BEE * मधुमक्षिका *f*, मधमाशी *f*; [an assemblage of persons who meet to engage in united labor for the benefit of an individual or family: a husking b.]; the humble - b. भृंगराज, भृंग; burrowing b. भोंवरा. -GARDEN मधमाशांचें मोहळ ठेवण्याची जागा *f*. -HIVE मोहळ *n*.

BEEF (*bos, bovis,* ox) an animal of the genus *Bos* बैल, गाई *f*, इ०; the flesh of bovine animals गोमांस. — *a.* गोमांसाचा. —BEEVES *pl* गुरें *n pl*, बैल *pl*.

BEER * एक मद्य आहे, बोझा *n*, 'बीर.'

BEETLE * a heavy mallet मोगरा, ठोकणें *n*; an insect एक सपक्ष कीटक आहे.— *v.* पुढें येणें: the cliff that *beetles* o'er his base. -BROWED *a.* उंच भोंवयांचा, उन्नतभृकुटी. -HEADED *a.* मूर्ख, टोणपा, ढ.

BEFALL *v.* (*be* and *fall*) बितणें, गुदरणें, भिडणें.— *i.* घडणें, होणें.

BEFIT *v.* (*be* and *fit*) साजणें, शोभणें, ठीक होणें.

BEFOOL *v.* (*be* and *fool*) भोंदणें, छकावणें.

BEFORE *prep.* (*be* and *fore*) in front समोर, पुढें: b. the fire; earlier than पूर्वी, अगोदर (John viii. 58); superior हून, पेक्षां (John i. 5); in presence of हुजूर, समोर: he bowed b. the people; in the power of हातांत, मुखत्यारींत: the world is b. thee; b. the wind, in the direction of the wind वाऱ्यापुढें, वाऱ्याच्या रोखानें -जोरानें. — *ad.* on the fore part पुढें, समोर; earlier पूर्वी, अगोदर. -HAND *ad.* अगोदरच, पूर्वीच. — *a.* सुखी, चार पैसे बाळगून. -TIME *ad.* पूर्वकालचा; पूर्वी.

BEFOUL *v.* (*be* and *foul*) मळीण -मळकट क., घाण क.

BEFRIEND *v.* (*be* and *friend*) बाजूराखणें, थाप संभाळणें, हात देणें.

BEG *v. Ger.* ask earnestly विनंती -मिन्नत करून मागणें; intreat as charity धर्मार्थ मागणें, भीक मागणें; take for granted प्रमाणाशिवाय मानणें, वादास्तव खरें असें कल्पिणें: to b. the question in debate [of, from, for]. — *i.* भीक मागणें, भिकाऱ्याचा धंदा क. -GAR भिकारी, याचक; — by profession झोळीबंद; — of victuals माधुकरी; crowd of *beggars* भिकार *n*; obstinate and troublesome b. खळभट, तेलंगभट; b. - like trick, way, habit भिकारचाळा -खोड *f*.— *v.* भिकेस लावणें, देशधडीस लावणें; exhaust रिता -शून्य क. -LINESS, meanness भिकारपणा, नीचपणा; extreme poverty कंगाली *f*, गरिबी *f*. -LY *a.* भिकार, कंगाल, कृपण; तुच्छ, हलका; [b. sins, that is those sins which idleness and beggary usually betray men to; such as lying, flattery, &c.]. —*ad.* हलकेपणानें &c. -GARY भिक्षुकवृत्ति *f*, कंगाली *f*.

BEGET* *v.* (*be* and *get*) procreate, as a father जन्मदेणें; produce as an effect उत्पन्न क.: love is *begot* by fancy [from].

BEGIN* *v.i.* commence आरंभ होणें; do the first act उपक्रम निघणें: b. every day to repent [by, with, at, upon].—*t.* आरंभणें, चालू क.; उपक्रम काढणें. -NER आरंभ करणारा; a tyro नवशिक्या, नूतन अभ्यासी. -NING आरंभ, प्रारंभ; the first cause आदिकारण *n*, मूल *n* (Rev. i. 8); the rudiments मूलपीठिका *f*.

BEGONE* *interj.* नीघ, तोंड घेऊन जा, काळेंकर.

BEGRUDGE, See GRUDGE.

BEGUILE* *v.* (*be* and *guile*) impose on मोह -भुरळें घालणें, ठकविणें; elude by craft भुलथाप -झोका देणें, झुलविणें; amuse रमविणें (time) [with].

BEHALF* (*be* and *half*) बाजू *f*, तरफ *f*, पक्ष; interest हित *n*, लाभ; on the b. of साठीं, करितां, अर्थ: धर्मार्थ.

BEHAVE* *v.i.* चालणें, वागणें, वर्त्तणें; to b. circumspectly जपून -विचारानें वागणें.—*t.* चालविणें, वागविणें.—BEHAVIOR वर्त्तणूक *f*, चालचर्या *f*, आचरण *n*; [to be, or to be put, upon one's good b., to be in a state of trial, in which something important depends on propriety of conduct;—during good b., during the integrity and fidelity of official conduct.]

BEHEAD* *v.* (*be* and *head*) डोकें मारणें -उडवणें, शिरच्छेद क.

BEHEST* आज्ञा *f*, आदेश.

BEHIND* *prep.* at the back of पाठीमागें, पाठीशीं: b. a door; left after the departure of मागें, पाठीमागें; inferior to in dignity, rank, or excellence उणा (2 Cor. xi. 5); close b. मागोमाग, पाठोपाठ; from b. पाठीमागून.—*ad.* पाठीमागें, पश्चात्; remaining शेष, बाकीचा: there is no evidence b.; past गत, मागचा -ला (Phil. iii. 13).

BEHOLD* *v.* observe with care विलोकणें, निरेखणें, पाहणें: b. the Lamb of God, which taketh away the sin of the world (John i. 29).—*i.* पाहणें, नजर लावणें. -EN *p. a.* आभारी, उपकारबद्ध.

BEHOOVE* *v.* अगत्य पडणें (Luke xxvi. 46).

BEING, See under BE.

BELABOR *v.* (*be* and *labor*) work carefully upon कमाई -मशागत क.: if the earth *belabored* with culture; beat soundly ठोकणें, खूप मारणें, बडवणें; cudgel सोटाळणें.

BELCH* *v.* eject or throw up from the stomach ढेंकरदेणें: eject violently from within आंतून जोरानें बाहेर टाकणें, सुरकांडी मारणें [out, forth].— *n.* ढेंकर.

BELDAM *F.* म्हातारडी *f*, थेरडी *f*.

BELEAGUER *v. D.* घेरणें, वेढणें, कोंडणें.

BELIE* *v.* give the lie to खोटा -लबाड क., खोटेपणा आणणें; calumniate by false reports तुफान घेणें; mimic नकल उतरणें, वाकुल्या दाखवणें.

BELIEVE* *v.* credit upon the authority or testimony of another विश्वासणें, खरा मानणें (Mark ix. 24) [in].— *i.* have a firm persuasion विश्वास भरवसा -असणें -धरणें (John xiv. 1) [in, on]; think वाटणें.—BELIEVER विश्वासणारा, विश्वासू; *Theol.* a professor of Christianity ख्रिस्ती.—BELIEF, assent to a proposition or affirmation, or the acceptance of a fact as real or certain, without immediate personal knowledge विश्वास; faith विश्वास, भाव, श्रद्धा *f*; the object of belief श्रद्धाविषय; opinion मत *n*; a tenet मार्ग, धर्म, मत *n*; assurance निशा *f*, खातरी *f*.

BELIKE *ad.* (*be* and *like*) कदाचित.

BELL* hollow metallic vessel which gives forth a clear, musical, ringing sound on being struck घाट *f*, घंटा *f*;— of a flower फुलाच्या खालची वाटी *f*. -FOUNDER घंटाकरणारा, घंटाकार. -MAN घांटवाजविणारा, घड्याळजी. -METAL कांसें *n*.

BELLE *F.* छानछूक बायको *f*, चटकचांदनी *f*.

BELLES LETTRES *F.* polite or elegant literature; including especially rhetoric, poetry, history, philology, and criticism अलंकारशास्त्र *n*.

BELLIGERENT *a.* (*bellum*, war, *gerere*, to wage) लढाई चालविणारा (powers); pertaining to war लढाईचा (right).

BELLOW* *v.* make a hollow, loud noise, as a bull डरकणें, डरकाळी फोडणें; roar, as the sea in a tempest, or as the wind when violent गर्जना क., सुसाटणें; b. and beat the mouth बोंबमारणें [out].

BELLOWS *sing & pl* भाता.

BELLY * that part of the human body which extends downward from the breast to the thighs पोट *n*, उदर *n*; the part of anything which resembles the human belly in protuberance or cavity पोट, फुगारा.—*v. i.* झोळ येणें, भोंगळणें. -BAND घोड्याचा तंग. -GOD पोटबाबू.

BELONG *v. D.* be the property of -चा असणें, सत्तेचा असणें: India *belongs* to Great Britain; be the proper business of -चें काम असणें; be appendant -कडचा असणें (Luke ix. 10); be native to जागचा-स्थानचा-देशचा असणें.

BELOVED *a.* (*be* and *loved*) आवडता, प्रिय, जिवलग.

BELOW *prep.* (*be* and *low*) under in place खालीं, खालतीं; inferior उणा, कमी: one degree b. kings; unworthy of अयोग्य. *ad.* beneath खालीं; on the earth भूमीवर, इहलोकीं; in hell अधोलोकीं, नरकांत; in a court of inferior jurisdiction कनिष्ठ कोर्टांत, खालच्या अदालतींत.

BELT* पट्टा, कमरपट्टा, कटिसूत्र *n*, मेखला *f*.—*v.* पट्ट्यानें -मेखलेनें वेष्टणें -बांधणें, कडें घालणें; [shear, as buttocks and tails of sheep].

BEMOAN* *v.* See BEWAIL.

BENCH * a long seat बांक *m f*; [a long table at which mechanics work: a carpenter's b.]; the seat of justice न्यायासन *n*, धर्मासन *n*, ईश्वरी गादी *f*; the persons who sit as judges न्यायाधीश; the court 'कोर्ट' *n*.

BEND* *v.* strain or move out of a straight line वांकडा -वक्र क.; direct रोख लावणें -देणें: b. thine ear; apply नियोजणें, कामीं लावणें: to b. the mind to study; subdue जिंकणें, वळवणें; prepare or put in order by straining ताणून तयार क. (Ps. vii. 12); to b. the brow, भोंवयांस आठी घालणें.—*i.* वांकणें, तीडखाणें, वळणें; be inclined with interest, or closely निश्चय -संकल्प क.: *bent* on mischief [with, down]; bow in prayer नमणें.—*n.* वांक, मुरडा, वळण *n*;—of a road वांकण *n*, वळसा.—BENT वांकडेपणा वांक; inclination कल, झोंक; declivity उतरण *f*: the b. of a hill; close application अभिनिवेश: the full b. of the mind.

BENEATH * *prep.* & *ad.* See BELOW.

BENEDICTION (*bene*, well, *dicere*, to say) the act of blessing आशीर्वाद देणें, स्वस्तिवचन *n*; invocation of happiness दुवा मागणें; the short prayer which closes public worship मंडळींतल्या ईश्वरभक्तीच्या शेवटची अल्प प्रार्थना *f*: to give the b.

BENEFACTION (*bene*, well, *facere*, to do) उपकार, कल्याण *n*; a charitable donation दान *n*, धर्मादाय.—BENEFACTOR उपकारकर्त्ता.— BENEFACTRESS कल्याणकर्त्री.—BENEFICE, an ecclesiastical living धर्मादाय, उपाध्याची वृत्ति *f*.—BENEFICENCE लोकोपकार, परोपकार.—BENEFICENT *a.* परोपकारी.—BENEFICIAL *a.* उपयोगी, हितकारक, लाभजनक [to]; [*Law*, entitled to have or receive benefit: the b. owner of an estate].—BENEFICIARY *a.* holding some office or valuable possession in subordination to another दुसऱ्याच्या हाताखालचा, पराधीन.—*n.* one who is maintained by charity उपकारजीवी; one who holds a benefice धर्माध्यापनवृत्तिभागी.

BENEFIT (*-fieri*, to be made) an act of kindness उपकार: Bless the Lord, O my soul, and forget not all his *benefits*; profit नफा, फायदा:—of clergy उपाध्याची वृत्ति *f*; public b. लोकोपकार; for the public; b. प्रजार्थ.—*v.* हित -कल्याण क.—*i.* हित होणें.

BENEVOLENCE (*bene*, well, *volere*, to wish) disposition to do good उपकारबुद्धि *f*, उपकारशीलता *f*, परेच्छा *f*; good done उपकार. —BENEVOLENT *a.* परोपकारी, परोपकारशील, जनहितेच्छु.

BENIGHTED *a.* (*be* and *night*) रात्रीनें गांठलेला, रात्रीग्रस्त, निशाक्रांत; involved in moral darkness अज्ञान -पाप इ०च्या अंधारानें व्यापलेला, तमोग्रस्त.

BENIGN *a.* (*benignus*) gracious दयाळु, कृपाळु; generous उदार; favorable शुभ, अनुकूल: the b. aspects of the seasons; wholesome हितकारक, हितावह (medicine); परोपकारिपणा *f*, दया *f*; हितकारकता *f*; शुभ *n*, मांगल्य *n*; सौम्यता *f*.

BENUMB* *v.* बहिरा -सुना -गुंग क.: a hand *benumbed* by cold.

BENZOIN *Per.* ऊद, लोभानी ऊद, देवधूप.

BEQUEATH* *v.* give or leave by will मृत्युपत्रांत देणें अथवा ठेवणें; hand down परंपरागत चालू ठेवणें [to].—BEQUEST मृतपत्रांकितदान *n*.

BEREAVE* *v.* हरवणें, नागवणें, नाडणें [of]. -MENT वियोग, नागवणूक *f*, नाश.

BERRY* बोर, करवंद इ० लहान फल *n*.

BERTH* (See BIRTH) a ship's station at anchor नांगरलेल्या गलबताची जागा *f*; place in a ship to sleep in जहाजांत निजायाची जागा *f*; official situation जागा *f*, असामी *f*, काम *n*: he has a good b.; to give the land or any object a wide b., is to keep at a distance from it.

BERYL *Ar.* गोमेद, बिरोजा.

BESEECH* *v.* विनंती क., मिन्नत क., पदर पसरणें, मागणें.

BESEEM* *v.* (*be* and *seem*) शोभणें, साजणें.

BESET* *v.* (*be* and *set*) set or place on, in, or round जडणें, भरणें: a robe b. with drops of gold; hem in घेरणें, वेढणें: let thy troops b our gates; harass घोटाळ्यांत पाडणें, गोंधळविणें: b. with ills. — TING *p. a.* नित्य बराबर असणारा किंवा जाचणारा (a sin).

BESIDE *prep.* (*be* and *side*) at the side of जवळ, बाजूस, पासीं: b. him hung his bow; aside from मार्ग सोडून, आड, एकीकडे; over and above शिवाय, खेरीज: to be b. one's self शुद्धीवर नसणें, भानरहीत होणें (Acts xxvi. 24).—, and BESIDES, *ad.* शिवाय, खेरीज: hast thou any here b.? —BESIDES *prep.* शिवाय, खेरीज, अणखी (Gen. xxvi. 1).

BESIEGE *v.* (*be* and *siege*) वेढा -घेरा घालणें; beset गरक -ग्रस्त क. [with].

BESMEAR* v. (*be* and *smear*), See BEDAUB.

BESOM* केरसुणी *f*, झाडणी *f*.— *v.* केरसुणीनें झाडणें.

BESOT *v.* (*be* and *sot*) make sottish with drink दारूनें मस्त क.; make dull सुस्त -गुंग क.

BESPANGLE* *v.* (*be* and *spangle*) टिकल्या लावून शोभवणें, टिकल्यांनीं भूषित क.

BESPATTER* *v.* (*be* and *spatter*) soil by spattering शिंतोडे उडवून नासणें; sprinkle with water पाण्याचा शिडकाव देणें, पाणी शिंपडणें; sprinkle with dirt and water गाळाचे शिंतोड्यांनीं भरणें; asperse with calumny निंदणें.

BESPEAK* *v.* (*be* and *speak*) speak for beforehand अगोदर बोलून -सांगून ठेवणें; foretell भाकीत क., सुचविणें: he *bespoke* dangers; speak to -स बोलणें: he thus the queen *bespoke*; indicate by external appearances बाहेरच्या खुणांनीं -लक्षणांनीं दर्शविणें.

BEST* *a.* सर्वांहून चांगला, उत्तम, in comp. तम· इष्टतम b. loved; most correct अतिशुद्ध, अगदीं रास्त.— *n.* पराकाष्ठा *f*: to do one's b.; [to make the b. of, to improve to the utmost;] to reduce to the least possible inconvenience गोड करून खावें मऊ करून निजावें.

BESTIAL, See under BEAST.

BESTIR* *v.* (*be* and *stir*) सावध -हुशार क. [one's self].

BESTOW * *v.* lay up in store संग्रह क., सांठविणें; use कामीं लावणें, खर्चणें (Deut. xiv. 26); give देणें (1 Cor. xiii. 3) [on, upon]; give in marriage लग्न करून देणें, कन्यादान क. -AL, -MENT देणें *n*; donation दान *n*.

BESTRIDE *v.* (*be* and *stride*) stride over ढेंगांत -पायाच्या बेचक्यांत धरणें (a horse); step over ढेंग टाकून पलीकडे जाणें, ओलांडून जाणें (a threshold).

BET * पण, पैज *f*, प्रतिज्ञा *f*.—*v.* पैज मारणें, पण क.

BETAKE* *v.* (*be* and *take*) आश्रय धरणें -क.: they b. themselves to submission.

BETEL *Malabar.* नागवेल *f*; b. leaf नागवेलीचें पान *n*. -NUT सुपारी *f*.

BETHINK* *v.* (*be* and *think*) आठवण क. -देणें [of].—*i.* आठवण क. -होणें -असणें.

BETIDE * *v. i.* घडणें, बितणें, गुदरणें.—*t.* -वर बितणें इ०.

BETIMES* *ad.* (*be* and *times*) seasonably वेळेवारीं, यथाकाळीं; soon लवकर, थोडक्यांत.

BETRAY *v.* (*-tradere*, to give up) give up treacherously दग्यानें स्वाधीन क., विश्वासानें गळा कापणें (Matth. xvii. 22); violate the confidence of, by disclosing a secret विश्वासघातानें बाहेर पाडणें, दग्यानें फोडणें (गुप्त गोष्ट); disclose, as something intended to be kept secret बाहेर पाडणें, बभ्रा क.: be cautious, lest you b. your ignorance; deceive फसविणें; indicate दर्शविणें, सुचविणें: this river *betrays* its original in its name [to, for].

BETROTH* *v.* (*be* and *troth*) contract to any one, in order to a future marriage मुलगा किंवा मुलगी देण्याचें कबूल क., वाग्निश्चय क.; espouse लग्न करतों ह्मणून कबूल क., वाणीनें वरणें, मागणी घालणें (Deut. xx. 7); [nominate to a bishopric, in order to consecration]. -MENT वाग्दान *n*, मागणी *f*; वाग्वरण *n*.

BETTER *v.* (*Skr. bhadra*) सुधारणें: love *betters* what is best.— *n.* advantage वर्चस्व *n*: to get the b. of an enemy; improvement सुधारणूक *f*; a superior जेष्ठ, वरिष्ठ, वडील; —used *pl.* — *a.* having good qualities in a greater degree than another पेक्षां -हून बरा; in comp. तर: महत्तर greater; more advantageous अधिक लाभाचा -सोयीचा (Ex. xiv. 12); more acceptable विशेष मान्य -ग्राह्य (1 Sam. xv. 22); improved in health बरा: the patient is b.; to be b. off, to be in a better condition सुखी -बरा असणें.— *ad.* बरें; more correctly अधिक शुद्ध रीतीनें -शुद्ध.

BETWEEN* *prep.* betwixt मध्यें, दरम्यान; shared by two दोघांचा, समाईक; in intermediate relation to मध्यें; from one to another -च्या मध्यें, आंत: if things should go so b. them.

BETWIXT* *prep.* मध्यें, दरम्यान; from one to another of -च्या मध्यें -आंत.

BEVERAGE (*bibere*, to drink) पिण्याचा पदार्थ, शरबत, चहा वगैरे.

BEVY *It.* a flock of birds साईर *f*, झुंड *f*; company मंडळी *f*, समुदाय; esp. of ladies.

BEWAIL* *v. i.* (*be* and *wail*) शोक -विलाप क., हाय हाय क.—*t.* -चा -विषयीं शोक क.

BEWARE* *v. i.* सावध -हुशार असणें, संभाळणें [of]: of all things in the world we should b. of that folly, by which men please themselves and despise better judgment.

BEWILDER *v.* (*be* and *wild*) घाबरविणें, भांबविणें, घोटाळ्यांत पाडणें. -MENT चकभूल *f*, भ्रांति *f*, घोटाळा.

BEWITCH * *v.* (*be* and *witch*) fascinate मोहणें, भुलविणें; affect by witchcraft मंत्रानें भारणें -मोहणें. -MENT मोहिनी *f*, मोहन *n*, नजरबंदी *f*.

BEYOND* *prep.* on the further side of पलीकडे; before पुढें : a thing b. us; out of reach of -च्या मर्यादे -अटोप्या बाहेर : b. expectation; above अधिक, आगळा, वर; to go b. मागें टाकणें, कान कापणें; in a bad sense फसविणें (1 Thess. iv. 6).

BEZEL *Chald.* कोंदन *n*, घर *n*.

BEZOAR *Per.* विषाचा मोहरा; bovine b. गोरोचन *n*, गोवर्धन.

BIAS *F.* a leaning of the mind मनाची ओढ *f*, झोंक, वांक.—*v.* मन वळविणें, मनास गांठ -पीळ देणें.

BIB (*bibere*, to drink) मुलाच्या उरावरचें वस्त्र रक्षणार्थ जें पडवस्त्र बांधतात तें.—BIBBER मद्यपी wine - b.—BIBULOUS *a.* शोषण करणारा, शोषक.

BIBLE (*Gr. biblos*, book) the sacred volume, in which are contained the revelations of God, the principles of Christian faith, and the rule of practice ख्रिस्ती शास्त्र *n*, पवित्रशास्त्र *n*, 'बैबल' *n*.—BIBLICAL *a.* ख्रिस्ती शास्त्र संबंधी *n*.—BIBLIOGRAPHY पुस्तकांचा इतिहास, पुस्तकवर्णन *n*.—BIBLIOMANIA प्राचीन व अपूर्व ग्रंथसंग्रह करण्याचा छंद -नाद -वेड *n*.

BICIPITAL *a.* (*bis*, twice, *caput*, head) दोन डोक्यांचा, द्विमूर्द्ध; having two origins दोन बुडख्यांचा (a muscle).

BICKER *v. i. W.* quarrel तंटा-वाद क., भांडणें; quiver कंपित होणें : the *bickering* flame.

BICORN *a.* (*bis*, twice, *cornu*, horn) दुशिंग्या, द्विशृंग.

BID *v.* offer to pay, as for a thing put up at auction लिलावांत किंमत करून मागणें; offer in words बोलणें; to b. one welcome क्षेम बोलणें; to b. farewell शेवटचा निरोप घेणें; to b. defiance धमकीची गोष्ट सांगणें, धाक घालणें; enjoin आज्ञा -ताकीद क., सांगणें (Matth. xiv. 28); invite बोलावणें, पाचारणें (Matth. xxii. 9); to b. beads माळ जपणें; [to b. fair, to offer a good prospect; to make fair promise].—*n.* लिलावांतली मागणी *f*. -DER लिलावांत मागणारा. -DING आज्ञा *f*, ताकीद *f*; आमंत्रण *n*; बोलावणें *n*; मोलानें मागणें *n*, मागणी *f*.

BIDE, See ABIDE.

BIDENTAL *a.* (*bis*, twice, *dens*, tooth) दोन दातांचा, द्विदंत.

BIENNIAL *a.* (*-annus*, a year) happening once in two years दोन वर्षांत एकदां होणारा; continuing for two years दोन वर्षें जगणारा, द्वैवार्षिक (plants).—*n.* दोन वर्षें जगणारें झाड *n*.

BIER * मनुष्याचें प्रेत स्मशानांत नेण्याची गाडी *f*, किंवा तिरडी *f*, शववाहन *n*.

BIESTINGS* *pl* चीक, खरवस.

BIFURCATED *a.* (*-furca*, fork) बेळक्याचा, दुफांट्याचा, द्व्यग्र.

BIG *a. W.* मोठा, स्थूल; pregnant गरोदर, गर्भार; great with young गाभ; inflated फुगलेला, तटतटीत; to look b. गर्वानें फुगणें.

BIGAMIST (*bis*, twice, *Gr. gamein*, to marry) दोन बायकांचा नवरा, किंवा दोन नवऱ्यांची बायको *f*.—BIGAMY, *Law*, एकाच वेळीं दोन नवरे अथवा दोन बायका करण्याचा अपराध.

BIGGIN *F.* मुलाचें टोपडें *n*.

BIGOT *Sp.* a person who is obstinately and unreasonably wedded to a particular religious creed, opinion, practice, or ritual अविचारानें अथवा हट्टानें आपलेंच मत धरून चालणारा मनुष्य, हटवादी -मतवादी मनुष्य. -ED. *a.* मतवादी, हटवादी.—RY मतवाद, हटवाद.

BILE (*bilis*) a yellow, greenish, bitter, viscid, nauseous fluid secreted by the liver पित्त *n*; ill humor खट्टीमजी *f*; to stir one's b. पित्त खवळणें.—BILIOUS *a.* पित्ताचा, पित्तसंबंधी; dependant on an

cess of bile पित्तप्रकृतीचा. — BILIARY *a.* पित्ताचा; conveying the bile पित्तवाहक (duct).

BILGE* protuberant part of a cask पिपाचें पोट *n* -चा फुगा; bulging part of a ship's bottom गलबताचें पोट *n.* -WATER गमत *n*, घमताड *n.*—*v.* गाबड पडणें (गलबताचें).

BILK *v. Ger.* फसविणें, आशाभंग क.

BILL * beak of a bird पक्ष्याची चोंच *f*; note of a bird पक्ष्याचा स्वर.

BILL* कोयती *f*, कोयता, इळा.

BILL *F. Law*, a declaration in writing, expressing some wrong the complainant has suffered from the defendant, or a fault committed by some person against a law फिर्यादीची लेखी जबानी *f*, दोषारोपाचें पत्रक *n*; obligation or security given for money under the hand, and sometimes the seal, of the debtor, without the condition of forfeiture for non-payment रिणकोच्या हातची चिठ्ठी *f* -चा दस्तऐवज; draft of a law कायद्याचा खरडा -मसुदा; an advertisement posted प्रसिद्ध ठिकाणीं लावलेली -चिकटविलेली जाहिरात *f*; account of goods sold or delivered विकलेल्या अथवा दिलेल्या जिनसांची याद *f*, 'बील' *n*: a grocer's b.; any paper containing a statement of particulars तपशीलवार याद *f*: a b. of fare; b. of exchange हुंडी *f*; acceptance of सकार; b. at sight रोकडी हुंडी *f*; b. given in lieu of a b. lost पेंठ *f*; b. payable only to purchaser धनीजोग हुंडी *f*;—to the bearer शहाजोग हुंडी *f*; indorsement of a b. सकार; letter of advice posted to a b. लगत हुंडी *f*; price paid upon a b. हुंडणावळ *f*; rejection of a b. नकार; to present a b. हुंडी लावणें; money paid upon a b. that has been dishonored सकराई *f*; b. of lading भरताडाची याद *f*; b. of mortality मुडदे सुमारी *f*; [b. of health, certificate of healthiness of a ship]; b. of divorce सोडचिठ्ठी *f*; b. of sale खरीदखत *n*; note चिठ्ठी *f*, चकती *f*; ticket authorizing soldiers to lodge in a house शिपायी लोकांस दुसऱ्याच्या घरांत बिऱ्हाड करण्याची परवानगी चिठ्ठी *f*. — *v.* शिपायांस बिऱ्हाडीं ठेवणें.

BILLIARD *a. F.* गोट्यांच्या खेळांचा (room).— BILLIARDS गोट्यांचा खेळ.

BILLION *F.* a million of millions महापद्म; ten *billions* शंकु; a hundred *billions* जलधी.

BILLOW* मोठी लाट *f*, दांडी *f*.—*v.* लाटे सारखें हेलकावणें -तरंगणें.

BIN* कणंग *f*, ठिकी *f*.

BINARY *a.* (*bini*, two by two) दोन, द्वि; double दुहेरी, द्विगुण.

BIND* *v.* (*Skr. bandh*) tie together जखडणें, बांधणें; confine बांधणें, बंधन क.;—the bowels कोठा बंद क., मलावष्टंभ क.;—a book बांधणें; oblige उपकारबद्ध क.;—by promise, vow, duty, &c. वचनानें बांधून घेणें, गळा गोवणें; place under legal obligation to serve चाकरीकरितां कायद्यानें बांधणें: *bound* out to service [to, with, together]; form a border गोट -मगजी लावणें; — a wheel by a tire धांव घालणें -बसविणें; to करार क.; over कोर्टांत हजीर होण्याकरितां मुचलका घेणें. —*i.* कठीण होणें: clay *binds* by heat. -ER पुस्तकाचे पुठे बांधणारा, 'बुकबैंडर'; bandage पट्टी *f*, आळाबांधा. -ING *a.* बांधणारा; obligatory आवश्यक. — *n.* बांधणें, बंधन *n*; आकलन *n*, निग्रह; मगजी *f*, गोट; बुकाची बांधणी *f*, 'बैंडिंग' *n*; cost of b. बांधणावळ *f*. -WEED, a climbing plant तेड. — BOUND बांधलेला, बद्ध; कर्तव्य.

BINNACLE *F.* गलबताच्या होकायंत्राची पेटी *f*.

BINOCULAR *a.* (*bini*, two and two, *oculus*, eye) दुडोळ्या, द्विनेत्र (animals); pertaining to both eyes दोन डोळ्यांचा (vision);

adapted to the use of both eyes दोन डोळ्यांच्या कामाचा (telescope).

BINOMIAL *a.* (*bis,* twice, *nomen,* name) दोन शब्दांचा -नांवाचा, द्विपद (root).

BIOGRAPHY (*Gr. bios,* life, *graphein,* to write) history of the life and character of a particular person चरित्र *n,* आख्यान *n*; biographical writings in general चरित्राचीं पुस्तकें *n. pl,* चरित्रें *n pl.*— BIOGRAPHER चरित्र वर्णनकरणारा, चरित्रलेखक.

BIPED (*bis,* twice, *pedis,* foot) दोन पायांचा प्राणी, द्विपाद.— *a.* दोन पायांचा, द्विपाद.

BIRD* पक्षी, पाखरूं *n*; *birds* of the same feather एका माळेचे मणी *pl.* -LIME पक्षी धरण्याचा चिकोटा.—BIRD'SEYE *a.* seen from above, as if by a flying bird उडत्या पक्ष्याप्रमाणें वरून पाहिलेला; general साधारण.

BIRTH* act of coming into life जनन *n,* जन्म; lineage वंश; extraction कुळी *f,* खाण *f*; a man of noble b. कुलीन, खानदानीचा; condition in which a person is born जन्मस्थिति *f,* जन्म; act of bringing forth जनन *n,* प्रसव, वीण *f*; that which is born बेत *n*; origin उत्पत्ति *f,* आरंभ, मूळ *n*: the b. of an empire; new b., *Theol.* commencement of a religious life नवाजन्म; a former b. पूर्वजन्म; a genius from b. बालसरस्वति *f*; by b. जन्मतः; from b. आजन्म, जन्मारभ्य, जन्मापासून; in b. उपजत; blind from b. उपजत अंधळा, जन्मांध; rich from b. गर्भश्रीमंत; untimely b. अकालजन्म; twice-b. द्विज. -DAY जन्मदिवस; the anniversary of one's birth वाढदिवस, जन्मदिवस;— of a god जयंती *f.* -PLACE जन्मदेश -भूमि *f.* -RIGHT, any right or privilege to which a person is entitled by birth, such as an estate descendible by law to an heir, or civil liberty under a free constitution जन्माधिकार (Heb. xii. 16); primogeniture जेष्ठत्व *n,* जेष्ठ भाग.

BISCUIT (*bis,* twice, *coquere,* to cook) एक प्रकारची वडी सारखी भाकर *f* आहे, 'बिस्कुट' *n.*

BISECT *v.* (*-secare,* to cut) दुभागणें, दुखंडणें [with, by]. -ION दुफोड *f,* द्विधाकरण *n.*

BISHOP (*Gr. epi,* over, *skopos,* inspector) an overseer देखरेख करणारा, अध्यक्ष; in Episcopal usage, the highest of the three orders of the Christian ministry धर्माध्यक्ष, 'बिशप.' -RIC, a diocese धर्माध्यक्षाच्या अधिकारांतला प्रांत; office of bishop बिशपाची जागा *f* -चें काम *n.*

BISON (*Gr.*) एक रानटी बैल आहे.

BISSEXTILE (*bis,* twice, *sextus,* sixth) ज्या वर्षी फेब्रुआरी महिन्यांत अधिक दिवस धरतात तें.

BIT* लगामाची कडी *f.*—*v.* लगाम घालणें.—*n.* a mouthful घांस, ग्रास; a small piece तुकडा, शकल *n*; a small instrument for boring भोंक पाडण्याचें एक लहान हत्यार आहे.

BITE* *v.* cut, crush, or seize with the teeth चावणें, डसणें; cause smarting to झोंबणें;—as cold वाजणें, लागणें;— as hot substances झोंबणें, खवखवणें, लागणें;—as speech वेधणें, टोंचणें, झोंबणें; to b. the lips दांतओठ खाणें -चावणें; cheat फसविणें; hold fast घट्ट धरणें: the anchor *bites* the ground; to b. in, to eat into metallic plates by means of an acid खाणें; to b. the dust, to fall in the agonies of death मरणाच्या वेदनेनें जमिनीवर पडणें: he made his enemy b. &c.—*n.* डंख, दंश, लचका; घांस, ग्रास; टोला, झोंका; a sharper उचल्या, पांढरा परीस.

BITTER* *a.* having a peculiar, acrid, biting taste कडू; calamitous अनर्थाचा, अरिष्टाचा (regret); piercing प्रखर, कडक, कठीण (cold); harsh कठोर, निष्ठुर, कडू (Col. iii. 19); b. enmity हाडवैर *n,* उभा दावा;

mournful खेदाचा, शोकसूचक. -LY *ad.* फारच, अति, रागानें, निकरानें; to censure b. खरडपट्टी काढणें; to weep b. कष्टी होऊन रडणें.

BITTERN *F.* बगळा.

BITUMEN *L.* a substance having a pitch-like odor, and burning readily with a bright flame, without any residue शिलाजित्, दगडफूल?

BIVALVE (*bis*, twice, *valva*, valve) ज्याला दोन शिंपळ्यांचीं झांकणें आहेत असा जन्तु.—*a.* दुझडपी, द्विकपाट.

BIVOUAC *F.* the watch of a whole army, as in cases of great danger of surprise or attack भयाच्या प्रसंगीं सर्व सैन्याचा पाहरा; an encampment without tents उघडातळ.

BLAB *v. Ger.* गुप्तगोष्ट फोडणें, ओकणें.—*i.* वटवटणें, बडबड क. -BER कानाचा हलका, वाचाळ, बोंबल्यागणेश.

BLACK *a.* destitute of light निस्तेज, प्रकाशहीन; of the color of coal काळा, कृष्णवर्ण; dark अंधारमय, अभ्राच्छादित; gloomy उदास; b. and blue, the dark color of a bruise in the flesh, which is accompanied with a mixture of blue हिरवा निळा, हिरवा पिवळा; [a b. sheep, one in a family or company who is unlike the rest, and makes trouble].—*n.* काळारंग, कृष्णवर्ण; a negro शिद्दी; a black dress, or mourning काळा अथवा दुःखाचा पोशाक; b. and white, in writing or print पांढऱ्यावर काळें क.: I must have that statement in b. and white.—*v.* काळा क.; soil मळवणें.—ART जादू *f.* -BALL a composition for blacking shoes जोडे काळे करायाची शाई *f*; a ball of black color, used as a negative in voting विरुद्ध मत देण्याची काळी गुटिका *f.*—*v.* संमतचिठ्ठीच्या पेटींत काळ्या गोळ्या टाकून निवडून घेतांना (एकाद्यास) वगळणें -वर्जणें. -BOARD शाळेंतील काळा फळा. —CATTLE गुरेंढोरें *pl n.* —COAT पाद्री.—DEATH धाम *f*, जरीमरी *f.*—EARTH काळीमाती *f.* -EN *v.* काळा क., अंधारमय क.; sully, as reputation अब्रूस काळीमा आणणें-लावणें.—*i.* काळा पडणें-पडत जाणें. -EYED *a.* काळ्या डोळ्याचा, कृष्णनयन. -GUARD सोदा, लुच्चा, पाजी. -ISM सोदेशाई *f*, लुच्चेगिरी *f.* -ISH *a.* काळसर. -LEG पांढरापरीस, सोदा. -LEAD मुरदाडशिसें *n.*—MAIL sum paid to robbers to ward off robbing कोंबडीपट्टी *f.*—MONDAY सुटीच्या नंतरचा पहिला सोमवार. -NESS काळेपणा; अंधार; enormity in wickedness अघोर-अतिदुष्टपणा. -SMITH लोहार. -WASH, lotion of calomel and lime-water काळाद्रव; as opposed to whitewash भिंतीस वगैरे देण्याचा काळारंग. -WOOD शिसवी लांकूड *n.*

BLADDER* a bag or sac in animals, which serves as the receptacle of some secreted fluid कोठा, आशय, पिशवी *f*; urinary b. मूत्राचा कोठा -पोटला; मूत्राशय; gall-b. पित्ताची पिशवी *f*; a pustule फोड, पुळी *f.*

BLADE* the leaf of any plant पात *n*, पान *n*; the leaf of grass काडी *f* तनसरी *f*; the cutting part of an instrument पान *n*; the scapula खवाटाचें हाड *n*, स्कंधास्थि *f*, *n*; broad part of an oar वल्ह्याचा रुंद भाग; a bright, sharpwitted dashing fellow फरडा, हुशार.— BLADED *a.* पानाचा two-b. दुपानी, दुतलफी.

BLAIN* फोड, व्रण.

BLAME *v. F.* find fault with दोष -शब्द -बट्टा लावणें [for].— *n.* imputation of a fault दोषारोप; fault दोष, अपराध; censure बोल, ठपका. -LESS *a.* निर्दोष, निरपराध. —BLAMABLE *a.* दोष लावायाजोगा, निंद्य, दोषपात्र.

BLANCH *v. F.* take out the color, and make white रंग काढून पांढरा क.; make white by stripping off the peel सोलून पांढरा क.: to b. almonds; *Gardening*, whiten by excluding the light, as the

stalks or leaves of plants छायेखालीं ठेवून पांढरा क.

BLAND *a.* (*blandus*) सौम्य, कोमळ. -ISH *v.* लाडीगोडी लावणें. -MENT लाडीगोडी *f*, मृदुभाषण *n*; artful caresses आदा, नखरा, विलास, लालित्य *n*.

BLANK *a. F.* of a white or pale color पांढरा, पिठूर: the b. moon; pale from fear फिकट, पिकूट, काळवंडलेला; confused विस्मित, चकित; void कोरा, शून्य, अलिखित (paper, wall); mere केवळ, शुद्ध, निस्ता; b. sheet शुद्धस्फटिक, मूर्ख; empty रिता, रिकामा; b. cartridge सुका तोटा; b. verse मुक्तप्रास: [b. door, a depression in a wall made so as to resemble a door]. —*n.* रिकामी जागा *f*, शून्यस्थल *n*; a lot by which nothing is gained कोरी चिठ्ठी *f*, कोरा कागद; [a paper containing the substance of a legal instrument]; point at which aim is taken निशाण *n*.

BLANKET *F.* घोंगडी *f*, धाबळ *f*, 'ब्लांकिट' *n*.

BLASPHEME *v.* (*Gr. blaphis*, damage) speak of the Supreme Being in terms of impious irreverence परमेश्वराविषयीं अनादरपूर्वक भाषण क., देवनिंदा क.; speak reproachfully of God, Christ, or the Holy Spirit देव, खीस्त अथवा पवित्रआत्मा याची निंदा करणें; speak reproachfully of दुसऱ्याची निंदा क. —*i.* देवनिंदात्मक भाषण क.—BLASPHEMER देवनिंदक.—BLASPHEMY देवनिंदा *f*.

BLAST* a gust of wind वाऱ्याचा झपाटा -सनाटा; hot b. झळ *f*, भबका; a forcible stream of air from an orifice वाऱ्याची धार *f*; the sound made by blowing a wind instrument फुंक *f*, फुंकारा; a blight तांबारा, चिकटा; puff श्वास (Job iv. 9); — of an evil eye दृष्ट *f*, दृष्टि *f*;—of a devil झपेट *f*;— of a planet संक्रांतीचें बसणें *n*.—*v.* blight करपविणें, जाळून टाकणें (Gen. xli. 6); strike with a sudden plague मरगीनें हाणणें; rend open by an explosion of gunpowder दारूनें-सुरंगानें उडवणें; cause to fail लटपटवणें, नष्ट-भंग क. (hopes, pride); with infamy कलंक लावणें, बदरंग क. -ER नाशकरणारा; सुरंग्या.

BLAZE* a stream of light and heat आगीचा लोळ, डोंब; to be all in a b. पायाची आग मस्तकास जाणें; expanded light भणभणीत उजेड: the b. of day; white spot on the forehead of a horse मुखपट्टा, नाम; wide diffusion and display आडंबर, पसारा. — *v.* धगधगणें, पेटणें; up भडकणें, पेटणें; mark, as a tree, by chipping off a piece of the bark झाडाच्या अंतर्सालीवर खूण क.; बोभाटा क., गाजवणें [up]. — BLAZON *v.* deck शृंगारणें, सजवणें; make public गाजवणें, दवंडी पिटणें; [explain in proper terms, as the figures on armorial ensigns].— *n.* अडंबर, पसारा; बोभाट, बभ्रा.

BLEACH* *v.* ओप देणें.—*i.* ओप येणें, पांढरा होणें [with].

BLEAK * *a.* desolate and exposed बिन आसऱ्याचा, उघड्या वाऱ्यावरचा; chill सर्द, थंड.

BLEAR* *a.* पिचका, बरबरीत, चिपडा; b.-eyed पिचक्या डोळ्यांचा.

BLEAT* *v.* बेंबें क., बेंबावणें.—*n* बें *n*, ब्यां *n*.

BLEED* *v.* let blood रक्त काढणें, शिरा काढणें -तोडणें; loose, as blood रक्त सांडणें; to draw money from one पैका काढणें: they *bled* him freely for this fund.—*i.* रक्त वाहणें -पाझरणें -ओघळणें: the arm *bleeds*; die a violent death जबरीच्या मरणानें -अपघातानें मरणें; loose sap, gum, or juice चीक वाहणें -गळणें -ठिपकणें -द्रवणें; the heart *bleeds* अंतःकरण द्रवतें. — ING रक्तस्राव, रक्तसांड *f*, शीर काढणें *n*.

BLEMISH* *v. F.* mark with deformity

ऐब -खोड क. -लावणें; tarnish, as reputation अब्रूस बट्टा -कलंक -लांछन लावणें -आणणें. —*n.* ऐब *n*, खोड *f*, गोम *f*; बट्टा, दोष.

BLEND* *v.* मिळवणें, मिसळणें. —*i.* एकत्र होणें, मिळून -मिसळून जाणें [with].

BLESS* *v.* make happy सुखी क.; invoke a blessing upon आशीर्वाद-दुवा मागणें; pronounce a wish of happiness to -चें -ला अभिष्ट इच्छिणें -चिंतणें (Rom. xii. 14); consecrate by pronouncing a blessing upon आशीर्वाद मागून वाहणें -अर्पणें, पवित्र कर्माकरितां वेगळा ठेवणें (Luke ix. 16); praise for benefits उपकारस्तुति क., उपकार आठवून स्तवणें (Ps. ciii. 1); esteem happy सुखी मानणें -लेखणें (Jer. iv. 2); to b. from -पासून बचावणें -राखणें. -ED *a.* सुखी, धन्य (Luke i. 48); imparting happiness सुखदायक -कारक -प्रद (time); enjoying spiritual happiness परमार्थसुखभोगी (a saint); heavenly आकाशीय, दिव्य (feet). -EDNESS सुख *n*; favor of God ईश्वरीकृपा *f*; single b. अविवाहित अवस्था *f*. -ING सुख *n*, कल्याण *n*; a gift accompanied with the kind wishes of the giver दान *n*, देणगी *f*, वर; आशीर्वाद; अभीष्टचिंतन *n*.

BLIGHT* mildew मेकाडा, लाखा; b. turning the crop to a brick-dust red गेरवा; —on wheat तांबारा, तांब *f*; —on zondlá अंगारा, काजळी *f*, चिकटा;—on rice पीस *f*, *n*;—on the mango-tree, &c. भिरड.—*v.* चिकटा -टाका -रोग पाडणें.

BLIND* *a.* destitute of the sense of seeing अंधळा, अंध; ignorant अज्ञान, विवेकहीन; morally depraved भ्रष्ट, अंध (Matth. xiii. 26); hidden गुप्त, अदृश्य; closed बंद, झांकलेला; b. tumor गांठ *f*; inconsiderate अविचाराचा (approbation); b. from birth जन्मांध; b. by night रातांधळा; stone-b. निपट अंधळा [to].—*v.* अंधळा क.; बुद्धिअंध क.; deceive फसविणें, डोळ्यांत माती घालणें.—*n.* a screen पडदा, अंतरपाट; something to mislead the understanding फसवणी *f*, हुलकावणी *f*; b. for a bullock झांकणी *f*;—for a horse अंधारी *f*. -FOLD *a.* डोळे बांधलेला. -LY *ad.* डोळे झांकून, मागें पुढें न पाहतां. -NESS अंधळेपणा, अंधत्व *n*; अज्ञान *n*; अविचार, अविवेक. -MAN अंधळा मनुष्य; [a person who deciphers indistinct addresses of letters in a post-office]. -MAN'S BUFF अंधळी कोशंबीर *f*. -WORM माहांडूळ *n*.

BLINK* *v.* shut out of sight दृष्टिआड लपविणें; avoid टाळणें, टाळाटाळ क.: to b. the question.—*i.* wink डोळे मिचकावणें, मिटमिट पाहणें; glimmer, as a lamp मिणमिणणें, टिकटिकणें. —*n.* a glimpse दृष्टिपात, नेत्रकटाक्ष; मिणमीण *f*, टिकटीक *f*.

BLISS* the highest degree of happiness परमसुख *n*; heavenly joy स्वर्गसुख *n*, दिव्यानंद. -FUL *a.* आनंदमय, परमसुखमय.

BLISTER (corrup. of *Plaster*) a thin bladder on the skin, containing watery matter फोड, फुगा; a plaster to raise a blister फोड आणणारें औषध *n*, प्रस्फोटकारी औषध *n*, 'ब्लिस्तर' *n*.—*v. i.* फोड उठणें -येणें [up, with].

BLITHE* *a.* आनंदी, हौसी, उल्लासी.

BLOAT *v.* (?) make turgid, as with water, air, or other means फुगवणें, सुजविणें; puff up फुगवणें, चढवणें, फुलवणें.—*i.* फोपसणें, फुगणें, तटतटणें. -ED *p. a.* फोपशा, कापस्या. -NESS फुगोसी *f*, फुगवटी *f*.

BLOBBERLIP* (*blobber* and *lip*) बाबरओंठ.

BLOCK *D.* a solid mass of wood ठोकळा, टोणका;—of stone शिला *f*, धोंड *f*; the mass of wood on which criminals are beheaded अपराध्यांचा शिरच्छेद करायाचा ठोकळा; chopping-b. of carpenters वाधी *f*, सांकटा;

the wooden mould in which hats, bonnets, &c. are shaped टोप्या वगैरे करायाचा लांकडी सांचा; a pulley कप्पा, कप्पी *f*; a connected row of buildings चाळ *f*; obstruction बुजविणें *n*, अवरोध; obstacle अडथळा, विघ्न *n*.—*v*. बुजविणें, बंद क., कोंडणें (a road). -HEAD टोणपा, ठोंब्या, मूर्ख.

BLOOD* the fluid which circulates through the arteries and veins of the human body, and of other animals रक्त *n*; relation by natural descent from a common ancestor एका घराण्याचा संबंध, सहोदर संबंध; descent वंश; honorable birth कुलीनता *f*, खानदानी *f*; royal lineage राजवंश; murder खून, हत्या *f*; shedding of blood रक्तपात; temper of mind मनाची तब्यत *f*; [to commit an act in *cold* b. is to do it deliberately, and without sudden passion; *warm* b. denotes a temper inflamed]; a man of spirit तलख मनुष्य; the juice of anything, esp. if red रस, द्रव: the b. of grapes.—*v*. bleed; रक्त काढणें; stain with blood रक्तानें भरणें; inure to blood, as a hound रक्ताची सवई लावणें. -HORSE थळाचा घोडा, उंच जातीचा घोडा. -HOUND एका जातीचा कुत्रा आहे; हा पारधींत घायळ होऊन पळालेल्या जनावराचा त्याच्या रक्ताच्या सड्यावरून माग काढतो. -LET *v*. शीर काढणें. -SHED रक्त पाडणें *n*, रक्तपात; the crime of shedding blood रक्त पाडण्याचा अपराध. -SHOT, -SHOTTEN *a*. रक्तानें भरलेला, रक्तपूर्ण: b. eyes रातड -राते डोळे खारावलेले डोळे. -SUCKER रक्तशोषण करणारा प्राणी; a leech जळू *f*; खुनी, घातकी. -THIRSTY *a*. घातुक, हिंसक. -VESSEL शीर *f*, रक्तवाहिनी *f*. -WOOD पतंगाचें लाकूड *n*.—BLOODY *a*. stained with blood रक्तानें माखलेला, रक्तबोंबाळ; attended with bloodshed रक्तपाताचा, काटाकाटीचा (battle); murderous क्रूर, घातुक. -FLUX रक्ताची हगवण *f*, रक्तातिसार.

BLOOM—blossom मोहर, फूल *n*; the opening of flowers फुलणें *n*, विकास; flowers open विकसित पुष्पें *n pl*; a state of development into beauty, freshness, and vigor नवती *f*, टवटवी *f*, तजेली *f*; [the delicate powdery coating upon certain newly-gathered fruits, as grapes, plums, &c.].—*v*. फुलणें, विकसणें; टवटवणें, लुसलुसणें. -ING *a*. फुलणारा, विकसणारा, टवटवीत, लुसलुशीत (face).—BLOOMY *a*. मोहरानें -फुलानीं भरलेला, फुलवऱ्याचा; नळनळीत, नवतीचा.

BLOSSOM* the flower of a plant मोहर, फूल *n*; blind b. वायुफूल *n*; [the color of a horse that has white hairs intermixed with sorrel and bay hairs].—*v. i*. फुलणें, फुलास येणें; flourish and prosper उत्कर्ष-भरभराट होणें, आबादान होणें (Is. xxvii. 6).

BLOT *v. Icel.* spot, stain, or bespatter, as with ink बोळा पाडणें, शाईनें भरवणें; tarnish कलंक -डाग लावणें; obliterate पुसून टाकणें: to b. out a word; erase खोडणें [out]. — *n*. बोळा, ठिपका डाग, बट्टा. -TING-PAPER शाई टिपून -शोषून घेणारा कागद, 'बलाटिंग पेपर.'

BLOTCH (do.) a pustule in the skin चकदा, चकदळ *n*.

BLOW *Ger.* a stroke टोला, प्रहार:—with the fist बुक्की *f*, ठोंसा; a sudden or severe calamity गहजब, चटका, चेपटा;—in trade घसरा, झोंका; an egg deposited by a fly in flesh सडी *f*; a violent wind झुंजाट -प्रचंडवारा; at a b. एका तडाक्यानें; to come to *blows* हातघाईस -हातपिटीस येणें.

BLOW* *v. i*. produce a current of air with the mouth फुंकणें, फुंक मारणें; move, as air वाहणें: the wind *blows*; pant धापा देणें; sound वाजणें: the organ *blows*; over वाता-

हत होणें, निष्फळ होणें, पोकळीस जाणें; to b. up उडणें, सुरंगानें -दारूनें उडणें.—*t.* फुंकणें: to b. the fire; वाहविणें, वाऱ्याच्या जोरानें लोटणें: the tempest *blew* the ship ashore; वाजविणें, फुंकणें: b. the trumpet; publish बभ्रा -बोभाट क.;—the nose शिंकरणें; (माशीनें)सडी घालणें; swell by injecting air वारा भरून फुगविणें (bubbles); out मालवणें, विझवणें; up वाऱ्यानें भरणें, वारा भरणें, फुगविणें; फुगविणें, चण्याच्या झाडावर चढविणें: to b. up one with flattery; चेतविणें, पेटविणें, आगीवर तेल ओतणें (a contention); उडविणें (a fort); वाताहत क., निष्फळ क. (a scheme); खणकावणें, खरडपट्टी काढणें, पूजा क.: to b. up a person for some offense; upon लटपटवणें, लथाडवणें. -PIPE फुंकनळी *f*, फुंकणी *f*.—BLOWN *p.a.* फुगलेला; stale शिळा, बासा; tired दमलेला, थकलेला.

BLUDGEON *Ger.* गदा *f*.

BLUE* निळा रंग.—*a.* निळा; low in spirits खिन्न, उदास: to feel b.; extreme अतिशयीत, पराकाष्ठेचा, कडकडीत: his religion ...'twas Presbyterian true b.—*v.* निळा रंग देणें, निळा क.; make blue by beating, as metals, &c. ताव देऊन निळा क. -BOOK [a parliamentary publication, so called from its blue paper covers]. -BLUISH *a.* निळासा. -NESS निळीमा *f*, निळारंग.—VITRIOL मोरचूत.

BLUNDER *v.* (see BLEND) mistake grossly from confusion of thought or purpose गोंधळून मोठी चूक क., घसरणें, बहकणें; stumble ठोकर खाणें.— *n.* चूक *f*, भूल *f*, भ्रम. -BUSS एकप्रकारची बंदूक आहे, दमामा; a stupid, blundering fellow टोण्या, ढ, भांब्या.

BLUNT *a. Ger.* not sharp बोथट, ठोसर, बोथा (knife); dull in understanding मंद, जड (wits); abrupt in address सडक-धोपटमार्गी (man). — *v.* धार मोडणें -बसवणें, बोथवणें; repress or weaken, any appetite, desire, or power of the mind रग मोडणें: to b. the edge of pain.

BLUR, see BLOT.

BLUSH *v. i. D.* grow red लाल होत जाणें, लालरंगानें फुलणें -खुलणें, लाली चढणें; redden in the face; as from a sense of shame, confusion, or modesty लाजेनें, धांदलीनें अथवा मर्यादेनें काळवंटणें -तोंड -नूर उतरणें.— *n.* लाजेची काळोखी *f*, काळवंडी *f*, लालरंग, लाली *f*; glance ईषद्दर्शन *n*, सकृद्दर्शन *n*; at the first b. सकृद्दर्शनी.

BLUSTER* *v. i.* blow fitfully with violence and noise, as wind सोसो वाहणें, घोघावणें; talk with noisy violence मोठाल्या गोष्टी सांगणें, ताव झाडणें, पादरधिटाई क. — *n.* सोसाट, सनाटा; पोकळवल्गना *f*, अरेरावकी *f*. -ER अरेराव, तालतोड्या, धांटिंगण.

BOA (*L.*) एक मोठ्या सर्पाची जात आहे. CONSTRICTOR एक मोठ्या जातीचा सर्प आहे, त्याची लांबी तीसपासून चाळीस फूट असती.

BOAR* (*Skr. varaha*) रानडुकर.

BOARD* a plank फळी *f*, तक्ता; a table to put food upon जेवण वाढायाचें मेज *n*, जेवायाचें मेज *n*; food अन्न *n*, जेवण *n*; entertainment मेजवानी *f*; a council convened for business, or any authorized assembly or meeting सभा *f*, पंच *pl*, 'बोर्ड'; deck of a vessel गलबताची तक्तपोशी *f*; the side of a ship गलबताची बाजू *f*, बोडद *n*; a table for a game पट, चौपट: a chess-b.; writing-b. पाटी *f*; pasteboard खळीचा पुठा; *pl* the stage in a theatre रंगभूमि *f*; on b. a ship गलबतावर, गलबतांत; to fall overb. गलबताच्या बाजूवरून समुद्रांत -पाण्यांत पडणें.—*v.* तक्तपोशी क., पाटणें (a house); go on board of, as a ship जाहजावर चढणें -जाणें; furnish

with food for compensation पैसे घेऊन जेवायास घालणें; place at board for compensation पैसे देऊन खाणावळींत ठेवणें, खाण्यास ठेवणें: to b. one's horse at a stable. —*i.* पैसे देऊन जेवणें, खाणावळींत जाणें. -ER खाणावळीचा -लींतला माणूस; लढाईत जाहजावर चढून जाणारा. -ING-HOUSE खाणावळीचें घर *n.* -ING-SCHOOL जेथें विद्यार्थ्यांची जेवणाची, बिऱ्हाडाची, व शिकण्याची सोयी असते असी शाळा *f*, 'बोर्डिंग स्कूल' *n.* -WAGES *pl* चाकरांची पोटगी *f*.

BOAST *v. i. W.* vaunt one's self बडीवार -फुशारकी मिरवणें (Eph. ii. 8, 9) [of].—*t.* बडीवारानें दाखविणें, फुशारकीनें मिरवणें; exult in confident expectation फुशारकी बाळगणें.—*n.* बढाइकी *f*, फुशारकी *f*, अभिमान; the cause of boasting अभिमानाचें मूळ *n* -कारण *n*, अभिमानास्पद *n*, अभिमान.

BOAT* a small open vessel नाव *f*, नौका *f*, 'बोट' *f*; any vessel गलबत *n*; a b. from 50 to 60 *kandis'* burden बतेला. — *v.* बोटींतून -वरून नेणें (goods).—*i.* बोटींतून जाणें. -MAN नावाडी, तांडेल. -SWAIN सारंग.

BOBTAIL (*Eng. bob*, short, and *tail*) लांडें शेंपूट *n*.

BODE* *v.* पुढलें सुचविणें, दर्शविणें.— BODING *a.* शुभाशुभ सूचना *f*.

BODKIN *W.* नाडी ओढायाची सळई *f* -चा दाभण.

BODY* the frame of an animal अंग *n*, शरीर *n*, देह; the main, central, or principal part, as of an animal, tree, army, country, &c. मुख्यभाग, मध्यप्रदेश, पोट *n*; a person मनुष्य, माणूस, जण *c*; a corporation मंडळी *f*, पुट्ठा, गट: a clerical b.; a system श्रेणी *f*, मालिका *f*, पद्धत *f*: a b. of laws; a general collection संग्रह, राशी *f*, संहिता *f*; a b. of water जलराशी; any substance distinct from others पदार्थ, द्रव्य *n*, प्रकृति *f*: a metallic b.; *Geom.* a solid figure भरीव आकृति *f*; *Paint.* thickness जाडी *f*; strength कस, जहाली *f*: wine of a good b. -GUARD हुजरात *f*, हुजूर हशम *f*. -BODIED *a.* संदेह, देही, शरीरी: able-b.—BODILY *a.* शरिराचा, शारीर (defects); शरीरमय (part).—*ad.* कुडीसहीत, सहतनु; entirely अगदीं, तमाम, बिलकूल: to carry away b.

BOG *Ir.* रुतण *f*, रेवण *f*, दलदल *f*. -GY *a.* दलदलीचा, रुतणाचा.

BOGGLE *Gael.* बागुलबावा.—*v. i.* अडखळणें, कांकूं क., वचकणें.

BOIL *v.* (*bullire*) cause to be agitated by the application of heat कढविणें, उकळणें; form, or separate, by boiling or evaporation रवा जमविणें (sugar, salt); subject to the action of heat in a boiling liquid, so as to produce some specific effect, as cooking, cleansing, &c. उकडणें, शिजविणें, उबळणें (meat, clothes).—*i.* खतखतणें, उकळी येणें: the water *boils*; with passion रागाचा कढ येणें, जळणें, खवळणें; be in boiling water उकळणें; away उकळून -कढून -आटून जाणें; over उतून जाणें, ऊत येणें. -ER कढविणारा; a vessel in which anything is boiled कढविण्याचें भांडें *n* (कढई इ०); *Mech.* तापक, 'बोईलर,' वाफेचा डबा. -ING *a.* उकळता: [b. point, the temperature at which a fluid is converted into vapour with the phenomena of ebullition].—*n.* उकळी *f*.

BOIL* गळूं *n*, करंट *n*, फोड; blind b. मुकें गळूं *n*.

BOISTEROUS *a. D.* violent सोसाट्याचा, प्रचंड (storm); turbulent धुमाळीचा, धांगडधिंग्याचा (behavior).

BOLD* *a.* daring धीट, साहसी; planned with courage छातीचा, धैर्याचा (design); impudent धिट्ट, धट्ट; daring निर्भय, हिय्येदार; standing prominently out to view ठळठळीत, उभट, ठळक; steep उभ्या चढाचा, उभट (cape). -LY *ad.* धैर्यानें, धिटाईनें, बेधडक. -NESS शूरत्व *n*, शौर्य *n*, हिमत *f*; धटाई *f*, निलाजरेपणा; assurance विश्वास, धीर; निर्भयपणा, प्रशस्तपणा.

BOLSTER* a long pillow उशी *f*; pad गादी *f*, तक्या. — *v.* गादीचा -लोडाचा आधार देणें; support आधार -आश्रय देणें: to b. baseness [up].

BOLT* an arrow तीर, बाण; a strong pin of iron &c. used to fasten something in a place खीळ *f*, अगळ *f*; a shackle बेडी *f*; a thunderbolt वज्र *n*, विजेचा गोल. — *v.* खीळ घालणें, अडसरानें बंद क.; अटकेंत ठेवणें, तांगडणें. — *F.* sift वैंचणें; — bran from flour चाळणें; examine as by sifting चाळून पाहणें [out]; [discuss or argue privately, &c. for practice, as cases]. — *i.* start forth like a bolt तिराप्रमाणें निघणें, सटकणें: to b. out of the room; fall suddenly like a bolt वज्रप्राय पडणें; spring suddenly aside उधळणें: the horse *bolted* [away, off, out, in].

BOLUS (*L.*) गुटिका *f*, गोळी *f* (औषधाची).

BOMB (*Gr. bombos*) *Mil.* कुलपी गोळा. -ARD *v.* कुलपी गोळ्यांचा भडमार क. -MENT कुलपी गोळ्यांचा भडमार.

BOMBAST (*bombax*, cotton) high-sounding words ढबीचें बोलणें *n*, डौलाचें भाषण *n*. -IC *a.* ढबीचा, डौलाचा.

BOND* that which binds बंद, बंधन *n*; *pl* imprisonment कैद *f*, बंदी *f*; a uniting tie लगाबांधा; an obligation बंद, बंधन *n*; *Law*, a writing under seal by which a person binds himself, his heirs, executors, and administrators, to pay a certain sum on or before a future day appointed खत *n*, रोखा; a b. not expected to be discharged बुडीत खत *n*; b. timbers लग. — *v.* रोखा लिहून देणें. — *a.* दास, बांधलेला. -AGE कैद *f*, बंदी *f*; दासपणा, दास्यत्व *n*; बंधन *n*, आळा. -MAID दासी *f*. -MAN दास.

BONE* a firm hard substance, composing the skeleton in the higher order of animals हाड *n*, अस्थि *f*, *n*; a b. of contention वादाचा विषय [to make no *bones*, to make no scruples.] — BONY *a.* हाडाचा, अस्थिमय; strong मजबूत, दृढ.

BONFIRE (*F. bon*, good, and *fire*) a fire made as an expression of public joy आनंद झाल्याबदल होळीसारखा अग्नि पेटवितात तो, जयसूचक अग्नि.

BONNET *F.* बायकांची टोपी *f*.

BONNY *a.* (*bonus*) See BEAUTIFUL.

BONUS *L. Law*, a premium given for a loan मनोती *f*; [extra dividend to the shareholders of a joint-stock company, out of accumulated profits].

BOOBY *F.* टोणपा, शुंभ, ढ.

BOOK* a collection of sheets of paper, or similar material, blank, written, or printed, bound together पुस्तक *n*, वही *f*, 'बुक' *n*; a treatise ग्रंथ; a part of a treatise खंड *n*, पर्व *n*, भाग; a collection of sheets in which accounts are kept वही *f*, चोपडी *f*; without b. आठवण करून, वाचल्या शिवाय, तोंडानें; प्रमाणा शिवाय: a man asserts without b.; in the *books* of -च्या कृपेंत -मर्जीत. — *v.* वहीवर -चोपडीवर मांडून ठेवणें, बार क. -BINDER पुस्तकें बांधणारा, 'बुकबैंडर.' -BINDING बुकें बांधण्याची विद्या *f*. -CASE पुस्तकें ठेवायाचें कपाट *n*. -KEEPER जमाखर्चाचा हिशेब ठेवणारा, हिसाबनीस *n*. -KEEPING वहीचें लिहिणें *n*, जमाखर्ची

लिहिणें *n.* -KNOWLEDGE पुस्तकें वाचून मिळविलेलें ज्ञान *n*, ग्रंथज्ञान *n.* -LEARNED *a.* versed in books; [ignorant of men or of the common concerns of life]. -MATE शाळेंतील सोबती, गुरुबंधु. -OATH शास्त्रावरची शपथ *f.* -SELLER पुस्तकें विकणारा, 'बुकसेलर.' -WORM, a worm that eats holes in books कसर *f*; a close student ग्रंथासक्त, ग्रंथगंड.

BOOM *D.* a hollow roar, as of waves or cannon लाटांची अथवा तोफेची पोकळ गर्जना *f*; a pole set up as a mark to direct seamen how to keep the channel in shallow water समुद्रांत जेथें पाणी उसळतें तेथें गलबत नेऊं नये ह्मणून जी काठी पुरतात ती.—*v. i.* गर्जणें.

BOON *n.* (*bonus*) देणगी *f*, वर. — *D.* अर्जी, विनंती *f.*—*a.* (*bonus*) आनंदी, हौसी (companions); bountiful उदार. — BOOR *D.* (*Skr. bhu*, to be) गांवढळ, नांगऱ्या. -ISH *a.* गांवढळ, गव्हार.

BOOT* *v.* लाभणें, नफा होणें. —*n.* नफा, फायदा, लाभ.—BOOTY लूट *f.*

BOOT *T.* चरमीजोडा, जांघे पर्यंत उंच जोडा.

BOOTH *W.* टाहाळ्यांचें छप्पर *n.*

BO-PEEP, a play to amuse children, by keeping behind any object, as a screen, and crying out Bo! कुकडेकू.

BORAX *F.* टांकणखार.

BORDER* the outer edge of anything कांठ, कड *f*;—of a country शींव *f*, हद्द *f*; — of a field कुपट *f*; — of cloth धडी *f*, किनारी *f*, कांठ; — of tanks, wells पाळ *f*, वरवंडी *f.* — *v.* किनारी -कांठ क.; a garment गोट घालणें, मगजी लावणें; be contiguous to लगत -सीमेस लागणें. -ER शिवशेजारी, लगऱ्याचा.

BORE* *v.* perforate भोंक -वेड पाडणें; vex छळणें, त्रास देणें.—*i.* भोंक पाडून आंत शिरणें: an auger *bores* well; भोंक पडणें: the timber does not b. well.—*n.* भोंक *n*, रंध्र *n*; the calibre तोफेच्या -बंदुकीच्या तोंडाचा व्यास, मोहरी *f* (*H*); पीडा *f*, व्याध *f*, शल्य *n.* —*Ger.* उंचबळलेली लाट *f*, कल्लोळ *f.*

BOREAS (*L.*) उत्तरेकडील थंड वारा.

BORN *p.p.* (See BEAR) उत्पन्न; to be b. उपजणें, निपजणें; to be b. again is to be regenerated, renewed, having received spiritual life (John iii. 3) पुनः जन्मणें, द्विजत्व पावणें.

BOROUGH* a town or village that sends members to parliament जो गांव पार्लमेंतांत सभासद पाठवितो तो.

BORROW* *v.* take or receive from another on trust, with the intention of returning or giving an equivalent for उसणें घेणें; take from another for one's use दुसऱ्या पासून वापरण्या करितां घेणें (Ex. xii. 35): it is not hard for any man, who hath a Bible in his hands, to b. good words and holy sayings in abundance; but to make them his own is a work of grace only from above.—*Milton.*

BOSOM* the breast of a human being ऊर, छाती *f*; secret thoughts पोट *n*, मन *n* (Job xxxi. 33); embrace मिठी *f*, कवळ *f*, वेंग *f*; the interior आंतला भाग, पोट *n*: b. of the earth; tender affections प्रीति *f*, लळा, प्रेम *n*; part of the dress worn upon the breast पोशाकाचा जो भाग छातीवर असतो तो, पदर, घोळ (Ex. iv. 6); in comp. intimate सलगीचा, जिवलग: b. friend; b. secrets पोटांतील गोष्ट *f.* — *v.* पोटांत -मनांत ठेवणें -राखणें; conceal लपविणें.

BOSS *F.* a knob गेंद, गोंडा, बोंड *n.*

BOTANY (*Gr. botanè*, a plant) वनस्पतिविद्या *f.*—BOTANICAL *a.* वनस्पतिविद्येचा *f* -संबंधी;

b. garden वनस्पतिविद्या शिकण्याचा बाग.— Botanist वनस्पतिविद्यावेत्ता.

Botch *It.* an ulcerous affection खांडूक *n*; a patch कप्पा, ठिगळ *n*; work done in a bungling manner गोदडशाई काम *n*.— *v.* ओबडधोबड तांगडणें; गोदडशाई काम क., कप्पे देणें.

Both* *a.* & *pron.* (*Skr. abha, ubhan,* the two) दोन्ही; without exception of either दोन्ही, उभयतां; the one and the other हें आणि तें.

Bothee (?) tease त्रास देणें; perplex तारंबळ क. —*n.* उपद्रव, खटपट *f*, उपद्व्याप; तारंबळ *f*, त्रेधा *f*.

Bottle *F.* a hollow vessel of glass शिसी *f*, कुपी *f*, 'बाटली' *f*;—of leather बुधला -ली *f* -लें *n*, दबडा; contents of a bottle बाटलीभर पदार्थ, बाटली *f*.—*v.* बाटलींत भरणें. -friend दारू पिण्याचा सोबती. -glass बाटलीची कांच *f*. -gourd दूधभोपळा, कद्दु.

Bottom * the lowest part of anything मूळ *n*, तळ *n*, बूड *n*; base बैठक *f*, पडघी *f*; foundation पाया, आधार, मूळपीठिका *f*; low land formed by alluvial deposits along a river तळ, ठाव, तळाची जमीन *f*; a dale सखल *n*, बदखल *f*, लवण *n*; the keel of a vessel पठार *n*; a ship गलबत *n*; power of endurance पाणी *n*, दम, जीव: a horse of good b; dregs मळ, रेंदाड *n*: the b. of beer; a ball of thread सुताची गुंडी *f*.—*v.* -वर बांधणें -रचणें [on, upon]; तळ लावणें -बसवणें -घालणें; गुंडी क.

Bougie *F. Surg.*, a waxed cord or stick बत्ती *f*; वात *f*.

Bough * फांदी *f*, शाखा *f*.

Bounce *v. i. D.* leap suddenly तटकन -सटकन उसळणें; thump दणकण आपटणें; bully तुच्छ मानणें.—*n.* उसळी *f*; a bold lie धादांत लबाडी *f*.

Bound (*bunda*) मर्यादा *f*, सीमा *f*, टप्पा.— *v.* मर्यादा क., आळाबांधणें. —*p. p.* बांधलेला, बद्ध.— *a.* destined नेमलेला; going जाणारा [to, for]. -ary मर्यादा *f*, सीमा *f*, हद्द *f*.

Bound *F.* उडी.—*v.* उडी मारणें; in dancing पावटा टाकणें.

Bounty (*bonus,* good) generosity औदार्य *n*; that which is given liberally उदारपणाचें देणें *n*; [a premium offered or given to induce men to enlist into the public service, or to encourage any branch of industry].—Bounteous, Bountiful *a.* उदार हाताचा, सढळ, उदार.

Bouquet *F.* bunch of flowers फुलांचा झेला -झुबका, तुरा; perfume सुवास, सुगंध.

Bout *D.* a turn खेप *f*, पाळी *f*; contest कलह, तंटा; conflict झुंज *n*, झोंबी *f*.

Bovine *a.* (*bos,* ox) गाई संबंधी, गव्य.

Bow* *v.* (*Skr. bhudj,* to be bent) bend वांकविणें, लववणें; incline वळविणें; subdue जिंकणें, दबविणें; bend, in token of respect नमविणें; incline towards लक्ष्य -चित्त देणें -लावणें.—*i.* वांकणें; नमणें, नमस्कार क. [down].—*n.* नमन *n*, नमस्कार; the prow (गलबताची) नाळ *f*.

Bow* anything bent कमानदार -वांकदार वस्तु *f*; an instrument for shooting arrows धनुष्य *n*, तिरकमटा; —of a saddle खोड *n*; —for cleaning cotton धनुकली *f*. -man तिरंदाज, धनुर्धारी. -shot बाणाचा टप्पा. -string धनुष्याची दोरी *f*, गुण.

Bowel (*botulus*) an entrail अंतडें *n*; the interior part of anything पोट *n*: the *bowels* of the earth; tenderness कळवळा, कळकळ *f*.—*v.* -चीं अंतडीं काढणें.

Bower* arbor गुंफा *f*, मंडप; country-seat बंगला.

BOWL* a concave vessel to hold liquors पेला, प्याला, वाटी *f*; —of wood काठवट *f*, पाळें *n*; — of earth खापर *n*; — of a gourd तुंबा; the hollow part of anything पोट *n*;—of a spoon हरडा;— of a *wina* भोपळा;—of a cocoanut shell डौला.

BOX* a case of any size पेटी *f*, डबा; a snuff-b. डब्बी *f*; the quantity that a box contains पेटीची मोताद, पेटी *f*; an inclosed place with seats in a theatre नाटकगृहांत पेटी सारखी एक बसायाची जागा असते, 'बाक्स'; a money-chest पैक्याची पेटी *f*; driver's seat on a carriage गाडीवर गाडी हाकणार बसायाची जागा *f*; a present बक्षीस *n*: a Christmas b.; in a b. अडचणींत. — *v.* पेटींत घालणें; गाडीच्या चाकांत डबा बसविणें. — *n.* (?) बुक्की *f*, मुष्टि *f*. —*v. i.* ठोसाठोसी क., मुष्टियुद्ध क.—*t.* बुक्कीनें मारणें; कानशिलांत बुक्की मारणें. -ER मुष्टियोद्धा. -ING ठोसाठोसी *f*, बुकलाबुकली *f*; मुष्टियुद्ध *n*.

BOY *Ger.* मुलगा, पोर; *Hindu Law*, a b. under five years of age कुमार; under eight रिपु; from the fifth to the end of the ninth year पौगंड; from the tenth to the sixteenth किशोर; after the end of his minority the youth is termed प्राप्तव्यवहार. -HOOD पोरपण *n*, बालपण *n*. -ISH *a.* पोरकट, पोरकळ.

BRACE (*brachia*, the arms) a prop धिरा, टेका; in carpentry कैंची *f*; a bandage ओढण *f*, कसणी *f*; *pl* of a drum कांकर *f*, ओढण *f*; of a cart नाडा, ओढण *f*; a pair जोडी *f*, जोड: a b. of ducks; *Print.* the mark { कंस. — *v.* धिरादेणें; ताणणें, ओढणें; — a drum चढवणें; strengthen बळकट -जिवट क. (the nerves). -LET कडें *n*, करभूषण *n*, चुडा; — of glass बांगडी *f*; seller of glass *bracelets* काजारी.

BRACHYGRAPHY (*Gr. brachus*, short, *graphein*, to write) संक्षिप्त अक्षरानीं लिहिण्याची विद्या *f*.

BRACKET *f.* (*brachium*, arm) कौंस, कोडें *n*.

BRACKISH *a. Ger.* खारट, मचूळ, सौळ.

BRAD *D.* a kind of nail तुरई *f*.

BRAG *D.* See BOAST. -GADOCIO अरेराव, शेंदड शिपाई.

BRAID* *v.* गुंफणें, वळणें.—*n.* वेणी *f*.

BRAIN* the whitish, soft mass which constitutes the anterior extremity of the nervous system in man and other vertebrates, occupying the upper cavity of the skull, and considered to be the centre of sensation and perception मेंदू, मगज, मज्जा *f*; the seat of intellect बुद्धीचें स्थान *n*; the understanding बुद्धि *f*, अक्कल *f*, fancy कल्पना *f*. -LESS *a.* बुद्धिहीन. -PAN कंवटी *f*, कपाल *n*.

BRAKE *Ger.* an instrument for breaking flax ताग ठेंचण्याचें एक यंत्र आहे: a baker's kneading-trough पीठ मळायाची काठवट *f*; [contrivance for confining refractory horses while the smith is shoeing them]; a large heavy harrow for breaking clods after ploughing गुटाळ *n*; [a piece of mechanism for retarding motion by friction, as of a railway car; a carriage without a body used for breaking in horses].

BRAMBLE* कांटेझाड *n*.

BRAN *W.* कोंडा; as remaining in fine flour तांब *f*. -NEW. See BRAND-NEW.

BRANCH *F.* a bough फांदी *f*, खांदी *f*; ramification शाखा *f*, कोंब; a section अंग *n*, प्रकरण *n*: a b. of knowledge; line of family descent, in distinction from some other line or lines from the same stock पालव, शाखा *f*; minor b. उपांग *n*; a chandelier झुंबर; [*Law*, a warrant or commission

given to a pilot].—*v. i.* फांद्या फुटणें; विभाग -पोटभाग क.; off फांदी -फाटा फुटणें -फेलावणें; out पान्हाळ क., (भाषणाचा) विस्तार क.; विषयाचे बहुत विभाग क. — *t.* फांद्या -शाखा फोडणें; adorn with needlework representing branches, flowers, or twigs फुलाफांद्याचा कशीदा काढणें -क. -LET लहान फांदी *f*, शिपटी *f*.—BRANCHY *a.* फांद्यांनीं भरलेला; पसरट फांद्याचा.

BRAND* a burning piece of wood कोलीत *n*; a mark made by burning with a hot iron डाग, लास; quality जात *f*: good b. of flour; a mark put upon criminals with a hot iron अपराध्याला डागणीनें जी खूण करितात ती; stigma कलंक, डाग; [a disease in vegetables, by which their leaves and tender bark are partially destroyed, as if burnt]; डागणें, डाग देणें; कलंक लावणें. -ING-IRON डागणी *f*. -NEW *a.* नवा कोरा, घणकोरा.

BRANDY (*burned wine*) एक प्रकारची तलख दारू आहे, 'ब्रांडी.'

BRASS * alloy of copper and zinc पितळ *n*; impudence तिखें *n*, नाक *n*, निलाजरेपणा. -FOIL पितळीपान *n*.—BRASSY *a.* पितळेचा, पितळी; having the color of brass पितळी रंगाचा; hard as brass पितळे सारखा कठीण.—BRAZIER, one who works in brass कांसार; a pan to hold coals शेगडी *f*.—BRAZE *v.* solder with an alloy of brass and zinc पक्का डाक लावणें, पितळेनें सांधणें; cover or ornament with brass पितळेनें मढवणें किंवा शृंगारणें; harden to impudence कोडगा-निलाजरा होणें, मुसळ नेसणें.—BRAZEN पितळेचा; also -FACED निलाजरा, कोडगा.

BRAT कारटें *n*, पोरटें *n*, पोर *n*; *brat* and bantling पोरेंबाळें *pl.*

BRAVE *a. F.* of noble or admirable courage शूर, धारिष्टवान; excellent उत्तम, नामी, खासा, उमदा : iron is a b. commodity.—*v.* धैर्यानें गांठणें, शिंगावर घेणें.—BRAVERY शौर्य *n*, धाडस *n*, छाती *f*; उमदेपणा, छानदारी *f*. — BRAVADO (*Sp.*) फुशारकीची धमकी *f*, फुशारकी *f*.— BRAVO (*It.*) मारेकरी. —*int.* शाबास, भले, वाहवा.

BRAWL *v. i. F.* quarrel noisily and indecently कलागत -कटकट क.; make a noise गलबला -गोंगाट क.—*n.* कलागत *f*, कटकट *f*, गोंगाटाचें भांडण *n*. -ER कटकट्या, कलागत्या.

BRAWN *F.* flesh of a boar डुकराचें मांस *n*; salted and preserved flesh of the wild boar रानडुकराचें खारलेलें मांस *n*; the arm बाहु, दंड; muscular strength अंगबल *n*, शरीरबल *n*. — BRAWNY *a.* मांसल, गोंडस; strong बळकट.

BRAY *v. F.* खलणें, कुटणें (Prov. xxvii. 22).—कर्कश शब्दानें बोलणें -वाजवणें क.—*i.* utter a harsh cry, as an ass गाढवासारखें ओरडणें; make a harsh, grating cry कर्कशनाद क. —*n.* गर्धभध्वनि *f*, खरशब्द.

BRAZEN, See under BRASS.

BREACH* the act of breaking मोडणें *n*, तोडणें *n*, भंग; gap made by breaking खिंड *f*, भगदाड *n*;—violation भंग; of promise प्रतिज्ञाभंग; — of confidence विश्वासघात; a breaking up of amicable relations फूट *f*, तूट *f*, बिघाड.

BREAD* भाकर *f*, रोटी *f*; food अन्न *n*, भाकर *f*, जीवन *n* (Matth. vi. 11).

BREADTH* रुंदी *f*;—of cloth पन्हा.

BREAK* *v.* divide with violence फोडणें, मोडणें; sever by fracture तोडणें (a rope); disclose फोडणें, मनाची गांठ सोडणें (secrets, the mind); infringe मोडणें, भंग क. (a law, promise); interrupt खंड पाडणें, भंग क., मोडणें (sleep); destroy the completeness of विजोड क. (a set); shatter to

pieces चकणाचूर क., तुकडे तुकडे क.; bruise ठेंचणें; weaken, impair, or subdue, as health or the faculties बिघडणें, निर्बळ क.; diminish the force of वेग -रग -बळ मोडणें; tame वठणीस आणणें, वश क. (a colt); make bankrupt मोडणें, दिवाळें काढणें; cashier बरतर्फ क., कामावरून दूर क. -काढणें: I see a great officer *broken;* — the spirits मनोहत -भग्नाश क.; down दाबून -दडपून टाकणें; in जबरीनें आंत शिरणें: to b. in a door; वठणीस आणणें, राबविणें (a horse); खोड -व्यसन सोडविणें, सुधारणें (one of a habit); off तोडणें (a twig); शेवट क., सोडणें (Dan. iv. 27); open फोडून उघडणें; out फोडून घेणें किंवा काढणें, उखळणें: to b. out a pane of glass; over उल्लंघन क. (a rule); up मोडणें, बरखास्त -विसर्जन क. (the court);—an army रजा देणें, मोडणें;—the back बगाड -पेंकाट मोडणें -बसविणें;—cover झाडींतून -जाळींतून निघणें (game); fast पारणें सोडणें; न्यहारी क.; ground नांगरणें, खणणें, पोखरणें इ०; fig. आरंभ क, पेरणें; गलबताचा नांगर तळापासून सोडविणें;—the heart दुःखानें छाती फोडणें; —a house, *Law,* remove any part of the house or of the fastenings provided to secure it, with violence and a felonious intent घर फोडणें (चोरीच्या इराद्यानें); — ice तोंडच्या -आरंभींच्या अडचणींतून पार जाऊन आरंभ क.;—jail तुरंगांतून पळून जाणें; —a path वाट फोडणें;—wind पादणें.—

Break *v. i.* फुटणें, मोडणें, तुटणें (Matth. ix. 17); open spontaneously फुटणें, उफलणें, उतटणें (a tumor, bubble, seed-vessel); burst forth violently एकदम -जोरानें येणें -पडणें (a storm); तुटणें, निर्बळ होणें: see how he begins to b.; दिवाळें निघणें, पडणीस येणें; change the gait चालण्याची ढब बदलणें: to b. into a run; फूट होणें, बिघाड पडणें; away पळून जाणें; फाकणें, वितुळणें (clouds); down मोडून खालीं पडणें (coach); मोडणें, गळणें, थकणें: he had *broken* down at the outset; forth निघणें, बाहेर पडणें; [in, into] (Is. lviii. 8; xliv. 23); in, upon एकदम आंत येणें -शिरणें -जाणें; loose सुटणें, मोकळा होणें; off तुटणें, तुटून वेगळा होणें -येणें; out सुटणें, बंद तोडणें; (पाणी इ०) उतून निघणें; (आग) भडकन पेटणें -दिसणें; (रोग) उद्भवणें; (पुरळ इ०) उतणें -उठणें -निघणें; up उखळणें, फुटणें: the wreck will b.; with बिघडणें; फाटाफूट होणें; समजूत क. -पाडणें, बोलणें.—

Break *n.* खिंड *f,* खिंडार *n;* pause खंड, विराम;—in the weather उघाड, उघाडी *f;* the dawn अरुणोदय, प्रभात *f;* — in a wall भगदाड *n,* खिंडार *n;* [a kind of carriage]. -able *a.* फुटायाजोगा, भंगेशील. -age फुटीतुटीची सूट *f.* -er फोडणारा, भंजक; *pl* किनाऱ्यावर -खडकावर आदळून फुटणाऱ्या लाटा. -fast न्यहारी *f.*—*v.* न्यहारी क. -water लाटांचें जोर मोडण्या करितां बांध, भिंत वगैरे जें घालतात तें.

Breast* the fore part of the body between the throat and the belly ऊर, छाती *f;* protuberant glands, situated on the front of the chest or thorax in the female of man and of some other mammalia, in which milk is secreted for the nourishment of the young थान *n,* स्तन *n;* fig. the heart मन *n,* पोट *n;* make a clean b. सर्व कबूल होणें -क.; सर्व गुज सांगून मनावरचें ओझें उतरणें. -bone उराचें हाड *n,* उरोस्थि *n.* -deep, -high *a.* छाती इतका, छातीभर. -plate उरस्त्राण *n.* -work छाती एवढी उंच भिंत *f.*

Breath* air inhaled and exhaled in the respiration of animals श्वास, दम; the act of breathing naturally or freely दम घेणें *n,* श्वासोश्वास चालवणें *n;* power of respiration

श्वास घेण्याची शक्ति *f*; life जीव, प्राण; time to breathe दम, गम: let me take b.; a single respiration दम; an instant क्षण: he smiles and frowns in a b.; very slight breeze झुळूक *f*, वाऱ्याची लहर *f*.—BREATHE *v*. श्वासोश्वास घेणें -टाकणें -चालणें; live जगणें; inject by breathing फुंकून आंत सोडणें (Gen. ii. 7); utter softly मंजूळ वाणीनें बोलणें; emit, as breath श्वास सोडणें-टाकणें; cause to sound by the breathing फुंकणें, वाजविणें: to b. on the flute; suffer to take breath दम घेऊंदेणें (a horse); put out of breath दमविणें, बेदम क.; — hard दम लागणें -चढणें. -LESS *a*. बेदम, श्रांत; dead मेलेला, मृत (body). -ING श्वासोश्वासाची क्रिया *f*, श्वासोश्वास; inspiration प्रेरणा *f*, संचार; secret prayer गुप्त -मनांतील प्रार्थना *f*; utterance उद्गार, उच्चार; vent श्वास सोडण्याची जागा *f*, उसास; *Gram.* aspiration महाप्राणउच्चार; hard b. महाप्राण; — as practised by the Vedantist प्राणायाम.

BREECH* lower part of the body behind ढुंगण *n*; hinder part of anything पाठीमागला भाग, पश्चाद्भाग; [esp. the part of a cannon or other arm behind the bottom of the bore]; *pl* चोलणा, गुडघी *f*; to wear the b., to usurp the authority of the husband;—said of a wife नवऱ्याच्या डोकीवर मिरें वाटणें -बसणें.

BREED* *v*. procreate उत्पन्न क., जन्म देणें; bring up लाहनाचा थोर क.; educate शिकवून तयार क., तरबेत क.; originate उत्पन्न क.: my quaint habits b. astonishment; be the native place of -ची खाण असणें; give birth to जन्म देणें: a pond *breeds* fish. —*i*. उपजणें (Gen. viii. 17); be formed in parent or dam (उदरांत) बनणें, आकारास येणें: children b. in the matrix; raise a breed ताणी वाढविणें: choose the kind of animal which you wish to b. from; [to b. in and in, to b. from animals of the same stock that are closely related].—*n*. जात *f*, अवलाद *f*;—of cattle ताणा, वाढा. -ING पालण *n*, पोषण *n*; manners माणूसकी *f*, विनय; रीत -शिक्षा -राबता लावणें *n*.

BREEZE *F*. झुळूक *f*, लहर *f*, मंदवायु; balmy b. मंदसुगंधवायु; cool and balmy b. शीतसुगंधवायु; land-b. मतलई *f*; sea-b. समुद्राकडला वारा.

BRETHREN *pl* (See BROTHER) भाऊ, बंधुवर्ग -जन *pl*.

BREVET (*brevis*, short) *Mil*. लश्करी सरदाराची सनद *f*; ही पगारापेक्षां मोठ्या जाग्याची असते.—BREVIARY, an abridgment संक्षेप, सार *n*; a book containing the daily service of the Roman Catholic or Greek Church रोमन क्याथोलिक किंवा ग्रीक मंडळीचें नित्य प्रार्थनापद्धतीचें पुस्तक *n*. — BREVITY, briefness of time अल्पकाळ; संक्षेप, समाहार.

BREW* *v*. seethe शिजवणें; prepare, as a liquor, from malt and hops माल्ट नांवाची दारू क.; plot पिकवणें, धुमसवणें; शिजवणें; बीरदारू करण्याचा धंदा क. -ER यवसाची दारूकरणारा.

BRIBE *F*. a price, reward, gift, or favor bestowed or promised with a view to pervert the judgment or corrupt the conduct of a judge, witness, or other person लांच *m*, *f*, पानसुपारी *f*, लुचपत *f*; allurement लालूच *f*, खाऊ; sums expended in *bribes* to official persons अंतस्थ *n*.—*v*. लांच देणें, तोंड दाबणें, हात चेपणें; gain by a bribe लांच देऊन मिळविणें. —BRIBERY लांचेचा व्यापार -व्यवहार.

BRICK* वीट *f*, ईट *f*; baked b. पक्की ईट *f*; sun-dried b. कच्ची ईट *f*; [a b. in his hat, used of a person intoxicated].—*v*. वीटबंदी क.; imitate a brick wall on विटांच्या

भिंती सारखी नकल क. -BAT इटकूर *n.*— -CLAY विटा करायाची माती *f*, विटांची माती *f*. -DUST इटकर *f*, *n*. -KILN विटा भाजण्याची भट्टी *f*; the mouth of a b. बारा. -LAYER गवंडी. -MAKER कुंभार. -TROWEL करणी *f*. -WORK ईटबंदी *f* -काम *n*.

BRIDE* (*Skr. praudha, pri,* to love) a woman recently married नवरी *f*; a woman contracted to be married नवरी *f*. -GROOM नवरा. -MAID करवली *f*. -MAN करवला. -WELL बंदीखाना, तुरंग.

BRIDGE * a way built over water पूल, सेतु; supporter of the strings of a fiddle घोडी *f*, चौकी *f*, तारदानी *f*;—of the nose नाकाचा दांडा.—*v.* -ला -वर पूल बांधणें: to b. a river पूल बांधून रस्ता क.

BRIDLE* instrument with which a horse is governed लगाम *m*, *f*, अनीन *f*; restraint लगाम *f*, संयम. — *v.* लगाम देणें -घालणें -चढविणें; आकळणें, लगामीं ठेवणें -चालवणें; put one's b. in the jaws of नाकीं वेसण घालणें. -HAND लगामीचा हात. -PATH घोडेवाट *f*.

BRIEF *a.* (*brevis,* short) short in duration अल्पकालिक; concise संक्षिप्त, लहान, थोडा (tale).—*n.* संक्षेप, समाहार; an abridgment of a client's case, made out for the instruction of counsel on a trial at law वकिलाकरितां तयार केलेलें कुळाच्या खटल्याचें टिपण *n*; a writ राजाज्ञापत्र *n*. -LESS *a.* ज्यापासीं कूळ किंवा खटला नाहीं तो (barrister). -LY *ad.* थोडक्यांत, संक्षेपानें.

BRIER * a prickly plant काटेझाड *n*; the sweet-brier and the wild-brier रानगुलाब, सदागुलाब.

BRIG *F.* टुकाठी जहाज *n*.

BRIGADE *F.* a division of troops commanded by a general officer or brigadier ब्रिगेडियर पदवीच्या सरदाराच्या सैन्याची टोळी *f*; ह्या टोळींत अमूकच संख्या लोक असावे असा नेम नाहीं. — BRIGADIER ब्रिगेड नामक सैन्यभागाचा सर्दार, 'ब्रिगेडीर' साहेब.

BRIGAND *F.* पुंड, बंडकरी, लुटारू. -AGE पुंडाई *f*, बंडाळी *f*.

BRIGHT * *a.* (*Skr. bhrâdsh,* to shine) उजळ, चकचकीत, टिपूर, तेजस्वी; clear निर्मळ, स्वच्छ (wine); having qualities that render attractive मनोरम गुणांचा, मनोहर; sparkling तेजदार, पाणीदार (eyes); sparkling with wit चाणाख्य, तैलबुद्धि: be b. and jovial among your guests; evident स्पष्ट, व्यक्त; b.-eyed दिव्यलोचन. -EN *v.* उजळ क.; तेजोवृद्धि क., उजरणें, make cheerful आनंदित क. — *i.* उजळणें, उजळ होणें; रंगास चढणें, खुलणें: उजरणें. -NESS तेजी *f*, कांति *f*, प्रभा *f*, झिलई *f*; उजळपणा; बुद्धिसौक्ष्म्य *n*, सौंदर्य *n*.

BRILLIANT *a. F.* sparkling with lustre लकलकीत, पाणीदार, तेजोमय; shining तेजशाली, प्रतापशाली (talents).—*n.* a diamond of the first cut or water तरतरा.—BRILLIANCY लकलकी *f*, तकतकी *f*, पाणी *n*, तेज *n*, ढाळ.

BRIM * rim of any vessel, or other thing कड *f*, कांठ, तोंड *n*; the brink पाल *f*, किनारा, तट. — *v. i.* तंतोतंत -कांठोकांठ भरणें. -FUL *a.* तोंडोतोंड, भरपूर, तुडुंब.

BRIMSTONE * गंधक.

BRINDED, BRINDLED* *a.* बांडा, कसरा (cat, lion).

BRINE* matter saturated with salt मिठवणी *f*, खार; the sea समुद्र; tears, so called from their saltness आंसवें *n pl.*—*v.* मिठवणींत घालणें, खारणें; mix salt with मीठ मिसळणें -घालणें (hay).

BRING* *v.* fetch आणणें, घेऊन येणें; procure मिळवून -प्राप्त करून देणें: nothing will b. you more honor; influence मन वळविणें; convey नेणें: the water *brings* over with it

some oil; about घडविणें, बधविणें; back परत आणणें -बोलावणें; down खालीं आणणें, उतरणें; नमविणें, गर्वखंडन क., पाणउतारा क. (high looks); forth प्रसविणें, जन्म देणें; उपजविणें; उघडकीस आणणें; forward पुढें -दृष्टोत्पत्तीस आणणें; in चालू क., प्रचारांत आणणें; मर्यादेंत -आटोप्यांत आणणें; मिळकत करूनदेणें, वसूल येणें; मंडळींत-सोबतींत मिळायास मनावणी क.; off दूर नेणें; सुटका मिळविणें; दंडमुक्त क.; on आरंभ करायास लावणें (an action); उत्पन्न क., आणणें (a disease); out उघड क., फोडणें; over पैलतिरीं -कांठास नेणें (passengers in a boat); पलीकडे नेणें (despatches); मन वळविणें, मत फिरविणें; to शुद्धीवर -देहभानावर आणणें (a fainting person); under वश क., जिंकणें; दाबांत ठेवणें; up लहानाचा मोठा क.; प्रतिपाळ क.; शिकविणें, तरबेत क.

Brink *D.* कड *f*, किनारा, तट, कांठ.

Brisk *a. W.* full of liveliness and activity आनंदी, उल्लासी; full of spirit हुशार, चपळ, तलख; — of towns गजबजीत, भरलेला; — of trade तेजीचा, भरभराटीचा; b. fire धगधगीत आग *f*; effervescing, as liquors खतखतणारा, उतणारा. -ness उल्लास, आनंदवृत्ति *f*; चलाखी *f*, तेजी *f*; b. and dulness of trade तेजीमंदी *f*; — of fire धगधगी *f*.

Bristle* रांठकेश, सड. — *v.* केश उभारणें -पिसारणें. — *i.* केश उभे राहणें, कांटा येणें.

British* *a.* ब्रिटन देशाचा, 'ब्रिटिश,' इंग्रजी. — Briton ब्रिटन देशचा राहणारा.

Brittle* *a.* ठिसूळ, लवकर मोडणारा; of thread तुटीर, फुसका.

Broach *F.* an awl चांभाराची आरी *f*; a tool for smoothing or enlarging holes in metal धातूंत भोकें मोठीं किंवा साफ करण्याचें हत्यार; a brooch वस्त्र अडकविण्याचा अंकडा. — *v.* सळईस टोचणें (मांस, भाजण्याकरितां); भोंक तोंड -पाडणें; give out फोडणें, षट्कर्णी क.; open for the first time, as stores फोडणें, उघडणें (कोठी वगैरे).

Broad* *a.* wide रुंद, विस्तीर्ण; open फटफटीत, भणभणीत: b. and open day; fig. extended प्रशस्त: a b., statesman-like, and masterly way; gross निर्भिड, बेमुर्वतीचा (compliment, mirth). -cloth बनात *f*, सकलात *f*. -side, discharge of all the guns on one side of a ship गलबताच्या बाजूवरून सर्व तोफांचा भडमार; side of a ship above the water पाण्याच्या वरली गलबताची बाजू *f*; in printing, a sheet of paper printed on one side only पाठकोरा ताव. -sword रुंद पानाची तरवार *f*. -wise *ad.* आडवा, कडे कडून.

Brocade *Sp.* जर, किनखाब. — Brocaded *a.* जरतारी; that has a b. border लफेदार; dressed in brocade जरतारी पोशाक ल्यालेला.

Brocage, See under Broke.

Broil *F.* कटकट *f*, कलागत *f*. — *v.* निखाऱ्यावर भाजणें. — *i.* तळतळणें.

Broke *v. i. F.* transact business for another गुमास्त्याचें काम क.; act as procurer कुंटणपणा क. -age दलाली *f*. — Broker, an agent गुमास्ता; *Law*, an agent employed to effect bargains and contracts दलाल. -age दलाली *f*, दलालाचें काम *n*; दलालाची दस्तुरी *f*, दलाली *f*.

Broken *p. a.* (See Break) फुटलेला, मोडलेला; थकलेला, मोडलेला; वश झालेला, जिंकलेला &c. See Break. -hearted भग्नहृदय.

Bronchial *a. Gr.* कंठसंबंधी, कंठ्य. — Bronchocele गंडमाळा *f pl.*

Bronze *F.* compound of copper and tin तांब्याचा व कथलाचा मिश्रधातु; a statue, medal, &c. cast in bronze पूर्वोक्त धातूचा ओतीव पुतळा, पदक वगैरे; the color of bronze ह्या धातूचा रंग. — *v.* ब्रांझ धातूचा रंग देणें.

BROOCH *F.* a jewel रत्न *n*; ornamental pin for a garment वस्त्राचें अडकण *n*.

BROOD * *v.* पाखर घालणें : a hen *broods* her chickens.—*i.* sit on and cover eggs, as a fowl अंडीं उबविणें; sit over and cover young, as a hen her chickens पाखर घालणें; sit quietly उगी -स्तब्ध बसणें; over, on, remain long in anxiety ध्यास धरणें, चिंता करीत बसणें, फिकिरींत असणें.—*n.* hatch वीण *f*, वेत *n*; species generated वाढा, ताणा; offspring संतति *f*, संतान *n*.

BROOK * ओढा, ओहळ.

BROOK * *v.* सोसणें, साहणें, पोटांत घालणें.

BROOM * besom केरसुणी *f*, झाडू *f*; a shrub एक कांटेझाड आहे. -STICK केरसुणीचा दांडा.

BROTH * मासाचा किंवा दुसऱ्या पदार्थाचा घाटा -रसा.

BROTHEL *F.* छिनालवाडा, वेश्यालय *n*.

BROTHER* (*Skr. bhrâtar*) he who is born of the same father and mother with another भाऊ, बंधु; half - b. सावत्र भाऊ; one related closely to another by some common tie or interest, as of rank, profession, membership in a society, toil, suffering, &c.;—used among judges, clergymen, professors of religion, &c. भाऊ, बंधु (in comp. विद्या -धर्म कर्म -गुरुबंधु); one that resembles another in manners or traits of character भाऊ (Prov. xviii. 9). -HOOD भाऊबंदकी *f*, भाऊपणा; an association अखाडा, पंक्ति *f*; a class of men of the same kind, profession, or occupation एका धंद्याचे -पेशाचे लोक. -IN-LAW मेहुणा. -LY *a.* भावांचा; b. love बंधुप्रीति *f*.—*ad.* भावासारखा; affectionately प्रीतीनें, ममतेनें : I speak but b.

BROW* (*Skr. bhrû*) the prominent ridge over the eye भोंवई *f*, भ्रुकुटी *f*; the eyebrow भोंवईचे केश *pl*, भोंवई *f*; forehead कपाल *n*, भाळ *n*, ललाट *n*; general air of the countenance मुखचर्या *f*; edge of a steep place कडा, कड *f*; to knit the *brows* भोंवयांस गांठ देणें. -BEAT *v.* भोंवया चढवून बोलणें : to b. witnesses. -BOUND *a.* मुगुट घातलेला, किरीटधारी, किरीटी. -LESS *a.* निलाजरा.

BROWN* उदी -तपकिरी रंग; dark b. घनसावळा; light b. भुरा. — *a.* उदी, तपकिरी, पिंगटवर्ण. — STUDY, thoughtful absent-mindedness विचारांत गुंग होऊन देहभानावर नसणें *n*.

BROWSE *F.* झाडाचा कोवळा पाला, कोवळ्या फांद्या *f pl.*—*v.* कोवळ्या कोवळ्या फांद्या -पाला खाणें [on].

BRUCINA, BRUCINE *F.* काजऱ्याचा सत्वांश.

BRUISE* *v.* crush as drugs, &c. ठेंचणें, चेंचरणें, खरंगटणें; injure, as animals, or vegetables दुखापत क., चेंचरणें.—*n.* दुखापत *f*, खोक *f*, जखम *f*.

BRUIT *F.* अफवा *f*, आवई *f*, जनप्रवाद. — *v.* जाहीर -प्रसिद्ध क.

BRUMAL *a.* (*bruma*, winter) हिंवाळ्याचा, हैम.

BRUNETTE *F.* काळसावळी बायको *f* -मुलगी *f*.

BRUNT* heat of an onset झपाटा, तडाखा: the b. of a battle ; shock धक्का, धडाका, आघात.

BRUSH *F.* instrument to rub or clean clothes, lay on colors, &c. कुंची *f*, बोंथ *f*: branches of trees lopped off कवळ *f*; फांट्या *f pl*; thicket of shrubs झुडूप *n*; skirmish चकमक *f*, झटापटी *f*, फाटफूट *f*, bushy tail of a fox कोल्ह्याचें गोंडाळ शेपूट *n*. — *v.* कुंचीनें झाडणें -साफ करणें -रंगविणें इ०; कुंचा -कुंची फिरविणें; touch in passing घसरा देऊन जाणें; up धांसपूस क.; उजळणें, उजरणें, उजळणी क. -WOOD झाडी *f*, झुडूप *n*; small branches of trees cut off कवळ *f*.

BRUTE (*brutus*, stupid) beast पशु, जनावर *n*; brutal person पशुशील मनुष्य, हैवान

—*a.* not having sensation जड, चैतन्यशून्य (earth); irrational बुद्धिहीन, अज्ञान (beast); animal देहसंबंधी, दैहिक, अंग; b. force अंगधटाई *f* -मस्ती *f*; bestial जनावरासारखा (violence); uncivilized रानटी, अडाणी: b. philosopher अरण्यपंडित.—BRUTAL *a.* पशूचा, पशुसंबंधी (nature); पशूसारखा; merciless निर्दय, क्रूर. -ITY पशुपणा, पशुत्व *n*; निर्दयपणा, निष्ठुरता *f*.—BRUTISH *a.* पशूसारखा, पशुतुल्य; निर्दय; रानटी.

BUBBLE *D.* small bladder or vesicle of water or other fluid inflated with air बुडबुडा, फुगा; vain project चटक्याचे मांडव *pl*, भुसकेलडू *pl*, पाण्यावरचा बुडबुडा; dishonest speculation ठकबाजीचा व्यापार: the South - Sea b.—*v. i.* बुडबुडे येणें; make a bubbling sound खतखतणें, सळसळणें [up, out].—*t.* ठकविणें, फसविणें.

BUBO (*L.*) बद *n*, वळ.

BUCK *Ger.* male of the fallow-deer काळविंट;—of the goat बोकड;—of the sheep मेंढा;—of the rabbit and hare ससा; a gay, dashing young fellow अकडबाज, छानछूक.

BUCKET* पोहरा, डोल, बादला, मोट *f*, इ० प्रकारचें शेंदणें *n*; the large b. of a draw-well मोट *f*.

BUCKLE *F.* an instrument for fastening dress or harness अडकवण *n*, 'बकल' *n*; a curl कुरळ *n*.—*v.* कचकीनें अडकविणें; prepare for action (काम करायास) कंबर बांधणें, कासघालणें. — BUCKLER एक प्रकारची ढाल *f* आहे.

BUD *D.* कळी *f*; a large b. कळा.—*v. i.* कळी येणें -फुटणें.—*t.* पिवंदी क.: the plum and the peach are *budded* on each other.

BUDGEROW ऐषआरामाची एक बंगाली बोट *f* आहे, बजरा.

BUDGET *F.* a bag with its contents (भरलेली) पिशवी *f* -थैली *f*; a stock पुंजी *f*, पोतें *n*, भरणा; papers respecting the finances of the British nation ब्रिटिश राज्याच्या वसूल वासलातीच्या पत्रकांचा रुमाल; [to open the b., to lay before a legislative body the financial estimates and plans of the executive government].

BUFFALO *It.* रेडा, टोणगा, हेला; female b. ह्मैस *f*.—BUFF ह्मशीचें कातडें *n*; military coat made of buff-skin or similar leather ह्मशीच्या कातड्याचा लश्करी डगला; [color between light pink and light yellow]; a blow ठोंसा, बुकी *f*.

BUFFET *It.* बुकी *f*, ठोंसा.—*v.* बुकलणें, ठोंसे मारणें; contend against भांडणें, भिडणें; to b. the billow (पाणी -लाट) तोडणें.

BUFFOON *F.* low jester हांडीबाग, भांड; a mimic माध्वी, विदूषक. -ERY मस्करी *f*, थट्टा *f*; माधवीपणा.

BUG *W.* ढेंकूण. -BEAR बागुलबावा, बौ; to make a b. of भोंबा करून सांगणें.

BUGLE *F.* तुतारी *f*, रणशिंग *n*, करणा, 'बिगुल' *n*. (*bugulus*) काळीपोत *f*, कांचेचा काळामणी *f*.

BUILD* *v.* construct बांधणें, रचणें, उभारणें; establish पाया घालणें, स्थापणें (reputation, hope); up, increase and strengthen वृद्धि क., स्थिर -दृढ क. (Acts xx. 32); to b. castles in the air मनांत मांडे खाणें.— *i.* (घर वगैरे) बांधण्याचा धंदा क.; depend, as on a foundation अवलंबणें, भिस्त -मदार ठेवणें -राखणें. -ER घरबांधणारा, गवंडी, सुतार इ०, शिल्पी. -ING बांधणें *n*; a thing built इमारत *f*, इमला; the art of constructing edifices इमारती बांधण्याची कला *f*, शिल्प *n*.—BUILT *a.* बांधलेला, बंदिस्त.

BULB (*bulbus*) गड्डा, कांदा; — of the eye डोळ्यांतलें बुबूळ *n*. -OUS *a.* कांद्याचा, कंदमय.

BULGE* *v.* swell out कोंक -फुगा -पोट येणें; see BILGE.

Bulk *W.* size लांबीरुंदी *f*, परिमाण *n*; the main mass or body मुख्यभाग. — Bulkiness मोठेपणा, स्थूलत्व *n*. — Bulky *a.* मोठा, रटेल, अवजड.

Bull *Ger.* बैल; a sign of the zodiac वृषभरास *f*; — *a.* in comp. large मोठा, घोड, (in comp. घोडशीर *f*): b. - head. -dog एक जातीचा मोठ्याडोक्याचा कुत्रा आहे.—Bull's-eye पोलीसच्या शिपायाचें कंदील *n*.—Bulrush मोठ्या जातीचा लव्हाळा.— Bullock खोंड, गोऱ्हा.

Bull (*bulla*, a seal) an edict of the pope पोपाचें आज्ञापत्र *n*; the seal appended to the edicts of the pope पोपाच्या आज्ञापत्राची मोहर *f*; a blunder चूक *f*, भूल *f*.

Bullet *F.* a small ball गोळी *f*; a shot (बंदुकीची) गोळी *f*.

Bulletin *F.* an official account, as of a battle लढाई वगैरेची सरकारी बातमी *f*; news recently received ताजी बातमी *f*; [an official statement respecting the health of some distinguished personage].

Bullion (*bulla*, bubble) लगडीचें -गट्टाचें सोनें *n*, किंवा चांदी *f*.

Bully (?) गरिबांचा काळ, इमाम दांडगा.— *v.* गुरकावणें, दांडदपट क. -ing डरकावणी *f*, दटावणी *f*.

Bulwark *D.* a bastion बुरूज; a means of defence रक्षण *n*, आश्रय [*pl* the sides of a ship above the upper deck].

Bumboat (from *bum*, the buttocks) बंदरांतील जहाजावर सामग्री नेण्याची होडी *f*, 'बांबोट' *f*.

Bump *W.* a thump धप्पा, थडाका, झपाटा; a swelling टेंगूळ *n*, गांठ *f*. — *v.* थडाका मारणें, धाडकन मारणें. — *i.* बगळ्यासारखा आवाज क.

Bumper *F.* a cup filled to the brim or till the liquor runs over तोंडोतोंड भरलेला प्याला, परिपूर्ण पात्र *n*; crowded house at a theatre गच्च -दाट भरलेलें नाटकगृह *n*.

Bunch *D.* a protuberance टेंगूळ *n*; — on a camel's back मदार *f*; a cluster घोंस, घड, जुडगा;—of flowers झेला, झुमका.—*v.* *i.* टेंगूळ येणें.—*t.* घोंस -झुबका -जुडगा बांधणें.

Bundle * a number of things bound together गाठोडें *n*, बोचकें *n*, मोट *f*; a small b., as of paper &c. पुडका;—as of medicine - powder पुडी *f*; — of grass, sticks जुडी *f*, जुडगा, मोळी *f*, भारा;—of cotton गड्डा, बिंडा;—of papers तबलक *f*.—*v.* गाठोडें बांधणें; off उचलबांगडी क.; up गठडी बांधणें.

Bung *W.* stopper of a cask पिपाचा दट्टा.—*v.* दट्टा-गुडदी बसविणें [up]. -hole पिपाचें तोंड *n*, पिपांत दट्टा बसविण्याचें भोंक *n*.

Bungle *v.* (?) ओबडधोबड क. -तांगडणें -शिवणें. —*n.* अडाणी -अडमूठ काम *n*.

Buoy *F.* a floating mark to point out shoals, anchors, rocks, &c. बोयरा, तरतें *n*.—*v.* तरतें -तरता -तरंगत ठेवणें [up]; mark by buoys बोयऱ्याची निशाणी क. (a channel); support धीर देणें. -ancy तरतेपणा, तरण्याची शक्ति *f*, तरणधर्म; vivacity उल्लासवृत्ति *f*. -ant *a.* तरता: b. on the flood; bearing up, as a fluid वाहून नेणारा, वहनशील; उल्लासी, आनंदवृत्ती.

Bur *F.* वनस्पतीच्या बिजावरचें खरखरीत किंवा कांट्याचें वेष्टन *n*.

Burden* that which is borne ओझें *n*, भार; that which is grievous, wearisome, or oppressive भार, ओझें *n*, कष्ट *pl*, पीडा *f*, जाच, काच; the contents of a ship भरताड *n*; ship of b. बारकस *n*; — of a favor received आभार *F.*; chorus or refrain पालुपद *n*, ध्रुपद *n*; the main topic मुख्य विषय, अनुवाद: the b. of a prayer; beast

of b. पाठाळ *n.* — *v.* ओझें घालणें -लादणें; जाचणें, काचणें. -SOME दुर्वह, जड, भारी.

BUREAU *F.* a desk with drawers for papers कागद ठेवायाचें खणांचें मेज *n*, 'बिरो'; office where business is transacted कचेरी *f*; department for the transaction of business by a public functionary खातें *n*.

BURGH, See BOROUGH.

BURGLAR *F.* घरफोड्या, भिंतफोड्या, गृहभेदी.— BURGLARY, *Law*, the breaking and entering the dwelling-house of another, in the night-time, with intent to commit felony therein घर फोडण्याचा अपराध, संधिचौर्य *n*.

BURIAL, See under BURY.

BURLESQUE *F.* satire निंदात्मक भाषण *n*; an ironical composition intended to excite laughter हसूं येण्यासारखी नकल *f*. — *a.* थट्टेचा, हसण्याजोगा.—*v.* थट्टा क.

BURN* *v.* consume with fire जाळणें; reduce to ashes भस्म -राख क.; injure by fire or heat विस्तवानें किंवा उष्णतेनें खराब क., जाळणें; to b. steel in forging;—food in cookery करपवणें, जाळणें; to b. one's face in the sun उनानें तोंड काळवटणें; subject to the action of fire आंच -अग्निपुट देणें; to b. bricks विटा भाजणें; excite animal heat in आग -दाह क.: this fever *burns* me up; cauterize लासणें, भाजणें;—the throat &c. खवखवणें, जाळणें; b., or b. together, as two surfaces of metal, to fuse and unite them by pouring over them a quantity of the same metal in a liquid state कस्तुर क.;— out, up जाळून फस्त क., राख -रांगोळी क.; to b. one's fingers, to get one's self into unexpected trouble, as by interfering in the concerns of others, speculation, &c. शेकणें; [to b. out of house and home, to be driven out from a dwelling, warehouse, &c., by the burning of it].—*i.* आग लागणें, पेटणें (Deut. ix. 15);—a lamp जळणें, तेवणें; जळणें, करपणें (food, in cookery); sparkle चकचकणें: the barge *burned* on the water; with desire हुरहुरणें, सुरसुरणें; be in commotion क्षोभणें, संतापणें, क्षुब्ध होणें;—the mouth, &c., under acrid or pungent tastes पोळणें, फणफणणें;—the body in fever धगधगणें, तलखी क., तापणें; rage with destructive violence जळफळणें; to b. out जळून राख होणें, जळून जाणें.—*n.* जळणें *n*, दहन *n*; a hurt caused by fire चरका, चटका. -ING जळणें *n*; आग *f*, दाह, डोंब.—*a.* फार तापलेला, अतिउष्ण; उग्र, तिखट (scent); —glass सूर्यकांत.

BURNISH *v. F.* polish शिकल क., झिलई देणें (silver); render bright उजळ -सोज्वळ क. -ER शिकलगार; the tool that burnishes मोहरा, ओपसळई *f*.

BURROW* बीळ *n*, बिवर *n*. — *v.* बीळ करून राहणें [in].

BURSE, BOURSE (*bursa*) an exchange where merchants meet व्यापाऱ्यांचा अड्डा -फड.— BURSAR विद्यालयाचा खजीनदार.—BURSARY, treasury of a college or monastery विद्यालयाचा किंवा मठाचा खजीना; charitable foundation in a university विद्यालयांतील धर्मार्थ नेमणूक *f*.

BURST* *v.* एकदम जोरानें फोडणें -फाडणें उघडणें. — *i.* break open with force जोरानें फुटणें -निघणें; break away सुटून मोकळा होणें;—with laughter हसूं लोटणें; —into tears गहिंवर येणें; [forth, out, away, upon, into].—*n.* फुटणें, स्फोटन *n*; —of applause गजर;—of thunder कडाका, धडाका, भडाड, बार;—of grief, tenderness गहिंवर;—of anger झटका.

BURY* *v.* cover out of sight लपविणें, झांकणें; with earth मातींत पुरणें; inter with funeral ceremonies पुरणें, मूठमाती देणें,

प्रेतक्रिया क.; hide in oblivion विसरणें, पोटांत घालणें (strife) [in, under]. -ING-PLACE प्रेतभूमि *f*, मसणवट *f*.—BURIAL पुरणें *n*, मूठमाती *f*, प्रेतक्रिया *f*.

BUSH *Ger.* झुडूप *n*; close and dense b. जाळी *f*.—BUSHY *a.* झाड्या झुडपाचा; thick like a bush गोंडस, गोंडेदार (tail); full of branches झांपळ, निबिड.

BUSHEL *F.* the circle of iron in the nave of a wheel वसूं *n*; a dry measure एक कैली माप (मुंबईच्या फऱ्या इतकें) आहे; a large quantity खंडी *f*, मण, डोंगर.

BUSS *L.* चुंबन *n*, मुका.

BUST *F.* कमरे पासून वरच्या शरिराचें चित्र *n*, मुखवटा.

BUSTARD *F.* माळढोक.

BUSTLE* *v. i.* धांवाधांव क. — *n.* धांवाधांव *f*, गडबड *f*; as of business &c. खटपट *f*, वावर; tumult गोंधळ, घालमेल *f*.—BUSTLER खटपट्या, उलेढाल्या.

BUSY* *a.* engaged for the time in business कामांत गुंतलेला असलेला, उद्योगांत लागलेला; constantly active उद्योगी, व्यवसायी; restless चपळ, चंचळ (feet); officious लुबरा, लांडा, बुचाकारभारी; — a town गजबजीत [with].—*v.* कामांत लावणें, गुंतवणें. -BODY लुडबुड्या.—BUSINESS, that which occupies the time, attention, or labor of one, as his principal concern काम *n*, कामगिरी *f*, उद्योग; any particular occupation for a livelihood धंदा, उद्योग; traffic व्यापार, देणें घेणें *n*; concern कडचें काम *n*, खटलें *n*; affair खटला, प्रकरण *n*, गोष्ट *f*.

BUT* *prep.* & *conj.* except शिवाय, खेरीज, सोडून; nevertheless तरी, पण, परंतु (1 Cor. xiii. 13); that कीं; only केवळ, मात्र (2 Cor. iv. 17).

BUTCHER *F.* one who slaughters animals, or dresses their flesh for market खाटीक, कसाई; a slaughterer कसाब.—*v.* खाटीकपणा क.; खून क., कंदन क.—BUTCHERY खाटीकपणा; कंदन *n*, कतल *f*.

BUTLER *F.* वाकनीस, कोठवळा, 'बुटलेर, बुटनेर.'

BUTT *F.* large end of a thing बुडखा; limit मर्यादा *f*, सीमा *f*;—of a musket दस्ता; mark to be shot निशाण *n*, टिपण *n*; person at whom ridicule, jest, or contempt is directed खेळवणा, विनोदास्पद; push given by the head of an animal टक्कर, हुंदका, ढेमणी *f*; [a short piece of land left unploughed at the end of a field]. —*v.* टक्कर -दुसणी देणें.

BUTTER * लोणी *n*, नवनीत *n*.—*v.* लोणी लावणें, चोपडणें [over]. -FLY फुलपांखरूं *n*, पिंगाणें *n*. -MILK ताक *n*. -TOOTH चौकीचा दांत. -TREE एक झाड आहे त्यापासून लोण्या सारखा पदार्थ मिळतो.--BUTTERY *a.* लोण्यासारखा.—*n.* दूध, ताक वगैरे ठेवायाची खोली *f*; [a room in some colleges where refreshments are sold to the students].

BUTTERIS *F.* instrument for paring the hoof of a horse सुंबतरास.

BUTTOCK *F.* ढुंगण *n*, टिरी *f*.

BUTTON *F.* गुंडी *f*, भुतावें *n*, अडकवण *n*; holding by the b. मगरमिठी *f*;—of wood to fasten doors चिमणी *f*. — *v.* गुंडी अडकविणें, गुंडीनें अडकविणें [up].

BUTTRESS *F.* टेका, टेकावा, धिरा, पुस्ती *f*.—*v.* टेकावा देणें.

BUXOM* *a.* रंगेल, खुषमौजी.

BUY * *v.* acquire the property, right, or title to, by paying a consideration or an equivalent, usually in money विकत घेणें; procure at a price मोल देऊन घेणें: to b. favor with flattery; off मन वळविणें; पैसा -लांच देऊन आपल्या पक्षाचा क.; out (व्यापारांत) दुसऱ्याची पाती विकत घेणें; on

credit उधार घेणें, उचापत काढणें. -ER विकतघेणारा. -ING खरिदी *f*, क्रय.

BUZZ *O. E. v. i.* गुणगुणणें, गोंगावणें [about]. —*t.* फुसफूस -कुजबूज क. — *n.* गुणगुणाट, घोंघों; कुजबूज *f*, फुसफूस *f*.

BY* *prep.* near to जवळ, पासीं: sit b. me; past जवळून, वरून: to go b. a church; through कडून, पासून, हातून, नें: a city is destroyed b. fire; to take b. force; b. this time आतां, एव्हां; day b. day दिवसे दिवस; to sell b. pounds शेरांवर -शेरांवारी विकणें; to pass b. water पाण्यावरून जाणें; to swear b. heaven आकाशाची शपथ वाहणें; to sit b. himself एकटा बसणें; b. and b. अमळशानें; b. day दिवसा; to stand b. जवळ उभें राहणें, धीर -आसरा देणें; one b. one एक एक, एकामागून एक; twenty feet b. forty एका बाजूनें वीस फूट व दुसऱ्या बाजूनें चाळीस, चाळीस फूट लांब व वीस फूट रुंद; [to let go b. the run, to let go altogether; north-west b. west, toward the west from north-west; good-b. is a corruption of *God be with you* (b'w'ye)].

BY *ad.* near जवळ: there was no person b. at the time; gone गेलेला, गत: the procession is gone b.; aside एकीकडे, बाजूस: to lay b.—*n.* also BYE गौणपक्ष, फलितार्थ: upon the b.; b. the b. प्रसंगवशात्, हां, बरीच आठवण झाली इ०.

BY *a.* आड, चोर. -BIDDER लिलावांत मालधन्याच्या वाटची किमत चढविणारा. -BUSINESS आडकाम *n.* -CORNER आडकोन, चोरकोनाडा. -END स्वार्थ, स्वहित *n.* -GONE *a.* गत, गेलेला.—*n.* गतगोष्ट *f*, गेलेली गोष्ट *f*. -LANE आडगल्ली *f*. -PATH आड -चोरवाट *f*. -STANDER मौज पाहणारा, तमासगीर; idle *bystanders* आलेभाऊ कोलेभाऊ *pl*. -VIEW स्वार्थदृष्टि -बुद्धि *f*. -WAY आडवाट *f*. WORD ह्मण *f*.

C.

CAABA *Ar.* ह्या नांवाचा मक्केंत एक दगड आहे, त्याची मुसलमान लोक भक्ति करितात.

CABAL *Heb.* a junto जट, जूट *f*; an intrigue कवटाळ *n*, कूट *n*. — *v.* कट -मसलत क. — CABALA, tradition of the Jews यहुदी लोकांची दंतकथा *f*; secret science गूढ विद्या *f*.

CABBAGE (*caput*, head) a vegetable कोबी *f*, कोई *f*; [cloth purloined by one who cuts out garments].—*v.* बेततांना कापड चोरणें.

CABIN *W.* small room लहान कोठडी *f*; cottage खोपट *n*, झोपडी *f*; any covered place for a temporary residence तंबु, राहुटी, छप्पर वगैरे दोन दिवसांसाठीं आसऱ्याची जागा *f*; apartment in a ship गलबतांतली खोली *f*.

CABINET *F.* closet लहान खोली *f*; private room in which consultations are held मसलतीची खोली *f*, खलबतखाना; select or secret council of a prince or executive government राजमंत्र्यांची निवडक किंवा गुप्तसभा *f*, अष्टप्रधान *pl*, मंत्रिसमूह; a box with drawers and doors; a private box खणांची पेटी *f*, बगवें *n*; close place, where things of value are deposited for safe keeping मोलवान वस्तु सुरक्षीत ठेवण्याची कडीकोट जागा *f*.—COUNCIL मुख्य प्रधानांची सभा *f*. -MAKER सफाईचें लाकडी काम करणारा सुतार.

CABLE *D.* rope or chain by which a ship is anchored लंगर दोर, दोरखंड *n*; a large rope नाडा; [cable's length, the length of a ship's cable, usually 120 fathoms; to pay out, or to veer out the c., to slacken it that it may run out of the ship]; to slip the c., to let it run out लंगर दोर सोडणें.

CACKLE *v. D.* make a noise like a hen or goose हंसनाद क.; giggle हिही करून हसणें.

CACOCHYMY *Gr.* vitiated state of the humors त्रिदोष.

CADAVEROUS (*cadaver,* corpse) प्रेतकळेचा (look); प्रेताचा (scent).

CADENCE (*cadere,* to fall) (बोलतांना किंवा वाचतांना) उतरता स्वर, पात; tone वाणी *f,* स्वर; pause at the end of an air विराम.

CADET *F.* a volunteer in the army, who serves in expectation of a commission लष्करांतील सनदी जागेचा (पगारी) उमेदवार; a military student लष्करी विद्यार्थी.

CAGE *F.* enclosure for birds पिंजरा; place of confinement for criminals कोंडी *f,* पिंजरा.—*v.* पिंजऱ्यांत कोंडणें.

CAJOLE *F.* भोंदणें, फुसलावणें. -RY लाडीगोडी *f,* गुळगुळ थापडी *f.*

CAKE *D.*—of flour भाकर *f,* पोळी *f;* concrete matter ढेंप *f,* डिखळ *f,* वडी *f;* as of dried mud खपला, पोपडा.—*v.* वडी क.—*i.* जमणें, डिखळी होणें.

CALAMITY (*calamitas,* injury of crops) अरिष्ट *n,* संकट *n,* विपत्ति *f.*—CALAMITOUS *a.* हाल अपेष्टेचा, विपत्ति सोसणारा (persons); producing distress दुःखप्रद, अनिष्टकारक.

CALCAREOUS, CALCINE, See under CALX.

CALCOGRAPHY (*calx,* lime, *Gr. graphein,* to write) खडूनें चित्रें काढण्याची अथवा खडूच्या चित्रांसारखीं चित्रें खोदून काढण्याची विद्या *f.*

CALCULATE *v.* (*calculus,* pebble) compute हिशेब क., गणणें; as an eclipse वर्त्तविणें, पाहणें; adjust by computation बेतानें -हिशेबानें बसविणें -जुळणें, उपयुक्त क.: to c. a system of laws;—roughly अजमासणें, आकारणें [on, upon].—CALCULATION गणना *f,* हिशेब; अदमास, सुमार; *Astron.* गणित *n,* अंकचालन.—*n.* CALCULATOR गणित करणारा, अजमासणारा, आकारणारा; वर्त्तविणारा, गणक.

CALCULUS (*L.*) मुतखडा.

CALDRON *F.* हांडा, डेग *f.*

CALENDAR (*calendarium,* account-book) almanac पंचांग *n;* list फेरिस्त *n,* याद *f;* c. month सौर मास.—*v.* कुंदी क.

CALF*—of a cow वासरूं *n;*—of a buffalo रेडकूं *n;* stupid person टोणगा, गाईचा गोऱ्हा; thick part of the leg पायाची पोटरी *f,* पिंडरी *f.*—*v.* विणें, जावपें देणें.

CALIBRE (*F.*) diameter of the bore बंदुकीच्या -तोफेच्या तोंडाचा व्यास; diameter of a round body गोलाचा परिघ -व्यास; compass of mind पोंच, आंवाका *f.*

CALICO (from *Calicut*) कापसाचें कापड *n;* printed c. छीट *n.*

CALIF *Ar.* title of the successors of Mahomed खलीफ. — CALIPHATE खलीफाचा अधिकार.

CALIGRAPHY (*Gr. kalos,* fair, *graphein,* to write) कलमसफाई *f,* सुलेखन *n.*

CALIX, CALYX (*L.*) फुलाचें बाहेरलें आच्छादन *n,* पुष्पावरण *n.*

CALL *v.* (*calare*) invite or command to come बोलावणें, पाचारणें; summon by a particular name नांवानें हाक मारणें; name नांव घेणें; designate (कामावर) योजणें, नेमणें; proclaim जाहीर क.; back रद्द क., फिरवणें; for मागणें, हक्कानें मागणें; a crime *calls* for punishment; forth पुढें आणणें (a faculty of the mind); in उगविणें, उगराणी क.: बोलावणें, जमविणें (friends); off वरून फिरवणें -वळविणें (attention); वरून बोलावणें: to c. off workmen from their employment; out युद्धास ये म्हणणें -आमंत्रण देणें; हटकणें, ललकारणें; चाकरीवर बोलावणें (troops); names नांवें बोटें ठेवणें

शिव्या देणें;—in question संशयघेणें; over हजिरी घेणें, नांवनिशी वाचणें; up आठवणें; कामा करितां किंवा वादाकरितां आणणें (a bill before a legislative body).—*i.* हाकमारणें; बोलावणें; make a brief stay उतरणें, राहणें; make a brief visit भेटीस जाणें; on, upon भेटीस जाणें; कर्जाची मागणी क.; प्रार्थना किंवा धांवा क.—*n.* हाक *f*, आरोळी *f*, साद; मागणी *f*; बोलावणें *n*, पाचारणें *n*; requisition प्रयोजन *n*, अवश्यकता *f*; divine vocation ईश्वराचें बोलावणें *n*, ईश्वरीवाणी *f*; short visit भेटीस जाणें *n*, थोडकी भेट *f*, (in humble phraseol.) पायां जवळ येणें; vocation धंदा, रोजगार. -ING बोलावणें *n*, आवाहन *n*; धंदा, उद्योग; a class of persons engaged in any profession एका पेशाचे लोक; ईश्वराचें बोलावणें *n* काम *n*.

CALLOUS *a.* (*callosus*) hardened बधिर, सुना, बहिरा; unfeeling कोडगा, निलाजरा.

CALM *a.* *F.* not stormy निर्वात, संत; quiet शांत, थंड, निर्वात; चित्ताची स्वस्थता *f*, सौमनस्य *n*.

CALOMEL (*Gr.* *kalos*, fair, *melas*, black) पाऱ्याची मात्रा *f*, रसकापूर.

CALORIC (*calor*, heat) उष्णतेचें बीज *n* तत्व *n*, —*a.* उष्णतेचा.—CALORIFIC *a.* उष्णताजनक -कारक.

CALUMBA (from *kalumb*, its native name in Mozambique) कलमकाचरी *f*.

CALUMNY (*calumnia*) false accusation of a crime or offense, knowingly or maliciously made or reported to the injury of another बालंट *n*, तुफान *n*, आळ.—CALUMNIATE *v.* तुफान -आळघेणें [by].—CALUMNIATOR बालंटखोर, कुभांडी.—CALUMNIOUS *a.* चुगलीचा, तुफानाचा.

CALX (*L.*) limestone भस्म.—CALCAREOUS *a.* चुन्याचे धर्माचा, चूर्णधर्मक; c. spar सुफेद सुरमा.—CALCINE *v.* भस्म क., मारणें.

CAMBRIC *F.* एक फार तलम तागाचें कापड *n* आहे.

CAMEL* उंट *m*, *n*, सड *f*.—CAMLET उंटाच्या केसाचें वस्त्र *n*; हें आतां केस व रेशीम, किंवा लोकर व सूत यांचें करितात.

CAMELOPARD (*Gr.* *kamelos*, a camel, *pardalis*, leopard) जिराफ नांवाचें एक आफ्रिकेंतलें जनावर आहे.

CAMERA OBSCURA (dark chamber) फोटोग्राफीच्या विद्येंत चित्र काढण्याचें एक यंत्र *n* आहे.

CAMP (*campus*) ground on which tents, huts, &c. are erected for shelter तळ, collection of tents, huts, &c. for shelter, arranged in an orderly manner छावणी *f*; body of persons encamped in the same spot गोट, छावणी *f*.

CAMPAIGN *F.* large open plain मैदान *n*. पटांगण *n*; time that an army keeps the field मोहीम *f*, स्वारी *f*.

CAMPHOR (*camphora*) कापूर, कर्पूर. -ATE *v.* कर्पूरमिश्रित क.—*a.* कापराचा; also -ATED *a.* कर्पूरमिश्रित (liquors, draught). -OIL कापरेल *n*. -TREE कापराचें झाड *n*.

CANAL (*canalis*, a channel) artificial water-course कालवा, नदीचा पाट; duct in the body for the passage of liquids or solids नळ, नळी *f*, वाहिनी *f*: the alimentary c.

CANCEL *v.* (*cancelli*, lattice) cross and deface the lines of a writing खोडणें, छेकणें, हरताळ चोळणें; annul रद्द क., फांटा देणें.

CANCER (*L.*). crab खेकडा; a sign of the zodiac कर्करास *f*; a virulent sore चाळणपुळी *f*.

CANDID *a.* (*candidus*, white) fair मनाचा मोकळा, निष्कपट, प्रांजल; just वाजवी, रास्त, नीट (view).—CANDOR निष्कपटपणा,

सरळभाव, सालसपणा.—CANDIDATE उमेदवार, पदाभिलाषी.

CANDLE (*candela*) मेणबत्ती *f*; luminary उजेड देणारा पदार्थ; [excommunication by inch of c. is a form of excommunication when the offender is allowed time to repent only while a c. burns; sale by inch of c., an auction in which persons are allowed to bid only till a small piece of c. burns out]. -LIGHT मेणबत्तीचा उजेड; अमूक वेळपर्यंत लागतील तितक्या मेणबत्या *f pl*. -STICK मेणबत्तीचें घर *n*.

CANDY (*Skr. khand,* a piece, sugar in pieces) साकरपाक. — *v.* साकरेंत पाकविणें; form into crystals साखरेचे खडे -कांडी क.

CANE (*canna*) reed वेत, बांबू, ऊंस ह्यांच्या जातीचें झाड *n*; a walking-stick वेतकाठी *f*, हातांत धरायाची छडी *f*, काठी *f*. — *v.* वेतानें-छडीनें मारणें, चमकावणें; furnish with c. वेत घालणें (chairs); punish with a c. वेताच्या छडीनें मारणें -शासन क.

CANINE *a.* (*canis,* dog) कुत्र्यांचा; having the properties of a dog कुत्र्याच्या गुणांचा, श्वानधर्मक. — CANICULE, the dog-star लुब्धक.

CANISTER (*canistrum,* a basket of reeds) वेताची टोपली *f*, करंडी *f*; चहा, साखर, काफी इ० ठेवायाचा डबा.

CANKER (*cancer*) corroding ulceration पुळी *f*, चाळपुळी *f*; anything that corrodes, corrupts, or destroys कीड *f*, वाळवी *f*, कसर *f*; a disease in trees कीड *f*; a disease of the horse's foot घोड्याच्या पायांतला एक रोग आहे.

CANNIBAL *F.* माणसाचें मासखाणारा मनुष्य, नरभक्षक मनुष्य. -ISM माणसानें माणूस खाणें *n*, नरभक्षण *n*; barbarity रानटीपणा, निर्दयपणा.

CANNON (*canna,* tube) तोफ *f*, नाळ *f*; blank discharge of c. वायबार; c.-ball (तोफेचा) गोळा; range of c.-ball गोळ्याचा टप्पा -मारा. -ADE *v.* तोफेच्या गोळ्यांनीं हल्ला क., -वर तोफमारणें-सोडणें.—*i.* तोफांचा भडिमार क., मारगिरी क.

CANOE *Sp.* होडी *f*, डोणी *f*.

CANON (*L.*) rule कानू, कायदा; rule of doctrine or discipline शास्त्र *n*, सूत्र *n*; authentic books of the Holy Scriptures ख्रिस्ती शास्त्रांचीं असल पुस्तकें *n pl*, ख्रिस्तीधर्म शास्त्रसंहिता *f*; [in monasteries, book containing rules of a religious order]; catalogue of saints canonized in the Roman Catholic Church संतावळी *f*; a dignitary of the church ख्रिस्ती मंडळींत एक अधिकारी आहे. -ICAL *a.* शास्त्रसंबंधी; यथाशास्त्र, शास्त्राप्रमाणें; [c. books, those books of the Scriptures which are admitted by the canons of the Church to be of divine origin]. -IZE *v.* संतमाळिकेंत गणणें, अमूक मनुष्य संत झाला असें प्रसिद्ध क.

CANOPY (*conopeum*) छत *n*, छत्र *n*, चांदवा; —of a travelling carriage पिंजरी *f*.

CANT (*cantare,* to sing) whining, hypocritical manner of speech मानभावाचें बोलणें *n*, दांभिक भाषण *n*; vulgar jargon कुभाषा *f*; technical form of speech परिभाषा *f*; secret language spoken by thieves, beggars, &c. चिकारी बोली *f*, नंदभाषा *f*, इ०. -ER तोंडचा ब्रह्मज्ञानी, वाग्वेदांती; रडगाणें सांगून भीक मागणारा. — CANTICLE गीत *n*; *pl* शलमोनाचें गीत *n*, ह्या नांवाचें ख्रिस्ती शास्त्रांत एक पुस्तक आहे.— CANTO काव्याचा भाग, सर्ग.

CANTEEN *F.* vessel used by soldiers for carrying liquors for drink प्यायाचे पदार्थ ठेवायाचें शिपाई लोकाचें एक भांडें *n* आहे; sutler's shop in a garrison फौजेबराबरचें दुकान *n*, 'क्यांटीन' *f*; [a chest containing culinary and other vessels for officers].

CANTER (abbrev. of *Canterbury*) चौक-सात्रक चाल *f*.—*v*. चौक चालीनें चालणें.

CANTON *F*. जिल्हा, परगणा. -MENT फौजेची छावणी *f*, लश्कर *n*.

CANVAS (*cannabis*, hemp) coarse cloth made of hemp or flax, used for tents, sails of ships, painting, and other purposes ताट *n*, किंतान *n*; clear unbleached cloth, used for working tapestry with the needle वेलबुटी काढण्याचें एक जातीचें कापड *n* आहे; sails of a vessel तारवांचीं शिडें *n pl* -अवजारें *n pl*.—*a*. ताटाचा, किंतानाचा.

CANVASS *v*. *F*. sift शोध -छडा काढणें -लावणें; debate घाटणें, मथणें, घोळणें (opinion); go through in the way of solicitation समत मागत फिरणें (a district for votes). — *i*. समत मागणें: to c. for a friend.

CAP * part of the dress, made to cover the head टोपी *f*; mark of some rank, office, or dignity, as that of a cardinal पदवी किंवा अधिकार याची एक खूण आहे; the uppermost शिरोभाग, माथा, शिरोमणी; c. of fools मूर्खांचा शिरोमणी; respectful uncovering of the head सन्मानार्थ मस्तक उघडें क. *n*; anything resembling a cap in form टोपण *n*, टोपी *f*, शेंबी *f*.—*v*. शेंबी बसविणें; consummate पूर्ण क., शेवटास पोंचविणें, कळस क.; to c. verses, to name alternately verses beginning with a particular letter भंडी लावणें. —*i*. सन्मानार्थ डोकें उघडें क.— CAP-A-PIE *F*. आपादमस्तक, आनखशिख, सर्वांग: he was armed c.

CAPABLE *a*. (*capere*, to take) possessing ability, qualification, or susceptibility शक्तिमान, मानून घ्यायाजोगा: a man c. of lifting heavy weights, a room c. of holding a large number; qualified लायक, योग्य, क्षम: a c. judge [of]. — CAPABILITY शक्ति *f*, धारणशक्ति *f*, क्षमता *f*, दक्षता *f*, काबिली *f*.

CAPACITY (*capax*, capable) power of receiving or containing ग्रहण -धारणशक्ति *f*; extent of room विस्तार, सांटपा, पोट *n*; power of receiving ideas, knowledge, &c. बुद्धीची धाव *f*, पोंच *f*, अवांका, अटोका; ability शक्ति *f*: the c. of blessing the people; profession धंदा, वृत्ति *f*: to work in the c. of masons; *Law*, अधिकार, सत्ता *f*; *Geom*. घनफळ *n* [for].—CAPACIOUS *a*. विस्तीर्ण, ऐसपैस, प्रशस्त (room); मोठ्या सांटप्याचा (vessel); विशाल, व्यापक (mind).

CAPE (*caput*, head) भूशलाका *f*.

CAPER (*L*. he-goat) उडी *f*, खिदडा.—*v*. उड्या मारणें, खिदडणें [about].

CAPILLARY *a*. (*capillus*, hair) केशासारखा; fine बारीक, सूक्ष्म; pertaining to capillary tubes सूक्ष्मनाडींचा: c. action.— *n*. सूक्ष्मनाडी *f*.

CAPITAL *a*. (*caput*, head) डोक्याचा; involving the forfeiture of the head or life डोकें किंवा जीव गमावण्याचा: c. punishment देहांतदंड, प्राणांतशिक्षा *f*; chief मुख्य, श्रेष्ठ, प्रधान; c. city राजधानी *f*; c. letter मोठें अक्षर *n*; c. stock भांडवल *n*, पुंजी *f*.—*n*. upper part of a pillar खांबाचा माथा, स्तंभशीर्ष; metropolis राजधानी *f*, मुख्य शहर *n*. -IST पुंजीवाला, भांडवलाचा सावकार.—CAPITATION, numeration by the head शिरोगणती *f*; tax upon each head or person डोईपट्टी *f*.—CAPITULATE *v*. कौल मागून शरण जाणें.

CAPRICE *F*. मनाची लहर *f*, छंद.—CAPRICIOUS *a*. लहरी, छंदिष्ट.

CAPRICORN (*caper*, goat, *cornu*, horn) मकरराश *f*.

CAPSIZE *v*. (prob. f om *cap*, top, and *seize*) पालथा -उलथा -उपडा क.

CAPSTAN *F*. मोठालीं ओझीं उचलण्याचें यंत्र *n*.

CAPSULE (*capsa*, chest) बोंड *n*, बीजकोश. — CAPSULAR *a*. पोकळ, बीजकोशाकार.

CAPTAIN (*caput*, head) a head नायक, सरदार; military officer who commands a company 'कपतान'; — of a ship तांडेल, नाखवा; of a body, as of peons, spearsmen, cricketers, rowers, &c. नायक, हवालदार, मुकद्दम;—at the head of a team (a bullock) सर्ज्या; warrior योद्धा, वीर, गाजी.

CAPTIOUS *a*. (*capere*, to take) apt to catch at faults तकरारी, हुजतखोर, दोषग्राही; fitted to catch धरपकडीचा.

CAPTIVATE *v*. (do.) take prisoner युद्धांत पाडाव करून धरणें; charm मोहणें, वश क.—*a*. पाडाव केलेला. — CAPTIVE लढाईतला कैदी. —*a*. मोहित, वश. — CAPTIVITY पाडावपणा, कैद *f*, दास्यत्व *n*, बंधन *n*.—CAPTOR युद्धांत धरणारा-मिळविणारा. — CAPTURE *v*. लढाईत धरणें, पाडाव क.—*n*. (a prize) लढाईत मिळविलेली वस्तु *f*, शिकार *f*, जितद्रव्य *n*.

CAR (*carrus*) गाडी *f*; chariot of war रथ, स्यंदन; railway carriage लोखंडी रस्त्यावरली गाडी *f*.

CARABINE, CARBINE *F*. a short gun कराबीन *f*.

CARAVAN *Ar*. troop of merchants or pilgrims travelling together in the East काफला. -SARY, -SERAI धर्मशाळा *f*, सराई *f*.

CARAWAY (*careum*) ओंवा, अजमोदा.

CARBON (*carbo*, coal) शुद्ध -अमिश्रित कोळसा.

CARBUNCLE (do.) a red gem माणीक *n*, माणकी *f*; a malignant boil गरमीची पुळी *f*;—on the back काळपुळी *f*.

CARCASS *F*. corpse मुडदा, मढें *n*, शव *n*;—of a beast पडें *n*; the body, in contempt कलेवर *n*; decaying remains of a thing सापळा, हत्तीचें मढें *n*; frame of a thing unfinished सांगाडा, पिंजरा.

CARD *v*. (*cardere*) पिंजणें, पिंजारणें.—*n*. लोकर, ताग, केंस इत्यादि पिंजण्याचें यंत्र *n*. -ER पिंजारी.

CARD (*charta*) piece of pasteboard or thick paper, prepared for various uses चकती *f*;—for game गंजीफ *n*, पान *n*; visiting c. नांवाची चकती *f*, 'कार्ड' *n*, टिकिट *f*.

CARDAMOM (*Gr*). इलाचीचें झाड *n*.

CARDINAL *a*. (*cardo*, hinge) मुख्य, श्रेष्ठ, विशिष्ट; [c. numbers, one, two, three, &c.; c. virtues, prudence, sobriety, justice, and fortitude; c. points, north, south, east, and west; zenith and nadir; c. signs, Aries, Libra, Cancer, and Capricorn; c. winds, those which blow from the c. points. — *n*. one of the seventy ecclesiastical princes who constitute the pope's council].

CARE * charge दिमत *f*, ताबा, हवाला; press of *cares* रगडा; regard निगा *f*, जतन *f*, ओज *f*; anxiety काळजी *f*, चिंता *f*; caution सावधगिरी *f*, हुशारी *f*; take c. खबरदार; with c. जपून, संभाळून; object of anxiety काळजी *f*, काळजीची गोष्ट *f* -चा विषय [about, for].—*v*. चिंता वाहणें, घोर लागणें; mind गुमानणें, जुमानणें: not *caring* to observe the wind. -FUL *a*. [for, of] provident पुढचें धोरण पाहून चालणारा, दीर्घदर्शी: a c. father; watchful सावध, हुशार; चिंतायुक्त -ग्रस्त. -FULNESS चिंता *f*, काळजी *f*; सावधगिरी *f*. -FULLY *ad*. काळजीनें, जपून, संभाळून; लक्ष्य देऊन, लक्ष्यपूर्वक; दूरवर विचार करून, पुढचें धोरण राखून. -LESS *a*. निकाळजी, बेदरदी, निर्चिंत: he was c. of his charge; निर्धास्त, बेफिकीर, आनंदी: sleep as sound as c. infancy; done or said without care अविचाराचा, बेफामीचा (expression). -LESSNESS निकाळजी *f*, बेपरवा *f*; अनास्था *f*, हयगई *f*.

CAREER *F*. racecourse धावण्याची जागा *f*, धाव *f*; race दौड *f*, धाव *f*; procedure ओळ *f*, वहिवाट *f*, वर्त्तनक्रम.

CARESS (*carus*, dear) लाड *f.*— *v.* लाड क., गोंजारणें.

CARET (*carere*, to want) काकपद *n.*

CARGO (*Sp.*) गलबताचें बारदान *n*, भरताड *n.*

CARICATURE *It.* सोंग *n*, हास्यजनक चित्र *n* -वर्णन *n*, नकल *f.*—*v.* नकल करून दाखविणें.

CARIES (*L.*) हाडांचा कुजटपणा.—CARIOUS *a.* कुजका, सडलेला (tooth).

CARNAL *a.* (*caro*, flesh) दैहिक, इंद्रियविषयक (pleasure); lustful विषयी, कामासक्त, इष्कबाजीचा; c. knowledge संभोग, संग. -ITY विषयासक्ति *f*, कामासक्ति *f.*—CARNAGE काटाकाटी *f*, कत्तल *f*, कंदन *n.*—CARNATION, flesh - color मांसरंग; clove - pink गुलनार फूल *n.* — CARNIVAL रोमन क्याथोलीक लोकांचा होळीसारखा एक सण आहे.—CARNIVOROUS *a.* मांसभक्षक, क्रव्याद; — app. to animals.—CARNELIAN एक मोलवान पाषाण आहे, अकीक.

CAROL *It.* song of joy आनंदप्रदर्शक स्तोत्र *n*; devotional song भक्तिगीत *n.*

CAROUSE *v. F.* दारू झोंकणें -पिणें.—*n.* पानोत्सव.

CARP *F.* रोहीमासा.

CARP *v.* (*carpere*) दोष काढणें, तकरार क., फणगडे फोडणें [at]. -ER तकरारी, हुजतखोर, दोषदर्शी.

CARPENTER (*carpentum*, carriage) सुतार. — CARPENTRY सुतारकाम *n*, सुतारकी *f.*

CARPET *F.* जाजम *n*, बिछाईत *n*, बैठक *f.*— *v.* जाजम पसरणें.

CARRION (*caro*, flesh) मुडदार मास.—*a.* मुडदार मासाचा; feeding on carrion मुडदार मास खाणारा.

CARROT *F.* गाजर *n.* — CARROTY *a.* गाजऱ्या रंगाचा (hair).

CARRY *v.* (*carrus*, a car) convey नेणें, वाहणें impel दपटणें, चालविणें, सारणें: revenge will c. him too far; transfer एका जाग्यावरून दुसऱ्या जागीं नेणें: to c. war from Europe into Asia; an account to the ledger; effect साधणें, संपादणें; compel a result घडवून आणणें; obtain possession by force जबरीनें हस्तगत करून घेणें, जिंकणें; the town would have been *carried* in the end; imply फलितार्थानें दाखविणें, पोटीं असणें: it *carried* something of argument in it; behave वागणें, वर्तणें; off घेऊन जाणें, मारणें: to be *carried* off by sickness; on चालविणें, वहिवाटणें (trade); वाढवणें, रूपास आणणें (a design); through निभावणें, शेवटपर्यंत संभाळणें -पोचविणें: grace will c. a man through all difficulties; out शेवटास -सिद्धीस नेणें; to c. coals to Newcastle समुद्रास मीठ वाहणें.—*i.* पुढें लोटणें -चालविणें: a gun *carries* well; [hold up the head;— said of a horse]; on दांडगेपणानें वागणें.— CARRIAGE वाहणें *n*, नेणें *n*, नयन *n*; vehicle गाडी *f*; चाल *f*, आचरण *n*; वहिवाट *f*, वलावणी *f.*

CART* गाडा, गाडी *f*; c.-rope नाडा, मणदोरा; c.-rut चाकरी *f*, गराडी *f*; c.-way गाडेवाट *f*; c.-wright गाड्या करणारा.

CARTEL (*charta*, paper) लढाईतील कैद्यांची अदलाबदल करण्याचा करार.

CARTHAMUS (*L.*) a plant कुसुंबा.

CARTOUCH *F.* a roll of paper, &c. holding a charge for a fire-arm तोटा, 'काडतूस' *n*; the box containing the charge तोसदान *n*; [a ticket of leave or dismission given to a soldier].—CARTRIDGE तोटा.

CARTILAGE (*cartilago*) कोमलास्थि *f*, कुर्चा *f.* *f.*—CARTILAGINOUS *a.* कुर्चास्थिमय.

CARUNCLE (*caro*, flesh) मांसवृद्धि *f*, मस *f.*

CARVE* *v.* cut, as wood, stone, &c. in an artistic manner नक्षसणें, कोरणें, खोदणें;

shape by cutting खोदून घडणें -आकारास आणणें: an angel *carved* in stone; cut into slices फांका -फोडी क.; distribute वांटणें, वाढणें (food); to c. out युक्ति योजणें, बेतणें, बेत क.—*i.* नकसकामाचा धंधा क.; चित्रें खोदणें, कोरणें; for मास कापणें, मासाच्या फोडी क. -ER खोदकामी, नकसकामी, नकाशा; जेवणाच्या वेळीं -पंक्तीवर मास कापणारा; a large table-knife for carving जेवतांना मास कापायाचा सुरा.

CASCADE (*cadere*, to fall) धबधबा, धोत.

CASE *F.* covering, box, or sheath वेष्टन *n*, गवसणी *f*, घर *n*, म्यान *n*; barber's c. धोकटी *f*;—for pens, &c. कलमदान *n*; for needles चंची *f*; a box and its contents पेटी *f*, बारदान *n*: a c. of goods.—*v.* वेष्टणें, लपेटणें, गवसणी घालणें; बारदानांत घालणें. -WORM कोशकिडा, नहावी.

CASE (*cadere*, to fall) condition स्थिति *f*, हवाल *f*, *m*; *Med.* तब्यत *f*, भावना *f*; a state of facts involving a question for discussion प्रकरण *n*, विषय; a cause in court मोकदमा, खटला; *Gram.* विभक्ति *f*; in c. तशांत, तसें असतां; put the c. क्षणभर असें समज, झालेंच तर.—CASUAL *a.* accidental आगंतुक; occasional नैमित्तिक (expenses). -TY अकस्मात् होणारी गोष्ट *f*; mishap अवचट *n*, अपघात; diminution of forces by death, discharge, or desertion मृत्यु, बरतर्फी किंवा फरारी ह्या कारणानीं फौजेची तूट *f*.

CASEMENT *F.* झरोका, खिडकी *f*.

CASH *F.* place where money is kept, or where it is deposited and paid out पेटी *f*; specie रोकड *f*, नगद *f*.—*v.* वटावणें, टकें क. (a note).—ACCOUNT नगदी हिशेब. -BOOK खतावणी *f*. -KEEPER पोतनीस, खजिनदार, नगदी गुमास्ता; private c. खासगीवाला.

CASHEW *F.* काजूचें झाड *n*.

CASHIER *v. F.* कामावरून -चाकरीवरून काढणें, बरतरफ क.

CASK *F.* पिप *n*. -ET (जवाहीर वगैरे ठेवण्याचा) डबा, करंडा, संपुट *n*.

CASSIA (*L.*) बाहवा.

CAST *v. D.* throw टाकणें, फेंकणें; throw, as the sight नजरेखालीं घालणें -आणणें, दृष्टि लावणें; throw on the ground, as in wrestling पाडणें, जमीनदोस्त -चीत क.; convict अपराधी ठरविणें; shed गाळणें, टाकणें, सांडणें (the skin); emit सोडणें (smell); reject टाकणें, वर्जणें; compute हिशेब -गणना क.; वर्त्तविणें; decide ठरविणें; make to preponderate वजन जास्ती क.; decide by a vote मत घेऊन निकाल -ठराव क.: to c. the balance in one's favor; found ओतणें (cannon); spread out पाडणें: to c. light upon a subject; — anchor नांगर टाकणें -सोडणें; aside निकामी ह्मणून टाकणें; away गमावणें, उधळणें, व्यर्थ घालविणें (life); by वर्जणें, वगळणें; down खिन्न क. (Ps. xliii. 5); forth बाहेर टाकणें, ओकणें, सोडणें; off टाकणें, वगळणें; दूर क.; उतरणें, भार उतरणें; up हिशेब -अजमास क.; ओकणें; on हवाला देणें, सोपणें;— young गाभटणें;— in the teeth बोलण्यांत दांत पाडणें; [-off copy, to ascertain how many printed pages will be made by a manuscript, by setting up a portion for trial].—

CAST *v.i.* revolve in the mind मनांत घोळणें, विचार क.; receive form डौलास -आकारास येणें: metal will c.—*n.* टाकणें *n*, प्रक्षेप; distance through which anything is thrown टप्पा; throw of dice डाव; act of casting in a mould ओतणें *n*, ओतणी *f*; shape into which anything is cast घडण *f*, डौल; whatever is cast in a mould सांचा; mien ढब *f*, डौल; — of countenance तोंडघडण *f*; unexpected

advantage घबकें *n*: [to have the c. of a cart, that is, an opportunity of riding]; touch लकेरी *f*, छटा; glance नेत्रकटाक्ष. -LING पोटचें पडलेलें *n*, गोळा. -AWAY टाकाऊ जिन्नस *n*, *f*; a reprobate देवाधर्मानें टाकलेला.—*a*. टाकाऊ, कवडीमाल.

CASTE *Port*. जात *f*, ज्ञात *f* (हिंदूंची).

CASTIGATE *v*. (*castus*, pure) फटके मारून शिक्षा क.; शिक्षा-दंड क. [with, for].—CASTIGATION शिक्षा *f*, दंड.

CASTLE * fortified residence लढाऊ वाडा -कोट; fortress किल्ला, गड; c. in the air मनोराज्य *n*, गगनकुसुम *n*, मनांत मांडे *pl*; to build c. in the air स्वप्नीं मांडे खाणें.

CASTOR-OIL (corrup. of *Castus* -oil) एरंडेल *n*, एरंडेलतेल *n*.

CASTRATE *v*. (*castrare*) geld खच्चीं -खसी क.; take away, as the obscene parts of a writing ग्रंथ, लेख इ०तून बिभत्स भाग काढून टाकणें.

CASUAL, See under CASE.

CASUIST (*casus*, fall) one who studies and resolves cases of conscience कार्याकार्य विचार करणारा, दोषादोषविवेकी, दोषादोषविवेचनविद्या *f*.

CAT * मांजर *n*; c.-and-dog कुत्र्या मांजरा प्रमाणें भांडखोर; you have lived a c.-and-dog life; [to turn a c. in a pan, to make a sudden change of one's party in politics or religion, for the sake of being in the ascendant]. -EYED *a*. मांजरडोळ्या, घारडोळ्या.—CAT'S-PAW, dupe क्रीडामृग, हात खोरणें *n*; light air मंदवारा, वाऱ्याची झुळूक *f*. —CATGUT, cord made from the intestines of animals सांव *f*.

CATALEPSY (*Gr. katalepsis*) sudden suspension of the action of the senses and of volition तादस्थवायु.

CATALOGUE (*Gr. kata*, down, *logos*, word) याद *f*, फेरिस्त *n*.

CATAMŒNIA (*Gr. -men*, month) विटाळ, रज, ऋतु.

CATARACT (*Gr. -raktos*, a precipice) धबधबा, धोत;—of the eye डोळ्यांतलें मोतीं *n*, मोतिबिंदु.

CATARRH (*Gr.-rhein*, to flow) पडसें *n*, शैत्य *n*.

CATASTROPHE (*Gr. -strophè*, a turning) शेवटची गोष्ट *f* -चा परिणाम, वाईट परिणाम, दुष्परिणाम.

CATCH *v*. (*capere*, to take) lay hold on धरणें apprehend धरणें, पकडणें;—in speech कबज; धरणें; communicate लागणें: the fire *caught* the building; charm रिजविणें, रंजविणें: the soothing art that *catches* the fair; take by contagion स्पर्शानें -अनुसंयोगानें घेणें -जडणें -लागणें (cold, measles); — a song झेलणें; find सांपडणें: to c. one in the act; overtake अटपणें, मिळवून घेणें (a companion); at झेलणें; up हिसकावून घेणें; झेलणें. — *i*. गुंतणें, अडकणें: a kite *catches* in a tree; लागणें, जडणें: sickness is *catching*. —*n*. अकडा, अडकवण *n*; gain शिकार *f*, लाभ; the whole quantity caught at one time एका खेपेस धरलेले मासे वगैरे.

CATECHISE *v*. (*Gr. kata*, down, *echein*, to sound) प्रश्नोत्तर रूपानें शिकविणें.—CATECHISM प्रश्नोत्तरावलिरूप संक्षिप्त ग्रंथ, प्रश्नोत्तरावली *f*. — CATECHIST प्रश्नोत्तरानें शिकविणारा, पाठक. — CATECHUMEN ख्रिस्ती धर्माचीं मूळतत्वें शिकणारा, नवशिक्या.

CATECHU (*L*.) कात; Areca c. खैर.

CATEGORY (*Gr. agora*, assembly) predicament जात *f*, विल्हा; *Logic*, पदार्थ.—CATEGORICAL *a*. स्पष्ट, निश्चयात्मक.

CATER *v*. *F*. अन्न विकत घेणें, अन्न पुरविणें (for). -ER मोदी, वाकनीस. — CATES पक्वान्न *n*, मिष्टान्न *n*.

CATERPILLAR *O*. *E*. सुरवंट, घुलें *n*.

CATHARIST (*Gr. katharos,* pure) अतिसोवळा, लांकडें -मीठ -विस्तव धुवून घेणारा.—CATHARTIC रेच, ढाळ.—*a.* रेचक, ढाळक.

CATHEDRAL (*Gr. kathedra,* seat) बिशपाची जेथें गादी असते तें देऊळ *n.* —*a.* बिशपाच्या देवळा संबंधी (service); पोप किंवा बिशप याच्या हुकुमाचा (determination).

CATHOLIC *a.* (*Gr. kata,* down, *holos,* whole) universal सर्वांचा, सार्वत्रिक, सामान्य (faith); liberal उदार, प्रशस्तमनाचा, असंकुचित (tastes); pertaining to the Roman Catholics रोमन क्याथोलिक लोकांचा -संबंधी; [c. epistles, the epistles of the apostles which are addressed to all the faithful, and not to a particular church; being those of James, Peter, Jude, and John, also called general epistles.].—*n.* रोमन क्याथोलिक पंथाचा मनुष्य, रो० क्या० पंथानुयायी. — CATHOLICISM सार्वत्रिकपणा; यावत् ख्रिस्ती लोकांचा यथाशास्त्र धर्म; रोमन क्याथोलिक धर्म; मताचा -मनाचा उदारपणा. — CATHOLICON, universal remedy त्रैलोक्यचिंतामणी.

CATTLE (*capitalis,* chief) गुरें *n,* ढोरें *pl;* wealth in c. गोधन *n.*

CAUDLE (*calidus,* warm) सुंठवडा, बाळंतकाढा इ० प्रकारचें उष्णपेय *n.*

CAUL * net or covering for the head मस्तकावर घालायाचें एक जाळें *n* आहे; a membrane covering the greater part of the lower intestines पोटांतला पडदा, अंत्रवेष्टण *n,* सातपुडी *f;* part of the membrane enveloping the fœtus वार *f.*

CAULIFLOWER (*caulis,* stalk) फुलकोबी *f.*

CAUSE (*causa*) that which produces a result कारण *n,* उपाधि; that which is the occasion of an action कारण *n,* हेतु, सबब *f*: c. for rejoicing; action in court खटला, मोकद्दमा; side पक्ष: our c. is just; efficient c. कारक हेतु; originating c. प्रभव; instrumental c. निमित्त *n;* primary c. आदिकारण *n;* relation of c. and effect कार्यकारणभाव; espousing a c. कैवार घेणें; espouser of a c. कैवारी. — *v.* उत्पन्न क.; कारण -निमित्त होणें. -LESS *a.* having no cause अकारण; without just cause निष्कारण, व्यर्थ, विनाकारण. — CAUSAL, *Gram.* प्रयोज्य (धातु). —*a.* कारण संबंधी. -ITY, agency of a c. कारणत्व *n,* साधकत्व *n.*— CAUSATION उत्पन्न करणें *n,* उत्पादन *n.*

CAUSEWAY *F.* बांधाचा रस्ता, धरण *n,* दादर.

CAUSTIC (*Gr. kaiein,* to burn) मास जाळणारें -दाहक औषध *n,* काडीखार, 'कास्टिक' *n.*—*a.* मास जाळणारा, दाहक; sharp मनास लागण्याजोगा, तिखट, खरमरीत, मर्मभेदी (remark). — CAUTERY डाग, दाह [burning by a hot iron is called actual c.; that by caustic medicines, potential c.].— CAUTERIZE *v.* डागणें, डाग देणें.

CAUTION (*cavere,* to take care) prudence in regard to danger सावधगिरी *f,* हुशारी, *f;* security हमी *f,* जामीन; injunction ताकीद *f,* बजावणी *f,* सांगी *f.*—*v.* सावध -हुशार क.; ताकीद देणें, बजावणें [against, upon]. —CAUTIOUS *a.* सावध, हुशार [of].

CAVALRY (*caballus,* horse) घोडदळ *n,* तुरुकस्वार *pl.*—CAVALCADE, procession of persons on horseback स्वारी *f.*—CAVALIER स्वार, शिलेदार.

CAVE (*cavus,* hollow) विवर *n,* ढोल *f,* गुहा *f.* —CAVERN दरा, खोरें *n,* गुहा *f.*—CAVITY, hollowness पोकळी *f;* hollow place खांच *f,* खळी *f,* खळगा.

CAVIL *v. i.* (do.) पोकळ -मिथ्यावाद क., वृथादोष काढणें, फणगडे फोडणें [at].— *n.* मिथ्यावाद, वृथादोष, फणगडा [at].

CAW* *v.i.* कावकाव -काका क.

CEASE *v.* (*cedere*, to withdraw) come to an end थांबणें, राहणें (Prov. xx. 3); fail कमती येणें, सरणें (Deut. xv. 11) [from]. -LESS *a.* निरंतर, अखंड, सतत. —CESSATION राहणें *n*, विराम, निवृत्ति *f*; c. of arms लढाईची महकुबी *f*.

CECITY (*cæcus*, blind) अंधळेपणा.

CEDAR (*cedrus*) गंधसरू.

CEDE *v.* (*cedere*) सोडून देणें, स्वाधीन क., सत्तात्याग क. [to].—CEDED सोडून दिलेला, त्यक्त.—CESSION सोडून देणें *n*, सत्ता -स्वामित्वत्याग; *Law*, voluntary surrender of a person's effects to his creditors in order to avoid imprisonment कैद चुकविण्यासाठीं सावकारांस आपल्या कर्जा बदल आपली मालजिनगी स्वसंतोषानें देणें.

CEIL *v.* (*celare*, to cover) छत देणें -मारणें -बांधणें -भरणें; — *n.* चांदवा, छत *n*;—of planks तक्तपोशी *f*.

CELEBRATE *v.* (*celeber*, famous) extol स्तवणें; honor by solemn rites संस्कार -विधि करून पाळणें: to c. the Lord's Supper; to honor by ceremonies of joy and respect उत्सव -समारंभ क. (a marriage, the birthday of a person).—CELEBRATED *a.* प्रख्यात, नामांकित [for]. — CELEBRATION स्तव, कीर्त्तन *n*, स्तुति *f*; पाळणें *n*; उत्सव, समारंभ.—CELEBRITY प्रख्याति *f*, नांव *n*, लौकिक; a person (or thing) of distinction धेंड *n*, प्रस्थान *n*; he (or it) is one of the *celebrities* of the place.

CELERITY (*celer*, swift) त्वरा *f*, शीघ्रगति *f*, वेग.

CELESTIAL *a.* (*cœlum*, heaven) दिव्यलोकाचा, स्वर्गीय; aërial अंतराळाचा, आकाशाचा.

CELIBACY (*cœlebs*, single) अवरठेपणा, ब्रह्मचर्य *n*.—CELIBATE ब्रह्मचारीपणा, ब्रह्मचर्य *n*; a bachelor अविवाहित पुरुष.

CELL (*cella*) very small and close apartment, as in a prison or a monastery खण, खोली *f*; small cavity खळगी *f*, खळी *f*; *Organic Structures*, bag containing fluid matter पिशवी *f*, कोश;—in tables of calculation कोष्टक *n*, घर *n*. -AR तळघर *n*, भुयार *n*;—of grain पेव *n*. -ULAR *a.* खळग्यांचा, छिद्रमय, मधुकोषाकार.

CEMENT (*cœmentum*) substance used for making bodies adhere to each other डकवण *n*, खळ *f*; — of mortar गिलावा; — of tin कस्तुर; bond of union बंधन *n*, आळाबांधा.—*v.* सांधणें, जोडणें.—*i.* जडणें, मिळणें सांधणें [with].

CEMETERY (*Gr. koiman*, to sleep) मसणवट *f*, स्मशान *n*.

CENSER (See INCENSE) धुपाटणें *n*.

CENSOR (*L.*) inspector of manners and morals धर्माधिकारी; one who is empowered to examine all manuscripts and books, before they are committed to the press, and to see that they contain nothing which is forbidden पुस्तकाची तपासणी करणारा.—CENSURER दोष पाहणारा. -IAL *a.* आचारदर्शन संबंधी, धर्माधिकार संबंधी. —CENSURE *v.* (do.) दोष लावणें-काढणें [for]. —*n.* दोष लावणें *n*, दोष.—CENSURABLE *a.* दोष लावायाजोगा, निंद्य. — CENSUS, official registration of the number of the inhabitants of a country खानेसुमारी *f*.

CENT (*centum*, *Skr.* शत) शेंकडा, शतक *n*; per c. दर शेंकडा; a copper coin एक तांब्याचें नाणें आहे, शंभर सेंट म्ह० एक दालर. -AGE शेंकड्याचा भाव.—CENTENARY शेंकडा, शतक; a century वर्षशतक *n*, शताब्द *n*.—CENTENNIAL *a.* शंभराव्या वर्षांच्या दिवसाचा; शंभर वर्षांनीं घडणारा -होणारा (jubilee). — CENTESIMAL शतांश.—*a.* शंभरावा.— CENTIPEDE (*-pes*, foot) घोण *f*, शतपदी *f*. — CENTURION शंभर शिपायांवरचा सरदार, शत-

पति, 'कपतान.'—CENTURY शेंकडा, शतक *n*; शंभर वर्षे *n pl.*

CENTO (*L.*) composition formed by passages from different authors disposed in a new order खंड काव्य *n.*

CENTRE (*Gr. kentron,* sharp point) middle point मध्य *n,* केंद्र *n*; middle portion मध्यभाग, गर्भी *f.*—*v.* एकत्र जमविणें; मध्यें ठेवणें.—*i.* मध्यें असणें; मध्यें जमणें.—CENTRAL *a.* मधला; मध्यस्थ, मध्यें ठेवलेला.—CENTRIFUGAL *a.* tending to recede from the centre मध्यत्यागी; c. force केंद्र सोडून जाण्याची गति *f,* केंद्रोत्सार गति *f.*—CENTRIPETAL *a.* tending towards the centre केंद्राकडे जाणारा; c. force केंद्राभिसरण गति *f.*

CEPHALIC *a.* (*Gr. kephalè,* head) मस्तक संबंधी (medicines).

CERE *v.* (*cera,* wax) मेणाविणें.—CERUMEN कानांतला मळ.

CEREAL *a.* (*Ceres,* the goddess of corn and tillage) गहूं, जोंधळे इ० खाद्यधान्य संबंधी.—*n.* खाद्यधान्य *n.*

CEREBRUM (*L.*) मगजाचा वरचा व मोठा भाग.—CEREBRAL *a.* मज्जा संबंधी.—CEREBELLUM मेंदूचा खालचा व मागला भाग.

CEREMONIAL (*cœremonia*) external form in religion संस्कार, क्रिया *f,* विधि; forms of civility आदरसत्कार, आदरउपचार, शिष्टाचार; outward forms of state दरबारी शिरस्ता, रिवाज; [the order for rites and forms in the R. C. Church, or the book containing the rules prescribed to be observed on solemn occasions]. — *a.* संस्कारसंबंधी; ceremonious आदरसत्कारी.—CEREMONIOUS *a.* क्रियाविधीचा, संस्कारसंबंधी: c. part of worship; विधीप्रमाणें; रिवाजाप्रमाणें; आदरसत्कार करणारा, आदरमानाचा, कर्मठ, क्रियानिष्ठ.—CEREMONY क्रियाकर्म *n,* विधि; forms of civility शिष्टाचार, आदरसत्कार.

CERTAIN *a.* (*certus*) assured in mind खातरी झालेला, निर्धारित, निःसंदेह; sure खचीत, अचूक, निश्चित (Dan. ii. 45); stated मोजलेला, मापाचा, नियमित (Ex. xvi. 4); some कांहीं; one कोणी एक; a c. person फलाणा, अमका [of]. -LY *ad.* खचीत; निःसंशय, खरोखर, मुकरर, खामोखाम. -TY निश्चय, खातरी *f*; खचीत -खरी गोष्ट *f.*—CERTIFY *v.* testify to in writing खातरीचा लेख -दाखला देणें; give certain information of -ची माहिती करून देणें, कानावर घालणें, विदित क.; verify शाबूत -खराकरून देणें.—CERTIFICATE, written testimony to the truth of any fact लेखी दाखला, दाखला; प्रमाणपत्र *n.* -लेख;—of good character अब्रूपत्र *n,* सर्टिफिकिट *n*; — of purification शुद्धिपत्र *n*;—of preëminence अजितपत्र *n.*—CERTITUDE खचीतपणा, निश्चितार्थ, निःसंदेह.

CERULEAN *a.* (*cœrulus*) अस्मानी, नीलवर्ण.

CERVICAL *a.* (*cervix,* neck) मानेचा, ग्रीवा संबंधी.

CESAREAN *a.* (*Cœsareus*) pertaining to Cæsar सिजर बादशाहाचा; c. section or operation, *Surg.* an incision made through the parietes of the abdomen and uterus in order to extract the fetus उदर छेदून गर्भ काढणें *n.*

CESSION, See under CEDE.

CETACEOUS *a.* (*cetus,* whale) व्हेल नामक जलजंतूच्या जातीचा.

CHAFE *v. F.* excite physical heat or irritation in by means of friction चोळून-घासून उष्णता उत्पन्न क., ऊब -उबारा आणणें; excite heat in the mind of चिडवणें, खिजवणें; fret and wear by rubbing चोळवटणें, घासटणें.—*i.* तडफडणें, चडफडणें, फुणफुणणें; घासणें, चोळणें [against].—*n.* घर्षणानें उत्पन्न झालेली उष्णता *f,* आग *f,* संताप, मनस्ताप.—CHAFING-DISH शेगडी *f.*

CHAFF* फोल, तूस, भूस. — CHAFFY *a.* भुसाचा; भुस्यासारखा: c. opinions भुसकें लडु *pl.*

CHAFFER* *v.* haggle (व्यापारांत) घिसघिस क.; talk idly बडबड क.

CHAGRIN *F.* रुसवा, खप्पा मर्जी *f.* —*v.* खट्टू -रुष्ट क., रुसवणें.

CHAIN (*catena*) a series of connected links or rings सांखळी *f,* शृंखला *f*; a bond बेडी *f,* बंधन *n*; series of things linked together श्रेणी *f,* सांखळी *f,* रांग *f,* माळ *f*; instrument used in measuring land जमीन मोजायाची सांखळी *f*; ही ६६ फूट लांब असती. — *v.* सांखळीनें बांधणें, सांखळणें; बेडी घालणें, दास्यत्वांत-बंदांत ठेवणें; guard with a chain सांखळीनें राखणें -रखवाली क.; unite जोडणें, जडणें, कडींत कडी अडकविणें [up, together]. -RULE सांकळरीति *f.* -SHOT जंजिरीगोळा, जोडगोळा.

CHAIR *F.* a moveable seat with a back intended for one person खुरची *f*; seat of justice धर्मासन *n*; — of a professor गुरुपीठ *n*; pulpit व्यासपीठ *n*; presiding officer of an assembly सभाध्यक्ष; sedan नालकी *f*; gig बगी *f*; iron block used on railways to support and secure the rails खुर्ची *f,* घोडी *f*; c. and c. day वृद्धापकाळ, खाटेवर -झोपाळ्यावर बसून राहायाचे दिवस. -MAN सभाध्यक्ष, सभापति; नालकी उचलणारा, भोई.

CHAISE *F.* एक प्रकारची गाडी आहे.

CHALDRON *F.* कोळसे जोखायाचें एक वजन आहे.

CHALICE *F.* पेला, पंचपात्र *n.*

CHALK* खडू *f*? 'चाक'; red c. रक्त धातु *f,* सुरंग; French c. बळभ?; [to know c. from cheese, to understand what is going on, or what is for one's interests]. — *v.* खडूनें घासणें; खडूनें खूण क., अंकणें; manure with chalk खडूचें खत घालणें; to c. out अंकणें, बेतणें, बेतून देणें.— CHALKY *a.* खडूसारखा; खडूचा (water).

CHALLENGE *F.* invitation to a contest of any kind युद्धामंत्रण *n*; act of a sentry in questioning or demanding the counter sign from those who appear at his post ललकारणें *n,* हटकणें *n*; calling upon one to engage in single combat द्वंद्वयुद्धास बोलावणें *n*; claim made of a right दावा सांगणें *n,* दावा; *Law,* claim of a party that certain jurors shall not sit upon him or his cause आपल्या खटल्याची चौकशी करण्यांत अमूक पंच नसावे असें म्हणण्याऱ्या कैदीचा -वादीचा हक्क.—*v.* युद्धास-वादास आमंत्रण क.; मागणें, सत्तेनें मागणें: c. better terms माझ्या खटल्याची चौकशी करण्यांत अमूक पंच नसावे असी वादीनें तकरार क. [to].

CHAMBER (*camera,* vault) retired room एकांत खोली *f*; a hollow closed place खळी *f,* पोकळी *f*: c. of the eye; place where an assembly meets सदर *f*; assembly सभा *f*; private place where a judge sits to hear and determine cases;—of a mortar खजीना, कोठी *f*; [c. of commerce, a board to protect the interests of commerce, chosen from among the merchants and traders of a city; to sit in *chambers* to hear cases, or do business in chambers, as a judge]. -LAIN कोठीवाला, वाकनीस दिवाण; a treasurer खजानवीस.

CHAMELEON *Gr.* सरड, सरडा.

CHAMPAGNE (from *Champagne* in France) एक प्रकारचें मद्य *n* आहे.

CHAMPAIGN, See CAMPAIGN.

CHAMPION (*campus,* field) one who engages in any contest वीर,योद्धा; one who contends in behalf of another in single fight दुसऱ्या करितां द्वंद्वयुद्धकरणारा, एकांगवीर; one who has the acknowledged supe-

riority as prize-fighter, waterman, &c. वस्ताद, धगड, पटाईत.

CHANCE (*cadere*, to fall) casualty दैवघटना *f*; an event which happens without any assigned or definite cause अकस्मात् होणारी गोष्ट *f*: there is no such thing as c.; possibility of an occurrence होण्याचा संभव, संभावना *f*.—*v*. अकस्मात् होणें -घडणें.

CHANCEL (*cancelli*, lattices) (देवळांत) वेदि आणि कठडा यांच्या मधली जागा *f*.

CHANCELLOR (do.) judicial officer of high rank पंडितराव; c. of the exchequer कोशाधीश; c. of a university राजविद्यालयाधिपति.—CHANCERY सदर अदालत *f*.

CHANCRE *F*. चट्टा, उपदंश. See CANCER, CANKER.

CHANDLER *F*. मेणबत्त्या करणारा अथवा मेणबत्त्यांचा व्यापारी; dealer in other commodities, which are indicated by a word prefixed: a corn-c. भुसारी.

CHANDELIER *F*. झुंबर, झाड *n*.

CHANGE *v*. *F*. alter बदलणें, रूपांतर क. (color); exchange अदलाबदल क., पालटणें (clothes); give another kind of money for मोडणें, वटाविणें; become acid अंबणें, नासणें, लागणें: the milk has been *changed* by the weather.—*i*. पालटणें, बदलणें, फिरणें [for].—*n*. रूपांतर *n*, स्थित्यंतर *n*, पालट: a c. of countenance;— of the moon अमावास्या *f*; permutation अदलाबदल *f*;—of garments पोषाक; मोड *f*, खुरदा; balance शिलक *f*, बट्टा, वरतवळा; व्यापाऱ्यांचा अड्डा. — CHANGEABLE *a*. फेरफार करायाजोगा, विकार्य; fickle चंचळ, अस्थिर; क्षणिक बुद्धि; चंचळ (a person).—CHANGER —of money सराफ.

CHANNEL (*canalis*) bed of a stream of water पात्र *n*, तास *n*; — for irrigation पाट, कालवा, सारणी *f*; a strait खाडी *f*; means of passing, conveying, or transmitting मार्ग, द्वार *n*, वाट *f*; a furrow in, as in a column खांचणी *f*. —*v*. कालवा पाडणें; खांचणी पाडणें.

CHANT *v*. (*cantare*) sing गाणें; utter with melodious voice मधुर स्वरानें बोलणें; celebrate in song स्तुति गाणें, गाऊन स्तवणें.—*n*. गायन *n*, गीत *n*; गाण्याच्या स्वरानें ह्मणणें *n* -वाचणें *n*.

CHAOS (*Gr*.) an empty, infinite space अनंतपोकळी *f*, आकाश *n*; the rude, confused state, or unorganized condition of matter before the creation of the universe भूतसंकर, अपंचीकृतभूतस्थिति *f*; confusion घोटाळा.—CHAOTIC *a*. अपंचीकृत; घोटाळ्याचा.

CHAP, CHOP* *v*. भेग पाडणें, चिरणें.—*i*. फुटणें, तडतडणें, उतरणें.—*n*. भेग *f*, चीर *f*.—*F*. जबडा, जाभाड *n*, मुसकाड *n*.—बच्चाराम, बच्चाजी. -FALLEN *a*. तोंड उतरलेला, हिमटतोंड्या.

CHAPEL (*capella*, short cloak) a lesser place of worship लहान देऊळ *n*, भजनगृह *n*.—CHAPLAIN, a clergyman who is officially attached to a ship of war, to an army, to some public institution, or to a family, for the purpose of performing divine service धर्मोपदेशक; सरकारी पाद्री, 'चापलेन. -CY चापलेन पाद्रीचा हुद्दा.

CHAPITER (*caput*, head) upper part of a pillar कळस.

CHAPLET *F*. wreath to be worn over the head मुंडावळ *f*, पुष्पमाळा *f*; string of beads used by Roman Catholics in counting prayers जपमाळा *f*; tuft of feathers on a peacock's head मोराच्या डोक्यावरील पिसांचा तुरा, कलगी *f*; a small chapel लहान देऊळ *n*.

CHAPTER (*caput*, head) division of a book पर्व *n*, प्रकरण *n*, अध्याय; assembly of the clergy of a cathedral मोठ्या देवळा

संबंधी धर्मोपदेशकांची सभा *f*; decretal epistle निर्णय -ठरावपत्र *n*, आज्ञापत्र *n*; [organized branch of some society, as that of the Freemasons, &c.].

CHAR *v. Ir.* जाळून कोळसा क. -COAL (लांकडी) कोळसा.

CHAR* रोजकाम *n*, मोलकाम *n*.— *v.* रोजिंदारी क. -WOMAN मोलकरीण *f*.

CHARACTER (*Gr. charassein*, to make sharp) a distinctive mark चिन्ह *n*, खूण *f*; manner of writing or printing लिपि *f*, अक्षर *n*; sum of qualities which distinguish one person or thing from another स्वभाव, धर्मलक्षण *n*; good qualities गुण, सुलक्षण *n*; reputation अब्रू *f*; certificate of the c. of अब्रुपत्र *n*; capacity नातें *n*, अधिकार: in his c. as a judge; a person मनुष्य, पुरुष: a distinguished c.; description वर्णन *n*, हकीकत *f*. -ISTIC खूण *f*, लक्षण *n*.—*a.* योग्य, उचित. -IZE *v.* अंकित -मुद्रित क.; describe by peculiar qualities लक्षण -गुण सांगणें; distinguish the character of भेद पाहणें, गुणभेद दाखविणें [by].

CHARGE *F.* a trust हवाला, जिम्मा *f*; thing intrusted अनामत *f*; commission कारभार, सोपलेलें काम *n*, 'चार्ज'; earnest or impressive command, direction, exhortation, or injunction, as the c. of a judge to a jury ताकीद *f*, आदेश; imposition of rent, tax, &c. on an estate मालमत्तेवर कर -भाडें वगैरे बसविणें; *pl* costs खर्च; contingent c. सरंजामी खर्च; that which is debited in a business transaction खर्च; accusation आरोप, 'चार्ज'; position of a weapon fitted for attack उगारलेल्या हातेराचें ठाण *n*; quantity of powder or shot in a gun बार; attack हल्ला, चाल *f*; to sound the c. नगारा वाजविणें. — *v.* lay on, as a load ओझें -भार घालणें; with, impose on, as a trust हवाला क., सोपणें; बजावून -हडसून सांगणें; as debt नांवीं मांडणें, नांवावर लिहिणें; खर्ची मांडणें; कर बसविणें: to c. rent on land; आरोपणें, दोष लावणें: to c. a man with crime; to c. home upon माप पदरीं घालणें; load बार भरणें (a gun); घसरणें, चाल -हल्ला क. (an army) [with]. -ABLE *a.* ओझें -भार घालायाजोगा; आरोपणीय; खर्चाचा. —CHARGER, large dish थाळा; war-horse लढाऊ घोडा. — CHARGÉ D'AFFAIRES (*F.*) वहिवाटदार, चौथ्या प्रतीचा कारभारी -प्रधान.

CHARIOT *F.* रथ, स्यंदन;— of the gods विमान *n*. -EER रथहाकणारा, सारथी.

CHARITY (*carus*, loved) love प्रीति *f*; liberality to the poor गरिबांवर उपकार, धर्मवासना *f*; alms भिक्षा *f*, धर्म; generosity उदारपणा, औदार्य *n*; act of benevolence परोपकार, धर्मकृत्य *n*; disposition which inclines men to put the best construction on words and actions of their fellowmen दुसऱ्याचें बोलणें व चालणें याविषयीं प्रीतिदृष्ट्या विचार करण्याची बुद्धि *f* [to]. —CHARITABLE *a.* दयाळू; दानधर्मी; परोपकारी, कृपादृष्टि; दानधर्माचा, धर्माचा, धर्मार्थ (institution).

CHARLES'S WAIN * सप्तर्षि *pl*, खाटलें बाजलें *n*.

CHARM (*carmen, Skr. casman*, a laudatory song) a magic spell चेटक *n*, मंत्र; anything worn for its supposed efficacy on the wearer, in averting ill or securing good fortune ताईत, दोरा, यंत्र *n*, इ०; that which fascinates मोहक पदार्थ; *pl* सौंदर्य *n*, शोभा *f*, कांति *f* [for].—*v.* मोहणें, भारणें; subdue by some secret power वश क.; allay शमविणें; delight मनरंजन क. -ED भारलेला, अभिमंत्रित; उल्लासित, रंजित. -ER चेटकी, मंत्री; मोहक, मनोहर. -ING *a.* मनोरंजक.

CHARNEL-HOUSE (*caro, carnis*, flesh) देव-

ळांतील अथवा देवळाजवळचें मसण *n*, स्मशान *n*; यांत मेलेल्याच्या अस्थि ठेवतात.

CHART (*charta*, a leaf of paper) पट, नकाशा: an historical c.; समुद्रकिनाऱ्याचा नकाशा. -ER, writing bestowing privileges सनद *f*; special privilege विशेष अधिकार; immunity माफी *f*; letting a vessel by special contract मखत्यानें गलबत भाड्यानें देणें. —*v.* सनद देऊन कायम क.; गलबत भाड्यानें देण्या घेण्याचा मखता. -ERED *a.* सनदी; मक्त्याचा.

CHASE *v. F.* hunt पारध क.; pursue पाठीस लागणें; away, off, हाकून लावणें.—*n.* पाठलाग, लगट *f*; that which is hunted पारध *f*, शिकार *f*; open hunting-ground रमणा, मृगयाभूमि *f*. -GUN गलबताच्या समोरच्या बाजूची तोफ *f*.

CHASM (*chasma*) fissure भेग *f*, चीर *f*; gap भगदाड *n*; void space पोकळी *f*, पोकळजागा *f*.

CHASTE *a.* (*castus*, pure) pure from unlawful sexual intercourse शुद्ध, पाक; —of females सती *f*, पतिव्रता *f*;— of language शुद्ध, निर्दोष.—CHASTITY निर्मलता *f*, शुद्धता *f*; साध्वीपणा, पातिव्रत्य *n*; भाषणाची शुद्धता *f*.—TREE निरगुडी *f*.

CHASTEN, CHASTISE *v.* (*castigare*, to punish) शासनासाठीं किंवा सुधारणुकेसाठीं फटके मारून किंवा दुसऱ्या कोणत्या रीतीनें दुःख देणें; correct or purify चुक्या नीट क., शुद्ध क. [with, for]. -MENT शिक्षा *f*, शासन *n*. See the verb.

CHAT *v. F.* talk in a light and familiar manner बाता कुटणें; talk without form or ceremony खळबळीतपणें बोलणें. — *n.* गप्पा *f pl*, गपाष्टक *n*, गोष्टिश्राद्ध *n*.—TER *v. i.* utter sounds which somewhat resemble language, but are inarticulate and indistinct किलबिल क.; prate वटवट -बडबड क.; — as a monkey किचकिच क.; make a noise by collision, as the teeth करकरणें. -BOX गप्पीदास, वाजती घांट *f*, फकांड्या, घणघणघंटा *f*.

CHATEAU (*F.*) castle गढी *f*, लढाऊवाडा; country-seat बंगला.

CHATTEL *F. Law*, every kind of property except the freehold मालमत्ता *f*; personal c. जंगम मालमत्ता *f*; real c. स्थावर मिळकत *f*; goods and *chattels* अजबाब *f*.

CHEAP**a.* bearing a low price in the market सवंग, स्वस्त; being of small value थोडक्या मोलाचा, हलका; common साधारण; c. as dirt पैशा पायली. -EN *v.* मोल क.-विचारणें; स्वस्त क., पाडून घेणें. -LY *ad.* सस्तेवार, सवंगाईनें; थोडक्या मोलानें. -NESS सवंगाई *f*, सस्ताई *f*.

CHEAT* *v.* ठकविणें, फसविणें.—*n.* ठकवण *f*, फसवण *f*; a person who cheats ठक, फसवणारा.

CHECK *F.* a stop महकुबी *f*, मोडा, अटकाव, अवरोध; restraint दपटशाई *f*, दाब, 'चक'; a mark put against items, as names, &c. in going over a list खूण *f*, निशाणी *f*; order for money, drawn on a banker, payable on sight सावकारावर देखत चिठी *f*, 'चेक'; kind of checkered cloth चित्रविचित्र कापड *n*, चित्राचें कापड *n*; a term at chess शह. — *v.* दाबांत ठेवणें, आकलणें; याद वाचतांना नांवावर -रकमेवर खूण क.; compare with a counterpart, as an account रुजवात घेणें, ताळा मिळवून पाहणें, मुकाबला क.; rebuke ठपका देणें, 'चक' देणें.—*i.* थांबणें विराम पावणें [at]; interfere नडणें, आडवा येणें. -ER *v.* चित्रविचित्र क.; फुली -चौकटी -घरें पाडणें. -MATE मात *f*.

CHEEK* गाल, कानसल *n*. -BONE कपोल *n*, फलक *n*.

CHEER *F.* countenance and its expression मुखवृत्ति *f*, मुख *n*; spirits धीर, धैर्य *n*; mirth उल्लास, आनंद; entertainment मेज.

वानी *f*; provisions prepared for a feast मिष्टान्नें *n pl*; applause वाहवा *f*, शाबसकी *f*; outward expression of good spirits or gaiety, by shouting गजर.—*v.* उल्लासित -खुश क.; धीर -आश्वासन देणें; गजर करून सलाम -सलामी क.: to c. a ship.—*i.* आनंदी -उल्लासित होणें [by, with]. -FUL *a.* हास्यमुख, प्रफुल्लवदन; उल्लासी, आनंदी. -FULNESS आनंदी स्वभाव, उल्लासवृत्ति *f.* -LESS *a.* उदास, असुखी.—CHEERY *a.* आनंदी, उल्लासी; tending to promote cheerfulness आनंदकारक, आल्हादप्रद.

CHEESE* चक्कादहीं *n*, पनेर.

CHEMISTRY *Ar.* science which treats of the composition of substances, and of the changes which they undergo रसायन विद्या *f* -शास्त्र *n*.—CHEMICAL *a.* रसायनविद्येसंबंधी; रसायनविद्येनें केलेला. -LY *ad.* रसायनशास्त्रानुसार.—CHEMIST रसायनवेत्ता.

CHERISH *v.* (*carus*, dear) treat with tenderness and affection लालनपालन क.; indulge बाळगणें, धरणें, राखणें (virtue, ill-will). -ER पाळणारा, पोषक, पाळक.

CHERRY (*cerasus*) एक फळ आहे.—*a.* चेरी फळासारखा लाल (lips, cheeks).

CHERUB *Heb.* दिव्यदूतांचा एक वर्ग आहे त्यांतील एक, 'करूब'; [a beautiful child].

CHERUP, CHIRRUP, *v. i.* पक्ष्यासारखा शब्द क.—*t.* urge on by making a short shrill sound बारीक व तुटक शब्द करून (घोडा, बैल इ० स) पुढें चालवणें.

CHESS *F.* बुदबळांचा खेळ. -BOARD बुदबळांचा पट. -MAN बुदबळ *n*.

CHEST (*cista*) a large box पेटी *f*, हडपा; the thorax छाती *f*, वक्षस्थल *n*. -FOUNDERED *a.* उरीं भरलेला (a horse).

CHESTNUT (*castanea*) एक फळ आहे; चेस्नट झाड *n*.—*a.* तांबडाबोर (घोडा).

CHEVALIER (*F.*) शिलेदार.

CHEW* *v.* masticate चघळणें, चर्वण क.; meditate चिंतणें, कल्पिणें, योजणें (revenge); to c. the cud रवथ क.

CHICANE *F.* न्यायांत -वादांत छक्केपंजे *pl*, डावपेच *pl*.—CHICANERY फसविण्याची युक्ति *f*, घालमेल *f*.

CHICKEN* कोंबडी इ० चें पिलूं, 'चिकण,' 'चिकीन' *n*. -HEARTED *a.* भितरा, भेकड. -POX कांजण्या *f pl*.

CHIDE * *v.* धमकावणें, निषेधणें, बोल लावणें.—*i.* भांडणें, कल्ला -कलागत क.

CHIEF *a. F.* highest in office मुख्य, अग्रेसर (priest); most eminent in any quality or action मुख्य, प्रधान (topic).—*n.* सरदार, नाईक, अधिपति; commander in c. सेनापति. -LY *ad.* मुख्यत्वें करून, विशेषें करून. -TAIN सरदार, नाईक; सेनापति.

CHILBLAIN* a blain produced by cold जळवात, पादस्फोट.

CHILD* a son or a daughter लेंकरूं, मूल *n*, बाळ *n*; a young person मूल *n*, पोर *n*; one who exhibits the character of a very young person पोर *n*, पोरबुद्धीचा; *pl* descendants संतानें *n*, *pl* वंशज; one who, by character or practice, shows signs of relationship to another लेंकरूं *n*: a c. of God, a c. of the devil; to be with c. गरोदर असणें. -HOOD बालपण *n*, लेंकूरपण *n*. -ISH *a.* पोरकट, पोर स्वभावाचा; मुलाचा; c. understanding बालबुद्धि *f*. -LESS *a.* ज्याला संतान नाहीं तो, अनपत्य, अपत्यहीन. -LIKE *a.* मुलासारखा, बालसदृश; मुलास योग्य; meek नम्र, लीन; submissive आज्ञांकित. -BEARING, -BIRTH बाळंतपण *n*, प्रसूति *f*.

CHILL* *a.* moderately cold थंड, सरद; affected by cold थंडावलेला, कुडकुडी भरलेला; formal कोरड्या आदरमानाचा, निःस्नेह; dispirited हिरमूस झालेला, धैर्य खच-

लेला.—*n.* थंडी *f*, सरदी *f*; हिरमोड.—*v.* थंड-सरद क.; मोडणें, पाणी ओतणें.—CHILLY *a.* थंड, सरद.

CHIME (*campana*, bell) harmonious sound of bells, or of other musical instruments घांटांचा किंवा दुसऱ्या वाद्यांचा एकनाद; pleasing correspondence of proportion, relation, or sound सुमेळ, एकताळ.— *v. i.* एकनाद होणें; जमणें, मेळबसणें; jingle खळखळणें, झणझणणें.

CHIMERA (*Gr. chimaira*, goat) वृथा वासना *f* -कल्पना *f* -पदार्थ (जसें वाळूचें तैल, सशाचें शिंग इ०).—CHIMERICAL *a.* अकल्पित, असंभाव्य (projects).

CHIMNEY (*caminus*) धुराडें *n*, धारें *n*; दिव्याच्या वातीवर जी कांचेची नळी ठेवतात ती *f*. -SWEEPER धुराडें झाडणारा.

CHIN* हनुवटी *f*, हनु *f*. -COUGH *D.* डांग्या खोकला.

CHINA चिनई मातीचें भांडें *n*. -ROOT चोबचिनी *f*. -ROSE सेवंती *f*.— CHINESE *a.* चिनदेशा संबंधी.—*n.* चीन देशचा मनुष्य; चिनी लोक *pl*; चिनी भाषा *f*.

CHINE *F.* जनावराच्या पाठीचा कणा.—*v.* कण्याचे तुकडे क., कणा कापणें.

CHINK* चीर *f*, सांध *f*, फट *f*.—*v.* चिरणें, भेगलणें.

CHINK *v.* छणछण वाजविणें.—*i.* छणछण वाजणें.

CHINTZ *Hind.* छीट *n*.

CHIP *v. Ger.* तासणें, ढलपी काढणें.—*i.* तुकडे तुकडे होणें, तुकडे निघणें. —*n.*—of wood धलपा, ढपला, ढपली *f*; — of stone कपचा, कपरा; *pl* काटकूट *f*, सालपा.

CHIROLOGY (*Gr. cheir*, hand, *logos*, speech) करपल्लवी भाषा *f*.—CHIROMANCY (*Gr. manteia*, power of divination) सामुद्रिक *n*, हस्तलक्षणविद्या *f*. — CHIROMANCER सामुद्रिक पाहणारा.

CHIRP *v. Ger.* चिवचिव -चूंचूंक.

CHISEL (*secare*, to cut) टांकी *f*, किंकरें *n*, विंधणें *n*.—*v.* विंधण्यानें चिरणें -फोडणें -खोदणें, टाकी मारणें.

CHIT* sprout कोंब, अंकूर; child पोर *n*, बाळ *n*, चिटलिंग *n*.

CHITCHAT (See CHAT) वटवट *f*, गप्पा *f pl*, बाता *f pl*.

CHIVALRY *F.* cavalry तुरुकस्वार *pl*; knighthood सरदार बहादरी *f*; character of knight सरदार बाहदराची चाल *f*, (आदर, शौर्य, इ०). —CHIVALROUS *a.* सरदार बाहदरीचा; शूर, पराक्रमी.

CHIVES *pl* (*cepa*, onion) केशर, पुष्पकेशर; एक लहान कांद्याची जात आहे.

CHOICE, See under CHOOSE.

CHOIR (*chorus*) band of singers गाणाऱ्यांचा ताफा, फड, गायकगण; part of a church appropriated to the singers देवळांत गाणारांचा ताफा बसण्याची जागा *f*. See CHANCEL.

CHORUS (*L.*) गाणाऱ्यांची मंडळी *f*; part of a song in which the company join the singer पालुपद *n*, ध्रुपद *n*. — CHORAL *a.* गाणाऱ्या मंडळींतला; फडांत गायलेला.

CHOKE* *v.* suffocate गुदमारणें, दम कोंडणें; block up बुजविणें, कोंदणें, भरणे; check, as growth, expansion, progress, &c. वाढ -विस्तार खुंटविणें.—*i.* श्वास कोंडणें, गुदमरणें; अडकणें, घुसमटणें: the words *choked* in his throat.

CHOLER (*Gr.*) bile पित्त *n*; anger राग, पित्त *n*. — CHOLERA MORBUS मोडशी *f*; Asiatic c. पटकी *f*, जरीमरी *f*, महामारी *f*. — CHOLERIC *a.* पित्तानें भरलेला; पित्तप्रकृतीचा, तामसी, तापट; indicating anger क्रोधदर्शक, रागाचा (speech).

CHOOSE* *v.* निवडून घेणें, निवडणें [from].—*i.* पसंत क.; exercise the power of choice निवडून घेण्याची सत्ता चालविणें: I can not c. but pity her.—CHOSEN *a.* निवडलेला. —CHOICE निवडणें *n*, निवड *f*; option खुशी *f*, मर्जी *f*; discrimination निवडण्याची बुद्धि *f*, विचार, तारतम्य *n*; thing chosen निवडलेली -निवडक वस्तु *f*; he is sick of his own c.; best part of anything उत्तमांश, शेलका पदार्थ; to make a c. of पसंत क., निवडून घेणें [from].—*a.* निवडक, असल, शेलका; frugal मितव्ययी, बेतानें खर्च करणारा: to be c. of time; deliberately chosen विचारानें -बुद्ध्या निवडलेला (word).

CHOP *v.* *D.* cut into pieces तुकडे तुकडे -खंडें क., साकटणें [up]; off, sever by one or more blows छाटणें, तोडणें; up, devour greedily गपागपा खाणें.—*n.* खांडणें *n*, फोड *f*, तोड *f*; खंड *n*, खांड *n*; slice of meat मांसखंड *n*, सागुतीचा रवा.—CHOPPING-BLOCK सकोटण.—CHOPPING-KNIFE सुरा.

CHOP, See CHAP.

CHORD (See CORD) string of a musical instrument तार *f*, तंतु; harmony in notes स्वरांचा मेळ, स्वरऐक्य *n*; *Geom.* ज्या *f*.

CHRIST (*Gr. christos*, anointed) अभिषिक्त; THE ANOINTED; —an appellation given to the Savior of the world, and synonymous with the Hebrew MESSIAH ख्रीस्त. — CHRISTEN *v.* give a name and apply water to, as a religious ceremony, in the name of, and according to the precept of, Christ नांव ठेवून बाप्तिस्मा देणें; give a name नांव ठेवणें, बारसें क. -DOM यावत् ख्रिस्ती देश; यावत् ख्रिस्ती लोक *pl.*— CHRISTIAN, one who professes to believe, or is assured to believe, in the religion of Christ ख्रिस्ती धर्मावर आपला विश्वास आहे असें म्हणणारा, ख्रिस्ती; one whose inward and outward life is conformed to the doctrines of Christ ख्रिस्ताच्या उपदेशा प्रमाणें ज्याचा विचार व आचार आहे तो, ख्रिस्ती; one who is born in a Christian country or of Christian parents ख्रिस्ती देशांत किंवा ख्रिस्ती आईबापां पासून जन्मलेला, ख्रिस्ती. — *a.* ख्रिस्ता संबंधी; ख्रिस्ती धर्म संबंधी (doctrine); professing Christianity ख्रिस्तीधर्मावलंबी, ख्रिस्तीधर्मानुसारी, ख्रिस्ती (people); pertaining to the church ख्रिस्ती मंडळी संबंधीचें (court); [c. name, the name given in baptism, as distinct from the family name, or surname]. -ITY ख्रिस्ती धर्म. -IZE *v.* ख्रिस्ती क., ख्रिस्ती धर्मांत आणणें; imbue with Christian principles ख्रिस्ती मतानी युक्त -व्याप्त क. (philosophy). — CHRISTMAS ख्रिस्ताचा जन्मदिवस पाळण्याचा सण, नाताल; ता० २५ डिसेंबर. -BOX नातालाचें बक्षीस *n*; नातालाचें बक्षीस ठेवण्याची पेटी *f*.—CHRISTOLOGY ख्रिस्ता विषयीं किंवा ख्रिस्ताच्या उपदेशाविषयीं संवाद -संभाषण *n*.

CHRONICAL *a.* (*Gr. chronos*, time) काळाचा, काळा संबंधी; according to time काळाप्रमाणें, काळानुसार (method); continuing for a long time बहुकाल राहणारा, दीर्घकालिक; c. disease अंगांत रेवलेला -फार दिवसांचा जडलेला -जुनाट रोग.—CHRONICLE, historical register in order of time कालक्रमानुसार इतिहास; a history बखर *f*, वृत्तांत; *pl* two canonical books of the Old Testament ह्या नांवाचीं ख्रिस्ती शास्त्रांत दोन पुस्तकें आहेत, कालवृत्तांत. — *v.* इतिहासांत लिहून ठेवणें; दफ्तरांत लिहिणें -मांडणें. —CHRONOLOGY, science which treats of measuring or computing time by regular divisions or periods, and which assigns to events or transactions their proper dates कालगणनविद्या *f*. — CHRONOLOGIST कालगणनविद्यावेत्ता.—CHRONOLOGICAL *a.* कालगणनविद्ये संबंधी; कालानु-

क्रमा प्रमाणें. —CHRONOMETER कालमापकयंत्र *n*, घटीयंत्र *n*.—CHRONOGRAM, CHRONOGRAPH (*Gr. -graphein*, to write) inscription in which the date is expressed by some of the letters: "*My Dictionary was Conceived, Composed, and Carried out after much Labor, Inquiry, and Industry,*" which gives the date MDCCCLII.

CHRYSALIS (*Gr. chrusos*, gold) किड्याची कोशस्थिति *f*.

CHRYSOLITE *Gr.* (*-lithos*, stone) a precious stone लसण्या.

CHUB* एक नदीमत्स्य आहे. -BY *a.* चब माशा सारखा; गुबगुबीत. -FACED *a.* गालफुग्या.

CHUCK *v.* (*imit.*) खुटखुट करून बोलावणें [under].—*n.* कोंबडीचा खुटखुट शब्द.—CHUCKLE *v.* गालच्या गालीं हासणें. See CHUCK.

CHUM *F.* बिऱ्हाडाचा सोबती; —a word used in colleges.

CHUMP (?) ठोकळा, ओंडा.

CHUNAM *Hind.* चुना.

CHURCH (*Gr. kuriakon*, the Lord's house), a building set apart for Christian worship ख्रिस्ती भजनस्थान *n* -भजनालय *n*, ख्रिस्ती देऊळ *n*; a formally organized body of Christian believers worshiping together ख्रिस्ती मंडळी *f*, एकाच देवळांत -ठिकाणीं शिरस्त्याप्रमाणें मिळून भजन करणारी मंडळी *f*; a body of Christian believers, observing the same rites, and acknowledging the same ecclesiastical authority ख्रिस्ती मंडळी *f*: the Presbyterian c.; the collective body of Christians, or those who acknowledge Christ as the Savior of mankind सार्वत्रिक ख्रिस्ती मंडळी *f*; the aggregate of religious influences in a community लोकांत धर्माचें वजन *n* -चा अधिकार: to array the power of the c. against some form of moral evil.—*v.* संकट, दुःख इ० पासून ईश्वरानें सोडविलें किंवा रक्षिलें म्हणून त्याचा उपकार मानण्यासाठीं देवळांत जाणें. -MAN पुरोहित, याजक; [an Episcopalian]. -WORK मंडळीचें काम *n*; work carried on slowly ढिलें -दिरंगाचें काम *n*. -YARD देवळाच्या लगतचें कबरस्थान *n*.

CHURL * a rustic गव्हार, गांवढळ; a miser चिकू, लोभी; ill-bred man दाष्ट, तुसडा.

CHURN * दहीं घुसळण्याचें भांडें *n*.—*v.* घुसळणें, मंथणें. -ING मंथणें *n*, मंथन *n*, घुसळण *n*. -ING-ROPE रवीची दोरी *f*, मांजरी *f*. -STAFF रवी *f*, मंथा *f*.

CHYLE (*Gr. chulos*, juice) a milky juice formed in the stomach by digestion अन्नरस.—CHYME, food after it has undergone the action of the stomach पक्वाशयांत पचलेलें अन्न *n*.

CHYMISTRY, *See* CHEMISTRY.

CICATRIX (*L.*) माव *f*, व्रण, चटा.—CICATRIZE *v.* माठेसा क., खपली धरेसा क.—*i.* माठणें.

CICERONE (*It.*) one who shows strangers the curiosities of a place (कोणत्याही ठिकाणचे) परक्यास अपूर्व पदार्थ दाखविणारा.

CILIARY *a.* (*cilia*, eyelashes) पापण्यांचा.

CILICIOUS *a.* (*cilicium*, haircloth) केशांचा केलेला, अथवा केशमय, लोममय.

CIMETER, See SCIMETER.

CIMMERIAN *a.* (*Cimmerius*) सिमेरी लोकांचा (हे लोक सर्वदा अंधारांत राहत अशी कथा आहे); अतिकाळा; c. darkness सतत अंधार, अंधार गुडूप.

CINCTURE (*cinctura*) पट्टा, कमरबंद, मेखला *f*.

CINDER (*cinis*, ashes) ember कोळपलेला कोळसा, निखारा, फुपाटा; particle of matter remaining after combustion, in which fire is extinct पदार्थाचा जळून राहिलेला भाग, राख *f*.—CINEREOUS *a.* राखेसारखा; having the color of the ashes of wood भस्मवर्ण. — CINERITIOUS *a.* भस्माकार; भस्मवर्ण.

CINNABAR *Per.* हिंगूळ, रससिंदूर.

CINNAMON *Heb.* दालचिनी *f.*

CION, See SCION.

CIPHER *Ar.* an arithmetical character [0] शून्य *n*, पूज्य *n*, पूज *n*; a person of no worth कवडीमाल मनुष्य; an intertexture of letters, as the initials of a name अक्षरांचें परस्परांत गुंतविणें; a private alphabet गूढ लिपि *f.*— *v.* गूढ लिपीनें लिहिणें; खूण क.—*i.* हिशेब क.

CIRCLE (*circus*) plane figure, bounded by a single curve line वर्तुल *n*, मंडल *n*; ring कडें *n*; orb गोल; compass घेर; coterie मंडळ *n*, मंडळी *f*; a series ending where it begins चक्र *n*, गाडा, फेरा; form of argument in which two or more unproved statements are used to prove each other गिरकांड्याचें बोलणें *n*, गिरकांडा, चर्पटपंजरी *f*; territorial division मंडल *n*. — *v.* वेढा घालणें, वेष्टणें; move around प्रदक्षिणा क., गरका घालणें, गरगरा फिरणें; — in कोंडणें, चक्रव्यूहांत घालणें.—*i.* गरगरा फिरणें.—CIRCULAR *a.* वाटोळा, वर्तुळ; repeating itself फेरींचा, गिरकांड्याचा lit. fig. (reasoning); mean नीच, हलका; addressed to a number of persons having a common interest: a c. letter याद *f*, यादी *f*, 'सर्क्युलर' *n*, प्रसिद्धिपत्र *n*. — *n.* बहुतांस पाठवायाचें पत्र *n*, वटहुकूम इ०, सर्क्युलर *n*. — CIRCULATE *v. i.* वाटोळें फिरणें; pass from place to place, or from person to person एका जाग्याहून दुसऱ्या जागीं फिरणें, हातोहात फिरणें -चालणें, भ्रमणें: money *circulates*; a story *circulates*.—*t.* फिरवणें, चालवणें, चालू क. (a report, bills of credit).—CIRCULATION फिरवणें *n*, परिभ्रमण *n*, अभिसरण *n*; — of the blood रक्ताभिसरण *n*; transmission पाठविणें *n*, पोंचविणें *n*, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठविणें *n*; currency चलन *f*; extent to which anything circulates प्रसार, विस्तार, फैलावा: the c. of a newspaper.

CIRCUIT (*circum*, around, *ire*, to go) act of moving or revolving around फिरणें *n*, फेरा, परिभ्रमण *n*; regular or appointed journeying from place to place in the exercise of one's calling, as of a judge, &c. फेरी *f*; tract of country visited by judges न्यायाधिशाच्या फेरीचा प्रांत; that which encircles anything कडें *n*, वाळा, वाळी *f*, अंगठी *f*; circumference परिधि, परीघ; space inclosed within a circle मंडळांतली जागा *f*, क्षेत्र *n*. -OUS *a.* घेऱ्याचा, फेऱ्याचा, वांकडा (road, manner).

CIRCUMAMBIENT *a.* (*-ambire*, to go about) वेष्टक, परिवेष्टक: the c. heaven.

CIRCUMAMBULATE *v. i.* (*-ambulare*, to walk, वळसा घालणें -मारणें, सभोंवतां फिरणें.

CIRCUMCISE *v.* (*-cædere*, to cut) सुंता क.; *Scrip.* put off the sins of -चें पाप घालविणें, पवित्र क.—CIRCUMCISION, act of cutting off the prepuce or foreskin of males, and the internal labia of females सुंता *f*, सुनत *f*.

CIRCUMFERENCE (*-ferre*, to bear) measure round about परिधि, परिमाण *n*, घेरमेज; external surface of a sphere घेर, परिधि.

CIRCUMFLEX *a.* (*-flectere*, to bend) wave of the voice embracing both a rise and fall on the same syllable स्वरित (स्वर).

CIRCUMJACENT *a.* (*-jacere*, to lie) आसपासचा, भोवर प्रदेशाचा (countries).

CIRCUMLOCUTION (*-loqui*, to speak) use of a number of words to express an idea, when a suitable term is not at hand लांबच लांब बोलणें *n*, द्राविडी प्राणायाम.

CIRCUMMURED *a.* (*-murus*, wall) भिंतीनें वेढलेला.

CIRCUMNAVIGATE *v.* (*-navigare,* to navigate) गलबतांत बसून प्रदक्षिणा क.

CIRCUMPOLAR *a.* (*circum,* round, and *polar*) ध्रुवाजवळचा.

CIRCUMSCRIBE *v.* (*-scribere,* to write, to draw) हद्द -मर्यादा क. -बांधणें, आळा घालणें.

CIRCUMSPECT *v.* (*-spicere,* to look) सावध, चौकस, पगदस्त. -ION सावधगिरी *f,* हुशारी *f.*

CONCERT *v.* (*-certare,* to strive) plan together एकोप्यानें मसलत क.; plan मसलत क.—*i.* एकोप्यानें वागणें -चालणें [together]. —*n.* एकविचार, एकोपा; harmony स्वरांचा मेळ, सुमेळ; public musical entertainment संगीत *n,* गायनसमारंभ.

CONCESSION, See under CONCERN.

CONCH (*concha*) शंख. -OLOGY शंखशास्त्र *n* -विद्या *f.*

CONCILIATE *v.* (*conciliare,* to bring together) मनाविणें, अनकूळ क.—CONCILIATION मनावणी *f,* आराधना *f,* साम *n* [by, with].—CONCILIATOR मनमिळावू, आराधक.—CONCILIATORY *a.* मनमिळविण्याचा, सामोपचाराचा

CONCISE *a.* (*-cædere,* to cut) संक्षिप्त, अल्पशब्दक.

CONCLAVE (*-clavis,* key) private apartment एकांतखोली *f,* अंतःशाला *f*; [room in which the cardinals of the R. C. Church meet in privacy, for the election of a pope; the body of cardinals]; private meeting गुप्तसभा *f.*

CONCLUDE *v.* (*-claudere,* to shut) infer अनुमान क., तर्कानें काढणें; close बंद -शेवट -समाप्त क.; decide ठरविणें, निश्चय क.; bar अडवणें, अटकाव क.; shut up कोंडणें; include समावेश क., आंत घेणें (Rom. xi. 32) [by, with, at, in, from]. — *i.* शेवट -समाप्ति होणें; ठराव -निर्णय होणें. —CONCLUD-

ING *a.* शेवटचा, अखेरीचा, सरता. — CONCLUSION अखेरी *f*, अवसान *n*, शेवट; निर्णय, ठराव; अनुमान *n*; demonstrated c. सिद्धांत; experiment अनुभव, प्रचीति *f*, पारख *f*; *Law*, end of a pleading पर्यवसान *n*.—CONCLUSIVE *a.* निर्णयाचा, निश्चयात्मक; सिद्धांतस्थापक, सिद्धांतप्रतिपादक.

CONCOCT *v.* (*-coquere*, to cook) digest पचविणें, जिरविणें; ripen पिकविणें, पक्वदशेस आणणें; plot रचणें, कूट -कावा -व्यूह रचणें [together]. -ION पाक, पचन *n*, परिपक्वता *f*; कट, व्यूह, युक्ति *f*.

CONCOMITANT *a.* (*-comitari*, to accompany) बरोबर असणारा, अनुगामी. —*n.* सोबती.—CONCOMITANCE समागम, अनुषंग.

CONCORD (*cor*, heart) agreement एकोपा, मिलाफ; harmony स्वरांचा मेळ, स्वरैक्य *n*; *Gram.* अन्वय. -ANCE, dictionary in which all the important words used in any work are arranged alphabetically, with reference to the places in which they occur अमुक एका ग्रथांतील शब्द त्याच ग्रंथांत अमक्या ठिकाणीं आहेत हें पाहण्याचा कोश, स्थलदर्शक कोश. -ANT *a.* मिलाफाचा, अनुरूप.—CONCORDAT कट, मिलाफ, करार [agreement made between the pope and a sovereign for the regulation of ecclesiastical matters with which both are concerned].

CONCOURSE (*-currere*, to run) मिळून धावणें *n*; confluence संगम; assembly जमाव, मेळा, समुदाय.

CONCRETE *a.* (*-crescere*, to grow) consistent in a mass घट्ट, दाट; *Logic*, not abstract गुण -धर्मविशिष्ट; as the *white snow*, where whiteness is considered as existing in the snow, and not as a separate thing.—*n.* डिखळ *f*, ढेप *f*, गोळा; [*Logic*, a term designating both quality and the subject in which it exists].—*v. i.* जमणें, गोठणें.—*t.* जमविणें, गोठविणें.

CONCUBINE (*-cubare*, to lie down) woman who cohabits with a man without being his wife ठेवलेली बायको *f*, राख *f*; wife of inferior condition उपपत्नी *f*, पाटाची बायको *f*.—CONCUBINAGE उपपत्नीसंभोग; the state of being a concubine मानित पतिपत्नीभाव.

CONCUPISCENCE (*F.*) दुर्वासना, विषयवासना *f*. —CONCUPISCENT *a.* कामी, विषयलंपट, व्यसनी.

CONCUR *v.* (*-currere*, to run) agree जमणें, मिळणें; act jointly मिळून काम क.; assent मान्य -कबूल होणें [in, with]. -RENCE जम, मिलाफ, गांठ *f*; अनुमत *n*, संमत *n*, एकचित्त *n*; joint rights समाईक हक्क. -RENT *a.* जमणारा, मिलाफाचा; मिळून काम करणारा; समाईक (jurisdiction) एकचित्त, संमतीचा.

CONCUSSION (*-quatere*, to shake) हलवणें *n*, धक्का देणें *n*; shock धक्का, हबका; agitation खळबळ *f*, क्षोभ.

CONDEMN *v.* (*-damnare*) pronounce to be wrong दोष ठेवणें, बोल लावणें; pronounce a judicial sentence against शिक्षा -शिक्षेचा ठराव सांगणें; pronounce to be unfit for use निकामी -बेकामी ठरविणें: the ship was *condemned*. -ABLE *a.* दूषणीय, दंडनीय [for, to].—CONDEMNATION दंड -शिक्षा नेमणें *n*; दंड, शिक्षा *f*; cause of condemnation शिक्षेचें कारण *n*, शिक्षाहेतु (John iii. 13).

CONDENSE *v.* (*-densare*, to make thick) घट्ट -दाट क.; *Chem.* reduce into another and denser form रूपांतर करून घट्ट क.: to c. gas into a solid form [from, into, to].—*i.* घट्ट -दाट होणें.—*a.* घट्ट, दाट, घन.

CONDESCEND *v.* (See DESCEND) let one's self down थोरपणा एकीकडे ठेवून वागणें, अंगीं लहानपणा घेणें [to]. — CONDESCENSION

हलकेपणा पदरीं घेऊन वागणें *n*, मेहेर *f*, नम्रता *f*; courtesy भीड *f*, मुरवत *f*.

CONDIGN *a.* (*-dignus*, worthy) योग्य, वाजवी (punishment, praise).

CONDIMENT (*condire*, to season) मसाला, चटणी *f*, तिखटमीठ *n*, तोंडीलावणें *n*.

CONDISCIPLE (*con* and *disciple*) सहाध्यायी, सोबतीचा शिकणारा.

CONDITION (*-dare*, to give) state स्थिति *f*, हवाल; quality गुण, धर्म; stipulation बोली *f*, करार; clause in a contract, which has for its object to suspend, to defeat, or to modify, the principal obligation अट *f*, अड *f*, शर्त *f*.—*v.* करार -बोली क. — *i.* करार -संकेत होणें. -AL *a.* अटीचा, अटकावाचा; c. mood संकेतार्थरूप; c. bill जबाबी हुंडी *f*.

CONDOLE *v.* (*-dolere*, to grieve) दुसऱ्याच्या दुःखाला रडणें [with, on].—CONDOLENCE समदुःखी होणें *n*; सहशोक.

CONDUCE *v.* (*ducere*, to lead) उपयोगी -सहाय -साधक -प्रयोजक होणें [to, towards]. —CONDUCIVE *a.* साधक, प्रयोजक, वह, in comp. जनक : c. to wealth अर्थावह; c. to satisfaction तृप्तिजनक.

CONDUCT (do.) management वहिवाट *f*; generalship पुढार, पुरस्कार; pass रहदारी *f*; warrant परवाना; convoy वलावा; a safe-c. अभयपत्र *n*; वागणूक *f*, वर्त्तणूक *f*.—*v.* वाट दाखवून नेणें; वहिवाटणें, चालविणें;—one's self वर्त्तणें, वागणें; पुढाकार घेणें [from, to]. -OR पुढारी, मोहरपी; वाटाडी; वहिवाटदार, कारभारी;—of heat उष्णतावाहक;—of a sacrifice याजक. — CONDUIT वाहक, वाही; pipe नळ, नळी *f*.

CONE (*conus*) सुळका, शंकु.—CONICAL *a.* निमुळता, गोपुच्छाकार; c. section शंकुछेद -छिन्न *n*.

CONFECTION (See COMFIT) मिठाई *f*, हलवा, मुरंबा इ० पदार्थ; *Med.* मसाल्याचा अवलेह किंवा मोदक. -ARY मिठाई *f*, मेवा. -ER हलवाई, मेवामिठाई करणारा.

CONFEDERATE *v.* (*fœdus*, league) जुटणें, जथणें [with].—*a.* जुटलेला, जुटीचा, कटांतला. — CONFEDERACY, compact for mutual support or common action एकोपा, जूट *n*; the persons united by a league जूट, जथा *m*, *f*; *Law*, combination of two or more persons to commit an unlawful act कट, संगनमत *n*.

CONFER *v. i.* (*-ferre*, to bear) discourse or converse in a serious manner बोलाचाल क., संभाषण क.; compare views विचार -मतें ताडून -मिळवून पाहणें; — in private खलबत क.—*t.* देणें, दान क., इनाम देणें [on]. -ENCE बोलाचाली *f*, भाषण *n*; meeting for consultation बैठक *f*, सभा *f*, प्रसंग; private c. खलबत *f*.

CONFESS *v.* (*-fateri*) acknowledge स्वीकारणें, पदरीं घेणें, कबूल होणें (fault, debt); own ओळखणें, आपला ह्मणणें (Matth. x. 32); admit as true खरा मानणें; acknowledge as after a previous denial एक वेळ नाकबूल झाल्यावर कबूल होणें: send for him hither, and let him c. the truth; acknowledge, as one's sins to a priest, in order to receive absolution;—said of a worshiper आपल्या पापांची क्षमा मिळविण्या करितां उपाध्यापासीं तीं कबूल होणें; hear or receive such confession दोषश्रवण क.; —said of a priest; attest साक्षदेणें : tall, thriving trees *confessed* the fruitful mould [to]. — *i.* कबूल होणें; पाप पदरीं घेणें : the man went to the priest to c. -EDLY *ad.* निखालस, निःसंशय.—CONFESSION स्वीकार, इकरार, अंगीकार; उपाध्यापासीं पाप पदरीं घेणें *n*, दोषस्वीकार; formulary in which the articles of faith are comprised धर्मसिद्धांतपद्धति *f*. -AL दोष

श्रवण करितांना बसायाचें उपाध्याचें आसन *n*, दोषश्रवणपीठ *n*. — CONFESSOR कबूल करणारा, पदरीं घेणारा; one who makes a profession of his faith in the Christian religion ख्रिस्ती धर्म स्वीकारणारा; [one who confessed the doctrine of Christ before persecuting magistrates, and firmly endured punishment for defending the faith]; priest who hears the confessions of others दोषश्रवणगुरू.

CONFIDE *v.* (*-fidere,* to trust) विश्वासानें ठेवणें, विश्वासानें सोपणें -हवालणें [to]. — *i.* विश्वासणें, भरवसा ठेवणें [in].—CONFIDANT सखा, रहस्यमित्र.—CONFIDENCE विश्वास, भरवसा; assurance खातरजमा *f*, धडा; self-reliance दम, उमेद *f*, अवसान *n*; ground of faith भावहेतु.—CONFIDENT *a.* विश्वासवान्, विश्वासाचा; secure निर्भय, निश्शंक; bold to a fault धीट; giving occasion for confidence खातरीचा, खातरी ठेवण्याजोगा, खातरी उत्पन्न करण्याजोगा [in, of].—-IAL *a.* विश्वासू, विश्वास ठेवण्याजोगा (servant); communicated in confidence विश्वासानें सांगितलेला, गुप्त (matter).

CONFINE (*-finis,* end) सीमा *f*, हद्द *f*, शींव *f*; —used chiefly in the *pl.* — *v.* restrain प्रतिबंध -निग्रह क.; bound बांधणें [to].—*i.* हद्दीवर लगटून -लागून असणें.—CONFINED *a.* आकळलेला; कोंडलेला, अडचणींत घातलेला; बाळंत झालेली.—CONFINEMENT नेम, मर्यादा *f*; कैद *f*, बंदी *f*, अटक *f*; अडचण *f*, आकलन *n*, निग्रह; बाळंतपणा; solitary c. एकांत कैद *f*.

CONFIRM *v.* (*-firmare,* to make firm) बळकट क., बळकटी -पुष्टी आणणें; ratify मुकरर -मंजूर क.; administer the rite of confirmation to स्थिर क. [by]. -ATION बळकट क. *n*, बळकटी *f*; पुष्टीकरण *n*, पुष्टी *f*; बहाली *f*, मंजुरी *f*; proof प्रमाण *n*; rite practised in the Episcopal churches by which a baptized person is admitted, through the laying on of the hands of a bishop, to the full privileges of the church स्थिरीकरण *n*.

CONFISCATE *v.* (*-fiscus,* basket, money-bag, the state treasury) दंडा दाखल घेणें, जप्त क.—*a.* दंडार्थ घेतलेला, जप्त.

CONFLAGRATION (*-flagrare,* to blaze) मोठी आग *f*, आगीचा डोंब; general c. प्रलयाग्नि.

CONFLICT (*-fligere,* to strike) धक्का, घासणी *f*; contest झोंबी *f*, झूज *n*, भांडण *n*; agony प्राणांतव्यथा *f*.—*v. i.* घासणें, आदळणें; झगडणें, भांडणें, लढणें [with].

CONFLUENCE (*-fluere,* to flow) संगम: c. of two rivers; crowd जमाव, मेळा.—CONFLUENT *a.* मिळून वाहणारा; एका ठिकाणीं मिळणारा; blending एकांत एक मिसळणारा; c. smallpox मसुऱ्या देवी *f pl.*

CONFORM *v.* (*-forma,* form) सारखें क., पाहून क., अनुसरणें [to, unto].—*i.* सारखें पाहून वागणें, अनुसरणें [to, with]; conform with the usages of the established church राजस्थापित धर्मा प्रमाणें चालणें. -ABLE *a.* सारखा, बरहुकूम, अनुरूप [to]; suitable बराबर, माफक, लायक; submissive आज्ञांकित, हुकमी. -ABLY *ad.* अनुरोधानें, बरहुकूम, यथा: c. to the rule यथाविधि. -ATION मिलाफ, मेळ; form आकार, आकृति *f*; make बांधा, अंगलोट. -IST अनुसरणारा; one who complies with the worship of the Church of England, or of the established church इंग्लंडाच्या (ख्रिस्ती) मंडळीच्या भक्तिमार्गा प्रमाणें, अथवा राजस्थापित धर्मा प्रमाणें चालणारा, राजस्थापित धर्मानुसारी.—-ITY मिलाफ, जम; सारखेपणा, सादृश्य [to, with, between]; compliance अनुरोध, अनुकूलता *f*.

CONFOUND *v.* (*-fundere,* to pour) mistake by error भ्रांतीनें (एका वस्तूवर दुसऱ्या

वस्तूचा) भास होणें; perplex घाबरविणें, धांदल क.; discomfit वाताहत -धूळधाण -मोड क.; strike with amazement दंग -थक्क क.; कुंठित क. [with, by]. -ED *p. a.* गोंधळलेला, भ्रांत; कुंठित, दंग.

CONFRATERNITY (See FRATERNITY) भाऊमंडळी *f*, बंधुवर्ग.

CONFRONT *v.* (*-frons,* front) समोर -सन्मुख राहणें -असणें; oppose आडवा होणें, प्रतिकूल होणें; compare मुकाबला -रुजू क.; set face to face समोरासमोर उभें क. -आणणें, रुबरू क. [with]. -ATION समक्षासमक्ष *f*, रुबरू *f*, रुजू मुकाबला.

CONFUSE *v.* See CONFOUND. — CONFUSION घोटाळा, गोंधळ; perturbation धांदल *f*, त्रेधा *f*; overthrow मोड, दाणादाण *f*; tumult घालमेल *f*, बंडाळी *f*.

CONFUTE *v.* (*-futare,* to argue) put to silence कुंठित क., निरुत्तर क.; disprove खोटा करून दाखविणें (error) [by]. — CONFUTATION खंडन *n*, मोड.

CONGEAL *v.* (*-gelare,* to freeze) थिजवणें, गोठवणें; bind, as if by cold थंडीनें आवळणें; stiffen, as from the effect of terror भयानें ताठ -काष्टवत् क.—*i.* गोठणें, थिजणें, सांखळणें.

CONGENER (See GENERIC) एकजातीचा, सजातीय. —CONGENIAL *a.* एकस्वभावाचा, समस्वभाव, समशील; naturally adapted स्वभावास लागून, स्वभावानुसार [to]. -ITY समभाव, समशीलता *f*; suitableness योग्यता *f*, उपयुक्तता *f*.

CONGERIES (*-gerere,* to bear) पुंज, राशि.

CONGEST (*-gerere,* to bear) गोळा -रास क.— *Med.* — of blood रक्तस्तंभन *n*, रक्तसंचय, तुंबारा; — of humors into a tumor गांठ *f*, ग्रंथी *f*.

CONGLOMERATE *a.* (*-glomus,* ball of yarn) जमा -गोळा झालेला.—*v.* गोळा क.—CONGLOMERATION गोळा, रास *f*, समूह.

CONGRATULATE *v.* (*-gratulari,* to wish joy) address with expressions of sympathetic pleasure on account of some happy event affecting the person addressed दुसऱ्यास कांहीं शुभ गोष्ट घडली असतां आपणास आनंद झाला आहे असें त्याला (बोलून -लिहून) दाखविणें.—CONGRATULATION सहानंदोक्ति *f*, अभिनंदन *n*, मुबारकबादी *f*.

CONGREGATE *v.* (*-gregare,* to collect into a flock) जमा क., मिळविणें.—CONGREGATION जमाव, मेळा, समुदाय; assembly of persons सभा *f*, मंडळी *f*; — of persons met for the worship of God ईश्वरभजनार्थ मिळालेली मंडळी *f*. -AL *a.* मंडळी संबंधी, सामाजिक; [belonging to the system of Congregationalism]. -ISM [that system of church government which vests all ecclesiastical powers in the assembled brotherhood of each local church, as an independent body].

CONGRESS (*-gradi,* to go) meeting सभा *f*, प्रसंग; meeting of the sexes in sexual commerce मैथुन *n*, स्त्रीपुरुषसंग; formal assembly, as of deputies, representatives, &c. प्रतिनिधींची सभा *f*.

CONGRUITY (*congruo*) मेळ, मिलाफ, जमा [with].—CONGRUOUS *a.* मिलाफाचा, संगतवार, संयुक्तिक.

CONIC, See under CONE.

CONJECTURE (*-jacere,* to throw) अनुमान *n*, अटकळ *f*; mere c. अटकळपंचविशी *f*.— *v.* अनुमान क.—CONJECTURAL *n.* अनुमानाचा, तर्काचा.

CONJOIN *v.* (See JOIN) जोडणें, मिळविणें; associate सोबत घालून देणें, गांठ मारणें [with]. —CONJOINT *a.* संयुक्त, संबद्ध. -LY *ad.* मिळून, जथून. — CONJUNCTION संबंध, सम

गम, संयोग; *Gram.* उभयान्वयी अव्यय *n*; *Astron.* योग, संगम. — CONJUNCTURE संधि, संयोग; crisis आणिबाणीची वेळ *f*, प्रसंग, संधी *f*.

CONJUGATE *v.* (*-jugare,* to yoke) जोडणें; *Gram.* धातूचीं रूपें चालविणें.—CONJUGATION संयोग; धातूचीं रूपें चालविणें *n*, रूपाख्यापन *n*; class of verbs conjugated in the same manner धातूंचा गण.

CONJUGAL *a.* (do.) लग्न संबंधी, वैवाहिक; c. fidelity in a woman सतित्व *n*, पातिव्रत्य *n*; —in a man एकपत्निव्रत *n* -सेवा *f*.

CONJURE *v.* (*-jurare,* to swear) शपथ -आण -वाहून पुसणें -बोलावणें; enchant मंत्र घालणें, भारणें, जादू क. [by].—CONJURER जादुगीर, मंत्री, गारुडी.

CONNATE *a.* (*-natus,* born) समकालज, एककालीं जन्मलेला.

CONNECT *v.* (*-nectere,* to bind) knit, link, or fasten together विणणें, गुंतविणें, गुंफणें; join जोडणें, संबंध क. [with, to]. -ION *n.* संबंध, अन्वय, संदर्भ, नातें; one who is connected by family ties सोयरा, नातलग, संबंधी; with great personages, as a means of power or profit वशिला.

CONNIVE *v.* (*-nivere,* to close) close the eyes upon a fault or other act कानाडोळा क., डोळ्यांवर कातडें ओढणें [at].—CONNIVANCE कानाडोळा, डोळेझांक *f*.

CONNOISSEUR (*F.*) a critical judge अभिज्ञ, रसज्ञ, पारखी; one well versed in any thing निपुण, निष्णात.

CONNUBIAL *a.* (*-nubere,* to marry) लग्नाचा, विवाहविषयक.

CONQUER *v.* (*-quærere,* to seek) gain by force जिंकणें, हस्तगत करून घेणें; surmount जिंकणें, निभावणें, पारपडणें (difficulties); obtain by success फत्ते करून मिळविणें, प्रयत्नानें मिळविणें, मिळवणें [by, from]. -OR जय मिळविणारा, विजयी. —CONQUEST जय, विजय; that which is conquered जितवस्तु *f*, द्रव्य *n*.

CONSANGUINEOUS *a.* (*-sanguis,* blood) एका रक्ताचा, सगोत्र. —CONSANGUINITY एका घराण्याचा संबंध, सहोदरसंबंध, सगोत्रता *f*.

CONSCIENCE (*-scire,* to know) knowledge of our acts, states, or characters as right or wrong आत्मज्ञान *n*, विज्ञान *n*; the moral faculty मन *n*, सदसद्विवेक; estimate or determination of conscience मनाचा निवाडा; honesty प्रमाणिकपणा, इमान *n*; to make c. मनाच्या सांगणी प्रमाणें चालणें -वागणें.—CONSCIENTIOUS *a.* सदसद्विचाराप्रमाणें चालणारा, नेकीचा. -LY *ad.* मनाच्या सांगीप्रमाणें, इमानानें, नेकीनें.—CONSCIOUS *a.* possessing the faculty of knowing one's own thoughts सावध, देहभानी; possessing knowledge मनोबोधित, प्रबोधित, मनःसाक्षी [of]. -NESS शुद्धि *f*, देहभान *n*, फाम *n*; ज्ञान *n*, माहिती *f*.

CONSCRIPT *a.* (*-scribere,* to write) पटावर मांडलेला -नमूद केलेला. — *n.* [one taken by lot from the conscription list, and compelled to serve as a soldier or sailor]. — CONSCRIPTION पटावर नांव दाखल क. *n*; [compulsory enrolment of individuals of a certain age, held liable to be drafted for military or naval service].

CONSECRATE *v.* (*-sacer,* sacred) make sacred वाहणें, अर्पणें, संस्कृत क.; — by sprinkling अभिषिक्त क.; exalt to the rank of a saint संतपदीं बसविणें, संतमाळिकेंत मिळविणें; enroll among the gods देवगणांत मिळविणें; dignify मोठेपणा देणें, पूज्य क.: rules or principles *consecrated* by time [to].— *a.* वाहिलेला, समर्पित; अभिषिक्त; पवित्र.— CONSECRATION प्रतिष्ठापन *n*, संस्कार; प्रोक्षण

n;—of one's self to God आत्मनिवेदन *n*; —of an idol प्राण -देवप्रतिष्ठा *f*; संत अथवा देवमंडळींत मिळविणें *n*.

CONSECUTIVE *a.* (*-sequi*, to follow) अनुक्रमाचा, लागोपाठचा; consequential परिणामाचा, प्रयुक्त. -LY *ad.* लागोपाठ, क्रमानें, हारोहार.—CONSECUTION पद्धत *n*, क्रम, फरपट *f*; *Logic*, अनुमानपरंपरा *f*, मालिका *f*.

CONSENT *v.i.* (*-sentire*, to feel) concur मान्य होणें, रुकार देणें; indicate willingness मान्यता दर्शविणें [to].—*n.* अनुमत *n*, रुकार; unity of opinion एकमन *n* -मत *n*, ऐक्य *n*; harmony मिलाफ, मेळ: melodious c. of the birds.

CONSEQUENCE (*F.*) result परिणाम, फल *n*; inference अनुमान *n*, तर्क; connection of cause and effect कार्यकारण संबंध; weight वजन *n*, कदर *f*; moment मुजाखा, परवा *f*; in c. या कारणानें, यावरून; of c. मोठा, वजनदार. — CONSEQUENT *a.* प्रयुक्त, मुळें झालेला [on]. — *n.* परिणाम, फल *n*. -IAL *a.* प्रयुक्त; assuming an air of consequence पत्राजी, तोरेदार, दिमाखदार. -LY *ad.* ह्मणून, त्यामुळें, तस्मात्.

CONSERVE *v.* (*-servare*, to keep) राखणें, संभाळून ठेवणें; candy fruit मुरंबा घालणें.—*n.* मुरंबा.—CONSERVATOR रक्षक, पालक; *Law*, लोकांमध्यें स्वास्थ्य राखणारा, अथवा लोकांच्या हक्काचें रक्षण करणारा (न्यायाधीश, नाझर इ०).

CONSIDER *v.* (*-sedere*, to sit) fix the mind on, with a view to a careful examination मन लावणें, विचार क.; take into view लेखणें, हिशेबांत -जमेस धरणें: c. the chances of war; estimate मानणें, लेखणें: I c. him wise [of]. -ABLE *a.* विचार करायाजोगा, विचारणीय; not insignificant संभावित, योग्य, मान्य (man); of value जमेस धरायाजोगा, बराच (sum of money). -ABLY *ad.* बराच, सुमाराचा. -ATE *a.*—of persons विचारी, विचारवंत;—of acts विचारपूर्वक.—CONSIDERATION विचार क. *n*, मनन *n*; deliberation विचार, मनसुबा; attentive respect मुलाजा, मुरवत *f*; influence वजन *n*, भारदस्ती *f*; motive हेतु, कारण *n*; compensation नुकसानी बद्दल दिलेला पैसा; c. of pros and cons कार्याकार्य विचार; minute c. सूक्ष्म विचार; upon c. पाहिलें असतां; in c. of बदल, -च्या मोबदला.

CONSIGN *v.* (*-signare*, to seal) give, transfer, or deliver, in a formal manner as if by signing over into the possession of another, or into a different state, with the sense of fixedness in that state, or permanence of possession हवालणें सोपणें, स्वाधीन क., दिमतीस देणें; appropriate नांवानें काढून ठेवणें. -च्या कामास लावणें; give into the hands of an agent for superintendence, sale, &c. गुमास्त्याच्या जिम्मेस देणें (goods) [to]. -MENT निरवणूक *f*, निरवणी *f*; writing by which anything is consigned हवाला खत *n*, समर्पण पत्र *n*; thing consigned हवाललेली वस्तु *f*; goods sent to a factor for sale गुमास्त्याच्या दिमतीस पाठविलेला माल.—CONSIGNEE गुमास्ता, अडत्या.

CONSIST *v.* (*-sistere*, to stand) be असणें, होणें (Col. i. 17); be composed केला असणें, in comp. घटित -मय असणें; be harmonious जुळणें, मिळणें [of, in]. -ENCE, -ENCY स्थिति *f*, धृति *f*, स्थैर्य *n*; density घट्टपणा, घनता *f*; firmness स्थिरता *f*, दृढता *f*; a combination जूट; coherence ताळ, धरबंद, संदर्भ, संयुक्ति *f*: c. of laws, opinions, behavior.—CONSISTENT *a.* स्थिर, अचळ, घट्ट; मिलाफाचा, मेळाचा, संयुक्त [with, to]. -LY *ad.* संगतवार, एकरीतीनें; agreeably अनुसरून, अनुरूप.

—CONSISTORY, a spiritual court धर्मप्रकरणीं खटल्यांचा निवाडा करायाचें कोर्त्त *n.*

CONSOLE *v.* (*-solari*) शांतवन -समाधान क. [for, by, with].—CONSOLABLE *a.* शमनीय, सांत्वनीय.—CONSOLATION सांत्वन *n*, समाधान *n*, दुःखशांति *f*; cause of comfort समाधान कारण *n* (Luke ii. 25) [for].—CONSOLATORY *a.* दुःखशमक, शोकहारक.—CONSOLER सांत्वनकर्त्ता, संतापहारी.

CONSOLIDATE *v.* (*-solidus*, solid) घट्ट -कठिण क.; unite एकत्र -एक क., जमविणें; *Surg.* जोडणें, भरणें, तोंड मिळविणें. — *i.* घट्ट होणें [into].—CONSOLIDATED *p.a.* दृढ केलेला; जोडलेला; घटीव, अटीव; एककेलेला.

CONSONANT *a.* (*-sonare*, to sound) consistent मिलाफाचा, बेताचा, उपयुक्त; according अनुसारी [with, to]; accordant एकस्वर, समनाद. — *n.* व्यंजन *n*, हलवर्ण.—CONSONANCE मिलाफ, जमें; स्वरैक्य *n*, समस्वरता *f*.

CONSORT (*-sòrs*, lot) companion सोबती, जोडपी; wife or husband बायको *f* किंवा नवरा; queen c. राजपत्नी *f*.—*v. i.* सहवास ठेवणें, समागम क. — *t.* स्नेह -संगत -मन जोडणें [with].

CONSPICUOUS *a.* (*-spicere*, to behold) स्पष्ट, उघड, व्यक्त; eminent प्रसिद्ध, नांवालौकिकाचा, नामांकित.

CONSPIRE *v.* (*-spirare*, to breathe) agree, by oath, covenant, or otherwise, to commit a crime कट -संगनमत क.; agree मिळणें, जमणें [with, against, together]. —CONSPIRACY कट, संगनमत *n*; जम, मिलाफ, संयोग.—CONSPIRATOR संगनमतांतला, कटांतला, संगनमत्या.

CONSTABLE (*comes stabuli*, count of the stable) officer of the palace पोलीस खात्यांत कोतवाल, जमादार यां सारिखा एक हुद्देदार आहे, 'कन्स्टेबल.' — CONSTABULARY *a.* कन्स्टेबलांचा.

CONSTANT *a.* (*-stare*, to stand) स्थिर, अचल, दृढ. -LY *ad.* नित्य, सतत्; स्थिरतेनें.—CONSTANCY सतत्पणा; lasting affection दृढप्रीति *f*.

CONSTELLATION (*-stella*, star) नक्षत्र *n*, नक्षत्रांचा घड; assemblage of splendors or excellencies तेजःपुंज, अपरसूर्य.

CONSTERNATION (*-sternare*, to overcome) त्रेधा *f*, पांचावर धारण *f*, चळकांप.

CONSTIPATE *v.* (*-stipare*, to crowd together) stop, as a passage कोंडणें, बुजविणें; make costive कोठा बंद क., मलावष्टंभ क.—CONSTIPATION दाटी क. *n*, दाटी *f*, गिचडी *f*; मलावरोध, बद्धकोष्ट.

CONSTITUTE *v.* (*-statuere*, to place) स्थापणें, नेमणें; compose करणें, बनावणें; depute नेमून -वकील -मुखत्यार करून पाठविणें.—CONSTITUENT *a.* component अंश -कारण -मूलभूत: body, soul, and reason are the three c. parts of man; having the power of appointing नियोजक, संस्थापक.—*n.* अवयव -अंगभूत पदार्थ -विषय; संस्थापक, नियोजक; one who assists in appointing or electing a representative to an office मुखत्यार निवडण्याच्या किंवा नेमण्याच्या कामांत सहकारी. — CONSTITUTION नियोजन *n*, संस्थापन *n*; natural condition तब्यत *f*, प्रकृति *f*; make घटना *f*, बनावट *f*, रचना *f*; organic law कायदा; *pl* बंदोबस्त, व्यवस्था *f*, विधान *n*. -AL *a.* तब्यतीचा, प्रकृतीचा, आंगचा (infirmity); राज्यव्यवस्थानुसारी, राज्यनीतीचा, बंदोबस्ताचा, कायद्यांचा.

CONSTRAIN *v.* (*-stringere*, to strain) secure by bonds बांधणें, आवळणें; compress आकुंचित क.; restrain आवरणें, आकळणें; compel जुलूम -बलात्कार क. [by].— CONSTRAINT आवर, निग्रह; बळजोरी *f*, बलात्कार, जोर; necessity गरज *f*, अवश्यकता *f*, जरूरी *f*.—CONSTRICT *v.* आंखडणें, आकर्षणें. -ED

p. a. आकुंचित, आंखडलेला. -ION संकोच, आकुंचन *n.*

CONSTRUCT *v.* (*-struere,* to pile up) बांधणें, उठवणें, रचणें (an edifice); arrange रचणें, उभारणें, बनावणें (a theory). -ION बांधणी, रचना *f*; structure घडण *f*, रचना *f*, बांधा; *Gram.* वाक्यरचना *f*, पदयोजना *f*, sense अर्थ, आशय.—CONSTRUE *v.* अन्वय लावणें -जुळणें -दाखविणें; translate भाषांतर क.; put a construction upon -चा अर्थ लावणें -बसवणें -क. [upon].

CONSTUPRATE *v.* (*-stuprare,* to ravish) हटसंभोग क., भ्रष्ट क., जुलूम क.

CONSUBSTANTIAL *a.* (See SUBSTANCE) एकजातीय, समतत्व, एकतत्व. -ITY समतत्वता *f.* —CONSUBSTANTIATION समभाव, समतत्वता *f*; [*Theol.* the actual, substantial presence of Christ with the bread and wine of the sacrament of the Lord's Supper].

CONSUL (*L.*) रोमन लोकांत राज्यकारभार पाहणारा एक मुख्य अधिकारी होता; officer appointed to protect the commerce of his country in foreign parts स्वदेशच्या व्यापाराचें परदेशांत रक्षण करण्यास नेमलेला सरकारी कामदार -वकील -अमीन. -AR *a.* कान्सल -वकिला संबंधी. -ATE कान्सलाचा हुद्दा, अमीनी *f.* -SHIP कान्सलाचा हुद्दा; कान्सलाच्या हुद्याची मुदत *f.*

CONSULT *v. i.* (*consulere*) मसलत -सल्ला घेणें -पुसणें; deliberate विचार -मनन क.—*t.* -ची मसलत विचारणें; recur to for information -पासीं माहिती करून घ्यायास जाणें; regard पाहणें, लक्ष्य -दृष्टि -नजर ठेवणें; deliberate upon विचार क.;—books ग्रंथअवलोकन क. -पाहणें [with, in, upon]. -ATION मसलत *f*, विचार; meeting of persons to consult together मसलती करितां मिळणें *n*, दिवाण *n*, मजलस *f*, बैठक *f*; secret c. खलबत *n.*

CONSUME *v.* (*-sumere,* to take) destroy, as by decomposition, dissipation, waste, or fire नाश क., फडशा क., उडविणें; use up खर्चणें; waste दवडणें.—*i.* झिजणें, नाश -लय होणें; become exhausted खपणें.—CONSUMPTION खाणें *n*, खाद *f*, फस्त क. *n*; खर्च, फडशा, फन्ना; loss तोटा, झीज *f*; a gradual decay of the body झिजणी *f*, क्षय; phthisis क्षयरोग, ककक्षय; pulmonary c. यक्ष्मा. — CONSUMPTIVE *a.* क्षय -नाशकारक; क्षयरोगी, झड्या; inclined to consumption क्षयाच्या भावनेचा.

CONSUMMATE *v.* (*-summa,* sum) achieve पुरा -पूर्ण क. [by]. — *a.* पक्का, पुरा, पूर्ण.—CONSUMMATION पूर्णता *f*, संसिद्धि *f*, निष्पत्ति *f*; close अंत, समाप्ति *f.*

CONTACT (*-tangere,* to touch) close union of bodies निकट संबंध, संयोग; a touching स्पर्श, संपर्क. — CONTAGION, act of transmitting a disease from one person to another, by direct or indirect contact साक्षात् किंवा परंपरेच्या स्पर्शानें रोग पाठविणें *n*, स्पर्शसंचार; pestilential influence स्पर्शसंचारी रोग -बाधा *f* (मरी *f*, लस *f*, इ०). —CONTAGIOUS *a.* स्पर्शानें होणारा -लागणारा -पसरणारा (disease); pestilential विखारी, रोगी (air); spreading from one to another एकाकडून दुसऱ्याकडे जाणारा -पसरणारा: the spirit of imitation is c.

CONTAIN *v.* (*-tenere,* to hold) comprise समावेश क., असणें: what thy stores c. bring forth; hold धरणें, सांठवणें, मावून घेणें: a barrel *contains* more than two bushels. -ABLE *a.* मावायाजोगा, रहायाजोगा. -ED धरलेला, समाविष्ट; गर्भित, आकलित.—CONTINENCE, -CY, self-command आत्मसंयमन *n*, निग्रह; chastity of males एकपत्निव्रत *n*;—of females एकपत्निसेवा *f*; resistance of concupiscence नाडंबदपणा, ब्रह्मचर्य *n*.—CONTINENT *a.* जितेंद्रिय, नियतें-

द्रिय; बंदिस्त, नाडबंद. — *n.* great extent of land not interrupted by water. महाद्वीप *n*; [main land of Europe, as distinguished from the islands, esp. from England]. -AL *a.* महाद्वीप संबंधी, महाद्वीपाचा.

CONTAMINATE *v.* (*-taminare,* to violate) soil मळविणें, डाग लावणें; pollute भ्रष्ट क., विटाळविणें; tarnish कलंक -दोष लावणें [by, with]. —CONTAMINATED दूषित, लिप्त, अपवित्र.— CONTAMINATION दूषण *n*, मालिन्य *n*, अशौच *n*.

CONTEMN *v.* (*-temnere,* to slight) अनादरणें, अवमानणें, कसपटा प्रमाणें मोजणें [for]. -ED निंदित, अवमानित, उपेक्षित. — CONTEMPT अपमान, धिक्कार; *Law,* disobedience of the rules, orders, or process of a court of justice, or of the rules or orders of a legislative body; disorderly, contemptuous, or insolent language or behavior in presence of a court, tending to disturb its proceedings, or impair the respect due to its authority कोर्त्याचा किंवा कायदे करण्याऱ्या मंडळीचा अपमान बेअदबी *f* [for]. -IBLE *a.* तिरस्कार करायाजोगा, तुच्छ, पाजी, हलका. -UOUS *a.* अवमानाचा, धिक्कारयुक्त, निंदात्मक; haughty दिमाखाचा, तोऱ्याचा, ताठ्याचा (behavior). -NESS उद्धटपणा, मगरूरी *f*.

CONTEMPLATE *v.* (*contemplari*) meditate ध्यान -लक्ष लावणें; have in view मनांत होऱ्यांत असणें. — *i.* चिंतन -मनन क. — CONTEMPLATION ध्यान *n*, ध्यास, चिंतन *n*; to have in c. विचार -बेत असणें. — CONTEMPLATIVE *a.* ध्यानस्थ (look); मननशील, विचारवंत: the c. part of mankind.

CONTEMPORARY (*-tempus,* time) एककालीं असणारा, एककालिन, बराबरचा (with).—*n.* एककालिन, एककालीं असणारा मनुष्य -वर्त्तमानपत्र *n*, इ०.

CONTEND *v. i.* (*-tendere,* to stretch) quarrel भांडण -कज्जा क.; dispute वाद -तकरार क. [for, against, with].—CONTENTIOUS भांडण *n*, कज्जा; तकरार *f*, वाद; fierce c. झोंबी *f*, लटपट *f*, कलागत *f*.—CONTENTION *a.* भांडखोर, वादप्रिय; involving contention वादाचा; खटल्याचा, कलह उत्पन्न करण्याजोगा, तकरारीचा.

CONTENT *a.* (*-tenere,* to hold) तृप्त, संतुष्ट, समाधानी, राजी. — *v.* इच्छा तृप्त क., मनशा मोडणें; please संतोषविणें, खुशी क. -MENT तृप्ति *f*, परितोष, संतोष.—CONTENTS — of a receptacle भरगत *f*, अंतर्गत वस्तु *f*; — of book, &c. मजकूर, लिखितार्थ; table of c. or the c. अनुक्रमणिका *f*; *Geom.* क्षेत्रफळ *n* superficial c. पृष्ठफळ *n*.

CONTEST *v.* (*-testis,* witness) call in question तकरार क., दिकत काढणें; struggle to defend रक्षणा करितां भांडणें -युद्ध -कलह क.; *Law,* litigate वाद क., भांडणें (with).— *n.* भांडण *n*, वाद, तकरार *f*; लढाई *f*, युद्ध *n*. -ABLE *a.* तकरारीचा, वादाचा, वादास योग्य.

CONTEXT (*-texere,* to weave) connected structure, as of a discourse अन्वय; parts of a discourse which precede or follow a sentence quoted वाक्याचा पूर्वापार संदर्भ, शब्दसंदर्भ.

CONTIGUOUS *a.* (*-tangere,* to touch) जवळचा, लगत्याचा, एकसीम [to].—CONTIGUITY समीपता *f*, लगता.

CONTINENCE, CONTINENT, See under CONTAIN.

CONTINGENT *a.* (*-tangere,* to touch) incidental दैवानें घडणारा, आगंतुक; dependent on that which is undetermined अनिश्चित गोष्टीवर अवलंबणारा (upon, on); casual नैमित्तिक; c. expenses सादिलवार खर्च.—*n*; दैवयोग, दैवघटित गोष्ट *f*; quota वांटणी *f*, वर्गणी *f*, हिस्सेरसी *f*: each prince furnishes his c. of men.

CONTINUE *v.* (*-tenere,* to hold) पुढें चालवणें, चालू ठेवणें, करीत जाणें (Ps. xxxvi. 10); prolong लांबविणें, वाढविणें.—*i.* stay राहणें, चालणें, नांदणें (Matth. xv. 32); endure टिकणें, निभणें, चालणें (1 Sam. xiii. 14); persevere टिकणें, धीर -दम धरून राहणें (John vii. 32) [from, to].—CONTINUAL *a.* निरंतर, सतत, सदा; often वारंवार, नित्य. -LY *ad.* नित्य, नेहमी, हरघडीं; निरंतर, वारंवार. — CONTINUANCE पुढें चालविणें *n,* चालवणूक *f;* constancy स्थिरता *f,* स्थिति *f;* टिकाव, नांदणूक *f,* राहणें *n;* *Law,* postponement of the proceedings in a cause from one stated term of a court to another खटल्याची तहकुबी *f.*—CONTINUITY एकसारखेपणा, नैरंतर्य *n.*—CONTINUATION स्थिति *f,* टिकाव, राहणें *n;* पुढें चालवणें *n;* उत्तरभाग, परिशेष *n,* शेपूट *n*: the c. of a story.— CONTINUOUS *a.* निरंतर, अखंड, एकसारखा.

CONTORT *v.* (*-torquere*) पिळवटणें, मुरगळणें. -ION पीळ, पिळा, मुरगळा;— of the bowels मुरडा.

CONTOUR (*F.*) line that bounds a figure आकृतीच्या परिघाची रेषा *f;* outline रूप *n,* रेषा *f,* आरंभ.

CONTRABAND (*L. & It.*) कायद्यानें मना केलेला व्यापार किंवा माल.—*a.* कायद्यानें मना केलेला.

CONTRACT *v.* (*-trahere,* to draw) आंखुडणें, संकुचित क.; आवरणें;—the brow अठी -अठ्या घालणें; bargain for करार -मक्ता क.; take by contract मक्ता -इजारा घेणें; gain जोडणें, मिळविणें; betroth मागणी घालणें, वाग्दान क.—*i.* आकुंचणें, संकोचित होणें; करारानें -मक्त्यानें घेणें [for, with].—*n.* करार, मक्ता, 'कंत्राट' *n;* करारपत्र *n* -नामा; to take by c. तोडून -खंडून घेणें; marriage c. मागणी *f,* वाग्निश्चय. -ED संकुचित, आकुंचित; संक्षिप्त; घेतलेला, जोडलेला; मागणी घातलेला, वाग्दत्त; mean हलका, नीच, अधम. -ION आंखडणें *n,* आकुंचन *n;* संक्षेप, ऱ्हास: a writing full of *contractions;* *Gram.* संक्षिप्त वर्ण. -ER मक्तेकरी, गुत्तेवाला, इजारदार, 'कंत्राट' वाला;—of lands खोत.

CONTRADICT *v.* (*-dicere,* to say) oppose in words विरुद्ध -उलट बोलणें; oppose आड येणें, विरोध क., मोडा घालणें, रद्द क.: no truth can c. another truth. -ION उलटें बोलणें *n,* विरोधोक्ति *f,* फेर, विपर्यय, बाध. -ORY *a.* उलटा, आडवा, विरुद्ध; असंगत, विसंगत, परस्पर विरोधी.—*n.* विरुद्ध -विसंगत गोष्ट *f* -सिद्धांत.—CONTRADISTINGUISH *v.* विपरीत गुणानीं भेद दाखविणें.—CONTRADISTINCTION विरुद्ध गुण सांगून जो भेद दाखवितात तो, वैलक्षण्य *n.*

CONTRAMURE (*-murus,* wall) पडकोट, परकोट.

CONTRAPOSITION (See POSITION) सम्मुख -समोरासमोर ठेवणें *n.*

CONTRARY *a.* (*-contra,* against) opposite विरुद्ध, उलटा, प्रतिकूल; c. wind तोंडचा -समोरचा वारा; repugnant वांकडा, विगुण; perverse हेंकट, हेकेखोर [to].—CONTRARIETY उलटेपणा, विपर्यय; वैगुण्य *n,* वैलक्षण्य *n.*—CONTRARIWISE *ad.* उलटून, उफराटा; आडवे -वांकडेपणानें, विरुद्ध भावानें.

CONTRAST *v.* (*-stare,* to stand) गुणांचा भेद दाखवून तुलना क., गुणागुण प्रकाशणें. — *i.* भिन्न भावानें दिसणें -शोभणें -विराजणें [with]. —*n.* अंतर *n,* वैलक्षण्य *n,* फरक.

CONTRAVENE *v.* (*-venire,* to come) आडवा येणें -होणें; oppose विरोध क.—CONTRAVENTION विरोध, प्रतिरोध; obstruction अडथळा, अटकाव [of].

CONTRIBUTE *v.* (*-tribuere,* to give) give in common with others दुसऱ्या बरोबर देणें, वर्गणी -हिस्सा देणें; supply in part भर

घालणें.—*i.* मदत -सहाय -देणें -क. [to].—CONTRIBUTION वर्गणी *f*; हिस्सा, भर *f*; military c. खंड, खंडणी *f*.—CONTRIBUTIVE, CONTRIBUTORY *a.* सहायकारी, उपकारी; भर घालणारा, पुरविणारा.

CONTRITE *a.* (*-terere,* to rub) broken down with grief दुखानें भग्न झालेला; penitent पश्चात्तापी.—CONTRITION खेद, अनुताप.

CONTRIVE *v. F.* युक्ति काढणें, कल्पिणें, योजणें. —*i.* युक्ति -तजवीज -उपाय क.—CONTRIVABLE *a.* कल्पनीय, योज्य.—CONTRIVANCE योजणें *n*, रचणें *n*; युक्ति *f*, तोड *f*, कल्पना *f*; thing contrived कृति *f*, करामत *f*, यंत्र *n*.—CONTRIVER योजणारा, रचक; हुनरी, करामती.

CONTROL *F.* restraint आवर, आटोप, निग्रह; authority to check हुकूम, सत्ता *f*, नियंतृत्व *n*; under the c. of ताब्यांत, कब्यांत, स्वाधीन.—*v.* आवरणें, आटोपणें; ताब्यांत -कब्यांत ठेवणें [by]. -LER आटोपता, आवरणारा, नियंता; officer appointed to keep a counter-register of accounts, or to oversee, control, or verify the accounts of other offices मुस्ताफी *Hind.*

CONTROVERT *v.* (*-vertere,* to turn) वाद क., तकरार घेणें, भांडणें. -IBLE *a.* वादास योग्य, विवादास्पद, खटल्याचा.—CONTROVERSY वाद, भांडण *n*, विवाद.

CONTUMACIOUS *a.* (*-tumere,* to swell) हट्टी, जिद्दखोर; *Law,* wilfully disobedient to the summons or orders of a court कोर्त्ताचा हुकूम हट्टानें न मानणारा, कोर्त्ताची बेअदबी करणारा.—CONTUMACY हट्ट, दुराग्रह, जिद्द *f*. —CONTUMELY मगरुरीचें -तोऱ्याचें -दिमाखाचें भाषण *n*.— CONTUMELIOUS *a.* reproachful निंदक, निंदेचा; insolent मगरुरीचा.

CONTUSE *v.* (*-tundere, Skr. tud,* to beat) ठेंचणें, कुटणें; injure by beating ठेंचून- चेंचून दुखापत क.— CONTUSION, *Surg.,* bruise, hurt, or injury to the flesh by a blunt instrument, or by a fall, producing no breach or apparent wound दुखापत *f*.

CONVALESCENT *a.* (*-valere,* to be strong) recovering health after sickness दुखण्यांतून नुकताच उठलेला, जगत्या पंथास लागलेला, हिंडता फिरता.—CONVALESCENCE सावरती दशा *f*, पालवी *f*, जगता पंथ.

CONVENE *v.i.* (*-venire,* to come) जमणें, मिळणें.—*t.* मिळविणें, जमविणें, भरविणें (a meeting).—CONVENER (लोक -सभा) जमविणारा; chairman of an organized body सभाध्यक्ष, सरपंच.

CONVENIENCE (do.) fitness योग्यता *f*, लायकी *f*; ease सुख *n*, सोयी *f*; accommodation सोय *f*, सोयी *f*, अनुकूलता *f*; fitness of time अवकाश, अवसर; fitness of place बिऱ्हाडाची -जाग्याची सोयी *f*.—CONVENIENT *a.* सोयीचा, सोयीवार; सुखकारक, अनुकूल [for, to].

CONVENT (do.) body of monks or nuns मठाश्रमी पुरुष *pl* किंवा बायका *f pl*; a monastery मठ, आश्रम. — CONVENTICAL *a.* मठ संबंधी. — CONVENTICLE, assembly सभा *f*; assembly for worship भक्तिसमाज, भजन, समाज, प्रार्थनासमाज, मेळा.

CONVENTION (See CONVENE) act of coming together एकत्र मिळणें *n*; assembly of delegates प्रतिनिधींची सभा *f*; usage वहिवाट *f*, धारा; contract संकेत, ठराव. -AL *a.* संकेताचा, ठरावाचा; रुढीचा, प्रथाचा.

CONVERGE *v.* (*-vergere,* to turn) एका केंद्राकडे वळणें, एकीकडे वळणें -मिळणें; एककेंद्राभिमुख होणें [to, together].—CONVERGENCE, एककेंद्राभिमुखता *f*.—CONVERGENT *a.* एककेंद्राभिमुख.

CONVERSE *v.i.* (*-versari,* to be turned) hold intimate intercourse वहिवाट -सहवास -संसर्ग ठेवणें, दळणवळण ठेवणें [with]; talk familiarly संभाषण -गोष्टीवार्त्ता क.; have

sexual commerce संग -संभोग क. [with, together].—*n.* सहवास, समागम; संभाषण *n*, गोष्टी बाता *f*.—CONVERSANT *a.* वहिवाटीचा, परिचयाचा; versed निपुण, वाकब, माहितगार; having relation संबंधाचा, विषयींचा (with). —CONVERSATION बोलणें *n*, संभाषण *n*; behavior वागणूक *f*, आचरण *n*; निपुणता *f*, माहिती *f*, वाकबगारी *f*.—CONVERSAZIONE *It.* meeting for conversation, part. on literary subjects विद्यादि विषयावर संभाषण -चर्चा करण्याची सभा *f*.

CONVERT *v.* (*-vertere*, to turn) transform रूप पालटणें, रूपांतर क.; change from one religion to another धर्मांतर करविणें; — from one party to another पक्षांतर करविणें; turn from a bad life to a good one सन्मार्गवर्त्ती क., सदाचाराकडे फिरविणें: he who *converteth* the sinner from the error of his ways shall save a soul from death (James v. 20); apply by a diversion from the proper or intended use नियोजित कार्यावरून अन्य कार्यीं लावणें: he *converted* the prizes to his own use [from, to, by]; पालटणें, रूपांतर होणें.—*n.* दुसऱ्या धर्मांत गेलेला, परमतावलंबी; one who turns from the controlling power of into that of holiness सन्मार्गाकडे फिरलेला, पवित्रमार्गी, सन्मार्गवर्त्ती. —CONVERSE उलटपक्ष, व्युत्क्रम.—CONVERSION रूपांतर *n*, पालट; धर्मांतर *n*, मतांतर *n*; पक्षांतर *n*; *Theol.* change from the service of the world to the service of God जगाची चाकरी सोडून ईश्वराच्या सेवेस लागणें *n*, देवाकडे फिरणें *n*.

CONVEX *a.* (*-convehere*, to bring together) कासवाच्या पाठीच्या आकाराचा, बाह्यगोल.—CONVEXITY बाह्यगोलता *f*.—CONVEXO-CONCAVE *a.* बाह्यांतर, दुदुंभाकार, अर्धचंद्राकृति.

CONVEY *v.* (*-via*, way) carry from one place to another नेणें, घेऊन जाणें; transmit पोचविणें, पावता क.; make over हवाला क., सोपणें; impart देणें [from, to].—*i.* चोरी क., चोरणें. -ANCE नेणें *n*, नयन *n*; सोपणें *n*, हवालणें *n*; means of carrying वहन *n*, गाडी *f*, पालखी इ०; *Law*, deed for transferring property दानपत्र *n*, समर्पणपत्र *n*. -ANCER दानपत्र लिहिणारा. -ANCING सत्तानिवृत्ति *f*.

CONVINCE *v.* (*-vincere*, to conquer) खातरी क., प्रत्ययास आणून देणें. —CONVICT *a.* अपराध लागू क., पदरीं माप घालणें [of].—*n.* अपराधी ठरविलेला मनुष्य, गुन्हेगार. -ION गुन्हा शाबीत क. *n*; confutation खंडन *n*; strong persuasion भरवसा, खातरी *f*; — as formed प्रबोध.

CONVIVIAL *a.* (*-vivere*, to live) मेजवानीचा, भोजन समारंभाचा. -ITY मेजवानीच्या वेळचा विनोद, हास्य *n*, इ०.

CONVOKE *v.* (*-vocare*, to call) बोलावणें, जमविणें. — CONVOCATION बोलावणें *n*, आवाहन *n*; assembly सभा *f*, समाज; [*Church of Eng.* general assembly of the clergy, by their representatives, to consult on ecclesiastical affairs].

CONVOLVE *v.* (*-volvere*, to roll) गुंडाळणें, लपेटणें.—CONVOLUTION पेच, फेरा, लपेटणी *f*.

CONVOY *v.* (See CONVEY) वाटेनें रक्षण करून पोचविणें, रक्षणार्थ बरोबर जाणें. — *n.* वलावा, पावणी *f*.

CONVULSE *v.* (*-vellere*, to pull) पिळणें, पिळवटणें; agitate कापविणें, थरारविणें, क्षोभविणें [with]. — CONVULSION पिळावळा, पेटका; क्षोभ, गडबड *f*, कंप.

CONY (*cuniculus*, rabbit) सशा सारखें एक जनावर आहे.

COO* *v. i.* make a low cry as pigeons घुमणें.

COOK *v.* (*coquere*) स्वैंपाक क.; —by boiling, शिजविणें, रांधणें;—by roasting भाजणें.—*n.*

स्वयंपाकी, आचारी. -ERY पाकक्रिया *f.* -ROOM स्वयंपाकघर *n*, पाकशाला *f.*

COOL* *a.* moderately cold अमळ थंड, मंदशितळ; producing coolness सीतकारक; calm थंड, शांत, अव्यग्र (reason); indifferent उदास, अनुत्कंठित, थंड; quietly impudent धटाईचा, निलाजरेपणाचा, धट्ट, निलाजरा (behavior).—*n.* थंडी *f*, थंडावा; —of the day शिळोपा.—*v.* थंड क., निवविणें; मंद -शांत क.; विझविणें.—*i.* निवणें, थंड होणें; शमणें, थंडावणें [down]. -LY *ad.* थंडाईनें, मंदाईनें; deliberately विचारानें, घाई न करितां, दमाखालीं; अनास्थेनें, उदासपणानें. -NESS थंडपणा, थंडाई *f*; सावकाशी *f*, थंडाई *f*; अनुत्साह, अनुराग, पातळमाया *f*.

COOP (*cupa*) barrel पीप *n*; pen for animals कोंडवाडा; — for fowls खुराडा.—*v.* कोंडणें, कोंडींत घालणें [up in]. -ER पिंपें करणारा. -AGE पिंपें करणावळ *f*; place where coopers' work is done पिंपें करण्याचा कारखाना; work of a cooper पिंपें करण्याचें काम *n*.

CO-OPERATE *v.* (*-opus*, work) मिळून -सोबतीनें काम क., सहाय क. (with, in).—CO-OPERATION सहकार, सहाय.—CO-OPERATIVE *a.* -TOR *n.* मिळून कामकरणारा, सहकारी, सहोद्योगी.

COOT *D.* पाणडुबी *f*, *Hind.*

COPAL, *Mexican.*—the gum चंद्रूस.

COPARCENER (*-pars*, part) अविभक्त, समभागी, घरभाऊ, तक्षीमदार.— COPARCENARY समभागीपणा, तक्षीमदारी *f*. — COPARTNER सर्कती, पातीदार. -SHIP सर्कत *f*, पाती *f*.

COPE* *v. i.* लढणें, भिडणें, टक्कर देणें [with].

COPERNICAN *a.* कोपर्निकसाचा (को० हा एक महाविद्वान जोतिषी होता) (system).

COPIOUS *a.* (*copia*) plentiful पुष्कळ, महामूर, प्रचुर; ample प्रशस्त, विपुळ. -NESS पुष्कळपणा, महामुरी *f*, प्राचुर्य *n*.

COPPER (*cuprum*) तांबें *n*, ताम्र *n*; copper coin तांब्याचें नाणें *n*: पैसे, पई इ०; vessel made of copper तांब्याचें भांडें *n*, ताम्रभाजन *n* (डेग, कढई इ० कढविण्याचें भांडें); sulphate of c. मोरचूत; calx of c. ताम्रभस्म *n*. —*a.* तांब्याचा, ताम्रमय.—*v.* तांब्यानें मढविणें (a ship). -AS हिराकस. -FACED *a.* तांब्यानें मढविलेला, ताम्रमुख (type). -PLATE ताम्रपट; print taken from a copperplate ताम्रपटावर छापलेली प्रत *f*, (कित्ता, नकाशा, चित्र इ०). -SMITH तांबट, कांसार, तांबटकर.—COPPERY *a.* ताम्रमिश्रित; like copper तांब्यासारखा; made of copper तांब्याचा, ताम्रमय.

COPPICE *F.* झुडपाळ रान *n*, झाडी *f*. सर्पणा करितां वारंवार तोडायाचें रान *n*.

COPULA (*L.*) *Logic*, the word which unites the subject and predicate of a proposition उद्देश्य आणि विधेय यांस जोडणारा शब्द; *Anat.* ligament अस्थिबंधन *n*. -TIVE *a.* जुळणारा; *Gram.* उभयान्वयी. — COPULATE *v. i.* जुळणें, संभोग क.

COPY *F.* writing like another writing प्रत *f*, नकल *f*, 'कापी' *f*; original work असल *f*, मूळ ग्रंथ; model नमुना, कित्ता, one of a series of imitations of an original work प्रत *f*; foul c. मसुदा, खरडा; that which is to be printed मूळ *n*, 'कापी' *f*.—*v.* प्रत -नकल क. [without]; imitate कित्ता -वळण घेणें, अनुकरण क. -BOOK कित्त्यांचें पुस्तक *n*, 'कापी बूक' *n*. -HOLD पट्टा. -IST प्रत करणारा, लेखक, नकलनवीस *Hind.* -RIGHT, the exclusive right of an author to print, publish, and vend his own literary works for his own benefit, during a certain period of time ग्रंथस्वामित्व *n*.

COQUETTE (*F.*) नखरेदार बायको *f*, चाळक भवानी *f*, नाचण *f*.—COQUETRY नखरा, आदा, विलास, हाव.

CORAL (*corallum*) पोवळें *n*, प्रवाळ *n*; पोवळ्याचें केलेलें लेंकराचें खेळणें *n*; child's c. चोखणी *f*. -LINE *a*. पोवळ्यांचा, प्रवालमय. -TREE पारिजातक.

CORBAN *Heb*. alms-basket भिक्षापात्र *n*; gift दान *n*, कुर्बान *n* (Mark vii. 11).

CORD (*chorda*) string दोर, दोरी *f*; enticement पाश, बंधन *n*. -AGE दोरखंडें *n*. *pl*.—CORDON,—in fortification कंगणी *f*.

CORDIAL *a*. (*cor*, heart) मनापासूनचा, मनःपूर्वक; giving strength or spirits बलवर्द्धक, दीपक.—*n*. पौष्टिक, तेजोवर्द्धक (औषध वगैरे). -ITY निष्कपटप्रीति *f*, सौमनस्य *n*. -LY *ad*. मनापासून, बेंबीच्या देटापासून.—CORE गाभा, गर्भ;—of a horn नार.

CORIANDER (*coriandrum*) कोथिंबीर *f*; c. seeds धणे *pl*.

CORINTHIAN *a*. करिंथ शहरा संबंधी; [pertaining to the Corinthian order of architecture].

CORK (*cortex*, bark) कार्क नामक झाडाची वरची साल *f* (हिचे बूच करतात); कार्क सालीचा बूच -दट्टा.—*v*. दट्टा -गुडदी मारणें -बसविणें [up]. -SCREW बूच काढायाचा स्क्रू; 'काकस्क्रू.'

CORMORANT (*corvus*, raven) करढोंक पक्षी.

CORN* single seed of certain plants दाणा, कण; various cereal or farinaceous grains which grow in ears, and are used for food दाणा, धान्य *n*, गल्ला; plants which produce corn when growing in the field (भाताचे -गव्हाचे -दाण्याचे;) रोपे *pl*, शेत *n*.—*v*. preserve and season with salt मिठांत घालणें, खारावणें (beef); granulate रवे क. (gunpowder); supply or feed with grain दाणा पुरविणें किंवा चारणें -देणें (horses); render intoxicated मस्त क., निशा आणणें: ale strong enough to c. one. -FLOOR खळें *n*.

CORN (*cornu*, horn) पायावरचा जोड्याचा घट्टा.—CORNEOUS *a*. शिंगाचा; शिंगा सारखा.—CORNEA डोळ्याचा बाहुलीवरचा पडदा.—CORNICLE लहान शिंग *n*.

CORNELIAN, See CARNELIAN.

CORNER (*cornu*, horn, end) angle कोन; space between two converging lines or walls which meet in a point कोन, कोपरा; secret place कोनपडा, एकवसा; any part कोणताही भाग; a part भाग, कोनकोपरा: they searched every c. of the forest. -STONE, stone which lies at the corner of two walls, and unites them कोपऱ्याचा धोंडा, कोन्यादगड. -WISE *a*. तिर्कस.

CORNET (*cornu*, horn) wind instrument blown with the mouth करणा, शिंग *n*; officer who carries the standard in a cavalry troop तुरपाचा झेंडेवाला. -ER शिंगवाजविणारा, शिंगकरी.

COROLLA (*L*.) फुलवरा, अंतरपुष्पकोश.—COROLLARY, that which follows over and above a proposition demonstrated एका गोष्टी वरून सिद्ध झालेली दुसरी गोष्ट *f*, 'कुर्लरी' *f*; inference अनुमान *n*.

CORNICE *L*. कंगोरा, कंगणी *f*.

CORONAL (*coronalis*) crown मुगुट, किरीट; frontal bone टाळू *f*.—*a*. मुगुटाचा; राज्याभिषेकाचा; टाळूचा. — CORONATION पट्टाभिषेक, राज्याभिषेक. — CORONER, officer whose duty is to inquire into the manner of a violent death अपघातानें अथवा जुलमानें मेलेल्या मनुष्याचा चौकसनीस, 'कारोनर.' [This must be done by a jury, on sight of the body, and usually at the place where the death happened].—CORONET, inferior crown worn by noblemen बडे लोकांचा मुगुट; ornamental headdress शिरभूषण *n*; [upper part of a horse's hoof, where the horn terminates in skin]. -ED *a*. मुगुटधारी, किरीटी.

CORPORAL *F.* (फौजेंतील) नाईक.—*a.* (*corpus*, body) शरीर संबंधी; c. toil अंगमेहनत *f*; corporeal देही, शरीरी; material मूर्त्तिमंत (heaven).—CORPORATE *a.* formed into a body by legal enactment सनदीजमातीचा. —CORPORATION, a body politic or corporate, formed and authorized by law to act as a single person, and endowed by law with capacity of perpetual succession सनदीजमात *f*; society having the capacity of transacting business as an individual पुठा. — CORPOREAL *a.* देही, शरीरी; not spiritual अनात्मिक, मर्त्य. -IST, one who denies the reality of spiritual existence अनात्मवादी.—CORPS सैन्य *n*, चमू *f*, गण.—CORPSE, dead body of a human being मुडदा,प्रेत *n*.—CORPULENCE, -CY अंगाचा स्थूलपणा, अंगस्थौल्य *n*. —CORPULENT *a.* स्थूल, मांसल, ढमाल.— CORPUSCULE अणू, परमाणु.

CORRECT *v.* (*-regere*, to lead straight) make right नीट क., सुधारणें; remove errors शुद्ध क., शोधणें; chastise शिक्षा लावून सुधारणें; counteract रग मोडणें, समधात क., ताळ्यावर आणणें: to c. the acidity of the stomach by alkaline preparations. —*a.* नीट, दुरुस्त; शुद्ध, बिनचूक, दोषहीन. -ION नीट क. *n*; निटावणी *f*; शुद्ध क. *n*, शोध; शिक्षा *f*, पारपत्य *n*; शोधन *n*, विशुद्धि *f*; house of c. तुरुंग. -IVE *a.* सुधरणारा, शुद्ध करणारा; नाश करणारा, समधात, घ्न, in comp. विषघ्न. -LY *ad.* शुद्ध रीतीनें, बराबर, ठीक. -NESS शिष्टाई *f*, नीति *f*; शुद्धपणा, शुद्धता *f*. -OR शासन करणारा, शास्ता; चूक नीट करणारा, दुरुस्त करणारा; समधात करणारा, शोधक: an alkali is a c. of acids.—CORRIGIBLE *a.* दुरुस्त -शुद्ध करण्याजोगा; शोधनीय; शासनीय, शिक्षा करण्याजोगा. —CORRELATIVE *a.* अन्योन्य संबंधाचा. father and son are c. terms.—*n.* अन्योन्य संबंधभाव.

CORRESPOND *v.* (*-respondere*, to answer) suit जमणें, मिळणें, जुवाबसणें; have intercourse वहिवाट -व्यवहार ठेवणें;— by sending and receiving letters पत्रव्यवहार ठेवणें-राखणें (with). -ENCE ताळा, मेळ, जम; वहिवाट *f*, दळणवळण *n*; पत्रव्यवहार; letters which pass between correspondents कागद पत्रें *n pl.* -ENT *a.* बेताचा, मिलाफाचा, तंतोतंत [to].—*n.* पत्र पाठविण्याची वहिवाट ठेवणारा, पत्र पाठवणारा -लिहिणारा; *Com.* अडत्या, गुमास्ता. -ING *a.* बेताचा; जोडपी, जोडीचा; पत्रव्यवहार ठेवणारा [with].

CORROBORATE *v.* (*-roborare*, to strengthen) बळ -जोर आणणें; confirm बळकटी देणें, खरा क. [by].—CORROBORATION दृढीकरण *n*, पुष्टीकरण *n*; पुरावा, प्रमाण *n*.— CORROBORATIVE *a.* पौष्टिक, बलवर्द्धक; मजबुतीचा, पुराव्याचा.

CORRODE *v.* (*-rodere*, to gnaw) खात खात जाणें, हळू हळू क्षय क.; wear away by degrees झिजवणें, जीर्ण क., धुपविणें. — CORROSIVE *a.* किडीसारखा खाणारा, आंत चरत जाणारा, जीर्ण करणारा; [c. sublimate, an acrid poison of great virulence].

CORRUGATE *v.* (*-rugare*, to wrinkle) चिरमुटणें, सुरकुती पाडणें.—CORRUGATION सुरकुती *f*.

CORRUPT *v.* (*-rumpere*, to break) putrefy कुजविणें, सडविणें; deprave बिघडणें, नासणें, दुषित क.: evil communications c. good manners (1 Cor. xv. 33); bribe लांचदेणें: [Judge

Heaven is above all yet; there sits a
That no king can *corrupt*.—*Shak.*;

बिथरविणें, सन्मार्गभ्रष्ट क.; debase नीच -हीन क. (language); pervert फिरविणें, खोटा क. (a text) [by, with].—*i.* कुजणें.— *a.* कुजका, सडका; बिघडलेला, नासलेला; लांचलुचपतीचा; भ्रष्ट, दुष्ट, नीच; फिरवलेला, खोटा. -IBLE *a.* नाशवंत, नश्वर (1 Cor. xv. 53) बिघड-

प्याजोगा, दूष्य *v.* -IBILITY नश्वरता *f*, विनाशित्व *n.* -ION कुजविणें *n*; बिघाड; भ्रष्टता *f*;—of language अपभ्रंश; pus पू; रुशवतखोरी *f*, लांचलुचपत *f*. See the adj.

CORSAIR (*currere*, to run) pirate समुद्रांत लूट करणारा, चांचा; piratical vessel चाच्याचें गलबत *n*.

CORTEGE (*F.*) जिलीब *f*, स्वारी *f*.

CORTEX (*L.*) वनस्पतीची बाहेरची साल *f*, वल्कल *n*.—CORTICAL *a*. सालीचा; बाहेरचा -ला.

COSINE (*-sinus*, a bend) *Geom.* ज्या *f*, कोभुजज्या *f*.

COSMETIC *a.* (*Gr. kosmos*, ornament) कांति वर्द्धक *n*, कांतिवर्द्धक द्रव्य *n* -उटणें *n* -तेल *n*.

COSMOS (*Gr. kosmos*, order) the world जग *n*; doctrine of the universe सृष्टि संबंधी सिद्धांत, सृष्टिविद्या *f*.—COSMOGONY जगाची उत्पत्ति *f*, सृष्ट्युत्पत्ति *f*.—COSMOGONIST जगदुत्पत्ति वर्णनकर्त्ता.—COSMOGRAPHY जगाचें वर्णन *n*, भूसृष्टिवर्णन *n*.—COSMOPLASTIC *a*. जगदुत्पत्ति संबंधी; world-forming सृष्ट्युत्पत्तिकारक.—COSMOPOLITE, -POLITAN, citizen of the world जगद्वासी, सर्वदेशवासी.

COST *Ger.* charge खर्च, व्यय; price मोल; loss तोटा, खर्च; *Law*, खर्च, तोटा; prime cost मुदल *n*; at prime c. मुदलामुदल.—*v.* खर्च लावणें -पाडणें; सोसायास लावणें; to c. dear मोठा खर्च लागणें. -LINESS मोठें मोल *n*; खर्चीकपणा, धौताली *f*. -LY *a*. मोठ्या मोलाचा, बहुमूल्य; मोठ्या खर्चाचा, खर्चीक.—COSTERMONGER (*costard*, modification of *custard*) फळें विकणारा, मेवा विकत फिरणारा.

COSTAL *a.* (*costa*, rib) फांसोळ्यांचा; बाजूचा, कुसीचा, पार्श्वीय (nerves); *Bot.* शिरेचा.

COSTIVE *a.* (*-stipare*, to cram) जड कोठ्याचा, बद्धकोष्ट. -NESS कबज *n*, बद्धकोष्ट.

COSTUME *F.* वेष, पेहराव, लिबास.

COT* hut खोपटें *n*, झोपडें *n*; enclosure for beasts कोंडवाडा; small bed बाज *f*, खाटलें *n*. -TAGE झोपडी *f*, खोपटें *n*; app. to a small, neat, and tasteful dwelling टुमदार बंगली *f*. -TAGER झोपडींत राहणारा, कुटीरवासी; [*Law*, one who lives on the common, without paying any rent, or having land of his own]. -QUEAN बायल्या.

COTTON *Ar.* कापूस; cloth made of cotton सुताचें वस्त्र *n*, सुती कापड *n*; c.-cleaner पिंजारी; c.-plant कापसी *f*; c.-press गिरणी *f*; c.-gin वटणें *n*; c.-seed सरकी *f*.

COUCH *v. F.* पलंगावर -मंचकीं ठेवणें -नसविणें; spread पसरणें; compose to rest खालीं बसणें, थिरावणें: the waters c. themselves; express दर्शविणें, बोलून दाखविणें; to c. a cataract डोळ्यांतील मोतीं काढण्या करिता तें सुईनें दाबणें;—a spear or lance लागावर भाला रोवणें; under सुचविणें.—*i.* (विसावा घेण्या करितां) निजणें, लवंडणें; hide लपणें; पसरणें (Deut. xxxiii. 13); bend the body as in reverence, pain, labor, &c. वाकणें, नमणें, लवणें.—*n.* पलंग, मंचक इ० सुखशय्या *f*, 'कोच' *m*, *f*; any place of repose, as the lair of a beast जनावराची जाळी वगैरे विसाव्याचें स्थान *n*; [layer of barley prepared for malting].

COUGH *D.* खोकला; consumptive c. क्षय, कांस; dry wheezing c. खेंस *f*; hooping-c. डांग्या खोकला; lingering and moist c. खैन.—*v. i.* खोकणें.—*t.* up खोकून बाहेर टाकणें.

COUNCIL (*-cire*, to move) assembly of men summoned or convened for consultation, deliberation, or advice सभा *f*, 'कौन्सल'

n; consultation of a council मसलत *f*, खलबत *n*; privy c. मंत्रिसभा *f*. -LOR सभासद, 'कौन्सलर.'

ESPOUSE *v.* (*-sponsare*, to betroth) वाग्दान -वाग्निश्चय क.; marry वरणें, पाणीग्रहण क.; make one's own आपलासा क., अंगिकारणें; embrace कैवार -पक्ष घेणें (a cause).—ESPOUSAL मागणी *f*, वाग्निश्चय; वरणें *n*, पाणीग्रहण *n*; स्वीकार, अंगिकार; कैवार.

ESPY *v.* *F.* catch sight of दृष्टीस पडणें, पाहणें; discern unexpectedly अकस्मात् पाहणें; inspect narrowly निरखून -न्याहळून पाहणें, हेरणें. — ESPIONAGE हेर पाठवून पाहणें *n*, हेरणें *n*.

ESQUIRE *F.* a title of dignity next in degree below a knight रावसाहेब, रावबाहदूर अशा प्रकारचा एक सन्मानाचा किताब आहे; हा कागदोंपत्रीं साधारण मनुष्यासही देतात.

Essay *v. F.* try यत्न क.; make trial of अजमावून पाहणें; as metals तावणें, सुलाखणें [on].—*n.* यत्न, उद्योग; परीक्षा *f*, अजमाव; composition treating of any particular subject निबंध, प्रबंध; trial to prove the qualities of a metal धातुपरीक्षा *f*, धातूची पारख *f*. -ist निबंध रचणारा.

Essence (*esse*, to be) the constituent qualities which belong to any object मूलप्रकृति *f*, सत्व *n*, तत्व *n*; distinctive character भेददर्शक लक्षण *n*, विशेषगुण; an existing being व्यक्ति *f*; virtues of a plant or drug, extracted and refined from grosser matter सार *n*, तत्व *n*, अर्क; perfume सुवास, अत्तर *n*, आमोद.—Essential *a.* really existing वास्तविक, खरा, स्वाभाविक; important in the highest degree आवश्यक, जरुरीचा: piety is e. to Christian character; pure निरा, नितळ, असल; highly rectified गाळून निझरून काढलेला. -ly *ad.* स्वभावेंकरून, स्वभावतः, वास्तविक, वस्तुतः.

Establish *v.* (*-stabilis*, firm, from *stare*, to stand) make stable स्थिर क., थारावणें, थिरावणें; enact ठरवणें, स्थापणें (laws); secure खचित क. (opinions); found स्थापणें, मांडणें, स्थापना क. (a state); confirm मुकरर -खचीत -सदृढ क.; set up in business काम उभारणें -चालू क.; secure against assault or harm निर्भय स्थान -आसरा धरून राहणें: the enemy *established* themselves in the citadel [on, at]. -ed स्थापित, व्यवस्थित; निर्णित, सिद्ध, उपपन्न; काईम, नियत; e. custom दस्तुर. -er स्थापणारा, स्थापक, संस्थापक. -ment स्थापणें *n*, अधिष्ठान *n*; settlement स्थापना *f*, संस्थापना *f*; a state of being established उपपत्ति *f*, सिद्धि *f*; a form of government, civil or ecclesiastical राज्यव्यवस्था *f*, धर्मव्यवस्था *f*, बंदोबस्त *f*; fixed allowance नेमणूक *f*; salary वेतन *n*; a permanent civil, military, or commercial force or organization नेमणुकीची मंडळी *f*; a style of living संसार, खटला, खटलें *n*; state or domestic e. इतमाम, लवाजमा, खटला; large e. लंगरखाना.

Estate (*-stare*, to stand) state स्थिति *f*, अवस्था *f*, पद *n*, स्थान; rank पदवी *f*; property मालमत्ता *f*, दौलत *f*, जिंदगी *f*; property in land जमीनदारी *f*, फजीनदारी *f*, 'इष्टेट'; hereditary e. वतन *n*; [one of the ranks or classes of men which are considered as constituting the state, as the crown, the lords, or the commons; or the lords, the clergy, and the people]; interest which any one has in land and *estates* वतनवाडी *f*, वृत्ति *f*.

Esteem *v.* (*æstimare*) set a value on गणणें, लेखणें, मोजणें; regard with reverence, respect, or friendship चांगला समजणें, सन्मान्य -पूज्य मानणें, प्रीति -प्यार -चहा क.—*n.* मान्यताबुद्धि *f*, मान्यता *f*, मान, आदर; प्यार, चहा *f*, प्रीति *f* [for]. -able *a.* मान्य, भला, योग्य. -ed मान्य, सन्मानित.—Estimate *v.* अजमासणें, अटकळणें, सुमार पाहणें [at].— *n.* अडसट्टा, अटकळ *f*, हिशेब, अजमास, आकार [for]. — Estimation तोलणें *n*, गणणें *n*; अजमास, अंदाज: e. of distance; in his e. त्याच्या नजरेंत -मनांत; regard मान, मान्यता *f*, पाड.

Estrange (See Strange), See Alienate [by, from].

Estuary (*æstus*, fury) खाडी *f*.

Et cetera *ad.* (*L.*) इत्यादि, वगैरे.

Eternal *a.* (*ævum*, eternity) without beginning or end of existence अनाद्यंत, सनातन (Deut. xxxiii. 27); without end of existence सर्वकालिक, शास्वत, सर्वकाळचा (2 Tim. ii. 10); perpetual अखंड, निरंतर, सतत: fires e.; immutable निर्विकार, अवि-

कारी, नित्य (truths).— *n.* सनातन परमेश्वर. -LY *ad.* सतत, निरंतर, नित्य.—ETERNITY, duration without beginning or end अनाद्यंतत्व *n;* duration without end शाश्वति *f,* सातत्य *n*; condition which begins at death मरतांच ज्या स्थितीस आरंभ होतो ती *f,* मरणोत्तरची अवस्था *f,* परलोकची -अनंतकालची स्थिति *f.*

ETHER (*Gr. aithein,* to burn) supposed matter above the air सूक्ष्मवायु, आकाश *n*; *Chem.* a volatile fluid वायुरूपानें उडून जाणारा एक मद्यार्क आहे, 'ईथर' *n.* -EAL *a.* ईथराचा केलेला, ईथरमय; exceedingly light हलफूल; tenuous अति सूक्ष्म, फार पातळ -बारीक; celestial आकाशाचा, आकाशीय, दिव्य.

ETHIC, -AL *a.* (*Gr. ethos,* custom) आचार संबंधी, नीतिविषयक; containing precepts of morality नीतिशास्त्राचा.—ETHICS नीतिशास्त्र *n,* नीति *f*: विदूरनीति *f.*

ETHNOLOGY (*Gr. ethnos,* nation, *logos,* discourse) नृकुलविद्या *f,* मनुष्यजातिविवेचनविद्या *f.*

ETIQUETTE (*F.*) शिष्टाचार रीति *f,* सभ्याचार पद्धति *f.*

ETYMOLOGY (*Gr. etumos,* true, *logos,* discourse) शब्दांची फोड *f* -व्युत्पत्ति *f*;— the science शब्दविचार, शब्दसाधनविद्या *f.*—ETYMOLOGICAL *a.* शब्दांच्या व्युत्पत्ति संबंधी.—ETYMON मूळशब्द, धातु.

EUCHARIST (*Gr. eu,* well, *charis,* favor, grace) the sacrament of the Lord's Supper प्रभुभोजन *n*; thanksgiving स्तुति करणें *n,* स्तुतिवाद.

EULOGIUM, EULOGY (*Gr. eu,* well, *legein,* to speak) a speech or writing in commendation of the character or service of a person -च्या गुणाची -कामाची -तारीफ *f* स्तुति *f,* प्रशंसा *f* [on, for].

EUNUCH (*Gr. eunè,* bed, *echein,* to keep) खोजा, षंड, नपुंसक; chamberlain घरची व्यवस्था पाहणारा, कारभारी.

EUPHONY (*Gr. eu,* well, *phonè,* voice) सुस्वर, मधुर.—EUPHONIC *a.* कानास गोड, कर्णमधुर, सुस्वर.

EUROPEAN *a.* (*L. Europæus, Heb. ereb,* evening, west) युरोप खंडा संबंधी, विलायती, 'युरोपियन.'—*n.* युरोपांतला राहणारा, 'युरोपियन.'

EVACUATE *v.* (*-vacare,* to be empty) खाली -रिकामा -रिता क. (a vessel); as the bowels हगणें, मलविसर्जन क.; desert सोडणें, टाकणें (a city); nullify मोडणें, रद्द क. (a contract).—EVACUATION रिकामें करणें *n*; त्याग, उत्सर्ग; —of the bowels मलविसर्जन *n,* हगणें *n.*

EVADE *v.* (*-vadere,* to walk) elude झुकांडी -झुगारा देणें; escape चुकवणें, टाळणें; avoid by dexterity, subterfuge, address, or ingenuity झुलवणें, टाळाटाळ मांडणें [from, to.]—EVASION टाळणें *n,* चुकवणें *n,* चुकवाचुकव *f,* उडवणी *f.*—EVASIVE *a.* चुकवणारा, टाळणारा; चुकवाचुकवीचा, झुगारपटीचा, उडवणीचा.

EVANGELICAL *a.* (*Gr. eu,* well, *aggellein,* to bear a message) contained in, or relating to, the four Gospels चार शुभवर्त्तमानांतला -संबंधी -चा (history); agreeable to the Gospel शुभवर्त्तमानानुसार, ख्रिस्ती शास्त्रानुसार (truth); strict in interpreting Christian doctrine शुभवर्त्तमाना प्रमाणें उपदेश करणारा, यथाशास्त्र; [technically applied to a party in the English and other churches].—EVANGELIST, a writer of the history or doctrines, precepts, actions, life and death, of our blessed Savior, Jesus Christ: as, the four *Evangelists,* Matthew, Mark, Luke, and John शुभवर्त्तमान लिहिणारा, मंगलसमाचार लेखक, आमचा सुवंद्य तारणारा येशू ख्रीस्त याचें चरित्र लिहिणारा; a preacher who is au-

thorized to preach, but has not charge of a particular church, and is not allowed to administer the Eucharist शुभवर्त्तमानाचें घोषण करणारा, सुवार्त्तिक.—EVANGELIZE *v.* ख्रिस्ती धर्म शिकविणें; ख्रिस्ती धर्म शिकवून ख्रिस्ती क.

EVAPORATE *v. i.* (*-vaporare,* to emit steam) वाफ होऊन उडून जाणें; be wasted खर्चणें, व्यर्थ फुकट जाणें: arguments e. in words. —*i.* वाफ क.; dissipate in vapor वाफ करून उडवणें. — EVAPORATION वाफ क. *n,* बाष्पीकरण *n,* वाफ होणें *n,* बाष्पीभवन *n.*

EVE, EVEN* close of the day संध्याकाळ *f,* सांज *f*; evening preceding some particular day पूर्वसंध्या *f*: Christmas e.; the period just preceding some important event एखादी मोठी गोष्ट होण्याच्या जवळचा काळ, लाग: the e. of an engagement.

EVEN* *a.* level सपाट, सारखा, साफ; calm स्थिर, शांत, समवृत्ति (temper); parallel -शीं बराबर, सारखा (Luke xix. 44); fair बराबर, रास्त, उजू: our accounts are e.; not odd सम: 4 and 10 are e. numbers.—*v.* सारखा -सपाट क., बराबर क.; बाकी पूज क.; *ad.* likewise तसाच, तद्वत्; at the very time त्याच वेळीं: they were bad enough to please, e. when I wrote them; so much as देखील, इतका कीं, ही; as was not to be expected ही, देखील, सुद्धां. -HANDED निष्पक्षपाती.

EVENT (*-venire,* to come) that which comes, arrives, or happens घटित गोष्ट *f*; consequence परिणाम, शेवट, फळ *n.* -FUL *a.* घडामोडीचा, उलटापालटीचा. -UAL *a.* coming or happening as a consequence अनुसारी, कार्यकारण संबंधी, आनुषंगी; final शेवटचा, अंतिम. -LY *ad.* शेवटीं, अखेरीस, परिणामीं.

EVER* at any time कधीं कोणत्या तरी वेळीं, केव्हां तरी (Eph. v. 29); at all times नित्य, सदां, सर्वदां: he shall e. love; continually निरंतर, अखंड; e. and anon जेव्हां तेव्हां, वारंवार. -GREEN *a.* सदां हिरवा -ताजा, सदां हरित. -LASTING *a.* सर्वकाल राहणार, शाश्वत, सनातन; निरंतर, सर्वकालिक.—*n.* सनातन काल, अनादि काल. -MORE चिरकाल; नित्य, निरंतर, सर्वदां.

EVERY* *a.* हरएक, प्रत्येक. -DAY *a.* दररोजचा, प्रतिदिवसीं; प्रतिदिवसाचा, नित्याचा (suit of clothes). -WHERE चहुंकडे, सर्वत्र.

EVIDENT *a.* (*-videre,* to see) स्पष्ट, व्यक्त, उघड, जाहीर. — EVIDENCE, conclusive testimony मुद्दा, प्रमाण *n*; a witness साक्षी, साक्षीदार; *Law,* that which is legally submitted to a competent tribunal, as a means of ascertaining the truth of any alleged matter of fact under investigation before it साक्ष *f,* शाहिदी *f*; written e. लेखप्रमाण *n*; corroborative e. पडसाक्ष *f*; ocular e. प्रत्यक्ष प्रमाण *n*;—of analogy उपमान *n*; [State's, King's, Queen's e., an accomplice in a crime who is admitted as evidence for the government].

EVIL* that which produces unhappiness अरिष्ट *n,* संकट *n,* दुःख *n*; moral badness, or the deviation of a moral being from the principles of virtue impressed by conscience, or the will of the Supreme Being, or the principles of a lawful authority पाप *n,* दुष्टता *f,* दुष्टपणा.—*a.* वाईट, खराब (beast, plant); wicked वाईट, दुष्ट, पापी, in comp. कु, दुर, अप (words, thoughts), producing or threatening sorrow, distress, injury, or calamity अरिष्टाचा, दुःखाचा, अनर्थाचा, दुःखोत्पादक (days, tidings). -EYE, a supposed power of fascinating, of bewitching, or otherwise injuring, by the eye or look मोहक दृष्टि *f,* दृष्ट *f,* दृष्टि *f,* घातुक दृष्टि *f.* -EYED *a.* पापदृष्टि, नजरपापी. -MINDED *a.* मनाचा

कपटी, कुड्या भावाचा. -SPEAKING *a.* चाहडी *f*, अपवाद. -WORKER दुष्कर्मी.

EVINCE *v.* (*-vincere,* to vanquish) सिद्ध -शाबीत क., स्पष्ट दाखविणें -दाखवून -करून देणें.

EVISCERATE *v.* (*-viscera,* the bowels) आंतडीं बाहेर काढणें.

EVOKE *v.* (*-vocare,* to call) बोलावणें, आव्हान क. [from].

EVOLVE *v.* (*-volvere,* to roll) उघडणें, खुला -स्पष्ट क., उकलणें; emit बाहेर टाकणें. सोडणें (odors).—*i.* उघडणें, खुलणें, फांकणें.—EVOLUTION विस्तार, प्रकटिकरण *n*; a series of things unrolled श्रेणी *f*, श्रेढी *f*; *Arith.* मूळकर्म *n*; *Mil.* कवाईत *f*.

EWE* (*Skr. avi*) मेंढी *f*.

EWER* हात तोंड धुवायास पाणी आणण्याचें (एक प्रकारचें भांडें *n*; झारी *f*, लोटा, गडवा या सारखें).

EXACERBATION (*-acerbus,* bitter, sour) irritation चिढवणें *n*, खिजवणें *n*; *Med.* a periodical increase of violence in a disease भरतें *n*, चढ.

EXACT *a.* (*-agere,* to drive) precisely agreeing with a standard, a fact, or the truth बरोबर, नेमका, यथातथ्य, खरा (time, sum);—of persons बेतबात्या, सुती, रेखला, व्यवस्थित:—punctual वक्तशीर येणारा -जाणारा -देणारा -करणारा; definitely conceived or stated साफ, कडक, सखत, ठास, स्पष्ट (command) [in].—*v.* require authoritatively अधिकारानें मागणें -घेणें; extort जुलमानें घेणें -काढणें [from]. -ION बलात्कार, जबरी *f*; tribute, fee, rewards, or contributions, demanded or levied with severity or injustice जुलमानें -अधिकाराच्या बळानें मागितलेला किंवा घेतलेला पैका, जोरतलब *f*, खंडणी *f*. -LY *ad.* बराबर, नेमका, पुरता; precisely according to a rule खरा, बरोबर, हुबेहुब. -NESS रेखलेपणा, टापटीप *f*, सुतीपणा, सुयंत्रता *f*.

EXAGGERATE *v.* (*-aggerare,* to heap up) फुगवून -मीठमिरची लावून सांगणें, राईचा पर्वत क., रजाचा गज क.—EXAGGERATION अतिशयोक्ति *f*, अत्युक्ति *f*.

EXALT *v.* (*-altus,* high) उभारणें, उंच क.; dignify वाढविणें, मोठेपणा देणें, योग्यतेस चढवणें; extol स्तुति *f* -स्तव क.; lift up with joy, pride, or success हर्षानें, गर्वानें किंवा जयानें फुगविणें [from, to, by]. -ED उंच, थोर; sublime प्रगल्भ, प्रौढ, प्रशस्त. -ATION मानवृद्धि *f*, सरफराजी *f*, मोठेपणा देणें *n*; मोठेपणा, मोठी पदवी *f*.

EXAMINE *v.* (*examen,* tongue of a balance) test by a balance तोलून -ताडून पहाणें; inquire into and determine शोधणें, तपासणें, परीक्षणें; try as an offender अपराध्याची चौकशी क.;—as a witness (साक्षीस) विचारपूस क., सवाल घालणें;—as a scholar परीक्षा घेणें;—accounts मोहसबा घेणें [into, in]. — EXAMINATION विचारणें *n*, परीक्षण *n*, शोध परीक्षा *f*;—by question विचारपूस *f*, पुस्तपास्त *f*;—judicial तलाश, चौकशी *f*.—EXAMINER परीक्षक, परीक्षा करणारा; चौकसनीस, चौकशी करणारा; परीक्षा घेण्यास नेमलेला मनुष्य, परीक्षा घेणारा: an e. of students for rank.

EXAMPLE (*eximere,* to take out) a sample मासला, नमुना; a model नमुना, कित्ता; a warning जरब *f*, ताकीद *f*; precedent मागला दाखला, उदाहरण *n*; an instance दृष्टांत, दाखला, प्रतीक *n*.

EXASPERATE *v.* (*-asper,* rough) provoke खिजविणें, चेतविणें; aggravate अधिक जड क.; to be *exasperated* विकोपास जाणें [by, at].

EXCAVATE *v.* (*-cavare,* to make hollow) hollow out पोखरून काढणें, पोखरणें (the

earth); form by hollowing पोखरून -कोरून क. (a canoe).—EXCAVATION पोखरणें *n*: cavity formed by removing the interior पोखर *f*, पोखरून केलेलें भोंक *n*, खळी *f*.

EXCEED *v*. (*-cedere*, to go) go beyond पलीकडे जाणें, वर जाणें, मर्यादे बाहेर जाणें, अधिक होणें; surpass मागें टाकणें, जिंकणें; -चे कान कापणें. — *i*. मर्यादा उलंघून जाणें; अधिक होणें. -ING *a*. and -LY *ad*. अतिशय, पुष्कळ [by, in].

EXCEL *v*. (*Gr. -kellein*, to urge on) मागें टाकणें, जिंकणें, माजी पाडणें, अधिक श्रेष्ठ होणें.—*i*. वर्चढ -उत्कृष्ट असणें [in, at]. -LENCE उत्तम -उत्कृष्टपणा, गुणाधिक्य *n*; any valuable quality गुण, भूषण *n*. -LENCY सुलक्षण *n*, भूषण *n*, गुण; a title of honor or respect given to the highest dignitaries of a court or state, also to embassadors, governors, and commanders-in-chief महाराज, हजरत असा एक किताब आहे. -LENT *a*. उत्तम, उत्कृष्ट, श्रेष्ठ; excelling in attainments गुणी, गुणवान (judge, artist).

EXCEPT *v*. (*-capere*, to take) खेरीज -निराळा -वर्ज क., वगळणें. — *i*. तकरार -दिक्कत घेणें [from, to]. — *prep*. शिवाय, वांचून, विना; unless शिवाय, नाहीं तर *n*. -ING *prep*. शिवाय. -ION बाहेर टाकणें *n*, वर्जणें *n*; that which is excepted अपवाद, विपक्ष: every general rule has its *exceptions*; objection शंका *f*, दिक्कत *f*; offense रुसवा; esp. with *to take*, followed by *against*; [*Law*, an objection, oral or written, taken, in the course of an action, as to bail or security; or as to the decision of a judge in the course of a trial, or in his charge to a jury.] -AL *a*. नियमा बाहेरचा, विपक्ष. -ABLE *a*. दूषण लावायाजोगा, बाध्य, दूषणीय, वर्ज्य.

EXCESS (*-cedere*, to pass) the state of surpassing or going beyond limits अतिशयपणा, आधिक्य *n*, अधिकाई *f*, पराकाष्ठा *f*; —of action बेहद्द *f*, सीमा *f*, जुलूम; dissipation अत्याचार, दुराचरण *n*, बदफैली *f*; remainder बाकी *f*, कसर *f*, वरताळा [of, in]. -IVE *a*. अतिशय, फारच, पराकाष्ठेचा (labor); अमर्याद, बेहद्द (anger).

EXCHANGE *v*. (See CHANGE) part with for compensation बदला घेऊन देणें, मोबदला घेऊन देणें; part with for a substitute अदलाबदल क., फेरमोबदला क.: to e. a crown for a cowl; barter अदलाबदलीचा व्यापार क., साटेंलोटें -विनियम क.: to e. horses with a neighbor;—as money वटावणें, बटावणें [for].—*n*. बदलणें *n*; अदलाबदला, मोबदला; सट्टाबट्टा; साटेंलोटें *n*, विनियम; balance of currencies बट्टा, बट्टाई *f*;—on bills हुंडणावळ *f*; place where merchants meet उदम्यांचा फड, अड्डा, चौक.

EXCHEQUER *F*. court into which public money is paid जमाबंदीची कचेरी *f*, खजीना.

EXCISE (*-cædere*, to cut) जकात *f*, सायर *n*, महसूल. -MAN जकातदार. — EXCISION कापून टाकणें *n*, अवच्छेद; excommunication बहिष्कार; (ख्रिस्ती) मंडळीच्या बाहेर काढणें *n*.

EXCITE *v*. (*-cire*, to put in, move) rouse to feeling उठवणें, जागृत क., चेतवणें (spirits, passions); agitate क्षोभवणें, खवळणें [for, by]. -MENT उचल *f*, उठावणी *f*; गडबड *f*, धांदल *f*; as of the passions क्षोभ, उद्वेग, मनस्ताप.

EXCLAIM *v*. (See CLAIM) ओरडून -मोठ्यानें बोलणें; against नांवानें बोंब मारणें, गिल्ला सांगणें [at, to, against]. -ATION रड *f*, आरड *f*, आक्रांत; हाकाटी *f*, बोंब *f*; *Rhet*. a sentence passionately uttered उद्गार; *Print*. e. point उद्गारचिन्ह *n* (!).

EXCLUDE *v.* (*-claudere,* to shut) आंत येऊं न देणें, बाहेर ठेवणें; thrust out बाहेर टाकणें -काढणें [from, by, for].—EXCLUDED बाहेर ठेवलेला, वर्ज केलेला, खेरीज.—EXCLUSION बाहेर टाकणें, वर्जन *n*, बहिष्करण *n*.—EXCLUSIVE *a.* आंत येऊं नदेणारा, प्रवेश न होऊं देणारा; सर्वांस नसतां एकास असणारा, इतरव्यावृत्त (privileges); शिवाय, खेरीज, सोडून: five thousand troops, e. of artillery. -LY *ad.* इतरांस -दुसऱ्यांस सोडून -वर्जून.

EXCOMMUNICATE *v.* (See COMMUNICATE) expel from communion बाहेर टाकणें, बहिष्कार घालणें, अपंक्त क.;—from a caste वाळीत टाकणें [from, for]. — EXCOMMUNICATION बहिष्कार; the act of ejecting बाहेर टाकणें *n*; expulsion from the communion of a church, and deprivation of its rights, privileges, and advantages ख्रिस्ती मंडळीच्या बाहेर काढणें -टाकणें -ठेवणें -दूर क. *n*, धर्मबहिष्कार *n*; — from a caste वाळीत, जातिबहिष्कार; [e. is of two kinds, the *lesser* and the *greater*; the *lesser* e. is a separation or suspension from partaking of the Eucharist: the *greater* is an absolute exclusion of the offender from the church and all its rights and advantages].

EXCREMENT, EXCRETION (*-cernere,* to separate) विष्टा *f*, मळ, गू.

EXCRESCENCE *F.* any thing growing out unnaturally from any thing else वृद्धि *f*, टेंगूळ *n*;—upon the body आवाळूं *n*, टेंगूळ *n*, गलंड *n*;—upon a tree टेंगूळ *n*, गुळुंब *n*, गुंज *n*.

EXCRUCIATE *v.* (*-cruciare,* to slay on the cross, torment) अति वेदना देणें, यातना क. —EXCRUCIATING *a.* अति वेदनाकारक, व्यथाकारक.

EXCULPATE *v.* (*-culpare,* to find fault with) निरपराधी -निर्दोष ठरवणें, दोष उडवणें [from]. —EXCULPATION दोषमुक्ति *f* -मोचन *n*.

EXCURSION (*-currere,* to run) धावणें *n*, धांव *f*, दौड *f*; expedition मोहिम *f*, दौड *f*; a trip for pleasure or health सहल *f*, सफर *f*, फेरफटका; digression भटकणें *n*, रानांत शिरणें *n* [from, to].—EXCURSIVE *a.* भटक्या, भ्रमणकारी -शील, विहारी.

EXCUSE *v.* (*-causa,* cause) exculpate निर्दोष -निरपराधी ठरवणें -क.; pardon क्षमा -माफ क.; overlook कानाडोळा क., मनावर न घेणें (irregular conduct); release by favor सूट देणें, सोडणें, माफी देणें (a forfeiture); relieve of an imputation by apology निमित्त -सबब -बाहणा सांगणें [for, from].—*n*, सबब *f*, निमित्त *n*, कारण *n*: e. for delay; दोष उडविणें *n*, सुटका *f*, दोषमुक्तता *f*; माफी *f*, क्षमा *f*; false e. मीस *n*, निमित्त *n* [for].

EXECRATE *v.* (*-sacer,* holy) शाप -अभिशाप -तळतळाट देणें [for].—EXECRATION शाप, अभिशाप.—EXECRABLE *a.* शापयोग्य, अति दुष्ट, कुत्सित.

EXECUTE *v.* (*-sequi,* to follow) complete पुरा क.; शेवटास -सिद्धीस नेणें (a plan); complete as a legal instrument पुरा क., बजावणें (a deed); give effect to अमलांत आणणें, बजावणें; inflict capital punishment on देहांत शिक्षा क., देहदंड क., जिवें मारणें; *Mus.* perform on an instrument वाद्य वाजविणें: to e. rapidly. — EXECUTION करणें *n*, बजावणें *n*; साधन *n*, साधणूक *f*: e. of a plan; *Law,* कागदपत्रावर सही -शिक्का क. *n*; final process अमलांत आणणें *n*, बजावणें *n*; देहांतशिक्षा क. *n*, देहांतशिक्षा *f*. -ER करणारा, बजावणारा; फासींदेणारा, शिरच्छेद करणारा, मांग, चंडाळ.—EXECUTOR करणारा, साधणारा; person appointed by a testator to execute his will मृत्युपत्राची व्यवस्था करणारा, मृत्युपत्र चालविणारा -बजावणारा. —EXECUTRESS, -TRIX मृत्युपत्र चालविणारीण *f*.

EXEGESIS (*Gr.*) exposition प्रकाश, व्याख्या *f*, विवरण *n*; scientific interpretation of the Holy Scriptures ख्रिस्ती शास्त्राचें विद्यासूत्रानुसार अर्थप्रकाशन *n*.—EXEGETICAL *a*. अर्थप्रकाशक -सूचक, टीकारूप.

EXEMPLAR (See EXAMPLE) नमुना, कित्ता; [an idea or image formed in the mind of an artist, to which he conforms his work]. —EXEMPLARY *a*. कित्ता घेण्याजोगा, अनुकरणीय; commendable वर्णनीय, स्तुत्य (conduct); serving as a threatening धाक -दहशत बसवायाजोगा, ज़रबेचा (punishment); conspicuous प्रसिद्ध, उत्कृष्ट, प्रख्यात: to be e. in life. — EXEMPLIFY *v*. उदाहरणानें -दृष्टांतानें दाखविणें; copy प्रत -नकल क.—EXEMPLIFICATION दाखला देणें, उदाहरण *n*; प्रत *f*, नकल *f*.

EXEMPT *v*. (*eximere*, to take out) सोडणें, माफ क. [from].—*a*. सोडलेला, माफीचा, सुटा, मुक्त. -ION, freedom from that to which others are subject सुटका *f*, माफी *f*, मोकळीक *f*: e. from servitude, anxiety, suffering.

EXEQUIES *pl* (*-sequi*, to follow) प्रेतकर्म *n*, उत्तरक्रिया *f* -कार्य *n*.

EXERCISE *v*. (*exercere*), to put in action habitually वापरणें, वहिवाटणें, घोळणें; discipline शिक्षा -पद्धत लावणें, सराव क., कसरत क., शिकवणें (arms, troops);—as the mind मनोव्यापार क., व्यवसाय क.; worry छळणें, गांजणें: *exercised* with pain; put in practice आचरणें, चालवणें, करणें (authority, an office);—as the dumb-bells मुद्गल फिरवणें [in, at, on, upon].—*i*. शरीरव्यायाम क., सहील -रपेट क.—*n*. अभ्यास, सराव; आचरण *n*: the public e. of religion; व्यापार, व्यवसाय, वापरणें *n*: e. of the eyes;—of the body कसरत *f*, व्यायाम, शरीरपरिश्रम;—of the mind मनोव्यापार, व्यवसाय; military e. कवाईत *f*, शस्त्राभ्यास; a lesson धडा, संथा *f*, तालीम *f*; to take e. सहल -रपेट क.

EXERT *v*. (*-serere*, to join together) put forth, as strength, force, or ability झटणें, श्रम घेणें, परिश्रम क.; do करणें; to e. one's self प्रयत्न क. -ION प्रयत्न, आयास, कष्ट.

EXHALE *v*. (*-halare*, to breathe) श्वास सोडणें, निश्वास टाकणें; emit, as vapor वाफेच्या रूपानें बाहेर सोडणें -टाकणें: the earth *exhales* vapor; evaporate वाफेच्या रूपानें बाहेर काढणें: the sun *exhales* the moisture of the earth [from].—*i*. वाफेच्या रूपानें बाहेर निघणें.—EXHALATION उद्गार, निश्वास; बाष्परूप त्याग; that which rises in the form of vapor वाफ *f*.

EXHAUST *v*. (*-haurire*, to draw) फडशा क., खर्चणें: to e. the water of a well; empty by drawing out the contents खर्चून-काढून रिकामा क., खपवून -कोरडाटांक पाडणें -क.: to e. a well of its water, — a treasury of its contents; weary दमविणें, भागविणें, थकविणें, (one's strength) [by, of]. -ION निझाडा, फन्ना, खडखडाट; ताण *f*, त्रेधा *f*, भागवटा, शीण; the state of being emptied शून्यता *f*.

EXHIBIT *v*. (*-habere*, to hold) डोळ्यापुढें -दृष्टिपुढें धरणें -ठेवणें, दाखविणें, दर्शविणें: to e. a picture in a gallery; present in a public or official manner हुद्याच्या -अधिकाराच्या -सरकारी नात्यानें नमूद -रुजू क. (a charge);—a complaint नालिस्त -सांगणें-क.; *Med*. administer as a remedy (औषध) देणें -चारणें: to e. calomel; [to e. a foundation or prize, to hold it forth as a bounty to candidates [at, to].—*n*. नमूद केलेला कागद -लेख -दस्तऐवज. -ION दाखविणें *n*, प्रदर्शन *n*, दर्शन *n*; that which is exhibited दाखविलेली -प्रदर्शित वस्तु *f*; public show

तमाशा; a display of works of art &c. (कळाकुसरी इ० च्या पदार्थांचें) प्रदर्शन *n*; allowance for the maintenance of scholars, under certain conditions विद्यार्थ्यांची नेमणूक *f* -वृत्ति *f*. -ER नेमणुकीचा विद्यार्थी.

EXHILARATE *v.* (*-hilaris,* merry) आनंदित -हर्षित -खुश क. [with].—EXHILARATION खुशी *f*, आनंद, उल्लास.

EXHORT *v.* (*-hortari,* to incite) बुद्धिवाद सांगणें, उपदेश क.; warn बजावणें, ताकीद देणें [to]. -ATION उपदेश; बुद्धिवाद, बोध; ताकीद *f*, सांगी *f*.

EXHUME *v.* (*-humus,* ground) पुरलेला बाहेर काढणें (a corpse).

EXIGENCE, -CY (*-agere,* to drive) distress अडचण *f*, तारंबळ *f*, आपदा *f*; urgent want गरज *f*, अडचण *f*, निकड *f*, प्रयोजन *n*.

EXILE (*-solum,* ground) forced separation from one's native country हद्दपार क. *n*, स्वदेशत्याग; the person banished हद्दपार केलेला मनुष्य, बेवतन.—*v.* हद्दपार क.

EXIST *v.* (*-sistere,* to cause to stand) be असणें; continue in being राहणें, चालणें, असणें; occur घडणें, होणें; live जगणें, वाचणें: men do not e. in water [in, on, upon, by]. -ENCE असणें *n*, अस्तित्व *n*; घडणें *n*, घटना *f*. उपस्थिति *f*; नांदणूक *f*, स्थिति *f*, चालवणूक *f*; a being व्यक्ति *f*: a living e. प्राणी, जीव. -ENT *a.* असणारा, विद्यमान.

EXIT (*L.*) departure of a player from the stage, when he has performed his part नाटकांतील सोंगाचें निघून जाणें *n*; any departure जाणें *n*, निघून जाणें *n*, निष्क्रमण *n*; death मरण *n*, निर्याण *n*; a way of departure.

EXODUS (*Gr. -hodos,* way) निघून जाणें *n*, निर्गम; [departure of the Israelites from Egypt under the conduct of Moses]; the second book of the Old Testament निर्गम.

EX OFFICIO *ad.* (*L.*) अधिकारपरत्वें.

EXOGENOUS *a.* (*Gr.-genein,* to bring forth) growing by successive additions to the outside of the wood बहिर्वर्धिष्णु.

EXONERATE *v.* (*-onerare,* to load) दोष -उपका उडविणें;—as an obligation उपकाराचें ओझें उतरणें [from].

EXORABLE *a.* (*-orare,* to pray) capable of being moved by entreaty प्रार्थना-काकळूत केल्यानें दया-पान्हा येण्याजोगा, वरद, सुप्रसादित.

EXORBITANT *a.* (*-orbis,* circle) excessive अतिशय, बेहद्द, अमर्याद (claims, taxes); —of prices जबर, भारी; anomalous संप्रदायविरुद्ध, विधिभंजक, विलक्षण.—EXORBITANCE अमर्यादपणा, अतिशयता *f*; जुलूमजास्ती *f*.

EXORCISE *v.* (*Gr.-horkos,* oath) drive away in consequence of adjuring by some holy name भूत काढणें -घालविणें, झाडणें, उतरणें; deliver from the influence of an evil spirit -च्यांतून -आंतलें भूत काढणें (a house) [by, from].—EXORCISER, -IST भूतकाढ्या, पंचाक्षरी.

EXORDIUM (*L.*) introductory part of a discourse, poem &c. उपोद्घात, उपन्यास, प्रस्तावना *f*.

EXOTIC *a.* (*Gr. exo,* outside) परदेशीय, परभू, विदेशी (plant, word).—*n.* विदेशीय झाड *n* -शब्द -चाल *f*.

EXPAND *v.* (*-pandere,* to spread out) फुलविणें, उमलविणें, खुलविणें; diffuse पसरणें, विस्तारणें, फैलावणें.—*i.* फुलणें, उमलणें, खुलणें; पसरणें, वाढणें [from, to]. -ED *a.* पसरलेला, विस्तारित, विस्तृत; खुललेला, प्रफुल्लित, विकसित. —EXPANSE मोठा विस्तार, सपाटी *f*, तळवट *n*;—of heaven व्योम.—EXPANSION फैलावणें *n*, प्रसार; विस्तार, फैलाव, वृद्धि *f*; मैदान *n*, सपाटी *f*.—EXPANSIVE *a.* पसरायाजोगा, प्रसरणीय, प्रसरणशील.

EX-PARTE *a.* (*L.*) एकपक्षी, एकतर्फी.

EXPATIATE *v.* (*-spatiari,* to walk about) मोकळें -मोकाट -मोकार फिरणें; enlarge in discourse or writing पाल्हाळ करून बोलणें किंवा लिहिणें [on, upon].

EXPATRIATE *v.* (*-patria,* one's fatherland) देशपार -हद्दपार क.;—one's self स्वदेशत्याग क., मुलखावर उठून जाणें [from, for].

EXPECT *v.* (*-spectare,* to look at) वाट पाहणें, मार्गप्रतिक्षा क.; anticipate अगा असणें, अटकळींत येणें [from, of]. -ANCY, -ATION मार्गप्रतिक्षा *f,* अपेक्षा *f,* आशा *f;* अगा *f,* संभव, सुमार. -ANT *a.* वाट पाहणारा, मार्गप्रतिक्षा करणारा, सावचित.

EXPECTORATE *v.* (*-pectus,* the breast) खाकरणें, कफ पाडणें.—*i.* कफ पडणें.

EXPEDIENT *a.* (*-pes,* foot) proper under the circumstances उचित, लायक, कार्योपयोगी; tending to self-interest स्वहिताचा, स्वहितकारक [for].—*n.* तोड *f,* युक्ति *f,* उपाय.—EXPEDITE *v.* quicken जलदीवर घेणें -आणणें, गतित्वरित क.; dispatch जलदीनें पाठविणें, दवडणें, फेंकणें; issue officially अधिकाराच्या नात्यानें प्रसिद्ध क., फरमावणें.—EXPEDITION जलदी *f,* घाई *f,* त्वरा *f;* an important enterprise, undertaking, or attempt at some distance मोहीम *f,* सफर *f;* naval e. सफर *f;* military e. मोहीम *f,* दौड *f;* the body of persons making such an excursion दौडीचीं -स्वारीचीं मनुष्यें *n pl;* with e. जलदीनें, शिताबीनें.—EXPEDITIOUS *a.* जलद, शिताब, झटपट्या;—of matters ताबडतोबीचा, जलदीचा.

EXPEL *v.* (*-pellere,* to drive) काढून -घालवून देणें -टाकणें; banish देशपार क.; [cut off from further connection with an institution of learning, a society, and the like].

EXPEND *v.* (*-pendere,* to weigh) lay out खर्चणें, व्यय क.; consume by use खपवणें, सारणें, खलास क.; waste उडवणें, उधळणें [on, upon].—*i.* खर्चणें, सरणें, खपणें, उडणें. -ITURE खर्चणें *n,* वेच, व्यय; charge खर्च, व्यय; extra e. गैर खर्च.—EXPENSE खर्च, व्यय; income and e. आयव्यय: village *expenses* सादिलवार खर्च.—EXPENSIVE *a.* खर्चीक, धौताल; dear महाग; costly बहुमोलाचा, किमतदार. -NESS खर्चीकपणा; उधळेपणा; मोठें मोल *n,* बहुमूल्यता *f.*

EXPERIENCE (*experiri,* to try) practical acquaintance with any matter by personal observation or trial of it, or by feeling its effects, by living through it, or the like अनुभव, प्रचीत *f;* experimental knowledge अनुभविक ज्ञान *n;* repeated trial of a matter परीक्षा *f,* अजमास; personal trial and experiment स्वानुभव; to agree with the e. of दाखल्यास -प्रतितीस उतरणें -येणें [of].—*v.* अनुभव घेणें, भोगणें; परीक्षा क., अजमासणें; exercise राबवून तयार क., सराव पाडणें [in, from].—EXPERIENCED *p.a.* अनुभव घेतलेला, अनुभुक्त; skilful or wise by means of trial, use, or observation जाणता, वाकब, शहाणा, व्यवहारज्ञ (statesman, physician, artist). — EXPERIMENT पारख *f,* प्रचीति *f,* अनुभव; scientific e. प्रयोग? -AL *a.* परीक्षेचा, परीक्षेसंबंधी; अनुभविक, अनुभवस्थापित (religion).

EXPERT *a.* (do.) हाताचा कुशळ, कसबी, हुशार, चालाख [at]. -NESS हातवटी *f,* सुगराई *f,* निपुणता *f,* हस्तकौशल्य *n.*

EXPIATE *v.* (*-piare,* to seek to appease) निस्तरणें, प्रायश्चित्त करून -घेऊन घालविणें (crime) [by].—EXPIATION प्रायश्चित्त घेऊन घालविणें, निरसन *n;* प्रायश्चित्त *n* [for].—

EXPIATORY *a.* प्रायश्चित्ताचा, प्रायश्चित्तरूप, पापनिष्कृतिकारक (sacrifice).

EXPIRE *v.* (*-spirare,* to breathe) श्वास टाकणें, दमसोडणें; exhale वाफेच्या रूपानें सोडणें: plants e. odors.—*i.* die प्राण सोडणें, मरणें; come to an end शेवट होणें, संपणें, सरणें [at].—EXPIRATION श्वास, निश्वास; मरण *n,* प्राणांत; शेवट, पर्यवसान *n*; matter exhaled forth श्वासानें बाहेर टाकलेला पदार्थ, निश्वास.

EXPLAIN *v.* (*-planare,* to make plain) अर्थ सांगणें, फोड क., उघड करून सांगणें, समजाविणें [by, to]. -ATION, the act of expounding अर्थ सांगणें *n,* स्पष्टिकरण *n,* उलगडा, फोड *f*; that which explains टीका *f,* व्याख्या *f*; understanding समज, उमज; reconciliation, agreement, or good understanding of parties who have been at variance समजूत *f,* मनसमजावणी *f.*—EXPLANATORY *a.* उलगड्याचा, प्रकाशक; टीकारूप, विवरणरूप (notes).

EXPLETIVE (*-plere,* to fill) a word not necessary to the sense, but inserted to fill a vacancy, or for ornament पादपूरक शब्द, वाक्यालंकार, पालव पद *n.*

EXPLICATE *v.* (*-plicare,* to fold) उलगडा -फाड -परिस्फोट क.—EXPLICATION उलगडा, फाड, विवरण *n*; टीका *f,* प्रकाशन *n.*—EXPLICIT *a.* -LY *ad.* साफ, स्पष्ट, निवळ; direct खरपूस, खरमरीत.

EXPLODE *v. i.* (*-plaudere,* to clap) आवाजाबरोबर फुटणें, बार उडणें.—*t.* बार उडवणें, दारूनें उडविणें; cry down हुर्यो हुर्यो क., धुत्कारणें.—EXPLOSION बार होणें -उडणें *n*; धाडकन उडवणें *n*; बार, धडाड, भडाड *f*; हुर्यो, धुत्कार.

EXPLOIT (*explicare,* to unfold) पराक्रम, महत् कृत्य *n,* शूरकर्म *n.*

EXPLORE *v.* (*-plorare,* to cry out) search through शोधणें, तपासणें, पाहणें; spy out हेरणें, टेहळणें [into].

EXPONENT (*-ponere,* to place) *Alg.* घातप्रकाशक; one who, or that which, stands as an index or representative ज्ञापक, सूचक, मुख *n,* प्रतिनिधि.

EXPORT *v.* (*-portare,* to carry) देशांतरास माल पाठविणें.—*n.* देशांतरास नेलेला माल, रवानगी *f* [from, to].

EXPOSE *v.* (*-ponere,* to place) उघड्यावर मांडणें -ठेवणें; बाहेर -वाऱ्यावर ठेवणें -टाकणें: to e. one's self to cold; promulgate प्रसिद्ध क.; explain अर्थ सांगणें, उलगडा क.; lay open to attack or danger भयाच्या -धोक्याच्या जाग्यावर ठेवणें, धोक्यांत घालणें, उघड्यावर टाकणें; lay open to public inspection, as a thing that shuns publicity, something criminal, shameful, and the like उघडा पाडणें, फोडणें, उघाडीस आणणें (faults); divulge the reprehensible practices of रेवडी -फटफजिती क.: to e. a liar [to].—EXPOSITION उघड करणें *n,* प्रसिद्धिकरण *n*; फोड *f,* व्याख्या *f*; प्रदर्शन *n,* दाखविणें *n.*—EXPOSURE उघडा -उघाड्यांत टाकणें *n*; फजिती *f,* रेवडी *f,* टेर *f,* धिंड *f*; position in regard to influences of climate वारा -ऊन आंत येण्याची उघडी जागा *f,* बाजू *f,* किंवा दिशा *f.*—EXPOSITOR व्याख्या -विवरण करणारा; व्याख्या -टीकारूप ग्रंथ.—EXPOUND *v.* व्याख्या -विवरण क., स्पष्टार्थ क., अर्थ सांगणें. -ER अर्थ सांगणारा, प्रकाशक;—of the law धर्मप्रवक्ता.

EXPOSTULATE *v.i.* (*-postulare,* to ask) बुद्धिवाद सांगणें, कान उघडणें, चार गोष्टी सांगणें [with].—EXPOSTULATION कानझाडणी *f,* बुद्धिवाद.

EXPRESS *v.* (*-premere,* to press) पिळणें, पिळून काढणें (juice of grapes, truth); imi-

tate नकल -प्रत उतरणें -क.; represent दाखविणें, दर्शविणें: my words e. my purpose; utter बोलून दाखवणें, सांगणें; indicate सुचविणें, दर्शविणें, व्यक्त क.; send by express messenger मुद्दाम जासूद करून पाठविणें (a package).—*a.* प्रत केलेला, उतरून घेतलेला; plain साफ, स्पष्ट (command); direct चरचरीत, साफ, खरमरीत (terms); intended for a particular purpose मुजरतचा, विशेष कामाकरितां केलेला -योजलेला (train, messenger) [by].—*n.* मुजरत -मुद्दाम पाठविलेला जासूद; मुद्दाम -लवकर जाणार घोडा -गाडी वगैरे. -ION उच्चारणें *n*; उच्चार, उल्लेख;—of the features ठेवण *f*, ठेव *f*, पाणी *n*; a phrase वाक्य *n*, शब्दप्रयोग; *Alg.* बीजरूप *n*. -IVE *a.* serving to express दर्शक, बोधक; significant वाचक, अर्थक, उद्देशक (look). -LY *ad.* उघड, स्पष्ट, साफ.

EXPULSION (See EXPEL) काढून -घालून देणें, उच्चाटण *n*.

EXPUNGE *v.* (*-pungere,* to prick) blot out, as with a pen पुसणें, खोडणें, बोळा फिरविणें (words, lines); annihilate नाहींसा क., मागमूस मोडणें (an offence) [from].

EXPURGATE *v.* See PURGE.

EXQUISITE *a.* (*-quærere,* to ask) excellent उत्तम, उत्कृष्ट; exceedingly nice फार बारीक, नाजूक, सूक्ष्म; e. pleasure परमानंद; e. pain तीक्ष्ण -तीव्र दुःख *n*; of delicate perception सूक्ष्मदृष्टि, बारीक पाहणारा, नजरबाज.

EXTANT *a.* (*-stare,* to stand) protruded बाहेर आलेला; now subsisting प्रसिद्ध, उपलब्ध, विद्यमान.

EXTEMPORE *a.* (*-tempus,* time) without previous study or meditation पूर्वी विचार केल्यावांचून, समयस्फुर्त्तीनें.— EXTEMPORANEOUS, EXTEMPORARY *a.* समयीं सुचलेला, समयस्फूर्त.—EXTEMPORIZE *v. i.* पूर्वी विचार केल्यावांचून -समयास बोलणें.—*t.* उतावळीनें -घाईनें -लगबगीनें क. (a dinner).

EXTEND *v.* (*-tendere,* to stretch) ताणणें, वाढवणें, लांब क. (a line); expand पसरणें, विस्तारणें, फैलावणें; prolong लांबवणें, वाढवणें (the time of payment); hold out पुढें क.; लांब क. (the hand); bestow देणें, अर्पणें [from, to]. — *i.* वाढणें, लांबणें, पसरणें; पोहचणें, जाणें.—EXTENSION लांब क. *n*; विस्तार, फैलाव; लांबी *f*; *Physics* and *Metaph.* that property of a body by which it occupies a portion of space परिमेयता *f*; *Com.* a written engagement on the part of a creditor, allowing a debtor further time to pay a debt वायदेचिठ्ठी *f*.—EXTENSIVE *a.* लांबरुंद, प्रशस्त, विस्तीर्ण.—EXTENT, length लांबी *f*; size परिमाण, विस्तार, लांबीरुंदी *f*.

EXTENUATE *v.* (*-tenuis,* thin) बारीक-क्षीण-पातळ क.; palliate, as a crime हलका-कमी क. [by].

EXTERIOR *a.* (*L.*) outward बाहेरचा, बाहेरल्या अंगाचा, बाह्य; on the outside with reference to a person बाहेरील, वरचा, दर्शनी; foreign विदेशी, परदेशचा, परका: e. relation of a kingdom.—*n.* बाहेरचें अंग *n*, बाह्यांग *n*; बाह्यप्रदेश; बाहेरची चाल *f* -चें वर्त्तन *n*.—EXTERNAL *a.* बाहेरचा, बाह्य; derived from, or related to, the body, its appearance, functions, &c. शरीरविषयक, शारीर, शरीर संबंधी; accidental आगंतुक, आनुषंगिक (circumstances); परदेशचा, विदेशी *n*.—*pl* बाहेरचीं अंगें *n pl.* -LY *ad.* बाहेरून, बाहेरच्या आंगून; वरून, दिसण्यांत, दर्शनीं.

EXTERMINATE *v.* (*-terminus,* limit) हद्दपार क.; destroy utterly समूळ नाश क., निःपात क.; root out समूळ उपटणें, खणून काढणें; *Math.* छेदणें.—EXTERMINATION निसंतान *n*, समूळ नाश, संहार; उच्छेद, छेद.

EXTINCT *a.* (*-stinguere,* to quench) विझवलेला, मालवलेला; having ceased नाहींसा झालेला, सरलेला, नष्ट; as a family बींमोड झालेला, निर्बीज. -ION विझवणें *n,* मालवणें *n*; विनाश, लय, लोप;—of a family बींमोड, निर्वंश, निसंतान *n.* — EXTINGUISH *v.* विझवणें, मालवणें; नाश -लय -लोप -उच्छेद क. -ER मालवणारा; नाश -संहारकर्त्ता; a hollow cone used to put out a candle दीपनिर्वापक, गुलतराश (*H.*).

EXTIRPATE *v.* (*-stirps,* root) मुळासुद्धां उपटणें; destroy wholly समूळनाश -निःपात क. —EXTIRPATION संहार, निःपात.

EXTOL *v.* (*-tollere,* to raise) स्तुति -प्रशंसा -तारीफ क., वाखाणणें [for].

EXTORT *v.* (*-torquere,* to twist) बळजोरीनें -जुलमानें पिळून घेणें -काढणें; take unlawfully बळकाविणें, अन्यायानें घेणें. -ION बळजोरीनें घेणें *n*; बलात्कार, जुलूम. -ER जुलमानें घेणारा, हपापानें दौलत मिळविणारा.

EXTRA *a.* (*L.*) शिवाय, खेरीज.

EXTRACT *v.* (*-trahere,* to draw) काढणें, काढून घेणें; remove forcibly from a fixed position उपटून -बळजोरीनें काढणें: to e. a tooth from its socket; withdraw by distillation, or other chemical process अर्क -काढा काढणें; choose out, as a passage from a book वेचा -उतारा घेणें; *Math.*—the root (वर्ग -घन इ०) मूल काढणें [from].—*n.* काढा, कषाय, अर्क; वेचा, उतारा. -ION काढणें *n,* निष्कासन *n*; lineage कुळी *f,* वंश, घराणें *n*; अर्क, काढा.

EXTRANEOUS *a. L.* बाहेरचा, विजातीय, आनुषंगिक.: to separate gold from e. matter [to].

EXTRAORDINARY *a.* not usual विलक्षण, लोकोत्तर, अलौकिक (remedies); remarkable चमत्कारिक, अपूर्व (talents); employed or sent for an unusual or special object मुजरत -मुद्दाम पाठविलेला किंवा कामास लावलेला, विशेष.

EXTRAVAGANT *a.* (*-vagans,* wandering) भ्रमणशील, भटक्या; irregular गैरशिस्त, अमर्याद; excessive अतिशय, मनश्वी (flights of fancy); prodigal उधळा -ळ्या, उडाऊ (man). -LY *ad.* उधळेपणानें; सैरावरा, मनश्वी —EXTRAVAGANCE पराकाष्ठा *f,* अमर्यादा *f,* अनर्थ; उधळपट्टी *f,* उधळाखर्च, अतिव्यय; —of language अतिशयोक्ति *f,* अत्युक्ति *f.*

EXTREME *a.* (*extremus*) at the utmost point शेवटच्या टोकाचा, अग्रवर्त्ती (verge); final शेवटचा, निदानींचा, अंतींचा (hours of life); utmost, worst or best पराकाष्ठेचा. परमावधीचा, अति, अतिकठीण (case, remedy); [e. unction (*Rom. Cath. Church*), the anointing of a sick person with oil just before death].—*n.* शेवट *n,* अग्र *n,* टोंक *n*; पराकाष्ठा *f,* बेहद्द *f,* सीमा *f,* कळस;—of an arith. or geom. progression,—the first आदिधन *n,*—the last अंत्यधन *n.* -LY *ad.* फारच, अतिशय, परम.—EXTREMITY टोंक *n,* अग्र *n,* शेवट *n*: e. of a country; परमावधि *f,* परम मर्यादा *f*: e. of pain; greatest need or peril निदानींची वेळ *f,* पराकाष्ठेची अडचण *f,* तारांबळ *f,* तंगी *f,* लाचारी *f*: man's e. is God's opportunity;—of the body हस्तपादादि अवयव.

EXTRICATE *v.* (*-tricæ,* hindrances) disentangle सोडवणें, मोकळा क.; send out बाहेर पाठवणें -सोडणें [from].—EXTRICATION सोडवणूक *f,* सुटका *f.*

EXTRINSIC *a.* (*-secus,* by, nigh to) बाहेरचा, बहिर्भूत, बाह्य.

EXTRUDE *v.* (*-trudere,* to thrust) बाहेर लोटणें -ढकलणें; drive away हांकून लावणें -काढणें.—EXTRUSION *n.* बाहेर लोटणें *n,* टाकणें *n,* काढणें *n,* उच्चाटण *n.*

EXUBERANT *a.* (*-uber,* fruitful) पुष्कळ, विपुळ, अतिशय —as growth, foliage उफाड्याच्या वाढीचा, उफाड्याचा.—EXUBERANCE,-CY पुष्कळपणा, चळचळाट, पूर; अतिवृद्धि *f*, उफाड्याची वाढ *f*, माज.

EXUDE *v. i.* (*-sudare,* to sweat) पाझरणें, वाहणें, स्रवणें [from].—EXUDATION स्राव, पाझर, निचरा.

EXULT *v. i.* (*-salire,* to leap) आनंदानें नाचणें, उड्या मारणें, उल्लासणें, टाळ्या पिटणें [in, over]. -ATION आनंदानें नाचणें *n*; अत्यानंद, परमानंद, उल्लास.

EXUVIÆ *pl* (*L.*) cast skins, shells, or coverings of animals प्राण्यांनीं टाकलेलें कातडें *n*, कवच *n*, वगैरे;—of a snake कांत *f*.

EYE * (*Skr. akshi*) the organ of sight डोळा, नेत्र, नेत्रेंद्रिय *n*; power of seeing नजर *f*, दृष्टि *f*: to have the e. of a sailor; sight नजर *f*, दृष्टि *f*; view लक्ष्य *n*, दृष्टि *f*, रोख; opinion मत *n*, विचार; face तोंड *n*: we shall express our duty in his e.; watch नजर *f*, डोळा: the e. of the master; look रूप *n*, मुद्रा *f*, चेहरा: yon gray is not the morning's e.;—as of a peacock's tail, of a grain of corn डोळा, नाक *n*;— of a needle वेज *n*, नाक *n*; a catch for a hook फांस, डोळा, तुकमा; that which resembles the organ of sight in relative importance or beauty नेत्र, चक्षु: the sun is the e. of day: Athens, the e. of Greece; *eyes* of a ship गलबताचा पुढला भाग; to obtain the desire of one's *eyes* डोळे निवणें; to strain one's *eyes* डोळेफोड क.; long *eyes* आकर्णलोचन; having good *eyes* सुलोचन; before one's *eyes* प्रत्यक्ष; visible to the *eyes* दृष्टिगोचर; glance of the *eyes* दृष्टिपात; have an e. to नजर ठेवणें, लक्ष्य ठेवणें.—*v.* पाहणें, लक्षिणें;—wishfully टुकणें;—intently and pointedly रोखून पाहणें;—fiercely गुरकावून पाहणें; डोळे पिंजारणें. -BALL डोळ्याचें बुबूळ *n*, नेपिंडा. -BROW भंवई *f*, भ्रुकुटि *f*. -DROP असूत्र *n*, अश्रु *n*. -GLASS spectacles उपनेत्र *n*, आरशी *f*; the eye-piece of a telescope डोळ्यास लावून पाहण्याचें दुर्भिणीचें भिंग *n*; [a glass adapted for the application of remedies to the eyes]. -LASH डोळ्याच्या पापणीचे केश *pl*; पापणीच्या केशांतला एक केश. -LET नेडें *n*, वेज *n*. -LID डोळ्याची पापणी *f*. -SALVE नेत्रांजन *n*, खत्ता. -SERVANT कामचोर, धन्याच्या डोळ्यापुढलें काम करणारा चाकर. -SERVICE तोंडापुढली चाकरी *f* [Col. iii. 22]. -SIGHT नजर *f*, दृष्टि *f*. -SORE सल *n*, नेत्रकंटक, शल्य *n*. -TOOTH सुळा, दातांचा सुळका, सुळका. -WITNESS साक्षी, प्रत्यक्षदर्शी.

EYRY (*area,* an open space) घार वगैरे हिंस्र पक्ष्यांचीं घरटें बांधण्याची जागा *f*.

F.

FABLE (*fabula*) a feigned story or tale, intended to instruct or amuse कल्पित कथा *f*, कादंबरी *f*; fiction खोटी गोष्ट *f*.—*v.* कल्पित कथा लिहिणें -रचणें.—FABULIST कल्पित कथा रचणारा.—FABULOUS *a.* कल्पित, बनावट; related in fable कादंबरींतला, पुराणांतला, पंचोपाख्यानी.

FABRIC (*faber,* workman) structure of any thing रचना *f*, घटना *f*, बांधणी *f*; edifice इमारत *f*; texture वीण *f*, विणकर *f*; manufactured cloth विणलेलें कापड *n*.—FABRICATE *v.* रचणें, बांधणें; manufacture हातानें -कसबानें क.; forge खोटा क.-रचणें, बनावट क. (a story).—FABRICATION रचणें *n*, बांधणें *n*; कुभांड *n*, कंवटाळ *n*, कुफरांड *n*.—FABRICATOR कुभांड्या, थोतांडी, पाखंडी.

FACE (*facies*) exterior form or appearance of any thing मुख *n*, तोंड *n*, अग्रभाग; surface तळ, पाठ *f*, अंग *n*;—of the ground भूमीची पाठ *f*, भूतल *n*; — as of a

gem पैलू; outside appearance रूप *n*; that part of the head of an animal, esp. of a human being, in which are the principal organs of sense तोंड *n*, मुख *n*; countenance चेहरा, तोंडवळा, सुरत *f*; cast of features ठेव *f*, ठेवण *f*; effrontery नाक *n*, तिखें *n*; boldness छाती *f*, धिटाई *f*; favor or anger मर्जी किंवा गैरमर्जी *f* (Ezek. xv. 7, Prov. vii. 15); before the f. of तोंडा समोर, समक्ष; f. to f. तोंडातोंडीं, रुबरू; in the f. of तोंडावर; to set one's f. against तोंडास तोंड देणें; make f. at वाकुल्या दाखविणें; to make a long f. तोंड वासणें -पसरणें. —*v.* meet in front समोर भेटणें; stand opposite to समोर -सम्मुख उभें राहणें; confront रुबरू क.;—an instrument तोंड बसविणें -लावणें. -CLOTH प्रेताचें मुखवस्त्र *n*. —FACET पैलू.—FACIAL *a.* तोंडाचा, मुखसंबंधीं.

FACETIOUS *a.* (*facetus*) merry गमत्या, विनोदी, थट्टेखोर (companion); विनोदाचा, थट्टेचा, विनोदात्मक (reply).

FACILE *a.* (*facere*, to make) not difficult सोपा, हलका, सुगम, सुखकर; easily persuaded to good or bad मनाचा नरम -कोवळा, चलमति, भोळा.—FACILITATE *v.* सोपा-सुलभ क.—FACILITY सोपेपणा, सुलभपणा; dexterity हातवटी *f*, हात; assistance मदत *f*, सहाय *n*; advantage सवड *f*, सोयी *f*; pliancy नरमाई *f*, मऊ स्वभाव; easiness of access सुगम्यता *f*; affability खळबळीतपणा.

FACT (do.) event झालेली-खरी -घटित गोष्ट *f*: the resurrection of Christ is a f.; reality खरेपणा, तथ्यता *f*; in f. खरोखर, वस्तुतः; statement of a thing done or existing, sometimes, even when false, improperly put by a transfer of meaning for the thing done or supposed to be done हकीकत *f*, बयान, गोष्ट *f*: history abounds with false *facts*.—FACTION, a party तट, पक्ष, तड, फळी *f*; tumult बंड *n*, बलवा.—FACTIOUS *a.* दंगेखोर, बंडखोर; बंडाळीचा, फंदफितुराचा.—FACTITIOUS *a.* बनावट, कृतीचा, केलेला.—FACTOR अडत्या, गुमास्ता, कारभारी; *Math.* गुण्य किंवा गुणकपद *n*. -AGE अडत *f*, दस्तुरी *f*. — FACTORY, house where factors reside वखार *f*, कोठी *f*, अडत्यांचा अड्डा; the body of factors अडते लोक *pl*; a manufactory कारखाना.—FACTOTUM (*L.*) हरकाम्या, हरबाबी, कामाचा गाडा, चौकोनीचिरा.

FACULTY (do.) ability to act शक्ति *f*, सामर्थ्य *n*;—of mind मनःशक्ति *f*, बुद्धिवैभव *n*, आंवाका; authority अधिकार, अखत्यार; [a body of men to whom any specific right is granted, as the medical f., the professors and tutors in a college].

FACSIMILE (*L.*) अस्सल बरहुकूम नकल *f*.

FADE *v. i.* (*fatuus*, insipid) wither कोमेजणें, कोमणें, सुकून जाणें; lose freshness, color, or brightness विटणें, (रंग) उडणें, मजीत पडणें, फिका पडणें; vanish उडून जाणें, नाहींसा होणें.—*t.* विटविणें, कोमविणें, मजीत पाडणें [away].

FÆCES *pl* (*L.*) मळ, विष्टा *f*, गू.

FAG* *v. i.* drudge खपणें, कष्ट क.; tire थकणें, दमणें.—*t.* दमविणें, भागविणें.—*v.* खप्या, कबाडकष्ट करणारा; [a schoolboy who does menial services for another boy of a higher class in English schools]. -END, end of a web दशा *f pl*; refuse of any thing गाळ, गदळ. -GING आटापीट *f*, अट्टाहास.

FAGOT (*faæ*, torch) लांकडाचा -सरपणाचा भारा, मोळी *f*.

FAIL *v. i.* (*fallere*, to deceive) fall short कमी -उणा पडणें, तूट येणें: streams f.; be affected with want गरजवंत होणें, गरज लागणें; fall away गळणें, पडणें; fall off

with respect to vigor मोडणें, बसणें, थकणें, खचणें; die मरणें; miss चुकणें, हरणें, फसणें; become unable to meet one's engagement चुकणें, टळणें, अंतर -तफावत पडणें; be baffled लटपटणें, अपेश येणें; become bankrupt दिवाळेदार होणें, थकणें, डगागणें; as eyes, ears, &c. फुटणें, नष्ट होणें, जाणें. —*t.* अंतर देणें, फसीं पाडणें, सोडणें. -ING तूट *f*, अपूर *f*, तोटा; fault चूक *f*, दोष, ऐब *n*; lapse चळ, ढळ, भ्रंश. -URE तूट *f*, तोटा, अभाव; — of crops बूड *f*, बींबूड *n*; क्षय, भ्रंश; f. of memory मोड, मोडकळ *f*: f. in business; — in duty तफावत *f*, चूक *f*, अंतर *n*.

FAIN* *a.* glad आनंदी, खुशी; [content to accept, for lack of any thing better, as the more desirable of two alternatives]. —*ad.* खुशीनें, आनंदानें.

FAINT *a.* (*fingere,* to feign) weak अशक्त; languid थकलेला, शिणलेला, लुंघलेला; inclined to swoon मूर्च्छित होण्याजोगा; as color फिका, अंधक, पुसकट; as sound मंद, हलका, बारीक; hardly perceptible पातळ, बारीक, कळेनासा, सूक्ष्म (image); performed in a feeble manner मळमळीत, मिणमिणा; dejected खिन्न, उदास, दिलगीर. —*v. i.* मूर्च्छा -अंधारी येणें, कासावीस होणें, गळणें, ग्लान होणें (Prov. xxiv. 10; Matth. viii. 3); धीर -अवसान सोडणें; नाहींसा होणें, अंतर्धान पावणें, अदृश्य होणें. -HEARTED *a.* अल्पधीर, निर्वीर्य, मनमरू, भित्रा. -LY *ad.* मंद, हलका, बारीक; मंद, मिणमीण; हलका, कळेनकळेसा; धिमासा, मंद, हळू; ग्लानीनें, खिन्नतेनें; भित्रेपणानें. -NESS ग्लानि, कळमळ *f*; थंडाई *f*, सुस्ती *f*, मंदपणा; भय *n*, भित्रेपणा.

FAIR* *a.* free from spots निष्कलंक; free from dirt निर्मल; from imperfection निकोप, अव्यंग, निर्दोष; clear साफ, स्वच्छ; beautiful सुंदर, सुरेख (maid, city); free from a dark hue गोरा, उजळ, गौर (skin); cloudless निरभ्र, स्वच्छ, उघाडीचा (day, sky); favorable सोयीचा, अनुकूल (weather); open उघडा, स्पष्ट (view); upright प्रमाणिक, वाजवी, उजू, नीट, रास्त (man, conduct); inspiring hope and confidence भरवशाचा, दिलाशाचा (words); legible स्पष्ट, ठळक (writing); moderate मध्यम, सरासरी, बराच: the news is f. and good; f. play सचोटीचा व्यवहार, रास्तबाजी *f*.—*n.* सुंदर स्त्री *f*, सुंदरी *f*. -LY *ad.* वाजवी, वाजवी रीतीनें, मार्गानें; स्पष्ट, साफ, निस्तूक: he was f. beaten. -NESS गोरेपणा: f. of skin; उघाडी *f*, निरभ्रता *f*; स्वच्छता *f*, निर्मलता *f*: f. of water; प्रमाणिकपणा, रास्तपणा, सचोटी *f*; ठळकपणा, स्पष्टता *f*; सौंदर्य *n*, लावण्य *n*. -SPOKEN *a.* बोलून गोड -भला, तोंडचा गोड.

FAIR (*feria,* day of rest) a gathering of buyers and sellers, assembled with their merchandise at a stated or regular season मेळा, जत्रेचा -उरसाचा बाजार, बाजार.

FAIRY *F.* enchantment मोहणी *f*, चेटक *n*, an imaginary supernatural being or spirit supposed to assume a human form, either male or female, and to meddle, for good or evil, in the affairs of mankind परी *f*? वनदेवता *f*?, अप्सरा *f*? — *a.* वनदेवतेचा, परीचा; परीनें दिलेला (money).

FAITH (*fides*) assent of the mind to the truth of what is declared by another, resting solely and implicitly on his authority and veracity विश्वास, भरवसा, इतबार; firm and earnest belief, in probable evidence of any kind, esp. in regard to important moral truth विश्वास, खातरी *f*, निश्चय; *Theol.* belief in the historic truthfulness of the Scripture narrative, and the supernatural origin of its teachings, sometimes called *historical* and *speculative* faith शास्त्रश्रद्धा *f*, ख्रिस्ती शास्त्राच्या खरेपणावर विश्वास; belief in the

facts and truth of the Scriptures, with a practical love of them; esp. that confiding and affectionate belief in the person and work of Christ which affects the character and life, and makes a man a true Christian, called a *practical, evangelical,* or *saving* faith तारक विश्वास, भाव,श्रद्धा,प्रेम -भक्तियुक्त विश्वास,निष्ठा *f* (Heb. xi. 6); system of religious belief धर्म,पंथ, मत *n*; loyalty इमानीपणा, इमान *n*; promise given वचन *n*, भाक *f* [in]. -FUL *a.* विश्वासू, भाविक; खरा, इमानी, स्वामिसेवानिष्ठ (friend, servant, husband); वचन -भाक राखणारा, सत्यप्रतिज्ञ,खरा (Deut. vii.9); conformable to truth इत्थंभूत, खरा,सत्य (narrative); worthy of belief विश्वसनीय, विश्वासास योग्य;—a. f. wife पतिव्रता *f*, सती *f*. -LY *ad.* इमानें इतबारें; सत्य राखून; खरेपणानें; यथावृत्त, इत्थंभूत. -NESS इमानदारी *f*, इतबार; खरेपणा, प्रामाणिकपणा;—in a wife पातिव्रत्य *n*;—in a husband एकपत्निव्रत *n*.—FAITHLESS *a.* अविश्वासी, श्रद्धाहीन, बेइमान, खोटा, दगलबाज; —as a subject निमकहराम. -NESS अविश्वास, अश्रद्धा *f*; दगलबाजी *f*, निमकहरामी *f*.

FALCHION, FAULCHION, (*falx*, a sickle) a short crooked sword तेगा.

FALCON (do.) बहिरीससाणा. -ER बहिरीससाणा बाळगून त्यास शिकार करायास शिकविणारा. -RY बहिरीससाण्याची शिकार *f*.

FLORA (*flos*, flower) goddess of flowers पुष्पदेवता *f*; complete system of vegetable species native in a given locality अमूक एका प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या वनस्पति *f pl*; a description of such plants स्थानिक वनस्पतिवर्णन *n*. —FLORAL *a.* फुलांचा पुष्पसंबंधी (game); फुलांचा (bud).—FLORID *a.* flushed with red लालबुंद -भडक (countenance); embellished with flowers of rhetoric अलंकारिक, पुष्पित (style); -ITY तोंडाची लाली *f* -टवटवी *f*. -NESS लाली *f*, भडक *f*; अलंकारप्राचुर्य *n*.—FLORIN एक नाणें आहे; [the English f. is one-tenth of a pound sterling].—FLORIST फुलमाळी, फुलारी, माळी; पुष्पवर्णनकर्त्ता.

FLOUNCE, FLOUNDER *v. D.* धडफडणें, तडफडणें, हातपाय अपटणें -झाडणें [about].—*n.* झडफड *f*, तडफड *f*; *Ger.* [part of a lady's dress, a loose trimming].

FLOUR (See FLOWER) finely ground meal of grain पीठ *n*, पिष्ट *n*; wheaten f. कणीक *f*; gram f. बेसन *n*; fine wheaten f. सोजी *f*, मैदा; coarse wheaten f. रवा, सांजा; fine rice f. पिठी *f*; fine and soft powder of any substance पीठ *n*, भुकटी *f*, पूड *f*.

FLOURISH *v. i.* (*florere*, to bloom) grow luxuriantly पोसणें, तरतरणें, फोफावणें; be prosperous भरभराट -चलती -उत्कर्ष -चालता काळ असणें;—as a town, country आबादानी -आबाद असणें; use florid language बतावणी क.; make ornamental strokes with the pen भरकांडे -फरकांडे मारणें; vaunt बढाई सांगणें -क.; play with fantastic and irregular motion परजणें, खेळणें.—*t.* बतावून सांगणें, बतावणी क.; अलंकृत-वेलबुट्टेदार क.; परजणें, चमकावणें; विरखडणें, भरकांडे मारणें.—*n.* beauty सौंदर्य *n*, लावण्य *n*; बोलण्याचा भरकांडा, अर्थवाद; भरकांडा, फरगडा; *Mus.* गत *f*, परजणें *n*. -ING टवटवीत, तरतरीत; समृद्ध, संपन्न, आबाद.

FLOUT *v. D.* झिडकावणें, हिडसावणें, तिरस्कारणें.

FLOW* *v. i.* move by the power of gravity, and with a continual change of place, among the particles or parts, as a fluid वाहणें, ओघ चालणें; melt पाझरणें, गळणें, वितुळणें; glide smoothly सुरळीत-अस्खलित चालणें, सरणें; be full, so as to run or flow over भरून चालणें, वाहणें, लोट येणें; hang loose and waving रुळझुळणें, लोंबणें (mantle, locks); rise, as the tide भरती -जोर लागणें; proceed निघणें, येणें; discharge blood in excess from the uterus गर्भाशया पासून अति रक्तस्राव होणें [from, to, in].—*n.* ओघ, प्रवाह, धारा *f*; रेळचेळ *f*, चंगळ *f*;—of tears अश्रुधारा *f*, अश्रुपात;—of words वाक्चापल्य *n*, वाक्सरणी *f*; भर, पूर, भरतें *n*.

FLOWER (*flos*) a circle of leaves or leaflets on a plant, usually of some other color than green फूल *n*, पुष्प *n*; blossom मोहर, फूल *n*; that part of a plant destined to produce seed फूल *n*;—as of grain फुलोरा; the fairest, freshest, and choicest part of any thing निवड *f*, उत्तमांश, शेलका भाग;—of youth भरज्वानी *f*, तारुण्य *n*; a figure of speech वाक्यालंकार; *pl.* menstrual discharges पुष्प *n*, रज *n*;—as carved, painted फुली *f*, बुटे; *Chem.* फूल *n*.—*v. i.* फुलणें, फुलें येणें, विकसणें; भरास येणें.—*t.* फुलें -बूट काढणें, बुट्टेदार क.—FLOWERY *a.* पुष्कळ फुलांचा; पुष्पमय; अलंकारी, अलंकारयुक्त (style): [the f. kingdom, China].

FLUCTUATE *v. i.* (*fluere*, to flow) move as a wave हेलकावा खाणें; be irresolute धरसोड क.; be unsteady एका स्थितीवर नसणें [from, to].—FLUCTUATION हेलकावा, अन्दोलन *n*; धरसोड *f*; चढउतार, अस्थैर्य *n*.

FLUE *F.* धुराडें *n*.

FLUENT *a.* (*fluere*, to flow) वाहता; fluid पातळ; voluble बोलका, जिभेचा चपळ (speaker); flowing सरळ, सुरळीत, अस्खलित (speech). -LY *ad.* चुरचुर, खडखडीत, भराभर (बोलणें-वाचणें).—FLUENCY जिभेचा चपळपणा, वाक्चापल्य *n*; सरळ -सुरळीतपणा.—FLUID *a.* प्रवाही, पातळ, द्रवरूप.—*n.* पातळ-द्रव-प्रवाही पदार्थ. -ITY द्रवता *f*, पातळपणा.

FLUKE, *Ger.* the part of an anchor which fastens in the ground पावडा, कांटा, फाळ.

FLURRY *Provl. Eng.* a sudden blast वाऱ्याचा झटकारा; bustle गडबड *f*, लगबग *f*, धांदल *f*.—*v.* गडबडविणें, धांदल क.

FLUSH* *v.* redden suddenly एकदम लाली आणणें, तांबडालाल क.; elate चढवणें, फुगवणें.—*i.* भडभड -भळभळ वाहणें: blood *flushes* into the face; लाली येणें, तांबडालाल होणें; to f. up joints दरजा क.—*n.* लोंढा, ऊत, लहर *f*; ardor उकळी *f*, हुरशी *f*, कढ; लाली *f*; भय, लाज, राग इ० विकारांचा क्षोभ झाल्यानें तोंडावर उत्पन्न होणारी लाली *f*, काळिमा *f*.—*a.* fresh टवटवीत, तुकतुकीत; affluent संपन्न, श्रीमंत; liberal उदार; prodigal उधळ्या, उडाऊ.

FLUTE (*flatus*, a blowing) a musical wind instrument मुरली *f*, पोंवा; a channel in a pillar खांचणी *f*.

FLUTTER *v. i. D.* flap the wings rapidly फडफडणें, पंख झाडणें; be in agitation व्याकूल होणें, गडबडणें.—*t.* पंख झाडणें; गडबडविणें, धांदल क.

FLUX (*fluere*, to flow) वाहणें *n*; ओघ, प्रवाह; change पालट; concourse जमाव, मेळा; the tide setting in toward the shore भरती *f*; fusion आटणें *n*, गाळणें *n*;—for metals टाकणखार, सवागी इ० धातूचा रस करणारा पदार्थ; *Med.* आमातिसार, रक्तातिसार इ०; to have a f. हगवण लागणें.

FLY* *v. i.* move in the air with wings, as a bird उडणें; float in the air, as the clouds, the sparks तरंगणें, उडणें; — as a flag उडणें, फडफडणें; hasten away जाणें, लवकर निघून जाणें: time *flies*; flee (संकटा पासून) पळून जाणें: the enemy *flies*; part फुटणें, तुकडे होणें; to come off with flying colors जय मिळविणें, फत्तेहोणें, विजयध्वज मिरवीत येणें; at अंगावर तुटून पडणें, घसरणें;—in the face of बेअदबी क.; off तुटणें, तुटून मोकळा होणें; on अंगावर तुटून पडणें, हल्ला क.;—open जोरानें उघडणें; out उघळणें, उसळणें; रागावणें, कातावणें; to let f. सोडणें; जाऊंदेणें [from, to, against].— *n.* a winged insect of various species माशी *f*, मक्षिका *f*. -BLOW, egg of a fly सडी *f*. -CATCHER शिपाई (एक पक्षी आहे). -ING-FISH एक उडणारा मासा आहे. -LEAF बुकाच्या आरंभीचें किंवा शेवटचें कोरें पान *n*. -TRAP माशा धरणारें झाड *n*, मक्षिकाकर्त्तरी झाड *n*.

FOAL* शिंगरूं *n*, शिंगी *f* (गाढवाचें -घोड्याचें).

FOAM* (*Skr. phêna*) फेंस, फेण.—*v. i.* फेणणें, फेसळणें; फेंसानें भरणें.—*t.* फेंसळून काढणें -टाकणें [out].—FOAMY *a.* फेंसाळ, फेणयुक्त.

FOB *Ger.* घड्याळ ठेवण्याचा लहानसा खिसा.

FOCUS (*L.* fireplace) point in which the rays of light meet किरण एकत्र मिळण्याचें स्थान *n*, तेजस्संकर्ष देश; a central point मध्यकेंद्र *n*.—FOCAL *a.* केंद्रसंबंधी.

FODDER* वैरण *f*, चारा.—*v.* वैरण घालणें.

FOE* वैरी, शत्रु.

FŒTUS, See FETUS.

FOG *Icel.* धुकें *n*, धुकट *n*. -GY *a.* धुक्याचा, धुक्यानें भरलेला; dull मंद, स्थूल.

FOH *interj.* इश्श, इश्शो.

FOIBLE *F.* वर्म *n*, छिद्र *n*, उणें *n*; *pl* कर्मे वर्मे *n pl*.

FOIL *v. F.* मोडणें, थकणें, चालेनासा क. [by, in].—*n.* मोड, पराभव; a blunt sword used in fencing बुळी तरवार *f*, पट्टा, बोथाटी *f*, इ०; (*folium*) a leaf or thin plate of metal वर्ख, पत्रा, पान *n*; a coat of metal on a looking-glass आरशाची कल्हई *f*; [a thin leaf of metal, placed under precious stones by jewelers, to increase their brilliancy, or to give them a particular color]; any thing of another color, or of different qualities, which serves to adorn, or set off another thing to advantage कांतिवर्द्धक वस्तु *f*.

FOIST *v. F.* खुपसणें, लाटणें, घुसडणें [on, off, in]. -ER घुसड्या, खुपशा.

FOLD* *v.* lap or lay in plaits घडी क.; double दुमडणें; lay together, as the arms or the hands हात पोटाळणें; envelop गुंडाळणें, वेष्टणें, लपेटणें; confine in a fold कोंडवाड्यांत कोंडणें -घालणें;—a letter लखोटा क., मलफूप क. [together].—*i.* घडी होणें, दुमटणें.—*n.* घडी *f*, पदर; पट: four-f.; embrace मिठी *f*, वेंग *f*; कोंडवाडा. -ING पदर, घडी *f*;—of doors दुतलफी *f*.

FOLIAGE (*folium*, leaf) पानें *n pl*, पालव, पल्लव; new f. पालवी *f*.—FOLIATE *v.* पारा चढविणें, पाऱ्याची कल्हई क.—FOLIO, a sheet of paper once folded दुबंदी कागद; book made of sheets of paper each folded

once दुंड्याचें पुस्तक *n*; page in an account-book चोपडीचें पान *n*.—*a*. दुबंदी, दुबंदी कागदाचा.

FOLK* लोक *pl*, आलमदुनिया *f*.

FOLLOW* *v*. go or come after मागून जाणें -येणें -चालणें; go in pursuit of पाठीस लागणें;—accept, as authority आदरणें, प्रमाण माननें; obey माननें, ऐकणें; embrace स्वीकारणें, आदरणें; imitate अनुसरणें, अनुकरण क., कित्ता घेणें; succeed in order of time मागून -नंतर येणें -होणें; accompany संगती -बरोबर जाणें; result from, as an effect from a cause निष्पन्न होणें, निघणें; understand the meaning, connection, or force of, as a course of thought or argument अर्थ -अन्वय -संदर्भ समजणें; attend upon closely, as a profession धंधा क., वृत्ति चालविणें [from, to, in, after]. -ER मागून जाणारा येणारा, अनुगामी; disciple शिष्य; dependant चाकर, सेवक; ताबेदार; अनुयायी, अनुसारी. -ING *a*. पुढचा, पुढील.

FOLLY, See under FOOL.

FOMENT *v*. (*fovere*, to warm) apply warm lotions to शेक देणें, शेकणें; abet वाईट कामांत मदत क., फूस देणें. -ATION शेकणी *f*, शेक; फुसलावणी *f*, शिकवणी *f*, उठावणी *f*.

FOND *a*. *Icel*. relishing highly -चा आवडता, शौकी, लंपट; much pleased संतुष्ट, खुश; tender ममताळू, स्नेहाळू [of]. -NESS प्रीति *f*, ममता *f*, लळा; आवड *f*, चाड *f*.—FONDLE *v*. गोंजारणें, कुरवाळणें, लाड क.—FONDLING फार लाडका.

FONT (*fons*, fountain) झरा; बाप्तिस्म्याचें पाणी ठेवण्याचें पात्र *n*; [a complete assortment of printing types of one size].

FONTANEL *F*. vacancy in the infant cranium ताळू *f*; issue for the discharge of humors from the body पोत *f*.

FOOD* अन्न *n*, भक्ष्य *n*, खाणें *n*; undressed f. शिधा; heavy f. जडान्न; — of granivorous animals चारा; coarse or bad food कदन्न *n*; the usual quantity of f. आहार; f. and raiment पोटभर अन्न अंगभर वस्त्र [for].

FOOL *F*. an idiot वेडा, वेडगळ; a dunce मूर्ख, टोणपा, मंदबुद्धि; *Scrip*. wicked person दुष्ट मनुष्य; a professional jester मस्क-या, हंडीबाग; *fool's* errand हिसका; to go on a f.'s errand पायांची वळ भागविणें; to put on the f. वेडा ठरविणें, वेड्यांत काढणें; a learned f. पढतमूर्ख; to make a f. of झकवणें, भोंदणें, धाब्यावर बसवणें; to make a f. of one's self नकशा गमावणें, झकमारणें; to play the f. वेडेचार क. -ISH *a*. मूर्ख, वेडा, खुळा; मूर्खपणाचा, बेवकुबीचा (act); दुष्ट; ridiculous थट्टा करायाजोगा, उपहासास्पद. -HARDY *a*. उफराट्या काळजाचा. — FOOLSCAP [so called from the water-mark of a *fool's cap and bells* used by old paper-makers] एक जातीचा कागद आहे, 'फुलीसकेप.'

FOOT (*Gr. pous*, *Skr. padas*) the extremity below the ankle पाय, चरण, पाद;—of a table पाय, खूर; foundation पाया, तळ, बुडखा; a measure of 12 inches 'फूट' *f*; foot-soldier पायदळ *n*, प्यादा;—of a verse चरण; on f. पायीं; cubic f. घन फूट; to set on f. चालू क., उभारणें. -BALL पायानें उडवून खेळायाचा चेंडू. -BOY खिदमतगार, पोऱ्या, पोरगा. -FALL पायरव, चरणपात. -ING, ground for the foot पाय टेकणें *n*, पावठा; firm foundation to stand on थारा, आधार; permanent settlement व्यवस्था *f*, बंदोबस्त; firm position पगडा, पायशीरकाव; condition स्थिति *f*; tread to measure पाऊल *n*, कदम *n*; act of putting a foot to any thing पाय लावणें -जोडणें *n*; act of adding up a column of figures बेरीज क. *n*; to get f. पगडा पडणें,

धालणें, जडणें. -MAN प्यादा; खिदमतगार, चाकर. -MARK पाऊल *n*, पदचिन्ह *n*. -NOTE पृष्ठाच्या तळाचें टिपण *n*. -PAD वाटमाऱ्या. -PATH पाऊलवाट, पायवाट *f*. -PRINT पाऊल *n*, पदचिन्ह *n*. -STALK देट, डेंख. -STEP पाऊल *n*; token खूण *f*, चिन्ह *n*. -STOOL पीठ *n*, पादासन *n*.

FOP *Ger.* अकडबाज, कुरेंबाज. -PERY अकडबाजी *f*, छानछुकी *f*.

FOR *prep.* (*pro, Skr. pra*) in the place of जागीं, स्थानीं, बदल; concerning विषयीं; because of मुळें, साठीं, करितां, स्तव; toward कडे: a ship is bound f. China; for the sake of करितां, स्तव, प्रीत्यर्थ: is the world made f. me? in spite of; generally followed by all, aught, anything, &c. हटकून, न ऐकतां: he will do what she pleases *for* all me; notwithstanding असें असतांही, जरी: f. any thing that legally appears to the contrary; during a certain time पर्यंत, आंत, मध्यें, भर: f. a day; f. life ताहयात, जन्मभर, आमरण; in favor of पक्षाचा, वांटचा: he is f. a free government; noting meeting: I am ready f. you मी तुझास भेटायास तयार आहें; as if जसा, सारखा: he showed himself f. dead; he looks f. me तो माझी वाट पाहतो; f. my part मला जर विचारा; f. as much ज्यापेक्षां, ज्या अर्थी; f.-ever निरंतर, सर्वकाल; O f. जर असतें तर किती बरें होतें; मिळो; O f. a muse of fire!—*conj.* साठीं, करितां, म्हणून; ज्या अर्थी -पेक्षां.

FORAGE *F.* घांसदाणा, वैरण *f*.[for]. — *v.* घांसदाण्यासाठीं फिरणें; घांसदाण्यासाठीं देश लुटीत फिरणें, कही घेणें -क., लुटून खाणें.

FORBEAR* *v. i.* refrain from proceeding थांबणें, राहणें; refuse न मानणें, न ऐकणें.—*t.* give up सोडणें, टाकणें: to f. the use of a word; bear with सोसणें, वागविणें, संभाळून घेणें. -ANCE थांबणें *n*, राहणें *n*; long-suffering सहनशीलता *f*, क्षमा *f*; exercise of patience धीर धरणें *n*, धीर, दम, गम.

FORBID* *v.* prohibit मनाई -बंदी क.; command not to enter आंत जाण्याची -येण्याची मनाई -प्रतिबंध क.: I have *forbidden* him my house; oppose आडवा येणें, अथडळा -प्रतिबंध क.; God f. ईश्वर न करो. -DEN मना केलेला, निषिद्ध. -DING *a.* त्रासजनक, कंटाळवाणा, अनिष्ट.

FORCE (*fortis*, strong) बळ *n*, जोर *n*, *f*; an unusual degree of strength or energy तेज *n*, वीर्य *n*, शक्ति *f*; violence बळजोरी *f*, जुलूम; special signification विशेष अर्थ; validity बळकटी *f*, जीव, वजन *n*: f. of an argument; *pl.* troops फौज *f*, सैन्य *n*; *Law*, strength or power exercised without law, or contrary to law, upon persons or things जुलूम, जबरी *f*, बलात्कार; *Physics*, any action between two bodies which changes, or tends to change, their relative condition as to rest or action वेग, शक्ति *f*: the f. of gravity;—of habit कर्मवेग; moral f. बुद्धिबळ *n*;—of a disease, of winds, &c. झपाटा, वेग, बळ *n*, रग *f*;—in f. चालू, उपयोगी.—*v.* जुलमानें -जबरीनें करायास लावणें, जबरी क.: masters f. their slaves to labor; ravish बलात्कार क., दपटणें, हटसंभोग क.; capture by assault हल्ला करून घेणें; drive, wrest, get, &c. by violence दामटणें, दपटणें, ढकलणें [along, away, from, into, through, out, &c.]; strain ओढून ताणून आणणें -काढणें -क. (conceit);—a passage दपटून शिरणें -रिवणें, घुसणें.—FORCIBLE *a.* बळकट, जोराचा, प्रबल; जुलमाचा, जबरीचा; जबरीनें मिळविलेला.—FORCIBLY *ad.* जोरानें, बळानें; जुलमानें.—FORCING, *Gardening*, अवकाळीं -कृतीनें फळफळावळ उत्पन्न क. *n*.

FORCEPS (*L.*) चिमटा ;—of the goldsmith सवाणा.

FORD * a shallow part of a river उतार, पायउतार ; a stream ओहळ. -ABLE *a.* पायांनीं उतराया जोगता.

FORE * *a.* advanced in place पुढला, पुढील, समोरचा, अग्र ; advanced in time अगोदरचा, पूर्वीचा, पूर्व ; advanced in order पहिला, प्रथम, पूर्व : f. part of a writing.—*ad.* पूर्वभागीं. -ARM कोपर आणि मणगट यांच्या मधला हाताचा भाग, हात. -BODE *v.* पूर्वी सांगणें, भविष्य सांगणें ; be prescient of, as of a calamity which is to happen येणार संकटा विषयीं प्रबोधित होणें, अरिष्टाची अगा असणें. -CAST *v.* plan before execution अगोदर बेत करून ठेवणें ; foresee अगोदर पाहणें, तजवीज क.—*n.* पूर्वीचा बेत, पूर्वयोजना *f* ; तजवीज *f*, दीर्घदृष्टि *f*. -CASTLE गलबताचा समोरचा भाग. -FATHER पूर्वज, वडील. -FINGER हाताच्या अंगठ्या जवळचें बोट *n*, तर्जनी *f*. -FOOT जनावरचा पुढला पाय. -GO *v.* quit सोडणें ; relinquish the enjoyment or advantage of -चा उपभोग -लाभ सोडणें ; go before पुढें जाणें. -HEAD कपाळ *n*, ललाट *n*. -LOCK टाळूवरचे केंस *pl* : to take time by the f., to make prompt use of any thing ; not to let slip an opportunity वेळ साधून घेणें. -MAN प्रमुख, पुढारी ; overseer कारभारी, चौकसनीस ;—of a jury सरपंच, जुरीचा पुढारी, मीर मजलीस *f*. -MAST पुढली डोलकाठी *f*. -MOST *a.* सर्वांपुढचा, अग्रवर्ती. -NAME, name that precedes the family name or surname आड नांवाच्या पूर्वीचें नांव *n*. -NAMED *a.* पूर्वोक्त, मशारनिल्हे. -NOON सकाळ *f*, दुपारचे पूर्वीची वेळ *f*, पूर्वान्ह *f*. -RUNNER पुढें धावणारा जासूद, अग्रदूत ; prognostic पूर्वचिन्ह *n*, लक्षण *n*. -SEE *v.* अगोदर पाहणें -समजणें ; भविष्य समजणें. -SHADOW पूर्वी प्रतिरूप दर्शविणें. -SIGHT दूरदृष्टि *f*, दीर्घदृष्टि *f*, दूरवरचा विचार. -SKIN अग्रत्वचा *f*, टोपी *f*, शफा *f*. -STALL, take in advance पूर्वी घेणें ; anticipate अगा-अवली साधणें ; preoccupy दुसऱ्याच्या अगोदर किंवा दुसऱ्यास वर्जून अगोदर उपभोग घेणें ; to f. the market बाजारांत येण्यापूर्वी खरीद क. (महाग विकण्यासाठीं माल). -TASTE पूर्वानुभव, पूर्वरूचि *f*. -TELL *v. i.* भाकीत क. -सांगणें, भाकणें.—*t.* -चें भाकीत सांगणें, होण्यापूर्वी सांगणें. -THOUGHT पूर्वविचार ; anticipation अटकळ *f*, अगा *f*. -TOOTH चौकटीचा दांत. -WARN *v.* पूर्वी सुचविणें, अगोदर ताकीद देणें -क.

FOREIGN (*foras*, abroad) not of one's country परदेशचा, परकीय ; remote दूरचा ; extraneous बाहेरचा, बहिर्भूत. -ER परदेशीं, परदेशाचा मनुष्य, परकी.

FOREST *F.* an extensive wood रान *n*, अरण्य *n* ; a royal hunting-ground राजक्रीडा वन *n*, राजाच्या शिकारीची जागा *f*.—*a.* वनाचा, वन्य, अरण्य ; f. law बनरक्षण करण्याचा कायदा. -ER वनरक्षक, बनकरी ; a sylvan वनवासी ; a forest-tree वनवृक्ष.

FOREVER *ad.* निरंतर, सर्वकाल, नित्य ; at all times सर्वदा, हमेश, रोज.

FORFEIT *v.* (*foris*, out of doors, *facere*, to do) अपराध करून गमावणें, दंड देणें, दंडास जाणें.—*n.* दंड, गुन्हेगारी *f*. -URE दंड -गुन्हेगारी देणें *n* ; an estate forfeited दंडांत गमाविलेली जिनगी *f* ; a fine दंड [for].

FORGE *F.* a smithy लोहाराची भट्टी *f* ; a workshop दुकान *n*, साळ *f*.—*v.* form by heating and hammering तावून व ठोकून घडणें, घडणें ; form घडणें, डौल -रूप देणें ; make falsely बनाऊ -खोटा क.—FORGED *a.* खोटा, बनावट.—FORGERY, the crime of fraudulently making or altering a writing, to the prejudice of another's right बनावट कागद करण्याचा अपराध ; the making of a thing in imitation of another thing

with a view to deceive and defraud बनावट नाणें वगैरे क. *n.*

FORGET* *v.* lose the remembrance of विसरणें, विसर पडणें: bless the Lord, O my soul, and f. not all His benefits (Ps. ciii. 2); neglect उपेक्षा -अव्हेर क., विसरणें; [to f. one's self, to be guilty of that which is unworthy of one; to commit an oversight]. -FUL *a.* विसराळू, विसऱ्या; careless गफलत्या, धांदल्या; causing to forget विसर पाडणारा, विस्मृतिकारक -जनक (wine) [of]. -NESS विसराळूपणा, विसर, विस्मृति *f*; गफलत *f*, धांदल *f*.

FORGIVE *v.* * give up resentment or claim to requital on account of, as an offence or wrong -ची माफी क., सूट देणें, अपराध क्षमा क.: f. old faults, cease to feel resentment against on account of wrong committed क्षमा क., माफ क., -ची क्षमा क.: I f. you. -NESS सूट *f*, माफी *f*; क्षमा *f*, क्षमाशीलता *f*.

FORK (*furca*) forkation नांगें *n*, दुबेळकें *n*, बेचकें *n*; table f. काटा;—of a road फांटा;—of a river, the place where separation takes place फांटा;—the place where union takes place संगम; a point टोंक *n*, नोक *f*.—*v. i.* फांकणें, फांदीस येणें; दोन फांटे फुटणें.—*t.* नांगीनें उचलणें; dig and break with a fork, as ground बेळक्यानें जमीन खणून फोडणें, कुळवणें? -ED *a.* दुफाट्यांचा, बेळक्याचा, द्विशाख.

FORLORN* *a.* deserted सोडलेला, टाकलेला, त्यक्त; helpless निराश्रित, अनाथ.

FORM (*forma*) shape आकार, आकृति *f*; the outline of the person शरिराची मूस *f*, रूपरेषा *f*; particular disposition of matter बांधा, घडण *f*; external appearance डौल, आकार, रूप *n*; image प्रतिमा *f*; constitution नीति *f*, रीत *f*, प्रकार: a republican f. of government; formula पद्धत *f*, परिपाठ; conventional ceremony रीत *f*, संस्कार, उपचार, आदरसत्काराची रीत *f*; show without substance पोकळ डौल: f. of justice; beauty रूप *n*, सौंदर्य *n* (Is. liii. 2); mould सांचा, नमुना; bench बांक; rank of students in a school वर्ग; seat or bed of a hare सशाची बसायाची जागा *f*; *Print.* type from which an impression is to be taken, arranged and secured in a chase 'फर्मा'; as of an official paper दस्तूर;—of a verb or noun रूप *n*.—*v.* घडणें, रूप देणें, आकारणें, करणें (Gen. ii. 7); train शिकविणें, वळण लावणें; education *forms* the mind; go to make up करणें, असणें, अंशभूत असणें: they *formed* the majority;—as an estimate आकारणें, अजमासणें [out of, into, from]; रूप घेणें;— as the hand in writing, &c. वळणें. -AL *a.* आकृतीचा, रूपाचा; essential स्वाभाविक, मूळचा; done in due form यथापद्धत -मार्ग; according to form रीतीचा, दस्तूरमाफक, यथाविधि; वरवरचा, बाहेरचा, कोरडा, वरपंकी (worship, duty). -IST *a.* कर्मनिष्ठ; बाह्योपचारी. -ALITY कायदेशीरपणा, यथामार्गता *f*; रीत *f*, चाल *f*; आदर, सत्कार; essence तत्त्व *n*, अवयवभूत पदार्थ. -ALLY *ad.* रीतीनें, यथापद्धत; आदरसत्कारानें; नीट, बराबर. -ER करणारा, कर्त्ता, घडणारा, रचणारा.—FORMULA पद्धति *f*, रीत *f*. -RY पद्धति -सूत्रग्रंथ; prescription रोग्यास देण्याच्या औषधाची याद *f*.

FORMER* *a.* preceding in order of time पहिला, प्रथम, पूर्व; long past प्राचीन, जुना, पूर्वीचा, गत (ages); first mentioned पूर्वोक्त, मागला. -LY *ad.* मागें, पूर्वी, जुन्या काळीं; पहिल्यानें, अगोदर.

FORMICATION (*formica*, ant) *Med.* a sensetion of the body resembling that made by the creeping of ants on the skin मुंग्या *pl*, हुळहूळ *f*.

FORMIDABLE *a.* (*formidare,* to fear) भयंकर, भयउत्पादक -जनक [to].

FORNICATE *v.* (*fornix,* a brothel) शिंदळकी क. —FORNICATION, the incontinence of an unmarried person, male or female अविवाहित स्त्रीचें किंवा पुरुषाचें जारकर्म *n*; criminal conversation of a married man with an unmarried woman अविवाहित स्त्रीशीं विवाहित पुरुषाचा सदोषसंग; lewdness शिंदळकी *f*, जारकर्म *n*; *Scrip.* adultery व्यभिचार; incest अगम्यगमन *n*; idolatry मूर्त्तीपूजा *f*.—FORNICATOR अनूढागामी; शिंदळ, रांडबाज.—FORNICATRESS, -TRIX अनूढव्यभिचारिणी *f*; शिंदळ बायको *f*.

FORSAKE* *v.* सोडणें, टाकणें, त्यागणें, वर्जणें.

FORSOOTH* *ad.* तर खरा, तर होय, खचीत.

FORSWEAR* *v.* reject upon oath शपथ घेऊन -वाहून सोडणें; deny upon oath शपथ वाहून नाकारणें;—one's self खोटी शपथ क. -खाणें -घेणें.—*i.* खोटी शपथ घेणें.

FORT (*fortis,* strong) किल्ला, कोट, दुर्ग; town belonging to a f. पेठ *f*; wall of a f. कोट. -RESS कोट, गढी *f*.—FORTIFY *v.* तटबंदी -कोटबंदी क.; add strength to बळकट क., जोर आणणें; confirm स्थिर -दृढ क. [with, by, against]. —FORTIFICATION तट -कोटबंदी *f*; the art of fortifying दुर्ग प्राकारादि रचनाविद्या *f*; a fortified place कोट.

FORTITUDE (do.) that strength or firmness of mind which enables a person to encounter danger with coolness and courage, or to bear pain or adversity without murmuring, depression, or despondency मनस्थैर्य *n*, धैर्य *n*, धीर, छाती *f*.

FORTH* *ad.* forward पुढें; out बाहेर; abroad बाहेर; so f. इत्यादि, वगैरे [from]. -COMING *a.* तयार, सिद्ध, हाजीर. -WITH *ad.* लागलाच, तत्क्षणीं, तेव्हांच.

FORTNIGHT (contracted from *fourteen nights*) पंधरवडा, पक्ष.

FORTUITOUS *a.* (*fors,* chance) दैववटित, आगंतुक.—FORTUITY दैवयोग.—FORTUNE, personified or deified power regarded as determining human success, sharing happiness and unhappiness, and distributing arbitrarily or fortuitously the lots of life दैव *n*, नशीब *n*; that which falls to one as his lot in life दैवप्राप्त वस्तु *f*; estate मत्ता *f*, वित्तविषय; great wealth संपत्ति *f*, दौलत *f*, गजांतलक्ष्मी *f*; appointed lot in life दैवाचा वांटा, लाभालाभ, भोग; good f; सुदैव *n*; bad f. दुर्दैव *n*. -BOOK शकुनवंती *f*, -HUNTER धनवान स्त्रीशीं लग्न करून सधन होऊं इच्छिणारा. -TELLER दैव सांगणारा, डाकोता जोशी, दैवज्ञ, पिंगळा.—FORTUNATE *a.* भाग्याचा, दैववान्; coming by good luck दैवानें प्राप्त झालेला, सुभाग्याचा; auspicious शुभ, मंगलदायक. -LY *ad.* दैवानें, दैवयोगानें.

FORTY* *a.* चाळीस.—*n.* चाळीसाचा अंक; चाळिसाची संख्या *f*; an aggregate of f. चाळिसी *f*.—FORTIETH *a.* चाळिसावा.

FORUM (*L.*) न्यायाधिशाची कचेरी *f*, कोडत *n*; [a market-place in Rome, where causes were judicially tried, and orations delivered to the people].

FORWARD -S* *ad.* पुढें. —FORWARD *a.* पुढचा; less reserved or modest than is proper उद्दाम, निर्भीड, धीट; ardent उत्कंठित, उत्सुक; advanced beyond the usual degree पुढें गेलेला, सारलेला; too hasty उतावळा, अधीर. —*v.* send onward पुढें पाठविणें, पेंड पोंचवणें; advance वाढविणें, वृद्धि क., योग्यतेस चढविणें [from, to]. -NESS उत्कंठा *f*, उत्सुकता *f*; निर्भिडपणा, धिटाई *f*; prematureness काळाच्या पूर्वीची पक्वता *f*.

FOSSE (*F.*) खंदक.

FOSSIL *a.* (*fodere,* to dig) जमिनींतून खणून काढलेला; जमिनींतून काढलेल्या पदार्था सारखा; changed into stone दगड झालेला (shells). —*n.* जमिनींतून खणून काढलेला पदार्थ, उत्खात द्रव्य *n.*

FOSTER* *v.* nourish पोसणें, पाळणें; cherish बाळगणें, बागवणें (passion). -BROTHER, a male nursed at the same breast, or fed by the same nurse, but not the offspring of the same parents दूधभाऊ. -CHILD पोसणा मुलगा -मुलगी *f.* -ER पोसणारा, पोशिंदा, पालक. -FATHER पालक बाप, धाता. -MOTHER पालक आई *f,* धात्री *f*; nurse दाई *f.* -SON पालक पुत्र, पालक बेटा.

FOUL* *a.* (*Skr. puj,* to be putrid) filthy मळका, मळीण (cloth); obscene बिभत्स, अभद्र, अवाच्य (words); cloudy वाऱ्यावादळाचा, अभ्रें आलेला, ओंधट (weather); loathsome ओंगळ, घाणेरडा (disease); not favorable अप्रतिकूल, उलटा (wind); dishonest अप्रामाणिक, कपटी, कुटिल (play); entangled गुरफाटलेला, गुतागुत झालेला: a rope is f.; a f. copy खरडा, मसुदा; to fall f. भांडणें, हमरीतुमरीवर येणें; to run or fall f. of एकमेकावर घसरणें -पडणें.—*v.* मळवणें, मळकट क.; गुतविणें, गुतागुत क.—*i.* गुंतणें, गुरफाट्यांत पडणें; आदळणें, आपटणें, घांसणें: the two boats *fouled.* -MOUTHED *a.* तोंडाचा फटकळ, तोंडाळ, तोंडास कुत्रें बांधलेला.

FOUND *v.* (*fundare*) lay the basis of पाया घालणें; establish स्थापणें; fix firmly घट्ट बसविणें, कायम क.; take the first step in erecting or building up पाया घालणें, बांधणें, उठवणें; establish on a basis पायावर स्थापणें, प्रतिष्ठा क. [on]. -ATION स्थापना *f,* स्थापन *n*; पाया; footing आधार, थारा, आश्रा; endowment धर्मादाय, सदोदित धर्मादाय चालण्यासाठीं जमविलेलें द्रव्य *n.* -ER स्थापणारा, संस्थापक;—of a family मूळपुरुष.

FOUND *v.* (do.) धातूचा रस करून सांच्यांत ओतणें, ओतणें. -ER ओतारी. -RY धातु ओतण्याची कला *f* -क्रिया *f*; धातूचा रस ओतण्याचा कारखाना.

FOUNDER *v. i.* (do.) पाणी भरून बुडणें, पाण्यांत गर्क होणें; stumble and go lame, as a horse अडखळून पडून लंगडा होणें -लंगडत जाणें -चालणें. — *t.* (घोड्याचा) पाय सुजवून अधू क. -लंगडा क.

FOUNT, -AIN (*fons*) a spring झरा; a jet कारंजें *n,* फवारा; first cause मूल *n,* आदिकारण *n,* खाण *f,* उगम, झरा.

FOUR* *a.* चार. -FOLD *a.* चौपट, चतुर्गुण. -FOOTED *a.* चार पायांचा, चतुष्पाद. -SCORE चारविसा, ऐंशी. -SQUARE *a.* चौकोनी. -TEEN *a.* चौदा. -TEENTH *a.* चौदावा—FOURTH *a.* चौथा, चतुर्थ. -LY *ad.* चौथ्या वेळीं, चौथ्यानें, चौथेंदा.

FOWL* a bird पांखरूं *n,* पक्षी; a cock or hen कोंबडें *n.*—*v. i.* पांखरांची पारध क. -ING पांखरपारधी, फांसेपारधी, व्याध. -ING-PIECE पांखरांच्या शिकारीची बंदूक *f,* शिकारी बंदूक *f.*

FOX* कोल्हा, खोकड; a cunning fellow धूर्त्त गडी -माणूस. -HOUND कोल्ह्याची पारध करणारा कुत्रा.

FRACTION (*frangere,* to break) तुकडा, अंश; *Arith.* अपूर्णांक; compound f. प्रभागजाति अ०; vulgar f. व्यवहारी अ०; proper f. सम अ०; decimal f. दशांश अ०. -AL *a.* अपूर्णांकाचा.—FRACTIOUS *a.* तुसडा, तुटसाळ (man).—FRACTURE फुटणें *n,* भंग; भेग *f,* फूट *f,* चीर *f*; *Surg.* breaking of a bone अस्थिभंग; [compound f., a f. in which there is an open wound from the surface down to the f.; simple f., a f. in

which only the bone is divided].—FRAGILE *a.* फुटीर, नाजूक, भंगशील. — FRAGILITY फुटीरपणा, भंगुरता *f.*—FRAGMENT तुकडा, खंड, चूर ; an imperfect part अपूर्ण अंश, भाग.

FRAGRANT *a.* (*fragrare,* to emit a smell) सुवासाचा, सुवासिक.—FRAGRANCE सुवास, सुगंध.

FRAIL *a.* (*frangere,* to break) easily broken फुटीर, तुटीर, फुसका ; weak अशक्त, नबला ; weak in resolution अस्थिर, चंचलबुद्धि. —FRAILTY फुटीरपणा ; अस्थिरबुद्धि *f* ; अशक्तता *f,* दौर्बल्य *n* ; a f. चूक *f,* चुकून घडलेली गोष्ट *f.*

FRAME* *v.* construct रचणें, करणें, बांधणें (a house); plan बेत क., योजना क. ; fabricate थोतांड रचणें, रचणें ; adjust जम -जवा बसविणें ; regulate बेतानें चालवणें, वर्त्तवणें ; provide with a frame चौकट बसविणें -घालणें.—*n.* बांधणी *f,* रचना *f,* घटना *f* ; —as of a picture, window, door, &c. चौकट *f,* घर *n,* सांचा ;—of a building मांडणी *f* ;—of a drum, &c. गाडा, खोड *n* ; the bodily structure शरिराची काठी *f* ; skeleton सांपळा, सांगाडा, खटारा ; scheme बेत, रचना *f,* बंधारण *n* ; particular state, as of the mind तबियत *f,* प्रकृति *f.* -WORK चौकट *f,* सांचा.

FRANCHISE *F.* particular privilege conferred by grant from a sovereign or a government सरकारानें दिलेला हक ; an immunity from ordinary jurisdiction सूट *f,* माफी *f* ; limits of an immunity माफीची हद्द *f* ; an asylum आश्रय, आसरा. —*v.* मोकळा क., सूट देणें.

FRANGIBLE *a.* (*frangere,* to break) तुटीर; फुटीर, भंगशील.

FRANK *a. F.* मोकळ्या मनाचा, प्रांजल, साफ ; licentious बेकैद, स्वच्छंदी.—*v.* send by public conveyance free of expense सरकारी जहाज -गाडी वगैरेंतून फुकट पाठविणें: to f. a person to London ; exempt from charge for postage, as a letter पत्राच्या हाशिलाची माफी क. -LY *ad.* निष्कपटानें, मन मोकळें करून. -INCENSE ऊद, धूप.

FRANTIC *a.* (*Gr. phren,* mind) mad वेडा, कावराबावरा, तग्रवग्र ; wild वेडावांकडा, भलताच, स्वच्छंदाचा (abuse).

FRATERNAL *a.* (*frater,* brother) भावांचा, बधूचा, बंधु, in comp.: f. love बंधुप्रीति *f.*— FRATERNITY भाऊपणा ; a community of men of the same class एका वर्गाचे लोक *pl,* मंडळी *f,* शाई *f.*—FRATERNIZE *v.* बंधुप्रीतीनें -भाऊपणानें एकत्र जमणें -मिळणें.—FRATRICIDE बंधुहत्या *f.*

FRAUD (*fraus*) deception deliberately practised with a view to gaining an unlawful or unfair advantage कपट *n,* ठकबाजी *f,* दगलबाजी *f* ; fraudulent procedure दगलबाजीचा व्यापार, कपटी वर्त्तणूक *f.* -ULENCE ठकबाजी *f,* कापट्य *n.* -ULENT *a.* कपटी, दगेखोर ; कपटाचा, दगाबाजीचा (bargain) ; कपटानें मिळविलेला (conquest).

FRAUGHT *a. Ger.* भरलेला, पूर्ण, भरपूर.

FRAY (See AFFRAY) भांडण *n,* कलागत *f,* कलह. —*v.* (*fricare,* to rub) घांसणें, घर्षणें ; wear off by rubbing घांसून झिजविणें -जीर्ण क.

FREAK * लहर *f,* हुक्की *f,* तरंग. -FUL, -ISH *a.* लहरी, छंदी, तबियती.

FREE* *a.* (*Skr. prija,* beloved) exempt from subjection to the will of others स्वाधीन, स्वतंत्र, स्वेच्छ ; not under an arbitrary or despotic government मोकळा, सुटा, व्यवहार -धर्मसंबंधी गोष्टींत राजापासून मोकळीक भोगणारा ; liberated, by arriving at a certain age, from the control of parents, guardian, or master मोकळा, स्वतंत्र, वयांत आलेला, दास्यत्वांतून सुटलेला,

इ० ; not confined, liberated सुटा, मुक्त, मोकळा, खुला ; endowed with moral liberty ;—said of the will स्वतंत्र, स्वेच्छाधीन ; guiltless निर्दोष, दोषरहित, मुक्त : my heart is f. ; frank, familiar मनाचा मोकळा, खळबळीत : he was f. only with a few ; licentious स्वच्छंदी, बेकैद, मोकळा ; liberal मोकळ्या हाताचा, सढळ, उदार ; separated अलग, मोकळा, विभक्त, सुटा ; exempt मोकळा, रहित [from, of] ; easy सुलभ, हलका ; thrown wholly open or made entirely accessible सर्वांस मोकळा, सर्वांनीं वापरायाचा, मुक्त : the streets are f. for me ; gratuitous फुकट, बिन पैशाचा (admission) ; not arbitrary or despotic कायद्या प्रमाणें चालणारा, निर्बंधाचा (government, institution) ; defending individual rights against encroachment by any person, or class मनुष्याच्या हक्काचें रक्षण करणारा (government);—as land माफी ;—as letters बेमहसूल.—*v.* मोकळा क., बंदखुलास क. ; सोडणें, माफी क. ; प्रतिबंधांतून -अटकावांतून काढणें [from, of]. -BOOTER लुटारू, पुंड. -BORN जन्मापासून स्वतंत्र. -DOM मोकळेपणा, स्वातंत्र्य *n* ; franchise मुभा *f*, सूट *f*, माफी *f* ; मनाचा मोकळेपणा, प्राशस्त्य *n* ; खळबळीत -घळघळीतपणा ; हातवटी *f*, कसरत *f* ; बेकैदपणा, अमर्यादपणा, निरंकुशता *f*. -HOLD वतन *n*, मिरास *f*. -LY *ad.* मोकळेपणानें ; सढळपणानें ; खळबळीतपणानें ; पुष्कळ, अतिशय ; फुकट, मोलावांचून (Matth. x. 8) ; खुशाल, स्वस्थ, बेलाशक. -MAN जो दुसऱ्याचा दास किंवा ताबेदार नव्हे तो, स्वतंत्र मनुष्य ; one who enjoys or is entitled to a franchise or peculiar privilege विशेष हक्क भोगणारा मनुष्य. -MASON एक गुप्त मंडळी आहे तिचा सभासद *n*. -MASONRY त्या मंडळीचे नियम, मतें इ०. -THINKER ईश्वरोक्त शास्त्र न मानणारा, नास्तिक, चार्वाक. -WILL, a will free from improper coercion राजी *f*, खुशी *f*, स्वतंत्र इच्छा *f*, स्वसंतोष ; the power asserted of moral beings of choosing or willing without the restraint of natural or physical necessity स्वेच्छाकर्तृत्व *n*, मुखत्यारी *f* ; doctrine of f. पौरुषवाद.—*a.* आपखुशीचा, स्वसंतोषाचा.—FREEDMAN दास्यत्वांतून मुक्त केलेला मनुष्य.

FREEZE* *v. i.* become congealed by cold गोठणें, गारठणें, थिजणें ; become chilled with cold थंडीनें गारवठणें, थंड होणें.—*t.* गोठविणें ; थंडी भरविणें, सर्द क.

FREIGHT (See FRAUGHT) cargo भरताड *n*, बारदान *n* ; that which is paid for the transportation of merchandise नोर, भाडें *n*. — *v.* गलबतावर किंवा गाडींत माल भरणें ; load लादणें, भरती क. [with].

FRENCH *a.* (*Franci*) फ्रान्स देशाचा, फ्रेंच लोकांचा.—*n.* फ्रेंचभाषा *f* ; फ्रेंचलोक *pl*, फराशीस *pl*.

FRENZY (See FRANTIC) वेड *n*, उन्माद, कावरेबावरेपणा.

FREQUENT *a.* (*frequens*) often to be met with वारंवार भेटणारा -मिळणारा, वारंवारचा, नित्य ; inclined to indulge in any practice सराव -अभ्यास ठेवणारा, नित्य आचरणारा. *v.* वारंवार जाणें -येणें, जाण्याचा राबता असणें. -LY *ad.* वारंवार, पुनःपुनः.—FREQUENCY पौनःपुन्य *n*.

FRESH* *a.* new and strong ताजा, ताजातवाणा ; lately produced, gathered, or prepared for market नवा, कोरा, ताजा (goods);—as meats, vegetables ताजा, साजूक ; lately come or made public नवा, आलीकडचा, नवसर (news) ; recently taken from a well or spring ताजा, थंड (water) ; unpractised नवा, नवशिका, राबलेला नाहीं असा : a f. hand in a ship ; cool थंड, शितळ (wind) ; not salt गोडा (water) ; in distinction from that which is pickled,

as meat ताजा, न खारलेला; as plants टवटवीत, लुसलुसीत; brisk ताजा, हुशार.—*n.* a pool of fresh water गोडे पाण्याचा झरा -चें कुंड *n*; a flood पूर, लोंढा, रेल; [the mingling of fresh water with salt water in rivers or bays, as by means of a flood of fresh water flowing toward or into the sea]. -EN *v.* ताजा -गोडा क., खारटपणा काढणें (water). — *i.* गोडा होणें, खारटपणा गमावणें -जाणें. -MAN नवशीक, नवा; [a student during his first year's residence at a college]. -NESS ताजेपणा, साजूकपणा; गोडी *f*; टवटवी *f*, तुकतुकी *f*, पाणी *n*; हुशारी *f*, तेजी *f*;—of the air गुलाबी थंडी *f*.

FRET* *v.* rub चोळवटणें, घांसणें, चोळणें, (cloth); wear away झिजविणें, जीर्ण क.; variegate चित्रविचित्र क., नवा रंग देणें: gray lines that f. the clouds; ornament with raised work कशिदा -वेलबुट्टी काढणें; disturb ढवळणें, क्षुब्ध क.; हलवणें, चाळवणें: to f. the surface of water; tease चिढवणें, खिजवणें;—one's self कुसमुसणें [at, for]. —*i.* झिजणें, घांसटणें; क्षोभणें, ढवळणें; fume धुसमुसणें, चिवचिवणें; as the skin through a blister तडतडणें.—*n.* खळखळ *f*; चिरड *f*, खिजवणी *f*; कुसमूस *f*, कुरकूर *f*; कशिद्याचें -वेलबुटीचें काम *n*. -FUL *a.* चिरडखोर, पिरपिऱ्या.

FRIABLE *a.* (*friare*, to break) पिठूळ, पिठा, भुसभुसीत.—FRIABILITY पिठुळपणा, पिठेपणा.

FRIAR (*frater*, brother) सन्यासी, जोगी, गोसावी (रोमन क्याथोलिक पंथाचा.)

FRICTION (*fricare*, to rub) घांसणें *n*, घर्षण, *n*; *Med.* मर्दन *n*.

FRIDAY* शुक्रवार.

FRIEND* one who, entertaining for another sentiments of esteem, respect, and affection, from personal predilection, seeks his society and welfare मित्र, सखा, स्नेही; one not inimical मित्र; favorer पुरस्कर्त्ता, अनुकूल; [one of the religious sect usually called *Quakers* by those not of the sect]; a term of salutation गडी, मित्र. -LINESS मित्रत्व *n*, स्नेहभाव, -LY *a.* मैत्रीचा, स्नेहभावाचा; befitting a friend मित्रांस योग्य -गोड; not hostile मित्रत्वाचा, सख्यत्वाचा; अनुकूल, सुप्रसन्न [to]. -SHIP, attachment to a person, proceeding from intimate acquaintance and a reciprocation of kind offices, or from a favorable opinion of the amiable and respectable qualities of his mind मैत्री *f*, सख्यत्व *n*, स्नेहभाव; intimacy सलगी *f*, दाटमैत्री *f*; kindness उपकार, आभार; help सहाय [for].

FRIGATE *F.* लहान जातीचें लढाऊ गलबत *n*.

FRIGHT* *v.* भिवविणें, भेदरावणें [with].—*n.* वचक *f*, धास्ती *f*, धकधक *f*. -EN *v.* भिवविणें, भेडावणें. -FUL *a.* भ्यालेला, घाबरलेला, भयभरित, भयाभीत झालेला: see how the f. herds run from the wood; exciting alarm भयंकर, अकराळ विकराळ, घोर, भयोत्पादक (tempest).

FRIGID *a.* (*frigere*, to be cold) थंड, सर्द, शितळ; unfeeling शिथिल, निस्नेह. -ITY थंडी *f*; शिथिलता *f*, मंदी *f*, शैथिल्य *n*.—FRIGORIFIC *a.* (*-facere*, to make) शैत्यकारक, शितोत्पादक.

FRINGE *F.* झालर *f*, लकेरी *f*.

FRIPPERY *F.* old clothes जुनीं पुराणीं पांघुरणें *n pl*; place where old clothes are sold जुनीं पांघुरणें विकण्याची जागा *f*.

FRISK *v. i.* *Ger.* नाचणें, बागडणें;—as deer, horses, &c. ठिकणें, नाचणें;—dogs, kids, &c. बागडणें, नाचणें.—*n.* खिदडा, नाच; wild, boisterous f. थैथया, धिंगाणा.—FRISKY *a.* नाचरा, ठिकरा, मौज्या.

FRITH, FIRTH *Scot.* खाडी *f.*

FRITTER (*frigere,* to fry) मासाचा तळलेला तुकडा; fragment तुकडा, खंड *n.*—*v.* तळण्याकरितां (मासाचे) तुकडे कापणें -फोडी पाडणें.

FRIVOLOUS *a.* (*frivolus*) हलका, क्षुल्लक, पोकळ, छिचोर.—FRIVOLITY हलकट -पोकळपणा, छिचोरी *f.*

FRO* *ad.* पासून, हून; to and f. इकडे तिकडे, एथून तेथवर, तेथून एथवर.

FROCK *F.* an upper coat वरचा अंगरखा, डगला; a gown for children झबलें *n,* 'फ्राक.'

FROG* बेडूक, बेडकी *f;*—of a horse's foot पुतळी *f,* बेडकी *f.*

FROLIC *Ger.* खेळ, मौज *f,* कौतुक *n.*—*v.* खेळणें, मौजा मारणें, कौतुक क. [with]. -SOME *a.* खुशमौज्या, रंगेल, ख्याली.

FROM* *prep.* हून, पासून, कडून; f. house to h. घरोघर; f. above वरून; f. below खालून; f. behind मागून; f. far दुरून; f. fear भयानें; f. birth जन्मापासून, जन्मतः.

FRONT (*frons*) forehead कपाळ *n;* face तोंड *n;* a bold f. नाक *n,* तिखें *n;* fore part समोरचा भाग, तोंड *n,* पुरोभाग, अंग *n;*—of an army अगाडी *f,* बिनी *f;* in f. of समोर, मोहरे; f. to f. रुबरू; from in f. of समोरून, मोहरून; unblushing f. उघडामाथा. —*v.* समोर उभा राहणें, भेटणें; समोर -सम्मुख असणें: his house *fronts* the church; adorn in front समोर -दर्शनी -सुशोभित क.—*a.* समोरचा, दर्शनी. -AL *a.* कपाळाचा, ललाट संबंधी; समोरचा.—*n.* कपाळपट्टी *f;* *Med.* कपाळास लावायाचा लेप -चें औषध *n.* -IER सरहद्द *f,* सीमा *f,* लगता.—*a.* लगत्याचा, सरहद्दीवरचा. -ISPIECE दर्शनपट्टी *f,* इमारतीचें दर्शनी अंग *n;*—of a book ग्रंथाच्या आरंभीचें चित्र *n.* -LESS *a.* निलाजरा, बेशरम. -LET कपाळपट्टी *f;* रागाची क्रोधमुद्रा *f.*

FROST* act of freezing गोठणें *n;* severe cold गारठा, कडक हिंव *n;* frozen dew हिमतुषार.—FROSTY *a.* हिमउत्पादक; गारठ्याचा, हिंवाचा, हैम (night); पांढरा, शुभ्र, पिकलेला (head).

FROTH* foam फेंस, फेण; empty show फुशारकी *f,* फुशारी *f.*—*v.* फेंस आणणें; फेंसानें भरणें -भरिवणें: a horse *froths* his chain.—*i.* फेंस येणें, फेंसळणें, फेणणें; up दरदरणें.—FROTHY *a.* फेसाळलेला; पोकळ, शून्य, फोल (speaker); फुशारकीचा, फुशारीचा.

FROWARD* *a.* perverse करनकर, व्रात्य, वक्र (child); not willing to yield हट्टी, जिद्दखोर.

FROWN *v. F.* contract the brow in displeasure, severity, or sternness (रागानें) कपाळास अठी घालणें, भुवया चढवणें; manifest displeasure राग दाखविणें, रागें भरणें, खप्पा होणें [on, upon, at].—*v.* कपाळाची अठी *f,* खप्पा मर्जी *f,* राग.

FROWZY *a. Pro. Eng.* उबट, कुबट.

FROZEN *p. a.* गोठलेला, गारठलेला.

FRUCTIFY, See under FRUIT.

FRUGAL *a.* (*fruges,* grain) बेतानें खर्च -वापर करणारा, मितव्ययी, काटकसऱ्या. -ITY काटकसर *f,* मितव्यय.

FRUIT (*fructus,* product) whatever is produced for the enjoyment of man or animals by the process of vegetable growth फळ *n;* the juicy, pulpy product of certain plants फळ *n,* फळें *n pl,* मेवा; product फळ *n,* उपज; result फळ *n,* परिणाम; offspring संतान *n,* आपत्य *n.* -AGE फळफळावळ *f,* फळें *n pl,* मेवा. -ERER फळविक्या. -FUL *a.* सफळ, फळवान; सुबत्ता (season); rich मातबर, सुपीक, चिकण (soil); prolific बहुप्रसव, अवंध्य (wife) [of, in]. -LESS *a.* निष्फळ, व्यर्थ, निरर्थक. -TREE फळझाड *n.*—FRUITION भोग, उपभोग.—

FRUCTIFY *v.* फलप्रद क., पिकास आणणें, सुपीक क.—FRUCTIFICATION सफलीकरण *n.*

FRUSTRATE *v.* (*frustra,* in vain) मोडणें, निर्फळ -निरर्थक क. (a plan); nullify रद्द क., मोडणें (a deed) [by, in].

FRY *v. t. & i.* (*frigere*) तळणें; undergo the action of fire or extreme heat तळतळणें, पोळणें [in].—*n.* तळलेला पदार्थ, तळण *n.*—*F.* लहान मास्यांचा -चिंगळ्यांचा थवा. -ING-PAN कढई *f,* तळणी *f*; to fall out of the f. into the fire फुपाट्यांतून निघून आगींत पडणें.

FUDGE (?) गप्प *f,* कहाणी *f.*

FUEL (*focus,* hearth) सरपण *n,* जळण *n*; any thing that serves to feed or increase flame, heat, or excitement आगीवर तेल *n,* पेटवण *n*; to add f. to fire आगीवर तेल ओतणें *n.*

FUGITIVE *a.* (*fugere,* to flee) पळणारा, पळका; volatile उडून जाणारा, अस्थिर; tender and f. parts of vegetables; uncertain चंचल, क्षणिक, अशास्वत; flying or escaping from duty, service, danger, &c. भटक्या, पळपट्या, हिंडफिऱ्या.—*n.* पळपट्या, फरारी; दुसऱ्याच्या राज्यांत आश्रयार्थ पळून जाणारा; शासन चुकविण्या करितां पळून जाणारा.

FUGH *interj.* इश्श, इश्शो.

FULCRUM (*L.*) टेंकू, तरफ *f.*

FULFIL * *v.* पूर्ण क., शेवटास नेणें;—as a prophecy, promise, &c. खरा -सत्य करून देणें, प्रत्ययास आणणें;—as a term भरणें, मुद्दत पुरी क. [by]. -ED पूर्ण; संपूर्ण, साधित; one whose wishes are f. पूर्णकाम, कृतार्थ. -MENT पूर्णता *f,* सिद्धि *f,* पूर्त्ति *f*; बोलल्या प्रमाणें पार क. *n,* उक्तनिर्वाह: the f. of a promise.

FULL * *a.* filled up भरलेला, पूर्ण; copious पुष्कळ, भरपूर, विपुल, चघळ, भक्कम (supply, meal); abounding in व्याप्त, मय, in comp.: चिंतामय *f*; f. of cares; entire सगळा, समग्र;—as ears of corn भरदार;—as voice भरपूर, उद्दाम; f. moon पूर्णचंद्र; f. stop पूर्ण -पूर्णविराम चिन्ह *n* [of].—*n.* भर *f,* भरती *f*; utmost extent सीमा *f,* पराकाष्ठा *f.*—*ad.* तंतोतंत, टांकोटांक; exactly बरोबर, थेट; completely पुरतेपणीं, तब्बल, ताठ. -BLOWN *a.* पुरा फुललेला, पूर्ण, विकसित; fully distended with wind तटतटीत -तट्ट फुगलेला. -GROWN *a.* पुरे वाढीचा, भरदार.—* *v.* कापडास कांजी पाजणें -देणें. -ER कापडास कांजी पाजणारा, परीट, रजक;—fullers' earth खारमाती *f.*

FULMINATE *v. i.* (*fulminare,* to lighten) thunder गडगडणें, गरजणें; thunder forth menaces गरजून -धमकीच्या वाटेनें सांगणें [at, against].

FULSOME * *a.* ओंगळ, किळसवाणा.

FUMBLE *v. i. D.* grope about चांचपणें, चांचपडणें; seek awkwardly अडाण्यावाणी क.; handle much हातानें चाळवणें -शीं खेळणें [about].

FUME (*fumus*) vapor वाफ *f,* बफारा; smoke धूर, धूम; vain imagination वृथाकल्पना *f.*—*v. i.* धुमसणें, धुमणें; be in a rage धुसफुसणें, मुसमुसणें, फुणफुणणें.—FUMIGATE *v.* धूर -धुरी -वाफारा देणें [with].—FUMIGATION वाफारा, धूर, धुकटी *f.*

FUMITORY (do.) पित्तपापडा.

FUN* sport मौज *f,* खेळ, कौतुक *n*; wanton amusement चेष्टा *f,* विनोद, मस्करीचा खेळ. -NY *a.* विनोदाचा, थट्टेचा, मौजेचा.

FUNCTION (*fungi,* to perform) office काम *n,* हुद्दा; duty कर्म *n,* व्यापार; natural or assigned action of any power or faculty of the soul, or of the intellect शक्ति *f,* कर्मशक्ति *f*; activity appropriate to any business or profession कामाची चपळाई *f,*

चलाखी *f*. -ARY कामदार, अमलदार, अधिकारी.

FUND (*fundus*, bottom) a deposit of resources from which supplies are drawn, out of which expenses are provided for, &c. पुंजी *f*, भांडवल *n*, 'फंड' *n*; a full provision of resources पुंजी *f*, भांडवल *n*: f. of good sense; stock of a national debt सरकारास कर्जा दिलेला पैका.—*v*. फंडांत पैसा भरणें; -चें व्याज उत्पन्न होई इतकें फंड जमविणें. -AMENT गुदप्रदेश, अधःप्रदेश, गांड *f*. -AL *a*. मूल -आधारभूत.—*n*. मूलभूत विषय.

FUNERAL (*funus*) ceremony of burying a dead human body प्रेतसंस्कार -क्रिया *f*, मूठमाति *f*; procession of persons attending the burial of the dead प्रेतयात्रा *f*, मसणबोळावा.—*a*. प्रेतयात्रेचा; प्रेतसंस्कार संबंधी; f. fire चिताग्नि, भडाग्नि *f*; rite प्रेतकर्म *n*.

FUNGUS (*L*.) a large natural order of plants, comprehending mushrooms, toadstools, &c. अळंबें *n*, कुतऱ्याचें मूत *n*; excrescence अंगावर वाढलेलें मांस *n*, अवाळूं *n*.

FUNNEL (*infundere*, to pour in) an inverted cone with a pipe गळणी *f*, नरसाळें *n*; shaft of a chimney धुराडें *n*.

FUR (*furra*) skin with soft hair लोंकरीची कांतडी *f*; soft hair लोंकर *f*, लव *f*;—as upon the tongue बुरा, बुरसी *f*.

FURBISH *v*. *F*. उजळणें, ओप -झिलई देणें [up]. -ER उजळणारा, सिकलगार.

FURIOUS, See under FURY.

FURL *v*. *F*. गुंडाळणें, सुरळी क. [up].

FURLONG* मैलाचा आठवा भाग.

FURLOUGH *D*. *Mil*. रजा *f*, लष्करी रजा *f*.

FURNACE (*fornax*) धातु वगैरेचा रस करण्याची भट्टी *f*.

FURNISH *v*. *F*. provide पुरवणें; afford देणें; equip सज्ज क.;—as the mind संपन्न -विशिष्ट क.;—a house तयार क., सामान लावून सजविणें -भरणें, संजोगणें [with].—FURNITURE सामन *n*, साहित्य *n*.

FURROW* a trench in the earth made by a plough तास *n*, हरळ; a groove खांचणी *f*, कोरणी *f*.—*v*. तास पाडणें, पाळ्या घालणें [with].

FURTHER* *a*. more remote अधिक दूर, दूरतर, दूरचा; additional अणखी, शिवाय, जास्ती;—*ad*. अधिक लांब; अणखी, खेरीज.—*v*. advance मोठा क., वाढविणें; help सहाय क. [by]. -ANCE वृद्धि *f*, संवर्द्धन *n*; बढती *f*, सरफराजी *f*. -MORE *ad*. or *conj*. अणखी, शिवाय. -MOST *a*. सर्वांच्या पलिकडचा.

FURTIVE *a*. (*fur*, thief) चोरीचा, चोरलेला, चोरीनें मिळवलेला.

FURY (*furere*, to rage) तैष, त्वेष, जाळ; violent passion उन्माद, आवेश, महावेग; a stormy, turbulent, violent woman चंडिका *f*, हडळ *f*.—FURIOUS *a*. आवेशी, साहसी; जबरा, अनर्थाचा, झपाट्याचा (wind); दारुण, तुमल (fighting); उन्मत्त, मदोन्मत्त (animal) [against, at, with].

FUSE *v*. (*fundere*, to pour) वितळणें, रस क.,—*i*. रस होणें, वितळणें [with].—FUSIBLE *a*. वितळायाजोगा, द्राव्य, गलनीय. —FUSIBILITY द्राव्यत्व *n*, रस होण्याचा गुण -धर्म.—FUSION आटणें *n*, द्रावण *n*; रस, द्रव; एकीकरण *n* -भवन *n*.

FUSEE *F*. (*fusus*, spindle)—of a watch or clock घड्याळांत सांखळी गुंडाळायाचा एक खिळा असतो तो.

FUSIL लहान बंदूक *f*. -EER लहान बंदूकवाला शिपाई, 'फुजलीर.'

FUST (*fustis*, stick) shaft of a column स्तंभदंड.—*F*. उबट वास, दुर्गंध.

FUTILE *a*. (*futilis*, that easily pours out) trifling हलका, क्षुल्लक, पोकळ; f. in effect निरर्थक, निष्फल.—FUTILITY हलकेपणा, &c.

FUTURE *a.* (*futurus*) पुढला, पुढील, होणारा. —*n.* पुढला -येणार काळ; events that are to happen in time to come होणार गोष्टी *f pl*, होतव्य *n*, भवितव्य *n*.—FUTURITY पुढील काळ, भविष्यकाल; होणार गोष्ट *f*.

FY *F. int.* छी, धिक्, छीछी.

G.

GAB *D.* mouth तोंड *n*; prate बडबड *f*. -BLE *v.i.* बरळणें, बडबड क.—*n.* बडबड *f*, बरळणें *n* (over, about).

GABLE *Ger.* चांदई *f*.

GAD* *v. i.* भटकणें, हिंडणें [about]. -ABOUT पंचाळ. -FLY गोमाशी *f*.

GÆRTNERA RACEMOSA (*L.*) कस्तुरीमोगरा, मधुमाधवी *f*, वासंती *f*.

GAG* *v.* stop the mouth of, by thrusting in some thing तोडांत बोळाघालणें, तोंड कोंडणें; silence by authority or by violence अधिकारानें किंवा जबरीनें तोंड बंद क. -बोलण्याची बंदी क.; hold open by means of a gag बोळा घालून उघडा ठेवणें; keck उमाळा आणणें [with].—*n.* तोंड कोंडण्याचा बोळा; उमाळा आणणारा घांस.

GAGE *v. F.* पैजेचा विडा -ची खूण *f*; परिमाणमापक यंत्र *n*, परिमाण *n*.

GAIETY, See under GAY.

GAIN *v. F.* get, as profit मिळवणें, मिळकत -कमाई क., नफा मिळवणें; come off victor in मिळवणें, जय मिळवणें, जिंकणें; win to one's side पक्षास मिळवणें; reach पावणें, पोंचणें, सई क.;—ground पाय शिरकवणें, वाढणें; over मन वळवणें, आपल्या पक्षाचा क. [by, at, from]. —*i.* have advantage फायदा -लाभ असणें; grow rich वाढणें (Ezek. xxii. 12);—on, upon दुसऱ्याच्या अधिकारांत शिरणें; वर्चस्व असणें; चालणें, चलती असणें.—*n.* मिळकत *f*, प्राप्ति *f*, फायदा; accumulation संग्रह, संचय, सांठा: the lust of g.

GAINSAY *v.* (*against* and *say*) दुसऱ्याचें बोलणें खंडणें, वाद क., उलट सांगणें.

GAIT* जाणें *n*, चालणें *n*; manner of walking चालण्याची ढब *f*, चाल *f*; solemn or stately g. गजगति *f*.

GALA *Sp.* आनंद, उत्सव; g. day आनंदाचा -सणाचा दिवस.

GALINGAL (*L.*) कोष्टकोलिंजन *n*.

GALAXY (*Gr. gala*, milk) the Milky Way आकाशगंगा *f*, स्वर्गंगा *f*, दूधगंगा *f*; assemblage of splendid persons or things शोभिवंत पुरुषांचा किंवा वस्तूंचा समुच्चय.

GALBANUM (*L.*) गंधबिरूजा, हिंगड्याची एक जात आहे.

GALE *Ir.* (*Skr. djala*, cold) वावटळ *f*, महावात.

GALL* the bitter, alkaline, viscid liquid found in the gall-bladder, beneath the liver पित्त *n*?; spite दावा, अकस.—*v. F.* fret and wear away by friction चोळवटणें, घांसणें; vex छळणें, जाचणें, काचणें; annoy त्रास -उपद्रव देणें [with, by].—*n.* (*galla*) मायफळ *n*; black g. काळामाजा; white g. गोरामाजा.

GALLANT *a. F.* showy भडक, छानदार; high-spirited छातीचा, मर्द, प्रतापशाली; courteous to women स्त्रीसन्मानी, स्त्र्युपासनशील. —*n.* हौसी, विलासी, खुशालचंद; one who woos लग्नासाठीं स्त्रीची खुशामत करणारा; in a bad sense, a seducer धगड, यार, जार. -LY *ad.* शूरपणानें, मर्दाईनें. -RY शौर्य *n*, मर्दाई *f*, पराक्रम; स्त्रीयांचा सत्कार, स्त्रीसन्मान; इष्कबाजी *f*.

GALLERY *F.* a long and narrow place for walking दालन *n*?; a room for the exhibition of works of art कळाकुसरीचे पदार्थ दाखविण्याची खोली *f*; covered terrace outside of a house सज्जा; in churches &c.

देऊळ, नाटकगृह इ० स्थळीं पायऱ्या प्रमाणें चढती व उंच असी बसायासाठीं केलेली जागा *f*.

GALLEY (*galea*) शिडें व वल्हीं यांनीं हकारायाचें गलबत *n*; *Print.* a frame which receives the types from the composing stick 'ग्याली' *f*; cookroom of a ship of war लढाऊ गलबताची स्वयंपाकाची खोली *f*. -SLAVE 'ग्याली' जहाजावर चाकरी करण्याची शिक्षा पावलेला अपराधी -चा कैदी.

GALLINACEOUS *a.* (*gallus*, cock) गृहकुक्कुट संबंधी, घरकोंबड्याचा.

GALLON *F.* पातळ पदार्थ मोजण्याचें पुणेरी पांच शेराचें किंवा साधारण चार बाटल्यांचें माप *n*.

GALLOP *v. i. F.* भरधांव चालणें -पळणें [off, about].—*n.* भरधांव *f*, दौडचाल *f*.

GALLOWS * फांशी देण्याचा -फांशीचा खांब.

GAMBLE, See under GAME.

GAME* sport खेळ *f*, कौतुक *n*; amusement मौज *f*, गमत *f*, खेळ; a single match at play डाव, हात; that which is gained, as the stake in a game पैज *f*, पण; animals pursued and taken by sportsmen शिकार *f*, पारध *f*; plan बेत, मसलत *f*.—*v.* खेळणें, क्रीडा क.; gamble जुवा खेळणें [for, with]. -KEEPER वनपशु -पक्षी पाळणारा. -STER पैज लावून खेळणारा; जुवेबाज, जुगारी.—GAMBLE *v.i.* जुगार -जुवा खेळणें.—GAMBLER जुवेबाज, जुगाऱ्या.—GAMING-HOUSE शिकारखाना.

GAMBOGE (from *Cambodia*) रेवाचिनीचा शिरा.

GAMUT (*Gr. gamma*, third letter of the Greek alphabet, *ut*, name of a musical note) ग्राम, सरिगम *f*.

GANDER * हंस.

GANG * थवा, गट्टा, टोळी *f*. -WAY रस्ता, वाट *f*; गलबतावर जाण्याचें दार *n*.

GANGRENE (*Gr. -grainein*, to gnaw) एक रोग आहे, याकडून शरिराचें मांस नासकें, मऊ, ओलसर, थलथलीत व दुर्गंधयुक्त होतें, मांसपूति *f*.—*v.* सडणें, मांस कुजणें.

GANTLET, GANTELOPE, a military punishment. The offender is made to run between two files of men facing one another, who strike him as he passes. एक प्रकारची लष्करी शिक्षा आहे; [to run the g., to suffer the punishment of the g.; to go through severe criticism or controversy, or ill treatment].

GAOL *F.* तुरंग, बंदिखाना. -ER तुरंगावरचा अधिकारी, 'जेलर.' -DELIVERY, *Law*, a clearing the jail of persons confined in it for trial by trying them बंदखुलास, 'जेल डिलिवरी' *f*.

GAP *Icel.* खिंड *f*, भगाड *n*;—in the teeth खांड *f*.

GAPE *v.* open the mouth wide तोंड पसरणें -विचकटणें;—as for food आ पसरून -करून अन्न मागणें; yawn जांभई देणें.—*n.* खिंड *f*, खांड *f*. -TOOTHED दांतपडका, बोथरा, बोथरखिंड्या.

GARB *F.* पोषाक, लिबास.

GARBAGE* गाळसाळ, गदळ *n*.

GARBLE *v.* (*cribellum*, sieve) गाळणें, गाळून लिहिणें.

GARDEN* बाग *m*, *f*, बगीचा, उपवन *n*; flower-g. पुष्पवाटिका *f*, फुलबाग; kitchen-g. मळा. -ER माळी, बागवान; a g. who cultivates cumin and other aromatic seeds जिरिमाळी; a g. who grows flowers फुलमाळी. -GROUND बागाईत *n*, बागाइती जमीन *f*. -PLOT वाफा, तक्ता. -STUFF माळवें *n*.

GARDENIA LATIFOLIA (*L.*) पित्तपापडा.

GARGLE *Ger.* गुळणा करायाचें औषध *n*; गुळणी *f*, गुळण्या *f pl.*—*v.* गुळणा क.

GARLAND *F.* माळा *f*, हार;—of flowers पुष्पहार;—of pearls मुक्ताहार;—of wild

flowers वनमाला *f*; a collection of little printed pieces ग्रंथमाला *f*.

GARLIC* लसूण *m*, *f*.

GARMENT *F*. पांघरूण *n*, वस्त्रप्रावर्ण *n*.

GARNER. (See GRAIN.) See GRANARY.

GARNET (do.) a gem of a red color याकूत.

GARNISH *v*. *F*. सजवणें, सुशोभित क. [with].

GARRET *F*. शेवटल्या मजल्यावरची -छपराच्या खालची खोली *f*, पोटमाळा.

GARRISON *F*. body of troops stationed in a fort or fortified town तटबंदीच्या गांवाचे किंवा किल्ल्याचे रखवालीचें लष्कर *n*, किल्लेराखण *n*, शिबंदी *f*; a strong place in which troops are quartered for its security तटबंदीचा गांव -किल्ला, ठाणें *n*.—*v*. किल्ल्याच्या रखवालीस शिपाई -शिबंदी ठेवणें; तटबंदी करून राखणें (a conquered country) [with].

GARRULOUS *a*. (*garrire*. to chatter) वाचाळ, वटवट्या.—GARRULITY वाचाळपणा.

GARTER *F*. पायमोजे बांधायाची पट्टी *f*, मोजेबंद; [the badge of the highest order of knighthood in Great Britain, called the Order of the G.; the order itself].

GAS* वायुरूप पदार्थ; वायु, धूम, 'ग्यास.' -EOUS *a*. वायुरुपी, वायुरूप; lacking solidity पोकळ, वायकळ (information).

GASH *F*. मोठी जखम *f*, घाव, वार, भगदड *n*.

GASP *v*. *i*. *D*. pant violently धापा देणें; pant with eagerness खवखवणें [at, for]. —*n*. धापा *f*, दम.

GASTRIC *a*. (*Gr*. *gaster*, belly) जठर संबंधी, जाठर; g. juice जाठररस, जठराग्नि.—GASTRITIS *Med*. inflammation of the stomach उदरदाह.—GASTRODYNIA *Med*. pain in the stomach अमाशयगत शूळ, पोटदुखी *f*.

GATE* door of a city दरवाजा;—of a village वेस *f*;—of an enclosure फाटक *n*, ताटी *f*; *Scrip*. places which command the entrances नाका, चवाठा; way रस्ता, वाट *f*. -WAY दरवाज्यांतून जाण्याचा रस्ता, दरवाजा.

GATHER* *v*. bring together एकवटणें, गोळा क., जमवणें; pluck तोडणें, वेचणें, तोडा -वढा क. (Matth. vii. 16); cull वेचणें, निवडणें (Ps. cvi. 47); accumulate संग्रह -संचय क., जमविणें; pucker सुरकुत्या पाडणें, चिरमुटणें; infer अनुमान -तर्क क., तर्कानें काढणें;—as lampblack काजळ पाडणें;—as a garment सावरणें, आवरणें: *gathering* his flowing robe; to g. breath दमखाणें, विसावा घेणें;—strength बळ धरणें -बांधणें.—*i*. जमा होणें, मिळणें; वाढणें; come to a head, as a sore, and generate pus मुख फुटून पू जमणें -पुवारणें -पुवळणें; समजणें, अनुमान क. (Acts xvi. 10). —*n*. सुरकुती *f*. -ING जमा *f*, संग्रह; तोडणी *f*, तोडा, ओढा, वेचणी *f*; सावरणें *n*, अटोप, सावर, आवर; उगवणी *f*, वसूल; जमाव, मेळा; charitable contribution धर्मादायाची वर्गणी *f*; a tumor दुखरूं *n*.

GAUD (*gaudere*, to rejoice) नग, नगोटें *n*, दागिना. -INESS छान *f*, भडक *f*.—GAUDY *a*. छानदार, देखणाऊ.

GAUGE *v*. *E*. मापणें, मोजणें.—*n*. माप *n*, प्रमाण *n*.

GAUNT* *a*. रोडका, रोड.

GAUNTLET *F*. a large glove of mail दस्ताना, वज्रमुष्टि *f*; to take up the g. पण -विडा उचलणें; to throw down the g. पण मांडणें.

GAUZE *F*. a very thin, slight, transparent stuff, of silk or linen कपरधूल.

GAY *a*. *F*. merry आनंदी, उल्लासी; showy छानदार, देखणा, भडक; jolly रंगेल, चैनी. —GAIETY आनंद -उल्लासवृत्ति *f*; छानदारी *f*, भडक *f*; रंगेपलणा, चैन *f*.

GAZE* *v.* टक लावून पाहणें, पाहणें [at, on, upon].—*n.* टक *f*, एकाग्रदृष्टि *f*.—GAZING-STOCK दृष्टिपात्र *n*, उपहासदर्शनास्पद *n*, कौतुक *n*.

GAZETTE (from *gazzetta*, a Venetian coin) वर्त्तमानपत्र *n*, अखबार *f*. -ER वर्त्तमानपत्राचा कर्त्ता; a geographical dictionary भूगोलवर्णनाचा कोश.

GEAR* सरंजाम, सामान *n*; — of a cart, plough, &c. वेठण *n*, तेगार.

GELATINOUS *a.* (*gelare*, to congeal) चिकचिकीत, चिकीसारखा.

GELD* *v.* खच्ची क., अंड कापणें.

GEM (*gemma*) a precious stone रत्न *n*, मणी; bud कळी *f*.—*v.* रत्नखचित -मंडित क. [with].

GEMINI (*L.*) मिथुनरास *f*.

GEMMATION (*gemma*, bud) [*Nat. Hist.* formation of a new individual by the protrusion of any part of an animal or plant, which may then become free or remain connected with the parent stock; the period of the expansion of buds; *Bot.* the arrangement of buds on the stock].

GENDER (*genus*, birth) *Gram.* लिंग *n*.

GENEALOGY (*Gr. genea*, birth, race, *logos*, discourse) history of the descent of a person or family वंशचरित्र *n*; lineage वंशावळी *f*, वंश.—GENEALOGICAL *a.* वंशचरित्राचा; वंशावळीचा (table); वंशावळी प्रमाणें; परंपरेचा (order); g. tree, a family lineage drawn out under the form of a tree and its branches वंशवृक्ष, वंशावली *f*. — GENEALOGIST, one who traces the descent of persons or families कुलाचार्य, कुलकर्मदर्शक.

GENERAL *a.* (See GENUS) relating to a genus जातीचा, जाति संबंधी: g. law of the animal economy; not special सामान्य, साधारण (inference); lax in signification मोहगम, साधारण (expression); prevalent रुढींतला, व्यवहारिक, प्रायिक (opinion); common to the whole सामान्य, सर्वांचा, सार्वजनिक: Adam, our g. sire; *Obs.* the word g. annexed to a name of office usually denotes chief or superior; and is equivalent to सर, मुख्य, श्रेष्ठ, वरिष्ठ: a commissary g.—*n.* the whole सर्व, सगळा; superior officer in an administration मुख्य अधिकारी, सर कारभारी; — of an army सेनापति, बक्षी, 'जनरल'; in g. एकंदरींत. -ISSIMO अग्रसेनापति, मीरबक्षी. -ITY सामान्यत्व *n*, साधारणत्व *n*; the main body मोठी -अधिक संख्या *f* -भाग -अंश. -IZE *v.* जातीखालीं -साधारण धर्माखालीं आणणें; make universal in application सर्वांस -सर्वत्र लावणें -लागू क. -LY *ad.* साधारणपणें, सामान्यतः; most frequently बहुधा, बहुतकरून. -SHIP अधिकाऱ्याचें किंवा सेनापतीचें काम *n* -चा हुद्दा; military skill in a commander सेनापतीचें युद्धकौशल्य *n*.—GENERIC *a.* जातिमात्राचा, जातिवाचक, सामान्य; very comprehensive बहुव्यापक, पुष्कळांचा समावेश करणारा; g. property जातिधर्म; g. characteristic जातिलक्षण *n*. -ALLY सामान्यतः, साधारणपणें: a hot summer g. follows a cold winter; बहुधा, बहुतकरून, एकंदरीनें: g. speaking, they live very quietly.

GENERATE *v.* (See GENDER) beget जन्म देणें, जन्मविणें; produce उत्पन्न क. [from].—GENERATION उत्पन्न क. *n*, जनन *n*; origination by some process, mathematical, chemical, or vital उत्पन्न क. *n*, बनावणें *n*, करणें *n*: the g. of sounds; offspring संतान *n*, संतति *f*; single step in the succession of natural descent पिढी *f*; family वंश, कूळ *n*; from g. to g. पिढ्यानपिढी, पिढीपेस्तर.—GENERATIVE *a.* जननशक्तियुक्त, फलद; उत्पादक.—GENERATOR जनक, उत्पादक; vessel in which steam is generated वाफ उत्पन्न करण्याचें पात्र *n*.—

GENITAL *a.* उत्पत्ति -जनन संबंधी *n.*—*pl n.* जननांग *n*, उपस्थ *n.*—GENITIVE, *Gram.* षष्ठी *f.*—GENITOR जनक, बाप.—GENITURE, See GENERATION.

GENEROUS *a.* (do.) magnanimous मोठ्या -प्रशस्त मनाचा, महामनस्क; munificent उदार; abundant पुष्कळ, विपुळ, भरपूर (table); strong मादक, तलख, उत्तेजक (wine). -LY *ad.* उदारपणानें, औदार्यानें, औदार्यपूर्वक; मोठ्या मनानें, मन मोठें करून.—GENEROSITY कुलीनता *f*, खानदानी *f*; उदारपणा, औदार्य *n*; महात्मता *f*, मनाची थोरवी *f*.

GENESIS (*L.*) production उत्पत्ति *f*; theory उपपत्ति *f*; the first book of the Old Testament जुन्या करारांचें पहिलें पुस्तक *n*, उत्पत्तीचें पुस्तक *n*, उत्पत्ति *f*.

GENIAL *a.* (See GENIUS) generative जननकारक; contributing to, and sympathizing with, the enjoyment of life प्रकृतीस मानणारा, अनुकूल, मनोरम.

GENIUS (*gener*, to beget) the peculiar structure of mind with which each individual is endowed by nature बुद्धि *f*, मति *f*; uncommon intellectual power बुद्धिवैभव *n* -पाटव *n*, प्रज्ञा *f*; a man of great mental powers बुद्धीचा सागर, धेंड *n*, प्रस्थान *n*; peculiar constitution or character विशेष लक्षण *n* -धर्म -गुण; (*pl* GENII) a good or evil spirit दैवत *n*, देवता *f*; the animating spirit of a people or period धर्म : g. of the age युगधर्म.

GENTEEL *a.* (*gens*, race) polite शिष्ट, सभ्य, चालीचा, प्रौढ (persons);—of manners शिष्टाचाराचा, सभ्य; elegant सुंदर, सुशोभित, देखणा.—GENTILITY सभ्यपणा, शिष्टाई, *f.*—GENTLE *a.* well-born कुलीन, जातिवंत; mild सौम्य, नम्र (manner); not refractory गरीब, शांत (a horse); soothing उपशमक, शमक (music);—a breeze मंद, संत, हलका. -MAN, a man who is well-born कुलीनजन्मा, कुलीन पुरुष; one of gentle manners सभ्य -प्रतिष्ठित मनुष्य, गृहस्थ; *pl* people लोक, गृहस्थ *pl*. -MANLINESS माणुसकी *f*, गृहस्थगिरी *f* -पणा. -NESS कुलीनपणा; गरिबी *f*, भलाई *f*; नरमाई *f*, सौम्यता *f*.—GENTLY *ad.* संतपणानें, शांतवृत्तीनें; हलक्यानें, हळू.—GENTRY, people of education and good breeding शिक्षित व सभ्य लोक *pl*; in England, the class of eduple between the nobility and the vulgar गृहस्थवर्ग.

GENTIAN (*gentiana*) किराईत *n*; dried g. काडेकिराईत *n*.

GENTILE (*gens*, race) one of a Gentile or non-Jewish nation जो यहूदी नव्हे तो; 'विदेशी', 'परदेशी'; a heathen मूर्त्तिपूजक.—*a.* (यहूदी सोडून इतर) राष्ट्रां संबंधी; *Gram.* जाति -देशवाचक -प्रदर्शक (noun).

GENUFLECTION (*genu*, knee, *flectere*, to bend) भजनाच्या -भक्तीच्या वेळीं गुडघा टेंकणें *n*.

GENUINE *a.* (*genuinus*) मुळचा, खरा, असल, चोख. -NESS खरेपणा, असलाई *f*, चोखपणा.

GENUS (*L.*, *Skr. djan*) जात *f*, वर्ग, गण.

GEOGRAPHY (*Gr. gè*, the earth, *graphein*, to write) भूगोळविद्या *f*; description of the earth भूगोळवर्णन *n*.—GEOGRAPHER भूगोलविद्यावेत्ता.—GEOGRAPHICAL *a.* भूगोलविद्ये संबंधी.

GEOLOGY (*Gr. -logos*, discourse) science which treats of the structure and mineral constitution of the globe भूरचनाशास्त्र *n*.—GEOLOGIST क्षितिरचनाशास्त्रवेत्ता.

GEOMANCY (*Gr. -manteia*, divination) a kind of divination by means of figures or lines, formed by little dots or points,

originally on the earth, and afterwards on paper रमल *n.*—GEOMANCER रमल पाहणारा.

GEOMETRY (*Gr. -metrein,* to measure) that branch of mathematics which investigates the relations, properties, and measurement of solids, surfaces, lines, and angles रेखागणित *n,* क्षेत्रतत्वविद्या *f*; measurement of the earth भूमिति *f,* ज्यामिति *f.*—GEOMETRICIAN रेखागणिती -गणक.

GEORGIUM SIDUS (the star of George) एकग्रह आहे, त्याला हर्शल किंवा युरानसही ह्मणतात.

GERM (*germen*) a point of growth अंकुर, मोड, कोम; origin मूळ *n.* -INATE *v.i.* अंकुर फुटणें, मोड येणें.—*t.* अंकुर -मोड आणणें.

GERMAN *a.* (*germanus,* of brothers and sisters who have the same parents) जवळचा, जवळच्या संबंधाचा; cousins-g. सखे चुलतभाऊ *pl,* किंवा बहिणी *f pl*; सखे भाऊसभाऊ *pl,* किंवा बहिणी *f pl.*—(*n. Germ.* neighbour) जर्मनी देशाचा.—*n.* जर्मन देशचा मनुष्य; जर्मन भाषा *f.*

GERUND (*gerere,* to bear) लाटीन भाषेच्या व्याकरणांत एक प्रकारचें क्रियावाचक नाम आहे.

GESTATION (*gestare,* to carry) गर्भधारण -वहन *n*; pregnancy गर्भार -गब्हारपणा;—of beasts गाभपणा.

GESTICULATE *v.* (*gestus,* gesture) हावभावानें दाखविणें.—*i.* हावभाव दाखवणें -क.—GESTICULATION, GESTURE हावभाव, अंगचेष्टा *f,* चेष्टा *f.*

GET * *v.* procure मिळवणें, संपादणें, पावणें; beget जन्मविणें, जन्म देणें: I had rather adopt a child than g. it; learn शिकणें (a lesson); persuade मनवळवणें, समजी क.: g. him to say his prayers; procure to be करणें, घडवणें: g. these things dispatched; betake आश्रय धरणें -क.: he will g. himself to the town;—a beating मार बसणें -मिळणें -खाणें; to g. in आंत आणणें; out बाहेर काढणें; off काढणें, नेणें; together मिळवणें, जमवणें;—over पार पडणें, निभणें.—*i.* मिळवणें, कमावणें, वाढणें: we lose, they g.; ahead वाढणें, पुढें जाणें; along चालणें, पुढें पाऊल टाकणें; among मध्यें पोंचणें -पावणें; -च्या मधला -आंतला होणें;—a sleep झोपीं जाणें; at पोंचणें; वाट देणें, मार्ग मोकळा क.; back परत येणें -जाणें; before पुढें -आघाडी येणें; behind मागें -पिछाडीस राहणें -जाणें; मागें पडणें, मागसणें; clear मोकळा होणें; वचनांतून सुटणें; ओझ्याखालून मोकळा होणें; संकटांतून मुक्त होणें; drunk पिऊन मस्त होणें, झिंगणें; forward पुढें चालणें -होणें; वाढणें, भरभराटीस चढणें; home घरीं पोंचणें; on पुढें जाणें -चालणें; rid of सुटणें, किटकिटींतून सुटणें; up तयार क.; लिहिणें, छापणें; प्रसिद्ध क. -TING संपादणी *f,* संपादणूक *f*; मिळकत *f,* उपार्जना *f.*

GHASTLY* *a.* like a ghost in appearance प्रेतकळेचा, प्रेतवत् (face); horrible भयंकर, दारुण (wounds).

GHEE (*Hind., Skr. ghrita*) तूप *n.*

GHOST* the soul of man आत्मा; the soul of a deceased person प्रेत *n*; soul separate from the body विदेही आत्मा; Holy G. पवित्र आत्मा; *Theol.* the third person in the Trinity त्र्येकत्वांतला तिसरा, पवित्र आत्मा;—to give up the g. प्राण सोडणें; g. of a Brahman ब्रम्हराक्षस, संबंध;—of a Mahomedan खवीस. -LY *a.* spiritual आत्मिक, पारमार्थिक; relating to apparitions प्रेत -भूतसंबंधी.

GIANT (*gigas, Gr. gè,* the earth, *genein,* to beget) a man of extraordinary bulk and stature धिप्पाड माणूस, महाकाय, भीम पुरुष; *Myth.* राक्षस, दैत्य.—*a.* राक्षसी, राक्षससारखा. -ESS धिप्पाड बायको *f*; राक्षसी *f.*

—GIGANTIC *a.* स्थूलकाय, दैत्यरूपी, प्रचंड-शरीर; enormous जबर, घोर, दारुण (wickedness).

GIBBERISH *a.* हेंगाडा, रांगडा.—*n* हेंगाडी -रांगडी -पिशाच भाषा -बोली *f.*

GIBBET *F.* फाशीं देण्याचा खांब.

GIBBOUS *a.* (*gibbus*, hunch) फुगीर, कूर्मपृष्ठाकार.

GIBE *F.* See SCOFF.

GIDDY* *a.* dizzy घेरी -चक्कर आलेला; inducing giddiness घेरी -भोवंड आणणारा (heights); whirling चक्रगतीचा -चक्राकार (motion); unfixed चंचळ, अस्थिर; thoughtless अविचारी, विवेकशून्य: young heads are g.; excited उन्मत, उद्धत [with].

GIFT, See under GIVE.

GIG *F.* a top भोंवरा; a light carriage 'बगी' *f*; a ship's light boat जहाजाची जलद चालणारी होडी *f*; a harpoon मासे मारण्याची बरची *f.*

GIGANTIC, See under GIANT.

GIGGLE *v. i. D.* खिदखिद हांसणें, हिहिहि क. [at].—*n.* हिहिहि *f*, खिखि *f.*

GILD* *v.* overlay with a thin covering of gold सोन्याचें पाणी देणें, सोन्याचा मुलामा चढवणें -देणें; color with a gold-like color सोनेरी रंग देणें; brighten उजळ क.; give a fair and agreeable external appearance दर्शनी सुंदर क. -दाखविणें. -ING मुलामा देणें; सोनेरी ओप -मुलामा -धूर -पाणी *n.*—GILT सोन्याचा मुलामा.

GILL* organ of respiration in fishes and other water animals माशाचा कल्ला; flap that hangs below the beak of a fowl or bird गळचुंडी *f*; flesh on the lower part of the cheeks, or under the chin गालां खालचें किंवा हनुवटी खालचें मास *n.*

GIMLET *F.* सामता, बरमा.

GIN (contraction of *engine*) यंत्र *n*; ओझीं उचलण्याचें यंत्र *n*; कापसाच्या सरक्या काढयाचें यंत्र *n*, वटणें *n*, 'जिन' *n.*—*v. i.* जिन यंत्रानें कापूस वटणें.—(corrupt. from Geneva) एक प्रकारचें मद्य आहे.

GINGER (*zingiber, Skr. sring-wear*, horn-shaped) आलें *n*;—the dry root सुंठ *f*; preserved g. आलेंपाक. -BEER, [a sort of beer impregnated with ginger]. -BREAD सुंठवड्याची वडी *f.* -WINE, wine impregnated with ginger].

GINGLE, See JINGLE.

GIRD* a twitch हिसका; stroke of a rod फटका; sarcastic remark ठोमणा.—*v.* encircle with any flexible band वेष्टणें, लपेटणें, गुंडाळणें;—on, make fast गच्च आवळणें -बांधणें (a sword, harness); clothe वस्त्रें नेसविणें, पोशाख घालणें; give a blow to मारणें, प्रहार क., टोळा मारणें [with]. -ER वेष्टणारा, बांधणारा; the principal piece of timber in a floor तुळई *f.*— GIRDLE *v.* वेष्टणें, घेरणें, घेरा घालणें; पट्टा -कडें घालणें.—Also GRIDDLE *n.* कमरबंद -पट्टा; plate for baking cakes तवा.

GIRL* female child मुलगी *f*, कन्या *f*; a young woman तरुण बायको *f*, तरुणी *f.* -HOOD कुंवारपणा, कौमार्य *n.* -ISH *a.* मुलीचा, मुलीसारखा.

GIVE* *v.* bestow without receiving a return देणें, अर्पणें; pay देणें: what shall a man g. in exchange for his soul? (Matth. xvi. 26); pronounce बोलणें, मत -अभिप्राय देणें; grant power to अधिकार देणें; produce उपज देणें, उत्पन्न होणें, फळ येणें; devote लावणें, देणें, खर्चणें; away देणें, देऊन टाकणें; back परत देणें;—chase पाठीस लागणें;—ear ऐकणें, कान देणें; forth सांगणें; प्रसिद्ध क.; in मान्य -कबूल होणें; सांगणें; प्रसिद्ध क.;—one's self up स्वाधीन होणें; -ची आशा सोडणें, -ची जगण्याची आशा सोडणें;—it to soundly भला घेणें, कचकावणें;

—one's self out for ह्मणवणें; छंदास -नादीं लागणें; out बाहेर फोडणें, प्रसिद्ध क.; सोडणें, निघणें (odors); over सोडणें, टाकणें;—place अंग काढणें, माघार घेणें; up सोडणें, पाणी सोडणें;—way दबणें, भिणें; अंग काढणें; दबणें, पडणें, खचणें, कचणें;—a wall रेलणें; recede मागें हटणें; into माघार घेणें; in to मान्य-कबूल होणें; वश होणें; दबणें; over थांबणें, हात आटोपणें; up सोडणें; दबणें, हात टेकणें [to]. —GIVER देणारा; a donor दाता, दानकर्त्ता. —GIFT देणें *n*; donation दान *n*, देणगी *f*; present बक्षीस *n*; bribe लांच; some endowment given to man by God ईश्वरी देणें *n*, ईश्वरी देणगी *f*, गुण; right of giving देण्याचा हक, दानाधिकार; *Law*, voluntary transfer of real or personal property, from one to another, without any consideration दान *n*. -ED *a*. संयुक्त, संपन्न; गुणी, सुलक्षण.

GIZZARD *F*. पक्ष्याचा कोठा; हा त्यास दांताच्या ठिकाणीं अन्न चवर्ण करायास उपयोगी पडतो.

GLACIER (*glacies*, ice) बर्फाचें पटांगण *n*, किंवा -चा डोंगर.

GLACIS (*glatia*, smoothness) किल्ल्या बाहेरची उतरती जमीन *f*.

GLAD * *a*. pleased संतुष्ट, खुश; cheerful आनंदी, आनंदाचा, in comp. आनंद; exciting joy आनंदकारक -प्रद, हर्षकर [of]. -DEN *v*. हर्षविणें, संतुष्ट -खुश क. -LY *ad*. आनंदानें. -NESS आनंद, हर्ष, संतोष. -SOME *a*. संतुष्ट, खुश; आनंदाचा, हर्षप्रद.

GLADE *W*. अरण्यांतील बखळ *f*?

GLADIATOR (*gladius*, sword) तलवार -पट्टा खेळणारा; prize-fighter कुस्ती खेळणारा.

GLAIR * अंड्यांतील पांढरा बील.

GLANCE *Ger*. a sudden shoot of light झळक *f*; —of the eye दृष्टिविक्षेप, नेत्रकटाक्ष.— *v. i*. चकाकणें, झळकणें; dart aside ओझरता -कातरता जाणें -पडणें; snatch a momentary or hasty view कान्या डोळ्यानें पाहणें, ओझरता पाहणें [at, round].—*t*. प्रेक्षणें, टाकणें.

GLAND (*glans*, acorn) an organ formed by the convolution of a number of vessels पित्तादिक रसांची शरिरांतील पिशवी *f*, मांसग्रंथी *f*, पिंड. -ERS, a contagious and very destructive disease of the mucous membrane in horses, characterized by a constant discharge of sticky matter from the nose, and an enlargement and induration of the glands beneath and within the lower jaw शेंबा, कनार *H*.

GLARE * a bright dazzling light चकाकी *f*, झकाकी *f*; a fierce, piercing look गुरकी *f*, उग्रदृष्टि *f*.—*v. i*. चकाकणें, झळकणें; टीकारणें, डोळे वटारून पाहणें, फडी फिंदारणें [upon, on].

GLASS * a hard, brittle, transparent substance कांच *f*; any thing made of glass कांचेची वस्तु *f*; a looking-glass आरसा; an hour-glass रेतीचें घड्याळ *n*, डमरू; [the time in which a glass is exhausted of its sand]; a tumbler कांचेचा प्याला, 'ग्लास' *n*, *m*; a lens दुरबीण वगैरे यंत्राची कांच *f*; a weather-glass वायुमापक यंत्र *n*; *pl* spectacles चश्मा.—*a*. कांचेचा.—*v*. आरशांत पाहणें; reflect, as in a mirror आरशांत प्रतिबिंब उमटणें; cover with glass कांच लावणें. -CUTTER खिडकी वगैरेस बसविण्या करितां कांच कापणारा. -HOUSE कांच करण्याचा कारखाना. -MAN कांचविक्या.—GLASSY *a*. कांचेचा; कांचे सारखा नितळ -साफ इ० (stream, surface). —GLAZE *v*. furnish with glass कांच बसविणें -लावणें; overlay with some thing smooth and shining रोगण लावणें; incrust with a vitreous substance लाखलोटें क. — GLAZIER कांच -तावदान बसविणारा, बोहोरी.

GLEAM * a shoot of light चमक *f*, झगमग *f*; ray किरण *n*; brightness प्रभा *f*, तेज *n*; with a sudden g. चकक्कन, झक्कन.—*v. i.* चकचकणें, लकलकणें.

GLEAN *v. F.* gather after a reaper शेतांत दाणें टिपणें -वेचणें; collect with patient and minute labor धिम्या व मुंगीच्या श्रमानें मिळविणें (facts).—*i.* सरवा वेचणें [after, from]. -ER सरवा वेंचणारा, उंच्छवृत्ति. -ING वेंचणें *n*; subsistence upon g. उंच्छवृत्ति *f*.

GLEBE (*gleba*, clod) काळी *f*, जमीन *f*; land belonging to a parish church धर्माध्यापकभूमि *f*.

GLEE* आनंद, हर्ष; [a piece of music].

GLEET* a transparent mucous discharge from the membrane of the urethra परमें *n*; g. with contraction of the frenum तिडीक परमें *n*.

GLEN* दरा, खोरें *n*.

GLIB *a. F.* smooth गुळगुळीत; slippery निसरडा; voluble लुबलुब -चुरचुर बोलणारा.

GLIDE* *v.* flow gently हळू -संत वाहणें; move smoothly and swiftly सुळकन -सुरकन जाणें [along, over, in, out].

GLIMMER *v. Ger.* मिणमिणणें, टिकटिकणें.—*n.* मिणमिण *f*, टिकटिक उजेड. -ING झुळूक *f*, छाया *f*. — GLIMPSE, faint light टिकटिक उजेड; transitory view झुळूक *f*, अर्धवट पाहणें *n*, ईषद्दर्शन *n*; to afford a g. of देखावा दाखवणें; to catch a g. of ओझरता पाहणें [of].

GLISTEN,* GLITTER *v. i.* चकचकणें, तकतकणें [with].—GLITTER चकाकी *f*, तकाकी *f*, चमक *f* [with].

GLOAT *v. i. Ger.* लाळ घोटणें.

GLOBE (*globus*) a sphere गोळा, गोल; any thing globular in shape गोलाकार वस्तु *f*, गोल; the earth पृथ्वी *f*, भूगोल; a round model of the earth कृतीचा भूगोल, 'ग्लोब'; —of the heavens खगोल.—AMARANTH झेंडू? काफरी गोंडा? — GLOBULOUS, GLOBULAR *a.* गोलाकार, वाटोळा.—GLOBOSITY गोलपणा, गोलत्व *n*.—GLOMERATE *v.* गोळा क., गुंडी क. —*a.* घोळक्यानें वाढणारा, एका ठिकाणीं जमून वाढणारा (flowers).

GLOOM * partial or total darkness अंधारी *f*, धुंदाई *f*, काळोखी *f*; melancholy उदासपणा, औदासिन्य *n*.—GLOOMY *a.* अंधक, धुंद; उदास, उदासीन.

GLORY (*gloria*) praise, honor, admiration, or distinction, accorded by common consent to a person or thing गौरव, स्तुति *f*, प्रशंसा *f*: g. to God in the highest (Luke ii. 14); high reputation महिमा *f*, महात्म्य *n*, सु -सत्कीर्ति *f*: spread his g. through all countries; the presence of the Divine Being ईश्वराचें समीक्षत्व *n*; heaven आकाश *n*, स्वर्ग *n*: Thou shalt guide me with Thy counsel, and afterward receive me to g. (Ps. lxxiii. 24); *Paint.* a circle of rays, or a circular effulgence, surrounding the head or entire figure of saints, &c., and especially of the Savior अंशुमाला *f*, प्रभावळ *f*?.—*v. i.* exult with joy आनंद -हर्ष क., हर्षानें उचंबळणें; boast बढाई -फुशारकी क. [in, at].—GLORIFY *v.* गौरव -स्तुति क.; मोठेपणा -मान देणें.—GLORIOUS *a.* तेजवान, तेजश्वी; प्रतापशाली, कीर्तिमान; बढाईखोर, फुशारखोर.

GLOSS (*glossa*) polish जिल्हई *f*, ओप *f*;— upon paper, cloth, &c. through rubbing मोहरा; a specious appearance वरपकी देखावा, वरघडी *f*; comment टीका *f*; explanation व्याख्या *f*, अर्थ, शेरा.—*v.* जिल्हाई देणें; सफाई क.; टिप्पण क. -ARY ग्रंथांतील अप्रसिद्ध, पारिभाषिक किंवा कठीण शब्दांचा

कोश. -ARIST टीकाकार, भाष्यकार. -INESS लुसलुसी *f*, तिळतिळी *f*, तकतकी *f*.—GLOSSY *a*. नितळ, गुळगुळीत; सफाईदार, मोहरेदार; —of colors तेल्या;—of boils, grapes, &c. टळटळीत.

GLOVE* हातमोजा.

GLOW* *v. i.* shine with an intense or white heat धगधगणें, रसरसणें; exhibit a strong bright color झळकणें, झकाकणें; — the countenance, plants, &c. लुसलुसणें, तुकतुकणें, टवटवणें; — the mouth, from hot substances झणझणणें, फणफणणें; feel hot, as the skin तापणें, धगधगणें; feel the heat of passion जळणें, संतापणें [with].—*n.* shining heat धग *f*, भडाका, आंच *f*; redness लाली *f*; brightness of color तुकतुकी *f*, टवटवी *f*: g. of health in the cheeks; vehemence of passion संताप, जलाली *f*, तलखी *f*. -WORM सोनकिडा, काजवा, खद्योत.

GLUE (*glutis*) डकवण *n*, (सरस, खळ *f*, वगैरेचें).—*v.* (सरसानें -खळीनें) जोडणें [to, together].—GLUTINOUS *a*. चिकट, चिकचिकित.

GLUT *v.* (*glutire*) swallow greedily अधाशीपणानें गिळणें, गपापा खाणें; fill to satiety ओकारी येई पर्यंत खायाला घालणें, टेर क.; [to g. the market, to furnish an oversupply of any article of trade, so that there is no sale for it] [with].—*n.* रेळ *f*, उपट *f*, रेळचेळ *f*. -TON *a*. खादाड, अधाशी. -TONY खादाडपणा, पोटपूजा *f*, अत्याहार.

GNASH *v. D.* रागानें दांतओंठ खाणें (the teeth). —*i.* दांत करकरां चावणें.

GNAT* चिलट *n*, मुरकूट *n*.

GNAW* *v.* nibble at कुरतुडणें, करांडणें; corrode खाणें, चरणें, खणणें; as remorse, &c. खोंचणें, सलणें, टोचणें.

GNOMON (*Gr.*) *Astron.* शंकुयंत्र *n*.

GO* *v.* pass from one place to another जाणें, चालणें; walk चालणें; have currency चालणें, पसार होणें (money); succeed शेवटास जाणें, पार जाणें, जाणें: how *goes* the night?; conduce उपयोगीं पडणें, सहाय होणें: your counsels *go* against reason; undertake करायास लागणें, हातीं घेणें, पत्करणें: I am *going* to begin harvest; be pregnant महिने जाणें, गर्व्हार असणें;—a female beast गाभ जाणें; depart निघून जाणें, जाणें; die मरणें, जाणें, गत होणें; reach पोंचणें: his land *goes* to the river; about यत्न क., करूं पाहणें; between मध्यें पडणें, मध्यस्थी क.; by वगळणें, वर्जणें; down खालीं जाणें, पुरवणें, पचणें, भावणें [*Low*]; g. for nothing पोकळींत जाणें, फुकट जाणें;—hard with कठीण जाणें;—in and out संसार -कामधंदा क.; into, unto -सीं जाणें, संग क. [*Scrip.*]; on चालणें, पुढें जाणें; चढणें, जाणें: the coat will not g. on; out जाणें, विझणें (lamp); जाणें (life); बाहेर पडणें -फुटणें (a story); over वाचणें; शिकणें; तपासणें (an account); पुनः विचार क., मनन क.; पक्ष बदलणें, दुसऱ्या पक्षाकडे जाणें; फितणें; पार जाणें, तडीपार जाणें;—through निभणें, टिकणें (sickness, study); शेवटास नेणें, तडीस नेणें (an operation); सोसणें; under नांवानें चालणें, म्हणविणें; खचणें, बुडणें; नाश पावणें; let g. जाऊं देणें, सोडणें, मोकळा क. -BETWEEN, interposer मध्यस्थ; broker दलाल. -CART पांगूळगाडा.

GOAD* आर *f*, पराणी *f*.—*v.* आर लावणें -टोंचणें; stimulate उचल -उठवणी क., चेतविणें.

GOAL *F.* the point set to bound a race शर्यतेची हद्द *f*, टिपण *n*, निशाण *n*; final purpose उद्देश, अर्थ.

GOAR, GORE* slip of cloth inserted to widen a garment बच्चा.

GOAT* बकरा, बोकड, शेळी *f*, शेरडूं *n*. -HERD शेरडें राखणारा, शेलक्या, अजापाल.— GOAT-

SKIN सागळ *f*; as dressed for shoes, &c. नरी *f*.

GOBLET *F*. जांब, पंचपात्र *n*.

GOBLIN *F*. भूत *n*, पिशाच *n*.

GOD* an object of worship पूज्य विषय; a being conceived of as possessing divine power, and to be propitiated by sacrifice, worship, &c. कल्पित देव, दैवत *n*, देवता *f*; the Supreme Being परमेश्वर, देव, भगवान, ईश्वर: G. is a spirit, and they that worship Him must worship Him in spirit and in truth (John iv. 24); a ruler अधिकारी; judge न्यायाधीश; an angel दूत [Ex. xxii. 8]; person or thing exalted too much in estimation, or deified and honored as the chief good देव्हारें *n* (Phil. iii. 19); G. grant ईश्वर करो; any thing given to G. देवदत्त; G. of gods देवाधिदेव. -CHILD, one for whom a person becomes sponsor at baptism, and promises to see educated as a Christian धर्मपुत्र. -DESS देवी *f*. -FATHER, a man who becomes sponsor for a child at baptism, in the English and R. C. churches धर्मपिता. -HEAD देवपणा, देवत्व *n*; a god देव; God परमेश्वर, देव. -LESS *a*. देवहीन, धर्मनिंदक, नास्तिक. -LIKE *a*. देवासारखा; ईश्वरी; उत्कृष्ट, अत्युत्तम (virtue). -LY *a*. obedient to the commands of God from love for, and reverence of, His character ईश्वरभक्त, धार्मिक, भक्तिमान; formed or influenced by a regard for God ईश्वरानुसारी, ईश्वराचें भय धरून चालणारा.—*ad*. सुभक्तीनें (2 Tim. iii. 12). -LINESS ईश्वरभक्ति *f*, भक्तिशीलता *f*, सुभक्ति *f*, धार्मिकपणा, साधुपणा: g. is profitable unto all things (1 Tim. iv. 8).

GODOWN (*Malay, gading*) गुदांव *n*, जिन्नस ठेवण्याची कोठडी *f*, कोठी *f*.

GOGGLE *v. i. Scot.* डोळे वटारणें -फिरवणें.—*a*. वटवटीत, गटगटीत (eyes). -EYED *a*. वटवटीत डोळ्यांचा.

GOITEE, GOITRE (*guttur*, the throat) *Med*. enlargement of the thyroid gland appearing on the anterior part of the neck मन्यास्तंभ.

GOLD* a precious metal of a reddish yellow color, and metallic lustre सोनें *n*, सुवर्ण *n*; riches द्रव्य *n*, संपत्ति *f*; money पैका, नाणें *n*; yellow color, like that of the metal पिंवळा जरद रंग, सोनेरी रंग. -CLOTH सोनेरी -जरतारी वस्त्र *n*. -DUST सोन्याची माती *f*. -EN *a*. सोन्याचा; सुवर्णमय, सोन्यासारखा; सोनेरी रंगाचा; highly valuable लाखाचा, लाख्या, लाख रुपयांचा (opinion); g. age, the fabulous age of primeval simplicity and purity of manners in rural employments सत्ययुग *n*; [g. fleece, *Myth*., the fleece of gold fabled to have been taken from the ram that bore Phryxus through the air to Colchis, and in quest of which Jason undertook the Argonautic expedition]. g. rule, [the rule of doing as we would have others do to us; See Luke vii. 31]; त्रैराशिक *n*. -LEAF सोनेरी वरख. -SMITH सोनार.

GONG* *Malay* तास, घड्याळ *n*, घंटा *f*.

GONORRHŒA (*Gr*.) परमें *n*.

GOOD* *a*. possessing desirable qualities चांगला, बरा, उत्तम (Gen. i. 31); serviceable उपयोगी, कामाचा; virtuous सद्गुणी, चांगला, भला (Rom. v. 7); merciful दयाळू; friendly स्नेहभावाचा: he was very g. to me; clever कुशळ, हुशार, जाणता (workman); in a commercial sense, competent, of unimpaired credit, having pecuniary ability चांगला, पतीचा, ऐपतीचा, लायक; actual खरा, वास्तविक: in g. earnest;

considerable बराच, बराच मोठा, पुष्कळ (way, part); complete पुरा, भरलेला, चांगला (measure); not blemished निष्कलंक, चोख, in comp. सु (name, repute, report); a g. fellow खळबळीत मनाचा माणूस, खेळीमेळीचा गडी; as g. as सारखा; as g. as one's word वचना प्रमाणें चालणारा, एकवचनी; g. for nothing कवडीच्या मोलाचा, नकारा, निकामी; to stand g. स्थिर-खंबीर राहणें; to make g. पूर्ण खरा करून देणें (word); शाबीत क., खरा करणें (a charge); भरून देणें, पुरें पाडणें; to think g. मान्य क.; संतुष्ट होणें; बरें वाटणें, योग्य दिसणें; g. and bad नरमगरम, भलाबुरा.—*n.* कल्याणाची गोष्ट *f*, हित *n*, श्रेय *n*; benefit फायदा, हित *n*; *pl* माल, जिन्नस; refused g. पडकेणें *n*; for g., or for g. and all खचीत; बाकीच्या वेळे करितां; शेवटीं.—*ad.* बरें, बेश, ठीक; बराच.—BREEDING विनय, सुशीलता *f*. -BYE *n. & int.* सुखी ऐस, स्वस्ति.— DAY, a term of salutation at meeting or parting सलाम, रामराम.—FRIDAY, a fast, in memory of our Savior's sufferings, kept on the Friday of Passion-Week 'गुड्-फ्रैडे' -चा सण. -LY *a.* comely सुंदर; pleasant मनोरम, रम्य. -MAN दादा, बाबा, महाराज; a husband नवरा; master of a house घरधनी.—MORNING सकाळचा सलाम करितांना असें बोलतात. -NATURED *a.* सालस, भला, सुशील. -NESS चांगुलपणा; kindness दया *f*; benevolence परोपकार, उपकार.—NIGHT रात्रीचा सलाम करते वेळीं असें बोलतात. -WIFE घरधनीण *f* -करीण *f*. -WILL मर्जी *f*, कृपा *f*, मेहेर *f*; *Law*, custom of any trade गिऱ्हाइकी *f*.

GOOSE* हंस; a silly creature वेडगळ, गाढव.

GORDIAN *a.* [pertaining to Gordius, king of Phrygia, or to a knot tied by him, and which could not be untied]; intricate घोटाळ्याचा; g. knot ब्रह्मग्रंथी *f*.

GORE * blood रक्त *n*; clotted blood गोठलेलें रक्त *n*, रक्ताचीं चकळें *n pl.*— GORY *a.* रक्तबंबाळ, रक्तानें भरलेला.

GORE * *v.* भोसकणें, बोचकणें.

GORGE *F.* throat गळा, कंठ, घसा; narrow passage अरुंदवाट *f*; defile खिंडवाट *f*; [that which is gorged, esp. by a hawk or other fowl].—*v.* swallow with greediness गटगटां गिळणें; glut दपटून -आकंठ जेवणें [on, with].

GORGEOUS *a. F.* भडक, झळकफळक, छानदार.

GORMANDIZE *v. i. F.* दपटून जेवणें, अधाशीपणें खाणें, धणंगणें.— GORMANDIZER दपट्या, खादाडमावसा.

GORY, See under GORE.

GOSPEL * glad tidings सुवार्त्ता *f*, शुभवार्त्ता *f*; the good news concerning Christ and His salvation शुभवर्त्तमान *n*, मंगलसमाचार; one of the historical narratives of the life and sayings of Jesus Christ, the Savior शुभवर्त्तमानाचें पुस्तक *n*, श्री येशूखीस्तचरित्र *n*.—*a.* शुभवर्त्तमाना सारखा; -संबंधी -चा.

GOSSIP * idle tattler बात्या, गप्पीदास; place where *gossips* meet चवाठा; idle and groundless rumor गप *f*, गपसप *f*, खबरबात *f*; See SPONSOR—*v.* गप्पा छाटणें, बाता कुटणें [with, about].

GOURD *F.* भोपळा.

GOUT (*gutta*, drop) वातरोग, संधिवायु, पादांगुष्ट रोग.

GOVERN *v.* (*gubernare*) direct and control, as the actions or conduct of men, either by established laws or by arbitrary will राज्य -अमल -अधिकार क.-चालविणें; restrain आवरणें, आटोपणें, स्वाधीन -हुकमांत ठेवणें (passions); direct रोख -शिस्त धरणें (the motion of a ship); *Gram.* कारकान्वय पावणें [over, by]. -ABLE *a.* आवरायाजोगा, कह्यांत -हुकमांत ठेवण्याजोगा; obedient

धन्य, हुकमी. -ESS नायकीण *f*, स्वामीण *f*; an instructress शिकविणारीण *f*, शिक्षकीण *f*. -MENT अधिकार क. *n*; exercise of authority अधिकार, अमल, सत्ता *f n*; direction मार्गदर्शन *n*; control अटोप, नियमन *n*; the established form of law बंदोबस्त, कानु *f*, कायदा; right or power of governing अधिकार, सत्ता *f*: I resign my g. to thee; the ruling power राज्य *n*, सरकार *n*; the body politic governed by one authority सरकार, राज्य *n*, संस्थान *n*: the *governments* of Europe; *Gram.* कारक. -OR अधिकारी; नियंता, नियामक;—of a district मामलेदार, सुभेदार;—of a presidency सर सुभेदार, गवर्नर;—of a county चकलेदार;—of a fort किल्लेदार; [*Mach.*, a pair of heavy balls connected with machinery, designed to equalize speed]. -SHIP अधिकाऱ्याची -गवर्नराची जागा *f* हुद्दा.

GOWN *W.* the ordinary upper dress of a woman पेशवाज, 'गवन;' the official robe of certain professional men and scholars झगा, जामा; a judge's g. लबाद *Hind.*; civil officers, in distinction from military दिवाणी -मुलकी अमलदार लोक *pl*; any sort of dress पोशाक, वेष, लिबास.

GRACE (*gratia*) exercise of love, kindness, or good-will दया *f*, कृपा *f*, करुणा *f*; divine favor toward man ईश्वरी कृपा *f*, अनुग्रह; inherent excellence गुण, आंगचा गुण; beauty सौंदर्य *n*, लावण्य *n*, शोभा *f*: [title of a duke or an archbishop, and formerly of the king of England]; a short prayer before or after a meal; *Eng. Univ.* act, vote, or decree of the government of the institution]; to get into one's *graces* पोटांत शिरणें; to get out of one's good *graces* मर्जीतून उतरणें; [day, of g., *Theol.*, time of probation, when an offer is made to sinners; days of g., *Com.* the days immediately following the day when a bill or note becomes due, which days are allowed to the debtor or payer to make payment in. In Great Britain, the days of g. are three; means of g., means of securing the divine favor, or of promoting right feeling toward God; to say g., to render thanks before or after meals].—*v.* सुशोभित मंडित क., शोभा देणें; dignify or raise by an act of favor उपकार करून थोरपणा देणें -थोर पदावर बसविणें [with]. -FUL *a.* सुंदर, लावण्य, सुरूप, साजरा, गोजरा, छबदार, गोजिरवाणा (deportment, speaker, air); g. walk सुगति *f*; g. speech वाग्विलास [in]. -FULNESS छब *f*, गोजरेपणा, लावण्य *n*. -LESS *a.* देवाधर्मानें टाकलेला, अतिदुष्ट.—GRACIOUS *a.* कृपाळू, उपकारी; merciful दयाळू (Nehem. ix. 17); acceptable प्रिय, आवडता (child); beautiful सुंदर; produced by divine grace ईश्वरी अनुग्रहानें झालेला -अनुग्रहाचा (affections) [to].

GRADE (*gradi*, to step) पायरी *f*, दरजा, पद *n*.—GRADATION क्रम, पर्याय; अनुक्रम; in regular g. यथाक्रम, क्रमशः, पायरी पायरीनें.—GRADATORY *a.* पर्यायानें जाणारा; adapted for forward motion पुढें चालायाजोगा.—GRADIENT *a.* पायरीनें चालणारा; rising and descending by regular degrees of inclination चढता उतरता: g. line of a railroad.—GRADUAL *a.* क्रमाचा, उत्तरोत्तर, थोडाथोडा. -LY *ad.* क्रमानें, होतहोत, थोडाथोडा.—GRADUATE *v.* mark with degrees अंश -भाग मांडणें, दरजे पाडणें; admit or elevate to a certain degree; usually in a college or university, to admit to an honorable standing defined by a diploma पाठशाळेंतील पदवी किंवा सनद देणें; prepare gradually हळूहळू -पर्यायानें तयार क.: dyers advance and g. their colors with salt.—*i.* पाठशाळेची सनद मिळविणें; change gradually

क्रमानें -हळूहळू बदलणें -रूपांतर पावणें.— *a.* दरजे पाडलेला, क्रमानें लावलेला.— *n* ज्यास पाठशाळेंतील सनद मिळाली आहे तो, 'ग्राज्युएट.' See the verb.

GRAFT* *v.* कलम क. -लावणें [on].—*n.* कलम *n.*

GRAIN (*granum*) a single small hard seed दाणा, बीं *n*;—of certain plants, like corn and wheat दाणा; fruit of certain kindred plants which constitute the chief food of man धान्य *n*, दाणा; any small, hard particle दाणा, बीं *n*;—of gunpowder, sugar, &c. रवा, कण;—of wood हीर; any small portion कण, लेश, गुंज *f*, रती *f*: a g. of sense; a small weight एक लहान वजन आहे, 'ग्रेन';—against the g. प्रतिलोम, विलोम; with the g. अनुलोम; in g. खोल -आंत बसलेला; g.-merchant मोदी, भुसारी; *pl* the husks or remains of malt after brewing, or of any grain after distillation अर्क काढलेल्या दाण्याचा चोथा; to dye in the g. धान्याचा रंग देणें; पक्का रंग देणें; to go against the g. of त्रासदायक असणें, त्रास देणें, पीडा. क.—*v.* लांकडाच्या हिरा सारखा रंग देणें; रवा क.—*i.* रवा होणें -जमणें.—GRANARY धान्याची कोठी *f* -चें कोठार *n.*—GRANIVOROUS *a.* धान्यभक्षक, धान्योपजीवी.

GRAMINIVOROUS *a.* (*gramen*, grass) गवत खाणारा, तृणोपजीवी, तृणचर.—GRAMINEOUS *a.* गवता सारखा; गवताच्या जातीचा, तृणजातिक.

GRAMMAR (*Gr. gramma*, letter) the science of language व्याकरण *n*, भाषाशास्त्र *n*; the art of speaking or writing with propriety or correctness व्याकरण *n*, शुद्ध रीतीनें बोलणें किंवा लिहिणें याची विद्या *f*; treatise of the principles of language व्याकरणाचें पुस्तक *n*, व्याकरणग्रंथ; treatise on the elements of any science विद्यामूलतत्वग्रंथ, विद्येच्या परिभाषेचें पुस्तक *n.* -IAN *a.* व्याकरणविद्या जाणणारा, व्याकरणवेत्ता, वैयाकरण, व्याकरण शिकविणारा. -SCHOOL लाटीन, ग्रीक इ० भाषा शिकण्याची शाळा *f.*—GRAMMATICAL *a.* व्याकरण संबंधी, व्याकरणाचा (rule); व्याकरणाच्या नेमाप्रमाणें, व्याकरणशुद्ध (sentence).

GRANARY, See under GRAIN.

GRAND *a.* (*grandis*) of large size or extent मोठा, थोर (mountain, army, mistake); great in size, and fine or imposing in appearance भव्य, थाटमाटाचा, वैभवशाली (monarch); sublime मोठा, प्रगल्भ, महान् (view, conception); holding an elevated or advanced rank श्रेष्ठ, वडील, थोर. -CHILD नातवंड *n*; great-g. पणतवंड *n* -तोंड *n*; g. of g. of निपणत्वंड *n.* -DAUGHTER—in a male or female line नात *f*; son's daughter पौत्री *f*; daughter's daughter दौहित्री *f*; great-g. पणती *f*, प्रपौत्री *f*; husband of g. नातजांवई. -FATHER—pat. आजा, बापआजा;—mat. आजा, मातामह. -MOTHER—pat. बापआजी *f*, आजी *f*;—mat. मायआजी *f*, मातामही *f*; great-g. पणजी *f*, प्रपितामही *f*. -SIRE आजा; ancestor वडील, पूर्वज. -SON—in a male or female line नातू, नातवंड *n*; son's son पौत्र; daughter's son दौहित्र; g. of great g. खापरपणतू; wife of g. नातसून *f*;—of great g. पणतसून *f*.—GRANDEE बडालोक, सरदार, उमराव.—GRANDEUR मोठेपणा, थोरी *f*, वैभव (of an edifice, &c.); बडेजाव, थाटमाट, डौल (of a court, procession, &c.).

GRANITE (*granum*, grain) एक जातीचा कठीण दगड आहे.

GRANIVOROUS, See under GRAIN.

GRANT *v. F.* give over;—usually in answer to petition देणें, हवाली करणें, हक्क सोडणें; confer देणें, बक्षीस -बहाल क.; admit as true when disputed or not satisfactorily proved कबूल-मान्य क., क्षणभर-वादासाठीं कबूल क.—*n.* इनाम *n*, दान *n*, देणगी *f*;—of maintenance वृत्तिदान *n*; — of

safe conduct अभयप्रदान *n*; a written g. लेखपत्र *n*; a. g. of land as subsistence without service attached सानक *f*; a royal g. शासन *n*, पट्टा. -EE इनाम घेणारा, प्रतिगृहिता.

GRANULE (*granum*, grain) दाणा, कण, रवा. —GRANULAR *a* दाण्याचा, रवेदार.—GRANULOUS *a*. दाण्यानें भरलेला, कणमय. —GRANULATE *v*. रवा -कण जमविणें;—as a sore माठळणें, शेजेस येणें, मठारणें.—*i*. रवेदार होणें, रवा जमणें.

GRAPE *F*. द्राक्ष *n*, अंगूर *n*; seedless g. बेदाणा; dried *grapes* मनुका *f pl*. -SHOT कुलपीगोळा. -VINE द्राक्षा *f*, द्राक्षवेल.

GRAPHIC *a*. (*Gr. graphein*, to write) लेखनविद्ये संबंधी; written लिहिलेला, लिखित; well delineated मनांत ठसेल असा, सुवर्णित, स्वरूपबोधक.

GRAPPLE *v*. *F*. पकडणें, झोंबणें, धरणें.—*i*.—with -शीं झोंबी घेणें -लढणें -भिडणें.—*n*. बाहुयुद्ध *n*, झोंबी *f*.—GRAPNEL, a small anchor लोली *f*.

GRASP *v*. *Ger*. मुठींत-पंजांत-कबजांत धरणें, पकडणें [with].— *n*. धरणें *n*, पकड *f*, मुष्टिगृह; wide-reaching power of intellect to comprehend subjects पोंच *f*, आवाका, ग्रह.

GRASS* (*Skr. gras*, to devour) गवत *n*; *Bot*. तृणधान्य *n*. -HOPPER गवत्या टोळ, नाकतोड्या. -PLOT गवताचें मैदान *n*.—GRASSY *a*. गवताळ, गवताचा, तृणमय; गवतासारखा; हिरवा, चारीसारखा.

GRATE (*crates*, hurdle) a framework composed of parallel or cross bars, with interstices गजांची जाळी *f*; a frame of iron bars for holding coals, while burning as fuel लोखंडी शेगडी *f*.—GRATING गजांचा कठडा -ची जाळी *f*; a harsh sound or rubbing कर्कश शब्द, करकर *f*; घर्षण *n*, संघट्टण *n*.—*v*. *F*. घांसणें, चोळवटणें; —as the teeth करकरणें, खरखरणें; wear away in small particles किसणें, घांसून कीस काढणें (a nutmeg); fret खिजविणें, चिढविणें.—*i*. चोळवटणें, घांसणें; कर्कश लागणें [against, on, upon].—GRATER किसणी *f*.

GRATEFUL *a*. (*gratus*) having a due sense of benefits आभारी, कृतज्ञ; pleasing आवडता, गोड, सुखप्रद; delicious मधुर, गोड, सुरस [to]. -LY *ad*. कृतज्ञतापूर्वक, उपकार स्मरून.—GRATIFY *v*. संतोषविणें, खुश क.; satisfy तृप्त क.; पुरवणें [with].—GRATIFIED तुष्ट, तृप्त; कृतार्थ.—GRATIFICATION संतोषविणें *n*, संतोषीकरण *n*; पुरवणें *n*, संतर्पण *n*; तृप्ति *f*, तुष्टि *f*, संतोष; that which affords pleasure सुख *n*, पारितोषक.— GRATITUDE, warm and friendly feeling toward a benefactor कृतज्ञता *f*. उपकारस्मरण *n*. —GRATIS *a*. फुकट, भुकत, बिनपैशाचा -मोलाचा.—GRATUITOUS *a*. फुकटचा, मुफतचा; without proof निराधार, अप्रमाण.—GRATUITY बक्षीस *n*, इनाम *n*.

GRAVE* an excavation in the earth as a place of burial गार *f*, शवगर्ता *f*, कबर *f*, प्रेताची खांच *f* -चा खाडा. -CLOTHES *pl* प्रेतवस्त्रें *pl*. -DIGGER प्रेताचा खाडा खणणारा. -STONE शवगर्तेवर पुरलेला धोंडा. -YARD मसणवट *f*.

GRAVE* *v*. engrave कोरणें, खोदणें; carve out or give shape to कोरून रूप -डौल देणें -आकारणें.—GRAVEN *a*. कोरलेला, कोरीव (Ex. xx., 4).

GRAVE *a*. (*gravis*, heavy) भारी, वजनदार, गंभीर, भरकूम (character, deportment); not acute मंद, प्लुत (sound). -LY *ad*. भरकूमपणानें, न हांसतां.—GRAVID *a*. गर्व्हार, गरोदर. —GRAVITATE *v*. *i*. केंद्राकडे वळणें [to, towards].—GRAVITATION, that species of attraction or force by which all bodies or particles of matter in the universe tend

toward each other गुरुत्वाकर्षण *n.*—GRAVITY, sobriety of character or demeanor भरकूमपणा, भरकुमी *f*; weight वजन *n*, गुरुत्व *n*; महत्व *n*; tendency of a mass of matter toward a centre of attraction केंद्राकर्षण *n.*

GRAVEL *F.* small stones or fragments of stone कंकर, रेव *f*; *Med.* disease produced by small, calculous concretions in the kidneys and bladder मूतखडा, शर्करा *f*.

GRAVY* पक्व मांसरस, 'ग्रेवी' *f*, सुरवा *Hind.*

GRAY, GREY *a.* of the color of hair whitened by age पिकलेल्या केशाच्या रंगाचा, पांढरा, पलित; white mixed with black, as the color of pepper and salt, or of ashes कबरा, धूसर; iron-g. करडा; dark mixed color कैरा; mature वृद्ध, पक्व (experience).

GRAZE* *v.* touch lightly in passing चाटून -लागून जाणें; feed on चरणें; tend grazing cattle गुरें चारणें [off].—GRAZIER गुरें चारणारा, गुराखी.

GREASE *F.* animal fat in a soft state चरबी *f*, मांदें *n*; oily matter of any kind माखण *n*;—for axles, &c. ओंगण *n*; a disease in the legs of horses भेंडी.—*v.* चरबी लावणें, माखणें; bribe लांच देणें; cheat फसविणें [with].—GREASY *a.* तेलकट, स्निग्ध, चिकण; smeared with grease चुळबुळीत, ओशट; भेंड्या रोगाचा -लागलेला.

GREAT* *a.* large मोठा, थोर (house); large in number मोठा, बहुत, पुष्कळ (multitude); long-continued पुष्कळ, बहुत, दीर्घ (period); superior श्रेष्ठ, महान, उत्तम (thought, action); powerful बलाढ्य, मोठा, थोर, पराक्रमी (hero, scholar); distinguished नामांकित, थोर, बडा (men); chief मुख्य, सर, अग्र (seal); weighty भारी, वजनदार, थोर (argument, principle); older वडील, मोठा; g.-grandson पणतू; by the g. सर्व, एकंदर, साकल्य, सरसकट; the g. बडे लोक *pl*, महाजन *pl*; श्रीमंत, तालेवंत. -LY *ad.* फार, बहुत, अति (Gen. iii., 16); शौर्यानें, प्रतापानें, पराक्रमानें: by a high fate thou didst g. expire. -NESS मोठेपणा, थोरपणा; swelling pride दिमाख, अक्कड *f*, अभिमान; magnanimity मनाचा मोठेपणा, महात्मता *f*, उदार बुद्धि *f*; force जोर, कडाखा, झपाटा: g. of sound, heat, passion.

GRECIAN *a. Geog.* ग्रीस देशाचा.—*n.* ग्रीस देशचा राहणारा; [a Jew who understood Greek (Acts vi., 1); one well versed in the Greek language, literature, or history].

GREEDY* *a.* having a keen appetite for food or drink खादाडपिदाड, अधाशी, बुभुक्षित; eager to obtain हावरा, अहोपी, अत्याकांक्षी: g. of gain [of].—GREEDINESS अधासीपणा, खवखव *f*, लोभ, सोस.

GREEN* *a.* having a color composed of blue and yellow rays हिरवा, हरितवर्ण; wan पिकूट, पांढरा, फटफटीत: to look so g. and pale; not ripe कच्चा, हिरवा (fruit); immature in experience अजाण, अज्ञान, हिरवट, कच्चा; awkward अडाणी;—in years बाल, पोर; not dry हिरवा, ओला, चिंबट (wood); dark g. हिरवाचार.—*n.* हिरवा रंग; *pl* हिरवळ *f*, सबजी *f*; *pl* भाजी *f*, भाजीपाला. -HOUSE कोंवळीं झाडें राखण्याकरितां केलेलें घर *n.* -ISH *a.* कांहींसा हिरवा, हिरवट. -MARKET माळहट, माळसात *f*, मंडई *f*. -NESS हिरवेपणा; कोंवळेपणा, ओलेपणा; कच्चेपणा, अपक्वदशा *f*, इ०. -SWARD हिरवळ जमीन *f*.

GREET* *v.* नमस्कार-रामराम-सलाम क., कुशल प्रश्न विचारणें [with]. -ING सलाम, कुशल प्रश्न, अभिनंदन *n.*

GREGARIOUS *a.* (*grex*, herd) कळपांत राहणारा, समूहचर, संघचर.

GRENADIER (*F.*) one of a company of tall, stout soldiers, selected for the

place, which takes post on the right of a battalion, and leads it in every attack उंच शिपाई, ग्रेनेडियर रिजमिंटीतला शिपाई.

GREYHOUND* एक जातीचा शिकारी कुत्रा.

GRIEF (*gravis*, heavy) pain of mind on account of some thing in the past दुःख *n*, शोक, खेद; cause of sorrow दुःखास कारण *n*, दुःखमूळ *n*; grievance दुःखाची कथा *f*, रड *f*, संकट *n*; [at, with, for].—GRIEVE *v.i.* शोक क., कष्टी -दुःखी होणें [at, for];—for a person gone धोसरा धरणें; — for a thing lost चुरमुरणें.—*i.* दुःख देणें, रडवणें.—GRIEVANCE, that which gives ground for remonstrance or resistance, as arising from injustice, tyranny, &c. जुलूम, पीडा *f*; सखती *f*, जाच.—GRIEVOUS *a.* दुःखकारक, दुःखप्रद; heinous जड, अवघड, भारी (crime) full of grief दुःखाचा, दुःखभरित (cry).

GRILL *v. F.* गजावर -शिगेवर -शेगडीवर भाजणें.

GRIM* *a.* भयंकर तोंडाचा, उग्रमुख, अकराळ. -ACE माकडचेष्टा *f*, वांकुली *f*.

GRIME* काट, कीट, कट.—*v.* किटवणें, काटवणें; to be *grimed* किटणें [with].

GRIN* *v. i.* दांत विचकणें -दाखवणें, खिसखिस हांसणें [at].

GRIND* *v.* reduce to powder by friction, as in a mill दळणें, पिसणें;—with the teeth चावणें, चर्वण क.; whet धार लावणें, पाजवणें; make smooth साफ -गुळगुळीत क.; rub वाटणें;—the teeth कडकडा चावणें;—as with the teeth कडकडा चावणें; masticate चावणें, चर्वण क.; oppress by severe exactions जाचणें, पिडणें, खलणें, तेल काढणें [up].—*i.* दळणें; become ground दळून पीठ होणें; धार लागणें -येणें; drudge काबाडकष्ट क. -ER दळपी, दळ्या; a molar दाढ *f*. -STONE सहाण *f*, निसणा;—for spices पाटा;—for corn जातें *n*, चक्की *f*.

GRIP, GRIPE* *v.* clasp closely with the fingers मुठींत गच्च धरणें; seize and hold fast कबजांत धरणें; give pain to the bowels of पोटांत मुरडा क., पोट मुरडणें; distress जाचणें, पिडणें.—*i.* कबजांत धरणें; पोटांत मुरडा क.—*n.* कबज *n*, पकड *f*, मिठी *f*;—of an opponent in argument चिकाटी *f*, पकड *f*; handle मूठ *f*; clutch कचाटी *f*, तावड *f*, डाव; *pl* पोट दुखणें *n*, मुरडा; oppression जाच, काच.

GRISLEA, *Bot.*—tomentosa धायटी *f*.

GRIST* quantity ground at one time दळण *n*, घाणा.

GRIT* coarse part of meal भरड *f*, सांजा.—*v.* GRITTY *a.* कचकचीत, किचकिचीत, रेंवाळ.

GROAN* *v. i.* give forth a low, moaning sound कण्हणें, कुंथणें; strive after earnestly झटणें, कुंथणें, धौशा लावणें.

GROCER *F.* (चाहा, काफी, मसाला वगैरे) किराणा विकणारा, वाणी.—GROCERY किराणा.

GROG *F.* मद्य आणि पाणी यांचें मिश्रण *n*.

GROIN *Icel.* जांघ *f*, मांडीचा सांधा, ऊरुसंधि.

GROOM *D.* a servant चाकर, नफर; boy who has the charge of horses घोडेवाला, मोतद्दार, अश्वपालक.

GROOVE* खांचणी *f*, खोदणी *f*.—*v.* खांचणी पाडणें, खोदणें.

GROPE* *v. i.* अंधारांत चांचपणें -चांचपून पाहणें; [about, for, along].

GROSS *a. F.* large मोठा, स्थूल, जाडा; coarse जाडा, स्थूल; stupid जड, मंद, स्थूलबुद्धि; obscene बिभत्स, अचकटविचकट; thick जाड, दाट, घन (medium); great मोठा, धडधडीत, ठळक (mistake, injustice); whole कच्चा, ठोक (sum); g. receipts कच्ची आमदानी *f*.—*n.* the bulk भर -ठोकरास *f*; number of twelve dozen चोवीस छकड्या *f pl*; in the g. ठोक, एकरकम, उधड, उबलक.

-NESS मोठेपणा, स्थूलत्व *n*, भसाडेपणा; भारीपणा; बाष्कळपणा, &c.

GROTTO* गुहा *f*; artificial g. क्रीडाकंदर *n*.

GROTESQUE *a*. (*F*.) वेडा, विद्रा, विलक्षण.

GROUND* surface of the earth जमीन *f*, भुई *f*, भूमि *f*; territory देश, प्रदेश; estate वतन *n*, जमीन *f*; field शेत *n*, जमीन *f*; g. on the bank of a river बाऊळ *f*; foundation जागा *f*, पाया, थारा; floor जमीन *f*, भुई *f*; first principles आदिकारण *n*, मूलहेतु, उपपत्ति *f*; surface on which a figure or object is represented जमीन *f*, भूमि *f*; *pl* dregs गाळ, रेंदा, मळ (coffee-*grounds*); to gain g. पुढें जाणें; सवड साधणें; to give g. मागें हटणें; to lose g. मागें हटणें; संधि-सवड गमावणें; पत गमावणें; मोडकळीस येणें. —*v*. lay on the ground जमिनीवर ठेवणें; found स्थापणें; furnish ground for आधार-प्रमाण देणें; instruct in elements or first principles मूल ग्रंथांत पक्का क., परिभाषा शिकविणें [on, upon].—*i*. तळास-भुईस लागणें. -AGE, tax paid by a ship for the ground or space it occupies while in port जहाजाचें भुईभाडें *n*. -FLOOR खालचा मजला. -LESS *a*. wanting cause अकारण, निष्कारण; —a report, &c. निराधार, निर्मूल. -NUT भुईमूग. -PLOT घरटा. -RENT भुईभाडें *n*. -WORK पाया, बुडखा; first principles आदिकारण *n*, बीज *n*.

GROUP *F*. cluster झुपका; assemblage जमाव, घोळका, टोळी *f*; assemblage of figures चित्रांचा जमाव.—*v*. एकत्र क., जमविणें [together].

GROUSE* a bird पकोरडी *f*.

GROVE* राई *f*, वन *n*, बन *n*, उपवन *n*; mango-g. आंबराई *f*.

GROVEL *v*. *i*. *Icel*. creep भुई धरून चालणें, रांगणें; be low or mean अधमवृत्तीनें चालणें, थुंकी झेलणें.

GROW* *v*. *i*. increase in size by a natural and organic process वाढणें, वाढत जाणें; be augmented वृद्धि पावणें, वाढणें; thrive उफाटणें, उफाट्यानें वाढणें; be produced by vegetation उपजणें, रुजणें, होणें, वाढणें: rice *grows* in warm countries; become होणें: to g. poor; to g. over -वर वाढणें; to g. out of निघणें; to g. up पक्वदशेस येणें -पावणें [to].—*t*. पिकविणें, उत्पन्न क.: to g. wheat.—GROWTH वाढ *f*, वृद्धि *f*; that which has grown उपज, उत्पन्न *n*.

GROWL *v*. *i*. *Ger*. गुरकणें, गुरगुरणें [at].—*n*. गुरगुर *f*.

GRUB *v*. *i*. *Ger*. खुरपणें, खुरप्यानें काढणें.—*n*. किडा, कृमि.

GRUDGE *v*. *F*. envy हेवा क.; part with reluctantly नाखुशीनें देणें.—*i*. -वर कुरकुरणें (James v., 9).—*n*. अकस, चुरस *f*, दावा, पोटफुगी *f*.—GRUDGINGLY *ad*. नाखुशीनें, कुरकुरत, रडत.

GRUEL *F*. पेज *f*, कणेरी *f*.

GRUFF *a*. *D*. कडक, दाष्ट, तोडून बोलणारा.

GRUMBLE *v*. *i*. *D*. murmur with discontent कुरकुर क., कुरमुरणें; growl गुरगुरणें; rumble गडगडणें [at, about].

GRUNT* *v*. *i*. डुरडुरणें, डुरडुर क. [at].

GUAIACUM *Sp*. लोहलांकूड वृक्ष.

GUARANTEE, -TY *F*. a promise to answer for the payment of some debt, or the performance of some duty, in case of the failure of another person, who is, in the first instance, liable to such payent or performance हामी *f*, जिम्मा *f*, जामीन; one who binds himself to see the undertaking of another performed जामीन, हामीदार [against, for]; [the person to whom a guarantee is made]. —*v*. जामीन-हमीदार होणें, हमीभरणें; undertake to secure to another, at all events

कसेंही करून दुसऱ्यास मिळवून देण्याचें पत्करणें -विडा उचलणें; indemnify तोटा होऊं न देणें [against].

GUARD *v. F.* protect from danger संभाळणें, संभाळ -रखवाली क.; protect the edge of, esp. with an ornamental border मगजी लावणें.—*i.* जपणें, संभाळणें, सावध राहणें [against, by, from, with].—*n.* राखण *f*, चौकी *f*, पाहरा; a sentinel पाहरेकरी; one who has charge of a mail coach or a railway train 'गार्ड'; any fixture or attachment designed to protect or secure against injury, soiling or defacement, theft or loss आवरण *n*, त्राण *n*, रक्षण *n*; part of a sword-hilt which protects the hand खोबळा; ornamental edge of a garment मगजी *f*; chain or cord for fastening a timepiece to one's person घड्याळ अंगावर लटकविण्याची सांखळी *f*; [fence to prevent falling from the deck of a vessel]; advanced g. लष्कराच्या आघाडीची टोळी *f*, बिनी *f*; life-g. हुजरात *f*; to be on one's g. हुशारींत राहणें; rear-g. पिछाडी *f*; [to run the g., to pass the watch without leave]. -ED *a.* सावध, हुशार: he was g. in his expressions; सावधगिरीचा, हुशारीचा (expressions). -IAN राखणारा, राखणदार; *Law*, one who has, or is entitled to, the custody of the person or property of an infant, a minor without living parents, or a person who is incapable of managing his own affairs पालक. -ROOM पाहरेकऱ्याची खोली *f*, चौकीखाना *H*.

GUAVA *F.* पेरू, जांब.

GUESS *v. D.* अटकळीनें काढणें -सांगणें;—as a riddle सांगणें, जिंकणें; hint upon ताडणें, ओळखणें.—*i.* अटकळ क. [of, at, about].—*n.* अटकळ *f*, अजमास; mere g. अटकळपंचविसी *f*.

GUEST* (*Skr. ghas*, to eat up) पाहुणा, अतिथि. -RITE पाहूणचार, आतिथ्य *n*.

GUIDE *v. F.* direct in a way वाट दाखविणें -दाखवून नेणें; regulate चालविणें, वहिवाटणें; influence वळवणें, ओढणें [to].—*n.* वाटाड्या, मार्गदर्शक; conductor पुढारी, मोहरपी; regulator व्यवस्थापक; spiritual g. गुरु.

GUILE* कपट *n*, कृत्रिम *n*, कावा. -LESS *a.* निष्कपटी, भोळा, निष्कपट.

GUILT* the criminality and consequent exposure to punishment resulting from wilful disobedience of law, or from morally wrong action दोषीपणा, सदोषता *f*; crime दोष, अपराध. -LESS *a.* निर्दोष, निरपराधी.—GUILTY *a.* दोषी, अपराधी; wicked दुष्ट, पापी [of].

GUINEA (from *Guinea*, in Africa) साडेदाहा रुपयांचें एक सोन्याचें नाणें आहे.

GUISE *F.* external appearance वेष, रूप *n*; custom चाल *f*, रीत *f*.

GUITAR (*cithara*) सितार *f*.

GULF (*Gr. kolpos*) a deep chasm चर, खंदक (Luke xvi., 26); *Geog.* मोठी खाडी *f*, आखात *n*.

GULL *v. D.* धंतरणें, तंतरणें, ठकवणें [with]. -CATCHER छकवणारा, ठक, धतुऱ्या.

GULLET (*gula*) गळा, अन्नमार्ग; गळ्याच्या आकाराचा पदार्थ.—GULLY घळ *f*, ओघळ *f*.

GULP *v. D.*—solid substances गपगप खाणें, गोळा मारणें;—liquids घुटघुट पिणें, ढोंसणें [down].—*n.* गपका, बकाणा; घोट.

GUM* a vegetable secretion गोंद, चीक, डीक; fleshy substance covering the jaws and investing the teeth हिरडी *f*; g. arabic बाभळीचा डीक.—*v.* गोंद लावणें, गोंदानें चिकटविणें -बंद क. -जोडणें. -BOIL हिरडीवरचा फोड, हिरडीची सूज *f*. -MY *a.* गोंदाचा; चि-

कट, चिकचिकीत; गोंदानें भरलेला. -TREE गोंदणी *f.*

GUN *O. Eng.* cannon तोफ *f*; musket बंदूक *f*; sight of a g. माशी *f*, मखी *f*. -BOAT एक किंवा दोन तोफांची होडी *f*. -CARRIAGE तोफेची गाडी *f*. -FIRE सकाळीं किंवा संध्याकाळीं लष्करी तोफ सुटण्याची वेळ *f*. -NER गोलंदाज, खलासी. -NERY गोलंदाजी *f*. -PORT जाहजावरील तोफेची खिडकी *f*. -POWDER बंदुकीची दारू *f*, दारू *f*. -REACH, -SHOT गोळीचा टप्पा. -SHOT *a*. गोळीनें केलेला -झालेला, गोळीचा (wound). -WALE, the upper part of a ship's side बहाण *f*, बहाणी *f*.

GURGLE *v. i.* (*gurgulio*, gullet) बुडबुड वाहणें.

GUSH *v. i. Ger.* flow copiously भळभळ-भडभड वाहणें -बाहेर पडणें; act with a sudden and rapid impulse हुरहुरीनें क.—*n.* उमाळा, उबळ *f*, भडका.

GUST (*gustus*) स्वाद, रुचि *f*.—*Icel.* वाऱ्याचा झटका;—of flames, hot winds, &c. भबका, भबकारा.

GUT *Ger.* अंतडें *n*; अंतड्यांचा कोथळा.—*v.* अतंडीं बाहेर काढणें; plunder लुटणें.

GUTTER (*gutta*, drop) पन्हळ, नळ, 'गटर.'

GUTTURAL *a.* (*guttur*, throat) ज्याचा उच्चार कंठांतून होतो तो, कंठ्य.

GUZZLE *v. It.* गटगट पिणें, घोटणें, ढोंसणें [down].

GYMNASIUM (*Gr. gumnos*, naked) a place where athletic exercises are performed तालीमखाना; [a school for the higher branches of literature and science].—GYMNAST तालीम देणारा, शिकविणारा, वस्ताद. —GYMNASTIC *a.* तालमीचा, कसरतीचा, मेहनतीचा. — *n.* मेहनत *f*, कसरत *f*. — GYMNASTICS मल्लयुद्ध *n* -क्रीडा *f*, व्यायाम; तालमेची विद्या *f*. — GYMNOSOPHISTS (*Gr.* -*sophos*, wise) [one of a sect of Indian philosophers].

GYNARCHY (*Gr. gunè*, woman, *archè*, sovereignty) स्त्रीराज्य *n*.

GYRATION (*gyros*, a circle) गिरकांडा.

H

HA *interj.* हाहा, हा!

HABEAS CORPUS (*L.* you may have the body) *Law*, a writ having for its object to bring a party before a court or judge; esp. one to inquire into the cause of a person's imprisonment or detention by another, with the view to protect the right to personal liberty दुसऱ्याच्या अटकेंत वगैरे असलेल्या मनुष्यास कोर्टापुढें हाजर करण्याचा हुकूमनामा, 'ह्याबसकार्पस.'

HABERDASHER *Ger.* सुई, सूत, फणी वगैरे सामान विकणारा, बोहरी.—HABERDASHERY बोहऱ्याचें सामान *n*, खेरसामान *n*.

HABILIMENT *F.* पोषाक, पेहराव, लिभास.

HABIT (*habitus*, state) condition तब्यत *f*, प्रकृति *f*; fixed custom सवयी *f*, राबता, परिपाठ; dress पेहराव, लिभास, पोषाक; ill habit खोड *f*, व्यसन *n*.—*v.* वस्त्र नेसवणें, पोषाक घालणें. -ABLE *a.* राहायाजोगा, वासयोग्य, वास्तव्य. -ATION राहणें *n*; state of dwelling वस्ती *f*; place of abode राहण्याची जागा *f*, वस्ती *f*, घर *n*. -UAL *a.* सवयींतला, राबत्यांतला, अभ्यस्त; customary सवयीचा, राबत्याचा, चालीचा [to]. -UALLY *ad.* नेहमी, नित्य; सवयीनें, राबत्यानें. -UATE *v.* सवय लावणें; to be *habituated* सवयी लागणें, सराव पडणें.

HACK* *v.* cut irregularly वांकडातिकडा तोडणें, खांडणें, अचकटविचकट तोडणें; speak with stops तुटत तुटत -अडखळत -गुंतत बोलणें.— *n. F.* भाड्याचा घोडा;—in contempt हरदासी घोडा, घोडकें *n*. -NEY भा-

डोत्री घोडा. -NEY-COACH भाडोत्री गाडी *f.* -MAN भाड्यानें घोडीं देणारा.

HAG* an ugly old woman थेरडी *f*, म्हातारी *f*; a witch डंखीण *f*, जखीण *f*.

HAGGARD *F.* a hawk बहिरीससाणा.—*a.* intractable अडेल, दंडेल; having the expression of one wasted by want or suffering खप्पड, खल्लड.

HAGGLE* *v. i.* घासाघीस क., ओढून धरणें.

HAH *interj.* हाहा, हा!

HAIL* frozen rain गार *f.*—*v. i.* गारा पडणें.—*t.* गारा पाडणें, गारांची वृष्टि क. -STONE गार *f.* -STORM गारांची वृष्टि *f*, गारांचें वादळ *n.*—HAILY *a.* गारांचा.

HAIL* *interj.* नमस्कार असो, नमोनमः.—*v. Ger.* accost हटकणें, हांक मारणें; name नांव ठेवणें, नांवानें हांक मारणें.—*i.* दुसऱ्या गलबतावरून हटकलें असतां आपलें नांव गांव सांगणें.

HAIR* the collection or mass of filaments growing from the skin of an animal, and forming an integument or covering for a part of the head or for the whole body केंस *pl*, केश *pl*. In this sense it has no *pl*; a distinct filament on the surface of plants केसर;—of the body रोम, लव *f.* -BREADTH केंसा एवढें अंतर *n*, केंसभर. -CLOTH केंसांचें वस्त्र *n.* -DRESSER डोईचे केंस कातरणारा [न्हावी]. -SPRING खिशांतील घड्याळांतील केंसासारखी बारीक तार *f*, बाल, 'हेरस्प्रिंग' *f.*—HAIRY *a.* केंसाळ, केशमय; केशांचा केलेला.

HALBERD *F.* भाला.

HALCYON (*L.*) डिचापक्षी.—*a.* शांत, प्रसन्न. -DAY सुबत्तेचा काळ, सुबत्ताकाळ.

HALE* *a.* धडाखडा, धट्टाकट्टा (body).

HALF* अर्धभाग; to cry *halves* समभाग मागणें; to go *halves* समभाग असणें मिळणें.—*a.* अर्धभाग, निमें.—*ad.* अर्धा, निमें. -BINDING *a*, [a style of bookbinding in which the backs and corners are in leather, and the sides in paper or cloth]. -BOUND 'हापबौंड.' -BROTHER सावत्रभाऊ. -HOLIDAY अर्ध्या दिवसाची सुटी *f.* -MOON अर्धचंद्र (शुद्ध अथवा वद्य अष्टमीचा); अर्धचंद्राकार वस्तु *f.* -PENNY सुमारें दीड पैसा किमतीचें एक नाणें आहे. -WAY *ad.* अर्ध्या वाटेंत, मध्येंच. -YEARLY *a.* साहामाही.

HALL* a passage-way at the entrance of a house or suit of chambers, वठाण *n*, दालन *n*; a room in the houses of magistrates where audience is given and justice administered कचेरी *f*, सदर *f*; place of public assembly दिवाणखाना, दरबाराची जागा *f*, चावडी *f* इ०; [a college in an English university].

HALLELUJAH *Heb.* ईश्वराची स्तुति करा अशा अर्थाचें गायन *n*, 'हालेलुया.'

HALLOO *v. i. F.* ललकारणें, पुकारणें.—*n.* ललकारी *f*, पुकारा.

HALLOW* *v.* make holy पवित्र क.; treat as sacred पवित्र मानणें (Matth. vi., 9); consecrate वाहणें, अर्पण क.

HALLUCINATION (*hallucinari*, to wander in mind) मोह, भ्रम, चूक *f*; *Med.* the perception of objects which have no reality, or of sensations which have no corresponding external cause, arising from disorder of the nervous system वेडामधुरा इ० रोगांत रोग्याला विलक्षण वस्तु दिसल्याचा भास होणें *n*.

HALO (*halos*) circle of light तेजमंडल *n*, प्रभावळ *f*; a bright circle round the sun or moon खळें *n*, तळें *n*.

HALT* *v. i.* stop in walking or marching थांबणें, उभा राहणें, थोपणें; limp लंगडणें; hesitate नानू कांकू क.—*i.* मुकाम क., तळ देणें.

HALTER* rope for leading or confining a horse काढणी *f*; rope for hanging malefactors फांसी देण्याची दोरी *f*.—*v*. काढणीनें बांधणें, किंवा धरणें, काढणी गळ्यांत घालणें.

HAM* hind part of the knee मांडी *f*; thigh —of a hog cured by salting and smoking खारावलेली डुकार ची मांडी *f*. -STRING *v*. मांडीची शीर तोडून लंगडा क.

HAMLET * खेडें *n*, वाडगें *n*, वाडी *f*.

HAMMER * हातोडा, हातोडी *f*; sledge-h. घण; —of goldsmiths &c. घाट्या.—*v*. beat with a hammer हातोड्यानें मारणें -ठोकणें; form with a hammer हातोडीनें घडणें; work in the mind मनांत कल्पणें -रचणें [out]. -MAN घणकरी; घाट्या.

HAMMOCK *Sp*. चौपाळा, झोपाळा, दोला.

HAMPER * मोठी पाटी *f*, हारा, टोकरा.

HAND * the outer extremity of the human arm, consisting of the palm and fingers, united by the wrist to the arm हात, हस्त; a limb of certain animals; as the foot of a hawk, the forefoot of a horse पंजा; an index or pointer of a dial हात, कांटा; a measure of four inches; app. to the measurement of a horse's height चौंगा; side बाजू *f*, हात; dexterity हातोटी *f*, हात; act काम *n*, कर्म *n*; manner of performance पर्याय, क्रम, वर्त्तनक्रम: to change the h. in carrying on the war; a laborer trained for special service कामकरी, गडी; style of handwriting वळण *n*, अक्षर *n*; possession सत्ता *f*, अधिकार, हात; agency हात;—at the games हात, दस्त; activity चपळाई *f*; power सत्ता *f*, शक्ति *f*; fraternal feeling बंधुप्रीति *f*: to give the right h.; contract करार, commonly of marriage: to ask the h.; to accept the h. in marriage पाणिग्रहण क.; at all *hands*, or on all *hands* चहूंकडून; at h. जवळ; at the h. of -पासून [Job ii. 10]; by h. हातानें: to weed a garden by h.; clean *hands* निर्दोषता *f*; from h. to h. हातोपातीं; h. in h. मिळून; h.-made हातानें केलेला (यंत्रादिकानें नव्हे); h. over h. हातोहातीं; *hands* off थांब, थोप, पुरे; to live from h. to mouth हातावर संसार क.; heavy h. जाच, काच; in h. हातीं घेतलेला, चालू; रोख, रोकड; laying on of *hands*, a form used in consecrating to office, and in blessing persons आशीर्वाद -दीक्षा देतांना (मस्तकावर) हात ठेवणें; light h. ढिला हात, ढिली दोरी *f*; off h. or out of h. ताबडतोब, सहज, हातावर; off one's h. हातावेगळा; on h. जवळ, हातांत, शिलक; [putting the h. under the thigh, an ancient ceremony used in swearing; right h., the place of honor, power, and strength]; slack h. आळस, हयगय *f*; strict h. कडक -करडा अमल; to be h. and glove गळश्चकंठश्च होणें; to be on the mending h. जगत्या पंथास लागणें; to change *hands* पक्ष बदलणें; धनी बदलणें; to clap *hands* टाळ्या वाजविणें, आनंद दर्शविणें; to come to h. पोंचणें, पावणें; स्वाधीन करून घेणें; हातीं लागणें; to have a h. in -आंत हात असणें; to have in h. हातांत असणें; चालू असणें; पुढें चालवणें; to have one's *hands* full हाताला वार नसणें, पुष्कळ काम असणें, कामानें घेरला जाणें, कामाचा रगडा असणें; अडचणींत असणें; to lend a h. हात -आंग देणें, सहाय क.; to lift or put forth the h. against -वर हात टाकणें -उचलणें;—against a superior लात उचलणें; to pour water on the *hands* of -ची सेवा -खिजमत क., हातधुणें *n* (2 Kings iii. 11); inám granted in remuneration for washing the hands (of the Rájá &c.) हातधुणी *f*; lay *hands* on धरणें, पकडणें; to put the finishing h. to निपटणें, पुरा क.; to set the h. to हातीं घेणें, पत्करणें; to strike *hands* टाळी देणें, हातावर हात मारणें, करार क.; दुसऱ्याच्या कर्जाचा किंवा चांगल्या चालीचा

जामीन होणें; to take in h. हातीं घेणें -धरणें; taken in h. हात उचलला; to wash one's *hands* (of a matter) हातधुणें; under the h. दस्तूरचा, स्वदस्तूर.—*v.* हातानें उचलून देणें; conduct हात धरून नेणें, वाटेनें नेणें, पोंचवणें [to]. -BARROW हातगाडी *f.* -BILL जाहिरात *f*, प्रसिद्धिपत्र *n.* -BREADTH चौंगा, पांच, अंगुळें *n pl.* -CUFF हातबेडी *f.* -FUL पसाभर मूठभर, पसा, मूठ *f.* -KERCHIEF रुमाल, हातरुमाल; neckcloth गळेबंद. -MAID दासी *f.* -MILL जातें *n.* -SEL पहिली विकरी *f*, बोहणी *f*; [the first present sent to a young woman on her wedding day]. -SAW हातकरवत *f.* -SOME *a.* comely सुंदर, रूपवान; generous उदार; ample पुष्कळ, विपुळ. -SOMENESS सुरेखाई *f*, सौंदर्य *n.* -WHEEL हातचरक. -WRITING अक्षर *n*, वळण *n*; manuscript हस्तलेख.—HANDICRAFT हातचें काम *n*, हस्तकर्म *n.*—HANDICRAFTSMAN शिल्पी, कारागीर.—HANDIWORK कारागिरी *f*, हस्तकौशल्य *n* (Ps. xix. 1).—HANDLE *v.* touch हात -बोट लावणें; manage वापरणें, वहिवाटणें; make familiar by frequent touching वारंवार हात लावून वहिवाटींत -राबत्याखालीं आणणें: breeders h. their colts every six months; practise अभ्यासणें, आचरणें; discourse on एखाद्या विषयावर लिहिणें -बोलणें, उपपादन क.—*i.* चांचपणें (Ps. cxv. 7).—*n.* that part of a vessel or instrument which is in the hand when used दांडा, मूठ *f*; tool साधन *n*, कारण *n.*—HANDY *a.* हाताचा कुशळ, हरकामी; convenient आटोपसार, साटोप. -FIGHT हातपिटी *f.*

HANG* *v.* suspend टांगणें; fasten in a manner which will allow of free motion upon the point or points of suspension लटकावणें, लोंबवणें; put to death by suspending फांसीं देणें; decorate by hanging pictures, drapery, &c. मढवणें; down खालीं घालणें; [—fire, *Mil.*, to be slow in discharging or communicating fire through the vent to the charge: the gun *hangs* fire].—*i.* लोंबणें, लटकणें; dangle ओळकंबणें, हिलगणें; depend अवलंबणें, आश्रय धरून असणें, कासेस लागणें; drag रडतखडत चालणें -जाणें; hover घिरट्या घालणें: evils h. over the country; to be in suspense भिजत पडणें; rest upon -वर राहणें, गुंतणें; down ओथंबणें; upon पाठ घेणें -पुरवणें; to h. on the lips वक्तृत्वानें मोहला जाणें; to h. by the eyelids केंसावर लटकून राहणें; together एकत्र -मिळून राहणें; ताळा बसणें, पूर्वापर संबंध असणें: the story does not h. together. — *n.* संबंध, जम, अन्वय; get the h. of -ची रचना -जुळणी समजणें; -ची सवयी लागणें, -चा राबता पडणें. -ER -ON पंक्तिबारगीर, भोजनभाऊ. -ING झालर *f.* -MAN फांशी देणारा मनुष्य, मांग, डोंब.

HANK *D.* रेशीम, सूत वगैरेचें कुकडें *n.*

HANKER *v. i. D.* desire vehemently छंद घेणें, लुलुपणें, जीव टांगला असणें; form a group मेळा जमणें, गोळा होणें [after, for]. -ING छंद, सोस.

HAP *W.* दैव *n*, प्रारब्ध *n.* -LESS *a.* हतभाग्य, भाग्यहीन. LY *ad.* कदाचित्. -PEN *v. i.* come by chance दैवानें घडणें, अकस्मात् येऊन पडणें -भोंवणें, प्राप्त होणें; occur घडणें, वडून येणें [to]. -PILY *ad.* सुदैवानें; सुखानें; कौशल्यानें, हतोटीनें [for]. -PINESS, an agreeable feeling or condition of the soul arising from good of any kind सुख *n*, आनंद; good fortune सौभाग्य *n*, सुदैव *n*; unstudied grace स्वाभाविक लावण्य *n.* -PY *a.* favored by hap, luck, or fortune दैववान, भाग्यवान; enjoying good of any kind, peace, tranquillity, and comfort सुखी, संतुष्ट, संतृप्त; blessed धन्य, सुखी; furnishing enjoyment

सुखदायक -प्रद -कर (condition); dexterous सुगर, कुशल; able समर्थ, क्षम; propitious शुभ, मंगल, भद्र (omen) [in, with, for].

HARANGUE *F.* मोठ्या सभेपुढें केलेलें भाषण *n*; in a bad sense, ranting बडबड *f*, व्यर्थ भाषण *n*, शिरा ताणून बोलणें *n* [on, upon].

HARASS *v. F.* fatigue to excess भागवणें, कष्टी क., दमवणें; weary with importunity, care, or perplexity बेजार क., जिकीर क., जेरीस आणणें; annoy by repeated and unlooked-for attacks, as an enemy वारंवार व अकस्मात् घाले घालून जेरीस आणणें [with].

HARBINGER *Ger.* पुढें सुचवणारा, अग्रदूत;—of spring वसंतदूत.

HARBOR* asylum आश्रय, आश्रयस्थान *n*; port बंदर *n*.—*v.* आश्रय देणें; तुफाना पासून गलबताचा बचाव क.—*i.* कांहीं वेळ राहणें -मुकाम क.; आश्रय धरणें.

HARD* *a.* firm कठीण, दृढ, निबर (flesh, wood, apple); difficult कठीण, अवघड, बिकट (cause); difficult to bear कठीण, दुःसह्य (terms); difficult to control अनिवार्य, दुर्धर: the stag was too h. for the horse; severe कडक, कठीण, करडा (winter, times); cruel कठीण, निर्दय, निष्ठुर, कठोर (heart, master); unjust गैरवाजवी, जुलमाचा; rough कठोर, कडक, कठीण (words, countenance); not easy to follow with the mind गूढ, कठीण, दुर्ज्ञेय (diction); sour आंबट (liquor); coarse जाडा, भरडा, रुखा (fare); *Gram.* अघोष;—money रोकड *f*, नाणें *n*; [—water, water which contains some mineral substance that decomposes soap, and thus renders it unfit for washing]; h. to be crossed दुस्तर; h. to be broken दुर्भेद्य; h. fate दुर्दैव *n*; h.-earned कष्टाचा.—*ad.* कष्टानें, आयासानें श्रमानें, मेहनत करून; vehemently झपाट्यानें, रगडून, जोरानें: to rain h.; by जवळ; up निकडींत, तंचाईत. -EN *v.* कठीण क.; बळकट -सुदृढ क.—*i.* कठीण होणें; in wickedness निरडणें. -ENED कठीण केलेला; दुष्कर्मांत निपटलेला [in, to]. -FISTED *a.* लोभी -HEARTED *a.* कठीण मनाचा, निर्दय. -LY *ad.* कष्टानें, आयासानें; scarcely क्वचित्, विरळा -NESS कठीणपणा, कणखरपणा; दुर्ज्ञेयता *f*; दुःसाध्यता *f*; दुष्टता *f*; निष्ठुरता *f*. See the adj. -SHIP ओझें *n*, जाच; trials श्रम, कष्ट, हाल *n pl.* -WARE लोखंडी -पितळी सामान *n*.—HARDY *a.* बळकट, टणक, कणखर, लोखंडी (constitution); धीट, धारिष्टवान.—HARDIHOOD धिटाई *f*, धारिष्ट *n*.

HARE* ससा. -BRAINED *a.* चंचलबुद्धि. -LIP राखखंडा होट.

HAREM *Ar.* portion of the house allotted to females in the larger dwelling-houses of the East जनानखाना, अंतःपुर *n*; collection of wives and concubines belonging to one man जनाना.

HARK *imp.* (from *Hearken*) ऐक, ऐका.

HARLOT* कसबीण *f*, वेश्या *f*. -RY कसब *n*, वेश्यावृत्ति *f*.

HARM* injury अपकार, उपद्रव; damage नुकसानी *f* हानि *f*. [to].—*v.* उपद्रव देणें; हानि नुकसानी क. -FUL *a.* अपकारक; नुकसानी करणारा [to]. -LESS *a.* बापडा, गरीब, निरुपद्रवी; निर्दोष, निरपराध.

HARMONY (*harmonia*) just adaptation of parts to each other, in any system or combination of things मेळ, मिलाफ, ऐक्य *n*;—in facts, opinions, &c. ताळा, मेळ; concord of sounds स्वरांचा मेळ; peace and friendship स्नेह, एकोपा, सौख्य *n*.—HARMONICAL *a.* स्वरमेळाचा, स्वरैक्य संबंधी.—HARMONIOUS *a.* तालशुद्ध, समताल; मिला-

फाचा, संगतवार, सुरळीत.—HARMONIUM [a kind of musical instrument].—HARMONIZE *v.* जमविणें, जुगविणें, बसवणें; ताळा बसवणें; सूर जमवणें, ताळ बसवणें.—*i.* जमणें, जुगणें, बसणें; ताळा पडणें; सूर जमणें.

HARNESS *F.* गाडीच्या घोड्याचा सरंजाम, ओढण *n.*—*v.* जुंफायास तयार क.

HARP * वीणा, तंतुवाद्य *n*; Jewish h. मोरचंग. —*v. i.* वीणा वाजविणें; dwell tediously or monotonously in speaking or writing घोकणें, छंद घेणें, जपणें [on, upon].

HARPOON *F.* मोठे मासे मारण्याची बरची *f.*—*v.* बरचीनें (मासे) मारणें -धरणें.

HARROW * kinds of—दांताळें *n*, फेंसाटी *f*, इंगा, झोपा.—*v.* गुठावणें, पाळी घालणें; lacerate बेजार क., कांट्यावर ओढणें, कुत्तरओढ क.

HARSH *a. Ger.* rough खरखरीत, खरबरीत;—to the taste आंबट;—to the ear कर्णकठोर;—to the sensibilities कठोर, निष्ठुर, करडा [to].

HART * हरण, मृग.

HARVEST * time of reaping the corn and grain कापणीची वेळ *f*, सुगी *f*, फसलहंगाम; ripe corn and grain when cut and gathered in पीक *n*, फसल *f*; gain नफा, फायदा; autumnal h. खरीफ *n*: vernal h. रबी *f*. -HOME फसलहंगामाचें गाणें व जेवण *n*, नवें *n*.

HASH *v. F.* चोचावून तुकडे क.;—as meat खिमा क.

HASTE *Ger.* celerity of motion शीघ्रगति *f*, त्वरा *f*; hurry जलदी *f*, घाई *f*; quickness चपळाई *f*; precipitance उतावळ *f*, धांदल *f*; dispatch *f*; निकड *f*, तांतड *f*.—HASTEN *v. i.* जलदी-त्वरा क.; लगबगीनें जाणें-चालणें [on]. —*t.* जलदीनें घेणें-आणणें,-ची त्वरा क.—HASTILY *ad.* जलदीनें; उतावळीनें, मागें पुढें न पाहतां, अविचारानें; passionately रागानें, संतापानें.—

HASTY *a.* जलद, शीघ्र; forward आगसलेला (fruit); उतावळा, हूड (Prov. xxix. 20); तापट, शीघ्रकोपी. -PUDDING आयता.

HAT * टोपी *f*; [the dignity of a cardinal].

HATCH *v. Ger.* produce from eggs by incubation, or by artificial heat काढणें; plot कूट रचणें.

HATCHET *F.* कुऱ्हाड *f*.

HATE *v.* * have a great aversion to द्वेष क.; dislike नावडणें; be lacking in love toward कमी प्रीति क.—*n.* द्वेष. -FUL *a.* द्वेष करणारा; द्वेषउत्पादक, द्वेषयोग्य [to].—HATRED द्वेष, वैर *n* [of].

HAUGHTY *a.* (*altus*, high) उंच; arrogant मगरूर, दिमाखी, गर्विष्ट; indicating haughtiness दिमाखाचा (carriage).—HAUGHTINESS आढ्यता *f*, मगरुरी *f*, दिमाख.

HAUL *v. F.* ओढणें, ओढून नेणें; जबरीनें चालवणें.

HAUNCH *F.* कमरेचा खवाटा, मांडीचा खुबा.

HAUNT* *v.* frequent फेऱ्या घालणें, येणें जाणें क.; —as a ghost भूतसंचार असणें; accustom सवयी लावणें; *haunted* house or place भूतखाना [with].—*n.* बैठक *f*, फेरीची जागा *f*, अड्डा.

HAUTBOY *F.* सनई सारखें एक वाद्य आहे.

HAVE* *v.* own धनीपणा -स्वत्व बाळगणें; possess जवळ असणें; regard मानणें; accept मान्य क., पदरीं घेणें: wilt thou h. me? obtain मिळविणें; beget उपजविणें, जन्म देणें; cause to go जायास लावणें: h. out all men from me; be under necessity प्राप्त असणें; to h. a care संभाळणें, हुशारींत राहणें.

HAVEN* harbor बंदर *n*; asylum आश्रयस्थान *n*, शरण *n*.

HAVOC * मोड, धूळधाणी *f*, धूळपट्टी *f*, अनर्थ, तुफान *n*, प्रलय (Acts viii. 3).

HAWK* बहिरीससाणा.—*v. i.* बहिरीससाण्याची शिकार क.—*v. i. Scot.* खाकरणें.—*t. Ger.* फेरीनें -रस्तोरस्तीं फिरून माल विकणें, हिंडीफेरी क. [about]. -ER बिशाती, फेरीवाला; बहिरीससाण्याचा शिकारी.

HAY* वैरणी करितां कापून वाळविलेलें गवत *n*; to make h. while the sun shines वाहत्या गंगेंत हातधुणें.

HAZARD *F.* chance दैव *n*; danger भय *n*, जोखीम *n*; धोका; to run the h. तवकल क. —*v.* जोखमांत -धोक्यांत पाडणें -घालणें.

HAZE* धुकें *n.*—HAZY *a.* धुक्याचा, धुंद.

HE *pron.** तो, हा; any man जो कोणी, कोणी, जो माणूस: he that walketh with wise men shall be wise (Prov. xiii. 20).

HEAD* that part of an animal which contains the collected perceptive organs of sense, and which is therefore foremost or uppermost in the creature's locomotion डोकें *n*, मस्तक *n*; the uppermost part of an inanimate object शेंडा, माथा; the fore part of an inanimate object तोंड *n*, मुख *n*;— of a bed उशागत *n*, उसें *n*; — of a spear, dart भाला, फल *n*; the leader प्रमुख, नायक; — of a body of guards मुकद्दम, हवालदार, नाईक इ०; the front पुढला भाग, अघाडी *f*, अग्रभाग; individual डोई *f*: दर डोईस पैसा; नफर, नंग: ten h. of camels उंट नफर दाहा: ten h. of elephants हत्ती नंग दाहा; the seat of the intellect बुद्धि *f*; the brain मगज, मेंदू; source उगम, मूल *n*; a topic प्रकरण *n*, कलम *n*, खातें *n*; culminating point कळस, सीमा *f*; [altitude of the source, or the height of the surface, as of water, above the orifice at which it issues, and also the quantity in reserve, and the pressure resulting from either; as a mill or reservoir has a good h. of water, or ten feet h.; state of a deer's horns by which his age is known; the buck is called in the fifth year a buck of the first h.]; a rounded mass of foam शींग *f*; a head-dress शिराभरण *n*, पागोटें *n*, टोपी *f*, इ०; h. and ears नखशिख (पर्यंत): he plunged h. and e. into water: he was h. and e. into debt; h. and shoulder जबरीनें, जुलमानें; to drag one h. and s.; पुष्कळ, फार; he is h. and s. above them ते त्याच्या खांद्यास देखील लागणार नाहीं; h. or tail छाप किंवा तराजू—a phrase used in throwing a coin to decide a choice, question, or stake; neither h. nor tail शेंडा ना बुडखा; to come up to a h. तोंड फुटणें, पिकणें; to get a h. गोंडा फुटणें (boiling sugar-cane juice &c.); to give one the h., or to give h. मोकळा-मोकार सोडणें: he gave his horse the h.; to his h. तोंडावर; to revile one to his h.; to make h. पुढें चाल क., पुढें चालणें; to turn h. तोंड फिरवणें; out of one's h. बगलेंतून काढलेला; to be knocked on the h. धडधडणें, लटपटणें.—*v.* be at the head of प्रमुख -पुढारी असणें, पुढाकार घेणें; form a head to माथा-बोंड क.; fit or furnish with a head बोंडी -शेंडा -शेंबी बसविणें; go in front of -च्या पुढें -मोहरे जाणें. -ACHE कपाळदुखी *f*, कपाळशूळ. -BAND कपाळपट्टी *f*. -ING सदर *n*, 'हेडिंग' *n*: the h. of a paper. -LAND भूशलाका *f*;—of a field कडपट्टी *f*. -LONG *ad.* with the head foremost डोईकडून, अधोमुख; rashly उतावळीनें, अविचारानें, धसकावून; hastily जलदीनें.—*a.* हूड, हुरमट; steep मोठ्या चढाचा, अवघड चढणीचा. -MAN मुकद्दम, हाकीम, अध्यक्ष;— of a village पाटील. -MASTER सरपंतोजी, 'हेडमास्तर.' -MONEY डोईपटी *f*. -PIECE शिरस्त्राण *n*, शिरस्क *n*. -QUARTERS *pl* सेनापति -सुभेदार वगैरे राहण्याची जागा *f*, 'हेड् क्वार्टर' *n*. -SHIP मुख्य जागा *f* -अधिकार, अध्यक्षपणा, प्रमुखत्व *n*. -STALL, that part of

a bridle which compasses the head सरदारी *f.* -STRONG *a.* हेकेखोर, हेकड, शिरजोर.—WORKMAN मुकद्दम, सरकामदार.—HEADSMAN शिरच्छेद करणारा, मांग, अंतक.—HEADY *a.* हुरमट, कपाळफोड्या.

HEAL* *v.* make whole बरा -निरोगी क.; restore to original purity पूर्वीप्रमाणें शुद्ध क., उद्धरणें, पावन क.; reconcile समेट -मिलाफ क. [of].—*i.* बरा होणें; to h. up माठणें (a wound). —HEALTH, the state of being free from physical pain or disease आरोग्य *n*, कुशल *n*, शरीरसंपत्ति *f*;—of mind चित्तसमाधान *n*, स्वास्थ्य *n*; wish of health and happiness कल्याणेच्छा *f*; to drink a h. "अमुकाला आरोग्य असो" असें ह्मणून मद्य पिणें. -FUL *a.* हितकर, पथ्यकर, शरिरास चांगला (air, diet); निरोगी (body); favorable अनुकूळ. -INESS निरोगीपणा, आरोग्य *n*.

HEALTHY *a.* निरोगी (constitution); सुखकर, शरिरास हितकारक (climate).

HEAP * mass ढीग, रास *f*; as scratched up by rats &c. उकीर; *pl* मोप, मस्त, डोंगर. —*v.* -ची रास क., -चा ढीग रचणें [up, on]. सांठवणें, जोडणें, सांचवणें: to h. up treasures; form or round into a heap, as in measuring शीग भरणें [together].

HEAR* *v.* perceive by the ear ऐकणें, श्रवण क.; listen to ऐकणें, लक्ष्य देणें; examine तपासणें, ऐकणें; try in a judicial court कोर्टांत खटल्याची चौकशी क.; give audience सुनावणीची -मजकूर ऐकण्यासाठीं भेट देणें; accede to the demand or wishes of -ची गोष्ट मान्य क., -चें ऐकणें [of, from].—*i.* ऐकूं येणें, ऐकायास येणें; लक्ष्य -चित्त देणें; receive by report बातमी ऐकणें, ऐकणें, कानावर येणें. -ING ऐकणें *n*, श्रवण *n*; sense by which sound is perceived श्रवणेंद्रिय *n*; सुनावणीची भेट *f*; खटल्याची चौकशी करण्यासाठीं तो ऐकणें *n*; reach of the ear कानाचा टप्पा. -SAY कर्णोपकर्णी आलेली गोष्ट *f*, आफवा *f*, सांगावांगी *f*.—HEARKEN *v.* लक्ष्य देणें, ऐकणें [to].

HEARSE *F.* मुडद्याची गाडी *f*, शवयान *n*.

HEART* (*Skr. hrid*) a hollow, muscular organ, contracting rhythmically, and serving to keep up the circulation of blood रक्ताशय, काळीज *n*; seat of the affections अंतःकरण *n*, मन *n*, हृदय *n*; part nearest the middle गाभा, गर्भ; vital portion मर्म *n*, वर्म *n*; courage धैर्य *n*, वीर्य *n*, शौर्य *n*; that which resembles a heart in shape हृत्पिंडाच्या आकाराची वस्तु *f*; secret meaning मर्म *n*, अंतर *n*, आंतला अर्थ; at h. खरोखर, मनापासून, हाडीं: he is at h. a good man; to learn by h. मुखपाठ क.; hardness of h. मनाचें काठिण्य *n*, निर्दयपणा; to break the h. of कमर मोडणें; to find in the h. कबूल -मान्य असणें; to have in the h. मनांत असणें; to have the h. in a nutshell कवडीचुंबक होणें; to have the h. in the mouth पांचावर धारण बसणें, काळीज फुटणें; to h. -चा धोसरा धरणें, काळजी लागणें; to set the h. at rest निश्चित होणें, बिनघोर असणें; to set the h. upon -वर प्राण -जीव टांगणें; to speak to one's h., *Scrip.* समाधानाची गोष्ट बोलणें, सांत्वन क., धैर्य देणें. -ACHE चिंतारोग. -BURN आम्लपित्त *n*; to have the h. उरांत पित्ताची जोत भरणें. -BURNING आम्लपित्त *n*; secret enmity गुप्तवैर *n*. -EASE चित्तशांति *f*. -LESS *a.* निष्ठुर, निर्दय. -PEA कुटकी *f*, पिंगवी *f*. -ROBBING *a.* चित्तचोर. -SICK *a.* हृद्रोगी. -SICKNESS हृद्रोग. — HEARTY *a.* मनापासूनचा; not weak बळकट, टणक, कणखर (man, timber); nourishing पुष्टिकारक; abundant भरपूर, मनभरेसा (meal).—HEARTILY *ad.* मनापासून, अंतःकरणपूर्वक; really खरोखर;

पुष्कळ, पोटभर : to eat h. ; with zeal आवेशानें ; vigorously झपाट्यानें, धमकीनें.

HEARTH* the pavement in a chimney, on which a fire is made आगटीची जागा *f*, चूल *f*, चुला.

HEAT* the sensation produced by a hot substance गरमी *f*, दाह ;—as in objects उष्णता *f*, ऊब *f*, गरमी *f* ;—of weather ऊन, उष्मा, उन्हाळा ;—in the system गरमी *f*, उष्णता *f* ; तलखी *f* ; flush ताप, तळतळ *f*, संताप, लाली *f* ; animal excitement माज, मस्ती *f*, हत्याण *n* ; to be in h. उधानणें ; state of being once heated ताव : give the iron another h. ; a single effort हिरिरी *f*, दम ; vehemence झपाटा, तडाखा, कडाखा : the h. of battle ; excitement चेव *f*, उचल *f* ; fervency हौस *f*, उत्सुकता *f*, उत्साह : with all the strength and h. of eloquence ; fermentation उमाळा, खतखत *f* ;—of temperament गरमी *f*, तापटपणा ; radiant h. किरणविसर्जक उष्णता *f* ; red h. आरोक्तोष्णता *f* ; blood-h. मनुष्याच्या शरिराची स्वाभाविक उष्णता *f*.—*v*. तापवणें, उष्ण क. ;—of animals गरमी -ऊब आणणें ;—of the passions संतापवणें [with, at].—*i*. ऊन -गरम होणें, तापणें. -ED तप्त, तापलेला.

HEATH* a plant एक झाड आहे ; a desert रान *n*, जंगल *n*.

HEATHEN* मूर्त्तिपूजक ; [the h., *Scrip*. all people except the Jews ; now used of all nations except Christians and Mahomedans].—*a*. मूर्त्तिपूजक. -ISH *a*. मूर्त्तिपूजकाचा ; rude जंगली, रानटी. -ISM मूर्त्तिपूजकांचा धर्म, आचार इ० ; ignorance अज्ञान *n*.

HEAVE* *v*. lift वर उचलणें ; throw फेंकणें.—*i*. धापा देणें ; rise from the breast धापा देणें ; to work and h. in the stomach उमळणें ;—as the sea उचलणें, उचंबळणें ; to h. in sight दृष्टीस पडणें, दिसणें.—*n*. धापा ; उमासा कळमळ *f*.

HEAVEN* the sky आकाश *n* ; the atmosphere आभाळ *n*, अंतराळ *n* ; the dwelling-place or immediate presence of God आकाश *n*, स्वर्ग *n*, दिव्यलोक *n* ;—of Vishnu वैकुंठ *n* ;—of Shiva कैलास ;—of Brahma ब्रह्म -सत्यलोक ;—of Indra स्वर्ग *n* ; God देव, परमेश्वर ; supreme happiness परम सुख *n* ; for h.'s sake धर्मास. -BORN *a*. स्वर्गोत्पन्न. -LINESS उत्कृष्टता *f*, अत्युत्कृष्टता *f*. -LY-MINDED *a*. having the thoughts and affections placed on heaven and heavenly objects परनिष्ठ, परमार्थबुद्धि. -NESS परमार्थदृष्टि *f*.

HEAVY* *a*. weighty जड, भारी ; not easy to bear जड, कठीण, जबर (taxes, expenses) ; burdened लादलेला, भाराक्रांत ; sluggish जड, मंद (gait, looks, style) ; violent जोराचा, दांडगा, वेगाचा (storm) ; loud मोठा, गंभीर (thunder) ; clammy चिकट, पिठाळ (bread) ; not easily digested जड, अपथ्य (food) ;—as soil जड, चिकट ;—as road बिकट, अडचणीचा ; dark with clouds दाट, घनदाट, काळोखी आलेला (sky) ;—as sleep गाढ, घोर ; — fire बंदुकांचा किंवा तोफांचा मोठा भडिमार ;—metal मोठ्या तोफा *f pl* ; तोफेचे मोठे गोळे *pl*.—HEAVILY *ad*. जड होईसा ; दुःखानें, कष्टानें ; आयासानें, जड पावलानें ; as rain falling धोधो, झिमझिम.—HEAVINESS जडपणा ; सुस्ती *f*, उदासपणा ; कष्ट, जाच ; जाडी *f*, दाटपणा.

HEBREW (from *Heber*) यहुदी ; इब्रीभाषा *f*.—*a*. यहुदी ; इब्री लोकांसंबंधी, इब्री लोकांचा.

HECATOMB (*Gr. hecaton*, hundred, *bous*, ox) शतगोमेध, शंभर बैलांचा यज्ञ ; any large number of victims महाबळी.

HECTIC *a*. (*Gr. hexis*, habit) सवयीचा ; affected with hectic fever क्षयज्वराचा (patient).—*n*. क्षयज्वर.

HECTOR (*Gr.* from *Hector*, a brave warrior) धाररात्र, तिस्मारखान, अरेराव.

HEDGE* वई *f*, कुंपण *n*.—*v*. कुंपण घालणें, कुडणें; obstruct कोंडणें, बंद क., बुझवणें; hem in घेरणें, वेढणें; protect रक्षणें, बचावणें [in]. -HOG एक जातीचें जनावर आहे.

HEED* *v*. लक्ष्य देणें -लावणें.—*n*. लक्ष्य *n*, अवधान *n* [of]. -FUL *a*. सावध, सावधान [of]. LESS *a*. गाफल, बेफाम, असावध [of]. -NESS गफलत *f*, प्रमाद.

HEEL* hinder part of the foot टांच *f*, खोट *f*; जोडा वगैरेची टांच *f*; remaining part of any thing अवशेष *n*, शेंपूट *n*; a spur आर *f*, कांटा; to be at the *heels* of नेटणें, खेटणें; [to be out at the *heels*, to have on stockings that are worn out; hence, to be in a bad condition]; to lay by the *heels* बेडी घालणें-ठोकणें; to show the *heels* पळ काढणें, पाठ दाखवणें; to take to the *heels* पळणें, पळ काढणें.—*v*. *i*. कलंडणें, टळणें (a ship).

HEIFER* कालवड *f*, गोजी *f*.

HEIGHT* condition of being high उंचपणा, उच्चत्व *n*; altitude उंची *f*; eminence उंचवटा; hill डोंगर, टेकडी *f*; prominence थोरी *f*, थोरपणा; utmost degree in extent or violence भर *f*, भरती *f*, ऐन: the h. of a tempest, fever; grade पायरी *f*, दरजा: social duties are carried to greater *heights*, and enforced with stronger motives, by the principles of the Christian religion. -NE *v*. उंच क., चढवणें; advance वाढवणें, सुधारणें; advance to a worse state अधिक वाईट क., विकोपास नेणें; intensify जोरावणें, बळावणें, भारी माजणें; set off to advantage, by means of contrast साजरा क., शोभवणें, भेद दाखवून विशेष तेजस्वी क.; [to h. a tint, is to make it lighter and more prominent by means of touches of light opaque color placed upon it.]

HEINOUS *a*. *F*. अतिदुष्ट, अघोर, महा (sin). -NESS अघोरपणा.

HEIR (*hæres*) one who receives, inherits, or is entitled to succeed to the possession of any property after the death of वारीस, दायाद; h. apparent युवराज; [h. presumptive, one who, if the ancestor should die immediately, would be his heir, but whose right to the inheritance may be defeated by the birth of a nearer relative, or by some other contingency] [to]. -LOOM [any furniture, movable or personal chattel, which by law or special custom descends to the heir along with the inheritance].

HELIOTROPE (*Gr. helios*, the sun, *tropein*, to turn) *Bot*. सूर्यकमल *n*.

HELIX (*Gr.*) a circumvolution पेंच; winding बांक; external border of the ear पाळ *f*, कर्णपालि *f*.

HELL * the place of the dead, or of the soul after death मृतलोक, लोकांतर *n*; the place or state of punishment for the wicked after death नरक; the lower regions पाताळ *n*, अधःप्रदेश; a dungeon अंधारकोठडी *f*; a gambling-house जुगाराचें घर *n*; the pains of h. नरकयातना *f*; river of h. वैतरणी *f*. -ISH *a*. नरकाचा, नरक संबंधी; fit for hell नरकयोग्य; wicked दुष्ट.

HELLEBORE (*Gr. helleboros*) काळीकुटकी *f*.

HELLENIC *a*. (*Gr.* from *Hellen*, son of Deucalion ग्रीक लोकांचा -संबंधी.

HELM * instrument by which a ship is steered सुकाण *n*. -SMAN सुकाण्या.

HELMET * लढण्याच्या वेळीं डोक्यावर घालायाची टोपी *f*, शिरस्त्राण *n*.

HELP * *v*. furnish strength or means for the successful performance of any

action or the attainment of any object सहाय -पुरावा -पुरवठा क ; furnish with the means of deliverance from trouble or difficulty संकटांतून काढण्यास सहाय क., हात देणें ; remedy उपाय -इलाज क. ; hinder अडथळा-अटकाव क. ; prevent निवारणें, टाळणें, बंद क. : the evil approaches, and who can h. it ? forbear दम धरणें, राहणें, थांबणें : I cannot h. remarking the resemblance between him and our author ; to h. forward, on वाढवणें, पुस्ती -बळ देणें ; out अडचणींतून काढणें, पाठ-खांद देणें.—*i.* सहाय होणें-देणें.—*n.* मदत *f*, कुमक *f*, सहाय *n* : God is a very present h. in trouble (Ps. xlvi. 1) ; इलाज, तजवीज *f* [for]. -ER सहायकारी ; assistant मदतनीस. -LESS *a.* दुबळा, लाचार, अनाथ ; निरुपाय, बेइलाज. -MATE हस्तक्या.

HELTER-SKELTER *ad. Ger.* सैरावैरा, तजावजा ; धांदलीनें.

HEM * edge of a garment doubled and sewed गोट, लोड *f* ; border कड *f*, किनारा.—*v* लोड भरणें, तुरपणें ; about, around, in घेरणें, वेढणें.—*i. D.* खांकरणें.—खांकरण्याचा शब्द.

HEMIPLEGIA (*L.*) a palsy that affects one side only of the body पक्षवायु.

HEMISPHERE (*Gr. hemi,* half, *sphaira,* sphere) गोलार्ध ; half of the terrestrial globe भूगोलार्ध ; the eastern h. प्राक्पाल *n.*

HEMISTICH (*-stichos,* a verse) श्लोकार्ध *n*, अर्धश्ल.क.

HEMLOCK * एक विखारी वनस्पति आहे.

HEMORRHAGE (*Gr. haima,* blood, *rhegnunai,* to burst) रक्तस्राव, रक्तप्रवाह.

HEMORRHOIDS *pl* (*-rhein,* to flow) *Med.* livid and painful tubercles around the margin of or within the anus, from which blood or mucus is occasionally discharged ; piles मूळव्याधि *f*, गुदरोग.

HEMP * सण, ताग, अंबाडी *f* ; tax on the cultivation of h. or making rope of it अंबाडीपट्टी *f*.

HEN * कोंबडी *f*. -BANE खुरासनी ओंव्याचें झाड *n*. -PECKED *a.* स्त्रीवश, बायल्या.

HENCE * *ad.* from this place एथून, इकडून ; from this time एथून, आतां पासून, पुढें ; from this cause म्हणून, यावरून ; from this source ह्यापासून. -FORTH, -FORWARD *ad.* अतःपर, इतःपर, एथून पुढें.

HEPATIC *a.* (*Gr. hepar,* the liver) काळजाचा ; काळजाच्या रंगाचा. — HEPATITIS काळजाचा दाह, यकृत *n*.

HEPTAGON (*Gr. hepta,* seven, *gonia,* angle) सप्तकोणाकृति *f*. -AL *a.* सप्तकोण.

HER * *pron.* हिचा, तिचा ; to h. तिला, हिला.

HERALD *Ger.* ललकारा, स्तुतिपाठक, चारण.

HERB (*herba*) वनस्पति *f*, ज्याचें मूळ दर वर्षास सुकून मरतें असें झाड *n*. -ACEOUS *a.* झाडपाल्याचा, औषधी संबंधी. -AGE झाडपाला, हिरवळ *f*.

HERCULEAN *a.* (from *Hercules*) महत्प्रयासाचा, भगीरथ प्रयत्नाचा (task) ; जड, भारी, अवजड (limbs).

HERD * a number of beasts assembled together कळप, खिल्लार *n* ; a company of men झुंड *f*, घोळका, मेळा. -SMAN, one who herds domestic animals गुराख्या, गोवारी, मेंढक्या इ०.

HERE* *ad.* in this place एथें, इकडे ; in the present life इहजन्मीं, इहलोकीं, एथें ; h. and there इकडे तिकडे ; पातळ, तुरळक. -ABOUT, ABOUTS *ad.* आसपास. -AFTER *ad.* पुढें ; in a future state परलोकीं, मेल्यानंतर. —*n.* मरणोत्तरची स्थिति *f*, परलोक. -AT *ad.* यावरून -मुळें, यानें. -BY *ad.* याकडून -मुळें. -IN *ad.* यांत. -OF *ad.* याचा ; from this यापासून. -TOFORE *ad.* पूर्वी, मागें. -UPON *ad.* यावर. -WITH *ad.* यासहित -लगत.

HEREDITARY (*hæres*, heir) descended by inheritance पिढीजाद, वंशपरंपरागत (estate); descendible to an heir पिढीजाद चालायाचा, वंशोवंश चालायाचा, वंशोपयोग्य; capable of being transmitted from a parent to a child बापापासून किंवा आईपासून मुलास मिळायाजोगा, पितृप्राप्य (a disease).—HERITABLE *a* वंशोपभोग्य.—HERITAGE वतन *n*; [*Scrip.* the saints or people of God].

HERESY (*Gr. hairein*, to take) heterodoxy पाखंड *n*, पाखंडमत *n*; [*Law*, an offence against Christianity, consisting in a denial of some essential doctrine, publicly avowed, and obstinately maintained].—HERETIC पाखंडी, थोतांड्या; [*Rom. C. Ch.* one who does not acknowledge the teaching of the R. C. Church; a Protestant].

HERMAPHRODITE (*Gr.* from *Hermaphroditus*, son of Hermes or Mercury, and Aphrodité or Venus) an animal or human being having the parts of generation both of male and female हिजडा.—*a.* उभयलिंगी, स्त्रीपुरुषजातीचा.

HERMETICAL *a.* (*Gr. Hermes*, Mercury) रसायणशास्त्राचा; perfectly close घट्ट, आंत वायु न जाईसा, सुदृढ.

HERMIT (*Gr. eremos*, solitary) a person who retires from society and lives in solitude; esp. one who so lives from religious motives अरण्यवासी, वानप्रस्थ. -AGE आश्रम, मठ, पर्णकुटी *f*.

HERNIA (*L.*)—of the abdomen आंतड्यांतील कांहींएक भाग पुढें सरून जी सूज येती ती, अंतर्गळ, अंत्रवृद्धि *f*.

HERO (*heros*) a man of distinguished valor शूर, वीर;—of a drama नायक; a great person धेंड *n*; *Myth.* an illustrious man, supposed by the populace to partake of immortality, and after his death to be placed among the gods वीर. -IC *a.* बिराचा; शूर, रणधीट; शौर्याचा (action). -INE *a.* बहादर स्त्री *f*, वीरविक्रमा *f*;—of a drama नायका *f*. -ISM शौर्य *f*, मर्दाई *f*, पराक्रम.

HERON *F.* कुर्कुचा पक्षी, कुरकुंची *f*, क्रौंच.

HERPES (*L.*) an eruption of the skin दादर, इसप.

HESITATE *v. i.* (*hæsitare*) stop or pause respecting decision or action गुटमळणें, कांकू -नानू क., आशंकणें; stammer चांचरणें, बोलण्यांत अडखळणें [at].—HESITATION कांकू *f*, नानू *f*; चांचरी *f*, गचका.

HESPERIAN *a.* (*hespericus*, from *Hesperus*, the evening star) पश्चिमे कडील, पश्चिम.

HETERODOX *a.* (*Gr. heteros*, other, *doxa*, opinion) contrary to some acknowledged standard, as the Bible, the creed of a church, the decree of a council, &c. पाखांडी, वाममार्गी;—of persons वाममार्गाचा, पाखंड मताचा.—HETERODOXY पाखांड मत *n*, वाममार्ग.

HETEROGENEOUS *a.* (*-genos*, kind) भिन्नजातीचा, विजातीय.

HEW* *v.* cut with an axe तोडणें; chop खांडणें, छिंदणें; out, make smooth, as a stone मठारणें [down].

HEXAGON (*Gr. hex*, six, *gonia*, angle) षट्कोणाकृति *f*. -AL *a.* षट्कोण.

HEXAMETER (*Gr -metron*, measure) षट्पदी श्लोक.

HEY *interj.* ये, ए. -DAY भर, बहार *f*.

HIBERNATE *v. i.* (*hiems*, winter) हिंवाळा लोटणें -घालवणें.—HIBERNAL *a.* हिंवाळ्याचा, शिशिरऋतु संबंधी.

HIBISCUS POPULNEOIDES (*L.*) पारोसा पिंपळ.

HICCOUGH *Ger.* उचकी *f.*—*v. i.* उचकी लागणें -येणें.

HIDE* *v.* conceal लपवणें, छपवणें, झांकणें; keep secret गुप्त ठेवणें -राखणें; defend रक्षणें, बचावणें (Ps. xxvii. 5) [from].—*i.* लपणें, लिकणें, दडणें.—HIDDEN *a.* लपविलेला, गुप्त. —HIDING-PLACE लिकण *n*, दडण *n*.

HIDE* चामडें *n*, कातडें *n*.

HIDEOUS *a.* *F.* अकटोविकट, अकराळविकराळ (looks); भयंकर, घोर (noise).

HIE* *v. i.* लगे लगे -इयां इयां चालणें -जाणें.

HIERARCH (*Gr.* *hieros*, sacred, *archos*, leader) one who rules or has authority in sacred things महा आचार्य. -ICAL *a.* महा पुरोहिता संबंधी.

HIEROGLYPH, -IC (*Gr.* *-gluphein*, to carve) the picture-writing of the ancient Egyptian priests मिस्री उपाध्यांची चित्रलीपि *f*; any character or figure which has, or is supposed to have, a hidden or mysterious character सांकेतिक -गुप्त -गूढ अक्षर *n*.—& -AL *a.* सांकेतिक; सांकेतिक अक्षराचा; obscure गूढ, गहन.

HIGGLE *v.* See HAGGLE.

HIGH* *a.* elevated उंच; distinguished प्रख्यात, मोठा, थोर;—in rank थोर, मोठ्या पदवीचा; of noble birth कुलीन; violent जोराचा, प्रचंड (wind); victorious पराक्रमी, विजयी (Ex. xiv. 8); profound खोल, गहन (things); dear महाग; proud दिमाखाचा, अभिमानाचा (Prov. xxi. 4); h. noon ऐन दोनप्रहर; h. color गहिरा रंग; h. heat कडक आग *f*; h. relief उभट, उर्ध्वस्थ; h. treason राजद्रोह; h. antiquity बहु कालीनता *f*, फार पुरातनकाळ; strong-scented वासट, लागलेला (meat); remote from the equator भूमध्यरेषेपासून -विषुववृत्तापासून दूर, दक्षिण किंवा उत्तर (latitude);—as a note उंच, पहाड; h. day सण, उत्साहाचा दिवस; h. life बडेलोकांची रहाणी *f*; h. living मिष्टान्नभोजन *n*; [h. mass, *Rom. C. Ch.* that mass which is performed on a choir in a specially formal and solemn manner]; h. noon माध्यान्ह *f*, ऐन दोनप्रहर; [h. operation, *Surg.* extraction of the stone by cutting into the upper part of the bladder]; h. priest मुख्य उपाध्या; h. tide,—water भरतीची सीमा *f*.—*n.* उंच जागा *f*, उंची *f*; from on h. वरून. -BLOWN *a.* वाऱ्यानें फुगलेला; गर्वानें फुगलेला. -BRED *a.* बडेलोकांत वाढलेला.—CHURCH *a.* [inclined to magnify a particular form of church government or ecclesiastical rites and ceremonies;—more usually app. to such as attach the highest importance to the episcopal office and the apostolic succession]. -FED *a.* पोसलेला, माजवलेला. -FLOWN *a.* अतिगर्वित, दिमाखी. -HANDED *a.* oppressive जुलमाचा, काचाचा; arbitrary मनास येईल तसा, मनस्वी. -LAND पहाडीदेश. -LY *ad.* फार, बहुत, अतिशय. -METTLED *a.* पाणी-तेजदार, तापट (steed). -MINDED *a.* गर्विष्ट, मगरूर; magnanimous महामनस्क, थोर मनाचा. -NESS उंचपणा, उच्चता *f*; a title of honor given to princes or other men of rank राजपुत्र व बडे लोक यांचा एक किताब आहे. PRESSURE, having or involving a pressure exceeding that of the atmosphere; exceeding about fifty pounds on the square inch;—said of steam and steam-engines.] -SEASONED *a.* चमचमीत, मसालेदार. -WROUGHT *a.* मोठ्या कुशलतेनें -करामतीनें तयार केलेला, संस्कृत; inflamed to a high degree अति संतप्त, फार खिजवलेला -चेतविलेला. -WAY राजमार्ग, जनपथ, हमरस्ता. -MAN वाटमाऱ्या -पाडू.

HILARITY (*hilaris*, merry) हास्यविनोद, थट्टामस्करी *f*.

HILL * डोंगर, टेंकडी *f.* -OCK जमिनीचा उंचवटा, टेंक *n.*—HILLY *a.* पहाडी, डोंगरी, डोंगराळ (country).

HILT * मूठ *f*, कबजा, परज, दस्ता.

HIND * हरिणी *f*, मृगी *f*.

HIND * *a.* मागला, मागचा. -ER मागला, पश्चात्.—*v.* retard in motion गति खुंटवणें; prevent अडवणें, अडथळा हरकत क. [with, by, from]. ANCE अटकाव, हरकत *f*, गुत्ता, विघ्न *n* [to].

HINGE *D.* बिजागरें *n*, नरमादी *f*.—*v.* बिजागरीं लावणें -बसवणें.—*i.* बिजागऱ्यावर राहणें किंवा फिरणें; depend chiefly for a result परिणामावर -निकालावर अवलंबून राहणें-टेकणें [up, upon].

HINT * *v.* सुचविणें, दर्शविणें, दिक्प्रदर्शन क. [at, to].—सूचना *f*, इशारत *f*, इंगित *n* [to].

HIP * मांडीचा खुबा, कटि *f*; to smite h. and thigh समूळनाश क., अगदी मोड क., फन्ना-उडविणें; to carry on the h.—a child &c. कडेवर घेणें-वागवणें.

HIRE * *v.* procure from another person, and for temporary use, for a compensation or equivalent भाड्यानें घेणें -लावणें (a farm, horse);—as money व्याजानें घेणें -काढणें; engage in service for a stipulated reward मोलानें ठेवणें (servants, laborers); bribe लांच देणें, लांच देऊन वाईट कामास लावणें; let भाड्यानें देणें [for, from, to].—*n.* भाडें *n*; वेतन *n*, मजुरी *f*. -LING मोलकरी, मजूर.

HIS * *pron.* त्याचा, आपला.

HISS * *v. i.* make a sound like that of the letter *s*, by driving the breath between the tongue and the teeth, esp. in contempt or disapprobation हिश्श क., हुस्कटणें, हुर्यो हुर्यो क.; make a like sound as a goose or serpent does फुसकारणें, धुसकारा टाकणें;—as water thrown on hot metal चरचरणें, फसफसणें; as rockets &c. सुरसुरणें, सणसणणें [at, for].—*t.* हुसकटून टाकणें, धुत्कारणें.—*n.* फुसकारा, धुसधूस *f*; हुर्यो, धुत्कार.

HISTORY (*Gr. historein*, to learn) a written statement of what is known लेखी हकीकत *f*; description वर्णन *n*, बयान; a record of the past इतिहास, बखर *f*; a narrative of events कथा *f*, वृत्तांत; a true story, in distinction from *romance* कथा *f*, खरी गोष्ट *f*;—of kings and great men चरित्र *n*, पुरवणा, पोंवाडा; natural h. सृष्टिजन्य पदार्थांचें वर्णन *n*.—HISTORIAN इतिहास लेखक.—HISTORIC, -AL *a.* इतिहासाचा, इतिहास संबंधी; इतिहासरूप (poem); इतिहासावरून काढलेला -घेतलेला, इतिहासाचा (evidence); इतिहासदर्शक (chart).

HIT * *v.* reach or touch an object aimed at टिचणें, वेधणें; accord with -शीं मिळणें, जमणें [at].—*i.* strike अदळणें, लागणें, अपटणें [against, on]; succeed in an attempt चोट साधणें, लाग लागणें -साधणें.—*n.* आघात, फटका, धक्का; लाग, चोट *f*.

HITCH *v. i. Ger.* become entangled अडकणें, गुंतणें; jerk हिसके खाणें.—*t.* गुंतविणें, अडकविणें.—*n.* हिसका, तीड.

HITHER * *ad.* एथें, इकडे.—*a.* इकडील, एथील, आलिकडला. -TO *ad.* एथपर्यंत; up to this time आजपर्यंत, एथपावेतों.

HIVE * मधमाशांचें घर *n*, मोहळ *n*.

HOA *interj.* हो.

HOAR * *a.* white सफेद, पांढरा; white with age पिकलेला, पांढरा.—*n.* धुकें *n*.—HOARY *a.* सफेद, पिकल्या केशांचा, पलित.

HOARD * *v.* सांठवणें, संचय क. [up].—*n.* सांठा, ठेव *f*, डल्ला.

HOARSE * *a.* बसलेल्या गळ्याचा, घोगरा.

HOAX * झोका, गोला, फटवण *f*.

Hob *D.* वैल, अवेल.

Hobble *D. v. i.* लंगडणें, लंगडत चालणें.—[about, along, of].—*n.* कचाट *n*, लचांड *n*.

Hobby *D.* a stick, or figure of a horse on which boys play काठीचा घोडा; a favorable and ever-recurring theme of discourse, thought, or effort छंद, लहर *f*, नाद.

Hobgoblin (*hob* and *goblin*) भूत *n*, पिशाच *n*, बौ.

Hocus-pocus *D.* छांछू *f*, फांफू *f*, धंतरमंतर *n*.

Hod *F.* a kind of tray for carrying mortar कोळंबें *n*.

Hodgepodge *F.* खिचडी *f*, पंचमेळ *f*.

Hoe *F.* कुदळ *f*.—*v.* कुदळीनें खणणें.

Hog *W.* डुकर, शुकर.—*v.* केश कातरून लांडा क.—Hogshead एक कैली माप आहे.

Hoiden, Hoyden *W.* a rude, bold girl धांगड *f*, धोडगी *f*.

Hoist *v. Ger.* उभारणें, उंच क, वर चढवणें; to h. sail शीड हकारणें.

Hold* *v.* keep in the grasp धरणें: retain in one's keeping ठेवणें, राखणें, धरणें; possess जवळ असणें; restrain आवरणें, आटोपणें; continue चालवणें, चालू ठेवणें; — as a council, parliament, &c. भरणें, जमवणें, करणें; contain, as a vessel भावून -सोठवून घेणें; —as an opinion बाळगणें, धरणें; regard मानणें, लेखणें (Ex. xx. 7); h. your tongue चुप राहा, तोंड अटोप, तोंडाला खीळ घाल; to h. a wager पैज मारणें; forth पुढें क., द्यावयास काढणें; off दूर ठेवणें; जवळ न येऊं देणें; on चालू ठेवणें;—one's own वचन -प्रतिज्ञा पाळणें; आपली जागा संभाळणें -राखणें; out लांब क., पुढें क.; सोसणें, सोसत राहणें; up वर उचलणें.—*i.* टिकणें, ठरणें; खरें असणें, लागू पडणें: the argument *holds* in this case; चिकटून -धरून राहणें; इमानानें राहणें; थांबणें, राहणें; forth चौवांत बोलणें, सभत भाषण क.; off दूर राहणें; on धरून राहणें; चालणें; out टिकणें, निभणें; to, with पक्ष -मत धरणें; together लागून -जमून असणें; up निभाव काढणें, टिकाव धरणें; पाऊस उघडणें, राहणें; चालू ठेवणें, मागें न पडूं देणें.—*n.* seizure धर, पकड *f*, कबज *n*; authority to take or keep धरण्याचा अधिकार, हक्क; binding power and influence धर, धारणाशक्ति *f*; custody कैद *f*, बंदीखाना; fort किल्ला, गढी *f*.

Hole * pit खळगा, खाडा; excavation in the ground, made by an animal to live in पोखर *f*, विवर *n*, घर *n*, बीळ *n*; perforation भोंक *n*, छिद्र *n*, वेज *n*.—Hollow *a.* not solid पोकळ; empty पोकळ, शून्य, रिकामा; deep खोल, घोगरा (voice);—as the eye कोंझा;—as grains, &c. पोकळ; वांझ; false मनाचा खोटा -कुजका.—*n.* खळगा, —of the hand खोबळा, पुट *n*;—of a tree ढोल *f*;—in a hill, &c. विवर *n*, दरा *m*, *f*; low spot surrounded by elevations लवण *n*, सखल *n*; channel खांच *f*, खळी *f*; one who picks *holes* in the character of others छिद्रान्वेषी, छिद्रदर्शी.—*v.* पोकळ क., पोखरणें [out].

Holiday, See under Holy.

Holocaust (*Gr. holos*, whole, *kaustos*, burnt) होम.

Holy * *a.* set apart to the service or worship of God देवास वाहिलेला, पवित्र; worthy to be employed in the service of God देवाच्या सेवेस लावायास योग्य, शुद्ध; free from sinful affections; पवित्र, One परमेश्वर; [H. Thursday, the day on which the ascension of our Savior is commemorated; h. war, a war undertaken to rescue the Holy Land from the infidels; h. water (*Gr. and R. C.*

Churches) water which has been consecrated by the priest, to sprinkle the faithful and things used for holy purposes; H. Week, the week in which the passion of our Savior is commemorated; H. writ, the sacred Scriptures].—HOLINESS पवित्रता *f*; [His H., a title of the pope of Rome and also of Greek bishops].—HOLIDAY, HOLYDAY, a religious festival सण, पर्वणी *f*; a day of exemption from labor सुटीचा दिवस, सुटी *f*; h. clothes पोशाकी वस्त्रें *n pl.*

HOMAGE (*homo*, man, a vassal) a symbolical acknowledgment by a feudal tenant to, and in the presence of, his lord, on receiving investiture of fee, or coming to it by succession, that he was his *man* or vassal मुजरा, प्रभुवंदन *n*; devout affection भावभक्ति *f*, प्रेमभक्ति *f*; deference भीड *f*, मुरवत *f*.

HOME * a dwelling-house घर *n*; place or country in which one dwells घर *n*, स्वदेश, (आपला) गांव; the seat जागा *f*, घर *n*; at h. घरीं; to be at h. परिचय -माहिती असणें; h. department मुलकी खातें *n*.—*a*. घरचा, घरगुती; close निकट, जवळ; poignant खरमरीत, खोंचीचा.—*ad*. घरीं, गांवीं: to go h.; आंगीं, जिव्हारीं; to bring h. unto अंगीं लावणें, पदरीं माप घालणें. -BORN, -BRED घरगुती, पाळींव. -LY *a*. साधा, गांवटी, कुणबाऊ (garment, house); of plain features साधा, साधारण रुपाचा. -MADE *a*. घरीं केलेला. -SICKNESS, morbid and uncontrollable sorrowing for home when absent घरची काळजी *f*. -WARD *ad*. घराकडे.

HOMICIDE (*homo*, man, *cædere*, to kill) मनुष्यवध, नरहिंसा; culpable h. सदोष-मनुष्यवध. [H. is of three kinds;—justifiable, excusable, and felonious].

HOMILY (*Gr. homilia*, communion) a discourse or sermon read or pronounced to an audience संवाद, उपदेश.—HOMILIST उपदेशक.

HOMOGENEOUS *a*. (*Gr. homos*, the same, *genos*, race) एकजातीचा, सजातीय.

HOMOLOGOUS *a*. (*Gr. -logos*, speech) समपरिमाण.

HONE * शीळ *f*, साण *f*, पाथरी *f*; [a kind of swelling in the cheek].—*v*. साणेवर धरणें, पाजवणें, धार लावणें.

HONEST (*honos*, honor) decent शिस्त, योग्य, उचित (Rom. xii. 17); good चांगला, बरा (Acts vi. 3); fair in dealing with others प्रामाणिक, खरा, इमानी (man); just नेकीचा, सचोटीचा (dealing);—as an employment हलालाचा, हलाल; chaste पतिव्रता.—HONESTY प्रामाणिकपणा, सचोटी *f*; सत्ववृत्ति *f*, खराई *f*.

HONEY * मध *m*, *f*; मधासारखी गोड वस्तु *f*, अमृत *n*, मधु *f*, इ०. -COMB मधमाशांची पोळी *f*. -MOON लग्न झाल्यावरचा पहिला महिना. -TONGUED *a*. गोडबोल्या, मधुरभाषी.

HONOR (*L.*) esteem due or paid to worth मान, सन्मान, प्रतिष्ठा *f*; when said of the Supreme Being, reverence पूज्यबुद्धि *f*, श्रद्धा *f*, पूजन *n*; ornament अलंकार, भूषण *n*; excellence of character अब्रु *f*, इजत *f*, नांव *n*;—in men, integrity नेक *f*, नेकी *f*, प्रामाणिकपणा;—in women, purity साध्वीपणा, सद्गुण, पातिव्रत्य *n*; a mark of respect आदरमान, ताजीम *f*, आदरसत्कार: military *honors*; university prizes विद्यालयांतील बक्षीस *n* -पदवी *f*, इ०.—*v*. मान -ताजीम -अब्रू देणें; मोठ्या पदास चढविणें, मोठेपणा देणें; मान -मर्यादा ठेवणें -राखणें; पूजणें, भजणें;—as a bill of exchange सकारणें. -ABLE *a*. अब्रूचा, प्रतिष्ठेचा; थोरमनाचा, महा-

मनस्क; प्रामाणिक, नेकीचा, यथान्याय (motive); conferring honor मानप्रद, यशस्कर (wounds); worthy of respect सन्मान्य, मानयोग्य (Heb. xiii. 4) [for]. -ARY *a.* अब्रूचा, प्रतिष्ठेचा; सन्मानदायक; possessing a title or place without performing services or receiving a reward केवळ प्रतिष्ठे करितां दिलेला किताब, किंवा हुद्दा. -ED सन्मान्य, सन्मानित, प्रतिष्ठित [for].

HOOD * टोपी *f*, घुंगट *n*;—of a carriage दमन *n*;—of a serpent फडा *f*. -WINK *v.* blind by covering the eyes डोळे बांधणें; cover झांकणें; impose on फसविणें, छकविणें, नजरबंदी क.—* -पणा, -पण *n*: brotherh. भाऊपणा; falseh. खरेंपण *n*.

HOOF * खूर.

HOOK * आंकडा, अंकडी *f*;—of a staple कडी *f*;—for fish गळ: by h. or by crook कसेंही करून, जसें तसें.—*v.* अंकडीनें -गळानें धरणें; steal चोरणें; entrap फसीं पाडणें, फसविणें, गोवणें [together].

HOOP * धांव *f*, विडी *f*, कडें *n*. -ING-COUGH डांग्या खोकला.—*v.* पुकारणें, आरोळी मारणें —*n.* पुकारा, आरोळी *f*.

HOOPOE, HOOPOO (*upupa*) सुतारपक्षी.

HOOT *v. W.* shout in contempt हुर्यो हुर्यो क.; cry as an owl घुघु क. [down, out, off].—*n.* हुर्यो हुर्यो *f*, हडहड *f*; घुघू *f*.

HOP* *v. i.* skip as birds do उडत उडत जाणें -चालणें; limp लंगडत चालणें; dance नाचणें.—*n.* एका पायाची उडी *f*; उडी *f*; a spring झांप *f*, झडप *f*.

HOPE* a desire of some good, accompanied with at least a slight expectation of obtaining it, or a belief that it is obtainable आशा *f*; that which gives hope आशादायक गोष्ट -वस्तु -मनुष्य.—*v. i.* आशा धरणें -बाळगणें; -वर आशा ठेवणें (Ps. xlii. 2) [for]. -FUL *a.* आशावान, उमेदवार; promising व्हायासारखा, होतकर. -LESS *a.* निराश, आशाविरहित [of].

HORAL *a.* (*hora*, hour) होऱ्यासंबंधी, होऱ्याचा.

HORDE (*F.*) फिरस्त्यांचा थवा -जथा -पुठा.

HORIZON (*Gr. horos*, limit) the apparent junction of the earth and sky दिगंत, धार *f*, काळीधार *f*; rational h. क्षितिज *n*.—HORIZONTAL *a.* क्षितिजाचा, काळ्या धारेचा; सपाट, क्षितिजाबराबर, क्षितिजसमसूत्र; क्षितिजाजवळचा. -LY *ad.* आडवा, क्षितिजासीं समान.

HORN* a hard, projecting, and usually pointed organ growing from the heads of certain animals शिंग *n*, शृंग *n*; a wind instrument of music. करणा, शिंग *n*; a drinking-cup प्याला; utensil for holding powder दारूचें शिंग *n*, शिंगडा; feeler of an insect किड्याची मिशी *f*; a drenching h. for cattle घोटें *n*.—of a snail गोगलगाईचें शिंग *n*;—of the moon चंद्राची कोर *f*, शृंग *n*; material of which horns are composed शिंगाचा पदार्थ, शृंगमय द्रव्य *n*: a h. comb; [*Scrip.* a symbol of strength, power, exaltation]; to draw, pull, or haul in the horns नाक गुंडाळणें. -BOOK, a primer मुलाची पहिली पोथी *f*, बालपोथी *f*; a manual सारग्रंथ. -ED शृंगी, शिंगाचा; शृंगाकार.—HORNY *a.* शिंगाचा, शृंगमय; hard कठीण, निबर.

HOROLOGE (*Gr. hora*, hour, *legein*, to say) कालमापक यंत्र *n*.

HOROSCOPE (*Gr.-skopos*, observing) an observation made of the aspect of the heavens at the moment of a person's birth, by which the astrologer claims to foretell the events of his life जातक *n*, जन्मपत्र *n* -पत्रिका *f*; diagram or scheme of twelve houses or signs of the zodiac, into which the whole circuit of the heavens was divided for the purposes of such prediction of fortune जन्मकुंडली *f*.

HORROR (*horrere*, to shiver) a shaking, shivering, or shuddering, as in the cold fit which precedes a fever शिसारी *f*, काटा; painful emotion of fear, dread, and abhorrence थरथराट, भय *n*, धोसरा.—HORRIBLE *a*. भयंकर, विक्राळ, घोर.—HORRID *a*. rough खरबरीत; prickly काटयाचा, काटेरी; विकराळ, भीम.—HORRIFIC *a*. भयंकर, भेंसूर.—HORRIFY *v*. भेंसूर -भयंकर क.; strike with horror भेडसावणें, धोसरा भरणें. [with]. — HORRIPILATION (*-pilus*, the hair) अंगावरचा काटा, थरकांटा, रोमांच.

HORSE* (*Skr. hresh*, to neigh) घोडा, अश्व; mounted soldiery स्वार *pl*, घोडदळ *n pl*; a stand घडवंची *f*, घोडा: a clothes -h., a saw -h. घोडी *f*; to take h. घोड्यावर बसून फिरायास निघणें; body of h. under one commander पागा *f*, पताक *f*.—*v*. घोडा किंवा घोडे पुरविणें; घोड्यावर बसल्या सारखें बसणें, दोहींकडे पाय टाकून बसणें; घोडी वर घोडा चढवणें; पाठीवर नेणें -घेणें -वाहणें.—ANT घोडमुंगळा. -BACK,—on h. घोड्यावर. -BOY घोडक्या, मोतद्दार. -BREAKER चाबुकस्वार. -CLOTH झूल *f*. -DEALER घोड्यांचा व्यापारी-सौदागर. -DOCTOR अश्ववैद्य, शालोत्री; a farrier नालबंद. -DRENCH घोड्याचा जुलाब. -FACED *a*. having a long, coarse face घोडमुख्या -तोंड्या. -FLY घोडमाशी *f*. -GUARDS पाहऱ्याचे स्वार *pl*; [the H., the head-quarters of the British army in London;—so called from two mounted sentries before the entrance]. -LAUGH मोठ्यानें हसणें *n*, अट्टहास. -LEECH मोठी जळू *f*; a farrier नालबंद. -MAN स्वारी *f*; घोड्यावरला शिपाई, घोडेस्वार; एक जातीचे कबूतर *n* आहे. -PLAY धांगडधिंगा, घोडदुळा. -POWER घोड्याचें जोर *n*; [*Mach.* a unit or standard by which the capabilities of steam-engines and other prime movers are measured; estimated as 33,000 pounds raised one foot in a minute]; a machine worked by one or more horses घोड्यानें -घोड्यांनीं चालवायाचें यंत्र *n*. -RACE घोड्यांची शर्यत *f*. -RADISH-TREE शेवग्याचें झाड *n*, शेवगा. -SHOE नाल. -SHOEING, the act of—नालबंदी *f*;—the employment नालबंदाचा धंदा. -TONGUE, a plant घोड्याची जीभ *f*. -STALL ठाणें *n*, ठाण *n*. -WAY घोडेवाट *f*. -WHIP चाबूक.—*v*. चाबूक मारणें, चाबकाचा मार देणें.

HORTICULTURE (*hortus*, garden, *cultura*, culture) बागाईत *n*, बागकाम *n*.—HORTICULTURAL *a*. बागाइताचा, बागकामाचा.

HOSANNA (*Heb.*) ईश्वराचा स्तुतिवाद, अथवा स्तुतिवादात्मक घोषण *n*.

HOSE* stockings पायमोजे *pl*; breeches; चोळणा [a pipe of a fire &c. engine].—HOSIER मोजे विकणारा.—HO-SIERY मोजे विकण्याचा धंदा; पायमोजे *pl*.

HOSPITABLE *a*. (*hospes*, guest) receiving and entertaining strangers with kindness and without reward आदरआतिथ्य करणारा; proceeding from or indicating kindness to guests आदरआतिथ्याचा, पाहुणचाराचा.—HOSPITALITY आतिथ्य *n*, आगतस्वागत *n*, पाहुणचार.—HOSPITAL, building in which the sick or infirm arereceived and treated रोग्यालय, दवाखाना, 'इस्पितळ' *n*.—HOST यजमान, आतिथ्य करणारा; one from whom another receives food, lodging, or entertainment खाणावळीचा घरधनी, खाणावळवाला. -ESS यजमानीण *f*, घरधनीण *f*; खाणावळ घालणारीण *f*.

HOST (*hostis*, enemy) an army सैन्य *n*, फौज *f*; multitude झुंड *f*, चुंग *f*, समुदाय.

HOST (*hostia*, sacrifice) [*R. C. Ch.* The consecrated wafer, believed to be the body of Christ, which in mass is offered as a sacrifice].

HOSTAGE *F*. a person given as a pledge or security for the performance of the

conditions of a treaty or stipulations of any kind, and on the performance of which the person is to be released ओल *f*; to give as a h. ओलीस देणें -ठेवणें.

HOSTILE *a.* (*hostis*, enemy) appropriate to an enemy शत्रूचा, शत्रूस योग्य; unfriendly प्रतिकूल, विरुद्ध (country, change).—HOSTILITY शत्रुभाव, वैर *n*; a hostile deed वैरपणाचें काम *n*, आगळीक *f*, भांडण *n*, लढाई *f*, मारामारी इ०; *pl* लढाई *f*, हल्ला इ०; natural h. जातिवैर *n* [to, with].

HOT *a.* * having much sensible heat उष्ण, ऊन, गरम; ardent तलख, तीक्ष्ण, प्रखर, गरम; violent तुंबळ, घोर, दारुण (fighting); eager उतावळीचा, जलद (pursuit); pungent तिखट. -BED अढी *f*. -BRAINED, -HEADED *a.* साहसी, आतताई. -HOUSE उष्ण हवेंतील झाडें वाढविण्याचें घर *n*. -SPUR कपाळफोड्या.

HOTCH-POTCH *F.* खिचडी *f*, धेडगुजरी *f*.

HOTEL *F.* उतारशाळा *f* (हींत जेवण वगैरेची सोयी असते), 'होटेल' *n*; in France, a place or dwelling of a person of rank or wealth हवेली *f*, वाडा, महाल.

HOUND* शिकारी कुत्रा.

HOUR (*hora*) sixty minutes तास, अडीच घटका *f*, 'अवर'; the time of the day, as expressed in hours, minutes, &c. वेळ, घटका *f*, तास इ०; a time वेळ *f*, घटका *f*: the h. of peril; to keep good *hours* वेळेवारीं घरीं येणें -असणें; रात्रीं फार वेळ बाहेर न राहणें; the h. is full घटका भरली. -GLASS घड्याळ *n*, डमरुयंत्र *n*. -HAND अवरकांटा. -LY *a.* दर तासास होणारा; वारंवार होणारा.—*ad.* दर तासास; घडींघडीं, वारंवार. -PLATE शंकु.

HOUSE* a dwelling-place घर *n*, गृह *n*; household affairs संसार, घरखटला, गृहकृत्य *n*; a family कुटुंब *n*; a family of ancestors घराणें *n*, घर *n*: the h. of Israel; one of the estates of a kingdom assembled in parliament or legislature राज्यकारभार पाहणारी सभा *f*; a firm पेढी *f*; *Astrol.* कुंडलींतलें गृहाचें स्थान *n*; an inn उतारशाळा *f*, खाणावळीची जागा *f*, इ०; h. of correction तुरुंग; h. of God देऊळ *n*, भजनालय *n*; religious h. मठ; to bring down the whole h. सर्व सभेकडून वाहवा ह्मणविणें -करून घेणें.—*v.* घरांत -निवाऱ्यास ठेवणें (wood, cattle).—*i.* निवाऱ्यास -आश्रयास राहणें; स्थान असणें; [have an astrological station in the heavens]. -BREAKER घर -भिंत-फोड्या, गृहभेदी, संधिचोर. -BREAKING घर फोडणें *n*, संधिचौर्य *n*. -DOG घर राखण्या करितां ठेवलेला कुत्रा, रखवालीचा कुत्रा. -HOLD कुटुंब *n*, घर *n*; domestic management घर संजोगणी *f*, घरचार; rules or customs of h. घरचार. -HOLDER कुटुंबी, गृहस्थ. -KEEPER घरबारी, खटलेवाला; a female servant who has the chief care of the family घर संभाळणारी चाकरीण *f*, परिचारिका *f*. -KEEPING घरसंजोगणी *f*, घरचार; hospitality पाहूणचार. -LESS *a.* निराश्रय, उघडा. -MAID गृहदासी *f*, घरांतील कामकरीण *f*, सैरंध्री *f*. -WARMING, a feast at the time a family enters a new house घरभरणी *f*. -WIFE घरधनीण *f*, -करीण *f*. -WIFERY घरचार, घरधंदा.—HOUSING गाशा.

HOVEL* खोपट *n*, खोपटी *f*.

HOVER *W. v. i.* hang fluttering on the air or upon the wing घिरट्या -भोवंड्या घालणें; hang about आसपास भ्रमण क., भोवणें.

HOW* *ad.* in what manner कसा; to what degree कितपत, किती; for what reason कां, कशानें; in what state कोणत्या स्थितीनें, कोणत्या तोंडानें. -BEIT *conj.* तथापि, तरी. -EVER *ad.* कसाही, कितीही; at least तरी, तर.—*conj.* तथापि, तरी. -SOEVER *ad.* कसाही; कितीही.

HOWITZER *Ger.* एक प्रकारची तोफ आहे, गर्नाळ *f*?

HOWL *v. i. Ger.* cry as a dog केंकावणें; wail हेल -गळा काढून रडणें; roar, as a tempest गर्जणें, गडगडणें [at].—*n.* केंकणी *f*; a loud piercing cry of distress आकांत, आक्रोश, घोर. -ING *a.* भणभणीत, घोर.

HUBBUB * गलबला, गवगवा, गूल *f*.

HUCKSTER *Ger.* घेवारी.

HUDDLE *v. i. Ger.* खेटणें, खेटाखेट क., दाटीनें जमणें.—*t.* do in haste गडबडीनें क., गडबडगुंडा क.; put together in confusion घालमेल -घोटाळा करून भरणें -ठेवणें [together, round].—*n.* दाटी *f*, गर्दी *f*; गलत *f*, घालमेल *f*, घप्पाघोळ.

HUE * रंग.—*F.* हाकाहाक *f*; h. and cry पुकारा, ओरडाओरड *f*.

HUG * *v.* press closely within the arms मिठीमारणें; embrace आलिंगणें, उरापोटासीं धरणें.—*n.* मिठी *f*, आलिंगन *n*; friendly h. क्षेमालिंगन *n*; Cornish h. मगरमिठी *f*.

HUGE *a. D.* enormous फार मोठा, बताडा, औजड; extended लांब, मोठा (space).

HULK * गलबताचा जुना सांगाडा.

HULL * the husk टरफल *n*; body of a vessel गलबताचा सांगाडा -चें पोट *n*.

HUM *v. Ger.* sing with shut mouth गळ्यांतले गळ्यांत गाणें; greet with a buzz of approbation हुंकार देणें, होकार देणें.—*i.* buzz गोंगावणें; make a drawling sound through the nose in the process of speaking गेंगणें; mumble गुळमुळीत बोलणें, ओठांत बोलणें. —*n.* गुणगुण *f*; confused voice of a crowd heard at a distance कलकलाट, गलका. -MING गुणगुण *f*, भिणभिण *f*, गुंजारव.

HUMAN *a.* (*homo*, man) मनुष्याचा, मानुष in comp. मनुष्य.—HUMANE *a.* दयाळू, कृपाळू; benevolent परोपकारी.—HUMANITY, the quality of being human मनुष्यपण *n*, माणूसपणा, मनुष्यस्वभाव; human race मनुष्यजात *f*; benevolence दया *f*, करुणा *f*, परोपकारबुद्धि *f*; liberal education व्युत्पत्ति *f*; philology भाषाशास्त्र *n*. -IZE *v.* नरम -लीन क.—*i.* नरम होणें. -KIND मनुष्यजाति *f*. -LY *ad.* दयाळूपणानें; मनुष्याच्या रीती प्रमाणें, मनुष्या प्रमाणें; मनुष्याच्या मता प्रमाणें; मनुष्याच्या समजुती -ज्ञाना प्रमाणें.

HUMBLE *a.* (*humilis*, on the ground) mean नीच, हलका; not proud निगर्वी, लीन, नम्र; [thinking one's self ill-deserving or unworthy, when judged by the demands of God].—*v.* गर्व हरण क., पाणउतारा क., रग मोडणें; नम्र क.; सत्ता -अधिकार कमी क.; ईश्वरेच्छेच्या आधीन क. (1 Pet. v., 6.)

HUMBLE-BEE (probably from *hum*) भुंगा, भ्रमर.

HUMBUG (*hum & bug*) imposition under fair pretenses भुलथाप *f*, गुळखोबरें *n*; spirit of deception ठकविण्याची बुद्धि *f*, ठकबाजी *f*; one who deceives भुलथाप देणारा, गोडबोल्या, भोंदू.

HUMID *a.* (*humere*, to be moist) ओलसर, दमसर. -ITY ओलावा, ओलसरपणा, आर्द्रता *f*.

HUMILIATE *v.* (See HUMBLE).—HUMILIATION मानभंग, रगमोड *f*, पाणउतारा; नम्रावस्था *f*.—HUMILITY लीनता *f*, नम्रता *f*, निगर्वता *f*.

HUMOR (do.) ओलावा; moisture of animal bodies धातु *f*, रस; — of the eye डोळ्यांतील ओलावा, पाणी *n*; disorder of the h. दोष; rash पुरळ, कोंडा; temper वृत्ति *f*, तबियत *f*; *pl* caprices लहर *f*, तबियत *f*, छंद; wit थट्टेबाजी *f*, रहस्य *n*.—*v.* लळा -लाड चालविणें -पुरविणें. -AL *a.* कफपित्तात्मक (fever). -IST विनोदी, थट्टेखोर; ख्याली; छांदिष्ट, तऱ्हेबाज; [one who attributes diseases to the diseased state of the humors]. -OUS *a.* छंदी, लहरी; विनोदी, मौजी, हसण्याजोगा.

HUMP *Ger.* कुबड *n*, कोंक *n*;—on a bullock's back कोहळें *n*, ओशिंड *n*;—on a camel's back मदार *f*. -BACK पोंक *n*, कोंक *n*; कोंक आलेला मनुष्य. -BACKED *a.* कुबडा, कुब्ज.

HUNCH, See HUMP.

HUNDRED* *a.* शंभर, शत.—*n.* शतक *n*, शेंकडा; division of a county in England महाल. —HUNDREDTH *a.* शंभरावा.—*n.* शंभरावा भाग, शतांश.

HUNGER* an uneasy sensation occasioned normally by the want of food भूक *f*, क्षुधा *f*; desire for food अन्नाची वांच्छा *f*; strong desire भूति इच्छा *f* (Matth. v. 6). *v. i.* भूक लागणें; इच्छिणें, वांच्छिणें, आशावणें [after, for].—HUNGRY *a.* भुकेला, उपाशी, बुभुक्षित, क्षुधित; barren भुकिस्त, भुकड (soil).

HUNT* *v.* chase पारध क.; pursue पाठीस लागणें, हुडकणें, शोध क. [out, up]; drive हांकणें, हांकलून देणें [down, from, away]; use, as hounds in the chase कुत्रे शिकारीस लावणें.—*i.* -च्या शिकारीस जाणें, -ची पारध क. (Prov. vi., 26).—*n.* शिकार *f*, पारध *f*; शोध; पाठलाग; association of huntsmen पारध्यांची टोळी *f* -मंडळी, -चा जथा. -ER पारधी; hunting-dog पारधीचा -शिकारी कुत्रा; horse used in the chase शिकारी घोडा; hunting-watch धातूच्या डबींत बसविलेलें घड्याळ *n*. -ING-DOG शिकारी कुत्रा. -ING-HORN शिकारींत कुत्र्यांस धीर देण्याकरितां फुंकायाचें शिंग *n*. -WATCH ज्या घड्याळाचे कांचेच्या रक्षणार्थ धातूचें झांकण असतें तें *n*. —HUNTSMAN पारधी, व्याध.

HURL *v. O. E.* जोरानें फेंकणें -लोटणें.—*n.* टाकणें *n*, प्रक्षेप.—HURLY-BURLY घोळ, धांदल *f*, घोळंकार.

HURRICANE *Sp.* वादळ *n*, तुफान *n*.

HURRY *v. Ger.* hasten त्वरा -घाई क.; urge to confused or irregular activity गडबडीनें -धांदलीनें करायास लावणें, तांतड लावणें. —*i.* उतावळी क., गडबडणें; उतावळीनें जाणें.

HURT* *v.* cause physical pain दुखवणें, दुखापत क.; damage नुकसान क., खराब क., नासणें; wound the feelings of मन दुखवणें, दुःख देणें.—*n.* दुखापत *f*, घाव; नुकसानी *f*, खराबी *f*, उपद्रव, धक्का. -FUL *a.* अपकारक, बाधक; घातक, नाशकारक [to].

HUSBAND* a married man नवरा, दादला, पति; a frugal person काटकसरीनें खर्च करणारा, मितव्ययी; [a ship's h., the owner of a ship who manages its concerns in person.] — *v.* तोडजोडीनें -बेतानें काम क.; बेतानें खर्चणें; till शेतकी क., जमीन नांगरणें. -MAN शेतकरी. -RY, domestic economy घरसंजोगणी *f*; thrift काटकसर *f*, मितव्यय; शेतकी *f*, कृषिकर्म *n*.

HUSH *a. Ger.* चुप, उगी, स्तब्ध.—*v.* शांत -थंड -उगा क.; शांतवन क., दुःख परिहार क. to h. up दाबादाब -चेपाचेप क.—*i.* चुप -स्तब्ध होणें. -MONEY तोंड दाबणें *n*, मुखपिंड.

HUSK *D.* टरफल *n*, साल *f*, फोल;—of नाचणी &c. फरळ *n*;—of rice भातकण, तूस;—of legumes काठण *n*, काड *n*.—*v.* टरफल, साल इ० काढणें, सोलणें.

HUT *D.* खोपट *n*, झोपडी *f*.

HUZZA *interj. Ger.* जयजय, वाहवा.—*n.* जयजय शब्द, गजर.

HYDRA (*Gr. hudor*, water) एक बहुमस्तकांचा कल्पित पाणसर्प; multifarious evil अनेक प्रकारचें दुःख *n*; एक जलजंतु आहे.

HYDRAULIC *a.* (*Gr. -aulos*, pipe) उदकगतिशास्त्र संबंधी.—HYDRAULICS उदकगतिशास्त्र *n*.

HYDROCEPHALUS (*Gr. -kephale*, head) dropsy of the brain जलमस्तकरोग.

HYDROGEN (*Gr. -genein,* to beget) उदकजनक वायु, 'हैड्रोजिन.'

HYDROGRAPHY (*Gr. -graphein,* to describe) समुद्र, नद्या, सरोवरें इ० मापण्याची अथवा त्यांचे नकाशे काढण्याची विद्या *f*, समुद्रमापनविद्या *f*.

HYDROMETER (*Gr. -metron,* measure) पातळ पदार्थांचें विशेष गुरुत्व जाणण्याचें साधन *n* -यंत्र *n*; पाण्याचा वेग मोजण्याचें यंत्र *n*.

HYDROPATHY (*Gr. -pathos,* suffering) पाण्याच्या प्रयोगानें रोगाची चिकित्सा *f*, जलोपचार.

HYDROPHOBIA (*Gr. -phobos,* fear) a preternatural dread of water जलभय *n*; the disease caused by inoculation with the saliva of a rabid creature पिसाळलेल्या जनावराच्या दंशानें होणारा रोग, जलभयरोग.

HYDROSTATICS (*Gr. -statikè*) science of weight द्रवद्रव्य (पाणी वगैरे) मापनविद्या *f*, उदकस्थितिशास्त्र *n*.

HYDROTHORAX (*Gr. -thorax,* chest) उरामध्यें पाणी जमण्याचा रोग, जलपिंजर.

HYEMAL *a.* (*hiems,* winter) हिंवाळ्याचा, हैम.

HYENA (*L.*) तरस.

HYGROMETER (*Gr. hygros,* wet, *metron,* measure) हवेंतील ओलावा मोजण्याचें यंत्र *n*.

HYMENEAL *a.* (*Gr. Humen,* the god of marriage) विवाह संबंधी, वैवाहिक.

HYMN (*Gr. humnos,* a festive song) गीत *n*; ईश्वरभजनाचें गीत *n* -स्तोत्र *n*.

HYPERBOLE (*Gr. hyper,* over, *ballein,* to throw) a rhetorical figure which represents things as much greater or less than they really are अतिशयोक्ति *f*, अत्युक्ति *f* (Gen. xiii., 16).

HYPERCRITIC (*Gr. -kritikos,* critical) one who is critical beyond measure or reason अति चिकित्सा करणारा, चिकित्साखोर.—HYPERCRITICISM अति चिकित्सा *f*.

HYPHEN (*Gr. hupo, hen,* under one) संबंधदर्शक चिन्ह *n* [-].

HYPOCHONDRIUM (*Gr. hupo,* under, *chondros,* cartilage) one of the two spaces which contain the liver and the spleen बरग *f*.

HYPOCRISY (*Gr. -krinein,* to decide) a feigning to be what one is not ढोंग *n*; the assuming of a false appearance of virtue or religion दांभिकपणा, दंभ, ढोंग *n*.—HYPOCRITICAL *a.* ढोंगाचा, दांभिक.—HYPOCRITE ढोंगी, दांभिक, हरिभक्त.

HYPOGASTRIC (*Gr. -gaster,* belly) खालच्या पोटाचा, बस्तीसंबंधी.

HYPOSTASIS (*Gr.* substance) वस्तु *f*, सत्व *n*, भाव; an element तत्व *n*; sediment गाळ.

HYPOTENUSE (*Gr. -teinein,* to stretch) *Geom.* कर्ण.

HYPOTHESIS (*Gr. -thesis,* placing) supposition अटकळ *f*, कल्पना *f*, अनुमान *n*; a system of theory imagined or assumed to account for known facts or phenomena उपपत्ति *f*.

HYSTERIA (*Gr. hustera,* the womb) *Med.* a species of neurosis, or nervous affection, generally occurring in paroxysms, the principal characteristics of which consist in alternate fits of laughing and crying, with a sensation as if a ball set out from the uterus and proceeded through the stomach, chest, and neck, producing a sense of strangulation वायुगोळा, गर्भाशयदाह.—HYSTERICS *pl* बाहेरचें वारें *n*.

HYSTERON - PROTERON (*Gr.*) a figure in which the word that should follow comes first मागेंपुढें, पुढचा मागें, आदिपश्चात्.

I.

I *pron.* * मी.

IAMBIC, IAMBUS (*L.*) a foot consisting of two syllables, the first short and the second long लघुगुरु.

Ice * water in a solid state बर्फ *n* ; concreted sugar घट्ट झालेली साखर *f*; [cream or milk sweetened, variously flavored, and frozen] ; to break the i. उपक्रम -उहू काढणें.—*v.* बर्फानें आच्छादणें ; घट्ट झालेली साखर वर पसरणें, साखर लावणें -पसरणें. -CREAM साखरेची राबडी *f.* -BERG बर्फाचा डोंगर. -HOUSE बर्फ ठेवायाचें घर *n.*—ICICLE बर्फाचा कण, हिमकण.—ICY *a.* बर्फाचा, हिममय ; indifferent शिथिल, थंड, उदास.

Ichneumon (*Gr.*) मुंगूस.

Ichthyology (*Gr. ichthus,* fish, *logos,* discourse) मत्स्यविद्या *f*, मत्स्यवर्णन *n.*

Iconoclast (*Gr. eikon,* image, *clastes,* breaker) मूर्त्ति फोडणारा, मूर्त्तिभंजक ; one who exposes or destroys impositions or shams ढोंग उघडकीस आणणारा, किंवा ढोंगाचा नाश करणारा.

Idea (*Gr. idein,* to see) the transcript, image, or picture of a visible object, that is formed by the mind कल्पना *f*, आकार, भास ; a general notion or conception formed by generalization कल्पना *f*, अनुमान *n*, तर्क ; the real object that is conceived or thought of कल्पना *f*; perception ग्रह ; opinion मत *n*, विचार ; conception समज, भास ; a fictitious object or picture created by the imagination कल्पनेचा पुतळा, कल्पनेचा तरंग.—IDEAL *a.* mental मनाचा, मनोगत (knowledge) ; proposed for imitation नमुन्याचा, कित्त्याचा (rules); visionary कल्पित, काल्पनिक (good); teaching the doctrine of idealism काल्पनिक विज्ञानाचा. -ISM, the system that makes every thing to consist in ideas, and denies the existence of material bodies कल्पनावाद. -ITY कल्पनाशक्ति *f.*

Identity (*idem,* the same) ऐक्य *n*, तादात्म्य *n.*—IDENTICAL *a.* तोच, एकरूप, अनन्य.—IDENTIFY *v.* (*-facère,* to make) तोच तो -हाच तो करून दाखविणें, तोच तो शाबीत क. ; make or be the same एक क. [by].—*i.* एक होणें ; -चें सुखदुःख, उद्देश.—IDENTIFICATION एकीकरण *n.*

Idiosyncrasy (*Gr. idios,* peculiar, *sun,* with, *krasis,* temperament) विशेष प्रकृति *f.*

Idiom (*Gr. idios,* proper, peculiar) भाषणसंप्रदाय, संप्रदाय ; peculiar cast of a language भाषेची रहाटी *f* -मोडणी *f.*—IDIOMATIC *a.* भाषणसंप्रदायाचा ; संप्रदायशुद्ध.

Idiot (*idiota*) a natural fool, or fool from birth जन्माचा वेडा, खुळा, उपजत मूर्ख. —IDIOCY चळ, खूळ *n.*

Idle* *a.* vain निरर्थक, व्यर्थ, पोकळ (words); unemployed रिकामा, रिकामपणाचा (hour); not employed रिकामा, निरुद्योगी, बेकार ; lazy आळशी, सुस्त (man) ; i. wishes वृथामनोरथ.—*v.* गमणें, रमणें ; away गमावणें. -NESS आळस, सुस्ती *f*; रिकामेपणा, अनुद्योग ; पोकळपणा, निरर्थकता *f.*—IDLER गमणारा, कामचोर.—IDLY *ad.* आळसानें ; रिकामेपणानें ; carelessly उगीच, एरवी, व्यर्थ.

Idol (*Gr. eidolon*) मूर्त्ति *f*, प्रतिमा *f*; image of a divinity देव, मूर्त्ति *f*, विग्रह (Rev. ix. 20) ; a person or thing greatly loved or adored देव्हारें *n* ; phantom आभास, छाया *f.* -ATER मूर्त्तिपूजक ; one who worships as a deity that which is not God मिथ्यादेवाची भक्तिकरणारा. -ATRY, the worship of idols, images, or any thing made by hands, or which is not God मूर्त्तिपूजा *f*, असत् देवभक्ति *f*; excessive attachment or veneration for any thing अतिभक्ति *f*, अतिप्रीति *f.* -ATROUS *a.* मूर्त्तिपूजेसंबंधी ; मूर्त्तिपूजेसारखा, मूर्त्तिपूजेच्या गुणाचा ; अतिभक्तीचा.

If* *conj.* in case that जर, जरकरतां ; whether किंवा नाहीं : he doubts i. two and two make four.

IGNEOUS *a.* (*ignis, Skr. agni,* fire) अग्नीचा; consisting of fire अग्निमय; resembling fire अग्नितुल्य, अग्निसारखा; *Geol.* resulting from the action of fire अग्नीच्या क्रियेपासन निघणारा -झालेला, अग्न्युत्पन्न (rocks). —IGNITE *v.* पेटविणें, प्रदीप्त क.—*i.* पेटणें, पेट घेणें; begin to burn जळूं लागणें.—IGNITION प्रज्वलन *n*, दीपन *n*, पेटविणें *n*.—IGNIS FATUUS (*-fatuus,* foolish) a meteor or light that appears in the night, over marshy grounds, supposed to be occasioned by the decomposition of animal or vegetable substances, or by some inflammable gas भूतकोलीत *n*, पिशाचदीपिका *f*.

IGNOBLE *a.* (*in,* not, *nobilis,* noble) हीन कुळाचा, कमजात; mean नीच, हलका, पाजी.

IGNOMINY (*-nomen,* name) public disgrace अप्रतिष्ठा *f*, अपकीर्ति *f*; an ignominious act अपकीर्तीचें कर्म *n*, लाजिरवाणें काम *n*.—IGNOMINIOUS *a.* लाजिरवाणा, अपयशाचा.

IGNORANT *a.* (*in,* not, *gnarus,* knowing) अज्ञान; unacquainted अजाण, गैरमाहीत; done without knowledge अजाणतेपणीं -अज्ञानांत केलेला.—*n.* अज्ञान मनुष्य *n*.—IGNORANCE अज्ञान *n*, अविद्या *f*. —IGNORE *v.* -च्या विषयीं अज्ञान असणें, न जाणणें; *Law,* throw out as false or ungrounded खोटा किंवा अप्रमाण ह्मणून टाकणें -अव्हेरणें -अमान्य क. (a bill); leave out of account हिशेबांत न धरणें -न लेखणें, वगळणें; shut the eyes to -कडे डोळेझांक क.

ILIAC *a.* (*ilia,* groin) खालच्या अंतडीचा.

ILL *a.* (contr. from *evil*) वाईट, अनिष्टकारक; iniquitous दुष्ट, वाईट; sick रोगी, आजारी; rude असभ्य, रानटी (manners); cross तुसडा, दाष्ट (temper).—*n.* नाश; संकट *n*, अरिष्ट *n*; दुर्दैव *n*; दुःख *n*, रोग; पाप *n*, दुष्टता *f*.—*ad.* वाईट, खराब; not easily जुलमानें, जुलमावर, जड: he is i. able to sustain the burden; to be i. at ease दिलगीर -दुःखी असणें. -NESS अजारीपणा; रोग, दुखणें *n*; दुष्टपणा. -NATURED *a.* दुःशील, कर्कश, दाष्ट. -STARRED *a.* भद्रया, जन्मकरंटा. -WILL दुष्टभाव.

ILLEGAL *a.* कायद्याविरुद्ध, गैर कायद्याचा, अशास्त्र. -ITY अशास्त्रता *f*, विधिविरोध, गैर कायदेशीरपणा. -LY *ad.* अन्यायानें, गैर इनसाफानें -कायद्यानें.

ILLEGIBLE *a.* वाचायास अवघड -कठीण, गिचमीड, दुर्वाच्य.

ILLEGITIMATE *a.* कायद्या विरुद्ध, अशास्त्र; unlawfully begotten जारजन्माचा, अनौरस (child); illogical अयुक्तिक, न्यायविरुद्ध (inference); not authorizedly good usage संप्रदायविरुद्ध, असांप्रदायीक. —ILLEGITIMACY अनौरसपणा *f*; खोटेपणा.

ILLIBERAL *a.* कृपण, अनुदार; rude अशिक्षित, असभ्य; mean नीच, हलका, क्षुल्लक; narrow अप्रशस्त -नीच मनाचा [to].

ILLICIT *a.* (*in,* not, *licere,* to be allowed) निषिद्ध, मनाईचा; unlawful गैराशिस्त; i. cohabitation अगम्यागमन *n*.

ILLIMITABLE *a.* ज्याची मर्यादा करितां येत नाहीं तो, अमर्याद, अपार.

ILLITERATE *a.* अनक्षर, निरक्षर, अक्षरशत्रु, अविद्वान.— ILLITERACY अविद्या *f*, अज्ञान *n*; an instance of ignorance चूक *f*, अज्ञानाचें उदाहरण *n*.

ILLOGICAL *a.* युक्तिविरुद्ध, अयुक्तिक; ignorant of the rules of logic न्यायशास्त्राच्या नेमाविषयीं अज्ञान.

ILLUDE *v.* (*-ludere,* to play) भुलवणें, फसवणें. —ILLUSION भूल *f*, माया *f*, भ्रम, मोह; philosophical i. माया *f*, अविद्या *f*.— ILLUSIVE, ILLUSORY *a.* मायेचा, मायीक; deceitful कपटी, खोटा.

ILLUMINATE *v.* (*-luminare,* to enlighten) प्रकाश पाडणें, प्रकाशित क.; light up or adorn as a building आराश -रोशनाई क.; adorn, as a book or page, with colored decorations or illustrations पत्ररंजन क.; enlighten प्रकाश पाडणें, प्रबोधित क., ज्ञानचक्षु उघडणें. — ILLUMINATION प्रकाशणें *n,* प्रकाशन *n*; रोशनाई *f,* दीपोत्साह; पत्ररंजन *n.* —ILLUMINATIVE *a.* प्रकाश पाडणारा, प्रकाशक, दीपक.—ILLUMINATOR प्रकाशक, दीपक; पुस्तकें किंवा पत्रें यांवर अलंकार काढणारा; प्रकाश एके ठिकाणीं करणारा आरसा, कांच इ०. —ILLUMINE *v.* प्रकाशित क.

ILLUSION, See under ILLUDE.

ILLUSTRATE *v.* (*-lustrum,* a purificatory sacrifice) make luminous प्रकाशित क.; make plain स्पष्ट-उघड क., फोड क.; explain दाखला वगैरे देऊन अर्थ सांगणें; adorn अलंकृत -मंडित क.—ILLUSTRATED *a.* प्रकाशित; चित्रादिकांनीं विवरण केलेला, चित्रयुक्त. — ILLUSTRATION प्रकाशणें *n,* प्रकाशन *n*; दाखला, दृष्टांत; चित्र *n.*—ILLUSTRATIVE *a.* प्रकाशक; दृष्टांतानें स्पष्ट करणारा, दार्ष्टांतिक.—ILLUSTRIOUS *a.* प्रकाशमान, तेजवान; characterized by greatness, nobleness, &c. प्रसिद्ध, यशस्कर, कीर्त्तिकर, प्रतापशाली; brilliant गौरव -वैभवयुक्त, उत्कृष्ट, नामी (deeds).

IMAGE (*imago*) a visible representation प्रतिमा *f,* पुतळा, पुतळी *f,* रूप *n*; an idol देवताप्रतिमा *f,* मूर्त्ति *f*; semblance सादृश्य *n,* सारखेपणा; a representation of any thing to the mind भास, आभास, मनःकल्पना *f*; *Rhet.* illustration दाखला, दृष्टांत; graven i. कोरीव मूर्त्ति *f*; molten i. ओतीव मूर्त्ति *f.*—IMAGERY मूर्त्ति *f pl,* पुतळ्या *f pl*; unreal show सोंग *n,* पोकळ डौल; false ideas वृथाकल्पना *f pl*; rhetorical decoration अलंकार, लाक्षणिक भाषण *n.*—IMAGINE *v.* form in the mind a notion of मनांत आणणें, -ची कल्पना क.; scheme बेत क., युक्ति योजणें; think विचार क., चिंतणें.—IMAGINABLE *a.* कल्पना करायास योग्य, चिंतनीय, कल्पनीय.—IMAGINARY *a.* मनःकल्पित, काल्पनिक.—IMAGINATION, the image-making power कल्पनाशक्ति *f,* कल्पना *f*; contrivance युक्ति *f,* कल्पना *f,* जुगूत *f*; conception कल्पना *f.*—IMAGINATIVE *a.* कल्पक, कल्पनाचतुर (mind); कल्पनेचा, काल्पनिक, कल्पनेपासून निघालेला, कल्पनेनें केलेला (art).

IMBECILE *a.* (*-bacillum,* a small staff, because he who is weak or infirm of foot leans upon a staff) दुर्बळ, अशक्त, नबळा, फुसका;—in mind न्यूनबुद्धि, मतिहीन.—*n.* IMBECILITY नबळेपणा, क्लैब्य *n*; न्यूनबुद्धित्व *n.*

IMBIBE *v.* (*-bibere,* to drink) पिणें, शोषणें; admit into the mind and retain गृहण -धारण क. (errors, principles.)

IMBITTER *v.* कडू क.; exasperate खिजवणें, चेतवणें.

IMBRUE *v. O. E.* भिजवणें, भिजूं घालणें.

IMBUE (*-bibere, Skr. pí, pâ*) tinge deeply छटादेणें, लकेरी आणणें; cause to become impressed ठसा उठविणें, युक्तिविशिष्ट -गुणमय क.

IMITATE *v.* (*imitari*) copy नकल उतरणें -क.; counterfeit बनावट क.; produce as the copy of some thing else हुबेहूब क., वळण घेणें.—IMITATION नकल उतरणें *n,* अनुकरण *n*; नकल *f,* उतारा; resemblance सादृश्य *n.*—IMITATIVE *a.* अनुकरण करणारा, नकल उतरणारा, अनुगामी; formed after a model नमुन्याप्रमाणें केलेला, नकली.

IMMACULATE *a.* (*-macula,* spot) निष्कलंक, निर्दोष, शुद्ध; limpid नितळ, निवळ, स्वच्छ (fountain); [I. Conception, *Theol.* the doctrine, as held in the R. C. Church, that the Virgin Mary was born without sin].

IMMATERIAL *a.* incorporeal अमूर्त्त; spiritual आत्मरूपी, आत्मिक; unimportant हलका, अप्रधान, लघु. -ISM, the doctrine that immaterial substances or spiritual beings exist आत्मवाद.

IMMATURE *a.* not ripe अपक्व, हिरवा, कच्चा; premature काळाचे पूर्वीचा, अकालिक; hasty उतावळा;—of understanding अप्रौढ, बाल.

IMMEASURABLE *a.* मोजतां येत नाहीं असा, अप्रमेय.

IMMEDIATE *a.* (*-medius,* middle) proximate जवळचा, निकट; instant तेव्हांचा, तात्कालिक; acting directly साक्षात्, जातीनिशीं. -LY *ad.* प्रत्यक्ष, साक्षात्; लागलाच, तत्क्षणीं, तसाच.

IMMEMORIAL *a.* beyond memory आठवणीपलीकडचा, अस्मार्त्तकालीन, फार प्राचीन.

IMMENSE *a.*(*-metiri,* to measure) अमर्याद, निस्सीम; very great अवाढव्य, ऐवट, भारी -LY *ad.* बहुत, पुष्कळ.—IMMENSITY निस्सिमता *f,* अमर्यादपणा; infinite space महाकाश.—IMMENSURABLE *a.* अप्रमेय, ज्याचें माप करितां येत नाहीं असा.

IMMERGE, IMMERSE *v.* (*-mergere,* to dip) बुडविणें, मज्जन क.; engage deeply गरक -निमग्न -गुंग क. [in].—IMMERSION बुडवणें *n,* निमज्जन *n*; गुंगी *f,* तल्लीनता *f*;—of a celestial body अस्त [in].

IMMIGRATE *v. i.* स्वदेश सोडून परदेशीं राहायास जाणें, देशांतर क.

IMMINENT *a.* (*-minere,* to jut) impending अगदीं नेटलेला, खेटलेला, जवळ येऊन ठेपलेला; perilous भयाचा, जोखमाचा: the i. deadly breach.

IMMOBILITY (*-mobilis,* movable) अचलता *f,* स्थिरता *f.*

IMMODERATE *a.* अति, अमर्याद, अपरिमित [in].

IMMODEST *a.* अमर्याद, अतिशयित; wanting in the reserve or restraint which decorum and decency require निर्लज्ज, निलाजरा; unchaste अशुद्ध, बिभत्स.

IMMOLATE *v.* (*immolare*) to sprinkle a victim with sacrificial meal बलिदान क. [to].—IMMOLATION बलिदान *n*; बलि.

IMMORAL *a.* अनितीचा, दुराचरणाचा (deed); दुराचरणी, अनीतिमान, दुष्ट (man). -ITY अनीति *f,* दुराचार, दुष्टपणा; दुष्कर्म *n,* अधर्म.

IMMORTAL *a.* अमर, अमर्त्य; imperishable अविनाशी, नित्य, शाश्वत; never to cease अखंड, अक्षय (hopes). -ITY अमरपणा, अमरत्व *n*; शाश्वती *f.* -IZE *v.* अमर-मरणातीत क.; शाश्वत क. [by, for].

IMMOVABLE *a.* अचल, निश्चल, स्थिर; steadfast धिराचा, निश्चयाचा, खंबीर; unchangeable अविकारी, अव्यय; hard-hearted क्रूर, कठीण मनाचा; *Law* स्थावर (estate).—*n.* अचलवस्तु *f*; *Law,* स्थावरमाल.

IMMUNITY (*-munus,* service) freedom from an obligation सूट *f,* माफी *f*; freedom मोकळेपणा, मुक्ति *f,* राहित्य *n,* अभाव; i. from danger अभय *n*;—from exertion अनायास.

IMMURE *v.* (*-murus,* wall) भिंतीच्या आंत कोंडणें; कोंडणें, कोंडून ठेवणें; तुरंगांत घालणें -टाकणें [in].

IMMUTABLE *a.* ज्याचा पालट होत नाहीं तो, अविकार, निर्विकल्प.—IMMUTABILITY निर्विकारीपणा, अविकारिता *f.*—IMMUTABLY *ad.* न ढळेसा, न फिरेसा, अमोघ.

IMP* तरुणभूत *n.*

IMPAIR *v. F.* make worse अधिक वाईट -खराब क.; weaken नबला -नुकसान क.; deteriorate बिघडणें, खराब क. [by, with].

IMPALE, See EMPALE.

IMPALPABLE *a.* incapable of being perceived by touch अस्पर्श्य; not readily apprehended by the mind दुर्बोध्य, गहन.

IMPANEL *v. F.* जुरीच्या असाम्यांचीं नांवें पटावर मांडणें.

IMPART *v.* -चा भाग देणें; give देणें; grant दान देणें; communicate कळविणें, विदित क. [to].

IMPARTIAL *a.* निष्पक्षपाती, रास्त, समदर्शी -दृष्टि (man); रास्त, निष्पक्षपाताचा, निस्पृह (opinion). -ITY निःपक्षपात, न्याय, समता *f*, समदृष्टि *f* [in, to].

IMPASSABLE *a.* ज्यावरून जाण्यास कठीण तो, दुर्गम, दुस्तर, अगम्य (road, mountain, gulf) [by, for].

IMPASSIBLE *a.* दुःखावेगळा, दुःखातीत; without sensation अचेतन [to].—IMPASSIONED *p. a.* रागान्वित, सानुराग, अनुरागी.

IMPASSIONATE *a.* आवेश भरलेला, सद्गदित, अनुरागी; without passion विरक्त, विरागी.

IMPATIENT *a.* असोशिक, अधैर्य, अक्षम; hasty उतावळा, हुडहुड्या; उतावळीचा (reply) [at, for, of, under].—IMPATIENCE असोशिकपणा, असहिष्णुता *f*; उतावळी *f*, हुटहूट *f* [of, in, with].

IMPEACH *v. F.* दोष लावणें; सरकारी कामदारावर दोषारोप क. [of, or]. -MENT दोष, दूषण *n*; सरकारी कामदारावर दोष ठेवून त्याची चौकशी करणें *n*.

IMPECCABLE *a.* (*-peccare*, to sin) ज्यापासून पाप होण्याजोगें नाहीं तो, पापसंभवातीत.

IMPEDE *v.* (*-pes, pedis*, foot) विघ्न -अडथळा क., मोडा घालणें [by, with].—IMPEDIMENT अडथळा, विघ्न, मोडा;—in speech बोलण्यांत अडखळणें *n*, वाक्स्खलन *n*.

IMPEL *v.* (*-pellere*, to drive) पुढें लोटणें, दामटणें, दपटणें, पुढें चालवणें [by].

IMPEND *v.* (*-pendere*, to hang) डोईवर (येऊन) टेकणें, पडायाच्या लागास असणें -येणें; जवळ येऊन ठेपणें -खेटणें [over]. -ING डोईवर टेकलेला, पतनोन्मुख; येऊन टेकलेला, समुपस्थित, निकटवर्ती.

IMPENETRABLE *a.* ज्याचा भेद होत नाहीं तो, अभेद्य, निर्भेद्य; unimpressible कठीण, निष्ठुर (mind) [to, by].—IMPENETRABILITY अभेद्यता *f*.

IMPENITENT *a.* पश्चात्तापशून्य, अपश्चात्तापी; कठीण -वट्ट मनाचा.

IMPERATIVE *a.* (*imperare*, to command) हुकमाचा, अधिकाराचा, आज्ञापक; obligatory आवश्यक, कर्त्तव्य; i. mood आज्ञार्थ, आज्ञारूप *n*.

IMPERCEPTIBLE *a.* समजण्यांत न येण्याजोगा, बेमालूम, अगोचर (operation); minute बारीक, सूक्ष्म [to].

IMPERFECT *a.* not complete in all its parts अपूर्ण, अपुरा; defective in quantity or quality कमी, उणा, न्यून; wanting in some elementary organ अधू, व्यंग; morally defective सदोष, न्यून; subject to defects दोषाधीन; i. tense अपूर्ण काल.—IMPERFECTION अपूर्णता *f*, उणेपणा, कच्चेपण *n*; कसर *f*, व्यंग *n*; उणें *n*, दोष, ऐब.

IMPERIAL *a.* (*imperare*, to command) राज्याचा, राज्यसंबंधी; राजकीय, बादशाही (government); supreme मुख्य, श्रेष्ठ; of superior size or excellence मोठ्या सांच्याचा किंवा उंच जातीचा, नामी, उंचा (paper, tea) -IST बादशाहाचा; बादशाहाची रयत *f*, किंवा -चा शिपाई.—IMPERIOUS *a.* कदरखोर, जालीम, कडक (temper); arrogant मगरूर गर्विष्ठ.

IMPERISHABLE *a.* अक्षय, अविनाशी, चिरकाल, राहणारा.

IMPERMEABLE *a.* निबिड, निर्भेद्य, अप्रवेश्य [to].

IMPERSONAL *a.* अव्यक्तिवाचक, अपौरुष; i. verb अकर्त्तृक.

IMPERTINENT *a.* irrelevant अप्रासंगिक, अप्रस्तुत; rude बेअदबी, दांडगा, उद्धट. -LY *ad.* प्रसंग -अन्वय सोडून; दांडगेपणानें, उद्धटपणानें.—IMPERTINENCE अप्रासंगिकपणा, अप्रस्तुतता *f*; बेअदबीपणा, उद्धटपणा, अविनय.

IMPERTURBABLE *a.* अक्षोभ्य, नित्यशांत.—IMPERTURBATION नित्यशांति *f*, अक्षोभ्यता *f*.

IMPERVIOUS *a.* अभेद्य, अवेध्य, दाट, घन [to].

IMPETUOUS *a.* (*-petere,* to fall upon) forcible जोराचा, वेगाचा; passionate कडक, तापट, तलख (temper); hasty उतावळा, हूड.—IMPETUOSITY झपाटा, तडाखा; तलखी *f*, तेजी *f*, जहाली *f*.—IMPETUS (*L.*) गतीचा वेग, जोर.

IMPIOUS *a.* (*im,* not, and *pious*) अधार्मिक अभक्तिमान; अभक्तीचा, देवनिंदात्मक (language, writings).—IMPIETY देवनिंदा *f*, अभक्ति *f*; दुष्टपणा; an impious act अधर्म, दुष्कर्म *n*; want of reverence, filial affection, or obedience to parents मातापितरांची अवज्ञा *f* -अभक्ति *f* -चा अपमान इ०, मातापितरनिंदा *f*.

IMPLACABLE *a.* शांत न होणारा, दुःशाम्य; constant in enmity दीर्घद्वेषी.—IMPLACABILITY अशाम्यता *f*; दीर्घद्वेष, दीर्घक्रोध, उभादावा.

IMPLANT *v.* लावणें, रोवणें [in].

IMPLEMENT (*-plere,* to fill) हत्यार *n*, उपकरण *n*, साहित्य *n*;—of husbandry आऊत *n*.

IMPLICATE *v.* (*-plicare,* to fold) गोवणें, गुंतविणें; prove to be connected or concerned संबंध दाखविणें, (कामांत वगैरे) -चें अंग -हात आहे असें दाखविणें.—IMPLICATION पेंच, गुंताडा, गुतागुत *f*; inference भाव, फलितार्थ.—IMPLICIT *a.* implied फलितार्थानें दाखविलेला, गर्भित; trusting to the word or authority of another पुरा, अनन्यभावाचा, पूर्ण (credit).—IMPLY *v.* फलितार्थानें दाखविणें; to be *implied* फलित -गर्भित असणें, अर्थ निघणें.

IMPLORE *v.* (*-plorare,* to cry aloud) पायांपडून -काकळूत करून मागणें, विनंती क., मिन्नत -याचना क.

IMPOLICY अयुक्ति *f*, अविचार, अनीति *f*.—IMPOLITIC *a.* अविवेकी, असमंजस, अयुक्तिक; i. ruler लोकांचें अनिष्ट करणारा -प्रजार्थविरोधी राजा.

IMPOLITE *a.* असभ्य, दांडगा, बेअदबी.

IMPORT *v.* (*-portare,* to bear) बाहेरून -परदेशाहून आंत आणणें; signify दर्शविणें, दाखविणें, अर्थ सुचविणें; be of consequence महत्व -वजन असणें; *imported* goods बंदरी माल (into, from).—*n.* बाहेरून आणलेला माल, आगत *n*, भरती *f*, अमदानी *f*; अर्थ अभिप्राय; महत्व *n*, योग्यता *f*. -ANT *a.* भारी, वजनदार, मोठा, अगत्याचा [to]. -ANCE महत्व *n*, वजन *n*, कदर *f*, भार [to]. -ATION आंत आणणें *n*; आंत आणलेला माल, आवक *n*, आगत *n*; conveyance नेणें *n*.

IMPORTUNE *v.* (*-portare,* to bear) मिन्नताकरून -आग्रहानें मागणें; esp. of children and beggars गळींपडणें, खणपट घेणें, पिच्छा -दुमची पुरवणें [for]. —IMPORTUNATE *a.* आग्रही, आग्रहाचा; लोंचट, चेंगट.—IMPORTUNITY आग्रह, मिन्नत *f*; लोंचटपणा, चेंगटपणा, आग्रह.

IMPOSE *v.* (*-ponere,* to place) ठेवणें, मांडणें; lay on लादणें, घालणें; lay, as a charge, burden, tax, duty, obligation सोपणें, हवालणें, बसवणें, माथां मारणें;—as a command आज्ञापिणें, हुकूम देणें; palm दगलबाजीनें चालवणें -गळीं बांधणें, टोपी घालणें; upon फसविणें; *Print.* place, as matter in type, on the stone, in order to arrange it for printing शिळेवर टाकणें, 'इंपोज' क.; *Eccl.* lay on, as the hands in an act of religion,

as confirmation or ordination दीक्षा वगैरे देतांना मस्तकावर हात ठेवणें [on, upon].—IMPOSITION घालणें *n*, बसवणें *n*, स्थापन *n*, सोपणें *n*, स्थापना *f*; कर, शिक्षा, दंड वगैरे जें द्यायाला, करायाला सांगितलें तें *n*; कर; शिक्षा *f*; दंड; ठकवणें *n*, ठकबाजी *f*; मस्तकीं हात ठेवणें *n*.—IMPOST दस्त, कर. —IMPOSTOR ठक, भोंदू, तोतया.—IMPOSTURE फटवण *f*, ठकवण *n*, दंभ.

IMPOSSIBLE *a*. अशक्य, असंभाव्य; impracticable असाध्य, दुर्घट, अघटित. —IMPOSSIBILITY अशक्यता *f*, असाध्यता *f*; an impossible thing अशक्य गोष्ट *f*.

IMPOTENT *a*. दुर्बळ, निर्बळ, नबळा; wanting the power of propagation, as males, बुळा, नामर्द, रांड *f*, पाउणेआठ; —wanting the power of self-restraint इंद्रियवश, अजितेंद्रिय.—IMPOTENCE, -CY निर्बलता *f*, कमजोरी *f*; बुळेपणा, नामर्दी *f*, क्लैब्य *n*.

IMPOVERISH *v*. दरिद्री क., भिकेस लावणें; make sterile सत्व हरण क., कृश -भुकड क. (land).

IMPRACTICABLE *a*. अशक्य, असांध्य, दुष्कर, न होण्याजोगा (undertaking); intractable अनिवार, शिरजोर, बेहुकमी; not to be persuaded by any reasonable method हेकट, हेकेखोर; incapable of being passed अगम्य, दुर्गम (road).— IMPRACTICABILITY असाध्यता *f*, अशक्यता *f*.

IMPRECATE *v*. (*-precari*, to pray) शाप देणें, अनिष्ट चिंतणें [on].—IMPRECATION शाप, अभिशाप.

IMPREGNATE *v*. गर्भार क.;—as used of female animals फळवणें, गाभ क.; fertilize फलभरीत क., सुपीक क.; infuse particles of another substance into एका वस्तूचे अंश दुसऱ्या वस्तूंत घालणें [with].—*a*. गर्भार, गर्व्हार; व्याप्त, युक्त.—IMPREGNATION गर्भाधान *n*, गर्भस्थापन *n*.

IMPREGNABLE *a*. न घेण्याजोगा, दुर्धर, बेलाग, बिकट (fortress); invincible अजेय, अजिंक्य.

IMPRESS *v*. छापणें, उमटवणें, मुद्रित क.: this heart, like an agate, with your feet *impressed*; stamp छाप उठवणें, ठसा उठवणें, वठवणें; fix deeply ठसवणें, बिंबवणें; take by force for public service सरकारी कामा करितां जबरीनें घेणें, वेठीस धरणें: to i. sailors [in, upon].—*n*. ठसा, छाप; seal मुद्रा *f*, शिक्का; वेठ *f*; भास, आभास. -ION ठसा उठविणें *n*; ठसा, छाप; image on the mind संस्कार, मनसंस्कार; influence on the purposes, feelings, or actions छाप *f*, थाप *f*; sensible result of an attack made, a power caused to operate संस्कार, स्पर्श: i. of weather; an indistinct notion वचक *f*; indistinct remembrance चुटपुटी आठवण *f*; an edition (पुस्तक वगैरेची) आवृत्ति *f*. -IVE *a*. मनांत ठसणारा, हृदयभेदक; susceptible ग्राहक, ग्रहणशक्त.

IMPRINT *v*. छाप -ठसा उठवणें; कागदावर छापणें; मनांत ठसवणें -बिंबवणें [on].

IMPRISON *v*. बंदांत टाकणें -घालणें; restrain अटकाव क., कोंडणें, अडथळा क. [in]. -MENT, कैदेंत ठेवणें *n*; कैद *f*, बंदी *f*, अटक *f*.

IMPROBABLE *a*. व्हायाजोगा -सारखा नाहीं तो, असंभव, अघटित.—IMPROBABILITY असंभव, असंभावना *f*.

IMPROMPTU *ad*. or *a*. (*in promptu*, in readiness) पूर्वविचारावांचून, पूर्वविचाररहित.—*n*. extemporaneous composition शीघ्रकविता *f*.

IMPROPER *a*. अयोग्य, अनुचित; i. to be done अकर्त्तव्य, अनुचित;—as language, words, conduct अमर्याद, उद्धट, दांडगा, वावगा; unfit नालायक, अनुपयुक्त.—IMPROPRIETY अयोग्यता *f*, नालायकी *f*; अमर्यादा *f*, दांडगेपणा इ०;—of conduct गैरशिस्तपणा, अकार्यता *f*.

IMPROVE *v.* (*-probare,* to esteem as good) make better सुधारणें; use to good purpose चांगल्या कामीं लावणें, सार्थक -सद्व्यय क.: honor God by *improving* diligently the talents which He hath committed to you [upon, by].—*i.* पहिल्यापेक्षां बरा -नीट होणें, रंगारूपास येणें, सुधरणें; grow worse अधिक वाईट होणें: I fear we have not a little *improved* the wretched inheritance of our ancestors; rise वाढणें, चढणें, तेजी असणें: the price of cotton *improves.* -MENT सुधारणें *n*; सुधारणा *f*, सुधारणूक *f*, गुणवृद्धि *f*, चढती कळा *f*; that which improves any thing सुधारणारी गोष्ट *f*, सुधारक; [valuable additions, as buildings, clearings, fences, &c.]

IMPROVIDENT *a.* पुढला विचार न पाहणारा, अदूरदृष्टि, अल्पविचारी.—IMPROVIDENCE अदूरदृष्टि *f* -विचार, अपरिणामदृष्टि.

IMPROVISE *v.* (*-provisus,* foreseen) पूर्वी विचार केल्यावांचून बोलणें; शीघ्रकविता क.; एकाएकीं घडवून आणणें.

IMPRUDENT *a.* अविचारी, अविवेकी;—of acts अविचाराचा.—IMPRUDENCE अविवेक, अविचार, वेडेपणा.

IMPUDENT *a.* (*-pudens,* ashamed) निलाजरा, उद्धट, धट्ट.—IMPUDENCE धटाई *f*, औधत्य *n*, नाक *n*, तोंड *n*.

IMPUGN *v.* (*-pugnare,* to fight) विरुद्ध कथन, क., शब्दाचा मार देणें, दोष ठेवणें [bv, for].

IMPULSE (See IMPEL) धक्का, आघात; sudden motion exciting to action उकळी *f*, चेव *f*, कढ; motion produced by the sudden action of a force गति *f*, वेग.—IMPULSIVE *a.* चाळवणारा, प्रेरक; actuated by impulse मनसोक्त वर्त्तणारा, लहरी, छंदी.

IMPUNITY (*-punire,* to punish) दंडाभाव, शिक्षे पासून मुक्तता *f*; freedom from injury अनपकार; security निर्भयता *f*, निर्भयपणा [from, for].

IMPURE *a.* अशुद्ध, भेळीचा, मिसळीचा; foul मळीण, मळका; unholy अपवित्र, अशुद्ध; unhallowed अशौच्य, विटाळलेला (things); unchaste बिभत्स, अभद्र.

IMPURITY मळीणपणा; अशुद्धपणा; अशुचि *f*, विटाळ; foul matter मळ; i. caused by the death of a relative सूतक *n*, मृताशौच *n*; i. contracted from carrying, or from some connection with, a corpse प्रेताशौच *n*; i. caused by the birth of a child सुयेर *n*, सुवेर *n*, जाताशौच *n*.

IMPUTE *v.* (*-putare,* to reckon) attribute आरोपणें, अभियोग क.; charge upon दोष लावणें; *Theol.* set to the account of another as the ground of judicial procedure दुसऱ्याच्या नांवें मोजणें -लेखणें -मांडणें [to]. [Rom. iv. 22].—IMPUTABLE *a.* आरोप्य, आरोपणीय. —IMPUTATION आरोपण *n*, आरोप; दोष, शब्द, ठपका; दुसऱ्याच्या नांवें मोजणें *n*, आंगीं लावणें *n*.

IN *prep.** within आंत, मध्यें; *in* the house घरांत; *in* the hour त्या घटकेंत; *in* the night रात्रीं; *in* that day त्या दिवसीं; *in* his name त्याच्या नांवें -नांवानें; *in* that कारण कीं; *in* as much असें असतां; come *in* आंत-घरांत ये; the vessel has come *in* गलबत बंदरांत आलें आहे; to be or keep *in* with जवळ -बराबर असणें; मैत्री राखणें; मर्जीत असणें; *in* the first place पहिल्यानें, प्रथम; *in* one place एकत्र; *in* every way सर्वथा; *in* another way अन्यथा; *in* many ways बहुधा; *in* vain व्यर्थ; *in* joke थट्टेनें; *in* as much as ज्या अर्थी.

INABILITY असामर्थ्य *n*, अक्षमता *f*.

INACCESSIBLE *a.* पावायाजोगा नाहीं तो, अवघड, दुर्गम; unobtainable दुर्लभ, अलभ्य [to].

INACCURATE *a.* चुकीचा, अशुद्ध, तफावतीचा.—INACCURACY चूक *f*, तफावत *f* [in].

INACTION उद्योगाचा अभाव, अनुद्योग, निर्व्यापार; idleness आळस, आळसीपणा; rest विसांवा. —INACTIVE *a.* व्यापाररहित, निचेष्ट; सुस्त, ढिला, आळसी.

INADEQUATE *a.* अयोग्य, अनुपयुक्त, अक्षम; defective उणा, न्यून, अपुरता [to]. — INADEQUACY अपुरतेपणा, अपर्याप्ति *f*, न्यूनता *f*, व्यंग *n*.

INADMISSIBLE *a.* न घेण्याजोगा, न कबूल करण्याजोगा, अग्राह्य, अमान्य;—into caste अपांक्त.

INADVERTENT *a.* गैरसावध, गाफील.—INADVERTENCE गफलत *f*, दुर्लक्ष्य *n*, प्रमाद.

INALIENABLE *a.* वंशानें मात्र उपभोग करावा असा, वंशोपभोग्य [from].

INAMORATA *It.* प्रियतमा *f*.—INAMORATO प्रिय, कांत.

INANE *a.* (*inanis*) रिता, रिकामा, शून्य.—INANITION शून्यता *f*, रिकामेपणा; exhaustion from want of food निराहारानें -उपासानें आलेली ग्लानि *f*, लुंघेपणा; want of fulness, as in the vessels of the body निराहार, लंघन *n*.

INANIMATE *a.* निर्जीव, अचेतन, जड; i. and animate चराचर, जडाजड.

INAPPLICABLE *a.* लावायास अयोग्य, अनुपयुक्त, अप्रयोज्य [to].

INARTICULATE *a.* अस्पष्ट, अव्यक्त, गुळमुळीत.

INARTIFICIAL *a.* अकृत्रिम, स्वाभाविक; simple भोळा, साधा.

INATTENTION अलक्ष्य *n*, अनवधान *n*; neglect दुर्लक्ष्य *n*, अबाळ *f*, अवनिगा *f*.—INATTENTIVE *a.* गाफल, बेफाम, असावध; निष्काळजी, निश्चिंत [to].

INAUDIBLE *a.* जें ऐकूं येत नाहीं तें, श्रवणाशक्य [to, by].

INAUGURATE *v.* invest with an office in a formal manner अधिकारावर स्थापणें, समारंभानें वस्त्रें वगैरे देऊन अधिकारावर स्थापणें; cause to begin आरंभ क., सुरवात क.—INAUGURATION स्थापना *f*, अभिषेक, संस्कार.—INAUGURAL *a.* अभिषेक -स्थापने संबंधी.

INAUSPICIOUS *a.* अमंगळ, अशुद्ध, अभद्र.

INBEING अंतःस्थिति *f*, अंतर्भाव.

INBORN *a.* अंतर्जात, नैसर्गिक.

INCALCULABLE *a.* असंख्यात, अगणनीय, अगण्य.

INCANTATION, See ENCHANTMENT.

INCAPABLE *a.* wanting spatial capacity माऊन न घेण्याजोगा, संकोचित, लहान; wanting physical strength असमर्थ, निर्बल, अशक्त; mentally insufficient अक्षम, नालायक, न्यूनबुद्धि; morally weak with respect to a purpose अधीर, अनिश्चयाचा, चंचळ; not capable of being brought to do, from being morally strong; — used with reference to things that are evil वाईट कर्म -गोष्ट न करण्याजोगा -करण्यास अशक्त, सुस्थिर [of].—INCAPACITATE *v.* नालायक -असमर्थ क. [for].—INCAPACITY नालायकी *f*, अक्षमता *f*; बुद्धिहीनता *f* [for].

INCARCERATE *v.* (*-carcer*, prison) बंदींत घालणें.

INCARNATE *v.* (*-caro*, flesh) सदेह क., देहांत घालणें, अवतरणें. — *i.* माठळणें, मठारणें (a wound).—*a.* देहधारी, अवतारी.—INCARNATION, the act of taking a human body and the nature of man अवतार, मनुष्याचा अवतार: the i. of the Son of God; माठळणें *n*, मठारणें *n*; personification रूप *n*, मूर्त्ति *f*, अवतार: i. of justice साक्षात्धर्म.

INCASE *v.* वेष्टन -डबा गवसणी इ० घालणें [with, in].

INCENDIARY (*-candere*, to glow) any person who sets fire to a building आगलाव्या, घर जाळणारा; one who maliciously sets fire to another's dwelling-house or other building आगलाव्या, ग्रहदाहक; a person

who excites factions, and promotes quarrels कळलाव्या, आगलाव्या, कळीचा नारद.—INCENSE, perfume exhaled by fire धुपाचा धूर; odors of spices and gums burned in religious rites धुपाचा वास, धूपगंध; mixture of fragrant gums, spices, and the like, used for the purpose of producing a perfume when burned धूप, धूपद्रव्य *n*.—*v*. धुपानें सुगंधित क॰; धूप दाखविणें.—*v*. चेतविणें, कोपविणें, संतापविणें [by]. —INCENTIVE *a*. उत्तेजक, प्रवर्त्तक.—*n*. उत्तेजन, प्रोत्साह.

INCEPTIVE *a*. (*-capere*, to take) आरंभाचा, उपक्रमाचा.—INCEPTION *n*. आरंभ, उपक्रम.

INCESSANT *a*. (*-cessare*, to cease) एकसारखा, सतत. -LY *ad*. न थांबतां, निरंतर, एकटक.

INCEST (*-castus*, chaste) the crime of cohabitation between persons related within the degrees wherein marriage is prohibited अगम्यागमन *n*;—as committed by a male अगम्यगमन *n*;—as by a female गोत्रगमन *n*; i. with one's mother मातृगमन *n*;—with one's *guru's* wife गुरुतल्प *n*. -UOUS *a*. अगम्यगामी, गोत्रगमनी (person); involving the crime of incest अगम्यगमनाचा (connection); an i. son मात्रागमनी, मातृगामी.

INCH * अंगूळ *n*, तसू, "इंच"; to die by *inches* तिळतिळ मरणें.

INCIDENCE (*-cadere*, to fall) पडणें *n*, पतन *n*; घडून आलेली गोष्ट *f*; दैवघटित गोष्ट *f*; *Physics*, direction in which a body, or a ray of light or heat, falls on any surface पदार्थाचा पडण्याचा रोख; angle of i. पतनकोन.—INCIDENT *a*. पडणारा, पतनशील; घडणारा, उपस्थित; fortuitous आगंतुक; liable to happen घडण्याजोगा [to]. -AL *a*. आगंतुक, दैवघटित, आकस्मिक; occasional प्रसंगानें होणारा, नैमित्तिक.

INCIPIENT *a*. (*-capere*, to take) आरंभीचा, उपक्रमाचा.

INCISION (*-cædare*, to cut) कापणें *n*; a cut घाव, घाय, चीर *f*, छेद.—INCISOR चौकीचा दांत.—INCISORY *a*. कापायाचा, छेदक.

INCITE *v*. (*-citare*, to rouse) उठवणें, चेतवणें; in a bad sense शिकवणें, फूस देणें, चढवणें [to]. -MENT उत्तेजन *n*, उठावणी, उचल *f*; motive प्रयोजन, हेतु [to].

INCIVILITY दुर्जनता *f*, असभ्यता *f*, दांडगेपणा; *pl* अपमान, अनादर.

INCLEMENT (See CLEMENCY) निर्दय, कठोर, कठीण; कडक, कठीण, वाऱ्यावादळाचा (weather, sky).—INCLEMENCY कठीणपणा, कठोरता *f*, कडाखा, रुक्षता *f*.

INCLINE *v*. *i*. (*-clinare*, to bend) lean झुकणें, कलणें; be disposed कल असणें, मन वळणें.—*t*. झुकवणें, वळवणें; मन वळवणें, वळवणें.—INCLINED कललेला, झुकलेला; मन वळवलेला, in comp. प्रवण, शील: दानशील i. to give; i. plane उतरण *f* [to].—INCLINATION तोल, झोक; मनाची ओढ *f*, ओढ *f*, कल; desire वासना *f*, इच्छा *f*;—of a planet परमापम; greatest i. of a planet विक्षेपध्रुव [to, towards, for].

INCLOSE *v*. See ENCLOSE.

INCLUDE (*-claudere*, to shut) आंत घेणें, समावेश क., मावून घेणें; belong to खालीं मोडणें: Great Britain *includes* England, Scotland, and Wales [in].—INCLUDED धरलेला पोटचा; to be i. मोडणें, ओढणें.—INCLUSIVE *a*. धरलेला, अंतर्गत. -LY *ad*. धरून, सुद्धां सकट.—INCLUSION, आंत घेणें *n*, समावेश, अंतर्गणना *f*.

INCOGNITO *a*. or *ad*. (*-cognitus*, known) गुप्तरूपानें, अज्ञात वेषानें.—*n*. गुप्तवेष.

INCOHERENT *a*. अलग, विसंगत, तुटक; inconsistent विसंगत, संदर्भविरुद्ध, बाष्कळ (speech,

conduct) [in]. -LY *ad.* कांहींचें बांहीं, अद्वातद्वा, वांकडेंतिकडें.—INCOHERENCE, -CY असंबंध, अनन्वय, विरोध;—of facts असंगति *f*, असंदर्भ.

INCOMBUSTIBLE *a.* न पेटणारा -जळणारा, अदाह्य. —INCOMBUSTIBILITY अदाह्यता *f*.

INCOME (*in* and *come*) that gain which proceeds from labor, business, or property of any kind जमा *f*, प्राप्ति *f*, मिळकत *f*, उत्पन्न *n*; i. and expense आयव्यय; that is without i. अनुत्पन्न; i. tax उत्पन्नावरील कर, 'इन्कम टाक्स.'

INCOMMENSURATE *a.* कमी परिमाणाचा, न्यूनपरिमाण; not adequate अपुरता, उणा, न पुरेसा. —INCOMMENSURABLE *a.* निरनिराळ्या परिमाणाचा, भिन्न परिमाणाचा.

INCOMMODE *v.* (*-commodus,* convenient) अडचणींत घालणें, इजा -त्रास देणें; visits of strangers at unseasonable hours i. a family; to be incommoded अडचणणें, अवघडणें [by, with].—INCOMMODIOUS *a.* अडचणीचा, गैर सोईचा, त्रासदायक.

INCOMMUNICABLE *a.* जें सांगतां येत नाहीं तें, अनिवेद्य; जें देतां येत नाहीं तें, अदेय: health and understanding are i.—INCOMMUNICATIVE *a.* तोंडाचा जड, मख्ख, अबोल्या, आंतल्या गांठीचा; दुसऱ्यांशीं व्यवहार न राखणारा: the Chinese are an i. nation.

INCOMPARABLE *a.* अप्रतिम, अतुल्य, सर्वोत्कृष्ट, अनुपम.

INCOMPATIBLE *a.* विजोड, वियुक्त, विपरीत; [with]; [*Med.* not suitable to be prescribed together, because of opposing medicinal qualities (medicines)].

INCOMPETENT *a.* incapable असमर्थ, अक्षम, अयोग्य, फुसका, हलका; wanting the legal or constitutional qualifications अनधिकारी, नालायक, कायद्यानें नालायक; not lying within one's competency, capacity, or authorized power अधिकारा बाहेरचा [for]. —INCOMPETENCY नालायकी *f*, अक्षमता *f*; नालायकी *f*, अनधिकार; अपूर्ति *f*, उणेपणा.

INCOMPLETE *a.* अपूर्ण, अपुरा, कच्चा; defective ऐबदार, हीन, तुटक.

INCOMPREHENSIBLE *a.* गूढ, गहन, दुर्बोध [by].

INCONCEIVABLE *a.* अतर्क्य, गूढ, अचिंत्य [by]. —INCONCEIVABLY *ad.* समजुती बाहेर, कल्पने बाहेर.

INCONCLUSIVE *a.* निर्णय न करणारा, अनिर्णायक.

INCONGRUITY अयुक्ति *f*, अयोग्यता *f*, विजोड -विलगपणा.—INCONGRUOUS *a.* विजोड, विलग.

INCONSIDERABLE *a.* जमेस न धरण्याजोगा; small हलका, थोडा.

INCONSIDERATE *a.* अविचारी, अविवेकी; rash अविचाराचा (conduct).

INCONSISTENT *a.* पूर्वापरविरुद्ध, अयुक्त, विलग, बाधित, असंबंध; fickle चंचल, अस्थिरबुद्धि; unequal असमान, असादृश. -LY *ad.* ताळ सोडून, धरबंध सोडून.—INCONSISTENCE [with, in]. -CY विजोडपणा, असंगति *f*, वैगुण्य *n*; पूर्वापारविरोध; असमानता *f*, विरुद्धता *f*.

INCONSTANT *a.* चंचल, अस्थिरबुद्धि, चलमति (a person); क्षणिक, बदलण्याजोगा, फेरफार होण्याजोगा, अस्थिर (a thing) [to].

INCONTESTABLE *a.* ज्या विषयीं वाद नाहीं तो, निर्विवाद.

INCONTINENT *a.* इंद्रियांचे स्वाधीन, इंद्रियवश, अजितेंद्रिय; lewd व्यभिचारी, इष्कबाज, बदख्याली. — INCONTINENCE इंद्रियाधीनता *f*, व्यभिचार, असंयम.

INCONTROVERTIBLE *a.* निर्विवाद.

INCONVENIENT *a.* अडचणीचा, गैरसोईचा.— INCONVENIENCE अडचण *f*, गैरसोई *f*; अडचणीची गोष्ट *f* -चें काम *n*, नड *f*.—*v.* अडचणींत घालणें -पाडणें [by].

INCONVERTIBLE *a.* ज्यावें रूपांतर करतां येत नाहीं तो, रूपांतराशक्य: one metal is i. into another.

INCORPORATE *v.* (*-corpus,* body) एकशरीर -एकगोळा -एकगट्ट क.: to i. drugs; embody देह देणें, साकार-मूर्त्तिमंत क.; unite मिळविणें, मिसळणें, संयोग क.: to i. copper with silver; combine into a structure or organization, whether material or mental एक क., जोडणें, एकजीव क., जडणें: to i. subjected provinces into the community of the conquerors; form into a legal body सनदी मंडळी क.—*i.* मिळणें, मिसळणें, संयोग होणें [into, with].

INCORRECT *a.* चुकीचा, अशुद्ध, सदोष; not in accordance with truth खोटा, असत्य (statement); not accordant with the rule of duty or morality गैरशिस्त, अशास्त्र, अनीतीचा. -LY *ad.* चूक करून, अशुद्ध, गैर.

INCORRIGIBLE *a.* कोडगा, शिक्षातीत, माणसांतून उठलेला; bad beyond correction अशोध्य, असाधनीय.

INCORRUPTIBLE *a.* अविनाशी, अविकारी, अनश्वर. —INCORRUPTION अविकार, अविकृति *f.*

INCREASE *v. i.* (*-crescere,* to grow) वाढणें, बळावणें;—as water चढणें, तुंबणें; —as reputation &c. वाढणें, वृद्धि -बढती होणें; multiply by the production of the young संतति वाढणें, प्रजावृद्धि होणें.—*t.* वाढविणें, वृद्धि क.; improve in quality सुधारणें; lengthen लांब क.; spread पसरणें; aggravate अधिक जड -कठीण क.—*n.* वाढ *f,* वृद्धि *f*; जोर, कडाखा: i. of heat; चढती *f,* बढती *f*; profit नफा, वर्त्ताळा, वृद्धि *f*; संतति *f,* संतान *n*;—of the moon वृद्धि *f.*—INCREMENT वाढ *f,* वृद्धि *f*; produce उपज, उत्पन्न *n.*; *Rhet.* उत्तरोत्तर उत्कर्षवर्णन *n,* सारालंकार. See Phil. vi. 8.

INCREDIBLE *a.* ज्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं तो, अविश्वसनीय, अश्रद्धेय.—INCREDIBILITY अविश्वासपात्रता *f,* अश्रद्धेयता *f.*—INCREDULITY अविश्वासशीलता *f,* अश्रद्धा *f,* अविश्वास.—INCREDULOUS *a.* अश्रद्धालु, शंकाशील [of].

INCRUST *v.* कवच -थर चढवणें, पूट देणें. -ATION कवच *n,* पूट *n,* थर, हात.

INCUBATE *v. i.* (*-cubare,* to lie down) अंडीं उबविणें.—INCUBUS, the nightmare कुस्वप्न *n,* अजीर्णप्रयुक्त स्वप्न *n.*

INCULCATE *v.* (*-calcare,* to tread) वारंवार सांगून मनांत भरवणें -ठसवणें: the Savior *inculcates* in His followers humility and forgiveness of injuries [on, upon].—INCULCATION वारंवार सांगणें *n,* त्रिवारबोध.

INCULPABLE *a.* निर्दोष, निरपराध.—INCULPATE *v.* दोष लावणें -ठेवणें.

INCUMBENT *a.* (*-cumbere,* to lie down) resting upon अवलंबित, आश्रित; resting, as duty or obligation आवश्यक, अवश्य कर्त्तव्य, जरूर. — *n.* the person who is in present possession of a benefice धर्मवृत्तिभोगी; —of any office वृत्तिभोगी, कामदार.

INCUR *v.* (*-currere,* to run into) become subject to अधीन -पात्र होणें; bring down -वर आणणें. -SION, an entering into a territory with hostile intention परमुलखावर स्वारी *f,* दौड, धांव *f.*

INCURABLE *a.* जो बरा करितां येत नाहीं तो, अचिकित्सनीय, असाध्य; irremediable अपरिहार्य, दुस्तर, बेइलाज, निरुपाय.

INDEBTED *a.* (*in* and *debt*) देणेदार, ऋणी, ऋणकरी; obliged बांधलेला, उपकारबद्ध, ऋणी: we are i. to the Christian religion for many of the advantages, and much of the refinement, of modern times.

INDECENT *a.* निलाजरा, निर्भीड, लज्जाप्रद; अवाच्य, अभद्र, अवाच्य (language).

INDECISIVE *a.* अनिश्चयात्मक, मुळमुळीत; wavering धरसोडीचा, चंचळ, अस्थिर.—INDECISION अनिश्चय, धरसोड *f.*

INDECLINABLE *a.* अविकारी, अव्यय.

INDECOROUS *a.* अयोग्य, अनुचित, असभ्य.—INDECORUM *a.* अमर्यादा *f*, अविनय, असभ्याचार.

INDEED *ad.* (*in* and *deed*) खरोखर, सत्य, खचीत (Rom. viii. 7); i.! खरेंच, असेंच काय?

INDEFATIGABLE *a.* (*-fatigare*, to weary) थकाया -दमायाजोगा नाहीं तो, मेहनती, परिश्रमी, परिश्रमाचा, अश्रांत, अविश्रांत [in].

INDEFEASIBLE *a.* अनिवार्य, अखंडनीय (estate).

INDEFENSIBLE *a.* राखायास अशक्य, रक्षणायोग्य (post); not capable of being justified अप्रतिपाद्य, अनुत्तर.

INDEFINABLE *a.* ज्याचें लक्षण करितां येत नाहीं तो, अलक्षणीय, अलक्ष्य.

INDEFINITE *a.* मोघम, अनियमित (time, term); *having* no certain limits बेहद्द, बेसुमार, अमर्याद (space).

INDELIBLE *a.* (*delere*, to blot out) पुसून न जाण्यासारखा; वज्रलेपा सारखा, पक्का (letters).

INDELICATE *a.* बिभत्स, लज्जाकारक (word); बेमुरवतीचा, निर्भिड (behavior).

INDEMNIFY *v.* (*-damnum*, loss) तोटयापासून राखणें; make good भरून देणें, तोटा भरून देणें.—INDEMNITY तोटा न होऊं देण्याची हमी *f*; शिक्षा न होऊं देण्याची हमी *f* [for, against].

INDENT *v.* (*-dens*, tooth) notch खांडी पाडणें, कर्वतीकांठी क.; bind out by indenture करारानें बांधणें -ठेवणें (a servant); [*Print.* begin further in from the margin than the rest of a paragraph].—*i.* खांडी पडणें. -ATION खांड *f*, कातरा; a recess in any border खाचा, खोंच *f*.—INDENTURE खांडी पाडणें *n*; *Law* मुचलका, करारनामा, कौलनामा. —*v.* करार क., करारानें बांधून घेणें -ठेवणें (an apprentice).

INDEPENDENT *a.* स्वतंत्र, अनधीन; affording a comfortable livelihood त्यागभोगापुरता देणारा, पोटापुरता (property); not subject to bias or influence मोकळ्या मनाचा, स्वतंत्र: a man of i. mind; free मोकळा, खळबळीत (manners); exclusive खेरीज करूनचा, इतरव्यावृत्त [of].—*n.* [one who believes that an organized Christian church is complete in itself, competent to self-government, and independent of all ecclesiastical authority]. -LY *ad.* मुखत्यारीनें, स्वतंत्रतेनें; दुसऱ्याच्या संबंधावांचून [of].

INDESCRIBABLE *a.* सांगतां येत नाहीं असा, अवर्णनीय.

INDESTRUCTIBLE *a.* अविनाशी, अनश्वर.

INDETERMINABLE *a.* ज्याचा निश्चय करतां येत नाहीं तो, अनिश्चय.—INDETERMINATE *a.* मोघम, अनिश्चित; i. quantity अनियत संख्या *f*.—INDETERMINATION अनिश्चय, धरसोड *f*.

INDEX (*indicere*, to proclaim) that which points out दर्शक, ज्ञापक; a hand that directs to any thing, as the hour of the day हात, कांटा; a table for facilitating reference to topics, names, &c. in a book सूचीपत्र *n*, अनुक्रमणिका *f*; *Alg.* प्रकाशक; i. finger तर्जनी *f*; i. hand घड्याळाचा कांटा [to]; [i. *prohibitory*, a catalogue of books which are forbidden by the R. C. Church to be read; i. *expurgatorius* is a catalogue specifying passages in books which are to be expunged or altered. These catalogues

are published, with additions from time to time, under the sanction of the pope].

INDEXTERITY अडाणीपणा, अडमूठपणा, गैरवाकबगारी *f*.

INDIAN (from *Indus*) a native of the Indies हिंदुस्थानचा राहणारा; हिंदु .—*a*. हिंदुस्थानचा, हिंदु देशचा; अमेरिकेच्या मूळ प्रजेचा; i. corn मका; i. fig वडाचें झाड *n*; वडाचें फळ *n*; कांटेनिवडुंग *n*; i. hemp सण; i. millet साव; i. red गेरू, काव *f*; INDIA-RUBBER 'रबर.'

INDICATE *v*. (*-dicare*, to proclaim) दाखविणें, सुचविणें; *Med*. रूपावरून -लक्षणावरून दाखविणें.—INDICATION सूचना *f*; लक्षण *n*, चिन्ह *n*, खूण *f*;—of a passion आविर्भाव, आकार.—INDICATIVE *a*. दाखवणारा, दर्शक; *Gram*. i. mood स्वार्थ -सरळरूप *n*.—INDICATOR दर्शक, दाखवणारा; [*Steam Eng*. an instrument by which the working steam records its working pressure, from which the power of the engine may be calculated.]

INDICT *v*. (*-dicere*, to say) *Law*, charge with a crime, in due form of law, by the finding or presentment of a grand jury जुरीनें दोषारोप क. -ABLE *a*. दोषारोप करण्याजोगा; जुरीनें दोष ठेवण्याजोगा. -MENT दोषारोप क. *n*; जुरीनें लिहून दिलेला दोषारोप.—INDIFFERENT *a*. not making a difference सारखा, समान, बिन तफावतीचा; of no account हलका; passable मध्यम, चालायाजोगा, कामचलाऊ; impartial निःपक्षपाती; neutral समदृष्टि, उभय साधारण; feeling no interest, anxiety, or care respecting any thing बेफिकीर, उदास, बेफाम; disinterested निस्पृह, निष्काम [to].—INDIFFERENCE समदृष्टि *f*, समपक्षता *f*; अनास्था *f*, औदासिन्य *n*, हयगई *f*; सारखेपणा, अभिन्नता *f*.

INDIGENT *a*. (*-egere*, to be needy) गरीब, दरिद्री.—INDIGENCE गरीबी *f*, कंगाली *f*, ददात *f*.

INDIGENOUS *a*. (*-genere*, to beget) स्थानिक, देशीय, देशज, देशी: joy and hope are emotions i. to the human mind; देशांत उपजलेला, देशोत्पन्न: in India cotton is i.

INDIGESTED *a*. अपक्व, न जिरलेला, अजीर्ण; not methodized अव्यवस्थित, विसकळीत, न जुळलेला. —INDIGESTIBLE *a*. न पचण्याजोगा, अपच्य, जड; not to be received अग्राह्य, अमान्य. —INDIGESTION अजीर्ण *n*, कुपित्थ *n*, अन्नविकार.

INDIGNANT *a*. (*-dignus*, worthy) रागावलेला-तप्त, क्रुद्ध [at]. — INDIGNATION, feeling excited by that which is indign or unworthy, base or disgraceful तिरस्कारयुक्त कोप, रोष, तैष.— INDIGNITY, unmerited contemptuous treatment अनादर, तिरस्कार, अपमान.

INDIGO (from *India*) नीळ *f*.

INDIRECT *a*. वांकडा; circuitous फेऱ्याचा; by remote means वांकडा, आडरस्त्याचा (answer, accusation); unfair कुटिल, गैररस्त्याचा, वांकडा (dealing). -LY *ad*. आडमार्गानें; परभारें; लांबून, ओझरता.

INDISCERNIBLE *a*. अतिसूक्ष्म, इंद्रियागोचर.

INDISCREET *a*. अविचारी, अविवेकी (persons); अविचाराचा (conduct).—INDISCRETION अविचार, अविवेक.

INDISCRIMINATE *a*. विचारहीन -शून्य, तारतम्यहीन, अविवेकी. -LY *ad*. तारतम्य -विचार केल्यावांचून, भेदाभेद पाहिल्यावांचून.—INDISCRIMINATION अविचार, अविवेक.

INDISPENSABLE *a*. जो सोडतां -टाकतां येत नाहीं तो, ज्यावांचून चालत नाहीं तो, अगत्याचा, आवश्यक; it is not i. त्यावांचून खोळंबा नाहीं; i. act अवश्य कर्तव्य *n* [to].—INDISPENSABLY *ad*. अवश्य, जरूर.

INDISPOSE *v*. निरुपयोगी -नकामी क.; disqualify नालायक क.; make somewhat ill

अस्वस्थ -बेआराम क., विकृति क.; disincline मन फिरवणें, उलटवणें, विमुख क.: the pride and selfishness of men i. them to religious duties; make unfavorable अप्रसन्न क., -वर मर्जी खप्पा क. [towards].—INDISPOSED *a.* नाकबूल, नाराजी; अस्वस्थ, आजारी.—INDISPOSITION नावड *f*, नाराजी *f*, कंटाळा; विकृति *f*, असमाधान *n*.

INDISPUTABLE *a.* बेतकरार, निर्विवाद.

INDISSOLUBLE *a.* जें वितळत नाहीं तें, अद्रव; incapable of being broken or rightfully violated अभंग, अभेद्य, वज्रप्राय, रेशमाच्या गांठीचा (covenant).

INDISTINCT *a.* not separate अभिन्न, एक: i. as water is from water; not clear अस्पष्ट-अव्यक्त (ideas); faint चुटपुटा, दिसे न दिसेसा, कळे न कळेसा, विकल (view).

INDISTINGUISHABLE *a.* ज्यांचा भेद समजत नाहीं तें, अविज्ञेय.

INDITE *v.*(*indicere*) direct, dictate, suggest or prompt what is to be uttered or written बोलायास अथवा लिहायास सुचविणें, -सांगणें -स्फूर्ति देणें; compose रचणें; write लिहिणें.—*i.* रचणें, कवन क. -लिहिणें.

INDIVIDUAL *a.*(*-dividus,* divisible) one एक, एकटा (man); pertaining to one एकाचा, एकट्याचा (labor); distinctive भेददर्शक; peculiar विशेष, असाधारण.—*n.* व्यक्ति *f*, असामी *f*, इसम, जण. -ITY एकत्व *n*, पृथकत्व *n*; व्यक्तीचा विशेष गुण, -चें लक्षण. -LY *ad.* एकएक, असामीवार, व्यक्तिशः.

INDIVISIBLE *a.* ज्याचे विभाग होत नाहींत तो, अविभाज्य.—INDIVISIBILITY अविभाज्यता *f*, अभेद्यता *f*.

INDOLENCE (*-dolere,* to feel pain) आळस, सुस्ती *f*.—INDOLENT *a.* आळसी, जड, मंद; i. tumor बेदर्द *n*, मुडदार गांठ *f*, टेंगूळ *n*, इ०.

INDOMITABLE *a.*(*-domare,* to tame) अजिंक्य, अदमनीय.

INDORSE, See ENDORSE.

INDOOR *a.* घरांतला (work).

INDUBITABLE *a* (See DUBIOUS) खचित, निस्संशय.

INDUCE *v.* (*-ducere,* to lead) आंत नेणें-आणणें; bring into view दृष्टीस पाडणें, दाखवणें; influence मन वळवणें -फिरवणें; bring on उत्पन्न क., घडून -बनवून आणणें [to]. -MENT प्रयोजन *n*, आमिष *n*, उत्तेजन *n*.—INDUCT *v.* आंत आणणें, प्रवेश करविणें; *Eccl.* introduce, as to a benefice or office (धर्मसंबंधी) अधिकारावर -वृत्तीवर -पदावर बसविणें, यथाविधि स्थापना क. [into]. -ION आंत येणें *n*, प्रवेश; beginning आरंभ; *Philos.* the process of reasoning from a part to a whole, or from particulars to generals विशेष गोष्टीवरून साधारण गोष्टीचा निश्चय -चें अनुमान करणें *n*; अधिकारावर नेमणें *n*; विधिपूर्वक स्थापना *f*; a process of demonstration अनुमिति *f*, सिद्धांत. -IVE *a.* leading प्रवर्त्तक; अनुमानिक, तार्किक; i. reasoning अनुमानोक्ति *f*.

INDULGE *v.* (*-dulcis,* sweet) gratify by compliance तृप्त क., पुरवणें, चालवणें; humor कोड -लळा -कौतुक पुरवणें; not to oppose or restrain असूं देणें, राखणें, बाळगणें (sloth, pride); grant by favor मेहरबानीनें देणें [with, in].—*i.* यथेष्ट भोग क.; practise a forbidden or questionable act without restraint निषिद्ध कर्माचें यथेच्छ आचरण क. *n*.—INDULGENCE अनावर, असंयम; कौतुक *n*, कोड *n*, लाड; मेहरबानगीची देणगी *f*, प्रसाद; [*R. C. Church,* remission of the temporal punishment due to sins, granted by the pope or church, and supposed to save the sinner from purgatory]. -INDULGENT *a.* लाडचालविणारा; mild सौम्य, क्षमाशील [to].

INDURATE *v.i.* (*-durare,* to harden) कठीण होणें.—*t.* कठीण क.; make unfeeling मन कठीण क.

INDUSTRY (*industria*) habitual diligence in any employment, either bodily or mental उद्योग, मेहनत *f,* व्यवसाय; assiduity व्यासंग.—INDUSTRIOUS *a.* उद्योगी, मेहनती; व्यासंगी, प्रयत्नवान, उद्युक्त. -LY *ad.* मेहनतीनें, श्रमपूर्वक; with care जपून, काळजीनें.

INDWELLING आंत राहणें *n,* अंतर्वास, अंतःस्थिति *f.*

INEBRIATE *v.* (*-ebriare,* to make drunk) पाजून मस्त -उन्मत क.; stupefy गुंग क., भूल घालणें.—*i.* मस्त -गुंग होणें.—INEBRIATION मस्ती *f,* माद, उन्माद.

INEFFABLE *a.* (*-fari,* to speak) सांगतां-बोलून दाखवितां येत नाहीं असा, अवर्णनीय, अनिर्वाच्य.

INEFFECTIVE, INEFFECTUAL, INEFFICACIOUS *a.* व्यर्थ, निष्फळ, निरुपयोगी, निरर्थक.—INEFFICACY निष्फलता *f,* बलहीनता *f,* गुणाभाव.

INELEGANT *a.* बेडौल, विशोभित, बेढब.

INELIGIBLE *a.* निवडण्यास -घेण्यास अयोग्य, अग्राह्य [for].

INEQUALITY उंचनीचपणा, उंचसखलपणा; diversity नाना प्रकार, भेद; disproportion विषमता *f,* वैषम्य *n;* inadequacy अपूर्तेपणा, अक्षमता *f;*—of number विषम संख्यत्व *n,* तारतम्य *n.*

INERT *a.* (*-ars,* art) destitute of the power of moving itself अचेतन, जड, गतिहीन (matter); dull जड, मंद; powerless for an effect or influence दुर्बल, हलका, निर्जीव (party).—INERTIA (*L.*) that property of matter by which it tends when at rest to remain so, and when in motion to continue in motion जडत्व *n; Med.* want of activity अचेतनता *f,* जाड्य *n,* मांद्य *n.*

INESTIMABLE *a.* ज्याची गणना -अजमास करितां येत नाहीं तो, असंख्य; above all price अमोलिक, अमूल्य.

INEVITABLE *a.* जो टाळतां येत नाहीं तो, अपरिहार्य, अनिवार्य; not to be resisted अप्रतिकार्य, दुर्धर.

INEXCUSABLE *a.* कारण सांगून ज्याचा दोष घालवितां येत नाहीं तो, अपरिहार्य, निरुत्तर.

INEXHAUSTIBLE *a.* अक्षय, अव्यय, अनंत.

INEXORABLE *a.* not to be moved or persuaded by entreaty or prayer दुराराध्य, कठोर, कठीण मनाचा.

INEXPEDIENT *a.* अयोग्य, अनुचित, अनुपयुक्त; unsuitable to time and place देशकालविरुद्ध *n.*

INEXPERIENCE गैरमाहिती *f,* अप्रत्यय, अजाणपणा कच्चेपणा.

INEXPERT *a.* अडाणी, कौशल्यहीन.

INEXPIABLE *a.* (See EXPIATE) ज्याला प्रायश्चित नाहीं तो, अमोचनीय (crime); implacable दुःशाम्य (hatred).

INEXPLICABLE *a.* ज्याचा उलगडा होत नाहीं असा, दुर्बोध, गूढ.

INEXPRESSIBLE *a.* सांगतां येत नाहीं असा, अनिर्वाच्य, अकथनीय.

INEXTINGUISHABLE *a.* न विझणारा, न विझता, अशमनीय.

INEXTRICABLE *a.* ज्याचा गुताडा काढतां येत नाहीं असा, अमोचनीय.

INFALLIBLE *a.* अचूक, अमोघ, निर्भ्रांत, भ्रमातीत (master); certain खचीत, निश्चित (success).—INFALLIBILITY चूक -भ्रांति नसणें *n,* अमोघता *f,* अभ्रांति *f,* अचूकपणा.

INFAMOUS *a.* दुर्लौकिकाचा, अपकीर्तीचा (act); rendering infamous अपयशस्कर, लज्जा-

कारक, बदलौकिक करणारा; *Law,* branded with infamy by conviction of a crime सरकारांत गुन्हेगार ठरून नामोश झालेला -फजीत पावलेला, बदमाश, 'डामीस.'—INFAMY दुर्लौकिक, बदनाम, अपकीर्ति *f.*

INFANT (*-fari,* to speak) a child in the first period of life, beginning at his birth तान्हें मूल *n,* बालक *n,* अर्भक *n*; a child several years of age लेंकरूं *n,* मूल *n,* बाळ *n*; *Law,* person not of full age, a person under the age of twenty-one years बाल, अप्राप्तव्यवहार, जो कायद्यांत आला नाहीं तो. —*a.* बालपणाचा; tender कोमल, सकुमार; not mature कोंवळा, अपक्व, बाल (strength); intended for young children लहान मुलासाठीं केलेला, लहान मुलाचा, बाल (toy, school). -ILE *a.* बालपणाचा; बाळकाचा. -INE बाळाचा; लेंकरासारखा, बाळकासारखा (credulity).—INFANCY बालपण *n,* बालदशा *f*; the first age of any thing पूर्वावस्था *f,* आरंभ; *Law,* बालदशा *f,* अप्रौढदशा *f.*

INFANTRY (*infans,* child, foot-soldier) पायदळ *n.*

INFATUATE *v.* (*-fatuus,* foolish) वेडा क., बुद्धिभ्रंश क.: whom God intends to destroy, he first *infatuates* विनाशकाले विपरीत बुद्धि; inspire with an extravagant or a foolish passion, too obstinate to be controlled by reason -चें वेड भरवणें, -च्या नादीं लावणें, लुब्ध क. [with].—INFATUATION वेड *n,* खूळ *n,* भूल *f.*

INFEASIBLE *a.* अशक्य, दुष्कर.

INFECT *v.* (*-facere,* to make) taint with disease रोग लावणें, रोगविकृत क.; affect with morbid or noxious matter दुर्गंधीनें -कुजलेल्या पदार्थानें दूषित क.: to i. a lancet; corrupt बिघडणें, आपले दुर्गुण दुसऱ्यास देणें [with]. -ION, that which infects रोगाची लस *f* -वाफ *f*; a prevailing disease साथ *f,* धाम *f*; result of infecting influence संसर्गदोष; that which taints, poisons, or corrupts by communication from one to another संसर्गानें बिघडविणारी वस्तु *f.* -IOUS *a.* स्पर्शानें -वाफेनें लागणारा, स्पर्शसंचारी, सांसर्गिक (fever); स्पर्शानें बिघडविणारा, भ्रष्टकारक; readily communicated लवकर-सहज देण्याजोगा, सुदेय (mirth).

INFER *v.* (*-ferre,* to carry) derive either by deduction or induction अनुमान -तर्क क., ताडणें; prove सिद्ध क. [from]. -ABLE *a.* तर्कानें समजण्याजोगा, अनुमेय. -ENCE अनुमान *n,* तर्क; conclusion निर्णय, सिद्धांत. -ENTIAL *a.* अनुमानानें सिद्ध, अनुमानसिद्ध.

INFERIOR *a.* (*inferus,* that is below) lower in place खालचा; in social rank खालच्या पायरीचा-योग्यतेचा, कनिष्ट;—in excellence उणाख, हीन, निकृष्ट, नीच; less important गौण, अप्रधान; *Astron.* between the earth and the sun मध्यंतरीचा, अधरस्थ (planets) [to].—INFERIORITY खालची योग्यता *f* -पायरी *f*; हीनता *f,* निकृष्टता *f*; गौणता *f,* अप्राधान्य *n.*—INFERNAL *a.* pertaining to the lower regions पाताल -अधोलोक संबंधी; pertaining to hell नरक संबंधी; inhabiting hell नरकांत राहणारा, नरकवासी; hellish दुष्ट, अघोर, सैतानी.

INFEST *v.* (*infestus,* disturbed) त्रास -इजा -तसदी देणें [with].

INFIDEL *a.* (*-fides,* faith) अविश्वासी; disbelieving the inspiration of the Scriptures, or the divine institution of Christianity ख्रिस्ती शास्त्र किंवा धर्म ईश्वरदत्त नाहीं असें मानणारा -मानण्याचा, नास्तिक. (writer).—*n.* अविश्वासी मनुष्य; a heathen मूर्त्तिपूजक; a Mahomedan मुसलमान; [one who disbelieves in Christ, or the divine origin and authority of Christi-

anity]. -ITY अविश्वास, बेइमान; ख्रिस्ती शास्त्रावर व ख्रिस्ती धर्मावर अविश्वास; a violation of the marriage covenant by adultery or lewdness व्यभिचार, नवऱ्याचा किंवा बायकोचा बेमानपणा.

INFINITE *a.* अमर्याद, अपार, अनंत (Ps. cxlvii. 5); very great अतिशय, फार मोठा, भारी (calamity).—INFINITUDE अपारपणा, अनंतता *f*; अमर्याद काळ किंवा विस्तार; boundless number अगणित संख्या *f*.—INFINITY अपारपणा, अमर्यादा *f*; unlimited capacity, energy, or excellence अनंतशक्ति *f*, किंवा गुण; great multitude मोठा समुदाय; endless number अगणित संख्या *f*.—INFINITIVE *a.* असंख्य, अपार; i. mood *Gram.* सामान्यरूप *n*.

INFIRM *a.* अशक्त, नबला, नुकसान *n*; weak of mind मनाचा दुर्बळ; irresolute चंचळ मनाचा, धरसोडीचा; not stable डळमळीत, लटपटीत. -ARY, a hospital or place where the infirm or sick are lodged and nursed, or only treated as outpatients रोगीशाळा *f*, अनाथगृह *n*, बिमारखाना. -ITY कमजोरी *f*, बलहीनता *f*; लटपटीत -डळमळीतपणा; a disease रोग, व्याधि *f*; failing व्यंग *n*, ऐब *n*, दोष, चूक *f*.

INFIX *v.* खुपसणें, रोवणें, खोवणें; मनांत ठसविणें -बिंबविणें -भरणें: to i. good principles in the mind.

INFLAME *v.* (*-flammare*, to flame) चेतवणें, पेटवणें; raise to an unnatural heat तापवणें, दाह क. (the eyes); excite to an excessive and unnatural action चेव आणणें, चेष्टविणें; irritate संतापवणें, रागास पेटवणें, कोपवणें; *Med.* cause to become morbidly hot or irritated, by reason of undue or excessive action in the blood-vessels or tissues आंगांत आग -दाह क. [with].—INFLAMMABLE *a.* पेटवेणारा, ज्वालाग्राही.—INFLAMMATION पेटवणें *n*, संतापन *n*, दहन *n*, पेट; state of being in flame or on fire आग *f*, दाह, पेट; *Med.* आग *f*, दाह;—of the eye नेत्रदाह, आभीष्यंद;—of the spleen पाणथरी *f*, प्लीहादाह;—of the pleura पार्श्वशूल;—of the brain मज्जादाह.—INFLAMMATORY *a.* दाहक; दाहयुक्त, in comp. दाह: i. fever दाहज्वर; संतापकारक -आणणारा, चेतविणारा (speech); seditious बंडाळीचा, फंदफितुराचा (writings).

INFLATE *v.* (*-flare*, to blow) वाऱ्यानें फुगवणें, फुगीर क.; elate गर्वानें फुगवणें, फुलवणें, माजवणें, उन्मत्त क.; cause to become unduly expanded मर्यादे बाहेर वाढवणें -फैलावणें -ताणणें: an *inflated* currency will become depreciated [with].—INFLATION फुगवणें *n*, फुगवणूक *f*; फुगवशी *f*, फुगोसा; माज, पत्रास *f*, दिमाख; पसारा.

INFLECT *v.* (*-flectere*, to bend) वांकवणें, लववणें; *Gram.*—as a noun विभक्ति लावणें;—as a verb रूप चालवणें; modulate, as the voice स्वरभेद क., खांचखोंच घेणें [on, upon]. -ION वांकविणें *n*, वक्रीकरण *n*; विभक्ति *f*; रूप *n*; series of *inflections* रूपावली *f*; स्वरभेद, कर्त्तब.

INFLEXIBLE *a.* ताठर, ताठ; firm in purpose दृढसंकल्प, निग्रही; unalterable निर्विकल्प, निर्विकार.—INFLEXIBILITY ताठरपणा, काठिण्य *n*; आग्रह, नेट, दृढसंकल्प; obstinacy of will or temper हेंका, दुराग्रह.

INFLICT *v.* (*-fligere*, to strike) लावणें, घालणें, भोगायास लावणें (punishment &c.). -ION बसवणें *n*, लावणें *n*, in comp. आधान: दंडाधान; punishment दंड, शिक्षा *f*. -IVE *a.* दंड -शिक्षा लावणारा -करणारा -करण्यास समर्थ.

INFLUENCE (*-fluere*, to flow) आंत वाहणें *n*; ability to move or effect शक्ति *f*, बळ *n*;

—of the planet ग्रहावेश, ग्रहदशा *f*;—of God ईश्वरी शक्ति *f* -प्रेरणा *f*; power or authority arising from elevated station, excellence of character or intellect, wealth, and the like वजन *n*, तोल *n*, भीड *f*, चलती *f*; reputation आब्रू *f*, प्रतिष्ठा *f*; to exert one's i. with भीड खर्चणें; to have i. on भार पडणें -असणें, वजन असणें.—*v.* गुण क. -लागू होणें; move मन वळणें; lead or direct चालवणें, प्रवर्त्तवणें [over, on, with]. —INFLUENTIAL *a.* वजनदार, भारदस्तीचा, वगीचा.—INFLUX *v.* आंत वाहणें *n*, अंतर्वहन *n*; importation in abundance ऊत, पूर; to be a great i. पेंव -तारूं फुटणें, भरती लागणें.

INFOLD *v.* गुंडाळणें, लपेटणें; embrace आलिंगणें, कंवटाळणें.

INFORM *v.* घडणें, रूपदेणें; animate सजीव क., जीव -चेतना देणें: breath *informs* this fleeting frame; make known to -ला खबर -बातमी देणें, कळवणें, सांगणें: communicate a knowledge of facts to, by way of accusation अपराधाची बातमी -खबर देणें, दोषारोप क., नालस्ती सांगणें [of, about, concerning]. -ATION खबर *f*, बातमी *f*, सूचना *f*; अपराधाची सूचना *f*, फिर्याद *f*. [about]. -ANT, -ER कळवणारा, खबरदेणारा. -ER कळविणारा; अपराधाची बातमी देणारा; चाहडी -चुगली सांगणारा.

INFRANGIBLE *a.* अभंग, अभेद.—INFRINGE *v.* मोडणें (a contract); violate भंग -उल्लंघन क., मोडणें (a law). -MENT भंग, उल्लंघन *n*.

INFURIATE *a.* (*-furia,* fury) रागानें वेडा झालेला, क्रोधांध, संतप्त.—*v.* संतापवणें, वेड भरवणें [against].

INFUSE *v.* (*-fundere,* to pour) ओतणें, घालणें; instil, as principles or qualities मनांत भरवणें, बिंबवणें, गुण देणें; inspire प्रेरणा क.; steep in liquor without boiling, for the purpose of extracting medicinal qualities भिजवणें, भिजत घालणें [into].—INFUSION ओतणें.—*n.* प्रक्षेप; मनांत भरवणें *n*, निक्षेप; भिजवणें *n*; liquid obtained by infusion काट, काढा, कषाय. —INFUSORIA पाणी वगैरे द्रवपदार्थांत राहणारे अतिसूक्ष्म जीव *pl.*

INGATHERING हंगामाचें -कापणीचें काम *n*, हंगाम, कापणी *f*.

INGENIOUS *a.* (*-genere,* to beget) possessed of the faculty of invention कल्पक, योजक, चतुर (author, mechanic); of curious design, structure, or mechanism करामतीचा, युक्तीचा (fabric); witty खुबीचा, नोकदार (reply).—INGENUITY कल्पनाशक्ति *f*, युक्ति *f*, चतुराई *f*; करामत *f*, युक्ति *f*, कल्पना *f*: the i. of a plan.—INGENUOUS *a.* of honorable extraction कुलीन, खानदानीचा; noble महामनस्क, उदार (zeal); frank मनाचा मोकळा, निष्कपट, सरळ.

INGLORIOUS *a.* अपकीर्तीचा, अपयशाचा; shameful लाजेचा, लज्जाकर (flight).

INGOT (*lingotus,* a mass of gold or silver, extended in the manner of a tongue) सोनें, रुपें इ० धातूचा गट.

INGRAFT *v.* कलम क.; fix deeply खोवणें, रोवणें.

INGRATE *a.* & *n.* -FUL *a.* (*-gratus,* grateful) कृतघ्न, निमकहराम, खाल्ल्या घरचे वांसे मोजणारा; ungrateful to the sense नावडता, अरुचिकर.—INGRATITUDE कृतघ्नता *f*, निमकहरामी.

INGRATIATE *v.* (*-gratia,* favor) कृपा -मर्जी संपादणें [with].

INGREDIENT (*-gradi,* to go) that which enters into a compound वान *n*, वाना, द्रव्य *n*, जिन्नस, अंश.

INGRESS (do.) आंत जाणें *n*, प्रवेश; आंत जाण्याची मोकळीक *f*, किंवा अधिकार: all i. was prohibited.

INHABIT *v.* (*-habitare,* to dwell) आंत राहणें, नांदणें, राहणें, वस्ती क. (Is. lvii. 15). —*i.* वस्ती असणें, राहणें, असणें. -ABLE *a.* राहायाजोगा, वास्तव्य. -ANCE वस्ती *f,* नांदणूक *f,* वास्तव्य *n.* -ANT राहाणारा, in comp. स्थ, वासी, कर: क्षेत्रस्थ, नगरवासी, पुणेकर; an old i. of a place भुम्या. -ATION राहणें *n,* वस्ती *f*; राहायाची जागा *f.*

INHALE *v.* (*-halare,* to breath) श्वासा बराबर आंत घेणें -ओढणें, पिणें, खाणें.

INHARMONIOUS *a.* बेसूर, अपस्वर, बेताल.

INHERE *v.* (*-hærere,* to stick) धरून -अधिष्ठून राहणें -असणें.—INHERENT *a.* धरून असणारा, अधिष्ठित, अंतरस्थ; naturally pertaining to मूळचा, स्वाभाविक [in].

INHERIT *v.* (*-hæres,* heir) *Law,* take by descent from an ancestor वारशानें घेणें -मिळवणें -पावणें -उपभोगणें (land, estate); receive or take by birth जन्मापासून घेणें -पावणें, आईबापां पासून पावणें -जडणें [from]. -ABLE *a.* वारीसपणानें भोगायाचा (estate); वारीस होण्याजोगा पुत्रपरंपराभोग्य : the eldest daughter of the king is also i. to the crown; आईबापां पासून मिळण्या -घेण्याजोगा, पितृप्राप्य (qualities). -ANCE, *Law,* a perpetual or continuing right to an estate in a man and his heirs वारसा; that which is or may be inherited वतन *n,* वतनवाडी *f,* गोत्रधन *n*; unclaimed i. गतकुळी *f,* गतकुल *n*; right of i. उत्तराधिकार; portion of i. दायाभाग; partition of i. दायविभाग; share of i. अंश; [*Scrip.* future reward of righteousness (Col. i. 12; iii. 24)].

INHOSPITABLE *a.* आगतस्वागत न करणारा; not favorable to strangers परक्यास प्रतिकूळ -गैर सोयीचा (desert); i. village कुग्राम *n.*

INHUMAN *a.* क्रूर, निर्दय, कठीण, राक्षसी (person); क्रूरपणाचा, निर्दयतेचा, क्रूर, राक्षसी (act). -ITY क्रूरपण *n,* क्रौर्य *n.*

INHUME *v.* (*-humare,* to cover with earth) पुरणें (a dead body). —INHUMATION भूमिनिक्षेप -निवेश; self-i. जिवंतसमाध *f.*

INIMICAL *a.* (*-amare,* to love) वैरी, द्वेषी; adverse प्रतिकूल, विरोधी [to].

INIMITABLE *a.* अप्रतिम, अनुपम (eloquence).

INIQUITOUS *a.* (See EQUITY) अन्यायाचा, अधर्माचा, हरामाचा.—INIQUITY absence of, or deviation from, equal or just dealing अन्याय, अधर्म; an act of injustice अन्यायकर्म *n,* अन्याय; a crime or sin अपराध, पाप *n* (Is. lix. 2); the cup of i. पापाचा घडा.

INITIAL *a.* (*-ire,* to go) of the beginning आरंभींचा, पहिला, पूर्व (symptoms); placed at the beginning आरंभीं ठेवलेला, पहिला, आद्य, मूळ, प्रथम (letters).—*n.* शब्दाचा प्रथम वर्ण -चें पहिलें अक्षर *n.* —INITIATE *v.* आरंभ क.; instruct in the rudiments or principles मूळपीठिका -तत्वें शिकवणें (a pupil); introduce into a society मंडळींत घेणें -प्रवेश करविणें; —into secret ceremonies उपदेश -दीक्षा -अनुग्रह देणें.—*i.* आरंभींचें काम क.—INITIATORY, -TIVE *a.* आरंभींचे कामाचा; उपदेश -दीक्षाकर्म संबंधी; to take the i. पेरणें.

INJECT *v.* (*-jacere,* to throw) आंत टाकणें -घालणें; —with a syringe पिचकारी मारणें [into]. -ION आंत टाकणें *n,* अंतःक्षेप; medicine to be injected वस्तीनें -पिचकारीनें घालायाचें औषध *n.*

INJUDICIOUS *a.* अविचारी, असमंजस (person); अविचाराचा, वेडेपणाचा (measure).

INJUNCTION (*-jungere,* to join) आज्ञा देणें *n,* आज्ञापन *n*; आज्ञा *f,* हुकूम; *Law* ताकीद *f*; letter of i. ताकीदचिठ्ठी *f* [on, against].

INJURE *v.* (*-juris,* right) hurt अपकार -उपद्रव क., दुःख देणें; hurt or wound, as the person शरीरास दुखापत क.; damage or lessen the value of, as goods or estate नुकसानी क., खराबी क.; slander, tarnish, or impair, as reputation अब्रूची नुकसानी क., अब्रूस धक्का बसविणें; grieve मनास दुःख देणें, मन दुखवणें; —as the intellect बुद्धिभ्रंश क. [by]. —INJURIOUS *a.* अपकारक, उपद्रव करणारा; खराबी -नुकसानी करणारा.—INJURY अपकार, उपद्रव; खराबी *f,* नुकसान *n.*

INJUSTICE अन्याय, अधर्म, गैर इनसाफ.

INK *D.* शाई *f;* sympathetic i. अदृश्य शाई *f;* seller of i. रक्तवान, शाई विकणारा·—*v.* शाईनें भरणें, शाईनें काळा क.—INKY *a.* शाईचा; शाई सारखा; शाईनें भरलेला. -HORN -STAND दऊत *f,* कलमदान *n.*—INKLE नवार *f.*

INLAND *a.* समुद्रा पासून दूरचा, मध्यदेशस्थ, भूमध्य (sea); carried on within a country देशी, मुलकी (trade).—*n.* मध्यदेश.

INLAY *v.* जडणें, खचित क. [with].—*n.* जडाव *n.* -ER जडावकाम करणारा, जड्या.

INLET वाट *f,* दार *n;* a bay खाडी *f,* वांकण *n.*

INMATE एका घरांत राहणारा, सहवासी.

INMOST *a.* सर्वांहून आंतला.

INN* उतारशाळा व खाणावळीचें घर *n,* सराई *f.* -KEEPER खाणावळ घालणारा, भटाऱ्या.

INNATE *a.* (*-natus,* born) जातीचा, जन्माचा, अंतर्जात; originating in, or derived from, the constitution of the intellect आंगचा, बुद्धीचा.

INNAVIGABLE *a.* नौकागमनाशक्य.

INNINGS* the ingathering of grain कापणी *f; pl* lands recovered from the sea खार *f;* [time or turn for using the bat, in cricket].

INNOCENT *a* (*-nocere,* to hurt) not harmful निरुपद्रवी, अविकारी (medicine); free from wrong निर्दोष, निरपराधी; lawful यथाशास्त्र, उचित, कायदेशीर (trade); upright निष्कपट, सालस, सात्विक [of].—INNOCENCE निरपराधीपणा; सात्विकपणा, सालसाई *f;* ignorance अज्ञान, *n,* अजाणतेपणा; imbecility दुर्बलबुद्धि *f.*—INNOCUOUS *a.* निर्विकारी [to].

INNOVATE *v.* (*-novare,* to make new) नवी चाल -रीत काढणें; फिरवाफिरव क., नवें जुनें क. [on].—INNOVATION नवी चाल *f;* फिरवाफिरव *f.*—INNOVATOR नवें जुनें -फिरवाफिरव करणारा, नवी रीत -चाल -पाठ चालू करणारा.

INNUMERABLE *a.* असंख्य, अगणित; पुष्कळ, बहुत.

INOCULATE *v.* (*-oculus,* an eye) insert, as the bud of a tree in another tree, for the purpose of growth on the new stock पिवबंदी क.; communicate disease by inserting infectious matter शरिरांत लस घालून रोग जडविणें;—with the matter of small-pox तोटगा क., देवी काढणें [with].

INOFFENSIVE *a.* गरीब, बापुडा; निरुपद्रविक, अविकारी.

INOPERATIVE *a.* जो कार्य करणार नव्हे तो, ज्या पासून कार्य होत नाहीं -ज्याचा गुण येत नाहीं -जो लागू पडत नाहीं तो, अकार्यकारी, निरुपयोगी, व्यर्थ (laws, remedies).

INOPPORTUNE *a.* अवेळीचा, अकाळीचा.

INORDINATE *a.* (*-ordo* order) अमर्याद, बेसुमार, बेहद्द (desire).

INORGANIC *a.* जड, निरवयव, इंद्रियरहित (substances); इंद्रियरहित -जड पदार्थाच्या विषयाचा, जडपदार्थविषयक.

INQUIRE *v.* (*-quærere,* to seek) ask a question पुसणें, प्रश्न क., विचारणें; make examination or investigation शोधणें, परीक्षा क.; into तपासणें; about, after, for -चा समाचार घेणें, -ला पुसणें.—INQUIRER पुसणारा, शोधणारा; समाचार घेणारा; शोधक, परी-

क्षक;—after truth सत्यशोधक. —INQUIRY विचारपूस *f*; प्रश्न, सवाल; शोध, तलाश, तपास, चौकशी *f*; सत्याचा -ज्ञानाचा शोध; friendly i. respecting health कुशल प्रश्न; spirit of i. ज्ञानेच्छा *f*, ज्ञानेप्सा *f*.—INQUEST शोध, तलाश, चौकशी *f*; *Law*, official examination सरकारी चौकशी *f*; a coroner's jury assembled to inquire into the cause of a sudden death मैयतकयास, 'कारोनरची जुरी' *f*.—INQUISITION चौकशी *f*, तलाश, शोध सरकारी चौकशी *f*, चौकशी *f*; *R. C. Church*, a tribunal established for the examination and punishment of heretics धर्मसमीक्षण सभा *f*, पाखंडी लोकांची -मताची चौकशी करण्याची सभा *f*.—'इन्क्विजिशन' *n.f.*—INQUISITIVE *a.* चौकस, शोधक, पृच्छक. — INQUISITORIAL *a.* चौकशीचा, शोध लावण्याचा; इन्क्विजिशन सभेचा.

INROAD, entrance of an army into a country with purposes of hostility स्वारी *f*, दौड *f*.

INSANE *a.* वेडा, पिसा; वेडे लोकांचा, वेडे लोकां करितां केलेला (hospital).—INSANITY वेडेपण *n*; वेड *n*, पिसें *n*.

INSATIABLE, INSATIATE *a.* अधाशी, हावरा, असोशी.—INSATIETY अधाशीपणा, वखवख *f*,

INSCRIBE *v.* (*-scribere*, to write) लिहिणें; imprint छापणें, वठवणें, उमटवणें; engrave कोरणें, खोदणें; mark with letters, characters or words वर्णांकित -शब्दांकित क.; address to (नांवानें) नजर क., समर्पण क. (a book); impress ठसवणें, बिंबवणें.—INSCRIPTION लीपि *f*, लेख; कोरीव लेख;—on stone शिलालेख; —on copperplate ताम्रपटलेख; ग्रंथनिवेदन *n*, समर्पण *n*.

INSCRUTABLE *a.* (*-scrutari*, to search) अतर्क्य, दुर्ज्ञेय, खोल, गहन; incapable of being discovered, or understood by human reason मनुष्यबुद्धीस गहन -अतर्क्य.

INSECT (*insecare*, to cut in) किडा, कीटक, कृमि. -ILE *a.* किड्याच्या जातीचा, कीटजातीय.

INSECURE *a.* continually apprehensive of danger भयशंकित, सशंक; unsafe भयाचा, धोक्याचा, बेभरवशाचा.—INSECURITY भयशंका *f*; धोका, जोखीम *n*; want of confidence in one's opinion बेभरवसा, अविश्वास.

INSENSIBLE *a.* destitute of the power of feeling सुना, बधिर; void of feeling राग -रसहीन, विरागी; wanting tenderness निर्दय, कठीण; imperceptible इंद्रियानें न समजायाजोगा, इंद्रियागोचर; progressing by imperceptible degrees नकळत वाढणारा [to].—INSENSIBILITY सुनेपणा, बधिरत्व *n*; —of the skin सुनबहिरी; राग -रसहीनता *f*; निर्दयता *f*.—INSENSIBLY नकळत, न कळे असें; gradually क्रमानें, हळू हळू, थोडे थोडे.

INSENTIENT *a.* See INSENSIBLE.

INSEPARABLE *a.* जो वेगळा करितां येत नाहीं तो, अवियोज्य.

INSERT *v.* (*-serere*, to join) आंत शिरवणें, घालणें [in]. -ION शिरकाव, प्रवेश, निवेश.

INSIDE आंतली बाजू *f*, अभ्यंतर *n*; *pl* the entrails अंतडीं *n pl*; private thoughts and feelings मनांतले विचार *pl*, किंवा भावना *f pl*, अंतर *n*, अंतरंग *n*; one who or that which is within अंतरस्थ *c*, आंत राहणारा.—*a.* आंतल्या बाजूचा; आंतला.—*ad.* or *prep.* आंतल्या बाजूस, आंत.

INSIDIOUS *a.* (*-sedere*, to sit) deceitful कपटी, दगलबाज (a person); intended to entrap काव्याचा, धरपकडीचा (arts). -NESS कपटलाघव.

INSIGHT, thorough knowledge or skill प्रवेश, परिचय, गम्य *n*; power of acute observation and deduction कुशाग्रबुद्धि *f*.

INSIGNIA (*L.*) distinguishing marks of office or honor अधिकाराचीं चिन्हें *n pl* -लक्षणें *pl* -खूणा *f pl*;—of royalty राजचिन्ह *n*; signs चिन्हें *n pl*, लक्षणें *n pl*.

INSIGNIFICANT *a.* अर्थहीन, निरर्थक (words); trivial हलका, क्षुद्र, क्षुल्लक; mean नीच, हलका, अधम (being).—INSIGNIFICANCE अनर्थ, अर्थशून्यता *f*; हलकेपणा, क्षुद्रता *f*; नीचपणा, नीचत्व *n*.

INSINCERE* *a.* कपटी, ढोंगी, कृत्रिमी (friends); कपटाचा, खोटा, वावकळ, वरकरणी (things). —INSINCERITY कपट *n*, दुजाभाव, खोटेपणा, ढोंग *n*; वरकरणीपणा.

INSINUATE *v.* (*-sinus, bosom*) introduce gently, or as by winding or narrow passages हळूच -युक्तीनें किंवा वक्रगतीनें शिरकवणें -खुपसणें; work one's self into favor मर्जी संपादणें, पोटांत शिरणें; hint सुचवणें, दर्शवणें; suggest by remote allusion व्यंगोक्तीनें सुचवणें.—INSINUATING *p. a.* मर्जी संपादनारा, मनमिळाऊ.—INSINUATION, art or power of pleasing and stealing on the affections लाघवीपणा, वशीकरण *n*; सूचना *f*, नोक *f*, तुक्का.

INSIPID *a.* (*-sapidus*, savory) पाणचट, मळमळीत (liquor); पाणचट, अळणी, विरस (composition).

INSIST *v.* (*-sistere*, to stand) dwell upon घोकणी लावणें -मांडणें; urge आग्रह क. -धरणें [on, upon].

INSOCIABLE *a.* घुम्या, माणूसघाण्या, ज्यास मनुष्याची सोबत आवडत नाहीं तो.

INSOLATE *v.* (*-sol*, the sun) उन्हांत वाळवणें, सूर्यपुट देणें; उन्हांत पक्व क.—INSOLATION सूर्यपुट *n*; उन्हांत फळें वगैरे पिकविणें *n*.

INSOLENT *a.* (*-solens*, accustomed) proud and haughty with contempt of others उद्धट, दांडगा, मगरूर (master); मगरुरीचा, दांडगाईचा (words).—INSOLENCE मगरुरी *f*, दांडगाई *f*.

INSOLUBLE *a.* वितळत नाहीं तो, अद्राव्य; not to be explained कठीण, अवघड, बिकट.—INSOLVENCY नादारी *f*.—INSOLVENT *a.* unable to pay one's debts as they fall due, in the ordinary course of trade and business नादार, मोडकळीस आलेला, दिवाळें निघालेला.

INSOMUCH* *ad.* एथपर्यंत -पावेतों [as].

INSPECT *v.* (*-spicere*, to view) पाहणें, निरखणें, शोधणें; view and examine officially as troops, arms, goods पाहणी क.; superintend देखरेख ठेवणें -क. -ION परीक्षा *f*, शोध; पाहणी *f*; देखरेख *f* [into]. -OR देखरेख करणारा; पाहणीदार, चौकसनीस, 'इन्स्पेक्टर.'

INSPIRE *v. i.* (*-spirare*, to breathe) श्वास घेणें; blow gently वाहणें, मंद वाहणें.—*t.* breathe into फुकणें; infuse into the mind मनांत भरणें, बुद्धि देणें, प्रेरणें; disclose preternaturally ईश्वरी -अमानुष प्रेरणा क.; infuse into व्यापणें; fill with what animates, enlivens, or exalts उमेद -हौस -स्फुरण घालणें -देणें, प्रोत्साहित क.; inhale श्वास घेणें.—INSPIRED *p. a.* श्वासानें वेतलेला, श्वासित; व्याप्त, निवेशित; given by divine inspiration ईश्वरप्रेरित -प्रबोधित; to be i. with the afflatus of a god, &c. वारें -अवसर येणें -भरणें.—INSPIRATION श्वास घेणें *n*, श्वसन *n*; निश्वास; स्फुरण *n*, उत्तेजन *n*; a supernatural divine influence on the prophets, apostles, or sacred writers, by which they were qualified to communicate moral or religious truth with authority ईश्वरी प्रेरणा *f*, ईश्वरोपदेश, ईश्वरोक्त शास्त्र लिहिण्याची प्रेरणा *f* (2 Tim. iii. 16); [plenary i., that kind of inspiration in which the inspired person is incapable

of uttering or communicating any error with the inspired message; verbal i., that kind of inspiration in which the very words and forms of expression of the divine message are communicated to the inspired person.]

INSTALL *v.* (*Gr.* *-stall,* a place) जागीं ठेवणें, स्थापणें; to instate in an office, rank, or order जाग्यावर पदावर -हुद्यावर स्थापणें -नेमणें -योजणें; to invest with any charge by the usual ceremonies संस्कार करून स्थापणें, संस्थापना क. to i. an ordained minister in a parish [in]. -ATION प्रतिष्ठा *f,* पदस्थापना *f,* पदाभिषेक. -MENT संस्कारपूर्वक स्थापना *f*; part of a sum of money paid or to be paid at a particular period हप्ता, खिस्त *f.*

INSTANT *a.* (*-stare,* to stand upon) earnest तत्पर, आग्रही (Rom. xii. 12;) immediate लागलाच होणारा, अनंतरकालिक; quick शीघ्र, जलदीचा, त्वरेचा; current चालता, वर्त्तमान, मिनहू, मजकूर.—*n.* a moment क्षण, पळ *n*; a particular time वेळ *f,* काळ; a day of the current month चालत्या महिन्याचा दिवस, -ची तारीख, माहे मजकूर. -LY *ad.* लागलाच, तत्क्षणीं, आग्रहपूर्वक. -ANEOUS *a.* तात्कालिक, तत्क्षणिक. -LY *ad.* एका क्षणांत, पळांत.—INSTANCE आग्रह, मित्रतवारी *f*; occasion प्रसंग, वेळ *f*; example दाखला, उदाहरण *n*; in the first i. प्रथम, पहिल्यानें.—*v.* उदाहरण देणें, उदाहरणासाठीं सांगणें.

INSTATE *v.* (*in & state*) अधिकारावर बसवणें, पदारूढ क., पदावर स्थापणें.

INSTEAD *ad.* (*in & stead*) in the place of -च्या बद्दल -जागीं -ऐवजीं; equal to -च्या बरोबर, -च्या मोलाचा, -च्या ऐवजीं -जागीं -ठिकाणीं.

INSTEP (*in & step*) projection on the upper side of the human foot, near its junction with the leg पायाची धूर *f,* पादपृष्ठ *n.*

INSTIGATE *v.* (*instinguere,* to incite) फूस -चढी देणें, बीर भरणें, उठावणी क. [to]—INSTIGATION उठावणी *f,* फूस *f,* शिकवणी *f,* गुरुमंत्र.—INSTIGATOR चढीं -भर देणारा, उठावणी करणारा, गुरु, कानफुंकणारा.

INSTIL *v.* (*-stilla,* a drop) थेंब थेंब घालणें -ओतणें; infuse slowly हळूहळू (मनांत) भरवणें, मन व्यापणें [into, with].

INSTINCT (See INSTIGATE) inward impulse मनोवेग, आंतली प्रेरणा *f*; the natural unreasoning impulse in an animal, by which it is guided in the performance of any action, without thought of improvement in the method पशुबुद्धि *f,* उपजत बुद्धि *f,* आंगचें ज्ञान *n.* -IVE *a.* आंगचे बुद्धीचा, स्वाभाविक. -LY *ad.* आंगाचे ज्ञानानें, स्वभावतः, उपजत बुद्धीनें.

INSTITUTE *v.* (*-stare,* to stand) set up उभारणें; establish स्थापणें, नेमणें; found पाया घालणें; begin आरंभणें, चालू क. (an inquiry)—*n.* स्थापणें *n,* स्थापन *n,* संस्थापना *f*; precept विधि, नियम, सूत्र *n*; a literary and philosophical society विद्या व ज्ञानवर्धक -शोधक मंडळी *f*; *institutes* of religion धर्मशास्त्र *n*; compendium of *institutes* संहिता *f.* -ED *a.* संस्थापित, प्रतिष्ठापित —INSTITUTION स्थापणें *n*; स्थापना *f,* संस्थापना *f*; instruction शिकवणें *n,* शिक्षा *f*; method रीत *f,* पद्धत *f*; custom चाल *f,* संप्रदाय; enactment ठराव, व्यवस्था *f,* नियम; ordinance विधि, सूत्र *n,* आदेष;—of religion धर्मविधि; permanent form of law कायदा, बंधारण *n*; an organized (society सभा *f,* मंडळी *f*; a literary i. विद्यालय *n*: a charitable i. धर्मशाला *f*; a treatise ग्रंथ, निबंध.—INSTITUTOR स्थापक; विधिस्थापक पंथ, मंडळीस्थापक.

INSTRUCT *v.* (*-struere,* to pile up) teach विद्या शिकविणें, पढवणें, शिकवणें; command हुकूम -आज्ञा देणें; inform कळवणें, सांगणें; enjoin शिकवणें,सांगणें [in] -ION शिकवणें*n*, शिक्षा *f*; उपदेश, बोध; आज्ञा *f*, निर्देश; विधि, सूत्र *n* [in, for]. -IVE *a.* बोधाचा, बोधकारक, in comp. पर, बोध उपदेशपर, बोधकथा *f*. -OR शिकविणारा, शिक्षक; religious i. गुरु, आचार्य.

INSTRUMENT (do.) that by which work is performed, or any thing is effected साधन *n*, उपकरण *n*; implement हत्यार *n*, शस्त्र *n*, आऊत *n*; musical instrument वाद्य *n*; *Law*, a deed, contract, writing, &c. कागदपत्र *n*, खत *n*, करारनामा इ०; stringed i. तंतुवाद्य *n*; wind i. वेणु, पोवा इ० सुस्वर वाद्य *n*; i. covered with skin चर्मवाद्य *n*; i. sounded by the mouth मुखवाद्य *n*; one who, or that which, is made a means, or caused to serve a purpose कारण *n*, साधन *n*, निमित्त *n*. -AL *a.* साधक, कारणभूत; वाद्यजनित -सिद्ध; i. case तृतीया विभक्ति *f* [in.]. -ITY साधकपणा, कारकत्व *n*; —of persons गुजारत *f*, मारफत *f*.

INSUBORDINATE *a.* शिरजोर, बेहुकमी.—INSUBORDINATION बेहुकमीपणा, शिरजोरी *f*.

INSUFFERABLE *a.* दुःसह्य, असह्य.

INSUFFICIENT *a.* अपुरता; unfit अयोग्य, नालायक [for].—INSUFFICIENCY अपुरतेपणा, नालायकी *f*, अयोग्यता *f*.

INSULAR *a.* (*insula,* island) बेटाचा, द्वीपाचा; surrounded by water पाण्यानें वेष्टलेला, जलवेष्टित.—INSULATE *v.* अलग -वेगळा ठेवणें; *Arch.* भिंती पासून दूर -वेगळा ठेवणें (a column). —INSULATED *p. a.* अलग, तुटक, विभक्त.

INSULT *v.* (*-salire,* to leap) treat with abuse, insolence, or contempt, by words or actions बेअदबी क.—*n.* बेअदबी *f*, हेटाळणी *f*, अनादर. -ING *a.* अपमानाचा, बेअदबीचा.

INSUPERABLE *a.* (*-super,* above) अलंघनीय, दुस्तर, कठीण, अजेय.

INSUPPORTABLE *a.* तोलून धरायास अशक्य (weight); intolerable असह्य, दुःसह, कठीण (cold).

INSURE *v.* खचीत क.; secure against a possible loss on certain stipulated conditions, or at a given rate or premium विमा उतरणें [against].—*i.* विमा घेणें.—INSURER विमेकरी -दार.

INSURGENT *a.* (*-surgere,* to rise) बंडावलेला.—*n.* a person who rises in revolt or opposition to civil or political authority बंडवाला.—INSURRECTION बंड *n*, दंगा, बेदा, राजद्रोह. -ARY *a.* बंडाचा, दंग्याचा.

INSURMOUNTABLE *a.* See INSUPERABLE.

INSUSCEPTIBLE *a.* अग्राहक, ग्रहणाक्षम.

INTANGIBLE *a.* स्पर्श करायास अशक्य अस्पर्श्य,

INTEGER (*L.*) पूर्ण संख्या *f*, पूर्णांक.—INTEGRAL *a.* संपूर्ण, अखंड, सांग; not fractional बंदा, बांधा, संबंध.—INTEGRITY संपूर्णता *f*, सांगता *f*; moral soundness, honesty प्रमाणिकपणा, सचोटी *f*, हाडाचा चोखपणा.

INTEGUMENT (*-tegere,* to cover) पुट *n*, वेष्टण *n*; a covering that invests the body चर्म *n*, पापुद्रा, पडदा, कोश इ०.

INTELLECT (*-legere,* to gather) the part or faculty of the human soul by which it knows, as distinguished from the power to feel and to will बुद्धि *f*, विचारशक्ति *f*. -UAL बुद्धीचा, मनाचा, मानसिक (powers); formed by the intellect मनोकृत, काल्पनिक (scene); having the power of understanding बुद्धिवान, सुबुद्ध

(being); relating to the understanding बुद्धीचा, in comp. मानस; i. philosophy मानसशास्त्र. *n.*—INTELLIGENCE जाणणें *n*, ज्ञान *n*, समज; the intellect as a gift बुद्धि *f*, वकूब *f*, चतुराई *f*; notice खबर *f*, बातमी *f*; intelligent being ज्ञानव्यक्ति *f*, सुबुद्ध प्राणी.—INTELLIGENT *a.* बुद्धिवान, ज्ञानविशिष्ट; चतुर, सुज्ञ, हुशार, सुजाण.—INTELLIGIBLE *a.* समजायाजोगा, बुद्धिगम्य, [to].

INTEMPERANCE, want of moderation बेसुमार, पराकाष्ठा *f*; any exertion of body or mind, or any indulgence of appetites or passions which is injurious to the person or contrary to morality अमितभोग, अतिभोग; habitual indulgence in drinking spirituous liquors, with or without intoxication अतिपान *n*, दारूचें व्यसन *n*, बेसुमार दारू पिण्याचें व्यसन *n*;—in eating अति भोजन *n*, अत्याहार.—INTEMPERATE *a.* बेहद, अमर्याद; अमितभोगी, अतिभोगी, अनिर्तेंद्रिय; अति प्राशक, मद्यपि, फार दारूपिणारा; अतिभोजी, अचाट खाणारा, अधाशी; passionate रागीट, तापट [in].

INTEND *v.* (*-tendere*, to stretch) मनांत योजणें, बेत क. -ED ज्यासीं किंवा जिसीं लग्न करायाचा बेत केला आहे तो किंवा ती.—INTENSE *a.* ताणलेला, ताठ;—as study or application ताण दिलेला, लगटीचा, व्यासंगाचा; extreme in degree जबर, भारी, कडक (heat, cold); vehement जबर, भारी (excitement); severe फार, तीव्र, कठीण, तीक्ष्ण (pain). -LY *ad.* लगट करून, नेटानें; भारी, अतिशय; attentively लक्षपूर्वक, लक्ष लावून, एकाग्रतेनें. —INTENSIFY *v. t. & i.* बळकट क.; बळावणें, जोरावणें.—INTENT *a.* एकनिष्ठ, एकचित्त, आसक्त, एकाग्र: i. on business [on, upon].—*n.* अभिप्राय, बेत, मतलब; to all *intents* and purposes सर्वस्वी, सर्वथैव, खरोखर; he was miserable to all *intents*, &c. -ION, fixedness of attention एकाग्रता *f*, एकचित्त *n* -लक्ष्य *n*; बेत, इरादा, मतलब: i. to go home; aim हेतु, अर्थ, आशय. -AL *a.* जाणूनबुजून -समजून उमजून -बुद्धिपुरस्सर केलेला. -LY *ad.* समजून उमजून, बुद्धया.

INTER *v.* (*-terra*, the earth) पुरणें, गाडणें.

INTERCALAR, INTERCALARY *a.* (*-calare*, to call) मध्यें घातलेला; अधिक, धोंडा (day, month).—INTERCALATE *v.* पंचांगांत अधिक दिवस -मास धरणें -घालणें.

INTERCEDE *v.* (*-cedere*, to go) मध्यस्थि क.;—in favor of मध्यस्थ होऊन रदबदली क., परार्थ प्रार्थना क., भीड घालणें [for].—INTERCESSION मध्यस्थी *f*; मध्यस्थपणाची रदबदली *f*, परार्थ प्रार्थना *f*.—INTERCESSOR मध्यस्थ; मध्यस्थपणानें रदबदली करणारा, परार्थ प्रार्थक.—INTERCESSORY *a.* मध्यस्थीचे रदबदलीचा; परार्थ प्रार्थक (prayer).

INTERCEPT *v.* (*-capere*, to take) stop on its passage वाटेनें अडविणें -थांबविणें; seize by the way वाटेनें धरणें, रस्त्यांत धरणें; obstruct the progress of -ची गति कुंठित क.; interrupt communication with जाणें येणें -संबंध बंद क. -तोडणें.—INTERCEPTION वाटमारा, गतिरोध, &c.

INTERCHANGE *v.* अदलाबदल क. (places); cause to follow, or to alternate आळीपाळीनें येण्यास लावणें -आणणें: to i. cares with pleasures.—*i.* पाळीपाळीनें -एकामागून एक -एकाआड एक येणें.—*n.* पालट, अदलाबदल *f*; एकाआड एक येणें *n*; mutual exchange of commodities between two persons or countries देणेंघेणें *n*, अदलाबदलीचा व्यापार, विनियम; commerce व्यापार.

INTERCOSTAL *a.* (*-costa*, rib) बरगड्यांमधला, पंजरमध्यस्थ (muscle).

INTERCOURSE (*-currere*, to run) communication दळणवळण *n*, जाणेंयेणें *n*, वहिवाट *f*, संसर्ग, पायरव; commerce व्यापार, देवघेव; association सहवास, संगत *f*.

INTERDICT *v.* (*-dicere*, to say) forbid by order हुकमानें मनाई क.; forbid communion संसर्ग -पंक्तिव्यवहार बंद क.; cut off from the enjoyment of communion with a church ख्रिस्ती मंडळीच्या सहवासा पासून दूर ठेवणें [from]. -ION मनाई *f*, निषेध; prohibiting decree द्वाही *f*, दुराही *f*; curse शाप. -ORY *a.* निषेधाचा, मनाईचा.

INTEREST (*-esse*, to be) concern परवा *f*, चिंता *f*, काळजी *f*; excitement of feeling, whether pleasant or painful काळजी *f*, दरद *n*, आस्था *f*, कळवळा; share हिस्सा, पाती *f*; advantage अर्थ, हित *n*, फायदा; selfish benefit स्वार्थ; premium paid for the use of money व्याज *n*; surplus advantage उपराळा; compound i. चक्रवाढ व्याज *n*; i. at 25 per cent. सवाईचें व्याज *n*; simple i. सरळव्याज *n*; i. at one per cent. एकोत्रा;-at two दुहोत्रा;-at three तिहोत्रा;—at four चहोत्रा.—*v.* आस्था -कळकळ लावणें, उत्पन्न क., दरद उत्पन्न क.;—one's self अगत्य धरणें [in, with]. -ED *p.a.* कळकळीचा, आस्थेकरी, दरदी. -ING *p.a.* मनोरंजक, चित्तवेधक (story).

INTERFERE *v.* (*-ferire*, to strike) come in collision आडवा येणें, नडणें; intermeddle मध्यें पडणें, हात घालणें (दुसऱ्याच्या कामांत -गोष्टींत); strike one foot against its opposite so as to break the skin or injure the flesh नेवर लागणें: a horse *interferes*; to i. officiously or idly लांडा -बुचा कारभार क. [in, with].—INTERFERENCE मध्यस्थपणा, मध्यस्थी *f*; collision चकमक *f*, वासावास *f*.

INTERIM (*L.*) मधलाकाळ.

INTERIOR *a.* (*L.*) आंतला, आंतील; inland मध्यदेशस्थ.

INTERJACENT *a.* (*-jacere*, to lie) मध्यें पडलेला, मध्यवर्ती.

INTERJECT *v.* (*-jacere*, to throw) मध्यें टाकणें -घालणें; मध्यें फेंकणें. -ION मध्यें टाकणें, मध्यप्रेक्षण *n*; *Gram.* उद्गारचिन्ह *n*.

INTERLACE *v.* मध्यें मध्यें घालणें -मिसळणें, विणणें, गुंफणें.

INTERLINE *v.* एकांतऱ्या ओळींनें लिहिणें: to i. Latin and English; ओळींच्या मध्यें शोध घालणें किंवा विशेष लिहिणें.—INTERLINEAL -AR *a.* एकांतऱ्या ओळींनें लिहिलेला; ओळीच्या मध्यें लिहिलेला.

INTERLINK *v.* कडीसकडी अडकवणें.

INTERLOCUTION (*-loqui*, to speak) संभाषण *n*, संवाद; *Law*, शेवटचा निकाल होण्यापूर्वीच मधला ठराव.

INTERLOPE (*L.* & *D.*) run between parties and intercept without right the advantage that one should gain from the other दोघांच्या व्यापारांत सत्तेशिवाय शिरून त्यांचा नफा आपण मिळविणें; traffic without license परवानगी -परवान्या वांचून व्यापार क.

INTERLUDE (*-ludere*, to play) नाटकाच्या अंकाच्या मधला खेळ -तमाशा, विलासिका *f*; गायनाच्या मध्यें वाद्य वाजविणें *n*.

INTERMARRIAGE *v.* बदलाचें लग्न *n*, साटेंलोटें *n* [with].—INTERMARRY *v.* बदलाचें लग्न क.; लग्नव्यवहार क. -असणें [with].

INTERMEDDLE *v.* (*L.* & *D.*) कामावांचून -सत्तेवांचून मध्यें पडणें [with].

INTERMEDIATE *a.* मध्यें पडलेला; मधला, मधचा मध्यवर्ती.

INTERMINABLE *a.* (*-terminus*, end) अपार, अनंत, निस्सिम, निरवधि.

INTERMIT *v.* (*-mittere*, to send) तहकूब क., मध्येंच खाडा पाडणें, खोळंबवणें.—*i.* मध्यें खाडा पडणें -थांबणें -बंद पडणें; go off at

intervals मध्यें मध्यें जाणें -राहणें, कांहीं वेळ जाणें -सुटणें (fever). -TENT *a.* कांहीं काळ पर्यंत राहणारा; येताजाता, अंतऱ्या.—INTERMISSION खाडा, तहकुबी *f;* खंड, तूट *f.*

INTERMIX *v.* मिसळणें, मिश्रित क. [with]. -TURE मिसळ *f,* भेळ *f,* भेळ मिसळ *f;* a mass formed by mixture मिश्रण *n.*

INTERMUNDANE *a.* (*-mundus,* the world) भुवनांमधला, भुवनमध्यस्थित.

INTERMURAL *a.* (*-murus,* wall) भिंतीच्या मधला.

INTERNAL *a.* (*-internus*) आंतला, आंतील, अंतस्थ; pertaining to its own affairs खासगतचा, आंतला, देशचा, घरांतला इ० (trade, war, troubles); intrinsic, मूळचा, जातीचा, आंगचा, हाडाचा, वास्तविक, खरा (rectitude); pertaining to the heart अंतःकरणाचा, मनाचा; with our Savior, i. purity is everything. -LY *ad.* आंत, आंतल्या बाजूस; within the body शरिरांत; mentally मनांत, पोटांत.

INTERPOLATE *v.* (*-polire,* to polish) insert, as a spurious word or passage in a manuscript or book मूळ ग्रंथांत खोटा शब्द अथवा वाक्य घुसडणें -खुपसणें; alter or corrupt by the insertion of foreign matter विजातीय -बाहेरचा विषय -पदार्थ घालून बदलणें -बिघडविणें; [change, as a book or text, by the insertion of matter that is new or foreign to the purpose of the author].—INTERPOLATION खुपसणें *n;* खुपसलेला शब्द -ग्रंथ -वाक्य *n.*

INTERPOSE *v.* (*-ponere,* to place) मध्यें -आड ठेवणें; thrust in आंत खुपसणें; intrude कामा वांचून -सत्ते वांचून शिरवणें; offer, as aid or services, for relief or the adjustment of differences सहायार्थ किंवा तोडजोड करण्यासाठीं मध्यें पडणें -हात घालणें [between.].—*i.* मध्यें असणें -येणें, मध्यस्थी क.—INTERPOSITION मध्यें ठेवणें *n,* व्यवधान *n;* मध्यस्थी *f,* मध्यें हात घालणें *n.*

LIMIT (*limes*) हद्द *f*, मर्यादा, सीमा *f*; prison *limits* तुरंगाच्या जवळ कैद्यास फिरण्याची हद्द *f*.—*v.* हद्द बांधणें -क.; restrain आळा बांधणें, परिमिति क.; confine the signification of -च्या अर्थाची हद्द बांधणें [to]. -ED मर्यादा केलेला, मर्यादित; परिमित, समर्याद, संकुचित, जुजबी; of l. meaning मितार्थ. -ATION मर्यादा करणें *n*; आळा, मर्यादा *f*, बंध.

LIMNER (*luminare*, to light) पुस्तकांचा चितारी.

LIMP* *v.* लंगडणें, लंगडत चालणें.

LIMPID *a.* (*limpidus*) नितळ, निवळ (stream).

LINCHPIN* चाकाची -आसाची खीळ *f*.

LINCTURE (*lingere*, to lick) medicine taken by licking with the tongue चाटण *n*, अवलेह *n*.

LINE (*linea*) a linen thread or string सुताची दोरी *f*, सुतळी *f*, इ०; a thread-like mark of the pen ओळ *f*, रेघ *f*, रेषा *f*; *Math.* that which has length but not breadth रेघ *f*; boundary मर्यादा *f*, रेघ *f*; contour आकृतीच्या परिघाची रेषा *f*, पांढूरेखा *f*; lineament रेखा *f*, रेषा *f*, रूपरेखा *f*; a straight row ओळ *f*, कतार *f*, रांग *f*: a l. of houses, of soldiers; *Print.* a straight row of letters and words ओळ *f*, पंक्ति *f*,

'लैन' *f*; a note चिट्ठी *f*, दोन बोटें चिट्ठी *f*: a l. from a friend; *Poet.* चरण, पाद; course of conduct ओळ *f*, मोड *f*, रहाळ *f*; method of argument क्रम, श्रेणी *f*, पर्याय; deportment of industry, trade, or intellectual activity धंदा, पेशा; succession of progeny वंश, कुल *n*; connected series of public conveyances तांडा; a measuring-rod सूत्र *n*, सूत *n*; that which is measured by a line विभाग, वांटा (Ps. xvi., 6); instruction उपदेश, शिकवणें *n* (Ps. xix., 4); infantry पायदळ *n*; a trench खंदक; the twelfth of an inch इंचाचा बारावा भाग; l. of battle दंड, रांग *f*; right l. सरळ रेघ *f*; [ship of the l., a ship of war large enough to have a place in the line of battle]; meridian l. रेखा *f*, विषुववृत्त *n*;—as drawn through a word फांटा; to draw a l. ओळ फोडणें, रेघ काढणें; l. of fire बंदुकीचा -तोफेचा मारा; l. of life आयुष्याची (हातावरची) रेषा *f*; the l. along the sinciput (of females) made by parting the hair on both sides भांग.—*v.* रेघा ओढणें, रेखांकित क.; cover or put in the inside of अस्तर क.; as with tin, paper, &c. मढवणें; strengthen by adding any thing जोडून बळकटी आणणें: to l. works with soldiers; impregnate, app. to irrational animals गाभण क., लागणें; read or repeat line by line एक एक ओळ वाचणें -ह्मणणें -ह्मणून दाखविणें. -AGE वंश, घराणें *n*; descendants वंशज, वंश. -AL *a.* रेघांचा, अंकित, रेखित (designs); परंपरेनें आलेला, परंपरागत; l. descendant संतान *n*; रेघांवरून मापलेला, रेषांच्या मानाचा. -AMENT रूप-रेषा *f*, अंगलोट;—of the face तोंडवळा, रूप *n*. -AR *a.* ओळीचा; रेखामय; नीट वाटेचा, सरळ.

LINEN*, thread or cloth made of flax तागाचें सूत *n*, किंवा कापड *n*; underclothing आंतलें -अंतर्वस्त्र *n*, वस्त्र *n*.—*a.* तागाचा, सणाचे सुताचा; तागा सारखा; white पांढरा; pale फिका.

LINGER *v.** delay उशीर लावणें; loiter रेंगणें, गमणें; hesitate गुटमळणें; remain long in any state रखडत -भिजत -लांबणीवर पडणें; —in sickness रेंगणें, अंथरूण धरणें, खिरपणें; —a sickness रेंगणें, रखडणें, धुपणें. -ING गमणारा, चेंगट; रखडत चाललेला, चेंगटाईचा; —a disease खितपणीचा, खिरपणीचा.

LINGET *F.* धातूची कांडी *f*, लगडी *f*.

LINGUIST (*lingua*, tongue) अनेक भाषा जाणणारा, बहुभाषज्ञ.—LINGUA-DENTAL *a.* formed or uttered by the joint use of the tongue and teeth जिव्हादंत्य.

LINIMENT (*linire*, to anoint) चोळण्याचें औषध *n*, स्नेहन *n*, अभ्यंगतैल *n*.

LINK *Ger.* a single ring of a chain कडी *f*; any thing connecting लगाबांधा; part of a connected series अन्वय, संबंध, शेव. —*v.* सांगडणें, जोडणें, अडकवणें [together].

LINK (*lychnus*, lamp) मशाल *f*. -BOY मशालजी.

LINSEY-WOOLSEY *a.* कांहीं तागाचा कांहीं सणाचा; mean नीच, अधम.—*n.* कांहीं तागाचें कांहीं सणाचें असें वस्त्र *n*.

LINSTOCK (*lint* and *stock*) तोडा, बत्ती *f*.

LINT* flax ताग; [linen raveled, or scraped into a soft substance, and used for dressing wounds and sores].—LINSEED जवस, अळसी *f*. -OIL जवसाचें तेल *n*.

LINTEL *F.* दारावरची किंवा खिडकी वरची कपाळपट्टी *f*, दारवंठा.

LION (*leo*) सिंह, मृगेंद्र; an object of interest and curiosity चमत्कारिक पदार्थ: to visit the *lions* of a place. -ESS सिंहीण *f*.

LIP* one of the two fleshy parts composing the exterior of the mouth in man and many other animals ओंठ; edge of any thing कड *f*, कांठ; the upper l. ओष्ट्र; the lower l. अधर. -DEVOTION वरकरणी भक्ति *f* -प्रार्थना *f*. -LABOR वरकरणी बोलणें *n*.

LIPOTYHMY (*Gr. leipein*, to fail, *thumos*, soul) झीट *f*, मूर्च्छा *f*.

LIPPITUDE (*lippus*, blear-eyed) डोळ्यांचा चिपडेपणा.

LIQUEFIABLE *a*. (*liquere*, to be fluid) पातळ करण्याजोगा, द्राव्य ;— as a vowel अंतस्थ.— LIQUEFY *v*. रस क., पाघळविणें.—*i*. पातळ होणें. —LIQUID *a*. पातळ, प्रवाही, सद्रव.—*n*. पातळ पदार्थ, रस; *Gram*. अंतस्थवर्ण. -ATE *v*. पातळ क.; वितळून स्वच्छ क.; pay फेडणें, वारणें (debts). -ATION पातळ क. *n*, द्रावणें *n*; फेड *f*, फडशा. -TOR फेडणारा, 'लिक्विडेटर.' -ITY पातळपणा, प्रवाहधर्म.—LIQUOR पातळ पदार्थ, रस; spirituous fluid दारू *f*, मद्य *n*; l. amnii मोट *f*, पाणमोट *f*.

LISP* *v*. *i*. शीळ घालून बोलणें; speak imperfectly बोबडें बोलणें.—*n*. शिळीचें बोलणें *n*, बोबडा बोल.

LIST* border of broad cloth बनातीचा कांठ; strip of cloth पट्टी *f*, चिंधोटी *f*; a limit हद्द *f*; catalogue याद *f*, फेरिस्त *n*; [civil l., the civil officers of government; the revenue for the support of civil officers; civil l., in England, embraces only the expenses of the reigning monarch's household].

LISTS *pl* (*licium*, thread) ground or field inclosed for a race or combat रणांगण *n*, रंगभूमि *f*, अखाडा.

LIST* *v*. *i*. आवडणें, चाहणें; hearken मन देणें -लावणें, ऐकणें [to]. -EN *v*. *i*. लक्ष्य देऊन ऐकणें, ऐकणें; obey मानणें, ऐकणें;—privily कानोसा घेणें [to]. -LESS *a*. उदास, निरिच्छ, निस्पृह. -LESSNESS अनास्था *f*, अनुत्साह.

LITANY (*Gr. litania*) एक प्रार्थनापद्धति आहे.

LITERAL *a*. (*littera*, a letter) मुळचा, मुख्य, वाच्य, शब्दाप्रमाणें, खरा (meaning); following the letter or exact words अक्षरशः, शब्दशः, मूळ शब्दानुसार (translation); consisting of, or expressed by, letters अक्षरांचा, अक्षरी (notation). -LY *ad*. मूळ शब्दाप्रमाणें; मुख्यार्थाप्रमाणें.—LITERARY *a*. विद्येचा, विद्याविषयक; विद्वान लोकांचा, विद्येचा (fame); विद्वान, विद्याव्यसनी (man); consisting in letters विद्यामय, विद्येचा, in comp. विद्या: l. property विद्याधन *n*.—LITERATE *a*. & *n*. विद्वान.—LITERATURE विद्या *f*, अक्षर *n*, पढणें *n*; collective body of literary productions, embracing the entire result of knowledge and fancy preserved in writing ग्रंथ, विद्येचे ग्रंथ *pl*; *belles-lettres* इतिहास, काव्य इ० विषयांचे ग्रंथ *pl*.

LITHARGE (*Gr. -lithos*, stone, *arguros*, silver) lead vitrified मुडदारशिंग *n*.

LITHOGRAPH *v*. (*Gr. graphein*, to write) शिळेवर छापणें. —*n*. शिळाछाप.—LITHOGRAPHY शिळाछापाची विद्या *f*.

LITHOTOMY (*Gr. -temnein*, to cut) मुतखडा काढण्याची विद्या किंवा क्रिया *f*.

LITIGATE *v*. (*lis*, dispute) वाद -खटला क. —LITIGANT वादी, खटलेकरी.—LITIGATION वाद, खटला.—LITIGIOUS *a*. खटलेखोर, वादप्रिय (client); खटल्याचा, वादाचा, वादपात्र (grounds); खटल्या संबंधी, वादाचा (bar).

LITTER (*lectus*, couch, bed) डोली *f*, पाळणा; bed of straw for animals गवताची शेज *f*; scattered rubbish पडझड *f*, घाण *f*, खेर *f*, कचरा; condition of disorder अव्यवस्था *f*, पसारा; the number of pigs or other small brutes born at once वेत *n*, वीण *f*.—*v*.

गवत पसरणें, गवताची शेज क.; पसारा क., ऐलपैल टाकणें; विणें, पसवणें.

LITTLE* *a.* small in size or extent लहान; short in duration थोडा, अल्प, किंचित (time, sleep); small in quantity थोडा, थोडका, कांहीं, अल्प (food); insignificant हलका, क्षुद्र, गैरी; inconsiderable थोडा, जरासा, किंचित (effort, weight, attention); not liberal कृपण, किरमाडी, हलका.—*n.* थोडका भाग, अल्पांश: small space थोडकी जागा, *f*; a little थोडासा, किंचित; by l. and l. थोडा थोडा, तीळतीळ.—*ad.* अमळ, जरासा. -GO [*Eng. Univ.*, a public examination about the middle of the course, which, being less strict, and less important in its consequences, than the final one, has received this appellation].—-NESS लहानपणा, अल्पविस्तार; थोडकेपणा; हलकेपणा, लघुत्व *n*; कृपणता *f*, इ०;—of mind बुद्धिकार्पण्य *n*.

LITURGY (*Gr. leitos*, public, *ergein*, to work) established formula for public worship प्रार्थनापद्धति *f*; ritual for public worship सामाजिक भक्तिमार्ग किंवा प्रार्थनापद्धति *f*.

LIVE* *v. i.* have life जगणें, वांचणें, जिवंत असणें; pass one's time दिवस लोटणें, काल क्रमणें: to l. happily; abide राहणें, असणें, वस्ती क.; remain राहणें, टिकणें: men's evil manners l. in brass; their virtues we write in water; enjoy life नांदणें, सुखी राहणें; subsist उदरनिर्वाह -उपजीविका क.: those who l. by labor; feed खाणें, चरणें, पोट भरणें: horses l. on grass; *Scrip.* be exempt from spiritual death आत्मिक मरणा पासून मुक्त होणें, जीवन पावणें (Lev. xviii., 5); be inwardly quickened, nourished, and actuated by divine influence or faith ईश्वरी अनुग्रहानें -विश्वासानें वांचणें, जगणें (Gal. iii., 11); to l. with एकत्र राहणें; स्त्री पुरुषाच्या नात्यानें एकत्र राहणें, नांदणें. —*t.* आयुष्य खर्चणें, राहणें, दिवस लोटणें: to l. a life of ease.—*a.* जिवंत, सजीव; glowing तेजदार, पाणीदार; ignited पेटलेला; l. coal निखारा; l. stock घोडा, बैल वगैरे शेतकऱ्याचीं जनावरें *n pl*, जीवधन *n*. -LIHOOD उपजीविका *f*, जीवन *n*, निर्वाह, चरितार्थ. -LINESS हुशारी *f*, चपळाई *f*, जिवटपणा: l. of youth; पाणी *n*, तेज *n*, रंग: l. of the eye; — of health तुकतुकी *f*; —of the spirit आनंदवृत्ति *f*, दिलरोशनाई *f*. -LONG *a.* लांबणीचा, चेंगट (day). -LY *a.* जिवंत, सजीव (hope); जिवट, पाणीदार (youth); चपळ, हुशार; आनंदी, उल्लासी; चकचकीत, भडक (colors); दणक्याचा, कडाख्याचा, रंगाचा (entertainments, eloquence); life-like हुबेहूबचा, खऱ्याखुऱ्या सारखा, प्रत्यक्षप्राय. —LIVING *a.* जिवंत, सजीव; issuing continually from the earth जिवंत, वाहता (spring); quickening जिवंतकरणारा, जीवनदायक; l. by learning विद्योपजीवी; [l. rock, rock in its native state]; the l. जिवंत लोक -मनुष्यें *n pl.* —*n.* उपजीवन *n*, उपजीविका *f*; estate जिंदगी *f*, मालमत्ता *f*; living comfortably वागणूक *f*, नांदणूक *f*: there is no l. without trusting; act of living वांचणें *n*, जगणें *n*; benefice of a clergyman वृत्ति *f*, उपाध्याची वृत्ति *f*.

LIVER* काळीज *n*, पित्ताशय.

LIVERY *F.* लिभास, पेहराव; चाकरांचा बाणा -पेहराव.

LIVID *a.* (*lividus*) काळानिळा, हिरवानिळा.

LIZARD (*lacerta*) चोपई *f*, सरड वगैरे जातीचा प्राणी; house-l. पाल *f*.

LO* *int.* पहा, पहा बरें.

LOAD* a burden ओझें *n*; amount or quantity which a person can carry एका मनु-

प्याचें ओझें *n*; contents of a cart or vessel भरगत *n*, भरताड *n*, ओझें *n*; that which burdens, oppresses, or grieves the mind or spirit ओझें *n*, धोंड *f*, भार: a l. of guilt; charge of a fire-arm बार;—of wood, grass, &c. भारा, कबाड *n*; half -l. आंखें *n*.—*v*. ओझें घालणें -लादणें; भार घालणें, अधिक जड क.; बार भरणें. -ED लादलेला; भारग्रस्त, पीडित; भरलेला, बार भरलेला. -ING भरगत *f*, *n*.

LOADSTONE* लोहचुंबक.

LOAF* any thick lump or mass गोळा, ढेप *f*;—of bread रोट, रोटी *f*, 'पांव.' -ER, an idle man आळसी; a vagrant who seeks his living by sponging or expedient तुकडमोड्या, उंडीबकाळ, तैलंगभट, 'लोफर.'

LOAM* चिकणमाती *f*. — LOAMY *a*. चिकणमातीचा.

LOAN* act of lending उसणें देणें *n*, उसणवारी *f*; that which is lent उसणा दिलेला -घेतलेला पदार्थ;—of money on interest कर्ज *n*.

LOATH* *a*. नाखूश, नाराजी.—*v*. -ला कंटाळणें, -चा वीट येणें, विष मानणें. -FUL *a*. अतिद्वेषी; कंटाळवाणा, ओंगळ. -ING कंटाळा, वीट, किळस. -SOME *a*. कंटाळवाणा, ओंगळ, कुत्सित (forms); द्वेष उत्पन्न करणारा (sloth).

LOBBY *Ger*. opening before a room ओटी *f*, ढेलज *f*, ओसरी *f*; a waiting-room सदरे पुढची खोली *f*; [space or room at the head of a staircase]; a confined place for cattle गुरांचा वाडा, गोठा.

LOBE (*Gr. lobos*) कोणत्याही वस्तूचा गोल भाग; —of the ear कानाचा चाप;—of the lungs, liver, &c. फुप्फूस, काळीज इ० चा गड्डा.

LOBSTER* शेवंडी नांवाचा एक मासा.

LOCAL *a*. (*locus*, place) स्थान -देशसंबंधी; limited to a place एकदेशी, एकस्थानिक; l. usage देशाचार; l. affection स्थानिक रोग; l. law देशधर्म. -ITY जागा *f*, स्थान *n*; existence in a place स्थिति *f*, जागा *f*; geographical situation देशसंबंध, देश.—LOCATE *v*. place ठेवणें, बसवणें; designate the place of -ची -ला जागा नेमणें -योजणें (a church) [on]. —LOCATIVE *a*. स्थलदर्शक (adjective); l. case सप्तमी विभक्ति *f*.

LOCH* an arm of the sea खाडी *Scot*. lake सरोवर *n*.

LOCK* instrument to fasten a door, &c. कुलूप *n*, टाळें *n*; part of a gun बंदुकीचा चाप; inclosure to confine the water of a stream बांध, धरण *n*; grapple in wrestling पकड *f*, पेंच; tuft of hair केंसांचा बुचका; —as left on the crown at tonsure शेंडी *f*; a ringlet of hair झुलूप *n*;—for a wheel उटाळें *n*, अडकण *n*; a place which is locked up कोंडी *f*, बंद केलेली जागा *f*.—*v*. कुलूप लावणें -मारणें (a door); कुलपांत ठेवून बंद क.; अटकेंत टाकणें; close fast बंद क.; fasten so as to impede motion खिळणें (a wheel); enclose वेढा घालणें (arms).—*i*. घट्ट बसणें -लावणें: the door *locks* close; unite closely by mutual insertion एकमेकांत गुंतणें -अडकणें: they l. into each other. -ED -JAW दांतखीळ *f*. -ER खण;—in a ship पयाळ. -ET लहान कुलूप *n*; a catch अडकवण *n*, फांसा. -SMITH कुलपें करणारा लोहार, कारंचकर.

LOCOMOTION (*locus*, place, *motio*, motion) एक्या जाग्यांतून दुसऱ्या जाग्यांत जाणें *n*, स्थलांतरगमन *n*; power of changing place स्थानांतर -गमनशक्ति *f*: plants have life, but no l.—LOCOMOTIVE *a*. चलनशक्तिक, जंगम, चर.—*n*. लोखंडी रस्त्यावरच्या गाडीच्या तांड्या पुढची यंत्राची गाडी *f*, आगगाडीचें इंजीन *n*.

LOCUST (*locusta*) टोळ, नाकतोडा.

LOCUTION (*loqui*, to speak) वाणी *f*, उक्ति *f*.

LODGE* *v*. deposit for keeping ठेवणें : to l. arms in the arsenal; throw in फेंकणें, टाकणें, झुगारणें; fix in the heart, mind, or memory मनांत, लक्ष्यांत किंवा आठवणींत ठसवणें-भरवणें; furnish with a temporary habitation बिऱ्हाड देणें; to l. an information फिर्याद क. [at, in].—*i*. बिऱ्हाड क.; बसणें, राहणें, थारावणें.—*n*. a refuge आश्रय, आश्रयस्थान *n*; a small house in a park or a forest बंगला -ली *f*; the house of a gatekeeper on a gentleman's estate देहुडीवरच्या शिपायाची झोपडी *f*; [a secret association, as of the Freemasons, &c. the place in which they assemble]. -ING बिऱ्हाड *n*, मुक्काम.

LOFT माळा, माडी *f*.—LOFTY *a*. उंच; proud गर्विष्ट, मगरुरीचा, चढेल (looks); sublime मोठ, भारदस्तीचा, गंभीर (language); dignified उत्कृष्ट पदयुक्त, थोर (Is. lvii., 15); stately डौलाचा (steps).

LOG *D*. a bulky piece of wood ओंडा, ठोकळा; apparatus for measuring the rate of a ship's motion नौकागतिमापक यंत्र *n*; record of the rate of a ship's velocity गलबताचा रोजनामा. -BOOK गलबताचा रोजनामा. -GER. -HEAD टोणपा, मूर्ख; to be at *loggerheads* मारकुटीवर -हातघाईवर येणें. -WOOD पतंगाचें लांकूड *n*.

LOGARITHM (*Gr. logos*, word, *arithmos*, number) घातप्रमापक संख्या *f*, लागर्तम *n*.

LOGIC (*Gr. logos*, word) the science of pure and formal thought, or of the laws according to which the process of pure thinking should be conducted न्याय -तर्कशास्त्र *n*. -AL *a*. तर्कशास्त्राचा, न्यायशास्त्रांतला; according to the rules of logic न्यायशास्त्रानुसार, युक्तिसिद्ध (argument); skilled in logic तर्कविद्याप्रवीण, तर्कशास्त्रज्ञ (thinker). — LOGICIAN नैय्यायिक, तर्कशास्त्री.

LOGOMACHY (*Gr. -maché*, fight) शब्दाविषयीं विवाद, शब्दवाद; war of words वाग्युद्ध *n*.

LOIN* कमर *f*, कंबर *f*, कटि *f*.

LOITER *v. i. D*. रेंगणें, गमणें [about]. -ER गमणारा, रेंग्या. -INGLY *ad*. गमत गमत, रमत रमत.

LOLL *v.i. Icel*. lie at ease आळसानें पडणें, आंग टाकणें; hang extended from the mouth, as the tongue of an ox or a dog when heated with labor जीभ लळलळ क.; put out the tongue, as an ox, dog, or other animal when heated by labor जीभ लळलळ करीत बाहेर टाकणें -काढणें [about].—*t*. जीभ बाहेर काढणें -टाकणें.

LONE *a*. (abbrev. from *alone*) solitary, unfrequented आडवळणाचा, गैरराबत्याचा; single एकला, एकटा (house); unmarried अविवाहित, सडा, सडी *f*, एकला, एकली *f* (woman). -LINESS भणभणीतपणा, भणभणाट; seclusion एकांतवास; love of retirement एकांतवासाची आवड *f*. -LY *a*. आडवळणाचा, एकीकडचा (situation); एकटा, सडा; forsaken सोडलेला, टाकलेला (traveler). -SOME *a*. एकटा; भणभणीत, उजाड (road).

LONG* *a*. (*longus*) extended लांब, दीर्घ (line); extended in time लांब, पुष्कळ, दीर्घकालिक (sickness, debate); distant दूरचा, लांबचा; slow in coming उशीरलाव्या, उशिरा येणारा, विलंबकारी (death); tedious चेंगट, लांबणीचा (tale); extended to any specified measure मापाचा, परिमित, लांब: a yard l.; as a vowel दीर्घ, गुरु; in the l. run शेवटीं, अखेरीस; [l. clothes, the clothes worn by an infant]; l. home

कबर *f*, प्रेताचा खाडा; मरण *n*.—*ad*. दूरवर, लांबवर; बहुतकाळ, फार वेळापासून; l. after फार वेळानें; l. before बहुत वेळापूर्वी: as l. जों, जोंपर्यंत; how l. कोठपर्यंत; l. ago मागेंच, बहुत काळ झाला; through the whole extent or duration भर, पर्यंत, पावेतों: all night l. रात्रभर.—*v. i*. अति इच्छा धरणें, धादावणें, आशावणें; as a woman in pregnancy डोहळे लागणें-होणें; have an eager craving धादावणें, खाखावणें [for]. -ING आशा *f*, भूक *f*; डोहळे *pl*. -LIVED *a*. चिरंजीवी, दीर्घायु. -SHANKED *a*. लांबटांग्या, ऊर्ध्वजानु. -SOME *a*. लांबचलांब, कंटाळवाणा. -SUFFERING *a*. सोशीक, सहनशील (Ex. xxxiv., 6). —*n*. सोशिकपणा, सहनशीलता *f* (Rom. ii., 4). -TONGUED *a*. लांबजिभ्या, बडबड्या. -WINDED *a*. दीर्घ श्वासाचा -प्राणायामाचा; चेंगटाईचा, लांबलचक (narration).—LONGEVITY दीर्घायुष्य *n*.—LONGEVOUS *a*. दीर्घायु. —LONGMETRY लांबी मोजण्याची विद्या *f*, दूरत्वमापनविद्या *f*. —LONGITUDE लांबी *f*; distance of a place east or west, from a meridian रेखांश.—LONGITUDINAL *a*. लांबीचा; उभा, लांब.

LOOK* *v*. direct the eye toward an object so as to see it पाहाणें, दृष्टि -नजर लावणें, [to, at, on, after, for, toward];—direct the attention to पाहणें, लक्ष्य लावणें; consider पाहणें, विचार क.; examine तपासणें, पाहणें; penetrate समजणें, बोध होणें; seem दिसणें, नजरेस येणें; about हुशारी ठेवणें, सावध राहणें; into चौकशी -विचार क.; over तपासणें; after लक्ष्यदेणें; संभाळणें; अपेक्षणें, वाट पाहणें; शोधणें; down on, upon अपमान -धिःकार क.; for वाट पाहणें; शोधणें; into तपासणें; बारीक रीतीनें शोधणें; on मानणें, मोजणें; पाहणें, समजणें; तमाशा -मौज पाहणें; out हुशारी ठेवणें, सावध राहणें; to, unto संभाळणें, जपणें; मिळण्याच्या आशेनें -अपेक्षा धरून पाहणें, आशा धरणें (Is. xlv., 22); through पार पाहणें; पुरता समजणें, मर्म जाणणें. —*t*. दाब -धाक बसविणें: to l. down opposition; दृष्टीनें दाखविणें: soft eyes *looked* love to eyes that spake again;—in the face धिट्टाईनें -निर्भीडपणानें भेटणें; out शोधून मिळविणें, शोधून काढणें; निवडणें; up a thing शोधून काढणें, धुंडाळून काढणें.—*n*. air of the face चेहरा, मुद्रा *f*; aspect आकार, डौल, घाट; पाहणें *n*, दृष्टि *f*. -ER पाहणारा; on पाहणारा, तमासगीर. -ING शोधणें *n*, शोध; for मार्गप्रतीक्षा *f*, वाट *f*, (Heb. x., 27). -ING-GLASS आरसा, आरशी *f*, दर्पण *n*.

LOOM* माग; the indistinct appearance of any thing दूरचा चुटपुटा देखावा, ईषद्दर्शन *n*. —*v. i*. दुरून अंधक -अस्पष्ट दिसणें; rise and be eminent उंच पदावर चढून श्रेष्ठ -प्रख्यात होणें.

LOOP *Ir*. फांसा, मुदन *n*. -HOLE, hole in a wall for firing through जंगी *f*; shift खिडकी *f*, सवड *f*, सोडवण *f*, फट *f*.

LOOSE* *v*. unbind सोडणें-मोकळा क.; release from any thing obligatory सुटका क.-देणें, मुक्त क.; absolve सुटका -माफी देणें (Matth. xvi., 19); relax ढिला क.; unlock उघडणें, फोडणें (Rev. v. 2).—*i*. हकारणें, निघणें (Acts xiii., 13).—*a*. मोकळा, सुटा (sheet of a book); मोकळा, सुटा, मुक्त: l. of or from a vow; ढिला, सैल, पोकळ (a garment); not crowded पातळ, तुटक: chariots ranked in l. array; not costive पोटाचा अदळ; not dense पातळ, विरळ (texture); not precise धरसोडीचा, पळपळीत (style, way of reasoning); not controlled by moral restraints निर्बंध, मोकळा, मोकार; dissolute बेढंग, दुराचारी, सोदा; to break l. चौपायीं उडणें, दुलाच्या झाडणें; to let l. मोकळा क. -LY

ad. सुटा, मोकार; without order विसकळीत, अव्यवस्थित; बदख्यालीनें, दुर्व्यसनानें. -NESS ढिलेपणा; पातळपणा; फुसफुसीतपणा; पळपळीतपणा; सोदेगिरी *f*;—of the bowels हगवण *f*, ढाळ; to have a l. पोट जाणें -ढाळणें.

LOP *v. Ger.* cut off, as the top of any thing (शेंडा) तोडणें -छाटणें; cut partly off and bend down खडसणें, कलम क.; let fall पडूं देणें (a horse's ears) [off]. -PING छाटणी *f*; that which is cut off छाट *f*, छाटछूट *f*.

LOQUACIOUS *a.* (*loqui*, to speak) बोलका, वाचाळ, बहुभाष.—LOQUACITY बोलकेपणा, चावटपणा.

LORD* master प्रभु, धनी, खावंद; my l. खुदावंद *H*; nobleman of any rank above that of a baronet उमराव, अमीर; [by courtesy, the son of a duke or marquis, or the eldest son of an earl; and also a bishop, if a member of Parliament; a title bestowed on the persons above named; and also, for honor, on certain official characters, attendants, or representatives of majesty: L. advocate, L. chancellor, L. chief justice, &c.]; husband पति, स्वामि, नवरा; the Supreme Being परमेश्वर, ईश्वर, प्रभु; house of *Lords* ग्रेटब्रिटनच्या पार्लमेंत सभेचा एक भाग आहे; l. advocate सरकार तर्फेचा कोर्तातील मुख्य वकील; *Lords* spiritual ब्रिटिश पार्लमेंत सभेंत बसणारे आर्चबिशप व बिशप *pl*; *Lords* temporal ब्रि० पार्लमेंत सभेंतलें उमराव *pl*; Our *Lord* आमचा प्रभु, येशू ख्रीस्त, तारणारा.—*v. i.* सत्ता -धनीपणा क. -मिरवणें. -LINESS सरदारी *f*, अमिरी *f*; haughtiness मगरुरी, आढ्यता *f*. -LY *a.* सरदारास योग्य, सरदारी, अमिरी (estate); मगरूर, दिमाखाचा. -SHIP प्रभुत्व *n*, अधिपत्य *n*, धनीपणा; अमिरी *f*; domain जहागिरी *f*, जमीनदारी *f*. -'s SUPPER, the sacramental supper instituted by Christ प्रभुभोजन *n*.

LORE* erudition विद्या *f*, ज्ञान *n*; advice बुद्धि *f*, उपदेश.

LORY ? नुरी *f*.

LOSE *v.* be rid of unintentionally गमावणें, हरवणें (a book); forfeit हरणें, हारजाणें (a battle); part with अंतरणें, मुकणें, गमावणें, जाणें, पडणें (an arm by a shot, men in battle, one's life); waste दवडणें, घालवणें (a day, a fortune); miss चुकणें (the way); bewilder घाबरविणें, भांबावणें: *lost* in the maze of words; ruin नाश क., बुडविणें गमावणें (a ship by a storm); cease to view दिसेनासा होणें, गमावणें: he *lost* his companion in the crowd; fail to obtain न मिळणें, गमावणें (Matth. x., 42); to l. one's self. दिशाभूल होणें; to l. heart धैर्य खचणें. —*i.* हरणें, हारजाणें; तोटा -नुकसान होणें -येणें. —LOSING *a.* तोटयाचा.—LOSS हार *f*; तोटा, नुकसान *n*: the l. of liquor by leakage: नाश, हानि *f*: the l. of a child; in trade घस *f*.—LOST *a.* हरवलेला (book); हरलेला (battle); अंतरलेला, गेलेला, गत (honor); दवडलेला, पोकळीस गेलेला (day benefit); बहकलेला, चुकार: a child l. -in the woods; l. in thought ध्याननिष्ठ, विचारांत गुंग; l. to shame लज्जाहीन, कोडगा, निर्लज्ज; one who has l. his kingdom राजभ्रष्ट;—in astonishment चक्रभुल, थक्क, दंग; not visible अदृश्य, दिसेनासा, गडप, गर्क: an isle l. in a fog, a person l. in a crowd.

LOT* that which happens without human design or forethought दैव *n*, नसीब *n*; contrivance to determine a question by chance दैवाची परीक्षा पाहण्याचा फांसा -चिठ्ठी *f*, वगैरे; the part which falls to any one by chance दैवाचा वांटा, भोग, भोक्तृत्व *n*; a distinct parcel प्रत *f*, गठ्ठा, पुठ्ठा: a l. of goods;—of ground ठिकें *n*; a prize in a

lottery सोडतींतलें बक्षीस *n*; to cast *lots* चिठ्या टाकणें -काढणें; *lots* रगड *f*, डोंगर, पुष्कळ: *lots* of people [*colloq.*].—*v.* वांटणें, वांटून देणें; प्रत लावणें, वेगळें क. [out]. -TERY सोडत *f*.

LOTION (*lavare*, to wash) औषधी पाणी *f*, धुवण *n*, घडी *f*.

LOTUS (*L.*) the plant कमळीण *f*;—the flower कमळ *n*.

LOUD* *a.* high-sounding उंच स्वराचा, मोठ्या नादाचा (thunder); clamorous गलबल्याचा, गोंगाटाचा; emphatical जोराचा, नेटाचा: a l. call to avoid danger.—*ad.* मोठ्यानें, उंच स्वरानें; गलबल्यानें, गोंगाट करून; जोरानें, नेटानें.

LOUNGE *F.* रिकामचावडी *f*, फड.—*v. i.* रिकामटवाळी -चेष्टा करीत बसणें -फिरणें [about].

LOUSE*—found in the human hair ऊ *f*;—on cloth चिरू *f*;—on cattle, dogs, &c. गोचीड *f*.—LOUSY *a.* बुचबुचलेला, खुतखुतलेला; mean अधम, पाजी, हटाऊ.

LOVAGE *F.* Lingusticum Ajwaen अजमोदा.

LOVE* *v.* (*libere*; *Skr. lubh*, to desire) regard with affection प्रेम -प्रीति -आवड क. -ठेवणें; have goodwill toward -शीं परोपकारबुद्धीनें वागणें (Matth. xxii., 37); delight in चाहणें, गोडी वाटणें.—*n.* प्रीति *f*, स्नेह, लोभ; परोपकारबुद्धि *f*; courtship लग्नासाठीं स्त्रीचे आर्जव *pl* -ची आराधना *f*; fondness आवड *f*, भक्ति *f*, शौक: l. of home; l. of life जीविताशा *f*; object of affection प्रीतिपात्र; Cupid कामदेव; passion between the sexes काम, स्त्रीपुरुषप्रेम *n*, शृंगार; illicit l. दोस्ती *f*; to make l. लग्नासाठीं स्त्रीचे आर्जव क.; l.-knot इष्कपेच; play for l. पण लावल्यावांचून (सोंगट्या वगैरे) खेळणें. -APPLE वेलवांगी. -LINESS सौंदर्य *n*, लावण्य *n*; मनोहरता *f*, प्रियंकरत्व *n*. -LY *a.* सुंदर, रमणीय; amiable प्रियकर. -LETTER शृंगारपत्र *n*, प्रीतिपत्र *n*. -SICK *a.* कामरोगी, विरहरोगी. -SHAFT कामबाण, मदनशर. -SONG रासगीत *n*.—LOVER प्रीति करणारा; a friend मित्र, सखा; one who is in love with a person of the opposite sex—*mas.* कांत, प्राणसखा, यार, *fem.* कांता, प्राणसखी, वल्लभा.—LOVING *a.* ममताळू, प्रेमवान, स्नेही. -KINDNESS कृपा *f*, वात्सल्य *n*, अनुग्रह (Ps. lxxxix., 33). -LY *a.* प्रीतीनें, प्रेमभावानें, आवडीनें, प्रेमानें.

LOW *a. D.* not high नीच, सखल (ground); not rising to the usual height ठेंगणा, लहान (stature); near the horizon धारेजवळ, क्षितिजाजवळ: the sun is l. at six; deep सखल, खोलगट (valley); cheap स्वस्त, हलक्या -उतरत्या दराचा (price, wages); grave मंद, गंभीर (tone, voice); near the equator मध्यरेषे जवळचा (latitude); modern अलीकडला, नवा (empire); dejected उदास, खिन्न, दिलगीर (spirits); humble in rank गरीब, हलका, हलक्या स्थितीचा -पदवीचा; abject नीच, पाजी, अधम, क्षुल्लक (mind, trick); not sublime हलका, अप्रौढ (language); submissive नम्र, दीन (reverence); weak मंद, अशक्त (pulse): made l. by sickness; moderate माफक, परिमित, बारीक, स्वल्प (heat, fever); impoverished भिकेस लागलेला, ओढगस्तीस आलेला; reasonable बेताचा, माफक, बराबर (estimate); not rich हलका, साधा, (diet); l. tide ओहटी *f*; l.-water mark ओहटीच्या वेळीं जेथें पाणी हटून जातें ती जागा *f*.—*ad.* खालीं; हलक्या दरानें, स्वस्त; he sold his wheat very l.; नीच अवस्थेंत; गिरीपदारींत; आपल्या काळांत -काळाजवळ; हळू, हलक्यानें: to speak l.; गरिबींत. -ER *v.* उतरणें, खालीं आणणें -क. (a flag); मानभंग क. -उतरणें, नीच क.; किंमत -कमी क., भाव उत-

रवणें -कमी क. (price, rate.)—*i.* उतरणें, मंदावणें. -ERMOST सर्वांहून खालचा. -LY *a.* नम्र, लीन, निरभिमानी (Matth. xi., 29); साधा, अमौढ; नीच, हलका, गरीब. -LINESS नम्रता *f*, लीनता *f*; अमौढि *f*; नीच -हलकेपणा. -LAND हेटप्रांत, तळघाट.

LOWER *v. i. Ger.* descend, as the clouds and appear dark डवरणें, भरून येणें, अंधारी -काहूर येणें; look sullen दुर्मुखणें, फुगणें.

LOW* *v. i.* हंबरणें. -ING हंबरडा.

LOYAL *a.* (*lex,* law) devoted to the maintenance of the law धर्म -न्यायनिष्ठ; faithful to the sovereign राजनिष्ठ, स्वामीभक्त; as a wife पतिव्रता *f*, साध्वी *f*; as a husband स्वदाररत. -IST राजाचा निमकहलाल, स्वराजनिष्ठ. -ITY राजनिष्ठा *f*; पातिव्रत्य *n*; एकपत्नीव्रत *n*.

LOZENGE *F.* शर्करायुक्त औषधाची वडी *f* -चें पदक *n*.

LUBBER, LUBBARD *W.* ठोंब्या, ढेंशा, लठ्ठाश्रम. -LY रटाला, रटेल, ढोण्या.—*ad.* अडाणी -अडमूठपणा.

LUBRICATE *v.* (*lubricus*) मऊ -गुळगुळीत क.

LUCERNE *F.* विलायती गवत *n*.

LUCENT *a.* (*lux,* light) तेजस्वी, चकचकीत. —LUCID *a.* लकलकीत, नितळ, लक्क (marbles); clear स्वच्छ, निर्मळ; distinct सुबोध, स्पष्ट: a l. abstract of a debate; rational शुद्धीचा, हुशारीचा; [l. interval, an interval of reason enjoyed by an insane person between two fits of insanity]. —LUCIFER (*lux,* light, *ferre,* to bring) the planet Venus शुक्र; Satan सैतान; a match आगीचें कांडें *n*.

LUCK *D.* chance दैव *n*, नसीब *n*; good fortune सुदैव *n*, सौभाग्य *n*; to try one's l. फांसा टाकून पाहणें; to be in l. दैव उघडणें, उखळ पिवळें होणें. -LESS *a.* हतभाग्य, कपाळकरंटा, फुटक्या कपाळाचा.—LUCKY *a.* दैवाचा, भाग्याचा; auspicious शुभ, बरकतीचा (time); l. hour सुवेळ *f*, सुघडी *f*.

LUCRE (*lucrum*) मिळकत *f*, प्राप्ति *f*, नफा.—LUCRATIVE *a.* मिळकतीचा, नफ्याचा, सरिफेवार.

LUCUBRATION (*lux,* light) study by candlelight दिव्याजवळ बसून केलेला अभ्यास; that which is composed by night रात्रीं बसून केलेला ग्रंथ इ०.—LUCUBRATORY *a.* रात्रीं बसून -फार श्रम घेऊन केलेला.

LUDICROUS *a.* (*ludus,* play) हसें येण्याजोगा, हास्यप्रद -कारक -जनक; थट्टेचा, कौतुकाचा.

LUES VENEREA (*L.*) गर्मी *f*, वीसनखीची बाधा *f*.

LUG* *v.* drag खेंचणें, ओढणें, फरफरावणें; to l. by the ears कान धरून नेणें; convey with labour कष्टानें नेणें-वाहणें. -GAGE सामान *n*, बाडबिछाना.

LUKEWARM* *a.* moderately warm कोमट, सोमाळा (water); indifferent उदास, अनास्थ.

LULL *v. Ger.* शांत क., अंगाई क., निजवणें.—*i.* शांत होणें, पडणें, बसणें (wind, storm); शांति *f*, वाऱ्याची बंदी *f*. -ABY मुलांस निजवायाचें गाणें *n*, पाळणा, जोजो.

LUMBAGO (*lumbus,* loin) *Med.* rheumatic pain in the loins and small of the back उसण *f*, टिचरें *n*, कटिवात; to get l. कंबर धरणें-भरणें.—LUMBAR *a.* कमरेचा, कटि; l. region कटिप्रदेश.

LUMBER* गाबाळ *n*, सटरफटर *n*, रिकामी अडचण *f*.—*v.* अडगळीनें भरणें (a room); heap together in disorder घोळ -गळ्हाटा करून ठेवणें, ढीग घालून ठेवणें.—*i.* rumble गडगडणें, धडधडणें; move heavily कष्टानें चालणें. -ROOM जकीरखाना, खेरखाना.

LUMINARY (*lumen,* light) प्रकाशक पदार्थ, तेजःपुंज, प्रभाकर; one that illustrates any

subject, or enlightens mankind तेजयुंज, तेजोराशि.—LUMINOUS *a.* तेजश्वी, तेजोमय; bright चकचकीत, उजळ (color); clear स्वच्छ, निर्मळ (aspect).

LUMP *Ger.* a small mass of matter डिखळ *f*, खडा: a l. of sugar; an irregular cake ढेप *f*, लबका, गोळा;—of meat बोटी *f*, रवा; in the lump एकठोक, उधड, सरसगट.—*v.* एकगोळा -एकरास क.;—sums, items एकरकम लिहिणें -मांडणें [together, up]. -ISH *a.* जड, स्थुलबुद्धि.

LUNACY (*luna*, the moon) kind of insanity which is broken by intervals of reason, formerly supposed to be influenced by the changes of the moon वेड *n*, उन्माद. —LUNATIC *a.* वेडा, पिसा.—LUNAR *a.* चंद्राचा, चंद्रासंबंधी, चांद्र; resembling the moon चंद्रासारखा -समान; measured by the revolution of the moon चांद्रमानाचा: l. day तिथि *f*; l. month चांद्रमास; l. measurement चांद्रमान *n*.

LUNCH *Eng.* a slight repast between breakfast and dinner फळार, उपहार. -EON, a portion of food taken at any time except at a regular meal फळार, उपहार.

LUNG* फुपूस *n*, फोपीस *n*.

LUPINE *a.* (*lupus*, wolf) लांडग्या सारखा; ravenous बुभुक्षित, खादाड.

LURCH *W.* गलबताचें कलंडणें *n*; to fetch a l. गोताखाणें; to leave in the l. तोंडघसी पाडणें [over].—*v. i.* फसवणें, झोका -टोला देणें; lie in ambush दबाधरून राहणें.

LURE *F.* लालूच *f*, आमिष *n*.—*v.* लालूच दाखविणें, मोहणें, गूळखोबरें देणें.

LURK *v. i. W.* hid दडणें, लिकणें; lie in wait दडी -दबाधरून -मारून राहणें [about]. -ING-PLACE दडण *f*, *n*, लिकण *f*.

LUSCIOUS *a. O. E.* गोड, मिष्ट; sweet or rich so as to cloy तोंडास मिठी बसण्यासारखा गोड, अतिमिष्ट; fulsome किळसवाणा, ओंगळ.

LUST* longing desire सोस *f*, हाव *f*; carnal appetite विषयवासना *f*, काम, मैथुनाची इच्छा *f*.—*v.* लुब्धणें, जीव टांगणें [after]; काम उत्पन्न होणें [after]; have inordinate desire अति लोभ धरणें (1 Cor. x., 6) [after, for]. -FUL *a.* कामबुद्धीचा, स्त्रीलंपट, विषयलुब्ध; विषयाचा, कामुक, विषय उत्पन्न करणारा. —LUSTY *a.* robust धाटामोठा, बळकट, घटमूट; healthful धट्टाकट्टा, ताजातवाना.—LUSTILY *ad.* बळानें, बळ खर्चून, जीवतोडून.

LUSTRATE *v.* (*lustrare*, to purify) शुद्ध क.—LUSTRATION शुद्धिकरण *n*.—LUSTRAL *a.* शुद्धीचा, शुद्धिकारक.—LUSTRE, brightness कांति *f*, तेज *n*;—of a gem पाणी *n*, तेज *n*, ढाळ;—of a metal ओप *f*; renown कीर्त्ति *f*, प्रतिष्ठा *f*, नांव *n*.— LUSTROUS *a.* तेजश्वी, चकचकीत.—LUSTRUM (*L.*) पांच वर्षे *n pl*, वर्षपंचक *n*.

LUTE *F.* विणा, तंबुरा, तंबुरी *f*, इ०—LUTANIST विणा वाजविणारा, विणेकरी.

LUXATE *v.* (*luxare*, to loosen) सांधा उखळणें.—LUXATION संधिभंग.

LUXURIANT *a.* (*luxus*, excess) exuberant in growth उफाड्याचे वाढीचा; exuberant in plenty रेळचेळीचा, भरपुरीचा. -LY *ad.* उफाड्यानें, माजानें.—LUXURIANCE माज, मात, ऊत; रेळचेळ *f*, चळचळाट.—LUXURIATE *v.* माजणें, मातणें, फोफावणें; indulge to excess अमित भोग क.: to l. in description [in]. —LUXURY, voluptuousness in the gratification of appetite ख्यालखुशाली *f*, ऐषआराम, चैन *f*, विलास; delicious food or drink सुग्रास, गोडवास, मिष्ट पदार्थ; any thing delightful to the senses ऐषआरामाचा -चैनीचा पदार्थ, चीज *f*.—LUXURIOUS *a.*

चैनी, विलासी (life); ऐषआरामाचा, विलासाचा (wealth); furnished with luxuries घमंडीचा, मिष्ट पदार्थांचा -नीं भरलेला (table). -NESS सुखभोग, विषयभोग.

LYING, See under LIE.

LYMPH (*lympha*) लस *f*. -ATIC *a*. लसीचा.—*n*. शोषवाहिनी *f*.

LYNX (*L*.) कोळसुंदा, कोळीखा.

LYRE (*lyra*) विणा.—LYRIC *a*. विण्यावर गाण्याचा (song).—LYRIST विणा वाजविणारा.

M

MACE *F*. a heavy club सोटा, गदा *f*; a staff borne by, or carried before, a magistrate as an ensign of his authority छडी *f*, काठी *f*, चोप, वेत्र. -BEARER चोपदार, भालदार.

MACE (*masis*) जायपत्री *f*.

MACERATE *v*. (*macer*, lean) रोड क.; steep almost to solution भिजूं घालणें, भिजवणें, विरघळून जाई इतका भिजवणें.

MACHINATE *v*. (*machina*, trick) योजणें, रचणें. —MACHINATION योजना *f*, बेत; a hostile scheme कुभांड *n*, लचांड *n*, तरकट *n*.—MACHINATOR योजक, रचक; कुभांडखोर, तरकटी.—MACHINE यंत्र *n*.—MACHINERY कळसूत्र *n*, यंत्रसाहित्य *n*; machines in general यंत्रें *n pl*.—MACHINIST यंत्रकरणारा; one versed in the principles of machines यंत्रविद्यानिपुण.

MACROCOSM (*Gr. macros*, long, *kosmos*, the world) विश्व *n*, त्रिभुवन *n*.

MACULA (*L*.) कलंक, ठिपका, डाग.—MACULATE *v*. डाग -कलंक लावणें.

MAD* *a*. disordered in intellect वेडा, पिसा; excited with violent desire वेडा, पिसा; enraged खवळलेला, तप्तव्यम, कावराबावरा, वेडा; proceeding from, or indicating, madness वेडेपणाचा, वेडेचाराचा, वेडा. -DEN *v*. वेडा क., वेड भरवणें.—*v. i*. वेडा होणें, वेड भरणें, पिसाळणें. -NESS वेडेपण *n*, वेड *n*; कावरेबावरेपणा. -CAP साहसी, आतताई, वेडापीर. -HOUSE वेड्यांचा बंदिखाना, किंवा इस्पिताळ *n*. -MAN वेडा मनुष्य, वेडा, खुळा.

MADAM *F*. बाईसाहेब, 'मडम' *f*.

MADDER* मंजिष्ठ *n*.

MAGAZINE *Ar*. a storehouse कोठार *n*, भांडार *n*, कोठी *f*;—of arms, ammunition शस्त्रागार *n*, शिलेखाना;—of powder दारुखाना; a periodical pamphlet नियमित काळीं निघणारें पुस्तक *n*.

MAGGOT* a small grub किडा, अळी *f*.

MAGI *pl*. (*L*.) the caste of priests among the Persians पारशी लोकांचे उपाध्यांची जात *f*; holy men or sages of the East पूर्व देशचे साधु *pl*.—MAGIC, the science or practice of working spirits or educing the occult powers of nature, and performing things wonderful by their aid जादू *f*, कुविद्या *f*, पिशाचविद्या *f*, चेटक *n*.—MAGICAL *a*. जादूचा, कुविद्येचा; done by magic जादूनें -चा केलेला, शाबरी; imposing or startling in performance चमत्कारिक कृतीचा. —MAGICIAN जादुवाला, जादुगीर, चेटकी, मंत्री.

MAGISTERIAL *a*. (*magister*, master) धन्याचा; authoritative अधिकाराचा, धनीपणाचा, प्रभुत्वाचा, प्रभुसम्मित; proud अभिमानी, मगरूर (looks).—MAGISTRATE धर्माधिकारी, फौजदार, न्यायाधीश, 'माजिस्त्रेट'; chief m. राजा, मुख्य अधिकारी.—MAGISTRACY माजिस्त्रेटाचा हुद्दा, न्यायाधिकार; the body of magistrates धर्माधिकारी मंडळी *f*.

MAGNANIMITY (*magnus*, great, *animus*, mind) मनाचा मोठेपणा; elevation or dig-

nity of soul, which encounters danger and trouble with tranquillity and firmness, which raises the possessor above revenge, which makes him disdain injustice and meanness, and prompts him to act and sacrifice for noble objects महात्मता *f*, थोरवी *f*, औदार्य *n*, शौर्य *n*. —MAGNANIMOUS *a*. मोठ्या मनाचा, महामनस्क; धीर, उदार, गंभीर; dictated by magnanimity औदार्याचा, प्रगल्भ, उदार मनाचा (policy).

MAGNATE (*magnus*, great) उंच पदवीचा मनुष्य, सरदार, उमराव.

MAGNET (*Gr. magnes*) लोहचुंबक. -IC, -AL *a*. लोहचुंबक संबंधी, लोहचुंबकाचा; attractive आकर्षक. -ISM लोहचुंबकाचा धर्म; science which treats of the properties of the magnet लोहचुंबक गुणविवेचनविद्या *f*; आकर्षणशक्ति *f*.

MAGNIFY *v*. (*magnus*, great, *facere*, to make) मोठा क., मोठा करून दाखविणें; extol वर्णन क., स्तुति क. (Ps. xxxiv., 3); —one's self मोठेपणा मिरवणें.—*i*. लहान पदार्थ मोठा करून दाखविण्याची शक्ति असणें: some lenses m. but little.—MAGNIFICENCE शोभा *f*, थाट, भव्यपणा; liberality उदारपणा, औदार्य *n*.—MAGNIFICENT शोभिवंत, छानदार, भव्य.—MAGNIFIER मोठा करून दाखविणारा; an optical instrument, as a convex lens, which increases the apparent magnitude of bodies दुर्बीन *f*, भिंग *n*.

MAGNILOQUENCE (*-loqui*, to speak) ढबदारीचें बोलणें *n*.

MAGNITUDE (*magnus*, great) size आकारमान *n*, परिमाण *n*, लांबीरुंदी *f*; importance वजन *n*, महत्व *n*; greatness मोठेपणा, महत्व *n*.

MAID* virgin कन्या *f*, कुमारी *f*; female servant चाकरीण *f*, दासी *f*, परिचारिका *f*; unmarried woman अविवाहित स्त्री *f*. -EN कन्या *f*, दासी *f*.—*a*. कुमारीचा, कौमार; consisting of young women तरुण स्त्रियांचा (throng); fresh नवा, कोरा (sword). -HEAD, -HOOD कुवारपण *n*, कौमार्य *n*. -SERVANT कुळंबीण *f*, दासी *f*.

MAIL *F*. चिलखत *n*, कवच *n*.

MAIL *F*. टपाल *n*, डांक *f*.

MAIM ? अधुपणा, व्यंग *n*.—*v*. अधु -पंगु क. [with]. -ED लंगडा, लुला, हीनांग, व्यंग.

MAIN* *a*. huge मोठा, थोर, प्रचंड (abyss); chief मुख्य, प्रधान, मोठा (interest); mere नुस्ता, केवळ, शुद्ध (untruth); m. body सैन्याचा मधला किंवा मुख्य भाग.—*n*. force बळ *n*, शक्ति *f*; मोठा -मुख्य भाग; the great sea महासमुद्र -सागर; the continent, as distinguished from an island महाद्वीप *n*; a principal duct मोठा नळ; with might and m. मोठ्या जोरानें, जीवतोडून; in the m. एकंदरीनें, एकंदर, ठोक. -LY *ad*. बहुतकरून, मुख्यत्वेंकरून. -LAND मुख्य भूमि *f*, भूखंड. *n*. -MAST (तारवाची) मधली डोलकाठी *f*. -SHEET मोठें शीड *n*, अवजार *n*.

MAINTAIN *v*. (*manns*, hand, *tenere*, to hold) राखणें, ठेवणें, धरणें: to m. a certain degree of heat in the furnace; keep possession of स्वाधीन ठेवणें, हातीं ठेवणें, संभाळणें, राखणें; continue चालू -सुरू ठेवणें: m. talk with him; bear the expense of -चा खर्च चालवणें -अंगावर घेणें; support पाळणें, पोसणें; support by assertion or argument मंडन -प्रतिपादन क., स्थापणें;—one's self उदरनिर्वाह चालवणें. -ABLE *a*. संभाळायाजोगा, रक्षणीय; स्थापनीय, प्रतिपाद्य.—MAINTENANCE राखणें *n*, ठेवणें *n*, धारणा *f*; राखण *f*, संभाळ

पालनपोषण *n*; मंडन *n*, स्थापन *n*; उपजीविका *f*; चालू ठेवणें *n*, स्थिति *f*.

MAIZE (from the language of the island of Hayti) मका.

MAJESTY (*magis*, great) grandeur प्रताप, वैभव *n*, महिमा *f*; title given to sovereigns महाराज, राजश्री; dignity मोठेपणा, प्रौढी *f*.—MAJESTIC *a*. प्रतापाचा, प्रतापी; थोर, उंच; प्रौढ, डौलाचा.

MAJOR *a*. (*L*.) greater in number, quantity, or extent मोठा, मुख्य, बहुतर: m. part of the assembly; of greater dignity मुख्य, प्रधान; m. premise, *Log*. पूर्वपक्ष, प्रतिज्ञा *f*. —*n*. person of full age प्रौढ, पोक्ता, जाणता, वयस्क; officer next in rank above a captain 'मेजर.' -ITY मोठी -अधिक संख्या *f*; जाणतेपणा, प्रौढ वय *n*. -DOMO (-*domus*, house) घरकारभारी.

MAKE* *v*. create करणें, उत्पन्न क.; form घडणें, बनावणें; perform करणें (sport); do करणें (a complaint); get, as profit मिळवणें, कमावणें (money, profit); travel over मार्ग क्रमणें -चालणें: the ship *makes* ten knots an hour; cause to be करणें: to m. public; represent दाखविणें, वर्णन क., सांगणें; esteem करणें, मानणें: he is not that ass that B would m. him; compel बळजोरी क.: to m. to go बळेंच चालविणें; constitute करणें, नेमणें (Ex. ii., 14); compose करणें, असणें, बनावणें: the heavens, the air, the earth, and boundless sea, m. but one temple for the Deity; become होणें: a good daughter *makes* a good wife; reach पोंहचणें, पावणें, सई क., अटपणें: he can m. no land of either side;—a bed अंथरूण क.; —amends भरून देणें; away खपवणें, संपविणें; घात क.; हवालणें, गुजरणें;—account of सन्मान देणें, मानणें; good खरा -सिद्ध क.; भरून देणें; —light of तुच्छ -हलका मानणें (Matth. xxii., 5);—love to विवाहार्थ स्त्रीची आराधना क.; —merry आनंद -चैन क.;—much of सोपस्कार क.;—oath शपथ -प्रतिज्ञा क.; of समजणें, -चा अर्थ क.: I know not what to m. of the news; out अर्थ काढणें, शोध लावणें; खरा -सिद्ध क. (a case); पुरवणें: he was not able to m. out the whole sum; over हवालणें, सोपणें (an estate); up जमवणें, जथवणें, मिटवणें (a quarrel); पुरा क., भरती क.: a rupee is wanted to m. up the sum; करणें, बांधणें, तयार क., सजवणें इ०: to m. up a bundle;—a mass into pills; निश्चय -धडा क. (one's mind);—water गळणें; मुतणें, इराखत क.; way सुधारणें, वाढणें, पुढें पाऊल टाकणें; वाट क. -सोडणें -मोकळी क.—*i*. proceed जाणें, चालणें: he *made* towards home; contribute कामास -उपयोगी पडणें: this argument *makes* nothing in his favour;—as if आकार -डौल दाखविणें (Josh. viii., 15);—away with ठार मारणें;—bold धजणें, हिय्या क.; for -कडे जाणें -चालणें; towards -कडचा रस्ता धरणें; up जवळ येणें -जाणें: he *made* up to us with boldness; मिळणें, मिटणें; up for पुरता -पुरा क.; विसर पाडणें: have you a supply of friends to m. up for those who have gone? with मान्य होणें, मिळणें.— *n*. घडण *f*, बनावट *f*, बांधा. -BATE कळलाव्या, कळीचा नारद, कज्जेदलाल. -BELIEVE अनागोंदी जमाखर्च. -PEACE कळमोड्या. -MAKER कर्त्ता, उत्पन्नकर्त्ता; the Creator सृष्टिकर्त्ता.

MALADY (*malus*, bad) रोग, विकार, व्याधि *f*; a moral defect पाप *n*, अपराध, दोष.—

MALARIA रोग उत्पन्न करणारी पाणथळा जवळची वाफ *f*, रोगजनकवायु.

MALE *a*. (*maris*) pertaining to the sex that begets young पुरुष जातीचा, मर्दानी,

पुरुषाचा; having fecundating organs झाडांतील पुरुष जातीचा; m. screw नर.—*n.* पुरुष, नर.

MALCONTENT *a.* (*mal,* bad, & *content*) discontented गैरखुशी, नाराजी; dissatisfied with the government सरकारावर नाखुश, अमलनाखुश.

MALADMINISTRATION (*mal,* bad, & *administration*) बदअमल, बदमामला.

MALEDICTION (*male,* ill, *dicere,* to say) श्राप, अमंगल वचन *n.*

MALEFACTION (*male,* ill, *facere,* to make) अन्याय, गुन्हा.—MALEFACTOR गुन्हेगार, अन्यायी, अपराधी.

MALEVOLENCE (*-velle,* to wish) दुष्टबुद्धि *f,* कुभाव.—MALEVOLENT *a.* दुष्टबुद्धीचा, दुरात्मा.

MALICE (*malus,* bad) a disposition to injure others दुष्टभाव, द्वेषबुद्धि *f,* अकस.—MALICIOUS *a.* मत्सरी, अकस -चुरसखोर; अदावतीचा, द्वेषभावाचा (report); *Law* द्वेषभाव धरून केलेला.

MALIGN *a.* (*malus,* bad, *genus,* birth) खुनसी, दुष्टभावाचा; pernicious खडतर, नाठाळ (aspect of planets).—*v.* तुफान -कुभांड रचणें -घेणें. -ANT *a.* मत्सरी, खुनसी; tending to destroy life प्राण -जीवनाशक; *Med.* tending to produce death खडतर, दुसाध्य (fever). -ITY कुडाभाव, द्वेषभाव, दुर्बुद्धि *f*; उग्रपणा, खडतरपणा.

MALLEABLE *a.* (*malleus,* hammer) ठोकून वाढविण्याजोगा, प्रसरणशील.—MALLEABILITY घनवर्धिष्णुता *f.* See the adjective.—MALLET मोगरा, ठोकणी *f*; carpenter's m. कुडती *f.*

MALLOWS* गोखरू *n.*

MALT* barley or other grain steeped in water, fermented, and dried सातू इ० चें वाळवलेलें उंबलें *n.*—LIQUOR एक प्रकारचें हलकें मद्य आहे.

MALTREAT *v.* (*mal & treat*) गैररीतीनें वागविणें -वापरणें, घुसडणें, खरडणें, खरडपट्टी काढणें.

MALVERSATION (*-versari,* to move about in a place) बदमामली *f.*

MAMMA (*L.*) आई *f,* ब *f,* बये *f.*

MAMMALIA (*mamma,* breast) सस्तन प्राणीजाति *f.*—MAMMILLARY *a.* स्तनसंबंधी; स्तनासारखा.

MAMMON *Syr.* riches संपत्ति *f,* दौलत *f*; the god of riches कुबेर; the goddess लक्ष्मी *f.*

MAN* (*Skr. man,* to think) a human being मनुष्य, माणूस; a male person पुरुष, बाप्या; adult वयस्क मनुष्य, पणांत आलेला माणूस; mankind मनुष्यजाति *f*; मानव, one of manly strength or virtue मर्द, पुरुष; male servant गडी, चाकरमाणूस; a piece at chess or draughts नरद *f*; सार; a husband नवरा, दादला; sir महाराज; familiarly भाई, गडी; m. of war लढाऊ गलबत *n,* जंगीजहाज *n.* -FUL *a.* मर्द, दिलदारीचा. -HATER माणूसगांध्या, मनुष्यद्वेषी. -HOOD माणूसपणा, मनुष्यत्व *n*; not boyhood प्रौढपणा; courage शौर्य *n,* धैर्य *n,* पुरुषत्व *n,* पुरुषार्थ. -NIKIN खुजा, ह्रस्वमूर्त्ति *f.* -KIND मनुष्यजात *f.*—LIKE, -LY *a.* शूर, दिलदार. -LINESS मर्दाई *f,* पुरुषत्व *n.* -SLAUGHTER मनुष्यवध. -SLAYER मनुष्यघातक.

MANACLE (*manus,* hand) हातबेडी *f.*—*v.* हातबेडी घालणें.

MANAGE *v.* (do.) have under control and direction अटपणें, आवरणें, हुकमांत ठेवणें -धरणें; wield with address झेंपणें, वहिवाटणें, वागवणें; train, as a horse तालीम देणें, वळण लावणें; treat with caution युक्तीनें हुशारीनें चालवणें -वागवणें.—*n* घोड्यास तालीम देणें *n.* -ABLE *a.* चालवायाजोगा, अटोपसार; लगामी धरायाजोगा (horse). -MENT आवरशक्ति *f,* आटोप; बंदोबस्त, आळाबांधा; —in domestic matters घरजुगूत *f,* घरजोगावणी *f.*—

MANAGER वहिवाटदार, कारभारी, मुनीम; a good economist काटकसऱ्या, कतरबेत्या.

MANDARIN *Pg.* (*Skr. mantrin,* a counsellor) चीनदेशांतला सरकारी हुद्देदार -कामदार.

MANDATE *v.* (*mandare,* to order) आज्ञा *f,* हुकूम.—MANDATORY *a.* आज्ञेचा, आज्ञापक.

MANDRAKE* दुदी *f,* लक्ष्मणा *f,* पुत्रदात्री *f.*

MANE *D.*—of a horse अयाळ *f*;—of a lion केसर, केंसर *n.*

MANEGE *F.* art of horsemanship चाबुकस्वारी *f*; place for training horses अश्वशिक्षाशाला *f,* घोडे शिकवायाची जागा *f.*

MANES *pl* (*manus,* good) souls of the departed पितर *pl*; heaven of the m. पितृलोक.

MANGE *F.* गुरें, कुत्रीं वगैरे जनावरांची खरूज *f*;—in horses गर *f,* खवडे *pl*;—in cattle कथला;—in dogs लूत *f.*

MANGER *F.* (*manducare,* to chew) घोडे व गुरें यांचा दाणा खाण्याचा कोटंबा.

MANGLE *v. Ger.* खांडणें, छिन्नभिन्न क., वेडावांकडा तोडणें.—*Ger.* पांघुरणांच्या घड्या दाबून साफ करण्याचें -कुंदीचें यंत्र *n.*—*v.* यंत्रानें दाबून वस्त्रें स्वच्छ क., कुंदी क.

MANGO *Mal.* आंबा, आम्रफल *n*; grove of *mangoes* अंबराई *f*; revenue from a tax on m. groves अंबा or अंबाटका; unriped *mangoes* sliced and dried अंबोशी *f.* -STEEN कोकंबी *f,* रातंबी *f.* -TREE आंब्याचें झाड *n,* आंबा.

MANGROVE (do.) फणसीचें झाड *n,* फणसी *f.*

MANIA (*Gr.*) madness वेड *n,* उन्मत्तवायु; insane passion वेड *n,* चळ, छंद.—MANIAC वेडा, पिसाळलेला.

MANIFEST *a.* (*manifestus*) उघड, स्पष्ट, व्यक्त; to become m. प्रगटणें, उद्भवणें.—*v.* उघड क. -करून दाखविणें. -LY *ad.* उघड, प्रत्यक्ष, बोलून चालून.—MANIFESTATION स्पष्टीकरण *n*; उघडीक *f,* प्रसिद्धि *f,* उद्भव, आविर्भाव.—MANIFESTO राजाचा जाहीरनामा.

MANIFOLD* *a.* (*many & fold*) various in kind बहुत प्रकारचा, बहु-नानाविध: O Lord, how m. are thy works! (Ps. civ., 24); exhibited at divers times or in various ways बहुरूप, अनेकरूप (Eph. iii., 10.)

MANNER (*manuarius,* belonging to the hand) mode of action रीत *f,* पद्धत *f,* कृति *f*; habit, way चाल *f,* रीत *f,* परिपाठ; certain degree or measure कांहीं प्रकार (1 Sam. xxi., 5); fashion ढब *f,* डौल; sort जात *f,* तऱ्हा *f,* प्रकार; behavior चाल *f,* चालचर्या *f,* वर्त्तणूक *f*; respectable deportment शिष्टाचार, रीतरवेस *f*; *manners* and customs of a country देशाचार; good *manners* सदाचार, शिष्टाचार; bad *manners* दुराचार; to make one's *manners* सलाम मुजरा -नमस्कार क. -LY *a.* सभ्य-शिष्ट. -LINESS सभ्यता *f,* सुशीलता *f,* गृहस्थगिरी *f,* विनय.

MANŒUVRE *F.* युक्ति *f,* पेंच, डाव; military *manœuvres* कवाईत *f*; *pl* डावपेंच, छक्केपंजे *pl.*—*v.* युक्ति चालवणें -लढवणें; कवाईत क.

MANOR *F.* देशमुखाची जमीन *f,* व जमीनदारी *f.*

MANSE (*manere,* to dwell) धर्मोपदेशकाचें -पाद्रीचें घर *n*; a farm भाड्यानें घेतलेली जमीन *f.*—MANSION वाडा, हवेली *f,* महाल; lunar m. नक्षत्र *n.*

MANTLE* दुलई *f,* चादर *f,* रजई *f,* इ०; as worn over the body अंगवस्त्र *n,* उपवस्त्र *n.*—*v.* लपवणें, पांघरूण घालणें.—*i.* rise and spread माजणें, फोफावणें: the *mantling* vine; revel in pleasure बहर -मौज मारणें; send up a scum फेंसाळणें, फेणणें.

MANTUA *F.* पेशवाज, झगा. -MAKER बायकांची वस्त्रें करणारा.

MANUAL *a.* (*manus,* hand) हाताचा, हस्त; performed by the hand हातानें केलेला, in comp. हस्त; m. art शिल्प *n*; m. skill हस्तकौशल्य *n*; sign m. हस्ताक्षर *n,* दस्तुर

खुद.—*n.* सारग्रंथ, संहिता *f*;—of laws धर्मसंहिता *f*.

MANUFACTURE (*-facere*, to do) रचना *f*, घटना *f*, निर्मिति *f*; any thing made by art कसबानें -शिल्प क्रियेनें केलेला पदार्थ, शिल्प *n*.—*v.* कसबानें -कारिगरीनें क.; work up raw materials कमावणें, तयार क., ओजवणें. —MANUFACTORY कारखाना, शिल्पशाळा *f*.—MANUFACTURER कारागीर, शिल्पकार.

MANUMIT *v.*(*-mittere*, to send) सुटका-मोकळीक देणें, दास्त्वा पासून मुक्त क.—MANUMISSION सोडवण *f*, सुटका *f*, सुटी *f*, दास्यमोचन *n*.

MANURE *v. F.* खत घालणें, कारवणें.—*n.* खत *n*.

MANUSCRIPT (*manus*, hand, *scribere*, to write) हातानें लिहिलेला कागद, किंवा पुस्तक *n*, हस्तलेख.—*a.* हातानें लिहिलेला, हस्तलिखित.

MANY* *a.* बहुत, पुष्कळ; as m. जितका, जेवढा; how m. किती, केवढा, कितका; m. a one कित्येक, कैक; m.-colored बहुरंगी, चित्रविचित्र, नानावर्ण; m.-cornered बहुकोन.

MAP (*mappa*, napkin) पृथ्वीचा -देशाचा नकाशा, नकाशा.—*v.* नकाशा काढणें -आंखणें; delineate वर्णन क.

MAR* *v.* damage बिघडविणें, नासणें, विचका क.; disfigure कुरूप -विरूप क.

MARASMUS *Gr.* क्षयरोग.

MARAUD *F.* लुटीची स्वारी *f*, धाड *f*.—*v.* लुटी करितां हिंडणें, लुटत फिरणें; लुटणें. -ER लुटारू, पुंड.

MARBLE (*marmor*) संगमरवर, -री दगड; playing m. गोटी *f*; work of art in marble संगमरवरी काम *n*; record in marble संगमरवरी दगडावर कोरलेला लेख.—*a.* संगमरवरी, -दगडाचा; variegated चित्रविचित्र. -HEARTED निर्दय, पाषाणहृदय. -PAPER एक जातीचा नानारंगी कागद आहे.

MARCH (from *Martius*, belonging to *Mars*, the god of war) इंग्रजी सालाचा तिसरा महिना, फाल्गुन-चैत्र.—*v. i. F.* move by steps and in order, as soldiers कदम बराबरीनें -सारखें पाऊल टाकून चालणें; walk in a stately manner थाटानें-डौलानें-मिरवत चालणें [on, upon, to, off].—*t.* कवाइतीनें चालवणें, कूच क.; डौलानें चालवणें.—*n.* कवाइतीचाल *f*; डौलाची चाल *f*, गजगति *f*; कूच *f*; distance passed over मजल *f*, मुकाम, पल्ला; to beat a m. कुचाचा नगारा वाजविणें.

MARCHES* *pl.* शींव *f*, लगता, प्रांत, हद्दीवरचा देश.

MARCHIONESS (See MARQUIS) मार्किसाची बायको *f*.

MARE* घोडी *f*.

MARGIN (*margo*) border कांठ, किनारा; part of a page at the edge left uncovered in writing or printing पुस्तकाच्या पानाची कोरी कड *f*, समास; difference between the outlay, expense, number, or amount of any thing as estimated or previously calculated, and that which is actually required, incurred, or ascertained कूस *f*.—*v.* कड -कांठ लावणें; पत्राच्या समासावर लिहिणें; कूस राखणें -ठेवणें, नफ्याकरितां जागा सोडणें -ठेवणें. -AL *a.* कडेचा, कांठाचा; समासावरचा, कडेवर -बाजूस लिहिलेला.

MARINE *a.* (*mare*, the sea) समुद्राचा, समुद्र संबंधी, सामुद्र (productions); formed by the action of the currents or waves of the sea समुद्रोद्भव, समुद्राच्या ओघांच्या किंवा लाटांच्या क्रियेनें झालेला (shells); having to do with naval affairs जाहजांचे प्रकरणांचा, समुद्रक; m. corps 'मरीन' पलटन, 'मरीन कोर.'—*n.* जहाजावरचा शिपाई; अमारी प्रकरण *n*-काम *n*.—MARINER खलाशी.

MARIOLATRY (*Gr. Maria*, Mary, *latreia*, worship) मारया कुमारीची भक्ति *f*.—MARIOLATER मारयेचा भक्त.

MARITIME *a.* (*mare*, the sea) समुद्रकांठचा, तिरावरचा; See MARINE; m. nations ज्यांपासीं बंदरें आहेत व जे दर्यावर्दी व्यापार करितात ते लोक.

MARJORAM *F.* मरवा.

MARK* visible sign made or left upon any thing खूण *f*, निशाणी *f*, चिन्ह *n*; symptom लक्षण *n*, चिन्ह *n*, खूण *f*; distinguished preëminence श्रेष्ठत्व *n*, प्राधान्य *n*: a man of m.; as a character made, instead of signature, by one who cannot write हातची -सहीची निशाणी *f*; thing aimed at निशाण *n*, टिपण *n*: whate'er the motive, pleasure is the m.; badge of honor बिरूद *n*.—*v.* खूण -निशाणी क. -लावणें; draw, cut, fasten, brand, &c. खुणेकरितां अंकणें -कापणें -बांधणें -डागणें इ०; notice लक्षिणें, पाहणें (Ps. xxxvii., 37); out अंकून देणें, रेघ ओढून -काढून देणें, रेखाटणें; निराळा -वेगळा काढणें.—*i.* लक्ष्यांत ठेवणें -आणणें. -ED अंकित, चिन्हित. -ING-NUT बिबवा. -ER सळई *f*.—MARKSMAN निशाणमारणारा, अचूकसंधानी; लिहितां येत नसल्यामुळें सहीच्या जागीं निशाणी करणारा.

MARK* सुमारें तेरा रुपये किमतीचें एक नाणें आहे.

MARKET* place for buying and selling बाजार; sale विकरी *f*, खप; place for sale बाजार, बाजारवाडा; rate at which goods are disposed of बाजारनिरख; green m. मंडई *f*;—where grain, &c. are sold wholesale गंज; m.-court चावडी *f*; m. price बाजारनिरख -भाव, पेंठ *f*. -ABLE *a.* बाजार करायाचा, खपायाजोगा; current in market बाजारी, बाजारचलन, बाजारचा (value).

MARL *W.* चिकणमाती *f*.

MARRIAGE, See under MARRY.

MARROW* an oily substance in bones मेंदू, मज्जा *f*; essence सार *n*, सत्व *n*, उत्तमांश, कस. -BONE मेंदूचें हाड *n*, नळी *f*, इ०.

MARRY *v.* (*maritus*, husband) unite in wedlock लग्न लावणें; dispose of in wedlock लग्न करून देणें; give away as wife कन्यादान क., कन्या देणें; take for wife बायको करून घेणें; take for husband नवरा करून घेणें; m. contract वाग्निश्चय.—*i.* लग्न क.—MARRIAGE, union of man and woman as husband and wife लग्न *n*, विवाह (Heb. xiii., 4); irregular or invalid m. मंगळ *n*; of an invalid m. (the offspring) मंगळीचा. -ABLE *a.* लग्नाजोगा-योग्य.—MARRIED विवाहित, लग्न झालेला.

MARS (*L.*) the god of war रणदेवता *f*;—of the Hindus कार्त्तिकेय; one of the planets मंगल.

MARSH* दलदल *f*, पाणथळ *n*;—salt m. बहाड *n*.—MARSHY *a.* दलदलीत, पाणथळाचा.

MARSHAL *F.* सेनापति; सभापति.

MART (contr. from *Market*) पेंठ *f*, उतारपेंठ *f*.

MARTIAL *a.* (See MARS) युद्धाचा, लढाईचा, रण in comp. (music); suited to war युद्धोपयोगी; given to war लढाऊ, रणशूर (nation); m. law, an arbitrary kind of law, proceeding directly from the military power, and having no immediate constitutional or legislative sanction लष्करी कायदा. It is quite distinct from military law.

MARTYR (*Gr. martur*, a witness who testifies with his blood) one who, by his death, bears witness to the truth of the Gospel ख्रिस्ती धर्माच्या खरेपणाच्या साक्षीसाठीं प्राण अर्पणारा; one who sacrifies his life, his station, or what is of great value to him, for the sake of principle or to sustain a cause मताभिमानासाठीं किंवा पक्षाभिमानासाठीं प्राणदेणारा, अथवा द्रव्य, कीर्त्ति इ० ची हानि सोसणारा.—*v.* धर्मासाठीं -मतासाठीं प्राण घेणें. -DOM धर्मासाठीं प्राण देणें *n*, धर्मार्थ प्राणअर्पण *n*; स्वमतार्थ प्राणार्पण *n*.

MARVEL *F.* that which arrests the attention and causes admiration or surprise नवल *n*, कौतुक *n*, चमत्कार; m. of Peru गुलबास, सायंकाळी *f*.—*v. i.* आश्चर्य -नवल वाटणें. -OUS *a.* नवलाचा, चमत्कारिक, अद्भुत.

MASCULINE *a.* (*mas*, a male) पुरुषजातीचा, पुरुषाचा; having the qualities of man पुरुषाच्या गुणाचा, पुरुषधर्मक, मर्दानी (body); of the male gender पुल्लिंग.

MASH *Ger.* चेंदा, काला.—*v.* चेंदा क.

MASK *F.* cover to disguise a face मुखवटा, रुपडें *n*; pretext बाहणा, निमित्त *n*; masquerade मुखवट्याचा खेळ. —*v.* मुखवटा लावणें -घालणें; छपवणें, लपवणें.

MASON (*maceria*, wall) गवंडी; [a member of the fraternity of Freemasons]. -IC *a.* फ्रिमेसनाचा -संबंधी. -RY गवंडीपणा; गवंडी काम *n*.

MASQUERADE *F.* मुखवट्यांचा खेळ.

MASS (*massa*) lump गोळा, ढेंप *n*; bulk रास *f*, ढीग; assemblage जमाव, गट्ट, झुंड *f*; *pl* साधारण लोक *pl*, कुणबी माळी *pl*; in the m. एकठोक. -IVE, -SY *a.* जड, भारी, अवजड, ऐवट.

MASS (*missa*) रोमन क्याथोलिक मंडळींतील प्रभुभोजनाच्या वेळची भजनपद्धति *f*.

MASSACRE *F.* कत्तल *f*, काटाकाटी *f*.— कत्तल -निकंदन क.

MAST* डोलकाठी *f*, शीडकाठी *f*, डोल; [fruit of the oak and beech].

MASTER (*magister*) one of eminent rank, power or authority श्रेष्ठ, प्रमुख, मीर, साहेब, सरकार; one exercising authority धनी, प्रभु, खावंद; owner धनी, मालक, in comp. -वाला, -करी; correlative of slave, servant, apprentice धनी, यजमान; teacher गुरु, तालीम देणारा, वस्तादजी, पंतोजी, 'मास्तर'; skilful person निपुण, जाणता, वस्ताद; [a title of address to an inferior, a young person, or a body];—of a ship नाखोदा, तांडेल.—*v.* जिंकणें, सर क. साध्य क., -आंत तरबेत -निपुण -हुशार होणें (a science). -HAND वस्तादाचा हात. -KEY पुष्कळ कुलपें उघडणारी किल्ली *f*: this is a m. ही किल्ली वस्ताद आहे. -LY *a.* वस्तादीचा, कौशल्याचा (design); imperious कडक, कदरखोर.—*ad.* वस्तादीनें, कसबानें. -PIECE मोठ्या कौशल्याचें काम *n*. -SHIP धनीपणा प्रभुत्व *n*; वर्चस्व *n*, श्रेष्ठत्व *n*; मालकी *f*, स्वामित्व *n*; गुरुपणा. -STROKE वस्तादगिरीचा डाव -खेळ -उपाय.—MASTERY अधिपत्य *n*, स्वामित्व *n*, अध्यापकत्व *n*, धनीपणा; श्रेष्ठत्व *n*, वर्चस्व *n*; victory in war जय; eminent skill निपुणता *f*, गम्य *n*, प्रवेश; triumph सिद्धि *f*, फत्ते *f*, जय, यश *n*.

MASTIC (*Gr mastiche*) Pistacia Lentiscus रुमामस्तकीचें झाड *n*; the resin रुमामस्तकी *f*.

MASTICATE *v.* (*masticare*) चावणें, चर्वण क. —MASTICATION चर्वण *n*, चावणें *n*.—MASTICATORY *a.* चावण्याच्या कामाचा, चर्वणोपयोगी. —*n.* a substance to be chewed to increase the saliva चावण्याचें औषध *n*, चर्वणौषध *n*.

MASTIFF (*mastivus*) एक मोठ्या जातीचा बळकट व शूर कुत्रा आहे.

MAT* चटई *f*, अंथरी *f*; a m. of hair जट *f*. —*v.* चटई टाकणें -घालणें; twist together विणणें, वळणें.—*i.* जटा वळणें -जमणें.

MATCH *F.* गंधकाची काडी *f*, कांडें *n*;—of a gun बत्ती *f*, तोडा;—of a rocket, &c. रंजक *f*. -LOCK तोड्याची बंदूक *f*. -MAKER गंधकाच्या काड्या करणारा.

MATCH* an equal बरोबरीचा, तोलाचा; contest to try strength or skill डाव; a marriage लग्न *n*; a candidate for

matrimony जोडा, वर किंवा वधु *f.*—*v.* बरोबरी -साम्य क.; oppose as equal तोड -मुकाबला क., तोडीचा ह्मणून आणणें; suit जुळणें, जमवणें, मेळ बसवणें; लग्न करून देणें; [purify, as vessels by burning a m. in them].—*i.* जुळणें, जम पडणें; लग्न लावणें -क. -LESS *a.* बिनतोडीचा, अद्वितीय; unequal विजोड, विषम. -MAKER लग्न जमवून देणारा, बरावर करणारा, घटक.

MATE *D.* a companion गडी, साथी; among the lower animals, one of a pair जोडा, जोडपी; an assistant मदतनीस, हस्तक; companion गडी, साथी: officer of a ship next below the captain].—*F.* a term at chess मात *f.*

MATERIAL, See under MATTER.

MATERNAL *a.* (*mater,* mother) आईचा, मातेकडचा, मातृधर्मक; m. duty मातृधर्म.

MATHEMATICS (*Gr. mathema,* learning) गणित *n.*—MATHEMATICAL *a.* गाणिताचा, गणितसंबंधी; according to the principles of mathematics गणितनियमानुसार (exactness).—MATHEMATICIAN गणिती.

MATIN *a.* (*matutinum,* morning) प्रातःकाळ संबंधी, प्रातःकाळचा (trumpet).—*n.* प्रातःकाळ; *pl* प्रातःकाळचें भजन *n,* प्रातर्भजन *n.*

MATRICIDE (*mater,* mother, *cædere,* to kill) मातृहत्या *f*; murderer of a mother मातृहत्या करणारा, मातृघातक, मातृहत्यारा.

MATRICULATE *v.* (*matrix,* womb) a public register पटावर नांव दाखल क., (पाठशाळेच्या वगैरे) मंडळींत घेणें, 'म्याट्रिक्युलेट' क.—*n.* पटावर नांव दाखल करून मंडळींत घेतलेला मनुष्य.

MATRIMONY (*mater,* mother) wedlock लग्न *n*; nuptial state विवाहितावस्था *f.*—MATRIMONIAL *a.* लग्नसंबंधी, लग्नाचा.

MATRIX (*L.*) the womb गर्भाशय; mould सांचा, मूस *f.*

MATRON (*mater,* mother) elderly woman प्रौढ बायको *f,* घरबारीण *f*; female head of a household, school, &c. घरकारभारीण *f,* शाळाकारभारीण *f,* इ०.

MATTER (*materia*) substance द्रव्य *n,* साकार पदार्थ, दृश्य किंवा स्पर्श वस्तु *f*; that of which the sensible universe and all existent bodies are composed प्रकृति *f*; that of which any thing is composed साधना *f,* साधनीभूत पदार्थ; subject विषय, प्रकरण *n*:

> Son of God, Savior of men, thy name
> Shall be the m. of my song.—*Milton.*

subject of complaint, legal action, &c. वादाचा -खटल्याचा विषय, खटला; concern काम *n,* गोष्ट *f*; thing of consequence मुजाख *f,* बिशाद *f,* प्रत्यवाय: no m. बिशाद -चिंता नाहीं; ground of disturbance गडबडीचें -धांदलीचें कारण *n*: what is the m. काय आहे? काय झालें? indefinite quantity इयत्ता *f,* परिमाण *n*; pus पू; written manuscript or any thing to be set in type छापायाचा मजकूर -विषय, "म्याटर" *f*; type set up and ready to be used in printing छापाया करितां जुळलेल्या मजकुराचे खिळे *pl*; [dead m., type which has been used in printing, and is ready for distribution; living m., type set up, but which has not been printed from]; m. of fact घडलेली -खरी गोष्ट *f*; upon the m., upon the whole m. एकंदरीनें पाहतां.—*v. i.* मुजाखा -बिशाद होणें; पू होणें, पुवाळणें, पिकणें.

MATTERY *a.* पुवाचा, पुवानें भरलेला.—MATERIAL *a.* not spiritual पंचभूतात्मक, आधिभौतिक (substance); relating to the bodily wants संसारिक, प्रापंचिक, पोटाचा; भारी, मोठा: the discourse was always m.; essential वास्तविक, खरा.—*n.* जिन्नस, द्रव्य *n,* वाणा. -ISM देहात्मवाद, चार्वाक-

मत *n.* -IST, one who denies the existence of spiritual substances, and maintains that the soul of man is the result of a particular organization of matter in the body अनात्मवादी,देहात्मवादी. -ITY पंचभूतात्मक भाव, अनात्मिकत्व *n.* -LY *ad.* प्रकृतितः; कारण विशेषेंकरून.

MATTOCK* कुदळ *f.*

MATTRESS *W.* लेप, गादी *f.*

MATURE *a.* (*maturus,* ripe) पक्का, पक्व, प्रौढ, पोक्त; complete सिद्ध, पूर्ण.—*v.* पिकवणें; सिद्ध -पूर्ण दशेस आणणें. -LY *ad.* पुरतेपणीं, पोक्तेपणीं.—MATURITY प्रौढि *f,* पक्वदशा *f,* पोक्तेपणा; सिद्धता *f,* सिद्धि *f,* संपूर्णता *f.*

MAUDLIN *a.* (contr. fr. *Magdalen*) झिंगलेला, तारवटलेला.

MAUGRE *prep. F.* न मानतां -जुमानतां, गुंडाळून, एकीकडे ठेवून.

MAUL (*malleus*) मोगरा, मोगर.—*v.* चेंचणें, कुटणें, चेंदा पाडणें.

MAUSOLEUM (*L.*) मोठी कबर *f,* छत्री *f.*—MAUSOLEAN *a.* छत्रीचा.

MAW* कोठा, पोटाची पिशवी *f;* the craw चुनाळ, गचूर; to fill one's m. पोटजाळणें. —KISH *a.* पचपचीत, पाणचट.

MAXILLAR, -RY *a.* (*maxilla,* jaw-bone) दाभाड्याचा, हनुसंबंधी.

MAXIM (*maxima*) न्याय, वचन *n,* वाक्य *n,* सूत्र *n.*

MAXIMUM (*L.*) मोठी संख्या *f,* परमावधीचें परिमाण *n,* महत् परिमाण *n.*

MAY (*Maius*) इंग्रजी वर्षाचा पांचवा महिना; early part of life तारुण्य *n,* ज्वानी *f.*

MAYOR (*major,* greater) कोतवाल, हकीम. -ALTY कोतवाली *f.* -ESS कोतवालाची बायको *f,* कोतवालीण *f.*

MAZE* embarrassing place घोटाळ्याची -नागमोडीची जागा *f;* perplexity घोटाळा, चौऱ्यांशीचा फेरा.

MEAD, MEADOW* कुरण *n.*—MEADOWY *a.* कुरणाचा.

MEAGRE* *a.* lean रोडका, फाटक्या अंगाचा; poor भुकिस्त, भरड (soil); destitute of richness, strength, &c. शुष्क, बेकस, निकस; dry and harsh to the touch, as chalk चरबरीत, रखरखीत.

MEAL* जेवण *n,* भोजन *n;* m. time अन्नकाल, भोजनसमय; m. of, or served to, a sannyási पुडी *f.*—* पीठ *n.*—MEALY *a.* पिठूळ. MOUTHED *a.* मेलतोंड्या, गायमुख्या, डाळपिठ्या, गोडबोल्या.

MEAN* *a.* of low rank हलका, हलके पदवीचा; base पाजी, अधम, हलका; of little value हलक्या किमतीचा -योग्यतेचा, तुच्छ (foe). -NESS हलकेपणा, नीच पदवी *f;* पाजीपणा, हीनता *f;* हलकी योग्यता *f,* निकृष्टता *f,* लघुत्व *n.*—*a.* (*medius,* middle) मध्यम, मध्य परिमाणाचा (style); intervening मधला; in the m. time इतक्यांत, दरम्यान; *Math.* मध्य, मध्यम.—*n.* मध्य परिमाण *n;* मधली वेळ *f,* अवधि *f,* मध्यंतर *n;* instrument of action or performance साधन *n,* द्वार *n,* उपाय, योग; *pl* resources साहित्य *n,* सामुग्री *f;* income ऐपत *f,* द्रव्य *n,* सामर्थ्य *n;* *Geom.* सम *n;* by all *means* सर्व प्रकारें, सर्वथा; खचीत, निखालस; by no *means* अगदीं -सुतराम् नाहीं; by *means* of द्वारें, द्वारां; by some *means* or other कसेंही करून, कसेंही; according to one's *means* यथाशक्ति. -WHILE *ad.* इतक्यांत.

MEAN* *v.* have in the mind मनांत असणें; purpose योजणें, उद्देशणें (Gen. I., 20); signify अर्थ दाखवणें, सुचवणें (Matth. xi., 13). -ING उद्देश, आशय, अभिप्राय; अर्थ, खुलासा.

MEANDER (*Mœander*, a river in Phrygia, proverbial for its many windings) फेरा, वळण *n*. वांक.

MEASLES *pl Ger*. गोवर.

MEASURE (*mensurar*) dimensions मेज *n*, परिमाण *n*, मोज;—of capacity कैली माप *n*;—of weight वजनी माप *n*; fair m. नक्की माप *n*; m. rather in excess of the market one घबाड माप *n*; allotment वांटा, भाग; rule by which any thing is adjusted परिमाण *n*, प्रमाण *n*; due proportion मिती *f*, मोताद *f*; limit मर्यादा *f*, सीमा *f*, सुमार; beyond m. बेसुमार; contents of a vessel by which quantity is measured माप *n*; undefined quantity अव्यक्त परिमाण *n*: a large m. of wisdom मोठें शहाणपण *n*; small m. of knowledge थोडें ज्ञान *n*; in a great m. बहुतकरून; in some measure कांहींसा; musical time ताल; metre छंद, वृत्त *n*; means to an end उपाय, साधन *n*, युक्ति *f*, तजवीज *f*: to take *measures* उपाय -तजवीज क. -MENT मापणें *n*, मापन *n*; मेज *n*, माप *n*; gross m. स्थूलमान *n*; minute and exact m. सूक्ष्ममान *n*.—MEASURABLE *a*. मोजाया -मापायाजोगा, परिमेय; मध्यम, सुमाराचा.

MEAT* food अन्न *n*, भक्ष्य *n*; flesh मांस *n*.

MECHANIC, -AL *a*. (*Gr. mechanè*, a machine) यंत्राचा, यांत्रिक; constructed or performed according to the laws of mechanics यंत्रशास्त्रानुरूप, यंत्रशास्त्रसिद्ध; done as if by machine यंत्रतुल्य, यंत्रानें केल्यासारखा, विचारा वांचून -सवयीनें केलेला, यांत्रिक (action); belonging to those who live by hand-labor शिल्पी, शिल्पोपजीवी, कारीगराचा; made by mechanical means यंत्रानें केलेला, यंत्रोत्पन्न.—MECHANIC कारीगर, शिल्पकार.—MECHANICS यंत्रविद्या *f* -शास्त्र *n*.—MECHANISM कळ *f*, युक्ति *f*, यंत्ररचना *f*.—MECHANIST यंत्रें करणारा, यंत्रकार.

MEDAL (*metallum*, metal) piece of metal stamped in honor of some person or event पदक *n*, बिरुदाची मुद्रा *f*, 'मेडल' *n*.

MEDDLE *v. i. D.* कामावांचून मध्यें पडणें -हात घालणें, लुडबुडणें, लांडाकारभार क.; have to do with शिरणें, मध्यें पडणें [with].—MEDDLER लुडबुड्या, बुचा -लांडाकारभारी; मध्यें पडणारा, शिरणारा.—MEDDLING बुचाकारभार, लुडबूड *f*; curious or idle m. उठाठेव *f*.

MEDIATE *v. i.* (*medius*, middle) interpose between parties, as the equal friend of each मध्यस्थि क., मध्यें पडणें [between]. —*t.* मध्यें पडून -होऊन करविणें.—*a.* मधला, मधचा, मध्यस्थ.—MEDIATION मध्यस्थी *f*, मध्यस्थगिरी *f*; मध्यें असणें *n*, मध्यस्थिति *f*. —MEDIATOR मध्यस्थ; Christ प्रभु येशूख्रीस्त. -SHIP मध्यस्थी *f*, मध्यस्थपणा.

MEDICAL *a*. (*mederi*, to cure) वैद्यकीचा, वैद्यक विषयक; m. dictionary निघंट; medicinal औषधी (properties); instituted to teach medical science वैद्यक शिकविण्याचा, वैद्य in comp.: वैद्यशाळा *f*.—MEDICABLE *a*. वैद्योपचारसाध्य, चिकित्स्य.—MEDICATE *v*. tincture with medicine औषधगुणविशिष्ट क.—MEDICAMENT औषध *n*, औषधी द्रव्य *n*.—MEDICINE, any substance administered in the treatment of disease औषध *n*; the science वैद्यक *n*; practice of m. वैद्यकी *f*, चिकित्सा *f*.—MEDICINAL *a*. औषधाच्या उपयोगाचा, औषधी (spring); औषध संबंधी, औषधाचा, औषध (hours, days).

MEDIOCRITY *F*. मध्यपक्ष, सामान्यपक्ष.

MEDITATE *v*. (*meditari*) कल्पिणें, योजणें, बेत क.—*i*. ध्यान-चिंतन-मनन क. (Ps. l., 2).—MEDITATION ध्यान *n*, चिंतन *n* (Ps. xix., 14); religious and abstract m. योग, समाधि

f; absorbed in m. ध्यानस्थ, समाधिस्थ. —MEDITATIVE *a.* ध्याननिष्ट -शील, ध्यानी.

MEDITERRANEAN *a.* (*medius*, middle, *terra*, land) भुईनें घेरलेला, भूमध्य; remote from the sea समुद्रा पासून दूरचा, मध्यदेशस्थ.

MEDIUM (*L.*) middle place मधली जागा *f*; mean मध्य परिमाण *n*; instrument साधन *n*, योग; channel मार्ग, द्वार *n*; through the m. of the ear श्रवणमार्गानें, कानानें; *Med.* अनुपान *n*;—of persons गुजारत *f*, मारफत *f*, विद्यमानता *f*; [a kind of printing paper].

MEDLEY *F.* पंचभेळ *f*, मिसळ *f*, खिचडी *f*.

MEDULLA (*L.*) मेंदू, मज्जा *f*.—MEDULLAR. -RY *a.* मेंदूचा, अस्थिसार संबंधी.

MEED* फळ *n*, प्रतिफळ, बक्षीस *n*.

MEEK* *a.* gentle सौम्य, लीन, गरीब, नम्र; submissive to the divine will ईश्वराच्या इच्छेस मान्य (Matth. v., 5). -NESS लीनता, *f*, सौम्यता *f*, विनय: m. is a grace which Jesus alone inculcated.

MEET* *v.* come together with, by approach from opposite directions समोरासमोर येणें, आडवा येणें, सामोरा येणें; confront भेटाभेट होणें, गांठ पडणें; engage लढाईस भेटणें, भिडणें; find मिळणें, पावणें; make concession to कबूल होणें -क.; to m. half-way पदरीं घेणें, सूट देणें.—*i.* सामोरा येणें, भेटणें; मिळणें, भेटणें; assemble मिळणें, जमणें: council *meets* on Monday; unite मिळणें, जुळणें; with मिळणें, सांपडणें, आढळणें; मिळणें, येणें, जमणें: does it m. with your wishes. -ING गांठ *f*, भेट *f*; assembly सभा *f*, 'मिटिंग' *f*; collection of people मेळा, जमाव; religious assembly ईश्वरभजनाची सभा *f*, मेळा, पोथी *f*, प्रार्थनेची 'मिटिंग' *f*.

MEET *a.* योग्य, उचित, लायक. -NESS योग्यता *f*, लायकी *f*.

MEGIM* अर्धशिशी *f*.

MEIOSIS (*Gr.*) diminution न्यूनता *f*; *Rhet.* न्यूनालंकार.

MELANCHOLY (*Gr. melan*, black, *cholè*, bile) gloomy state of mind उदासवृत्ति *f*; gloom of mind औदासिन्य *n*, खिन्नता *f*. —*a.* उदास, खिन्न, दिलगीर; afflictive खेद कारक.—MELANCHOLIC *a.* सदा विषादी.

MELIORATE *v.* (*melior*, better) सुधारणें, नीट क.—*i.* सुधरणें, नीट होणें.

MELLIFEROUS *a.* (*mel*, honey, *ferre*, to bear) मध उत्पन्न करणारा, मधुप्रद.— MELLIFICATION (*-facere*, to make) मधुकरण *n*, मधुक्रिया *f*.—MELLIFLUENT *a.* (*-fluere*, to flow) मधुस्रावी, गोड, मधुर.— MELLIFLUENCE मधुस्राव -प्रवाह, शब्दामृत *n*.

MELLOW* *a.* soft with ripeness पिकून मऊ झालेला, परिपक्व; soft मऊ (soil);—of sound मंजूळ, गोड, मवाळ, मधुर;—of flavor मधुर, गोड genial प्रकृतीस मानणारा (age); slightly intoxicated किंचित मस्त झालेला, तार चढलेला; jovial with liquor मद्यानें हर्षित झालेला.—*v.* पिकवणें, मुरवणें; मऊ क.: earth is *mellowed* by frost.—*i.* पिकणें, मुरणें -NESS परिपक्वता *f*; मंजुळपणा; मधुरता *f*, गोडी *f*.

MELODY (*Gr. melos*, song) स्वरांची गोडी *f*, स्वरमाधुर्य *n*, ताल.— MELODIOUS *a.* मंजूळ-मधुर, सुस्वर.

MELON (*Gr.* apple) musk- m.,—the plant खरबूज *f* -जी *f*;—the fruit खरबूज *n*; water, m.—the plant तरबूज *f*, कलिंगडी *f*;—the fruit कलिंगड *n*, तरबूज *n*.

MELT* *v.* reduce from a solid to a liquid state पातळ क., रस -पाणी क., वितळणें; as metals अटणें, गाळणें, रस क.; soften मन विरघळणें; पान्हा आणणें.—*i.* वितळणें, रस होणें, अटणें; पान्हा -द्रव येणें, पघळणें, पाझरणें; faint धीर -अवसान सुटणें, गळणें (Ps. cxix., 28).

MEMBER (*membrum*) part of any animal body capable of performing a distinct office अंग *n*, गात्र *n*, अवयव; part of a whole भाग, अंश;—of a discourse प्रकरण *n*, खंड *n*;—of a community असामी *f*, व्यक्ति *f*, इसम, एक;—of an assembly सभासद. -ED, *a*. अंगी, सांग.

MEMBRANE (*membrana*) आंतली त्वचा *f* (शरिराची व वृक्षाची), अंतर्साल *f*.—MEMBRANOUS *a*. आंतले त्वचेचा.

MEMORY (*memor*, mindful) faculty of the mind by which it retains the knowledge of previous thoughts or events स्मरणशक्ति *f*, स्मृति *f*; remembrance आठवण *f*, स्मरण *n*; time within which past events can be remembered आठवणींतला काळ, स्मरणकाल, आठवण *f*; remembrance of a person, or event, preserved to after-times आठवण *f*, स्मरण *n* (Prov. x., 7); to recite from m. पाठ म्हणणें; to speak from m., speak without book तोंडानें सांगणें.-MEMENTO *L*. यादगारी *f*, आठवणूक *f*.—MEMOIR चरित्र *n*, बखर *f*, वृत्तांत.—MEMORABLE *a*. आठवणें धरण्याजोगा, स्मरणीय; celebrated प्रख्यात, प्रसिद्ध.—MEMORANDUM टिपण *n*, टांचण *n*, याद *f*, टीप *f*.—MEMORIAL *a*. स्मरणदेणारा, स्मारक; contained in memory आठवणींतला.—*n*. स्मरणदेणारी स्मारक वस्तु *f*, यादगिरी *f*; written representation अर्जी *f*;—to grandees याद *f*, खलीता. -IST वृत्तांत -चरित्र लिहिणारा; अर्जदार. -IZE *v*. अर्ज क., अर्जी देणें.

MENACE *v*. (*minere*, to jut) भय -धाक घालणें, धमकावणें [with].—& MENACING धमकी *f*, भेडसावणी *f*, दटावणी *f*.

MENAGE, -RIE *F*. पशूंचा संग्रह, शिकारखाना.

MEND *v*. (See AMEND) नीट -दुरुस्त क., डागडुजी क.; correct नीट -शुद्ध क., स्थितीवर -वाटेवर आणणें; improve सुधारणें, अधिक चांगला क.—*i*. बरा होत जाणें, वाटेवर ताव्यावर येऊं लागणें.

MENDACIOUS *a*. (*mendax*, lying) लबाड, खोटा.—MENDACITY लबाडी *f*; habit of lying लबाडी करण्याची खोड *f* -चट *f*.

MENDICANT (*mendicare*, to beg) भिकारी, भिक्षेकरी; religious m. जोगी, गोसावी.—MENDICANCY, MENDICITY भीक मागणें *n*, भैक्षचर्या *f*, भिक्षावृत्ति *f*;—of a Mahomedan फकिरी *f*; to take to m. चौपदरी -हातीं भोपळा -नरोटी घेणें; gatherings of m. उकळा.

MENIAL *a*. *F*. घरचाकरीचा -कामाचा; m. occupation चाकरीचा पेशा.—*n*. घरचा चाकर, झाडलोट करणारा; *pl* चाकरनफर.

MENSES (*mensis*, month) विटाळ, रज, ऋतु —MENSTRUAL *a*. प्रति महिन्याचा, मासिक (flux).—MENSTRUATE *v*. *i*. विटाळशी -ऋतुमति -रजस्वला होणें, महिन्याचें येणें.

MENTAL *a*. (*mens*, *mentis*, the mind) मनाचा, मानसिक, मानस. -LY *ad*. मनांत, कल्पनेंत.

MENTION *v*. (*mentio*, to remember) सांगणें, उल्लेख काढणें, नांव घेणें.—*n*. उल्लेख, चर्चा *f*.

MERCANTILE *a*. (*merx*, wares) व्यापाराचा, उदीमाचा; m. travelling वणंज *f*.

MERCENARY (*merere*, to serve for pay) पैका घेऊन काम करणारा, मोलाचा, भाडोत्री; sordid लालूचखोर, लोभदृष्टि.— *n*. मजूर, मुशारदार; soldier hired into foreign service मुशारा घेऊन परराज्याची चाकरी करणारा शिपाई.

MERCER (*merx*, wares) रेशमी कापड विकणारा. —MERCERY रेशमी कापड *n*; रेशमी कापड विकण्याचा धंदा.

MERCHANDIZE (do.) उदीम, व्यापार; goods माल, जिन्नस.—*v*. उदीम क.—MERCHANT

व्यापारी, उदमी, सावकार.—*a.* व्यापाराचा, उदमी. -ABLE *a.* विकाऊ, खपायाजोगा (wheat) -MAN व्यापाऱ्याचें गलबत *n*, कबाडी -जिनसी गलबत *n*, बारकस *n*.

MERCURY (*Mercurius*) quicksilver पारा; a planet बुध; [an ancient heathen deity]; oxide of m. पारदभस्म *n*; white sublimate of m. रसकर्पूर.—MERCURIAL *a.* पाऱ्याचा; मर्क्युरी देवाचा; active चंचळ, चपळ; money-making पैसा उत्पन्न करण्याचा.

MERCY (*merces*, hire) disposition to overlook injuries, or to treat an offender better than he deserves दया *f*, दयाशीलता *f*, दयाळूपणा -स्वभाव; act of mercy दयेचें काम *n*, दया *f* (Matth. ix., 13); to be at the m. of -च्या स्वाधीन असणें, -च्या हातांत सांपडणें; to cry m. दया भाकणें, क्षमा मागणें; m! m! त्राही त्राही.—MERCIFUL *a.* दयाळू, कृपाळू; not cruel करुणाशील, कृपाळू. —MERCILESS *a.* निर्दय, क्रूर.

MERE* *a.* नुस्ता, केवळ. -LY *ad.* केवळ, मात्र, फक्त.

MERGE *v.* (*mergere*) बुडविणें, गर्क क. [in].—*i.* बुडणें, गर्क होणें.

MERIDIAN (*meridies*, noon) दोनप्रहर, मध्यान्ह; highest point भरतें *n*, कळस; a great circle of the sphere passing through the poles of the heavens and the zenith of the spectator खमध्य *n*, याम्योत्तरवृत्त *n*; an imaginary great circle on the surface of the earth, passing through the poles and any given place याम्योत्तररेषा *f* -वृत्त *n*.

MERIT *v.* (*merere*, to deserve) योग्यतेनें -लायकीनें मिळविणें; incur आपणावर आणणें, -ला पात्र होणें (punishment).—*n.* योग्यता *f*, लायकी *f*; reward deserved फळ *n*, श्रेय *n*, बक्षीस *n*; m. acquired through work पुण्य *n*, श्रेय *n*; that excellence which entitles to reward or honor गुण, लायकी *f*; *pl* गुणदोष *pl.* -ORIOUS *a.* गुणी, योग्य, लायक; पुण्यकारक, श्रेयकर.

MERMAID (*mare*, the sea, & *Eng. maid*) मत्स्यकन्या *f*, जळमाणूस *n*.

MERRY* *a.* joyous आनंदी, उल्लासी; causing laughter हास्यजनक -कारक, विनोदाचा; to make m. ख्यालीखुशाली -खाऊन पिऊन चैन क.; lively दणक्याचा, कडाक्याचा. -ANDREW हंडीबाग, मौज्या, नकल्या.—MERRILY *ad.* ख्यालीखुशालीनें, मौजा मारून.—MERRIMENT ख्यालीखुशाली *f*, मौजा *f pl.*

MESH *Ger.* जाळीचें भोंक *n*, जाळीची खिडकी *f*.

MESLIN *F.* धान्याची मिसळ *f*, खेड *f*, मिसळीचें धान्य *n*.

MESNE *F.* मधला, दरम्यान; m. profits, profits of premises during the time the owner has been wrongfully kept out of the possession of his estate दरम्यान उत्पन्न *n*.

MESS *F.* dish पात्र *n*, पान *n*, ठाव; number of persons who eat together भिसी *f*, 'नंबर,' 'मेस' *n*, 'मेज' *n*; medley चिवडा, विचका; embarrassment फटफजिती *f*, दुर्दशा *f*, हाल.—*v. i.* भिसीनें जेवणें [together, with]. -MATE भिसीचा सोबती, मेसांत -नंबरांत एके ठिकाणीं जेवणारा, एकाताटांतला, सहभोजी.

MESSAGE (*mittere*, to send) निरोप, संदेशा. —MESSENGER निरोप्या, जासूद, दूत.

MESSIAH (*Heb. mashiah*, anointed) अभिषिक्त; Christ ख्रीस्त; the Savior of the world जगाचा तारणारा.

MESSUAGE *F.* घर आणि त्याच्या भोंवतालची जागा *f*, घरवाडी *f*.

METACARPUS (*Gr. meta,* beyond, *karpos,* wrist) हाताचा चौडा, मपाणि.—METACARPAL *a.* चौड्याचा, करभसंबंधी.

METAL (*metallum*) a simple, fixed, shining, opaque body, insoluble in water and fused by heat *n f;* broken stones for roads खडी *f*; guns carried by a vessel of war जंगीजहाजाचा तोफखाना; mettle पाणी *n,* रग *f;* glass in a state of fusion काचेचा रस. -LIC *a.* धातु संबंधी; धातूचा, धातुमय, धातुनिर्मित (substance); धातूसारखा (brightness). -LINE *a.* impregnated with metal धातूच्या धर्माचा, धातुधर्मक; धातुमय -निर्मित. -LIST धातूचें काम करणारा; one skilled in metals धातुपरीक्षक. -LURGY धातुशोधनविद्या *f.*

METAMORPHOSE *v.* (*meta,* beyond, *morphè,* shape) रूपांतर क., स्वरूप पालटणें.—METAMORPHOSIS रूपांतर *n,* स्वरूपभेद.

METAPHOR (*Gr. pherein,* to carry) a figure of speech by which the name and properties of one object are ascribed to another; or a word expressing similitude without the signs of comparison रूपकालंकार, आरोप: "that man is a fox" is a m.; but "that man is like a fox" is a simile, similitude or comparison.—METAPHORICAL *a.* लाक्षणिक, आरोपाचा.

METAPHRASE (*Gr. -phrasis,* phrase) verbal translation यथाशब्द भाषांतर *n*; repartee समयोचित उत्तर *n,* हाजीर जबाब.—METAPHRASIST शब्दास शब्द उतरून भाषांतर करणारा.

METAPHYSICS (*Gr. -phusis,* nature) mental philosophy मानसशास्त्र *n.*

METATARSUS (*Gr. -tarsos,* flat surface) the middle of the foot मपद *n.*

METATHESIS (*Gr.*) अक्षरांचें मागें पुढें होणें *n,* वर्णविपर्यय.

METE* *v.* मोजणें, मापणें [out].

METEMPSYCHOSIS (*Gr. -psuché,* the soul) passing of the soul of a man after death into some other animal body जन्मांतर *n,* अन्यजन्म, जन्ममरणाचा फेरा.

METEOR (*Gr. meteoros,* high in the air) any phenomena in the atmosphere, as clouds, rain, snow, &c. वायुमंडळांतील चमत्कार; a luminous body seen in the atmosphere तारा *f,* उल्का *f.* -OLOGY वायुचक्रशास्त्र *n,* विद्युदुल्कादिविद्या *f.*

METHINKS *v. imp.* मला वाटतें -भासतें.

METHOD (*Gr. meta,* after, *hodos,* way) orderly procedure रीत *f,* पद्धत *f,* मार्ग; orderly arrangement बेत, व्यवस्था *f,* क्रम; classification विल्हेवारी *f,* वर्ग. -ICAL *a.* व्यवस्थेचा, सुती, क्रमाचा, बेताचा. -IST नियमनिष्ठ -शील; [a follower of John Wesley]. -IZE *v.* क्रम बांधणें, व्यवस्था क.

METONYMY (*Gr. meta,* change, *onoma,* name) a trope in which one word is put for another अजहल्लक्षणा *f*: they have Moses and the prophets, *i.e.,* their writings.

METRE (*Gr. metron,* measure) माप *n*; poetical measure छंद, वृत्त *n.*—METRICAL *a.* छंदोबद्ध, पद्यरूप.

METROPOLIS (*Gr. meter,* mother, *polis,* city) राजधानी *f,* मुख्य शहर *n.*—METROPOLITAN *a.* राजधानी संबंधी; राजधानींत राहणारा.—*n.* the bishop who presides over the other bishops of a province धर्माध्यक्षाधिकारी, प्रांतांतील बिशपावरला मुख्य बिशप.

METTLE (See METAL) that which goes to form any thing प्रकृति *f,* पदार्थ; that temperament which is susceptible of high excitement रग *f,* पाणी *n*; spirit हिंमत *f,* धैर्य *n*; to know the m. of पोंची ओळखणें. -SOME, METTLED *a.* रगदार, पाणीदार, तापट.

MEW *v. i. Ger.* म्यांव म्यांव क.

MEWL *v. i. F.* केंकें -टेंटें -ट्यांहां क.

MIASMA *Gr.* कुजक्या पदार्थापासून निघणारी वाफ *f* -हवा *f* -वायु.

MICA (*L.* crumb) अभ्रक.

MICROCOSM (*Gr. mikros,* little, *kosmos,* the world) लघुजग *n*; man मनुष्य; man is a m. पिंडीं तें ब्रह्मांडीं.

MICROSCOPE (*Gr. -skopein,* to view) सूक्ष्म पदार्थदर्शक भिंग *n*, दुर्बीन *f*.—MICROSCOPIC *a.* made by the aid of a microscope दुर्बिनीच्या सहायानें केलेला (observation); capable of seeing very minute objects अति सूक्ष्म पदार्थ पाहण्याचा -जोगा (eye); very small फार बारीक, अति सूक्ष्म.

MID* *a.* मधला, मध्यवर्त्ती. -DAY दुपार *f*, दोन-प्रहर. -HEAVEN आकाशाचा मध्यभाग, ख-मध्य; meridian मध्यान्हरेषा *f*. -LAND *a.* मध्यवर्त्ती, समुद्रकिनाऱ्याहून दूरचा; mediterranean भूमध्य (sea). -MOST *a.* मधो-मधचा. -NIGHT मध्यरात्र *f*. -RIFF पोटाचा मधला पडदा. -SHIPMAN जाहजावरचा एक कामदार आहे. -STREAM ओघाचा मध्य. -SUMMER ऐन उन्हाळा; the summer solstice, 21st of June उत्तरायण *n*. -WAY अर्धी वाट *f*, निमरस्ता.—*a.* अर्ध्या वाटेवरचा, मध्यंतरीचा (air).—*ad.* अर्ध्या वाटेंत -वर. -WIFE सुईण *f*. -WIFERY सुइणीचें काम *n*, गर्भमोचनविद्या *f*. -WINTER ऐन हिवाळा; winter solstice, December 21st दक्षिणायण *n*.—MIDDLE मध्य *n*.—*a.* मधला, मध्यवर्त्ती. -AGED *a.* मध्यम वयाचा, मध्यवयस्क. -MOST *a.* मधोमधचा, मध्यस्थ; मध्याजवळचा. -SIZED *a.* मध्यम आकाराचा.—MIDDLING *a.* मध्यम, साधारण, बराच, सरासरी.

MIEN *F.* आकार, डौल, चेहरा.

MIGHT* शक्ति *f*, बळ *n*, जोर *n*, पराक्रम; with m. and main पराकाष्ठेनें; with all one's m. यथाशक्ति, यथासामर्थ्य. -ILY *ad.* जोरानें, बळानें; greatly फार, अतिशय.—MIGHTY *a.* पराक्रमी, समर्थ, बळकट; very great फार मोठा -थोर, महान; remarkable for size, effect, or qualities थोर, महा, दांडगा, जबर, मोठा, भारी (waters, famine); wonderful चमत्कारिक, मोठा, (works); fine सुंदर, उत्कृष्ट; remarkable for size अफाट, विशाल, प्रचंड.—*ad.* अति, फार (wise).

MIGRATE *v.* (*migrare*) remove from one country to another देश पालटणें, देशांतर क. [pass from a colder to a warmer climate in the autumn, returning again in the spring;—said of birds] [from]. —MIGRATION देशांतर *n*, स्थलांतर *n*, थारे-पालट.—MIGRATORY *a.* देशांतर करणारा; roving भटकत फिरणारा, फिरस्ता, फिरता (Tartars).

MILCH* *a.* दुपता, दुधाचा; m. cow दुपती गाय *f*, धेनु *f*.

MILD* *a.* gentle in disposition मृदु स्वभावाचा, सौम्यवृत्ति, शांत; not fierce सौम्य, कोमल, मृदु, शांत (look); not acrid मवाळ, मृदु, हलका (emetic); not intense सौम्य, सुखकर, गुलाबी (air); m. medical treatment राजसी उपचार. -NESS मृदुता *f*, सौम्यता *f*, सात्विकपणा इ०.

MILDEW* भेकाडा, किडा.

MILE* अर्ध कोस, 'मैल.' -STONE मैलाचे खुणेचा दगड.

MILIARY *a.* (*milium,* millet) साव्याच्या दाण्या सारखा; small बारीक, मोहरी सारखा, मोहऱ्या (eruption); accompanied with an eruption like millet seeds पुरळाचा, पुटकुळीचा (fever).

MILITANT *a.* (*miles,* soldier) लढणारा, युद्ध-प्रवृत्त; church m., the Christian Church on earth, which is supposed to be engaged in a constant warfare against

its enemies, and is thus distinguished from the Church triumphant in heaven युद्धप्रवृत्त (ख्रिस्ती) मंडळी *f.* — MILITARY *a.* शिपाई, लष्करी, युद्धसंबंधी (discipline); engaged in the service of a soldier or of arms युद्धप्रवृत्त, शस्त्रोपजीवी (man); warlike लढाईचा (bravery); derived from the services or exploits of a soldier लढाईत -शिपाईगिरींत मिळविलेला, लष्करी (renown); conformable to the customs or rules of armies लष्करी कायद्या प्रमाणें -कायदेशीर : the conduct of the officer was not m.; m. tenure तैनात *f*; m. class क्षत्रिवर्ग; a m. man शिपाई; m. conduct क्षत्रधर्म; m. profession शिपाईगिरी *f*, शिपाई पेशा.—*n.* लष्कर *n*, फौज *f*.—MILITATE *v. i.* लढणें, भांडणें, आडवा येणें, विरुद्ध होणें -असणें [against].—MILITIA, body of soldiers in a state enrolled for discipline, but engaged in actual service only in emergencies शिवबंदी *f*; local m. हशाम शिवबंदी *f*.

MILK* a white fluid secreted by female mammals for the nourishment of their young दूध *n*; white juice of certain plants चीक, रस; emulsion made by bruising seeds दूध *n*; m. of lime चुनवणी *f*; coagulated m. दहीं *n*; to fall off in yielding m. दुधास तुटणें; to begin to yield m. plentifully दुधाला फुटणें (a cow, &c.)—*v.* दूध काढणें -पिळणें, गाई -म्हैस पिळणें. -FEVER, fever which accompanies or precedes the first lactation दुधाचा ताप. -HEDGE शेर. -MAID गवळीण *f*. -MAN गवळी. -PAIL दुधाचें भांडें *n*, चरवी *f*. -SOP दुधांत भिजविलेला भाकरीचा तुकडा, दूधभाकर *f*; a soft, effeminate feeble-minded man दूधखुळा.—TOOTH दुधाचा दांत. -WHITE *a.* पांढरा, सफेत, गोरापान.—MILKY *a.* दुधाचा -केलेला; दुधासारखा; yielding milk दुधाळ, दुभता, दुभती; soft नरम, कच्चा; timorous भित्रा, मेणाचा, (heart). -WAY दूधगंगा *f*, आकाशगंगा *f*, मंदाकिनी *f*.

MILL* machine for grinding जातें *n*, चक्की *f*; the building, with its machinery, where grinding, or some process of manufacturing, is carried on दळण्याचा वगैरे कारखाना; oil-m. तेलाचा घाणा; sugar-cane -m. चरक; wind -m. पवनचक्की *f*; water -m. पाणचक्की *f*.—*v.* दळणें; stamp in a coining-press ठसा-शिक्का मारणें. -ER दळणारा, दळपी. -COG दांत, दांता. -STONE जात्याची तळी *f*, पेड *n*. -TOOTH दाढ *f*.

MILLENARY *a.* (*mille*, a thousand) हजाराचा. —*n.* हजार वर्षे *n pl*, वर्षसहस्र *n*; MILLENNIUM वर्षसहस्रक *n*; [a word used to denote the thousand years mentioned in the twentieth chapter of Revelations, during which period Satan will be bound, and holiness decome triumphant throughout the world]. —MILLENIAL *a.* वर्षसहस्रक संबंधी.

MILLET (*milium*) सावा.

MILLINER (from *Milaner*, an inhabitant of *Milan*, in Italy) स्त्रियांच्या टोप्या करणारी स्त्री *f*, 'मिलिनर' *f*.—MILLINERY स्त्रियांचे पोषाकाचें टोप्या, पट्या वगैरे सामान *n*.

MILLION *a.* (*mille*, a thousand) दाहा लाख, दशलक्ष; a very great number लाख, हजार.—MILLIONAIRE लक्षाधीश, कोट्याधीश, नवकोटनारायण.

MILT* sperm of the male fish नरमाशाचें अंड *n* -बीज *n*; spleen पाणथरी *f*.—MILTER नरमासा.

MIMIC (*Gr. mimikos*) नकल्या, नकली, भांड.—*v.* नकल क., वाकुल्या दाखविणें.—*a.* नकलेचा; नकल करणारा, नकल्या.—MIMICRY नकल *f*, वाकुल्या *f pl*, वेकावल्या *f pl*.

MINARET *Ar.* मनोरा, शिखर *n.*

MINCE* *v.* cut into very small pieces बारीक बारीक तुकडे क., फोडी क.; to m. meat खिमा क.; clip, as words or expressions बोलतांना शब्द गिळणें, खाऊन बोलणें. —*i.* चाखत माखत -डोलानें बोलणें; strut ठमकत -झमकत चालणें.

MIND* (*mens*) the intellectual or rational faculty in man मन *n*, चित्त *n*; understanding बुद्धि *f*; opinion मनोगत *n*, अभिप्राय: tell me your m.; choice मर्जी *f*, खुशी *f*, मनशी *f*; purpose हेतु, मन *n*, मनोदेश (Prov. xxi., 27); courage धैर्य *n*, हिमत *f*; desire मनोरथ, इच्छा *f*; memory स्मरण *n*, ध्यान *n*, आठवण *f*: keep in m.; application of m. मनोनिवेश; to give the m. चित्त देणें; exercise of m. मनोव्यापार; to put in m. याद देणें, आठवण क.; working of the m. मनोविकार; control of the m. मनोनिग्रह; flashing across one's m. स्फुरण *n*.—*v.* चित्त देणें, मन लावणें, ऐकणें. -ED प्रवृत्त, प्रवण. -FUL *a.* मनांत धरणारा -ठेवणारा, सावध. -LESS *a.* गैरसावध, अनवधान; forgetful गफलत्या, धांदल्या.

MINE *F.* pit from which minerals are dug खाण *f*, खाणी *f*; cavity filled with powder, formed in or under a fortification or other work, so as to destroy it when fired सुरुंग; rich source of wealth or other good खाण *f*, दुभती गाय *f*, आगर *n*: a m. of good qualities गुणनिधि, गुणांची खाण *f*.—*v. i.* खाण खणणें; सुरंग पाडणें; form a burrow in the earth बीळ -बिवर पाडणें.—*t.* सुरंगानें उडवणें, सुरंग लावून पाडणें.—MINER खाण खणणारा, बेलदार; सुरंग्या, सुरंगपाड्या.—MINERAL खाणींतील वस्तु *f*, खनिज पदार्थ -वस्तु *f*, धातु *f*.—*a.* खाणींतला, खनिज; impregnated with minerals धातूच्या गुणाचा, धातुव्याप्त, धातुधर्मक (spring). -IST, -OGIST धातुवेत्ता -परीक्षक. -OGY धातुविद्या *f*.

MINGLE* *v.* mix मिसळणें, मिळवणें; mix confusedly भेळमेळ क., खिचडी क.; associate in society or by ties of relationship मंडळींत -गोत्रांत मिळणें; render impure अशुद्ध क., विटाळविणें.—*i.* मिळणें, मिसळणें इ०

MINIATURE (*minium*) लहान आकाराची तसबीर *f*, पुतळी *f*.

MINIMUM (*L.*) कनिष्ठ पक्षाची संख्या *f*, कनिष्ठ मान *n*.—MINIM, any thing very minute अणु, अणुमात्र; the smallest liquid measure, a single drop थेंब, बुंद; a note in music दीर्घस्वर; a small being -ह्रस्वमूर्त्ति *f*, बुटबैंगण *n*.

MINION *F.* one who gains favors by flattery कृपेंतली असामी *f*, नाकाचा बाल; a small kind of type;

this line is composed in m. type.

MINISTER (*minus*, less) servant चाकर, सेवक; one to whom a king or prince intrusts the direction of affairs of state प्रधान, मंत्री, दिवाण, वजीर; agent कारभारी, गुमास्ता; ambassador राजदूत, राजाचा वकील; one who serves at the altar उपाध्या; pastor of a church duly authorized or licensed to preach the gospel and administer the sacraments ख्रिस्ती मंडळीचा दीक्षित किंवा सनदी पाळक.—*v. i.* सेवा -चाकरी क.; afford supplies पुरवणें, देणें, शुश्रुषा क. — *t.* देणें, पुरवणें. -IAL *a.* सेवेचा, सेवे संबंधी, उपचारक; कारभाऱ्याचा, प्रधानाच्या कामाचा. — MINISTRATION सेवा *f*, चाकरी *f*; वांटणी *f* पुरवणी *f*. —MINISTRY प्रधानकी *f*, वजिरी *f*, दिवाणगिरी *f*; उपाध्येपण *n*, पौरोहित्य *n*; the body of ministers of state प्रधानमंडळी *f*, मत्रि-

गण; उपाध्ये मंडळी *f*, पुरोहितगण; business काम *n*, कार्य *n*; instrumentality साधकत्व *n*, द्वार *n*, साधकपणा.

MINIUM (*L.*) शेंदूर.

MINOR *a.* (*L.*) inferior लहान, कनिष्ठ, गौण; of little account किरकोळ, गैर, अडपझडप.—*n.* a person of either sex under age लहान, बाल, अप्रौढ, क्रियाबाल; *Logic* उत्तरपक्ष. -ITY बालावस्था *f*, बालदशा *f*, अप्राप्तव्यवहारदशा *f*; the smaller number लहान संख्या *f*, न्यूनपक्ष.

MINSTREL (See MINISTER) वाजविणारा आणि गाणारा, संगीतकुशल; celestial m. गंधर्व.

MINT* place where money is coined टांकसाळ *f*.—*v.* नाणें पाडणें; fabricate बनावट क.

MINT* पुदीना; spear-m. पाहडी पुदीना.

MINUTE *a.* (*minuere*, to lessen) फार लहान, बारीक, अतिसूक्ष्म; particular बारीक विचारी, बारीक पाहणारा -विचार करणारा, सूक्ष्मदर्शी.—*n.* sixty seconds अडीच पळें *n pl*, 'मिनिट' *n*; small portion of time निमिष *n*, पळ *n*, क्षण; *Geom.*, sixtieth part of a degree कला *f*; short sketch in writing टिपण *n*, टांचण *n*.—*v.* टांचणें, टिपणें. -BOOK टिपणाचें पुस्तक *n*, टिपणवही *f*. [-GUN, a gun discharged every minute, as a signal of distress or mourning]. -HAND घड्याळांतील मिनिटाचा कांटा, मिनिटकांटा. -LY *ad.* क्षणोक्षणीं, प्रतिक्षणीं; बारकाईनें.—MINUTIÆ *pl.* बारीक -सूक्ष्म गोष्टी *f*.

MIRACLE (*mirari*, to wonder) चमत्कारिक गोष्ट *f*; an event or effect contrary to the established constitution and course of things, or a deviation from the known laws of nature चमत्कार (Acts ii., 22).—MIRACULOUS *a.* चमत्कारिक, अद्भुत; performed supernaturally चमत्कारिक -अमानुष शक्तीनें केलेला. -LY *ad.* चमत्कारानें, अमानुष -दैवी शक्तीनें.

MIRAGE *F.* an optical illusion arising from an unequal refraction in the lower strata of the atmosphere, and causing remote objects to be seen double, as if reflected in a mirror, or to appear as if suspended in the air. It is frequently seen in deserts, presenting the appearance of water मृगजल *n*.

MIRE* चिखल, रेंदा.—MIRY *a.* चिखलाचा, रेंद्याचा.

MIRROR (*mirari*, to wonder) a looking-glass आरसा, दर्पण *n*; pattern नमुना, कित्ता, प्रतिमा *f*.

MIRTH* थट्टा *f*, मस्करी *f*, विनोद, हास्यविनोद, -FUL *a.* उल्लासी, विनोदी, आनंदी. -LESS *a.* उदास, बेरंग.

MISACCEPTATION गैरसमजूत *f*, विपरीत ग्रह.

MISADVICE *v.* भलताच सल्ला देणें, कुमंत्र सांगणें.

MISALLEGE *v.* भलता वांका -गैर समजावणें.

MISANTHROPE (*Gr.* *-anthropos*, a man) माणूसघाण्या.—MISANTHROPY माणसाचा कंटाळा, माणूसघाण *n*, जनद्रोह.

MISAPPLY *v.* अन्यथा-वृथा खर्च क., कुप्रयोग क.—MISAPPLICATION कुप्रयोग, असत्प्रयोग, अनाठायीं खर्च;—of money असद्व्यय.

MISAPPREHEND *v.* भलतेंच समजणें, गैरसमजूत होणें.—MISAPPREHENSION गैरसमजूत *f*, अन्यथाबोध -ग्रह.

MISAPPROPRIATION गैरशिस्त -असत् उपयोग क., अफरातफर *f*.

MISBEHAVE *v. i.* गैरचालीनें चालणें, गैराशिस्त वागणें.—MISBEHAVIOR गैरचाल *f*, बदचाल *f*.

MISBELIEF मिथ्या विश्वास, अन्यथा श्रद्धा *f*.

MISCALCULATE *v.* चुकणें, गलत क., हिशेबांत -अजमासांत चुकणें.

MISCARRIAGE दुराचरण *n*, वाईट चाल *f*; failure फसगत *f*, बूड *f*; premature birth गर्भपात -स्राव.—MISCARRY *v.* फसणें, हरणें, खचणें; not to reach its destination ठिकाणीं-पल्यास न पोंचणें; दुवेतणें, पोटचें पडणें;—as of female animals गाभटणें, गाभ सांडणें [in].

MISCELLANY (*miscere*, to mix) mass of various kinds अनेक -किरकोळ वस्तूंचा संग्रह, मिसळ *f*; collection of various compositions अनेक विषयसंग्रही पुस्तक *n*.—MISCELLANEOUS *a.* अनेक जातीचा -प्रकारचा, नानाविध; किरकोळ.

MISCHIEF *F.* evil produced or effected, whether with or without intention वाईट *n*, खराबी *f*, नुकसानी *f*, अपकार; wickedness वाईट गोष्ट *f*, दुष्टपणा.—MISCHIEVOUS *a.* अपकारी, अपकारक (man, disposition) उपद्रवी; खोडकर, व्रात्य (boy).

MISCONCEPTION गैरसमजूत *f*, भ्रांति *f*, गैरवांका.

MISCONDUCT गैरवहिवाट *f*; wrong conduct गैरचाल *f*, बदचाल *f*, दुराचरण *n*.

MISCONSTRUE *v.* उलटा -विपरीत अर्थ क. -समजणें.—MISCONSTRUCTION विपरीत अर्थ, अन्यथाबोध.

MISCOUNT *v.* मोजण्यांत चुकणें.

MISCREANT (*-credere*, to believe) infidel नास्तिक; one who embraces a false faith असत्मतावलंबी; vile wretch दुर्जन, अधम, खल, करटा.

MISDEED दुराचरण *n*, कुकर्म *n*.

MISDEMEANOR, See MISCONDUCT.

MISEMPLOY, See MISAPPLY.

MISER (*L.*) wretched कृपण, अदत्त. -LY *a.* कृपण, लोभी, चिकू.—MISERABLE *a.* very unhappy अति दुःखी, विपत्तींत -हालांत पडलेला; causing unhappiness दुःखकारक; worthless खराब, नादान; mean हलका, पाजी. — MISERABLY *ad.* कृपणपणानें; अति दुःखानें; भिकारपणानें; अधम -नीच वृत्तीनें.—MISERY अति दुःख *n*, कंगाली *f*, हाल, *pl* कष्ट *pl*; calamity अरिष्ट *n*, विपत्ति *f*, आपदा *f*.

MISFORTUNE दुर्दैव *n*, दुर्भाग्य *n*; calamity अपाय, अरिष्ट *n*; m. personified अवदसा *f*, अकाबाई *f*; m. from heaven, as bad seasons, storms, draughts, &c. आफत अस्मानी; misfortune from the tyranny of the government आफत फरमानी *f*, or सुलतानी *f*.

MISGIVE *v. i.* शंका -आशंका घेणें -खाणें.—MISGIVING शंका *f*, दिक्कत *f*, वहीम.

MISGOVERN *v.* अधर्मानें अन्यायानें राज्य क.; वाईट रीतीनें अम्मल क., बदअमल चालवणें.

MISGUIDE *v.* चुकवणें, भ्रांतींत पडणें.

MISHAP अवचट *n*, विपत्ति *f*, अरिष्टापात.

MISINFORM *v.* भलतेंच समजावणें, गैरसांगणें.

MISINTERPRET *v.* खोटा अर्थ क. -समजावणें; खोटा अर्थ समजणें.—MISINTERPRETATION खोटा अर्थ -तर्जुमा; उलटी समजूत *f*, विपरीत ग्रह.

MISJUDGMENT मिथ्या विचार, अन्यथा संभावना *f*.

MISLAY *v.* भलत्याच जागीं ठेवणें; lose गमावणें, गहाळणें, गळफटणें.

MISLE *v. i.* (from *Mist*) बुरंगट पडणें, बुरबुर पडणें.

MISLEAD *v.* भलत्या वाटेनें नेणें, भुलविणें, बहकविणें; फसविणें.

MISMANAGE *v.* गैररीतीनें वहिवाटणें -चालवणें. -MENT गैरवहिवाट, *f* अव्यवस्था *f*; अन्यथा आचरण *n*, दुराचरण *n*.

MISNAME *v.* चुकून -भ्रांतीनें भलतें नांव देणें.

MISNOMER *F.* खोटें नांव *n*, मिथ्यानाम *n*.

MISPERSUASION गैर-उलटी समजूत *f*, अन्यथाग्रह.

MISPLACE *v.* अनाठाई ठेवणें.

MISPRINT छापण्याचा दोष, छापण्यांतील चूक *f*.

MISPRONOUNCE *v.* अशुद्ध उच्चार क.

MISREPRESENT *v.* गैरवांका -खोटा मजकूर समजावणें.

MISRULE अंधाधुंदी *f*, बचबच *f*; unjust domination जुलूम, बदअम्मल, अंधेर.

MISS (contr. from Mistress) young woman or girl तरुण बायको किंवा मुलगी *f*; [prefixed to the name of an unmarried female: *Miss* Carpenter.]

MISS* *v.* fail of hitting, reaching, or finding निशाण -टिपण चुकणें, न पावणें, न मिळणें, मुकणें, अंतरणें; omit गाळणें, सोडणें; feel the want of गरज वाटणें, नाहीं असा पाहणें, ओका दिसणें.—*i.* चुकणें, न लागणें; हरणें, फसणें; मुकणें, अंतरणें [of]; चुकणें, भ्रांतींत पडणें.—*n.* चूक *f*, भ्रांति *f*, भ्रम; हानि *f*, अभाव, तोटा.

MISSHAPE *v.* बेडौल क.— MISSHAPED *a.* बेडौल, कुरूप, विरूप.

MISSION (*mittere*, to send) पाठविणें *n*, प्रेरणें *n*, पाठवणी *f*; errand निरोप; duty on which one is sent प्रेषितत्व *n*, दौत्य *n*, दूतपणा; persons sent पाठवलेले लोक *pl*, प्रेरितगण *pl*; embassy दुतांची -वकिलांची मंडळी *f*; station or residence of missionaries मिशनाचें ठाणें *n* -ठिकाण *n*, 'मिशन, *n*; association or organization of missionaries मिशनेरींची मंडळी *f*, 'मिशन' *n*. -ARY, one who is sent upon a mission कामगिरीवर पाठविलेला मनुष्य, दूत; one sent to propagate religion धर्मप्रसारार्थ पाठविलेला मनुष्य, 'मिशनेरी.'—*a.* मिशनासंबंधी, मिशनाचा.—MISSILE *a.* फेंकायाचा, क्षेपनीय.—*n.* फेंकायाचें शस्त्र *n*, अस्त्र *n*, (भाला, तीर इ०).

MISSPEAK *v.* बोलण्यांत चुकणें -घसरणें.

MISSPELL *v.* अक्षर चुकून लिहिणें -बोलणें.

MISSPEND *v.* अनाठाई -अपात्रीं खर्च क., दुर्व्यय -अपव्यय क.

MISSTATE (See MISREPRESENT). -MENT खोटा बाहणा, मिथ्यावाद, मिथ्याकथन *n*.

MIST* fog धुकें *n*, धुई *f*; anything which dims and obscures vision धूर, धुंदी *f*: his passions cast a m. before his sense *f*.—MISTY *a.* धुक्याचा; अधुंक, मंद.

MISTAKE* taking wrongly गैरसमजूत *f*, भ्रम; error चूक *f*, भ्रांति *f*; fault दोष, अपराध; no m. खचीत, ठास, ठाम.—*v.* चुकून वाटणें, गैरसमजूत होणें; चुकणें [for].—*i.* चुकणें, भुलणें, घसरणें.—MISTAKEN *a.* भ्रम झालेला, भ्रांत; अशुद्ध, चुकीचा.

MISTER (See MASTER) धनी; a title or form of address to any adult male, nearly always written in the abbreviated form *Mr.* साहेब, 'मिस्तर.' —MISTRESS धनीण *f*, मालकीण *f*; a sweetheart प्रिया *f*, कांता *f*; a concubine राख *f*, उपपत्नी *f*;—of a family यजमानीण *f*;—of a house घरधनीण *f*, मालकीण *f*, बाई *f*; a female well skilled in anything सुगरण *f*; —of a school पंतोजीण *f*.

MISTRUST अविश्वास, संशय; surmise वहीम. —*v.* अविश्वास -शंका असणें -धरणें, बेभरोसा मानणें.

MISUNDERSTAND *v.* उलटणें, समजणें, गैरसमज होणें. -ING उलटी समजूत *f*, गैरसमजूत *f*, भ्रांति *f*; disagreement वांकडें *n*, वैमनस्य *n*, बेबनाव.

MISUSE *v.* खुंदळणें, घुसडणें; (See MISAPPLY).

MITE* *a.* small insect किडा, सूत *n*; a very small piece of money कवडी *f*, दमडी *f*, छदाम, बदाम.—*n*; [twentieth part of a grain]; a very little quantity सुतळीचा तोडा, सुपारीचें खांड *n*, नखभर, अणुमात्र; widow's m. सुदाम पोहे *pl*.

MITIGATE *v.* (*mitis*, mild) हलका क., शमवणें; alleviate दुःख कमी क.—MITIGATION उतार, उपशम; दुःखशमन *n.*

MITRE (*mitra*, turban) उपाध्याचा मुगुट.

MITTIMUS (*L.*) warrant granted by a justice for committing to prison a party charged with crime कैदीस तुरंगांत घालण्याचा हुकूम -चें वारंट *n*, महबुस सनद *f*; writ for removing records from one court to another एका कोडतांतून दुसऱ्या कोडतांत दप्तर नेण्याचा हुकूम.

MIX* *v.* blend मिसळणें, मिळवणें, एक -एकत्र क.; associate संगत धरणें, सोबतींत -मंडळींत जमणें -जाणें; mingle कालवणें, गोंधळ क.; form by mingling मिसळून क. -बनावणें.—*i.* मिळणें, मिसळणें, मिळून जाणें. -ED मिसळलेला, मिश्र, मिश्रित.—MIXTURE मिसळ *f*, मिश्रण *n*; *Med.* a kind of liquid medicine made up of many ingredients निरनिराळे वाणे मिसळून केलेलें पातळ औषध *n*, 'मिक्श्चर' *n*;—of castes वर्णसंकर, एकबाट; —of coins, of languages, of rice and pulse खिचडी *f*.

MIZZLE, See MISLE.

MOAN* audible expression of sorrow or suffering कन्हणें *n*, कुंथणें *n*, हायहूय *f*; lamentation विलाप, शोक.—*v.* कन्हणें, कुंथणें, हायहूय क.; विलाप क.

MOAT *F.* किल्या भोंवतालचा खंदक -चर.

MOB (*mobile vulgus*, the movable common people) collection of people for some riotous or unlawful purpose दंगल *n*, बंडाळीची मंडळी *f*.—MOBILE साधारण लोक *pl*, कोळी माळी *pl*, तेली तांबोळी *pl*.

MOBILITY (*mobilis*, movable) गमनयोग्यता *f*; activity चपलता *f*, चांचल्य *n*; fickleness चंचळपणा, चंचळ बुद्धि *f*.

MOCK *v.* (*Gr. mokan*, to mock) imitate in contempt or derision वेडावणें, वाकुल्या दावणें; deride, उपहास -टेर क., [at].—*n.* थट्टा *f*, उपहास, टेर. -ER उपहासक, थट्टेखोर; ठक, फसविणारा. -ERY, sportive insult or contempt कुटाळी *f*, चेष्टा *f*, टवाळी *f*; contemptuous merriment at persons or things वचेरी *f*, उपहास; false show कपट *n*, सोंग *n*, कपटवेष; vain effort वृथाप्रयत्न, रिकामी खटपट *f*.

MODE (*modus*, a measure) manner रीत *f*, ढब *f* शैल *f*: m. of speaking; manner of existing रूप *n*, आकार, प्रकार; prevailing popular custom लोकाचार, सभ्यसंप्रदाय, प्रघात, रिवाज, दस्तूर: a man of the m.; variety प्रकार, भेद; *Metaph.* condition स्थिति *f*; form as opp. to *matter* आकार, रूप *n*; *Gram.* वाच्यरूप *n*; *Music*, वर्ग, राग. —MODEL standard प्रमाण, धडा; pattern नमूना, सांचा; representation प्रतिमा *f*, नकाशा, उपमा *f*.—*v.* घडणें, बनावणें, नमुन्या प्रमाणें क.—*i.* नमूना -सांचा क.: to m. in wax.

MODERATE *a.* (do.) kept within bonds नेमस्त, बेताचा; —in size मध्यम, मध्य परिमाणाचा;—in eating मितहारी, मितविहारी; as language मर्यादेचा, शांत, नेमस्त; mild सौम्य, हितकारी (weather); limited as to attainments in knowledge साधारण, मध्यम, सुमाराचा: a man of m. abilities.—*v.* नेमस्तमाफक क.; मर्यादेंत ठेवणें.—*i.* शांत -थंड होणें, रग कमी होणें, थंडावणें. -LY *ad.* सुमारानें, नेमस्त; m. warm मंदोष्ण; m. ripe अर्धकच्चा; m. distant बराच दूर.—MODERATION नेमस्तपणा, परिमिति *f*;—in desires अल्पाभिलाष; frugality काटकसर *f*, दक्षता *f*; equanimity थंड -शांत स्वभाव, समानवृत्ति *f*, समभाव: to bear adversity with m.—MODERATOR नियंता, दमनकरणारा; the per-

son who presides over a meeting or assembly of people to preserve order, propose questions, regulate the proceedings, and declare the votes सभाध्यक्ष; one who presides at a discussion वादसभाध्यक्ष.

MODERN *a.* (*modernus*, from *modo*, just now) नवा, अर्वाचीन, नूतन.—*n.* अलीकडचा मनुष्य. -IZE *v.* नवा क.; नव्या गोष्टीस -चालीस योजणें -लावणें.

MODEST *a.* (See MODE) restrained within due limits of propriety or decency मर्यादशील, सलज्ज, विनयी; observing the properties of the sex;—said of a female साध्वी, सती, कुलवंती;—as a wife पतिव्रता *f*; evincing modesty in the actor or author निगर्वाचा, निरभिमानाचा, नम्रतेचा (joy, request); moderate माफक, बेताचा, नेमस्त (estimate).—MODESTY मर्यादा *f*, लज्जा *f*, विनय; निरभिमान, निगर्वीपणा, नम्रता *f*; साध्वीपणा, पातिव्रत्य *n*; false m. मिथ्या विनय.

MODICUM (*L.*) अल्पांश, लेश, रती *f*.

MODIFY *v.* (*modus*, a measure, *facere*, to make) change the form or external qualities of रूप फिरवणें-पालटणें, रूपांतर क. फिरवणें; moderate माफक -नरम क., शमविणें.—MODIFICATION रूपांतर *n*, रूपभेद; माफक -नरम करणें *n*; रूप *n*; भेद.

MODISH *a.* (See MODE) दर्बारी, सभ्यसंप्रदायाचा, शिष्ट रीतीचा.

MODULATE *v.* (do.) form, as sound, to a certain key सूर बसविणें -लावणें -काढणें -घेणें, आलापणें; vary sound स्वरभेद क., खांचखोंच घेणें.—MODULATION स्वरभेद, खांचखोंच *f*, कत्तब *n*; स्वर काढणें *n*; melody सुस्वर, ताल, स्वरमाधुर्य *n*.

MOIETY (*medius*, middle) अर्धभाग, निमे *f*.

MOIL* *v.* भरणें, लिडबिडविणें.—*i.* श्रमणें, कबाडकष्ट क., हाडें झिजविणें, जिवाचा अटापिटा क.

MOIST *a.* *F.* moderately wet ओलसर, ओला आर्द्र; damp दमसर, दमट. -EN *v.* ओलावणें; ओलसर क. -NESS ओलसरपणा, आर्द्रता *f*. —MOISTURE ओलावा, आर्द्रता *f*;—of the lips अधररस, अधरामृत *n*.

MOLAR (*mola*, mill) दाढ *f*.—*a.* दळणारा.

MOLASSES (*mel*, *mellis*, honey) काकवी *f*, मळी *f*.

MOLE* (अंगावरचा) तीळ.—(*moles*) धक्का, घाट.—*D.* चिचुंदरी *f*. -HILL वारूळ *n*; to make mountains of *molehills* रजाचा गज क.

MOLEST *v.* (*moles*, a heavy mass) उपद्रव -इजा -त्रास देणें, छेडणें, छळणें [by]. -ATION पीडा *f*, तसदी *f*, उपद्रव, त्रास.

MOLLIFY *v.* (*mollis*, soft, *facere*, to make) नरम -मऊ क.; assuage, as pain शांत -उपशम क.; calm शांत -थंड क.; qualify हलका -कमी क. (demands).

MOLTEN *a.* (See MELT) ओतींव, सांच्याचा; made of melted metal ओतींव धातूचा.

MOMORDICA (*L.*)—muricata कटोळी *f*.

MOMENT (*movere*, to move) an instant पळ *n*, क्षण, निमिष *n*; importance महत्त्व *n*, भार, प्रत्यवाय; force वेग, जोर; in a m. क्षणांत; for a m. क्षणभर; at that m. तत्क्षणीं; every m. क्षणोक्षणीं, प्रतिक्षणीं. -ARY *a.* क्षणिक, क्षणभंगुर, एकापळाचा. -OUS *a.* भारी, वजनदार, महत्त्वाचा. -UM (*L.*) चालण्याचा जोर, वेग, गतिवेग.

MONAD (*Gr.* *monos*, alone) an ultimate atom अनुमात्र, अभेद्यवस्तु *f*.

MONARCH (*Gr.* *monos*, alone, *archein*, to rule) स्वतंत्र -मुखत्यार राजा, अधिराज; universal m. सम्राट्, चक्रवर्ती; king राजा;

one superior to all others of the same kind मुगुटमणि, ईश्वर, शिरोमणि, पति, अधिपति, in comp. राज, राजा, इंद्र : the m. of the wild beasts. -ICAL *a.* एक राजाच्या सत्तेचा, एकस्वामिक ; suited to a monarch बादशाही, राजकीय.—MONARCHY एकाधिपत्य *n*, एका राजाची सत्ता *f*; empire राज्य *n*.

NON-COMPLIANCE कबूल न करणें *n*, नाकबुली *f*, अस्वीकार.

NON-CONFORMIST अननुरोधी, अननुसारी; one who does not conform to an established church देशस्थापित राजधर्मविरोधी.

NON-CONDUCTOR ज्यांतून वीज किंवा उष्णता बाहेर जात नाहीं तो पदार्थ.

NON-DESCRIPT *a.* (*-descriptus*, described) अवर्णित, जाचा वर्ग लावितां येत नाहीं असा, विलक्षण.—*n.* विलक्षण पदार्थ, अवर्णित वस्तु *f*, अगडबगड *n*.

NONE* *a.* & *pron.* कोणी नाहीं, एकही नाहीं; not any अगदीं -सुतरां -कांहीं नाहीं.—NON-ENTITY, non-existence नाहींपणा, अभाव; thing not existing शून्य *n*, अवस्तु *f*. -EXISTANT *a.* न असणारा, अविद्यमान.

NON-PLUS (*-lus*, more) state in which one is unable to proceed or decide गोंधळ, घोळ, पेंच.—*v.* गोंधळांत पाडणें -घालणें निरुत्तर क., पछाडणें, मेख मारणें, कुंठित क.

NON-RESISTANCE अप्रतिकार.—NONSENSE कांहींचें बाहीं *n*, लटरफटर *n*, बडबड *f*; trifles सटरफटर *n*, अगडबगड *n*.—NONSENSICAL *a.* निरर्थक, अचावचा, बाष्कळ; to talk n. झकमारणें.

NONSUIT *v.* दावा रद्द क. -ED वादांत हरलेला.

NOOK *Ir.* कोपरा, कोन.

NOON (*nona*, the ninth hour) दुपारची वेळ *f*, दोनप्रहर; at n. दुपारीं; height of n. उभी -टळटळती दुपार *f*.—*a.* दुपारचा, माध्यान्हिक. -ING दुपारची वामकुक्षी *f*; a repast at noon दुपारचा फराळ.—NOON-TIDE दोनप्रहरचा, दुपारचा.—*n.* दुपार *f*, दोनप्रहर.

NOOSE *Ir.* सरफांस, निसरगांठ *f*; n. for the neck गळफांस; n. to entangle in नागपाश.

NOR* *conj.* हेंही -तेंही नाहीं, न.

NORMAL *a.* (*norma*, rule) नेमाप्रमाणें, नियमित; n. school पंतोजी तयार करण्याची शाळा *f*, 'नार्मल स्कूल' *n*.

NORTH* उत्तरदिशा *f*.—*a.* उत्तर, उत्तर दिशेकडचा, उत्तरेकडचा. -EAST ईशानी दिशा *f*.—*a.* ईशानी कडचा, पूर्वोत्तर. -ERLY *a.* उत्तरेचा.—*ad.* उत्तरेकडे; in a northern direction उत्तरेकडचा -ला, उत्तराभिमुख; proceeding from the northern point उत्तरेकडून निघणारा. -ERN *a.* being in the north उत्तरेस असणारा, उत्तरस्थ; in a direction towards the north उत्तर दिशेकडचा (course). -ING—of the sun उत्तरायण *n*. -POLE, -STAR उत्तर ध्रुव. -WARD उत्तरेकडे. -WEST वायव्य दिशा *f*.—*a.* वायव्य दिशेकडचा. -WIND उत्तरेकडचा वारा, उत्तरवायु, उतरण *f*.

NOSE* (*Skr. nâsâ*) the organ of smell नाक *n*; power of smelling वास घेण्याची शक्ति *f*; scent वास; snout मुसकाड *n*, मुसकट *n*; to blow the n. नाक शिंकरणें; to bore the n. नाक टोंचणें; to lead by the n. नाकीं वेसण घालणें; follow your n. नाकासमोर जा; to put one's n. out of joint नाक कापणें; to measure noses भेटणें, गांठ पडणें; to take pepper in the n. नाकांतले केंस जळणें; having the n. cut नकटा; to bleed at the n. नाक फुटणें; to thrust one's n. into लांडा -लुबरा कारभार क. -GAY फुलांचा झुबका -गुच्छ. -RING नथ *f*.—NOSTRIL नाकपुडी *f*.—NOZZLE सोंड *f*, तोंड *n*.

NOSOLOGY (*Gr. nosos*, disease, *logos*, discourse) science of diseases रोगनिदानशास्त्र *n*.

NOSTRUM (*nos*, we) quack medicine जडीबुट्टी *f*, वल्ली *f*, औषध *n*.

NOT* *ad.* नाहीं.

NOTCH *D.* nick सड, कात्रा, खांड *f*; as cut in

a tree, made in a wall, &c., for the foot पावडा; as cut to facilitate breaking तोड *f*; as made for or worn by a rope करकोंचा.

NOTE (*nota*) a mark खूण *f*, निशाणी *f*, चिन्ह *n*; mark to call attention इशारत *f*; memorandum टिपण *n*, टीप *f*; a brief remark टीप *f*, टीका *f*; short letter चिठ्ठी *f*, 'नोट' *f*; promissory n. चिठ्ठी *f*, दस्तऐवज; bank n. 'नोट' *f*, ब्यांकनोट' *f*; *Mus.* tune सूर, स्वर; notice धोरण *n*, लक्ष *n*; reputation आबरू *f*, प्रतिष्ठा *f*, नांव *n*.—*v.* लक्ष देणें, ध्यान देणें -लावणें; टिपणें, टांचणें, मांडणें; टीका लिहिणें -क. -BOOK स्मरणवही *f*.—NOTED *a.* प्रसिद्ध, महशूर, विख्यात.—NOTABLE *a.* लक्षांत ठेवण्याजोगा, स्मरणीय; प्रसिद्ध, विख्यात; smart हुशार, चलाख; plain स्पष्ट, उघड; a n. housewife सुगरण *f*. [for].—NOTARY करारनामे वगैरे कागदपत्रांवर शिक्का करणारा, दबीर. —NOTATION अंकन *n*; *Mus.* numerical n. प्रस्तर.—NOTICE नजर *f*, दृष्टि *f*; heed लक्ष *n*, अवधान *n*, ध्यान *n*; intelligence बातमी *f*, खबर *f*, सूचना *f*, इशारत *f*; writing containing formal, customary, or presented information प्रसिद्धिपत्र *n*, जाहिरात *f*, 'नोटिस' *f*; respectful treatment आदरसत्कार, सन्मान, संभावना *f*.—*v.* पाहणें, लक्षांत आणणें; pay attention लक्ष देणें, धोरण ठेवणें -राखणें; make observation on -विषयीं लिहिणें -बोलणें, गोष्ट काढणें: the plant deserves to be *noticed* in this place; treat with attention and civilities आदरसत्कार -संभावना क. -ABLE *a.* लक्षांत ठेवण्याजोगा, लक्ष्य.—NOTIFICATION जाहिरात *f*, जाहीरनामा; कळवणें *n*, ज्ञापन *n*, सुचवणें *n*, सूचना *f*; paper giving notice जाहिरात *f*, जाहीरनामा.—NOTIFY *v.* make known कळवणें, जाहीर क.; give notice to सुचवणें, खबर देणें [to].

NOTHING* not anything कांहीं नाहीं; nonentity नास्तित्व *n*, अभाव; not any thing of account किंमत *f*, कथा *f*, केवा (Is. xli., 24); trifle हलकी गोष्ट *f*, कस्पदार्थ *f*; a mere n. परसांतली भाजी *f*; for n. फुकट, फुकटवारी; to go for n. पोकळीस जाणें; to make n. of तृणवत मानणें; to serve for फुकट -पोट बांधून चाकरी क.—*ad.* कांहींच नाहीं, अगदीं नाहीं.

NOTION (*noscere*, to know) idea कल्पना *f*, तर्क, ग्रह; opinion मत *n*, बुद्धि *f*; high *notions* पत्राज *f*, मिजास *f*; तोरा, आढ्यता *f*; intention बेत, मनोदय. -AL *a.* कल्पित, काल्पनिक, कल्पनेचा (things); fanciful छांदिष्ट, तऱ्हेवाईक, लहरी.

NOTORIOUS *a.* (See NOTE) प्रसिद्ध, विख्यात जगजाहीर; in an ill sense डंका वाजलेला, बाजार महशूर -निरख; to be n. डंका वाजवणें, दिवा लावणें [for].—NOTORIETY प्रसिद्धि *f*, उघडीक *f*, लौकिक; in an ill sense बोभाटा, बभ्रा, धांडोरा.

NOTWITHSTANDING *prep.* असें असतांही, तथापि, तरी.

NOUGHT, See NAUGHT.

NOUN (*nomen*) *Gram.* नाम *n*; n. of agency कर्तृवाच्य *n*; n. animate प्राणिवाचक; abstract n. भाववाचक; gentile n. जातिवाचक; instrumental n. कारणवाच्य; simple n. भाववाच्य; verbal n. क्रियावाचक.

NOURISH *v.* (*nutrire*) feed and cause to grow पोसणें, पाळणें, वाढविणें; encourage धैर्य -दिलासा देणें; comfort सांत्वन -समाधान क.; instruct शिकविणें, बोध क. -ER पालनपोषण करणारा; that which nourishes पौष्टिक. -ING *a.* पौष्टिक, धातुपोषक. -MENT पालन *n*, प्रतिपालन *n*; food अन्न *n*, भक्ष्य *n*, आहार.

NOVEL *a.* (*novus*, new) नवा, नवका; strange नवा, अद्भुत.—*n.* कल्पित कथा *f*, गोष्ट *f*, कादं-

बरी *f*, 'नाव्हेल' *n*. -TY नवेपणा, नूतना *f*; new thing अपूर्व वस्तु *f*, नवल *n*, कौतुक *n*; विलक्षणता *f*, अपूर्वता *f*, नवलाई *f*. -IST कादंबरी लिहिणारा.

NOVEMBER (*novem*, nine) इंग्रजी सालाचा अकरावा महिना, कार्तिक-मार्गशीर्ष.

NOVICE (*novus*, new) नवशिका, नवीन अभ्यासी; [one newly received into the church, 1. Tim. iii., 6].—NOVICIATE नवशिकेपणा; time of probation नवशिकेपणाचा काळ, नूतनाभ्यासकाळ.

NOW* *ad*. at the present time आतां, सांप्रत, हल्लीं; in present circumstances असें असतां, तर; n. and then केव्हां केव्हां, कधींमधीं; till n. एथपावेतों, अद्याप. -ADAYS *ad*. सांप्रतकाळीं, आजकाळ.

NOWAY, -WAYS, -WISE *ad*. कोणत्याही प्रकारें नाहीं, कसाही नाहीं, सर्वथैव नाहीं.—NOWHERE, See under No.

NOXIOUS *a*. (*nocere*, to harm) वावडा, अपकारक, दुष्ट [to].

NUCLEUS (*nux*, nut) गर, गीर lit. fig.; any thing about which matter is collected समुच्चायास्पद, हृदय *n*.

NUDITY (*nudus*) नागवेपणा, नग्नता *f*; the nude human figure नग्नमूर्त्ति *f*, दिगंबर.

NUGATORY *a*. (*nugax*, jesting) हलका, पोकळ, व्यर्थ, निरर्थक.

NUISANCE (*nocere*) उपद्रव, पीडा *f*; *Law*, that which annoys or incommodes पीडा करणारी वस्तु *f*, पीडा *f*, उपाधि *f* [to].

NULL *a*. (*nullus*, none) व्यर्थ, निर्जीव, रद्द, पोकळ. -IFY *v*. मोडणें, रद्द -बातळ क.

NUMB* *a*. सुस्त, जड, सुना, बधिर.—*v*. बेशुद्ध -सुना क.

NUMBER (*numerus*) assemblage made up of distinct things expressible by figures संख्या *f*, सुमार, गणती *f*, गणणा *f*; multitude समुदाय, मेळा, समूह; *Poet. pl* कविता *f*; *Gram.* वचन *n*; *Math.* अंकडा, अंक; what n.? किती? an odd n. विषमसंख्या *f*; even n. समसंख्या *f*.—*v*. मोजणें, गणणें, आंकडा घालणें; लेखणें, मानणें, मोजणें; amount to गोळाबेरीज होणें, एकंदर मिळून भरणें. -LESS *a*. असंख्य, अगणित.—NUMBERS the fourth book of the Pentateuch गणना नामक जुन्या करारांतलें एक पुस्तक *n*.—NUMERAL अंकडा, अंक; *Gram.* संख्यावाचक.—*a*. संख्येचा, संख्यासंबंधी; संख्यावाचक (letter).—NUMERATION अंकाची मांडणी *f*, संख्यापरिमाण *n*.—NUMERATOR गणणारा, गणक; *Arith.* अंश.—NUMERICAL *a*. संख्येचा, संख्येसंबंधी; अंकड्यांचा, अंकात्मक; identical तोच, एकरूप.—NUMEROUS *a*. मोठ्या संख्येचा, पुष्कळ, बहुत; musical सुस्वर गायनाचा.

NUN (*nonna*) a woman devoted to a religious life, who lives in a cloister or nunnery, secluded from the world, under a vow of perpetual chastity विरक्तस्त्री *f*, गोसावीण *f*. -NERY गोसाविणींचा मठ.

NUNCIO (*novus*, new) messenger दूत, जासूद; [ambassador from the pope to a king].

NUPTIAL *a*. (*nuptiæ*, marriage) लग्नसंबंधी, वैवाहिक; constituting marriage विवाहात्मक; *pl* लग्न *n*, विवाह.

NURSE (*nutrire*, to nourish) one who nourishes प्रतिपाळ करणारा, पाळक; woman who has the care of young children मुलें संभाळणारी बायको *f*, आया *f*; woman who suckles an infant not her own दाई *f*, थानकरीण *f*, दूधकरीण *f*; woman who has the care of sick persons रोग्याची सेवा -संभाळ करणारी स्त्री *f*, बिमारदार *f* *Hind.*; to put to n. दाईच्या स्वाधीन क.; wet n. दाईपिलाई *Hind.*—*v*. संभाळणें, राखणें; पालनपोषण क.; रोग्याची चाकरी-शुश्रुषा क. [up, in, at].—NURSERY

मुलांची खोली *f*, बालगृह *n*;—of young trees रोपांची जागा *f*; fostering place पालनस्थान *n*.—NURSLING तान्हें मूल *n*.—NURTURE food आहार, भक्ष्य *n*; education शिक्षा *f*, शिकविणें *n*, शिक्षण *n*.—*v*. पालन-पोषण क.; शिकवणें, सुशिक्षित क.

NUT* टणक कंवचीचें फळ *n*, सकवच फळ *n*. -CRACKER अडकिता. -MEG जायफळ *n*. -SHELL कंवची *f*.

NUTRIMENT (See NURSE) भक्ष्य *n*, आहार; पौष्टिक पदार्थ.—NUTRITION भक्ष्य *n*, आहार, जीवन *n*; पौष्टिक पदार्थ.—NUTRITIOUS *a*. पौष्टिक, धातुपुष्ट.

NYMPH (*nympha*) *Myth*. goddess of the forests, or waters वन किंवा जलदेवता *f*; maiden कुमारिका *f*, तन्वंगी *f*.

O

O *int*. अरे, रे; in respect अहो, हे, हो.

OAK* एक वृक्ष आहे, सिंदूरवृक्ष.

OAKUM* जुने दोरीचा काथा.

OAR* वल्हें *n*; blade of an o. चपणी *f*; staff of an o. पतिंगा.—*v*. वल्हें मारणें.

OASIS *Ar*. वाळवंटांतील ओलाव्याची जागा *f*.

OAT* एक धान्य आहे.

OATH* a solemn affirmation or declaration, made with an appeal to God for the truth of what is affirmed शपथ *f*, आण *f*; careless and blasphemous use of the name of the Divine Being, or any thing divine or sacred, either by way of appeal or as a profane exclamation or ejaculation]; to administer an o. शपथ देणें -घालणें; to substantiate by o. क्रिया क.; to take an o. शपथ वाहणें -खाणें -घेणें -क. -BREAKING शपथभंग, क्रियानाश.

OBDURACY (*-durare*, to harden) मनाचा कठीणपणा, पापनिग्रह.—OBDURATE *a*. पश्चात्ताप न होणारा, अनुतापपराङ्मुख, हट्टी.

OBELISK (*Gr. obelos*, a spit) मनोरा, सूच्याकारस्तंभ; *Print*.† या प्रकारची खूण *f*.

OBEY *v*. (*-audire*, to hear) give ear to ऐकणें, मानणें; submit to the government of अधिकारांत -सत्तेंत -कह्यांत वागणें; yield to the impulse, power, or operation of वश होणें; comply with the order of हुकूम बजावणें, आज्ञा पाळणें.—OBEDIENCE आज्ञापालन *n* -धारण *n* -सेवन *n* [to].—OBEDIENT *a*. आज्ञेंत वागणारा, आज्ञाधारक -पालक, आज्ञांकित, हुकमी [to].—OBEISANCE नमस्कार, नमन *n*; profound o. साष्टांग नमस्कार.

OBJECT *v*. *i*. (*-jacere*, to throw) अडचण सांगणें, तकरार -दिकत घेणें.—*t*. bring into opposition आडवा आणणें; offer in opposition आडवा क., दोषरूपानें पुढें क. [to, against]; reproach with दोष लावणें, हिणावणें.—*n*. that with which the mind is occupied in the act of knowing विषय; in comp. गोचर, पात्र *n*: इंद्रियगोचर, कृपापात्र; that to which the desire is directed आशय, अर्थ, हेतु, अभिप्राय; *Gram*. कर्म *n*.—OBJECTION शंका घेणें *n* -काढणें *n*; शंका *f*, आशंका *f*, हरकत *f*, बाध. -ABLE *a*. आशंका घेण्याजोगा, बाध्य.—OBJECTIVE *a*. वस्तूचा, विषय संबंधी; *Metaph*. outward बाहेरचा, मनाच्या बाहेरचा, स्थूल; *Gram*. कर्मपद विषयक.

OBLATE *a*. (*oblatus*) दोहों बाजूंस चपटा.

OBLATION (*offerre*, to offer) बळी, देवोपहार.

OBLIGE *v*. (*-ligare*, to bind) constrain by moral or legal force बांधणें, भाग पाडणें, नाप्राप्त क.; bind by some favor rendered उपकारानें बांधणें; do a favor to -वर कृपा -मेहरबानी क. [by, in, with].—OBLIGATION अवश्य कर्त्तव्यता *f*, उपकार.—OBLIGATORY *a*. आवश्यक, नाप्राप्त [on].—OBLIGED आभारी -उपकारी झालेला;—by a favor उपकारबद्ध;

भाग पडलेला.—OBLIGING *a.* उपकारशील -बुद्धि, परोपकारी.

OBLIQUE *a.* (*obliquus*) slanting तिरकस, तिरपा; underhand उपरोधिक, उपरोधाचा, वक्र; collateral बाजूच्या नात्याचा, शाखा संबंधी; o. case, *Gram.* कारक विभक्ति *f*; o. speech वक्रोक्ति *f*; o. vision वक्रदृष्टि *f*.—OBLIQUITY तिरकेपणा, वांक, वक्रता *f*; deviation from moral rectitude चळ, विपथगमन *n*.

OBLITERATE *v.* (*litera,* letter) blot out पुसून टाकणें, बोळा फिरवणें; wear out झिजवणें, जीर्ण क. (ideas); reduce to a very low state मंद -हलका क. (pulse) [from, with].—OBLITERATION लोप करणें *n*, लोप; extinction लोप, संहार, समूळनाश.

OBLIVION (*oblivisci,* to forget) विस्मृति *f*, विसर; amnesty गुन्ह्याची माफी *f*, सूट *f*; in o. नांवनट; to bury in o. -वर माती टाकणें -धूळ लोटणें; to fall into o. सांडणीस पडणें; to cast into o. सांडणीस टाकणें.—OBLIVIOUS *a.* विसर -विस्मृति पाडणारा; forgetful विसराळू, विसऱ्या [of].

OBLONG *a.* (*-longus,* long) लांबोडा, दीर्घचतुरस्र.

OBLOQUY (*-loqui,* to speak) language that casts contempt on men or their actions निंदा *f*, अपवाद, गर्हा *f*.

OBNOXIOUS *a.* (*noxius,* hurtful) liable to censure दोष ठेवण्याजोगा, दोषपात्र; odious नावडता, अप्रिय, वीट येण्याजोगा; liable योग्य, पात्र, वश्य, अधीन; o. to punishment दंडयोग्य -पात्र;—to disease रोगाधीन [to].

OBSCENE *a.* (*obscenus*) offensive to chastity and delicacy अभद्र, बिभत्स, अवाच्य (language, picture);—of person विचकट, तोंडाचा फटकळ; filthy मळीण, हिडीस; inauspicious अशुभ, अमंगळ, अभद्रसूचक (birds).—OBSCENITY विचकटपणा, बीभत्सपणा; lewdness बदफैली *f*, दुर्भाषण *n*, दुरुक्ति *f*.

OBSCURE *a.* (*obscurus*) dark निस्तेज, निबिड; abstruse गूढ, खोल, दुर्बोध (inscription); living in darkness अंधारांत राहणारा (bird); retired आडवळणाचा, कुशीचा (place); unnoticed अप्रसिद्ध, सांदीकोंदीचा (person); not clear अस्पष्ट, अव्यक्त, पुसट, चुटपुट (view).—*v.* अंधक -मळकट -तेजहीन क.; अवघड -कठीण दुर्बोध क. [by, with].—OBSCURITY अंधकपणा, पुसटपणा; गूढता *f*, गहनता *f* अप्रसिद्धि *f*, अल्पप्रतिष्ठा *f*.

OBSEQUIES *pl.* (*-sequi,* to follow) प्रेतकर्म *n*, -क्रिया *f*, क्रिया *f*, प्रेतसंस्कार, मूठमाती *f*, मरतीक *n*.—OBSEQUIOUS *a.* आर्जवी, खुशामती [to].

OBSERVE *v.* (*-servare,* to keep) be on the watch respecting पाहणें, लक्षिणें, निरेखणें; regard with religious or ceremonious care पाळणें, करणें, आचरणें; utter as a remark बोलणें, ह्मणणें; obey मानणें, ऐकणें, पाळणें [with, from].—*i.* बोलणें, ह्मणणें; लक्ष देणें, लक्षांत ठेवणें.—OBSERVER लक्ष लावून -निरखून पाहणारा; पाळणारा, करणारा: an o. of the Sabbath; लक्ष्यपूर्वक अवलोकन करायास शिकलेला; पाळणारा, राखणारा: he is a strict o. of his word; पाळणारा, आचरणारा, चालविणारा: an o. of old customs.—OBSERVANCE पाहणें *n*, निरेखणें *n*; rule of practice नेम, विधान *n*; व्रत -नियम पालन *n*, आचरण *n*, अनुष्ठान *n*; one who is liberated from ceremonial *observances* and worldly restraints अवधूत.—OBSERVANT *a.* पाहणारा, लक्ष लावणारा, नजरबाज; पाळणारा, मानणारा; आचरणारा, करणारा; आज्ञापालक, आज्ञांकित [to].—OBSERVATION पाहणें *n*, निरेखणें *n*; निरीक्षा *f*, अवलोकन *n*; बोलणें *n*, भाषण *n*, चर्चा *f*; पालन *n*, आचरण *n*; *Science,* आकाशांतील ग्रहादिकांचा यंत्रांनीं वेध घेणें *n*, -हवा वगैरे मापणें *n*;

religious o. व्रत *n*, नियम.—OBSERVATORY तारांगण *n*, वेधशाला *f*.

OBSOLETE *a.* (*-solere*, to use) उपयोगांतून गेलेला, रद्द, माजी, लुप्त (words, observances).

OBSTACLE (*-stare*, to stand) अडथळा, अटकाव, नड *f*, विघ्न *n*, [to].—OBSTERIC *a.* प्रसवकर्म संबंधी -कर्ममोचनविषयक.

OBSTINATE *a.* (*do.*) stubborn हट्टी, दुराग्रही; not easily subdued or removed खिळणीचा, जडलेला, दुःसाध्य (fever, cough) [in]. -LY *ad.* हट्ट -खळ घेऊन, दाटून, बळेंच. —OBSTINACY, fixedness in opinion or resolution that cannot be shaken at all, or not without great difficulty दृढता *f*, धैर्य *n*, निग्रह; a fixedness that will not yield to persuasion, arguments, or other measure हट्ट, दुराग्रह, हेका, खळ.

OBSTREPEROUS *a.* (*-strepere*, to make a noise at) गलबल्या, बोलभांड.

OBSTRUCT *v.* (*struere*, to pile up) block up बंद क., बुजवणें, कोंदणें; impede आडवणें, प्रतिबंध -अटकाव क. [in, by]. -ION प्रतिबंध क. *n*; विघ्न *n*, अटकाव, प्रतिबंध, नड *f*.

OBTAIN *v.* (*-tenere*, to hold) मिळवणें, संपादणें [from, by].—*i.* subsist असणें; become prevalent चालणें, चालू होणें, प्रचारांत येणें. -ABLE *a.* मिळवायाजोगा, लभ्य, प्राप्य. -ED संपादित, प्राप्य, उपार्जित.

OBTRUDE *v.* (*trudere*, to thrust) बळेंच देणें, पदरीं घालणें -बांधणें; one's self आपलें घोडें पुढें ढकलणें, पुढें पुढें क. [on, upon].—*i.* न बोलावतां जाणें, घुसणें.—OBTRUSION बळेंच घालणें *n* -देणें.—OBTRUSIVE *a.* बळेंच घालणारा -पुढें करणारा.

OBTUSE *a.* (*-tundere*, to strike) blunt बोथट, बोथा, बिनअणीचा; dull जड, मंदमति; o. angle विशालकोन.

OBVIATE *v.* (*-viare*, to go) निवारणें, टाळणें, चुकवणें [by].—OBVIOUS *a.* उघड, स्पष्ट [to].

OCCASION (*-cadere*, to fall) occurrence घटना *f*; opportunity समय, प्रसंग, अवसर, वेळ; incident गोष्ट *f*, वृत्त *n*; need कारण *n*, प्रयोजन *n*; accidental cause निमित्त *n*, कारण *n*, उपाधि *f*.—*v.* कारण -निमित्त होणें; produce उद्भवणें, उत्पन्न क. [by]. -AL *a.* कधींमधींचा, अनित्य; नैमित्तिक, प्रासंगिक; produced by accident आगंतुक (origin). -LY *ad.* कधीं कधीं, केव्हां केव्हां; प्रसंगानें, प्रसंगानुरूप -सार.

OCCIDENTAL *a.* (*do.*) western पश्चिमेचा-कडला (climate); setting after the sun सूर्यामागून अस्त पावणारा (planet); possessing inferior hardiness, brilliancy, or beauty न्यून -कठिन तेज -प्रभ (gems).

OCCIPUT (*-caput*, head) मस्तकाचा पृष्ठभाग. —OCCIPITAL *a.* मस्तकाचा, पृष्ठभागाचा, शिरपृष्ठ संबंधी.

OCCULT *a.* (*-colere*, to till) गूढ, गुप्त, अप्रसिद्ध (guilt); o. sciences, those imaginary sciences of the middle ages which related to the supposed action or influence of occult qualities, or supernatural powers, as alchemy, magic, necromancy, and astrology चोरविद्या *f pl.*

OCCUPY *v.* (*-capere*, to take) hold वहिवाटणें, धरून -बाळगून असणें, बाळगणें; take possession धरून ठेवणें, अटपणें, गुंतवणें, आपलासा क.: the better apartments were already *occupied*; cover or fill; व्यापणें, भरणें, अटवणें; the camp *occupies* five acres of ground;—one's self खपणें, राबणें, गुंतणें; to be *occupied* रमणें; follow, as a business उद्योग -व्यवहार -व्यापार क. [by, with].—*t.* व्यापार -व्यवसाय क.; वहिवाटणें.—OCCUPANT

a. वहिवाटणारा, भोगणारा.— Occupancy वहिवाट *f*, भोग.— Occupation अटपणें *n*; कबज *n*, व्यापणें *n*; वहिवाट *f*, भोगवटा; employment धंदा, उद्योग, काम *n*.—Occupier वहिवाटणारा.

Occur *v. i.* (*-currere*, to run) be found here and there अढळणें, सांपडणें, पाहण्यांत येणें; meet or come to the mind आठवणें, मनांत येणें [to]. -rence घडणें *n*, उपस्थिति *f*; event गोष्ट *f*, वृत्त *n*.

Ocean (*Gr. okos*, quick, *nacin*, to flow; *Skr. ogha*, stream) समुद्र, सागर; one of the large bodies of water into which the great ocean is regarded as divided महासागर; immense expanse सागर, अर्णव: o. of trouble.—*a.* समुद्राचा (stream). -ic *a.* समुद्राचा, सागर संबंधी; found in the ocean समुद्रांतला, समुद्रांत मिळणारा; formed in the ocean समुद्रांत झालेला, समुद्रोद्भव समुद्रोत्पन्न.

Ochre, Ocher (*ochra*) काव *f*, गेरु *f*. -ous *a.* गेरूचा, कावेचा; गेरूच्या रंगाचा.

Octagon (*Gr. octo*, eight, *gonia*, corner) अष्टकोन, अष्टकोनाकृति *f*. -al *a.* अष्टकोन.

Octavo (*octo*, eight) अष्टपत्री पुस्तक *n*; अष्टपत्री पुस्तकाचा सांचा.

October (*do.*) इंग्रजी सालाचा दाहावा महिना, आश्विन -कार्त्तिक.

Octogenary *a.* (*octogeni*, eighty each) ऐशीं वर्षांचा.

Ocular *a.* (*oculas*, the eye) डोळ्यांचा, प्रत्यक्ष (proof); o. deception नजरभूल *f*.—Oculist डोळ्यांचा वैद्य, नेत्रवैद्य.

Odd *a.* *Sw.* not paired with another विजोड, विलग; not included with others फुटकळ, किरकोळ; not even विषम, विषम संख्येचा; peculiar विलक्षण, चमत्कारिक, अपरूप (phenomenon); queer तऱ्हेवाईक, विलक्षण. -ity एकचिन्ह *n*, कौतुक *n*, एक प्रकार; विलक्षण गोष्ट *f*, नवल *n*.—Odds *sing.* & *pl.* न्यूनाधिक *n*, विषमता *f*; advantage वर्चस्व *n*, उपराळा; o.-and-ends ऐलपैल सामान *n*, सटरफटर *n*.

Ode (*L.*) गीत *n*, कविता *f*, गजल *f*.

Odious *a.* (*odi*, to hate) द्वेषपात्र -योग्य; causing hate द्वेषकारक -जनक; offensive ओंगळ, त्रासदायक (sight) [to].—Odium द्वेष; offensiveness वाईटपणा, त्रासदायकत्व *n*.

Odor (*L.*) वास, गंध; fragrant o. सुगंध, सुवास; bad o. दुर्गंध, घाण *f*; to be put in bad o. मर्जीतून उतरणें. -iferous *a.* सुवासिक सुगंधिक (flowers); bearing scent सुगंधवाहक, सुवासिक (gales).

Œsophagus (*Gr.*) गळा, अन्नमार्ग -गति *f*.

Of* (*Skr. apa*) belonging to चा *m*, ची *f*, चें *n*; from पासून; noting subjection to, connection with चा *m*, ची *f*, चें *n*, कडे, विषयीं, संबंधी; denoting the material of anything चा *m*, ची *f*, चें *n*; o. late अलीकडेस; o. old पूर्वी.—Off *ad.* from, noting distance लांब, दूर; noting departure: he went o. तो निघून गेला;—the action of separating: to cut o. कापून टाकणें; to take o. काढून टाकणें; from, not toward बाहेर, सोडून: to look o.; badly o. अनुपपन्न; well o. चार पैसे बाळगून, घरचा सुखी; o.-and-on धरून, सोडून, धरसोडीनें; to be o. करार मोडणें; बेत सोडणें; to come o. निभावणें, वाचणें, बचावणें; घडणें, होणें; to get o. उतरणें, निभावणें; to go o. बार होणें, सुटणें; निघून जाणें; सोडणें; to be o. मागें सरणें, हात काढणें. -*prep.* निराळा, वेगळा; o. the ground भुईसांड; o. the road एकीकडे.—*a.* एलीकडचा, बाहेरचा, दूरचा, आगल्या: the o. ox in a team.

OFFAL *n.* (*off & fall*) waste meat उष्टें *n*, उच्छिष्ट *n*; putrid meat कुजकें मांस *n*; refuse गाळसाळ, खेर *f*, गाळ, निवड *f*.

OFFEND *i.* (*-fendere*, to thrust) displease मर्जी मोडणें, नाखुश क., रुसवणें; shock चिळस आणणें, कंटाळा -त्रास देणें (the eye, conscience); cause to fall पडायास लावणें; cause to sin पापांत पाडणें, पाप करायास लावणें (Matth. v., 29-30) [by, in, against]. —*t.* पाप क., आज्ञा मोडणें (Jam. ii., 10); to o. against -चा अपराध क. -ER अपराधी, गुन्हेगार.— OFFENSIVE *a.* राग आणणारा, चिरडीचा, तुटक (words); कंटाळवाणा, त्रासकारक, ओखट (smell, sound); used in attack मारक, मारू (weapon); invading चढाईचा, आगळिकीचा (war).

OFFER *v.* (*-ferre*, to bear) present for acceptance or rejection पुढें ठेवणें -क.; present in words सांगणें, पुढें क., दाखवणें: I o. thee two things; undertake पत्करणें, हातीं घेणें; present, as an act of worship वाहणें, अर्पिणें; sacrifice बळी देणें, अर्पिणें [up]; bid, as a price बोलणें, सांगणें, घे ह्मणणें;—as a reward देऊं करणें; to o. violence बळजोरी -जबरी -बलत्कार क. [to, for]. —*i.* येणें, पुढें होणें, उपस्थित होणें; declare a willingness पुढें होणें, सरसावणें, तयार -सिद्ध होणें: he *offered* to go मी जाईन ह्मणून बोलला; make an attempt यत्न करून पाहणें.—*n.* पुढें करणें *n*, निवेदन *n*; बोलणें *n*, सांगणें *n*; ह्मटलेलें मोल *n*, मागणें *n*. -ING बलीदान *n*.

OFFICE (*-facere*, to do) duty काम *n*, कर्त्तव्य *n*, धर्म; public charge अधिकार, हुद्दा, असामी *f*; place of business कचेरी *f*, "हपीस" *n*; company whose place of business is their office व्यापाराची मंडळी *f*, पेढी *f*; *pl* kitchens, pantries, &c. पडशाळा *f pl*; *Eccl.* service appointed for a particular occasion पद्धति *f*, विधानमाला *f*; kind *offices* उपकार *pl.* [for].—OFFICER कामदार, हुद्देदार, अधिकारी; military o. लष्करी अमलदार, सरदार, 'हपिसर.'— OFFICIAL *a.* अधिकाराचा, अमलाचा; सरकारी नात्याचा, सरकारी, अधिकारप्रयुक्त (report). o. order दप्तरी हुकूम.—*n.* खालचा -दुय्यम हुद्देदार. -LY *ad.* अधिकार परत्वें; सरकारी नात्यानें.— OFFICIATE *v.* काम -अधिकार क. -चालवणें; perform the appropriate official duties of another बदलीचें काम चालवणें -क.— OFFICIOUS *a.* लुडबुड्या, चोमड्या, लांडा कारभारी.

OFFSPRING (*off & spring*) संतान *n*, संतति *f*.

OFT, OFTEN* *ad.* वारंवार, वेळोवेळ, बहुत वेळां.

OGLE *v.* (*oculus*, the eye) डोळे मोडून पाहणें, डोळे मोडणें, तिरप्या डोळ्यानें पाहणें.—*n.* कटाक्ष, नेत्रपल्लवी *f*.

OH *interj.* आ, आय.

OIL* तेल *n*, तैल *n*; fixed o. स्थिरतेल *n*; volatile o. उडणारें तेल *n*.—*v.* तेल लावणें -माखणें -चोपडणें; to be *oiled* तेलकटणें. -CAKE पेंढ *f*. -CLOTH मेणकापड *n*, तेलकापड *n*. -COLOR तेल्यारंग, तेलाचा रंग. -MAN तेली. -NUT -TREE उंडी *f*, उंडीचें झाड *n*.—OILY *a.* तेलाचा, तेलासारखा, तेल्या (appearance); fatty गुळगुळीत, तेलकट (man);—a smell मेणकट, तेलकट; supple आर्जवी, तोंडदेख्या

OINTMENT (*ungere*, to anoint) उटणें *n*, माखण *n*.

OLD* *a.* not young ह्मातारा, जुना, वृद्ध; not new जुना (garment); formerly existing पूर्वीचा, पूर्वकालिक, जुना, प्राचीन (custom, law); a year o. एक वर्षाचा; experienced जाणता, पक्का, पुरा, जुना (offender); long cultivated बहुत दिवस वहिवाटलेला

-राबलेला (land); worn out जीर्ण, जुना, वापरलेला (clothes); wise शहाणा, जाणता, चाणाख्य (head); wanting in the mental vigor or other qualities belonging to youth खप्पड, खल्लड, थेरडा; old-fashioned जुन्या तऱ्हेचा -चालीचा; रिवाजाचा, चालीचा; jolly आनंदाचा, उल्लासाचा, सुखाचा; of o. मार्गेंच, फार दिवस झाले; पुरातन काळापासून; o. age म्हातारपण *n*, वृद्धापकाळ; उतारवय *n*; o. bachelor जन्मसन्यासी, निंब; of o. school जुन्या शाळेचा, जुन्या मताचा पंथाचा; O. Testament, that part of the Bible which contains the collected works of the inspired writers previous to Christ जुनाकरार. -NESS जुनेपणा; जीर्णत्व *n*; बहुकालित्व *n*; म्हातारपण *n*. -WIFE वटवटणारी म्हातारी *f*.

OLEAGINOUS *a*. (*olea*, olive) चिकण, स्निग्ध.

OLIBANUM *Ar*. गंधाबिरोजा.

OLIGARCHY (*Gr*. *oligos*, few, *archein*, to rule) government of a small number अल्पजनप्रभुत्व *n*.

OLIVE (*oliva*) जैतून झाड *n*.

OMEN (*L*.) prognostic प्रश्न, शकुन; sign चिन्ह *n*, लक्षण *n*.—OMINOUS शकुन संबंधी; auspicious शुभसूचक; inauspicious अशुभसूचक, अभद्र लक्षणाचा, अभद्र.

OMENTUM (*L*.) पोटाचा पडदा, अंत्रवेष्टन *n*, मेदोधरा *f*.

OMIT *v*. (*mittere*, to send) drop गाळणें, सोडणें, सांडणें; neglect उपेक्षा -हयगई -आळस क. [from].—OMISSION सोडणें *n*, वगळणें, *n*, वर्जन *n*; that which is omitted कसर *f*, तफावत *f*, अंतर *n*.

OMNIPOTENT *a*. (*omnis*, all, *potens*, powerful) सर्वशक्तिमान; the O. सर्वशक्तिमान ईश्वर.—OMNIPOTENCE -CY, सर्वशक्ति *f*, अनंतशक्ति *f*.

OMNIPRESENT *a*. (*-præsens*, present) present in all places at the same time सर्वव्यापी, विश्वव्यापक, सर्वगत.—OMNIPRESENCE विश्वव्यापकता *f*.

OMNISCIENT *a*. (*-scire*, to know) having universal knowledge or knowledge of all things सर्वज्ञ, सर्वसाक्षी, त्रिकालज्ञ. —OMNISCIENCE the quality of being omniscient;—an attribute peculiar to God सर्वज्ञता *f*, सर्वज्ञान *n*.

OMPHALOTOMY (*Gr*. *omphalos*, the navel, *tomas*, cutting) नाभिछेदन *n*.

ON* *prep*. at, or in contact with, the surface of a thing and supported by it वर: o. the floor; toward and to the surface of वर, पाठीवर, पृष्ठतलावर: the rain falls o. the earth; upon; denoting the acting by contact with the surface of any thing वर: to play o. a harp; besides शिवाय, खेरीज, वर: loss o. loss; at or near स, ला, शीं, पाशीं, जवळ: o. each side; the fleet is o. the coast; reliance upon वर: to depend o. a person for assistance; at or in the time of स, ला, ईं: o. the Sabbath we abstain from labor; at the time of स, ला, ईं: o. public occasions; toward वर: have pity o. me; at the peril of: o. thy life तुझ्या जिवावर; by virtue of वर: he promised o. his word; to the account of वर, कडे: o. us be all the blame; in consequence of वर, नंतर: o. the ratification of the treaty; in reference to कडून: o. our part expect punctuality; to put shoes o. the feet पायांत जोडा घालणें; to put a ring o. the finger बोटांत अंगठी घालणें; concerning विषयीं, संबंधी, स, ला: he had come o. some business; o. a sudden एकाएकीं; o. fire जळत; जळत, रागांत; o. high उंचावर; o. the alert हुशारींत, सावध; o. the way वाटेंत, चालत; o. the wing उडत; जात;

to go o. foot पायीं जाणें; o. one occasion एकदां; o. another occasion दुसरेदां; to set o. foot आरंभणें, चालू क.—*ad.* in progress पुढें, म्होरे: move o.; forward, in succession पुढें, परंपरेनें: from father to son, from the son to the grandson, and so o.; in continuance पुढें: say o., sing o.; to go o.;—speaking, singing बोलत -गात चालणें -राहणें; adhering धरून, चिकटून: he is neither o. nor off, that is, he is not steady; attached to the body स, ला, वर: his clothes are not o. (डोईस पागोटें, अंगांत अंगरखा, अंगावर धोतर). -*interj.* चला, चल. -LOOKER तमासगीर, तमाशा पाहणारा -SET, -SLAUGHT हल्ला, चाल *f*; at the first o. पहिले तिडकेस -धडाक्यास -हिरिरीस. -WARD *a.* पुढें गेलेला, अग्रसर, अग्रगामी (course); improved सुधरलेला, वाढलेला, वर्द्धित.— & WARDS पुढें.

ONE* *a.* single एक, एकच (Gen. xli., 25); single in number एक; any o. कोणी एक, कोणी; o. another एकमेक; undivided एक, एकच: the church is therefore o. though the members may be many; single in kind एक -एकाच जातीचा: o. plague was on you all; noting diversity एक: बोलणें एक आणि करणें एक; such a o. अमूक, अमका, फलाणा; all o. एकून एकच; every o. जो तो; o. by o. एक एक; many a o. कित्येक; at o. एकीनें; in o. मिळून, जथून; o. day कोणी एक दिवशीं, कधीं तरी; only o. एकच, अनन्य; having o. only refuge अनन्य गति.—*n.* person मनुष्य, माणूस; the figure एकडा; *one's* self आपण; *one's* own आपला. -NESS एकी *f*, एकपणा, ऐक्य *n*.—ONCE *ad.* at one time एकदां: o. in two years; formerly मागें, पूर्वी: I had o. some foolish notions; ever कधीं: when wilt thou give thy Redeemer the possession of your soul? when shall it o. be? at o. एकदम, लागलाच, एकदांच; एकेवेळीं, एका तडक्यानें, एकदम: they all moved at o.; लागलाच, तेव्हांच, खडोखड: go at o.; all at o. एकदम, एकठोक; एकाएकीं, अकस्मात. —ONLY *a.* one alone एकच, केवळ; by itself एकच, एकुलता: an o. child; distinguished above all others एक, सर्वांहून श्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट: the o. art.—*ad.* केवळ, मात्र, शुद्ध, निखालस; entirely अगदीं, निस्तुक, निपट, फक्त: he being o. wicked. -SIDED *a.* एकतर्फी, एकपक्षी (statement); unfair गैरवाजवी; partial पक्षपाताचा.

ONEROUS *a.* (*onus*, a load) जड, भारी.

ONION (*unio*, oneness) कांदा. -EYED *a.* आसवांनीं भरलेल्या डोळ्यांचा.

ONTOLOGY (*Gr. onta*, the things which exist, *logos*, discourse) doctrine or science of beings प्राणिमात्राचा विचार, भूतमात्रविचार.

ONYX (*L.*) गोमेद.

OOZE* soft mud गाळ, राबडी *f*, राड *f*; soft flow पाझर, निचरा.—*v. i.* पाझरणें, निचरणें. [out].—*t.* पाझरविणें, थेंबथेंब पाडणें, गळती लावणें.

OPAL (*opalus*, *Skr. upula*, a rock, stone) क्षीरस्फटिक.

OPAQUE *a.* (*opacus*) not transparent किरणप्रतिबंधक, प्रकाशाभेद्य; dark न्यूनप्रभ, निष्प्रभ.—OPACITY प्रकाशाभेद्यता *f*; प्रकाशहीनत्व *n*.

OPEN* *a.* not shut up उघडा, मोकळा (door, road); not private सर्वांचा, सार्वजनिक, चौघांचा (library, letter); exposed उघडा (letter); expanded उघडा, खुला, विकसित (flower, hand); frank मोकळ्या मनाचा, खळबळीत, निष्कपट; generous उदार, प्रगल्भ; clear स्पष्ट, मोकळा, उघडा (plans); unobstructed मोकळा, चालू (river, canal);

not balanced चालू, ओढता (account); attentive उघडा, सावचित्त, सावध (eyes); not deaf उघडा, ऐकायाजोगा (Ps. xxxiv., 15); not covered over उघडा, उघड्या तोंडाचा (vessel): free to be discussed वाद करायास मोकळा, प्रतिबंधरहित (question); easily enunciated उदात्त (vowels); o. seam, joint, &c. उसू; in the o. air उघड्यावर; in o. उघडपणीं; in o. day दिवसा ढवळ्यां; o. to all comers मुक्तद्वार [to].—*v.* उघडणें; मोकळा क.; प्रसरणें, उमलविणें;—tumor, &c. फाडणें, फोडणें, चिरणें;—a vein सोडणें, काढणें; explain अर्थ सांगणें, फोड क., उलगडणें; used reflexively, फुटणें, बोलणें, वदणें: the king *opened* himself to some of his council that he was sorry for the earl's death; begin प्रारंभ -सुरू क., उपक्रम काढणें (a discussion, fire upon an enemy);—a road, passage, &c. पाडणें, करणें, मोकळा क.; split भेगलविणें, तडकविणें;—as a letter फोडणें, उघडणें;—one's mind पोट फोडणें, मन मोकळें क.—*i.* मोकळा होणें, उघडणें, उकलणें, उमलणें; चालू होणें; bark on view of the game शिकार पाहून भोंकणें. -ING उघडी जागा *f*; a hole भोंक *n*, छिद्र *n*, रंध्र *n*; a breach भगाड *n*, भोंक *n*; आरंभ, उपक्रम: the o. of a speech. -HEARTED *a.* मनाचा मोकळा, शुद्धमति. -HANDED *a.* उदार, उदारहस्त. -LY *ad.* उघडपणें, प्रसिद्धपणें. -MOUTHED *a.* तोंड वासलेला, आ पसरलेला; greedy खादाड, बुभुक्षित. -NESS उघडेपणा; प्रसिद्धपणा, प्रसिद्धि *f*; मनाचा मोकळेपणा, खळबळीतपणा, सरळ स्वभाव; mildness, as of the weather हवेची शितळाई *f*. -सौम्यता *f*.

OPERA (*opera*, pains, work) संगीत *n*.

OPERATE *v. i.* (do.) act कार्य क., चालणें, क्रिया -व्यापार क.; produce effect गुण क., लागू -चालू होणें; *Surg.* शस्त्रक्रिया क., शस्त्रोपचार क., कापणें, चिरणें, फोडणें इ०.—*t.* चालविणें, चालू क. (machine); गुण क. [with, in].—OPERATION कृति *f*, चेष्टा *f*, खेळ *f*, व्यापार; mode of action रीत *n*, कृति *f*; शस्त्राचा उपचार, शस्त्रक्रिया *f*; influence वजन *n*, भार; काम *n*, कार्य *n*, कृत्य *n*: military *operations*.—OPERATIVE *a.* कर्मकारी, क्रियाकारी (principles); efficacious गुणकारी, कार्यसाधक, गुणावह.—*n.* laboring man कामकरी, मोलकरी, गडी, मजूर.—OPERATOR करणारा, कार्यकर्त्ता; *Surg.* शस्त्रवैद्य [in, for].—OPEROSE *a.* कष्टाचा, श्रमाचा, डोईफोडीचा (proceedings).

OPTHALMY (*Gr. ophtahlmos*, the eye) नेत्ररोग, अभिष्यंद.

OPIATE, See under OPIUM.

OPINE *v. i.* (*opinari*) विचार क.—OPINION, a mental conviction of the truth of some statement founded on a low degree of probable evidence मत *n*, समजूत *f*; judgment समज, विचार, बुद्धि *f*; good esteem खातर *f*, खातरी *f*; *Law*, the formal decision of a judge ज्यडजाचा ठराव; public o. बहुमत *n*, लोकमत *n*; regard to public o. लोकलज्जा *f*. [of, on]. -ATE *a.* मतवादी, दुराग्रही. -ATIVE *a.* स्वमताभिमानी, दुराग्रही.

OPIUM (*L.*) अफू *f*, अफीम *f*.—OPIATE झोंपेचें औषध *n*.—*a.* निद्राकारी -जनक.

OPPONENT, See under OPPOSE.

OPPORTUNE *a.* (*-portus*, the port) समयोचित, प्रसंगोचित, समर्पक, योग्य [for]. -LY *ad.* प्रसंगोपात्त, प्रसंगास, वेळेस; to come o. प्रसंगास येणें. -NESS समयौचित्य *n*, समयानुकूल्य *n*.—OPPORTUNITY समय, प्रसंग, वेळ *f*.

OPPOSE *v.* (*-ponere*, to put) set opposite समोर -आडवा ठेवणें; set against आडवा आणणें, अडती -मोडा घालणें; strive against

भिडणें, ळढणें, विरोध क., स्पर्द्धा क.; resist effectually चालूं न देणें, कुंठित क. [to, by in, for, with].—Opponent विरोधी, वैरी: वादी, पूर्ववादी; प्रतिपक्षी, प्रतिवादी.—Opposite *a.* facing समोरचा, सन्मुख; hostile विरोधी, प्रतिकूळ; contrary उलटा, विपरीत [to].—*n.* शत्रु, प्रतिपक्षी; विपक्ष, विपर्यास.—Opposition आडवा येणें *n*, विरोध, प्रतिरोध; obstacle अडथळा, विघ्न *n*, अटकाव; contrariety विपर्यय, व्यत्यय; the collective body of opposers प्रतिपक्ष; repugnance विरुद्धता *f*; विरुद्धभाव.

Oppress *v.* (*-premere,* to press) दाबणें; press severely, unjustly, or cruelly काचणें, पीडणें, जाचणें; sit or lie heavy upon उरावर छातीवर बसणें: excess of food *oppresses* the stomach [with, by]. -ion जुलूम, जबरदस्त *f*; state of being oppressed जाच, कांच; sense of heaviness भार, जड वाटणें *n*, जाड्य *n*; injustice अन्याय, जुलूम; misery दुःख *n*, कष्ट *pl.* -ive *a.* जुलमी, जबरदस्त (taxes); जड, भारी कठीण, जबर (grief); जुलमाचा, जबरदस्तीचा (commands.)

Opprobrious *a.* (*-probrum,* reproach) निंदक, अपवादक, कुटाळीचा (words); despised तुच्छ, निंद्य (name) [to].—Opprobrium, reproach mingled with contempt धिक्कारयुक्त निंदा *f*, हेटाळणी *f*.

Optative *a.* (*optare,* to wish for) इच्छासूचक.—Option निवडण्याचा अधिकार; preference अधिक आवड *f*, चहा *f*; wish इच्छा *f*, मर्जी *f*, खुशी *f*. -al *a.* खुशीचा, इच्छेचा; खुशीवर ठेवलेला -सोडलेला, इच्छाधीन.

Optic -al *a.* (*Gr. optomai,* to see) दृष्टीसंबंधी, नजरेचा; relating to the organ of sight चक्षुरिंद्रियाचा, नेत्रेंद्रियाचा (nerve); relating to the science of optics दर्शनानुशासनशास्त्र संबंधी.—Optics दर्शनानुशासन *n*.

Opulent *a.* (*ops, opis,* power) मातबर, श्रीमान, धनसंपन्न.—Opulence संपत्ति *f*, श्रीमंती *f*, मातबरी *f*.

Or* *conj.* अथवा, किंवा, नाहीं तर.

Oracle (*orare,* to speak) answer of a god or some person reputed to be a god, among the heathen to an enquiry made respecting some affair of importance शकुन, प्रश्न, प्रसाद; deity who was supposed to give the answer शकुनाचा देव, प्रसाददेव; place where the answer is given गाभारा, शकुनस्थान *n*; *pl* communications, revelations, or messages delivered by God to prophets ईश्वरी प्रगटविणें *n*, ईश्वराकडून आलेला निरोप, दृष्टांत; the entire Sacred Scriptures ईश्वरोक्त शास्त्र *n* (Heb. v., 12); *Jewish Antiq.* the sanctuary, or most holy place in the temple, in which was deposited the ark of the covenant गाभारा (1 Kings vi., 19); one who communicates a divine command, an angel, a prophet ईश्वराची आज्ञा कळविणारा, दूत, भविष्यवादी इ०; person whose opinion is to be regarded with great authority ठोक्याचा माणूस, खऱ्या बत्तीशीचा माणूस; wise sentence or decision of great authority अभियुक्त वचन *n*, प्रसाद -आप्तवचन *n*; to consult gods and *oracles* देवीं धर्मी विचारणें; to give an answer,—an o. thus consulted कौल -प्रसाद देणें; to give a favorable answer,—an o. उजवी देणें; to give an unfavorable answer डावी देणें.—Oracular, Oraculous *a.* प्रसाद -कौल देण्याचा; like an oracle देव -प्रसादवाणीतुल्य.

Oral *a.* (*os, oris,* the mouth) तोंडचा, तोंडजबानीचा: o. answer तोंडजाब; o. inter-

course तोंडच्या तोंडीं व्यवहार; o. statement तोंडजबानी *f.* -LY *ad.* तोंडजबानीनें.

ORANGE *Ar.*—the tree नारंगी *f*, नारिंग *n.*—the fruit नारिंग *n.*

ORATION (*orare*, to speak) वक्तृत्व *n*, पांडित्य *n.*—ORATOR वक्ता, पंडित, बृहस्पति.—ORATORY सभापांडित्य *n*; eloquence शब्द -वाक्-चातुर्य *n*; a place of prayer esp. a chapel or small room set apart for private devotions प्रार्थनागार.

ORB (*orbis*) a globe गोल, गोलक; one of the celestial spheres आकाशगोल, सूर्य, चंद्र इ०; the eye नेत्रगोल; orbit कक्षा *f*, फेरी *f* (ग्रहाची). -IT कक्षा *f*, ग्रहपथ.

ORCHARD* फळांची बाग *f*, फलवृक्षवाटिका *f*, उपवन *n*.

ORDAIN *v.* (*ordo*, order) व्यवस्था क., स्थापणें, लावून देणें; set apart for an office नेमणें, योजणें, अधिकृत क.; introduce into the office of the Christian ministry, by the laying on of hands, or other appropriate forms ख्रिस्ती धर्माधिकाराची दीक्षा देणें.—ORDER regular arrangement क्रम, बेत, व्यवस्था *f*; proper condition सुस्थिति *f*, व्यवस्था *f*, बंदोबस्त: the muskets are all in good o.; fit appearance रंग, रूप *n*; customary mode of procedure रीत *f*, पद्धति *f*, क्रम, परिपाठ; regular government बंदोबस्त: preserve good o. in community; regulation कायदा: the rules and *orders* of a legislative house; command आज्ञा *f*, हुकूम, ताकीद *f*; commission to make purchases or supply goods मालखरिदी करण्याची किंवा पुरविण्याची वरदी *f*, मुखत्यारी *f*; a direction or order to pay money वरात *f*, वरातचिठ्ठी *f*, रोखा, 'आर्डर' *f*; free pass परवाना, दस्तक *n*; rank वर्ग, प्रत *f*: o. of nobles; religious fraternity मार्ग, पंथ, आश्रम; [*Episcopal Church.* office of the Christian ministry; to take *orders* that is, to become deacon or priest]; [*Arch.* one of the five principal methods, recognized by the ancients for constructing and ornamenting the columns of an edifice]; *Zool.* one of the well-marked divisions of a class गण, वर्ग; inverted o. व्यतिक्रम; directed o. अनुलोम; contrary to the natural o. प्रतिलोम; that is in regular and in reverse o. उलटापालटा, अनुलोम, विलोम; that is in o. रीतीचा, मार्गाचा; that is in good o. चांगला, नीट, यथास्थित (articles, affairs, &c.); as an animal ताजातवाना; to be in good o. नीट -साबीत -यथास्थित असणें; to get out of o. बिघडणें; head of a religious o. महंत; general o. वट -सदर हुकूम; made or done to o. फर्माशी; under the o. of कह्यांत; written o. लेखी हुकूम, हुकूमनामा; in o. साठीं, स्तव; o. of the day, *Legis. bodies* कायदे कौन्सलांत अमुक दिवशीं करायाचीं नेमलेलीं कामें *n pl*; natural o. of words अन्वय [for].—*v.* रचणें, व्यवस्था क.; हुकूम देणें धर्माधिकाराची दीक्षा देणें; regulate चालवणें, वागवणें. -LY *a.* बेतबाताचा, व्यवस्थेचा (proceeding); बेतबातानें चालणारा, ठाकठिकया, व्यवस्थित (a person); being on duty कामावरचा, 'आर्डरली' (officer).—*ad.* क्रमानें, बेतानें.—*n.* चिठ्ठीचपाटी नेणारा लष्करांतील कामदार, 'आर्डरली'; o. sergeant नकीब.—ORDINAL *a.* क्रमसूचक -वाचक.—*n.* क्रमवाचक संख्या *f*.—ORDINANCE कायदा, दस्तूर, कानू *m, f*;—of religion अनुष्ठान *n*, कर्म *n*, विधि.—ORDINARY *a.* चाली प्रमाणें, दस्तुरमाफक (forms of law); of common rank साधारण, मध्यम, प्राकृत (reader); usual नित्याचा,

साधारण (conversation) inferior रासवट, हलका; plain साधा, साधारण रूपाचा (face). —*n.* [*Law.* an officer who has original jurisdiction in his own right, and not by deputation; an ecclesiastical judge; *Naval Usage,* the establishment of the shipping not in actual service: a ship laid up in o.]; eating-house भटारखाना; that which is in common use रोज वापरायाचें सामान *n*; in o. नित्याचा, नित्यांतला; चाकरीवरचा, चाकरीवर नेमलेला: a physician in o.; [an ambassador in o. is one constantly resident at a foreign court].—ORDINATION स्थापणें *n*, नेमणें *n*, स्थापना *f*; योजना *f*, नेमणूक *f*; धर्माधिकारदीक्षा *f*; ख्रिस्ती धर्माधिकारदीक्षा *f*; o. of Providence घटितार्थ.—ORDNANCE तोफ *f pl*, तोफखाना.

ORDEAL* a form of trial to determine guilt or innocence, practiced by the rude nations of Europe, and still practiced in many parts of the East;—by fire तप्तदिव्य *n*, अग्निपरीक्षा *f*; to come safe out of an o. दिव्यास उतरणें; to take a piece of metal out of heated oil as an o. रवा काढणें; to undergo an o. दिव्य क.; severe trial कठीण परीक्षा *f*, अंत (*v.* पाह), कसोटी *f*; some of the forms of o. among the Hindus are: तुल, जल, अग्नि, विष, तंडुल, तप्तमाष, फाल, तुलसी.

ORDURE *F.* गू, विष्ठा *f*, मल.

ORE* (*Skr. ajas*) metal in its fossil state कच्ची -अशोधित -अशुद्ध धातु *f* (metal).

ORGAN (*organum*) instrument of action साधन *n*, उपकरण *n*, इंद्रिय *n*;—of action कर्मेंद्रिय *n*;—of sense or perception ज्ञानेंद्रिय *n*;—of the mind अंतरिंद्रिय *n*; means of communication द्वार *n*, साधन *n*, मार्ग; wind instrument मुखवाद्य *n*, वाद्य *n*. -IC *a.* इंद्रियाचा, इंद्रियसंबंधी; इंद्रियविशिष्ट -संपन्न, जीवनसाधनविशिष्ट (structure of the body). -ISM इंद्रियविशिष्ट रचना *f*; an organized being इंद्रियविशिष्ट प्राणी. -IST वंशवाद्य वाजविणारा. -IZE *v.* इंद्रियवान -जीवसाधनविशिष्ट क.; arrange in parts, each having a special function, act, office, or relation जमविणें, बेत बसविणें;—as government, army, &c. कामदार नेमून बंदोबस्त क., सैन्य उभारणें -रचणें इ०.—ORGANIZATION इंद्रियविशिष्ट क. *n*; बंदोबस्त, व्यवस्था *f*;—of the body शरीर -अवयवरचना -घटना *f*.—ORGANIZED संस्थापित, घटित, कल्पित; इंद्रियविशिष्ट.

ORGASM (*Gr. organ,* to swell) उकळी *f*, ऊत, कढ: o. of the flood;—of the spirit आवेश, उकळी *f*, ऊत.

ORIENT *a.* (*oriri,* to rise) उदय पावणारा, उदयमान (sun); eastern पूर्व, पूर्वेकडला; bright तेजवान, चकचकीत, सप्रभ.—*n.* पूर्व *f*, पूर्व दिशा *f*; पूर्वेकडले देश *pl.* -AL *a.* पूर्वेचा, पूर्व देशीय, पूर्व देशस्थ.—*n.* पूर्व देशांतला -एशिया खंडांतला राहणारा; पूर्वेकडल्या भाषा जाणणारा, प्राक्देशीय भाषापंडित.

ORIFICE (*osoris,* mouth, *facere,* to make) तोंड *n*, मुख *n*, दार *n*, भोंक *n*, छिद्र इ०.

ORIGIN (*oriri,* to rise) मूळ *n*, आरंभ, मुळारंभ; source उगम, उत्पत्तिस्थान *n*; birth जन्म, पैदास *f*; cause कारण *n*, हेतु. -AL *n.* मूळ *n*, आरंभ; archetype मूळप्रत *f*, आदर्श; text मूळग्रंथ, अस्सल *n*; one who has new and striking ideas नवी योजना करणारा, अपूर्वयोजक -कल्पक (writer).—*a.* मूळचा, आरंभीचा; primitive प्रथमचा, आद्यकालिक; not translated मूळचा, अस्सल, आद्यलिखित -रचित; अपूर्वकल्पक, हुनरी (genius); o. sin, *Theol.* the first sin of Adam आदामाचें पहिलें पाप *n*, hence, either the

imputation of Adam's sin to his posterity, or a natural corruption and tendency to sin, inherited from him मूळचें पाप *n*, स्वाभाविक पाप *n*. -LY *ad*. मुळा पासून, पहिल्यानें, आरंभीं; मूळ ग्रंथकर्त्यानें, मूळच्या कर्त्यानें. -ITY अस्सल -अव्वलपणा; अपूर्व कल्पना *f* -युक्ति *f* -शक्ति *f*, इ०. -ATE *v*. उत्पन्न -उपस्थित क. [with, in].—*i*. उत्पन्न होणें, उद्भवणें, उठणें.—ORIGINATOR उत्पन्न -आरंभ -उपस्थित करणारा, उत्पादक.

ORIOLE (*aurum*, gold) a bird,—the Indian पावशा, पावशा गुगूळ.

ORION (*L.*) a constellation मृगशीर्ष.

ORNAMENT (*ornare*, to adorn) शोभा *f*, अलंकार, भूषण *n*; trinket डागिना, नग.—*v*. शोभविणें, भूषित क. [with]. -AL *a*. शोभविणारा, शोभेचा.—ORNATE *a*. सुंदर, मंडित;—a style अलंकृत, प्रौढ, सालंकार, बनावट.

ORNITHOLOGY (*Gr. ornis*, bird, *logos*, discourse) पक्षीवर्णनविद्या *f*.

ORPHAN (*orphanos*) आईबापा वेगळा, पोरका, मातृपितृहीन; bereaved of one parent एकांगी उणा, मातृहीन किंवा पितृहीन, आईपोरका किंवा बापपोरका. -AGE पोरकेपणा; house for orphans अनाथ मुलांचें घर *n*, अनाथबालगृह *n*.

ORPIMENT *F*.—yellow हरताळ;—red रक्तधातु *f*; golden colored o. पऱ्याहरताळ.

OREERY (named after the Earl of *Orrery*) ग्रहांची गति दाखविणारें यंत्र *n*, ग्रहगतिसूचक यंत्र *n*.

ORIS (probably corrup. for *Iris*)—the root वेखंड *n*.

ORT *Ger*. उष्टें *n*, उच्छिष्ट *n*.

ORTHODOX *a*. (*Gr. orthos*, right, *doxa*, opinion) sound in Christian faith ख्रिस्ती धर्मानुसार; according to the doctrines of Scripture ख्रिस्ती शास्त्रांतील उपदेशा प्रमाणें; यथाशास्त्र.—ORTHODOXY सतपथ, सन्मार्ग; यथाशास्त्रता *f*, सत्पथानुयायिता *f*.

ORTHOEPY (*Gr. epos*, a word) शुद्ध उच्चार.

ORTHOGRAPHY (*Gr. graphein*, to write) शुद्ध लिहिणें *n*; *Gram*. वर्णविचार.

OSCILLATE *v. i*. (*oscillum*, a swing) हेलकावे -झोके खाणें -घेणें [between].—OSCILLATION हेलकावा, झोका.

OSIER *F*. वाळंज *n*, वाळंजाचें झाड *n*.

OSSEOUS *a*. (*os*, bone) हाडांचा, अस्थिमय; हाडा सारखा.—OSSICLE हडकी *f*, हडूक *n*.—OSSIFY *v. i*. हाड -अस्थि होणें.—*t*. अस्थिमय क.—OSSIFIC *a*. अस्थिकर -कारक.—OSSIFICATION हाड होणें *n*, अस्थिभवन *n*.—OSSIVOROUS *a*. हाडखाऊ, अस्थिभोजी (quadrupeds).—OSSUARY, place where the bones of the dead are deposited अस्थ्यागार *n*.

OSTENT (*ostendere*, to show) देखावा, दर्शन *n*; token चिन्ह *n*, लक्षण *n*.—OSTENSIBLE *a*. दिसण्याचा, दिसण्यांतला;—as implying insincerity वरकरणी, वरपंकी, कोरडा, बाह्यात्काराचा.—OSTENTATION प्रतिष्ठा *f*, मिरवणूक *f*, डामडौल, आव;—as fraudulent दंभ, स्तोम.—OSTENTATIOUS *a*. डामडौलाचा, आवाचा; pretentious ढोंगी, दांभिक, अडुंबाज.

OSTEOLOGY (*Gr. osteon*, bone, *logos*, discourse) अस्थिवर्णनविद्या *f*.

OSTRICH *F*. शहामृग.

OTHER* (*Skr. anya*) not the same दुसरा, इतर; opposite पलीकडला; the *others* दुसरे *pl*, वरकड *pl*; on the o. side पलीकडे; each o. परस्पर; the o. day परवां, कांहीं दिवसांमागें; every o. day एक दिवसाआड; the o. world परलोक; other's wealth परधन *n*. -WISE *ad*. दुसऱ्या रीतीनें; नाहीं तर.

OTTER* पाणमांजर *n*.

OUGHT, See AUGHT.

OUNCE (*uncia*, a twelfth) (साखर, तूप, वगैरे तोलायाच्या) पौंडाचा सोळावा भाग, अडीच तोळे *pl*; (औषध तोलायाच्या) पौंडाचा बारावा भाग, 'औन्स'; चित्त्यासारखें एक जनावर आहे.

OUR* *pron.* आमचा, आपला. -SELF, -SELVES आह्मी, आपण, स्वतः.

OUST *v. F.* बाहेर काढून टाकणें, बाहेर काढणें [from].

OUT* *ad.* without बाहेर; not at home बाहेर; in a state of disclosure उघडा, बाहेर, प्रसिद्ध: the secret is o.; in a state of extinction विझालेला: the fire is o.; in a state of exhaustion खपलेला; to be o. खपणें, उडणें, सरणें: the wine is o.; to be o. of fifty pounds; not in office निराळा, रिकामा, कामावेगळा; that is o. of employment रिकामा, बेरोजगार; to the end पार, सगळा, शेवट -अखेरपर्यंत: to sleep o. the whole morning; hear me o.; audibly मोठ्यानें: to laugh o.; not in the hands of the owner मालकाच्या हातांत नसलेला: the land is o. upon a lease; in error चुकींत, भ्रमांत: to be o. घसरणें, फसणें, चुकणें: wicked men are strangely o. in the calculating of their own interest; away निघ, चल: o. with the dog; o.-and-o. अगदीं, साफ, धडधडीत; o. of पासून, जवळून; आंतून, बाहेर: plants grow o. of the earth; (Prov. iv., 23); मुळें, स्तव, नें: a thing is done o. of envy; मुळावरून: to copy o. of Horace; o. of the house घराबाहेर; to be o. of favor मर्जीतून उतरणें; to be delivered o. of afflictions दुःखांतून सुटणें; o. of all rule सर्व नेमावेगळा; he goes o. of his way तो वाट सोडून जातो; o. of place भलत्याच जागीं, अप्रासंगिक; the mouth is o. of taste तोंडाची रुचि बिघडली आहे; the instrument is o. of tune तें वाद्य बिघडलें आहे; to be o. of sight दृष्टीआड होणें, अदृश्य होणें; o. of reach अगम्य; o. of hand लागलाच, तत्क्षणीं; to be o. of print विकत न मिळणें (a book); o. of season अकालिक, अवकाळीं; o. of fashion लोकव्यवहारविरुद्ध, चालीविरुद्ध; o. of temper किरकिऱ्या, रिपरिप्या; रागावलेला, संतापलेला; o. of tune बेसूर, बेताल, कर्कश; चिढलेला, खिजलेला.—*n.* बेरोजगारी मनुष्य; a nook कोन, कोपरा. -BALANCE *v.* दुसऱ्यापेक्षां वजनांत अधिक भरणें. -BRAVE *v.* शेरास सवाशेर होणें, अधिक धीट होणें. -BREAK जोरानें बाहेर फुटणें *n*, फुटणें *n*, स्फोट. -CAST *a.* जातिभ्रष्ट, बहिष्कृत, अपांक्त.—*n.* बहिष्कृत केलेला मनुष्य, चांडाळ; a vagabond भटक्या. -CRY आरड *f*, बोंब *f*, बोभाटा; clamor गलबला, गोंगाट; popular o. लोकापवाद. -DO *v.* मागें -पाठीमागें टाकणें, चढ क., कान कापणें. -DOOR *a.* घराबाहेरचा.—*ad.* घराबाहेर, बाहेर. -ER *a.* बाहेरचा, बाहेरल्या बाजूचा, बहिर्वर्ती; o. part बहिर्भाग; o. door बहिर्द्वार *n*. -FIT प्रवासाचें साहित्य *n* -सामान *n*; सफरीवर जाण्याची जहाजाची तयारी *f* -सामग्री *f* [for]. -GO *v.* पलीकडे जाणें, -च्याहून अधिक जाणें, -ला मागें टाकणें; excel वरचढ होणें, मागें पाडणें; circumvent फसविणें, कान कापणें.—*i.* संपणें.—*n.* खर्च, व्यय, जाव. -GOING बाहेर जाणें *n*; खर्च, व्यय. -GROW *v.* वाढीनें मागें टाकणें -पाडणें; -हून वाढीस चढणें; become too large to make use of वाढून अडस -दाट होणें; to o. clothing. -HOUSE पडशाळा *f*. -LANDISH *a.* परदेशचा, दूरदेशचा; barbarous हेंगाडा, रांगडा, अडाणी (speech, behavior). -LAST *v.* दुसऱ्यापेक्षां अधिक टिकणें. -LAW person excluded from the benefit of the law, or deprived of its protection राजरक्षणबाह्य.—*v.* राजरक्षणाबाहेर ठेवणें -क. -LAY खर्च, व्यय; that which is laid out पसारा.—*v.* खर्च क.; ex-

pose मांडणें, पसारा टाकणें. -LET वाट *f*, दार *n*, मार्ग. -LINE मर्यादेची -बाहेरची रेघ *f*, बाह्यरेखा *f*; sketch आकार, रूपरेखा *f*, आराखडा, बेत. -LIVE *v*. पाठीमागें वाचणें, -जगणें; to live better, or to better purpose अधिक चांगल्या अर्थासाठीं वांचणें. -NUMBER *v*. गणतींत -संख्येंत मागें टाकणें. -OF DOOR *a*. घरा बाहेरचा, वाऱ्यावरचा (exercise). -RAGE *v*. जुलूम -बलात्कार क.—*n*. कहर, जुलूम, अनर्थ. -RAGEOUS *a*. अनर्थाचा, कहराचा; furious कावराबावरा, तग्रव्यग्र. -REACH *v*. मागें टाकणें, पलीकडे जाणें. -RIDER, servant on horseback who attends a carriage जिलीबीचा स्वार. -RIGHT *ad*. immediately तत्काल, तेव्हांच, खडोखडी; utterly अगदीं, साफ, निस्तुक. -ROOT *v*. मुळासुद्धां उपटून टाकणें. -RUN *v*. धांवण्यांत मागें टाकणें. -SIDE बाहेरचें किंवा बाहेरील आंग *n*, बहिर्भाग; the utmost परमावधि, कड *f*, शेवट;—of an inclosure बहिःप्रदेश, बाहेरची जागा *f*.—*a*. बाहेरला -चा, बाह्य. -SKIRT शींव *f*, सीमा *f*, पालव. -STANDING वसूल न झालेला, उगवायाचा (debt). -STRIP *v*. मागें टाकणें -सांडणें. -WARD *a*. बाहेरचा, वरचा, बाह्य; adventitious नवा आणलेला, आगंतुक (honor); tending to the outward way बाहेर निघणारा, बाहेरच्या कलाचा. -WEIGH, See OUTBALANCE. -WIT *v*. फसवणें, पागोटें घेणें, तोंडाला पानें पुसणें. -WORK *Fort*. बाहेरचा कोट, बाहेरकोट.

OVAL *a*. (*ovum*, egg) अंडाकार, अंडाकृति.—*n*. अंडाकार, अंडाकृति *f*. -SHAPED अंडाकार. —OVARY *Anat*. organ of a female animal in which the eggs are formed अंडाशय. *Bot*. that part of the pistil which contains the seed बीजाशय.

OVEN* भट्टी *f*.

REMOVE *v.* (See MOVE) उठवणें, उचलणें, घेऊन जाणें; displace जागा पालटणें, स्थलांतर क.; take away दूर -परिहार क., घालवणें (a disease); carry from one court to another एका कोर्टांतून दुसऱ्या कोर्टांत नेणें (a cause or suit by appeal);—from a post जाग्यावरून काढणें -दूर क. [from, to]. —*i.* जागा पालटणें, स्थलांतर होणें.—*n.* स्थलांतर *n*, स्थानभेद; step in any scale of gradation पायरी *f*; act of putting a horse's shoes on different feet खोलबंदी *f*. [from].—REMOVAL स्थानांतर करणें *n*; स्थानपालट, स्थानांतर *n*; परिहार, निरसन *n*; दूर करणें *n*, दूरीकरण *n*;—of obstacles विघ्ननाशन *n*;—of ignorance अज्ञानखंडन *n*.—REMOVED काढलेला, उठवलेला; दूर केलेला, घालवलेला; remote दूरचा, लांबचा; (a dwelling); r. from office स्थानभ्रष्ट, पदच्युत. REMOVER काढणारा, स्थलांतर करणारा; in comp. नाशक, घ्न, अंतक : रोगांतक, रोगघ्न, &c.—

REMOTE *a.* दूरचा, लांबचा; foreign परका; separate वेगळा; primary मूळचा, अलग [from].

REMUNERATE *v.* (*-munerare*, to give) बक्षीस देणें.—REMUNERATION देणगी *f*, प्रतिफल *n*. —REMUNERATIVE *a.* फल देणारा, बक्षीस देणारा.

RENAL, See under REINS.

RENCOUNTER (*re* & *counter*) meeting of two persons or bodies भेटाभेट *f*, ठेप *f*; combat कचाकची *f*, चकमक *f*, झमाझमी *f*.

REND* *v.* tear asunder फाडणें, चिरणें, टरकावणें; split चिरणें, दुभागणें, विभागणें (1 Kings xi. 11) [into].

RENDER *v.* (*-dare*, to give) return परत देणें -क.; inflict, as a retribution शासन लावणें, सूड उगवणें -घेणें; give देणें; contribute करणें, पुरवणें (service);—as an account हिशोब -झडती देणें; cause to do करवणें: to r. a fortress more secure; translate भाषांतर क.; boil down and clarify कढवून निवळ क.; plaster roughly अस्तरगारी क. [to]. -ING भाषांतर *n*; गिलाव्याचा पहिला थर घालणें -रचणें *n*; अस्तरगारी *f*.

RENDEZVOUS *F. meeting जमाव; place of meeting संकेतस्थल *n*, जमण्याची जागा *f*, अड्डा.

RENEW *v.* नवा क.; restore to former freshness ताजा क., उजरणें; begin again पुनः आरंभ क.; do over again पुनः -नव्यानें -परतून क.; furnish again पुनः पुरवठा क., पुरवणें; *Theol.* make new spiritually नवें मन देणें, नवा स्वभाव देणें (Rom. xii. 2).—*i.* नवा होणें; पुनः आरंभणें. -AL नवा करणें *n*, नवीकरण *n*, जीर्णोद्धार; फिरून करणें *n*, पुनरारंभ.

RENOUNCE *v.* (*-nunciare*, to announce) disclaim टाकणें, सोडणें, नाकारणें (a title); reject, as a connection or possession

टाकणें, सोडणें, त्याग क., नांव सोडणें. -MENT. —RENUNCIATION आंगाबाहेर टाकणें *n*; अस्वीकार, नाकार; त्याग, उत्सर्ग, परित्याग;—of the world सर्वसंगपरित्याग, सन्यास, संसारत्याग.

RENOVATE *v.* (*-novare,* to make new) See RENEW.

RENOWN (*-nomen,* name) नांव *n*, कीर्त्ति *f*. -ED नामांकित, कीर्त्तिमान, प्रख्यात [for].

RENT* भाडें *n*;—of land धारा, सारा, वसूल. -AL, -ROLL तहशील *f n*, तनखा, वसूल बाकीची याद *f*, जमाबंदी *f*. -ER भाड्यानें सांग्यानें लावणारा; the tenant who takes an estate on rent भाड्यानें घेणारा, भाडेकरी; सारेकरी, धारेकरी.

RENT (See REND) चीरफळा.

REPAIR *v.* (*-parare,* to prepare) restore to a good state after injury or decay दुरुस्त क., सुधारणें.—as a house डागडुजी -'रिपेर' क.; supply loss भरणें, भरून देणें, तोटा भरणें.—*n.* डागडुगी *f*, 'रिपेर' *f*, सुधारणूक *f*, जीर्णोद्धार; keep in r. मरामत -उस्तवारी राखणें; to look after the *repairs* of मोडतोड पाहणें.—REPARATION डागडुजी करणें *n*; डागडुजी *f*; amends फेडणें *n*; प्रतिकार, वजपा, मोबदला [for].

REPAIR *v. i.* (*-rapatriare,* to return to one's country) जाणेंयेणें -येणेंजाणें क.

REPARTEE *F.* समयोचित्त उत्तर *n*, हजीरजबाब.

REPAST (*pascere,* to feed) भोजन *n*, जेवण *n*; meal अन्न *n*, आहार.

REPAY *v.* परत देणें -क., फेडणें; make return फेड क., प्रतिदान क.

REPEAL *v.* (*-appeler,* to call) रद्द क., मोडणें. —*n.* मोडणें *n*, भंग, लोप, उच्छेद.

REPEAT *v.* (*-petere,* to attack) फिरून -दुसऱ्यानें -उलटून क., दुसारणें; say again फिरून ह्मणणें; rehearse ह्मणणें, पाठ ह्मणणें [to]. -EDLY *ad.* वारंवार, पुनःपुनः—REPETITION पुनरावृत्ति *f*, दुसारणी *f*, पुनः -दुसऱ्यानें क. *n*; दुसऱ्यानें बोलणें *n*, पुनरुक्ति *f*; पठन *n*, अनुवाद.

REPEL *v.* (*-pellere,* to drive) मागें सरणें -लोटणें, हटवणें; oppose आडवा येणें, वारणें, निवारणें [from].

REPENT *v. i.* (*-pœnitere,* to make repent) feel pain, sorrow, or regret for what one has done or omitted to do पश्चात्ताप -खेद पावणें -क.; change the mind or course of conduct on account of regret or dissatisfaction with what has occurred मन -बुद्धि फिरवणें, वर्त्तन पालटणें; *Theol.* be sorry for sin as morally evil and to seek forgiveness पापाविषयीं खेद क., पश्चात्ताप क. (Luke xiii. 3).—*t.* -विषयीं दुःख क. [of]. -ANCE पश्चात्ताप, अनुताप [for]. -ANT *a.* & *n.* पश्चात्तापी, अनुतापी.

REPERCUSSION (See PERCUSSION) उलटविणें *n*, प्रतिसारण *n*.

REPERTORY (*-parere,* to procure) कोठी *f*, कोठार *n*.

REPETITION, See under REPEAT.

REPINE *v. i.* (*re* & *pine*) मनांत झुरणें, खंतघेणें, चुरमुरणें [at].

REPLACE *v.* पहिल्या जागीं -जागच्या जागीं ठेवणें, पूर्वस्थितीवर ठेवणें; repay परत देणें, भरणें; substitute an equivalent for बदला देणें; supply the want of -ची गरज पुरवणें [by, with].

REPLENISH *v.* (*-plenus,* full) पुनः भरणें; fill completely तंतोतंत भरणें, भरणें [with].

REPLETE *a.* (*-plere,* to fill) पूर्ण, परिपूर्ण [with]. —REPLETION पूर्णता *f*, परिपूर्ति *f*; *Med.* fullness of blood अतिपुष्टि *f*, रक्तवृद्धि *f* -बाहुल्य *n*.

REPLY *v.* (*-plicare,* to fold) उत्तर देणें; *Law,*

प्रतिवादीच्या उत्तराला उत्तर देणें [to].—*n.* उत्तर *n*, जाब; प्रत्युत्तर *n*;—in judicial proceedings उत्तरवाद; an evasive r. टाळाटाळीचें उत्तर *n*, उत्तराभास.

REPORT *v.* (*-portare*, to bear) bring back, as an answer जाब आणणें -नेणें; relate what one has discovered, as a person sent to examine, explore, or investigate वाका -हकीकत सांगणें -लिहिणें पाठविणें; tell सांगणें, बोलणें, कळवणें; give a formal or official account of हुद्याच्या नात्यानें खबर देणें, रपोट क.; make minutes of, as a speech, or the doings of a public body टिपण घेणें; to be *reported* वाजणें; to r. one's self आपल्या वरिष्ठाचे चाकरी करितां हाजर असणें. —*n.* वाका, अहवाल, हकीकत *f*, 'रपोट'; rumor बातमी *f*, अवाई *f*; reputation आबरू *f*, कीर्त्ति *f*, लौकिक (Acts x. 22); sound आवाज;—of a gun बार, आवाज; record of a judicial opinion निवाडापत्रक *n*, अभिप्राय, 'रपोट'; sketch of a speech, or a public meeting सभेंतील भाषणाचा सारांश, 'रपोट'; written r. हकीकतनामा *f*; loud r. धडाका; false r. कंडी *f*, नीळरांप *f*; flying r. हूक *f*; idle *reports* बाजारी -गटारी बातमी *f*; to spread a r. बातमी फुंकणें, पेरणें [of, on, upon, to]. -ER अकबरनवीस, वार्त्तिक; वर्त्तमानपत्राचा बातमीदार, 'रिपोर्टर.'

REPOSE *v.* (See PAUSE) lay at rest निजविणें, विसांवा देणें; place in confidence भरवशानें -विश्वासानें ठेवणें, हातीं सोपणें [on, upon, in].—*i.* निजणें, आंग टाकणें, लवंडणें; विश्वासावर राहणें, भरवशानें -वर राहणें.—*n.* आराम, विश्रांति *f*; झोंप *f*; rest of mind सुख *n*, चैन *n* [from].—REPOSIT *v.* lay up सांठवणें, सांचवणें; lay up for safety जतनेस ठेवणें, पाळणें.—REPOSITORY सांठवण *n*, निधान *n*, निधि.

REPREHEND *v.* (*prehendere*, to lay hold of) दोष लावणें [for]—REPREHENSIBLE *a.* दोष लावायाजोगा, दूषणीय.—REPREHENSION दोष, ठपका, शब्द, बोल.

REPRESENT *v.* exhibit दाखविणें, दर्शविणें; delineate वर्णन क.; *Drawing*, चित्र काढणें -काढून दाखविणें; personate सोंग घेणें: to r. Ganpati; supply the place of स्थानीं -जागीं उभा राहणें, प्रतिनिधि होणें; stand in the place of, in the right of inheritance वारसाच्या जागीं राहणें -असणें; give one's own impression and judgment of -च्या विषयीं स्वमत -विचार दर्शविणें; serve as a sign of दर्शविणें, सूचक होणें -असणें: mathematical symbols r. quantities;—as a case सांगणें, निवेदन क., वाका सांगणें; [present a second time by a transcript of what was originally presented to the mind] [to, by]. -ATION दाखविणें *n*, दर्शविणें *n*; वर्णणें *n*, वर्णन *n*; चित्र *n*; सोंग *n*, वकिली *f*, प्रतिनिधित्व *n*; प्रतिमा *f*; r. against गिल्ला *n*. -ATIVE *a.* प्रदर्शक, प्रतिरूपक; वांटचा, प्रतिनिधीचा.—*n.* प्रतिनिधि, वकील [for, of].

REPRESS *v.* दाबणें, दडपणें; restrain आवरणें, निग्रह क.; आटोपणें [by].—REPRESSIVE *a.* नियामक, निग्रहकारी, दाबाचा.

REPRIEVE *v.* (*-probare*, to prove) delay the punishment of शिक्षेची तहकुबी क.; relieve for a time क्षणभर विसांवा देणें -चैन पाडणें.—*n.* शिक्षेची तहकुबी *f*; मरणाच्या शिक्षेची तहकुबी *f*; दम, अवसर, आराम [from].

REPRIMAND *v. F.* तोंडची शिक्षा क., धमकी देणें.—*n.* तोंडची शिक्षा *f*, धमकी *f*, शब्दमार, वाग्दंड [for].

REPRINT *v.* पुनः छापणें [from].—*n.* दुसरी छापणी *f*.

REPRISAL (*-prehendere*, to take) act of taking from an enemy by way of retaliation प्रत्यापहार; act of retorting on an

enemy by inflicting suffering or death on a prisoner taken from him, in retaliation for an act of inhumanity प्रतिपीडन *n*; that which is reprised अपहार [for].

REPROACH *v.* (*-prope,* near) abusive reflections निंदा *f,* अपवाद; shame लज्जा *f,* ठपका; object of blame, censure scorn, or derision निंदास्पद, ठपका, लाज *f* [for, with]. -FUL *a.* निंदेचा, निंदात्मक; लाजिरवाणा, लज्जाप्रद.

REPROBATE *v.* (*-probare,* to prove) नापसंद क., नाकारणें; abandon to punishment without hope or pardon सोडणें, टाकणें.—*a.* देवाधर्मानें टाकलेला, माणसांतून उठलेला.

REPROVE (do.) तोंडची शिक्षा क., शब्दाचा मार देणें; reprimand बोल -शब्द लावणें [for]. —REPROOF बोल, शब्दमार, वाग्दंड.

REPTILE *a.* (*repere,* to creep) सरपटत चालणारा; grovelling हलका, अधम, नीच.—*n.* पायाखालचा जीव, सरपटत चालणारा जीव, उरोगामी.

REPUBLIC (*res,* a thing, an affair, *publicus,* public) a state in which the sovereign power is exercised by representatives elected by the people लोकसत्तात्मक राज्य *n,* लोकाधिपत्य *n.* -AN *a.* लोकाधिपत्याचा, बहुनायकीचा; लोकप्रभुत्वानुसारी (manners).

REPUDIATE *v.* (*-pudere,* to be ashamed) reject नाकारणें; divorce बायकोला सोडचिट्ठी देणें disclaim आंगावेगळें -बाहेर टाकणें (debt) [for].—REPUDIATION त्याग, परित्याग.

REPUGNANCE (*-pugnare,* to fight) विरुद्ध -वांकडेपणा; reluctance नाखुशी *f,* कंटाळा. —REPUGNANT *a.* वांकडा, प्रतिकूल; नाखुश, नाराजी, विमुख [to].

REPULSE *v.* (*-pellere,* to drive) मागें सारणें, हटवणें.—*n.* प्रतिसारण *n,* हटवणूक *f.*—REPULSION प्रतिसारकशक्ति *f* -गुण; प्रतिसारण *n,* मागें सारणें *n.*—REPULSIVE *a.* प्रतिसारक, निवारक; त्रासजनक -कारक; cold अप्रीतिजनक, निस्नेह, कोरडा, थंड (manners).

REPUTE *v.* (*putare,* to count) मोजणें, गणणें, —*n.* आबरू *f,* प्रतिष्ठा *f*; credit derived from public opinion नांव *n,* कीर्त्ति *f.*—REPUTABLE *a.* आबरूचा, प्रतिष्ठित; कीर्त्तिप्रद, यशस्कर.—REPUTATION आबरू *f,* प्रतिष्ठा *f,* नांव *n.*

REQUIRE *v.* (*quærere,* to seek) demand मागणें, हक्कानें मागणें; make necessary गरज असणें -लागणें, अगत्य पाडणें [of]. -MENT सत्तेचें मागणें *n,* मागणी *f*; गरज *f,* जरूरी *f,* अगत्य *n.*—REQUEST *v.* विनंती क., मागणें, प्रार्थणें [of].—*n.* विनंती *f,* अर्जी *f,* प्रार्थना *f*; that which is asked for मागितलेली वस्तु *f,* इच्छा *f,* मागणें *n*; state of being desired or held in such estimation as to be sought after अपेक्षा *f,* इच्छा *f,* आकांक्षा *f*: knowledge and fame are in great r.—REQUISITE *a.* जरूरीचा, अगत्याचा, अवश्यक; to be r. लागणें, पाहिजे, असणें.—*n.* अगत्याची गोष्ट *f,* अवश्यक वस्तु *f.*—REQUISITION मागणें *n,* मागणी *f*; [a formal demand made by one state or government upon another for the surrender of a fugitive from justice]; that which is required by authority मागणें *n,* मागणी *f.*

REQUITE *v.* (*re* & *quit*) फेडणें, परत क., देणें [for].—REQUITAL प्रतिक्रिया *f,* फेडणें *n*; —in a bad sense प्रतिदंड, प्रतिकार, वजपा.

RESCIND *v.* (*-scindere,* to cut) रद्द क., माजी पाडणें, मोडणें.—RESCISSION रद्द करणें *n,* खंडन *n,* उच्छेद.

RESCRIPT (*-scribere,* to write) आज्ञापत्र *n,* राजाज्ञा *f.*

RESCUE *v.* (*-excutere,* to drive out) सोडविणें, उद्धरणें, बचाव क.—*n.* सोडवणूक *f,* सुटका *f,* तारण *n,* बचाव; [*Law.* the forcible retaking or taking away, against law, of things

lawfully distrained; also the forcible liberation of a person from an arrest] [from].

RESEARCH शोधणें *n*, शोध, परीक्षा *f*, विवेचन *n* [into].

RESEMBLE *v.* (*-similis*, like) उपमा -तुलना क.; be like to सारखा -बराबर असणें.—RESEMBLANCE सारखेपणा, सादृश्य *n*; likeness प्रतिरूप *n*, प्रतिमा *f*, उपमा *f* [to, between].

RESENT *v.* (*-sentire*, to feel) take ill वाईट वाटणें -मानणें, मनावर घेणें; express resentment by word or action वाईट वाटलेलें बोलून किंवा करून दाखविणें. -FUL *a.* अकसी; शीघ्रकोपी, तापट. -MENT राग, संताप, क्रोध.

RESERVE *v.* (*-servare*, to keep) ठेवणें, राखणें, पुढल्या कामासाठीं -खर्चासाठीं ठेवणें; retain ठेवणें, राखणें, पोटांत ठेवणें, बाळगणें.—*n.* राखलेला पदार्थ, सांठा, उपराळा;—of an army राखून ठेवलेली फौज *f*, फाजल *f* (*H.*); backwardness लाज *f*, भीड *f*, संकोच, पडदा; ठेवणें *n*, राखणें *n*; in r. उपराळ्यास, सांठ्यास; to lay by as r. घर ह्मणून ठेवणें [for].—RESERVATION ठेवणें *n*, राखणें *n*; withholding from disclosure मनांत ठेवणें *n*, गांठ *f*; सांठवण *f*, सांठपा; *Law*, a clause in an instrument in which some new thing is reserved out of the thing granted, and not *in esse* before सवड *f*, फट *f*; to speak without r. मन मोकळें करून बोलणें; to make a r. बोली सोडवणें.—RESERVED संकोचवृत्ति, आंतल्या गांठीचा, खोल मनाचा, मख्ख. -NESS संकोच.—RESERVOIR पाण्याचा खजीना -चें सांठवण *n*, टांकें *n*.

RESIDE *v. i.* (*-sedere*, to sit) राहणें, वसणें, नांदणें; inhere धरून -अधिष्ठून असणें, आंत राहणें: in such acts, virtue and duty r. [at, in].—RESIDENCE नांदणूक *f*, वस्ती *f*, रहिवास, अधिष्ठान *n*; an abode वस्ती *f*, ठिकाण *n*, घर *n*.—RESIDENT *a.* राहणारा, वस्ती करणारा, रहिवासी, in comp. वासी, स्थ: वनवासी, ग्रामस्थ.—*n.* राहणारा मनुष्य; a public minister who resides at a foreign court परराज्याच्या दरबारांत राहणारा वकील, 'रसिडेंट.'—RESIDENCY, See RESIDENCE; official dwelling of a government official in India 'रसिडेन्सी' *f*.—RESIDUE बाकी *f*, शेष *n*, उरलेला अंश, ऊर *f*; the balance of a debt or account बाकी *f*, शिलक *f*, शेंपूट *n*, खरकटें *n*.—RESIDUAL *a.* बाकीचा.

RESIGN *v.* (*-signare*, to sign) give up सोडणें, त्यागणें;—as an office सोडणें, राजीनामा देणें; withdraw as a claim सत्तानिवृत्ति क. [to]. -ATION त्याग, परित्याग, राजीनामा; state of being resigned मान्यतावृत्ति *f*; r. to the will of God ईश्वराच्या करण्यास -इच्छेस मान्य असणें *n*, ईश्वराज्ञा मान्यतावृत्ति *f*.

RESIN (*resina*) राळ *f*, धूप. -OUS *a.* राळेचा, राळेच्या गुणाचा.

RESIST *v.* (*-sistere*, to stand) विरोध -प्रतिकार क, अडती घालणें; oppose आडवा येणें, विरोध क., प्रतिकूळ होणें: God *resisteth* the proud.—*i.* अडथळा क., आडवा येणें. -ANCE अडती *f*, हरकत *f*, विरोध, प्रतिकार; unlawful or violent r. दंडेली *f* [against]. -IBLE *a.* विरोध करायाजोगा. -LESS *a.* अनिवार्य.

RESOLVE *v.* (*-solvere*, to loosen) द्रव -रस क.; reduce to the constituent elements मूळ तत्वें निराळीं क.; dissolve and reduce to a different form मोडून -विसर्जन करून वेगळें रूप देणें: the house *resolved* itself into a committee; disentangle उलगडा क., अर्थ सांगणें (a riddle); convince खातरी -समजूत क.; express, as an opinion, by resolution and vote ठराव क., ठरविणें; *Math.* solve, as a problem उलगडा क.; find the answer to -चें उत्तर काढणें -मिळवणें; *Med.* disperse

or scatter, as an inflammation or tumor बसवणें, जिरविणें, भिनविणें [on, upon]. —*i.* द्रवणें, रस होणें; जिरणें, मुरणें, मावळणें (a fever, tumor); संकल्प -निश्चय क. [into].—*n.* धैर्य *n*, धीर, नेट; ठराव, निश्चय, संकल्प.—RESOLUBLE *a.* वितळायाजोगा, द्रवनीय.—RESOLUTE *a.* धिराचा, नेटाचा, दृढनिश्चयी, निग्रही [against]. -NESS दम, धैर्य *n*, नेट.—RESOLUTION धैर्य *n*, नेट, हिमत *f*; ठराव, निश्चय, संकल्प; firm r. वज्र -दृढसंकल्प; r. of government सरकारचा ठराव.—RESOLVABLE *a.* रस होण्यासारखा, द्रवनीय, मूळतत्वें निराळीं होण्यासारखा; उलगडण्यासारखा.—RESOLVENT द्रावकपदार्थ, द्रावण.

RESORT *v. i. F.* repair जाणें, येणें; have recourse आश्रय धरणें -क., उपाय क. [to].—*n.* जाणें *n*, येणें *n*, आश्रय धरणें *n*; a haunt बसण्याचा अड्डा, बैठक *f*, जाण्यायेण्याची -बसण्याची जागा *f*; last r. निदानीचा उपाय.

RESOUND *v.* घुमणें, दणदणविणें, गाजणें; spread the fame of कीर्त्ति पसरणें, गाजविणें.—*i.* दणदणणें, घुमणें; गाजणें, पसरणें; sound loudly लांबवर आवाज जाणें; his voice *resounded* far; echo प्रतिध्वनि होणें -उठणें [with].—*n.* प्रतिध्वनि, नाद.—RESONANT *a.* प्रतिध्वनि करण्याजोगा, घुमण्याजोगा, अनुनादी, सनाद. — RESONANCE अनुनाद, प्रतिनाद, प्रतिध्वनि.

RESOURCE *F.* resort गति *f*, युक्ति *f*, उपाय, आश्रय; *pl* pecuniary means पैका, द्रव्यबल *n*, अर्थ; गत्यंतर *n*, अन्यगति *f*; having no other r. अनन्यगति; having no r. गतिहीन, निरुपाय; last r. निदानीचा -शेवटचा उपाय.

RESPECT *v.* (*-specere,* to look) relate to लागणें, लागू होणें, संबंध असणें; regard मानणें, सन्मान राखणें [for].—*n.* संबंध, धोरण *n*; मान, सत्कार, आदर, भीड *f*; that which respects to any person or thing प्रकरण *n*, बाबद *f*, गोष्ट *f*; r. of persons भेददृष्टि *f* -भाव; with respect to विषयीं, संबंधी; *pl* मुजरा, सलाम, रामराम; to pay one's *respects* दर्शन घेणें, मुजरा -सलाम क. [for]. -ABLE *a.* अब्रूचा, अब्रूदार, प्रतिष्ठित, संभावित; moderate in degree of excellence or in number, but not despicable बरासा -च, जमेस धरायाजोगा, सरासरी, मध्यम. -FUL *a.* मर्यादेचा, भिडेचा, मर्यादशील, आदबशीर. -FULLY *ad.* मर्यादेनें, आदरपूर्वक -पुरस्सर. -IBILITY अब्रू *f*, प्रतिष्ठा *f*, इजत *f*, मर्यादा *f*; family r. कुलमर्यादा *f*. -ING *prep.* विषयीं. -IVE *a.* साक्षेप, ससंबंध; each to each आपापला, ज्याचा त्याचा, in comp. स्वस्व. -LY *ad.* ज्याचा त्यानें.

RESPIRE *v. i.* (*-spirare,* to breathe) श्वास -दम टाकणें, दम घेणें.—RESPIRATION श्वास, उश्वास, प्राण.—RESPIRATORY *a.* श्वासोश्वासाचा, श्वासोश्वास संबंधी (organs).

RESPITE (See RESPECT) postponement तहकुबी *f*; pause विसांवा, अवकाश, विराम; *Law,* reprieve शिक्षेची तहकुबी *f* [from]. —*v.* तहकूब क.; विसांवा देणें; शिक्षेची तहकुबी क.

RESPLENDENT *a.* (*splendere,* to shine) चकचकीत, तेजस्वी, प्रकाशमान [with].

RESPOND *v. i.* (*-spondere,* to promise) उत्तर -जबाब देणें; suit मिळणें, जमणें, जुळणें; render satisfaction तोटा भरून देणें, भरणें: the defendant is held to r. in damages. [to].—*t.* तोटा भरून देणें.—*n.* [a short anthem interrupting the reading of a chapter which is not to proceed until the anthem is ended]. -ENT *Law,* प्रतिवादी -पक्षी; जुळणारा, बेताचा;—one who maintains a thesis in reply प्रत्युत्तर देणारा, स्थापन -मंडन करणारा. -ENCE उत्तर देणें *n.*—RESPONSE उत्तर *n*;—in disputation समाधान *n*, उत्तर *n*, प्रतिवाद;—in a litany

उत्तरवाक्य *n.* [to]. — RESPONSIBLE *a.* जबाबदार, मोसबेदार [for].—RESPONSIBILITY जबाबदारी *f*, जामीनकी *f*, जिम्मा *f*, मोसबा.—RESPONSIVE *a.* उत्तर देणारा; जुळणारा, जमविणारा: the vocal lay r. to the strings.

REST* state of quiet or repose स्थिरता *f*, निवांतपणा, शांति *f*, निश्चलता *f*; cessation from motion or labor विसांवा, आराम, विश्रांति *f*; tranquillity सुख *n*, समाधान, चैन *n*, शांति *f*, स्वस्थता *f*; that on which any thing rests or leans for support आधार, धीर, धिरा; a place where one may rest विसांव्याची जागा *f*, विश्रांतिस्थान *n*;—for porters धका, ओटा, तक्या इ०; sleep निद्रा *f*, निद्रावस्था *f*; death मरण *n*; देहावसान *n*; *Poet.* and *Mus.* a short pause in reading अवसान *n*, यति *f*;—as of a lance आधार, नेटावा, घोडा, लाग; to feel at r. सुखास -चैन पडणें; to lie down to r. निजणें.—*v. i.* आराम क., झोंप घेणें; स्थिरावणें, स्थिर होणें, थांबणें; स्वस्थ -सुखी -शांत असणें, सुख वाटणें; विसंबणें, विसांवा घेणें -पावणें, बसणें; आधार -आश्रय क., टेकावा असणें, राहणें: a column *rests* on its pedestal; अवसान पावणें, मरणें; rely टेकून राहणें, टेकणें, विश्वास ठेवणें: to r. on God's promises; to r. with -च्या हातीं देणें; it *rests* with him to decide [on, upon, in, from].—*t.* शांत -स्वस्थ क., बसवणें; ठेवणें, टेकणें. -LESS *a.* अशांत, शांतिहीन, बेआराम, व्याकूळ; passed in inquietness तळमळीचा, बेआरामीचा: the patient has had a r. night रोग्याला रात्रभर डोळ्यास डोळा लागला नाहीं -चैन पडलें नाहीं; hard कठीण, अडचणीचा; discontented with one's lot, residence, &c. आपल्या भोगास -स्थितीस कंटाळलेला; not satisfied to be at rest चुळबुळ्या, चंचळ, घालमेल्या: a r. prince; disposed to be turbulent धांदल्या, धुमाळ्या, बंडखोर: a r. subject; sleepless निद्राहीन. -LESSNESS असमाधान *n*, तळमळ *f*, बेआरामी *f*, हळहळ *f*; चुळबुळ *f*, उठबैस *f*, चंचळपणा; घालमेल *f*, चडफड *f*; निद्राराहित्य *n*.

REST (*restare*, to stay back) शेष *n*, बाकी *f*; the remainder वरकड -बाकीचे -अवांतर जिन्नस -मनुष्यें इ०.—*v. i.* राहणें, उतरणें [with]. -OFF, IVE *a.* अडेल, खलेल. -NESS दंडेली *f*, खलेली *f*, अडेलपणा.

RESTITUTION (*statuere*, to put) परत देणें *n*, प्रतिदान *n*; तोटा भरून देणें *n*; पूर्वस्थितीवर आणणें *n*, उद्धार.

RESTORE *v.* (*restaurare*) bring back from the state of ruin निटावणें, पूर्वस्थितीवर आणणें, उजरणें; give or bring back, as that which has been lost (गमावलेला) परत देणें -आणणें; bring back to health or strength बरा -निरोगी क.; give in place of or as satisfaction for बदला -भरून देणें. [from, to, buy, with].—RESTORATION परत देणें *n*, प्रतिदान *n*; सुधारणें *n*, सुधारणूक *f*, जीर्णोद्धार; पुनःस्थापन *n*, पूर्वस्थितिस्थापन *n*, [to].—RESTORATIVE *a.* पूर्वस्थितीवर आणणारा; तेजोदायक. —*n.* तेजोदायक, तेजवर्धक औषध *n*, तेजबल *n*.

RESTRAIN *v.* (*stringere*, to draw together) आकळणें, आवरणें, दाबांत ठेवणें; confine अटकेंत ठेवणें -घालणें, बांधणें; withhold माघारा ठेवणें, राखणें, न देणें; abridge संक्षेप क. [from, by]. -ABLE *a.* आकळायाजोगा, आकलनीय, दमनीय. -ED आकळलेला, नियत, संयत, निगृहीत;—in desire जितेंद्रिय, बद्धकाम. -ER आकळणारा, नियामक, निरोधक.—RESTRAINT आकळणें *n*; आकलन *n*, नियमन *n*; आटोप, दाब, अवरोध, लगाम; self-r. आत्मसंयम;—of speech, action, &c. भीड *f*, संकोच, दाब; to feel under r. भीड पडणें -असणें, संकोच वाटणें; that

which restrains, as a law, a prohibition आसेध: r. of time कालासेध; r. of place स्थानासेध; a r. अटक *f*, दडपण *n*, आडकाठी *f*.—RESTRICT *v.* मर्यादा -हद्द क., आळा बांधणें: to r. a patient to a certain diet रोग्यास पथ्यावर ठेवणें [to]. -ED निबद्ध, परिमित;—as a word मितार्थ, योगरूढ. -ION मर्यादा *f*, आळा; आडकाठी *f*, अटकाव, दडपण *n*.

RESULT *v. i.* (*resultare,* to leap back) proceed निघणें, येणें, फळ होणें, होणें; end in परिणाम -शेवट होणें; *Logic* सिद्ध होणें [in, from].—*n.* फळ *n*, परिणाम; सिद्धांत, निश्चितार्थ; उपपत्ति *f*. -ING प्रयुक्त, उत्पन्न, प्रभव: pain r. from sin पापप्रयुक्त दुःख.

RESUME *v.* (*-sumere,* to take) परत घेणें; begin again पुनः आरंभ क., चालवणें.—RESUMABLE *a.* परत घ्यायाजोगा.—RESUMPTION परत घेणें *n*, प्रत्याहार;—of a grant दत्तापहार; [*Law,* taking again into the king's hands such lands or tenements as he had granted to any man on false suggestions].

RESUME *F.* सार, उपसंहार, सारार्थ, गोश्वारा.

RESURRECTION (*-surgere,* to rise) पुनः उठणें *n*; rising again from the dead मरून पुनः उठणें *n*; the future state पुनरुत्थिति *f*.

RESUSCITATE *v.* (*-suscitare,* to raise) revive, esp. to recover from apparent death फिरून जिवंत -सजीव क., जिवांत जीव आणणें -घालणें: to r. a drowned person; to r. withered plants.—*i.* जिवांत जीव येणें, पुनः जिवंत होणें, सजीव होणें.

RETAIL *v. F.* cut up and dispose of in small parcels फुटकळ -किरकोळ विकणें; sell in small portions थोडें थोडें सांगणें. -ER किरकोळ -फुटकळ विकणारा, घेवारी, फडकरी.

RETAIN *v.* (*-tenere,* to hold) ठेवणें, धरणें, राखणें; keep in pay पदरीं -जवळ ठेवणें, मुशारा देऊन -चाकरीस ठेवणें [in]. -ER ठेवणारा, राखणारा; a servant पदरचा माणूस, आश्रित; body *retainers* परिवार, सेवकवर्ग. -ING धारण *n*, धृति *f*. -TIVE *a.* धारणशक्तिविशिष्ट, दृढ (memory). -TION ठेवणें *n*, धारण *n*; धारणाशक्ति *f*, धारणा *f*; custody राखण *f*, रखवाली *f*; [*Law,* right of withholding a debt or of retaining property until a debt due to the person claiming this right be duly paid].—RETINUE स्वारी *f*, जिलीब *f*, इतमाम, खटलें *n*; light r. सडीस्वारी *f*.

RETALIATE *v.* (*-talis,* such) उलट -परत क., फेडणें, सूड उगवणें (injuries) [upon].—RETALIATION फेड *f*, उसणें फेडणें *n*, प्रत्युपकार, वाईटा बदल वाईट फेडणें *n*, सूड [for].

RETARD *v.* (*-tardare,* to delay) उशीर लावणें, खोळंबा -खोटी क., मंद -ढिला क.: to r. the march of an army; to r. the motion of a ship; to put off लांबणीवर टाकणें, उशिरानें क., दिवसगतीवर लोटणें: to r. a rupture between nations.

RETENTION, See under RETAIN.

RETICLE *F.* लाहान जाळें *n*; [net work dividing a telescope glass into equal squares].—RETIFORM *a.* जाळ्याचा आकाराचा, जाळीदार.—RETINA (*L.*) डोळ्याचा एक पडदा आहे.

RETIRE *v. i. F.* draw back or away मागें सरणें -हटणें -होणें -जाणें; go from company or from a public place into privacy समेंतून -मंडळींतून उठून जाणें, निघून जाणें; retreat from danger संकटापासून निघून जाणें, पळणें; withdraw into private life घरीं बसणें, रोजगार सोडणें; recede मागें सरणें -हटणें: the sea *retires* in bays [from, with]. -MENT मागें सरणें *n*; घरीं बसणें; एकांतवास; एकांतवासाचें स्थल *n*.—RETIRED मागें सरलेला; घरीं बसलेला; sequestered आडवळणी, एकांताचा;—of

persons साबडा, भिडस्त, संकोचवृत्ति; a r. spot आडवळण *n*.

RETORT *v.* (*-torquere*, to turn) bend or curve back वळविणें, पीळ देणें; return, as an argument उलट -परत देणें; reverberate प्रतिध्वनि क. [in, upon].—*i.* उलटून बोलणें -सांगणें.—*n.* उलट गोष्ट *f*, फेरजबाब, जाबसाल, प्रत्युत्तर *n*; *Chem.* वक्रयंत्र *n*.

RETRACE *v.* (*re & trace*) परत जाणें -येणें; —one's steps मागें परतणें, मागें पाऊल टाकणें; trace back पत्ता लावणें; trace over again गिरवणें; reverse फिरवणें: to r. one's proceedings.

RETRACT *v.* (*-trahere*, to draw) draw back, as claws नखें आंत घेणें; recant बोलणें परत घेणें -फिरवणें.—*i.* बोलणें परत घेणें. -ION बोलणें फिरवणें *n*, बोलला बोल परत घेणें *n*, उक्तत्याग.

RETREAT *v. i.* (do.) मागें सरणें -हटणें; retire from an enemy शत्रूपुढून पळणें; शत्रूस पाठ दाखविणें; retire एकांत -अज्ञात वासांत जाणें, आश्रय धरणें [from].—*n.* मागें जाणें *n*, माघार *f*; एकांतस्थान *n*, शत्रूपासून पलायन *n*, पळणें *n*; मागें जाण्याची खूण *f* -इशारत *f*; *Mil. & Naval* संध्याकाळचा तंबूर; *Rom. Cath. Ch.* एकांतीच्या भक्तीची वेळ *f*.

RETRENCH *v. F.* कापणें, कमी क., तोडणें, छाटणें; furnish with a retrenchment चर खणणें -बांधणें.—*i.* कमी खर्चावर राहणें. -MENT कमी करणें *n*, तोडणें *n*; काटाकाटी *f*, काटकसर *f*; चर, खंदक.

RETRIBUTION (*-tribuere*, to bestow) प्रतिक्रिया *f*, प्रतिफळ *n*, फळ *n*; reward and punishment, as distributed at the general judgment जगाच्या न्यायकाळीं मिळणारें कर्मफळ *n*.—RETRIBUTIVE *a.* प्रतिफलदायक.

RETRIEVE *v. F.* पुनः मिळवणें; bring back परत -माघारा आणणें; repair सुधारणें, नीट क. [from, by].

RETROGRADE *v.* (*retro*, back, *gradi*, to step) परत जाणें -येणें, परतणें, उलटणें.—*a.* परतणारा, प्रतिगामी; contrary उलटा, विपरीत; *Astron.* वक्रगति, वक्र. —RETROGRESSION परत जाणें *n*, व्यक्तिक्रम; वक्रगति *f*.

RETROSPECT *v.* (*-specere*, to look) मागें परतून पाहणें.—*n.* मागें पाहणें *n*, गतावलोकन *n*, मागचा विचार. -IVE *a.* मागला पाहणारा, गतावलोकी, अनुदर्शी; having reference to what is past मागल्यास लागू पडणारा, गतकालापेक्षक.

RETURN *v. i.* (*-tornare*, to turn) परत -माघारा -फिरून येणें -जाणें; come again, as a visitor परतून भेटायास येणें, परत येणें; appear again after an interval कांहीं वेळानें -राहून -थांबून पुनः दिसणें -येणें, परत येणें: seasons r.; reply उत्तर देणें; retort उलटून दोष लावणें -वर घालणें.—*t.* परत आणणें; परत पाठविणें -क.; repay परत देणें, फेड क. (money); परतजाब देणें; report खबर देणें, कळवणें, जाहीर क.; report officially सरकारांत खबर देणें, सरकारी नात्यानें -अधिकारपत्रें याद करून -तक्ता भरून पाठविणें; convey into official custody or depository सरकारी कोठींत -तिजोरींत वगैरे भरणें -नेणें.—*n.* परत जाणें *n*, पुनरागमन *n*, पुनरावृत्ति *f*; परतणें *n*, उलटणें *n*, परतणी *f*; उलट *f*, माघार *f*, प्रतिगमन *n*; परत करणें *n*, परतणी *f*; परत देणें *n*, प्रतिदान *n*, फेड *f*; उलटजाब, प्रत्युत्तर *n*; हकीकतनामा, 'रिटर्न' *n*; tabular r. तक्ता, 'रिटर्न' *n*; r. hire परत भाडें *n*; blank r. डौलपत्र *n*; profit on labor प्राप्ति *f*, मिळकत *f*, उपज [from, to]. -ABLE *a.* परत करण्याजोगा -देण्याजोगा; [*Law*, legally required to be returned, given or rendered].

REUNITE *v.* फिरून -पुनः जोडणें [with]. —*i.* पुनः मिळणें.—REUNION पुनर्योग; an assembly of familiar friends मित्रांची मंडळी *f*, बैठक *f*, मेळा, सभा *f*, इ०; पुनः मिळणें *n*, पुनर्मेलन *n*, मिलाफ.

REVEAL *v.* (*-velare*, to vail) उघडा क., पडदा -झांकण काढणें; show दाखविणें; disclose प्रसिद्ध क., फोडणें, सांगणें; communicate that which could not be known or discovered without divine or supernatural instruction ईश्वरी प्रेरणेनें -उपदेशानें प्रगट क. -कळविणें [to, by]. -ATION प्रगट करणें *n*, प्रगटीकरण *n*; प्रगट केलेली गोष्ट *f*; the act of revealing divine truth ईश्वरी ज्ञान *n*, उपदेश *f*, इ० प्रगट क.; that which is revealed by God to man ईश्वरानें प्रगट केलेली गोष्ट *f*, ईश्वरोक्त शास्त्र *n*, ईश्वरीवाचा *f*, शास्त्र *n*; the last book of the sacred canon, containing the prophecies of St. John प्रगटविण्याचें पुस्तक *n*, प्रगटविणें *n*.

REVEL *v. i.* (See REBEL) बहर -मौजा मारणें, धुमाळी -चैन क., धणंगणें.—*n.* चैन *n*, धुमश्चक्री *f*, बहर *f*. -RY धमंडी *f*, दिवाळी *f*, चंगळ *f*, रंग.

REVENGE *v.* (See VINDICATE) inflict punishment in vindication of सूड घेणें -उगवणें; inflict injury for, in a spiteful, wrong, or malignant spirit सूड घेणें, वैर उगवणें, दावा साधणें, वजपा काढणें [upon].—*n.* सूड उगवणें *n*, प्रतिफल *n*, सूड [for]. -FUL *a.* अकसखोर, खुनसी, काळा साप, कृष्णसर्प.

REVENUE (*-vinire*, to come) that which returns from an investment उत्पन्न *n*, वसूल, आदा; reward बक्षीस *n*, फळ *n*: a rich r. of praise; annual produce of taxes, customs, &c., which a nation or state collects and receives into the treasury for public use जमाबंदी *f*, वसूल, महसूल; arrears of r. सनदबाकी *f*; assignment for pay on the r. तनखा वरात or वरात *f*; collection of the r. कमावीस or कमाविसी *f*, कमावीसदारी *f*, तहसील *f*, खोतकी *f*; collection of r. due from the ryots तळाटी -ठी *f*; collectors of r. कमावीसदार, वसूलदार, खोत; extra r. खेरीज जमा *f*; fixed and regular r. ऐन जमा *f*, ऐन जमाबंदी *f*; full r. भरवसूल; general abstract of r. तरजमा *f*; gross r. भरजमा *f*, भरवसूल; maximum of the r. कमाल *n*; of or belonging to the r. महसुली; one employed in collection of r. वसुली or वसुल्या; remission of r. सूट *f*, एहसान *n*; r. and disbursements जमाखर्च; r. from the soil काळीचा वसूल, काळीचा पैका; r. police शिबंदी *f*; r. survey पाहणी *f*; r. surveyor पाहणदार or पाहणीदार; r. survey-report पाहणी खरडा; settlement of the r., assessment of the lands, &c. जमाबंदी *f*; shares out of the r. which belong to the head-officers बाबती *f pl*; sum in commutation of r. in kind तसर *n*; that has an assignment on the r. वरातदार; that yields good r. वसुली; that yields full r. भरवसुली; to collect r. वसूल करणें; settlement of *revenues* by instalments खिस्तबंदी *f*; r. year फसली साल *n*.

REVERBERATE *v.* (*verberare*, to lash) echo प्रतिध्वनि क., पडसाद उठवणें; reflect, as light or heat परावर्तन क.; send back मागें पाठविणें: flame *reverberated* in a furnace. —*i.* प्रतिध्वनि होणें; मागें हटणें -सरणें [with].

REVERE *v.* (*-vereri*, to fear) पूज्यबुद्धीनें मानणें, भीड धरणें, मान राखणें [for].—REVERENCE पूज्यबुद्धि *f*, श्रद्धा *f*, भीड *f*, सत्कार; act of revering नमस्कार, प्रणाम, अभिवंदन *n*; a person entitled to be revered पूज्य-शिष्ट जन -पुरुष; [a title applied to priests or ministers]; to do r. नमस्कार क. [for] *v.*

पूज्यबुद्धीनें मानणें, भीड राखणें [by, for].—REVEREND *a.* पूज्य, शिष्ट, मान्य, बुद्धख; [this word often employed as a title of respect given to the clergy; a clergyman is styled r.; a bishop, right r.; an archbishop most r.; in England, a dean is styled very r].—REVERENT *a.* भिडेचा, भिडस्त, आदरयुक्त (words); नम्र, आदरशील. -IAL *a.* पूज्यबुद्धीचा, पूज्यबुद्धीनें मानणारा, अदब राखणारा, अदबशीर: r. esteem of sacred things. -LY *ad.* आदरबुद्धीनें, आदरानें, भिडेनें, मर्यादेनें.

REVERT *v.* (*-vertere,* to turn) परतवणें, उलटवणें [to]—*i. Law,* return to the proprietor मालकाकडे परत येणें.—REVERSE *v.* परत फिरवणें, फिरवणें; change totally उलटा क., बदलणें; turn upside down पालथा क., उफराटणें; subvert पाडणें, मोडणें; confound घालमेल क.; *Law,* overthrow by a contrary decision फिरवणें, रद्द क.; [to r. an engine, to cause it to perform its revolutions or action in the opposite direction].—REVERSION returning of an estate to the grantor or his heirs पहिल्या देणाराकडे किंवा त्याच्या वारसाकडे परत जाणें *n*; right to future possession उत्तराधिकार. -ARY *a.* उत्तरभोग्य, अन्य भोगोत्तरप्राप्य. —REVIEW *v.* मागें पाहणें; go over and examine पाहणें, चौकसी क.; reconsider फिरून पाहणें -विचार क.; make a formal or official examination of the state of -ची पाहणी -चौकशी क.;—a book, &c. गुणदोष काढणें, गुणदोष विवेचन क.—*i.* पाहणी क. —*n.* फिरून पाहणें *n*, उलट पाहणी *f*, पुनर्विचार; पाहणी *f*, चौकशी *f*; गुणदोष विचार -विवेचन *n*; inspection of troops under arms लष्कराची पाहणी *f*, 'रवी' *f*; a periodical pamphlet containing examinations or analysis of new publications गुणदोषविवेचक पुस्तक *n*, 'रिव्यु' *f*.

REVILE *v.* (*re & vile*) treat with opprobrious and contemptuous language निंदा क., निंदणें. —REVILER निंदक, कुटाळ, निंदाखोर.

REVISE *v.* (*-videre,* to see) फिरून पाहणें, तपासणें: review, alter, and amend तपासून नीट क. -शुद्ध क.—REVISAL तपासणी *f*, शोध. —REVISER तपासणारा, शोधणारा, तपासनीस; ग्रंथ तपासणारा, 'रिवैजर.'—REVISION तपासणी *f*, शुद्धि *f*, शोध; that which is revised तपासलेली गोष्ट *f*, शोधलेलें पुस्तक *n*, वगैरे.

REVIVE *v. i.* (*-vivere,* to live) मरून उठणें, जिवंत -सजीव होणें, जिवांत जीव येणें; recover from a state of neglect, oblivion, obscurity, or depression जीव धरणें, सावरणें, फिरून उपस्थित होणें, उजेडीं येणें.—*t.* सजीव क., जिवांत जीव घालणें; जीव आणणें, उचल-उठावणी क. [by, with].—REVIVAL संजीवन *n*; पुनर्जीवन *n*; सावरणें *n*, सावर, पुनःसंस्थिति *f*; renewed interest in religion after indifference and decline धर्मसंजीवन *n*.

REVOKE *v.* (*-vocare,* to call) रद्द क., फिरवणें.

REVOLT *v. i.* (*revolvere,* to roll back) फिरणें, उलटणें; renounce allegiance or subjection फितणें, फितूर होणें, बदलणें, उलटणें; to be grossly shocked धडकणें, धडकी -दचका बसणें [against, from].—*n.* फितवा, फितूर.—REVOLUTION फिरवणें *n*, आवर्त्तन *n*; return पाळी *f*, प्रदक्षिणा *f*; rotation परिभ्रमण *n*; —of a planet गति *f*; a fundamental change in political organization राज्याची उलटापालट *f*, उलथापालथ *f*, राज्यक्रांति *f*, राज्यांतर *n*, गर्दी *f*;—of Nadir Shah नादीरगर्दी *f*;—of Bhavoo भाऊगर्दी *f*.

REVOLVE *v. i.* (*-volvere,* to roll) फिरणें, परिभ्रमण क.—*t.* फिरवणें, परिभ्रमण करविणें; —in the mind मनांत घोळणें, मथणें [around]. —REVOLVER फिरणारा; एक प्रकारचें पुष्कळ बारांचें पिस्तुल आहे, 'रिवाल्वर' *n*.

REWARD *v. F.* give in return, whether good or evil परत -उलट देणें;—in a good sense बक्षीस देणें.—*n,* प्रतिदान *n,* उलट देणें *n,* इनाम, *n,* बक्षीस *n,* देणगी *f* [for, of].

RHAPSODY (*Gr. rhaptein,* to sew, *odé* a song) विसंगत -असंबद्ध भाषण *n,* पांटीभर बोलणें गुंजभर अर्थ.

RHETORIC (*Gr. rheo,* I speak) art of composition वाक्यरचनाविद्या *f*; art of elegant and accurate composition in prose अलंकारशास्त्र *n*; art of speaking with propriety, elegance, and force अलंकारिक व रसभरित शब्दांनीं भाषण करण्याची विद्या *f,* सुभाषित *n,* वक्तृत्व *n.*—RHETORICAL *a.* अलंकारिक; अलंकारशास्त्र संबंधी.—RHETORICIAN अलंकारशास्त्रज्ञ.

RHEUMATISM (*Gr. rhein,* to flow) a painful inflammation affecting muscles and joints of the human body वातरोग; chronic r. proceeding from affection of the bowels आमवायु; r. attended with fever वातपित्त; acute r. उग्रवायु; r. of the loins कटिवात, उसण *f,* शिलक भरणें *n*; r. in the joints संधिवात; to be affected with r. फुटणें (हात -पाय).—RHEUMATIC *a.* वातरोगाचा.—RHEUMY *a.* चिपडा, पिचका.

RHINOCEROS (*Gr. rhinos,* the nose, *kepas,* a horn) गेंडा.

RHOMB (*rhombus*) *Geo.* विषमचतुरस्र.

RHUBARB *Ar.* रेवाचिनी *f.*

RHYME*, harmony of language भाषेचा ताल -मेळ; poetry कविता *f,* काव्य *n*; correspondence of sound in poetry यमक *n*; a word answering in sound to another word यमक *n*; neither r. nor reason ताळ नाहीं तंत नाहीं.—*v. i.* यमक मिळणें -होणें; कविता -कवन क.—RHYTHM (*Gr. rhuthmos*) ताल.—RHYTHICAL *a.* तालबद्ध.

RIB*, one of the long bones inclosing the thoracic cavity फांसळी *f,* बरगडी *f*;—of leaf दांडा, हीर;—of an umbrella शलाका *f.* -WORT इसपगोल.

RIBALD *a. F.* तोंडाचा फटकळ, तोंडशिनळ.—RIBALDRY अभद्र -शिवरें -पचकळ बोलणें *n* -भाषण *n.*

RIBAND, RIBBON (*rubens,* red) फीत *f,* 'रिबन' *f*; shred चिंधी *f.*

RICE *F.* the grain in the husk भात *n,* साळ *f*;—as husked तांदूळ;—as boiled भात; r. with milk खीर *f.*

RICH* *a.* wealthy मातबर, श्रीमंत, धनवान्; abounding आढ्य, संपन्न, मय, प्रचुर, all in comp.: विद्यासंपन्न, गुणसंपन्न, &c.; fruitful पिकाऊ, मातबर (soil);—as a dish रसरसीत, मसालेदार, पक्कान्नाचा; bright घवघवीत, भडक (color); full of sweet and harmonious sounds मधुर, सुस्वर; abounding in beauty शोभिवंत, छान, देखणा (landscape); abounding in humor विनोदाचा, ख्याली (incident); r. from birth गर्भश्रीमंत; to get r. उखळ पांढरें होणें [in]. -ES संपत्ति, दौलत *f,* धन *n,* ऐश्वर्य *n*; lust of r. धनलोभ; puffed up by r. मालमस्त; r. of unrighteousness पापधन *n.* -LY *ad.* बहुत धनानें, बहुत पैसा देऊन; पुरतेपणीं, पुष्कळ; थाटानें, शोभा येईसा; truly खरोखर; fully पुरा, खूब. -NESS श्रीमंती *f,* सधनता *f*; रसरसीतपणा, मिष्टता *f*; मातबरी *f*; विपुलता *f,* भरपुरी *f*; भडक *f,* घवघवीतपणा; शोभा *f,* तेज *n.*

RICK* गंज, ठिकी *f*;—of unthreshed corn सुडी *f,* उडवी *f.*

RICKETS* *pl.* कुटिलवात.—RICKETY *a.* कुटिलवाताचा; feeble in the joints लटपटीत, डळमळीत, खिळखिळा; to be r. लटलटणें, डकडकणें, लडबड हलणें.

RID* *v.* सोडवणें, मोकळा क.; to get r. of टाळणें, वाट देणें. मोकळा होणें [of]. -DANCE सोडवणूक *f*, सोडवण *f*; वेंचणी *f* (Lev. xxiii. 22); सुटका *f*, मुक्ति *f*.

RIDDLE* मोठी चाळण *f*, घोळणा.—*v.* चाळणें, घोळणें; make many holes in चाळण क.: a house *riddled* with shot.

RIDDLE*, enigma उखाणा, आहणा, कूट *n*; anything puzzling कूट *n*; to find out a r. उखाणा जिंकणें.

RIDE* *v. i.* be carried on the back of any animal (घोडा, गाढव इ०) बसणें, स्वार होणें, -बसून जाणें; be borne in a carriage गाडींत बसून जाणें; be borne in or on fluid तरंगणें, पोहणें, तरणें; manage a horse well घोड्यावर मांडी -आसन साधणें; sit बसणें [from, to].—*t.* -वर बसणें; manage insolently at will मगरुरीनें मनास वाटेल तसें चालवणें, दामटणें, दपटणें.—*n.* घोड्यावरची रपेट *f* -सहल *f*; a road for riding घोडेवाट *f*. — RIDER घोड्यावर बसणारा, स्वारी *f*, स्वार; one who breaks a horse चाबुकस्वार; an addition to a manuscript or other document, inserted after its completion, on a separate piece of paper पुरवणी *f*.

RIDGE*, back पाठ *f*;—of a hill कणा, दांडा, रांग *f*;—of a roof पाटेस; as raised on a plantation to stop water कांडोळें *n*, दंड; r. pole आढें *n*.—*v.* दांड घालणें; wrinkle सुरकुती पाडणें. -TILE ढापा.

RIDICULE *v.* (*-ridere*, to laugh) हासणें, थट्टा -उपहास क. [for, by].—*n.* हसें *n*, थट्टा *f*, टेर *f*.—RIDICULOUS *a.* हसायाजोगा, उपहासास्पद.

RIFE *a.* चालू, चलतीचा, प्रवृत्त [with].

RIFLE *v. F.* carry off हिरावून नेणें, हरण क., हिरावणें; plunder लुटणें.—*n.* एक प्रकारची बंदूक *f*, 'रैफल' बंदूक *f*.

RIG* *v.* सजवणें, सज्ज क. -GING—of a ship दोरखंडें *n pl.*

RIGHT* *a.* straight उजू, नीट, सरळ (way); upright उभा, सरळ, खरा (a beam); conformed to the constitution of man and the will of God खरा, नेक, सत्य, यथार्थ; fit उचित, योग्य, लायक; unquestionable खचीत, निःसंशय: they manifested themselves to be r. barbarians; not wrong खरा, वास्तविक: you are r. तुम्ही बोलतां -करितां इ० तें खरें आहे; most favorable अनकूळ, उजू, सोयीचा (side); not left उजवा (hand); being on the same side as the right hand उजवीकडला, उजव्या हातचा, दक्षिण; well regulated सुव्यवस्थित, बंदोबस्ताचा; [being on the right hand of a person whose face is toward the mouth of a river]; designed to be placed or worn outward सुफराटा, सुलटा, उजू: the r. side of a piece of cloth; winding to the r. दक्षिणावर्त्ती; r. ascension विषुवांश; r. line सरलरेखा *f*; r. angle काटकोन; r. and left सव्यापसव्य.—*ad.* नीट, ठीक, बरोबर, यथामार्ग; खरा, यथार्थ; नीट, समोर, धडक, धोपट (Prov. iv. 25); in a great degree फारच, अति (sorry); [very;—prefixed to titles: r. honorable; r. reverend].—*n.* that which is right or correct न्याय, नीति *f*, उजूपणा; freedom from falsehood खराई *f*, खरेपणा; adherence to truth सत्यनिष्ठा *f*; a just judgment न्याय, इनसाफ, दाद *f*; integrity प्रमाणिकपणा; that to which one has a claim हक, हकमाल; legal power अधिकार, सत्ता *f*; a sheriff has a r. to arrest a criminal; claim दावा, हक; all *rights* कुलबाब *f*; immunity माफी *f*, सूट *f*; उजवी बाजू *f*, उजवें अंग *n*; सुफराटी बाजू *f*; one's own r. स्वाधिकार; might makes r. फांसा पडेल तो डाव राजा करील तो न्याय; to set to r. नीट क., सुधारणें; बंदोबस्तानें चालवणें.

—*v. t.* निटावणें, सुफराटणें, न्याय क., दाद देणें. —*i.* निटावणें, सुफराटणें. -FUL *a.* हक्कदार (heir); सत्तेचा, हक्काचा (property); रास्त, यथान्याय, वाजवी, in comp. धर्म (war). -HAND उजवा हात. -LY *ad.* नीट, उजू, बरोबर, न्यायानें; यथायुक्त, यथामार्ग; दुरुस्त, खरा. -NESS उजूपणा, सरळपणा: r. of a line; यथान्यायता *f*, लायकी *f*, न्याय.—RIGHTEOUS *a.* न्यायी, नीतिमान; holy पवित्र, पुण्यशील. -NESS न्यायीपण *n*, नेकी *f*, रास्तपणा; *Theol.* the work of Christ, which is the ground of justification खीस्ताचें पुण्य *n*.

RIGID *a.* (*rigidus*, to be stiff) ताठ, ताठर; severe करडा, खरमरीत, जालीम;—account, &c. काडीकाडीचा, तिळानतिळाचा. -ITY ताठपणा, ताठरपणा; करडेपणा, जालीमपणा.—RIGOUR ताठपणा; करडेपणा, कठोरपणा;—as of heat or cold कडाखा, कडका; *Med.* as in the cold fit of fever कांटा, कांटे; sternness कठोर -कडकडीतपणा; stiffness of opinion कडकडीत मत *n*;—of temper करडी प्रकृति *f*. -OUS *a.* करडा, उग्र; कठोर, निष्ठुर; कडक, कडख्याचा (cold); minute काडीनकाडीचा, कवडी कवडीचा (account).

RILL (*rivulus*, a small brook) ओहळ, उपळी *f*.

RIM* कांठ, किनारा.

RIND* साल *f*, त्वचा *f*, सालपट *n*.

RING*, a circle कडें *n*, चक्र *n*, वेढा; as an ornament for the wrist तोडा; finger r. अंगठी *f*, मुद्रिका *f*, वळें *n*;—of metal कडी *f*, कडें *n*, वाळा; a circular group of persons घेरा, वेढा, कचाळें *n*;—of grass, cloth, &c. चुंबळ *f*, आहरा;—at top playing रंगण *n*; as of a bullock turning a mill भोंवार *f*; r. binding mallets, rammers, &c. मांडळ *f*, वसूं *n*;—of wire for the nose or ear वाळी *f*;—for the toe जोडवें *n*;—for the hand of a female पाटली *f*, चुडा;—of a male कडें *n*;—of a drum, sieve, nose-ring, &c. गाडा.—*v.* घेरा -वेढा घालणें; अंगठी -वाळी इ० घालणें;—a horse चक्रावर -मंडळावर धरणें. -BOLT, an iron bolt, with an eye at its head, and a ring through the eye हलकी *f*. -LEADER मोहरपी, पुढाईत. -LET झुलूप *n*. -WORM गजकर्ण *n*, दाद *f*, दद्रु.

RING* *v.* cause to sound, as a metalic body वाजवणें, घणघणावणें; produce by ringing, as a sound वाजवून नाद उत्पन्न क., नाद क.; repeat often, loudly or earnestly खणकावणें, शिरा ताणून -ठोठावून बोलणें; [to r. in or out, to usher, attend on, or celebrate, by the ringing of bells; to r. out the old year and r. in the new].—*i.* वाजणें, झणझणणें;—the ear झणझणणें, भणभणणें; be filled with a report or talk घुमणें, दणदणणें.—*n.* झणकार, झणत्कार.

RINSE* *v.* wash lightly विसळणें, धुणें;—as clothes खंगाळणें, खळबळणें; cleanse by the introduction of water, as hollow vessels खंगाळणें, विसळणें;—as the mouth गुळणा क. [out].

RIOT *F.* wanton or unrestrained behavior दंगा, हंगामा, गर्दी *f*; wild festivity धुमाळी *f*, धुमश्चक्री *f*; to run r. बावचळणें, वायकळणें, माजणें.—*v. i.* गर्दी -दंगा क. -उठवणें -माजवणें; धुमाळी -धुमश्चक्री क. [in]. -OUS *a.* धुमाळीचा, धुमश्चक्रीचा (Luke xv. 13); गर्दीचा, दंग्याचा, पुंडाईचा (assembly, proceeding).

RIP* *v.* tear or cut open चिरणें, फाडणें, विदारणें; open up उसवणें, उस्तरणें; discover उघाडीस आणणें, विचका क.;—faults उखाळ्या पाखाळ्या काढणें [off].

RIPE* *a.* ready for reaping पिकलेला, पक्व; advanced to the state of fitness परिपक्व,

तयार, झालेला (cheese); to be r. as a fruit पिकणें, होणें; matured पिकलेला, पक्व (tumor); perfected सिद्ध, परिपूर्ण, निपुण, निष्णात (scholar);—in years पोक्त, प्रौढ, वृद्ध; —prepared तयार, सिद्ध: things are r. for war; resembling ripened fruit in ruddiness and plumpness लाल व भरदार, तांबूस व गुबगुबीत (lips).—Ripen *v.* पिकवणें; पूर्णतेस आणणें, परिपक्व क.—*i.* पिकणें; पूर्णतेस येणें; as mangoes, tamarind, &c. गुळमटणें, पाडास येणें -लागणें;—a field of corn, &c. काळसरणें. -ness पक्वेपणा, पक्वता *f*, पक्वदशा *f*; प्रौढी *f*, पोक्तपणा;—of a crop पीक *n*.

Ripple *v. i. Ger.* खळखळणें, खळखळ वाहणें. —*n.* खळखळ *f*, खळाळी *f*.—Ripplingly *ad.* खळखूळ, खळखळ, खळकण.

Rise* *v. i.* ascend वर जाणें, वर चढणें; ascend or float in a fluid तरंगणें; grow upward वर -उंच वाढणें, वाढणें: a tree *rises* a hundred feet; become erect उठणें, उभा राहणें: to r. from a chair, or from a fall; leave one's bed उठणें, निजून उठणें; tower up उंच चढणें -दिसणें: the Alps r. far above the sea; slope upward चढणें, चढण लागणें: a path *rises* in this direction;—a heavenly body उगवणें, उदय पावणें -होणें;—a river, &c. चढणें, फुगणें, पाणी चढणें; increase in value or price, &c. दर -भाव -मोल चढणें -वाढणें; swell सुजणें, फुगणें (a boil); increase in intensity वाढणें, चढणें, बळावणें, जोर होणें (heat, the voice, debt); be promoted चढणें, वाढणें, मोठा होणें; come to mind आठवण -स्मरण -स्फूर्ति होणें, सुचणें: a thought *rose* in me; come to hands हातीं लागणें -येणें: there chanced to r. to my hand a book; revive मरून उठणें, सजीव होणें (Cor. i. 20); close a session सभा उठणें -बरखास -विसर्जन होणें; issue निघणें, उगम होणें, उद्भवणें (a river); break into rebellion उठणें, फिरणें, बंड क.—*n.* उभें राहणें *n*, उत्थान *n*; वर चढणें *n*, आरोहण *n*, ऊर्ध्वगमन *n*; चढती *f*, वृद्धि *f*, उदय; उगवणें *n*, उदय; मूल *n*, उगम, आरंभ; चढण *f*, चढाव; चढ, तेजी *f*.—Rising चढणारा, चढता, चढते कळेचा; वाढणारा, वर्द्धमान: चढत्या वयाचा; उगवणारा, उदयमान.—*n.* उठणें *n*, उत्थान *n*; पुळी *f*, फोड;—of measles, smallpox, &c. उगवण *n*.

Risible *a.* (*ridere*, to laugh) हसणारा, हसनसमर्थ; हास्यजनक, हसूं येण्याजोगा.

Risk *F.* जोखीम *n*, भय *n*, धोका; to run a r. तवकल क.; at all *risks* जरूर.—*v.* जोखमांत -धोक्यांत घालणें -पाडणें.

Rite (*ritus*) act of performing divine or solemn service, as established by law, precept, or custom अनुष्ठान *n*, व्रत *n*, विधि, संस्कार.—Ritual *a.* विधीचा, क्रिया संबंधी; संस्काराचा.—*n.* संस्कारपद्धति *f* -शास्त्र *n*.—Ritualist क्रियावान, अनुष्ठानी, कर्मठ.

Rival *v.* (*rivalis*, belonging to a brook) बराबरी -स्पर्धा क., झुंजणें, लढणें.—*n.* & *a.* स्पर्द्धा करणारा, प्रतिस्पर्द्धी. -ry स्पर्द्धा *f*, चढाचढी *f*, हेवा.

Rive* *v.* चिरणें, फाडणें, छेदणें.—*i.* चिरणें, फाटणें, तडकणें.

River (*ripa*, a bank) नदी *f*; copious flow ओघ, पूर, नदी *f*: *rivers* of blood; bank of a r. नदीतीर *n*; the mouth of a r. नदीमुख *n*; bed of a r. पात्र *n*; watered by *rivers* नदीमातृक; a sacred r. गंगा *f*; r. of heaven सुरनदी *f*;—of hell वैतरणी *f*.— Rivulet ओहळ, नाला, ओढा.

Rivet *v. F.* fasten with a rivet खिळा ठोकून -मारून बोळवणें, खिळ्यानें खिळणें -जोडणें; fasten firmly पक्की क., न हालेसा क.; clinch बोळवणें, वळवणें.—*n.* दोहों शेवटांनीं बोळवलेला खिळा, चुरसा.

ROAD* रस्ता, वाट *f*, मार्ग; —for ships नांगरवाडा; to be on the r. वाटचालणें; to take to the r. वाटमारणें, रस्त्यावर लुटणें; public r. हमरस्ता, राजमार्ग. -STEAD नांगरवाडा.

ROAM *v. i. F.* रमणें, फिरणें, भटकणें, भ्रमणें [about].—*n.* भ्रमण *n*, हिंडणें *n*, विहार, परिचार.

ROAN *a. F.* having a bay color चिताडा (horse).

ROAR* *v. i.* cry with a full, loud, continued sound ओरडणें, आरोळी मारणें; as a beast डरकाळी फोडणें, गरजणें; as in pain ओरडणें, केंकणें, आक्रंदणें; cry in anger डरकावणें, डरकाळी फोडणें, गुरकावणें; make a loud confused sound, as wind, waves, cannon, passing vehicles, &c. दणाणणें, गरजणें, गडाडणें, धडधडणें; laugh out loudly and continuously मोठ्यानें खदखदां हासणें; make a loud noise on breathing, as horses having a certain disease घोरणें [out].—*n.* डरकणें *n*, डरकणी *f*, डरकाळी *f*; ओरडणें *n*, आरोळी *f*; गडगडाट, गर्जना *f*, दणका. -ING *a.* डरकणारा, डरक्याफोडणारा; गरजणारा, दणदणीत; ओरडणारा, आरोळी मारणारा.

ROAST *v. F.* prepare, as meat, by exposure to heat भाजणें; parch भाजणें, होरपळणें (coffee); banter severely हुररेवडी उडवणें. —*n.* भाजण *n*, भाजप *n*.—*a.* भृष्ट.

ROB *v. Ger.* plunder लुटणें; take away by force हिरावणें, छिनावून घेणें; steal from चोरणें. -BER लुटारू. -BERY, *Law*, the felonious taking of money or goods from the person of another, or in his presence, against his will, by force, or by putting him in fear लुटणें *n*; जबरीची चोरी *f*, चोरी *f*, लूट *f*; gang r. दरोडा; highway r. वाटमारा.

ROBE *F.* जामा, झगा; r. of honor presented by a king, &c. खिलात *f*; r. and turban bestowed in honor शेलापागोटें *n*, शिरपाव.—*v.* पोशाक घालणें, वस्त्रें नेसवणें.

ROBIN *Ger.* एक गाणारा पक्षी आहे.

ROBUST *a.* (*robustus*) hard धट्टाकट्टा, जोरदार, बळकट; rough दांडगा; requiring vigor मेहनतीचा, बळाचा, दांडगा, घसमर (employment).

ROCK *F.* a large mass of stony material खडक, धोंडा, दगड; refuge आश्रय: (2 Sam. xxii. 2); r. in the sea खराबा, कांटा; sheet of r. कातळ, खडक; ledge of r. दांडा, खडक; flat r. in the sea कांसा; a projecting r. बिंडा; to cause the r. to flow दगडास पाझर आणणें; r. salt शेंदेलोण *n*; r. oil मांतीचें तेल *n*.—ROCKY *a.* खडकाचा, खडकळ; खडका सारखा, कठीण, निर्दय, in comp. पाषाण.

ROCK* *v.* move backward and forward as a body resting on a support beneath डोलवणें, झोका -झोके देणें; put to sleep by rocking पाळणा हालवून निजविणें [to and fro]. -ING *a.* डुलडुल हलणारा, डळमळीत; r. stone उलटा दगड.—*i.* डुलणें, डगमगणें. -ET बाण, तारा.

ROD* (*Skr. ridh*, to grow) a long twig काठी *f*, दांडा; instrument of punishment काठी *f*, छडी *f*, दंड; sceptre छडी *f*, वेत्र; instrument for measuring काठी *f*; race कूळ *n*, जात *f*; a measure of length containing 16½ feet काठी *f*.

RODOMONTADE *F.* अरेरावकी *f*, तीनतेरा गोष्टी *f pl.*

ROE *Ger.* माशाचीं अंडीं *n pl.*

ROE* हरणी *f*; buck हरण *n*, *m*.

ROGUE *F.* a knave सोदा, लुच्चा, ठक; vagabond भटक्या, उडाणटप्पू; way गुलाम, गुंड. -RY लबाडी *f*, सोदेगिरी *f*, लुच्चेगिरी *f*, गुलामगिरी *f*.

ROLL *v.* (*rotulus*, a little wheel) लोटणें, लोटून नेणें; make to revolve फिरवणें; wrap round on itself गुंडाळणें, लपेटणें;—cakes, &c. लाटणें, वळणें; along, over, in लोळवणें;

—the eyes चाळवणें, फिरवणें [round, off, away, in].—*i.* लोटणें, लोटत चालणें -जाणें; हेलकावा -झोके खाणें; be formed into a cylinder or ball वळकटी -गुंडाळी होणें; लाटणें: the paste *rolls* well; wallow लोळी येणें, लोळणें: a horse *rolls*;—as time लोटणें;—as in pain वळवळणें;—over and over on the ground लोळणें, गडबडणें;—as a boat डुलणें, झोके खाणें;—as in dogged resistance लोळण घेणें.—*n.* वळकटी *f*, गुंडाळी *f*;—as of a mortar लाट *f*, लाटणी *f*; a document written on a piece of parchment, paper, &c. पट, फर्द; register तक्ता, याद *f*; small loaf of bread made from dough rolled up into a cake before baking लाट्या, लाटा; of tobacco चुट्टा, विडी *f*, चिरुट; uniform beating of a drum which strikes so rapid as scarcely to be distinguished by the ear ताशेरा;—of the betel-leaf पट्टी *f*, विडा;—of tape, rope, &c. भेंडाळें *n*, पेंडोळें *n*;—of thread, &c. कोपरी *f*, कडी *f*;—of paper, cloth सुरळी *f*. -ER लोटणारा;—for cakes लाटणी *f*, लाटणें *n*;—for levelling ground लाट *f*, 'रोळ';—as of a mortar लाट्या, लाट *f*; bandage पट्टी *f*. -ING लोटणें *n*, डुलणें *n*; लोटांगण *n*, लोळण *n*, लोळी *f*; proceeding (to a place of pilgrimage, temple, &c.) by r. one's self over and over लोटांगण *n*. -ING-PIN लाटणी *f*, लाटणें *n*.

ROMAN *a.* (from *Roma*, Rome) रोम शहरचा; रोमी लोकांचा; रोमन क्याथोलिक धर्माचा; printing उभा, नीट (letters).—*n.* रोम शहरचा राहणारा; *pl* प्राचीन ख्रिस्ती रोमच्या मंडळींतला. -ISM रोमन क्याथोलिक मत *n*. -IST रोमन क्याथोलिक धर्मावलंबी. -IZE *v.* रोमन क्याथोलिक मताचा क. -कडे फिरवणें.—ROMISH *a.* रोमन क्याथोलिक पंथाचा.

ROMANCE *F.* पुराण *n*, कादंबरी *f*.—*v. i* पुराण इ० सांगणें.—ROMANTIC *a.* अद्भुत रसाचा, विलक्षण (notions, taste); अद्भुतप्रिय, अद्भुत वृत्तीचा (person).

ROMP *v. i. F.* खिदडणें, धांगडधिंगा माजविणें, धिंगाणा घालणें [about].—*n.* धिंगाणा, धमशान *n*, धुमश्चक्री *f*; a rude girl who indulges in boisterous play घोडगी *f*, घोडी *f*, भोपळदेवता *f*.

ROOD *Ger.* fourth part of an acre जमीन मोजण्याची काठी *f*, काठी *f*, 'रूड' *f*.

ROOD* ख्रीस्तप्रतिमायुक्त वधस्तंभ, क्रूस.

ROOF*, cover of a house छावणी *f*;—of thatch छप्पर *n*;—of tiles कवलार *n*; flat r. of earth धाबें *n*;—of the mouth ताळु *f* -लु *f*.—*v.* छावणी -छप्पर घालणें, शेकारणें [in]. -ING छावणी *f*, शाकारणी *f*.

ROOK* कावळा.—*v.* ठकविणें, चोरी क. -ERY कावळ्यांचीं घरें बांधण्याची जागा *f*; [an overcrowded dilapidated building or cluster of buildings].

ROOM*, space which has been set apart to any purpose जागा *f*, स्थळ *n*; apartment कोठडी *f*, खोली *f*; fit occasion प्रसंग, संधि, सवड *f*; place unobstructed मोकळी जागा *f*; make r. पैस, जागा दे -सोड -कर; place left by another रिकामी झालेली जागा *f*, जागा *f*, स्थान *n*; inner r. गर्भागार; suit of *rooms* वठाण *n*; upper r. माडी *f*; to make r. जागा घेणें, वाट देणें; want of r. अनवकाश [for]. -INESS ऐसपैसपणा, जाग्याची प्रशस्ती *f*; प्रशस्तपणा.—ROOMY *a.* ऐसपैस, अघळपघळ, प्रशस्त.

ROOST* पांखराची रात्रीस बसायाची काठी -जागा *f*, अडू.—*v. i.* अडूवर बसणें, थाऱ्यावर बसणें [on].

ROOT *Sw.* that part of a plant which is fixed on the earth मूळ *n*, पाळ *n*, मुळी *f*; edible or esculent root मूळ *n*, कंद; progenitor पूर्वज, मूळपुरुष; original मूल, बुंध *n*,

बीज *n*; bottom बुडखा; primary cause मूल -आदिकारण *n*; radical word प्रकृति *f*, शब्द-योनि *f*;—of a verb धातु;—of a number मूल *n*;—of a square or cube पद *n*; cube r. घनमूळ *n*; square r. वर्गमूळ *n*; ramification of r. पाळ *n*; to take r. मुळावणें; fig. पाळें घेणें, पाळें मुळें भूमींत जाणें; turn out r. and branch पाळें मुळें खणून काढणें; aquatic r. पानकांदा; bulbous r. कांदा; *roots* and samples of medicinal virtue जडीबुट्टी *f*; having for its r. मूलक: पाप-मूलक दुःख *n*.—*v*. मुळ जडवणें -रोवणें, बद्ध-मूल क., गच्च बसवणें; out or up उपटणें, उपटून काढणें.—*i*. मुळें धरणें, मुळावणें, रुतणें.

Root* *v. i.* turn up the earth with the snout, as swine मुसकांडानें माती खणणें -खणून काढणें, उकीर काढणें; fawn servilely जीजी क., थुंकी झेलणें.—*t*. उकरणें, उकीर काढणें.

Rope*, large cord दोरी *f*, चऱ्हाट *n*, दोर; halter काढणी *f*, नाडा; a row or string consisting of number of things united जुडी *f*, वेणी *f*; large thick r. सोल *n*; piece of r. दोरखंड *n*. -DANCER भोरपी, नाडेभोरपी, कोल्हाटी. -MAKER कंजारी वगैरे दोरी करणारा. -WALK, a long covered walk, or a long building over level ground where ropes are manufactured करदोडी *f*.

Rose (*rosa*)—the bush गुलाब, गुलाबाचें झाड *n*;—the flower गुलाबाचें फूल *n*; China r. जासवंद *f*; dog r. सफेद गुलाब, शेवंती *f*; extract of *roses* अत्तर *n*; no r. without a thorn धान्य तेथें घुशी निधान तेथें विवशी. -APPLE—the plant or fruit जांब, गुलाबी जांब, साखरी जांब. -ATE *a*. गुलाबी रंगाचा (bower); full of roses गुलाबांचा (beauty) -BAY कन्हेर *f*. -COLORED *a*. गुलाबी रंगाचा, गुलाबी. -WATER गुलाबपाणी *n*.—Rosy *a*. गुलाबी रंगाचा; गुलाबा सारखा; लाल; charming मनोहर, सुंदर.—Rosary, bed of roses गुलाबाचा बाफा; a string of beads for counting prayers जपमाळ *f*.

Rot* *v. i.* कुजणें, सडणें.—*t*. कुजविणें, सडविणें. —*n*. एक रोग आहे, सडी *f*. -GUT, dilute and sour liquid आंबट खळा, आंबट खळगट *n*. -TEN *a*. कुजका, सडका; treacherous कुजका, मनाचा कुजका; used of ground खस्ती -NESS कुजकेपणा, सडकेपणा.

Rotate *v. i.* (*rotare*, to turn round like a wheel) वाटोळा फिरणें, केंद्राभोवतीं फिरणें; [go out of office and be succeeded by another or by others].—*t*. फिरवणें, फिरेसा क.—*a*. चक्राकार (corolla).—Rotation चक्रगति *f*; succession पाळीपाळीनें येण्याजाण्याचा क्रम, पाळी *f*, रहाटगाडगें *n*; in r. पाळीनें, क्रमानें.—Rotatory *a*. चक्रगतीचा; पाळीनें येणारा जाणारा.—Rote घोकणें *n*, घोकणी *f*.

Rotund *a*. (*rota*, a wheel) वाटोळा, वर्तुल. -ITY वाटोळेपणा, वर्तुलता *f*, वर्तुलाकार, गोलाकार.

Rough* *a*. not smooth खरबरीत, खरखरीत; not polished किजबिडीत, भरड, धोबड (a gem); boisterous खवळलेला, वादळाचा, तुफानाचा (the sea); shaggy गेंदी, भोंगळ (dress, appearance); rude दांडगा, असभ्य, रगड्या (temper); harsh उग्र, कणेर, असुरी (measure, remedy); offensive to the ear कर्कश, कर्णकटु (sound); —to the taste रुखा, खट्टा (wine);—to the touch चरचरीत, चरबट; tempestuous वादळाचा, तुफानाचा (wind, weather); r. draft कच्चा खरडा; r. work झोडपट्टी *f*, रगडपट्टी *f*, धोबड काम *n*. -CAST *v*. भरडणें, खरडून ठेवणें, आकारास आणून ठेवणें.—*n*. खरडा, आराखडा. -DRAW *v*. खरडणें, बेतणें, आकारणें, अंकणें,

-HEW *v.* सडकणें (timber); form rudely खरडणें, कच्चा आकार काढणें. -HEWN *a.* सडकलेला, सडकीव. -LY *ad.* खरखरीत, खडबडीत; सरासरी, सुमारानें; कठोरपणानें, निष्ठुरतेनें. -NESS खरबरीतपणा, किचबिडीतपणा; धसकेपणा, रांठपणा; उग्र -कठोरपणा; क्षुब्धता *f.* -RIDER चाबुकस्वार. -SHOD *a.* कांटयांचे नालांचा (horse); to ride r. रगडणें, झपाटणें, लाटणें.

ROUND *a.* (See ROTUND) circular चक्राकार, वाटोळा, वर्त्तुल; globular गोळाकार, वाटोळा; cylindrical दीर्घवर्त्तुल, गोलदार: the barrel of a musket is r.; curved कमानदार, अर्धचंद्रकार, बांकदार (an arch); full ठोक, घाऊक (number); large मोठा, बराच (sum); positive साफ, निखालस (assertion); exactly r. वाटोळा गरगरीत; a number that ends with a cypher and may be divided by ten without a remainder शून्यांतक संख्या *f*; r. trot तुरूकचाल *f* (घोड्याची).—*n.* कडें *n*, चक्र *n*, मंडल *n*, वेढा; periodical revolution प्रदक्षिणा *f*, फेरा, आवृत्ति *f*; a series of duties which must be performed in turn, and then repeated फेरी *f*, आवर्त्तन *n*, रहाटगाडगें *n*; a circular dance चक्राकार नृत्य *n*, वाटोळा नाच; that which goes round a whole circle or company जें सर्व समेच्या -मंडळीच्या भोंवता जातें तें: a r. of applause; rotation as in office पाळी *f*, बारी *f*; step of a ladder पावका, पायरी *f*;—of a guard फेरी *f*, गस्त *f*, 'रोंद' *n*; secret round चोरगस्त *f*; [*Mil.*, a general discharge of firearms by a body of troops in which each soldier fires once];—of a rope वेढा, वळसा; [r. of beef, a cut of the thigh through and across the bone; r. of cartridges and balls, one cartridge to each man].—*ad.* गिरकांडा मारून, गरगरां; सभोंवता, चहूंकडे, फेऱ्यानें, फेराखाऊन; to go r. फेराखाणें -मारणें -घेणें; the whole year r. बारमास -माही; to look r. मुरडून -पाठीमागें पाहणें; to r. the head मुरडणें, तोंड फिरवणें; to come r. fig. बदलणें, वळणें.—*prep.* वरूनं, सभोंवता; आसपास, भोंवताला: to go r. the city.—*v.* वाटोळा -गोल क.: to r. a coin; पुरा क.; वाटोळा डौल देणें; move about आसपास फिरणें; to make full, smooth, and flowing भरदार -गोलदार क.: to r. periods in writing.—*i.* वाटोळा होणें. -ABOUT *a.* फेऱ्याचा, गिरकांड्याचा; ample विस्तीर्ण (sense). -HOUSE कान्स्टेबलाची चौकी *f*. -NESS वाटोळेपणा, गोलाकार -कृति *f*.

ROUSE* *v.* wake जागा क., उठवणें; excite जागा क., उत्तेजन देणें, चेतवणें; awaken into activity, as the attention जागृत -प्रबोधित -प्रबुद्ध क.; agitate क्षोभविणें, क्षुब्ध क., खळबळविणें; startle बिचकावणें, डचकावणें [up].—*i.* उठणें, जागा होणें.

ROUT* *Ger.* clamorous multitude बाजारबुगगें *n*, कतवार *n*; uproar गलबला, गोंगाट.

ROUTE (*rumpere*, to break) दाणादाण *f*, पट्टाधूळ *f*, फौजेचा मोड.—*v.* मोड क., उधळणें, उडवणें.

ROUTE *F.* वाट *f*, रस्ता; r. by land स्थलमार्ग; r. by water जलमार्ग; en r. वाटेनें जात असतां.—ROUTINE नित्यपाठ, परिपाठ, नित्यकर्म *n*, रोजचें काम *n*.

ROVE *v. i.* (See ROB) हिंडणें, भटकणें, हिंडत फिरणें [about, over].—ROVER भटक्या, हिंडणारा, हिंडफिऱ्या; a fickle person ओढाळ; robber पुंड.

ROW*, file आळ *f*, पंगत *f*, पंक्ति *f*, रांग *f*;—of flowering plants ताटा *f*, ताटवा;—of houses चाळ *f*; in rows हारोहार, हारीनें.

ROW* *v.* वल्हवणें, वलवून नेणें; वलवून पलीकडे नेणें. -ER वल्हेकरी. -LOCK part of the gunwale where the oar rests खुंट.

Row *F.* धांदल *f*, गर्दी *f*, गोंधळ; to kick up a r. दणका माजवणें.

Rowel (*rota*, a wheel) a little wheel of a spur, formed with sharp points कांटा, कांट्याची फिरकी *f*; seton पोत *f*.

Royal *a.* (See Regal) राजाचा, राजकीय, बादशाही, in comp. राज (family); becoming king or queen राजालायक, राजास किंवा राणीस शोभणारा, बादशाही; magnificent अलिजाहा, उमदा, थोर; r. attendant राजसेवक; r. city राजधानी *f*; r. dignity राजप्रताप; r. insignia राजलक्षण *n* -चिन्ह *n*; r. mansion राजमंदिर *n*; r. family राजकुल *n*. -ist राजाचा अभिमानी, राजाचा पक्ष बाळगणारा. -ty राजकी *f*, राजत्व *n*, बादशाही *f*; kingdom राज्य *n*; majesty राजा, नृप; ensigns of r. छत्रचामर *n*, शिक्केकटार *f*.

Rub *v. W.* move with pressure घांसणें, चोळणें, घर्षणें; wipe पुसणें; smear माखणें, चोपडणें; polish साफ क., ओप -जिल्हई देणें [over]; down मळणें, चोळ -मालीश क. (a horse); off घांसणें, खरडणें, खरडून काढणें (rust); out पुसणें, खोडणें (a letter, stain); up घांसणें, उजळणें; उठवणें, जागा क. (the memory).—*i.* घांसून जाणें, लागणें; through रेटून जाणें, जसें तसें करून जाणें; निभावणें, पार पडणें: to r. through the world.—*n.* घांसणी *f*, मळणी *f*, मर्दन *n*; घसरा, घष्टा, घर्षण *n*; अडचण *f*, हिसका, धक्का. -ber घांसणारा; पुसणारा, घांसून -घष्टा देऊन जाणारा; stone to smooth and polish (paper, metals) मोहरा, घोटा;—for a horse हातणी *f*. -bish कचरा, केर, गाळ; r. and filth हिडीस *n*, हेंदर *n*;—as of a fallen building or wall मलमा. -stone घोटा; a whet-stone निष्णा.

Ruby (*ruber*, red) a precious stone माणीक *n*, लाल; redness लाली *f*; a blotch फोडाचें चकंदळ *n*; [a size of printing type smaller than nonpareil].—*a.* रक्त -लोहीतवर्ण.

Rudder* सुकाण *n* -णू *n*.

Ruddle* गेरू *f*.—Ruddy *a.* तांबूस, लाल;—of a lively flesh color or the color of the human skin in high health तुळतुळीत, तुकतुकीत, टवटवीत *n*.

Rude *a.* (*rudis*) rough दांडगा, उद्धट, असभ्य; coarsely executed धोबड, भसाडा, धसाडा, रटाला; uncivil रानटी, अशिक्षित, रांगडा; barbarous रानटी, जंगली; unskilful अनाडी, कच्चा, नाकसबी. -ly *ad.* रानटीपणानें; धटाईनें, धिंगामस्तीनें, दांडगाईनें, मुरवतीवांचून; धोबड, कच्चा. -ness रानटीपणा, दांडगेपणा; धटाई *f*, धिंगामस्ती *f*; धोबडपणा, भसाडेपणा; अनाडीपणा.

Rudiment (do.) मूलतत्व *n*, बीज *n*; *pl* मूळपीठिका *f*, आरंभ, उपक्रम. -al, -ary *a.* मूलतत्वाचा, मुळारंभाचा.

Rue* *v. i.* रडणें, पस्तावा क.—*t.* रडविणें, दुःख देणें; -च्या करितां रडणें -शोक क. -ful *a.* रडका, रडकुंडा; r. countenance रडती -रोती सुरत *f*; knight of the r. countenance रडता राऊत.

Rue*—the plant सताप;—the leaves सतापाचा पाला.

Ruffian *F.* दांडगा, इमामदांडगा, काटक, सोरट.

Ruffle *v. Ger.* wrinkle सुरकुत्या घालणें -पाडणें; disturb the surface of गढुळणें, क्षोभविणें, खवळणें; agitate व्याकुल -क्षुब्ध क. (the mind); throw together in a disorderly manner पसारा पाडणें [by].—*n.* चुणी *f*, सुरकुत्या *f pl*; अस्वस्थता *f*, व्यग्रता *f*.—Ruffled *a.* सुरकुत्या घातलेला -पाडलेला; चोळवटलेला, गुधडलेला; व्यग्र, उद्विग्न, क्षुब्ध.

Rug* नमदा.

RUGGED* *a.* rough खडबडीत, उंचसखल; shaggy केसटीचा, झिपऱ्या (bear); austere कठीण, कडक, करडा (temper); stormy वादळाचा, तुफानाचा (winds); harsh कर्कश (sound); surly दाष्ट, खाष्ट (looks); violent दांडगा, उद्धट (conduct).

RUIN (*ruere*, to fall with violence) destruction नाश, बिघाड, ध्वंस; *pl.*—of buildings चुराडा, खिंडार *n*, ढिगार; defeat भंग, पराजय; that which promotes injury अनर्थ, अपाय;—of fortune, estate, affairs, &c. सत्यानाश, वाटोळें *n*, खराबी *f*, पाटावरवंटा; to fall into r. मोडणें, मोडकळीस येणें. —*v.* मोडणें, मोडून टाकणें, धुळीस मिळवणें; नाश क., बुडवणें; नाश -सत्यानाश -खराबी क.; भिकेस लावणें, वाटोळें क. [by, with]. -OUS *a.* घातक, नाशक; मोडकळीस आलेला, पडका, मोडका; ओसाडीच्या ढिगाचा.

RULE (*regula*) instrument by which lines are drawn रेखाटणी *f* -णें *n*, 'रुल' *f*; regulation विधि, नेम, कायदा; that which is settled by custom शिरस्ता, दस्तूर; behavior चाल *f*, रीत *f*; government अम्मल, राज्य *n*; mastery सत्ता *f*, हुकुमत *f*, धनीपणा; *Math.* राशि *f*: r. of three त्रैराशिक *n*; *Gram.* नियम, रीत *f*; standard परिमाण *n*, प्रमाण *n*, धडा; foreign r. परचक्र *n*; to bring under r. सुतास लावणें -आणणें; to keep one's r. बेतावर बसणें; to lay down *rules* for रेब काढून -ओढून देणें; according to r. यथाविधि; r. of action कर्मविधि.—*v.* अंकणें, रेखटणें; अम्मल -अधिकार चालवणें; अनुशासणें; ठरविणें [over, with, by].—*i.* अम्मल -प्रभुत्व क. -चालवणें -असणें; *Com.* maintain असणें, राहणें: prices r. lower than formerly.—RULER आंखणी *f*, रेखाटणी *f*, 'रुलर' *f*; स्वामी, प्रभु, राजा, राणी *f*; अधिपति, शास्ता, नियंता.

RUM *F.* एक प्रकारची दारू आहे.

RUMBLE *v. i. Ger.* गडगडणें, दडदडणें;—the belly पोटांत गुडगुडणें.—*n.* गडगडाट.

RUMINATE *v.* (*rumen*, the throat) chew the cud रंवथ क.; meditate ध्यान -मनन क. [upon].—RUMINATION रंवथ *n*; ध्यान *n*, मनन *n*, चिंतन *n*.

RUMMAGE *v. i.* (*-mutare*, to change) धुंडाळणें, चाळाचाळ क., हुडकणें, उचलाउचल क.

RUMOR (*L.*) flying report अफवा *f*, कंडी *f*, आवई *f*, उडत बातमी *f*; report of a fact गोष्ट *f*, खबर *f* (Luke vii. 17).—*v.* आवई उडविणें -पसरणें [about].

RUMP *Ger.* ढुंगण *n*, चौक; sinking in of the r. (of a cow, goat, &c., at calving) खोलगटणें, शेपखडी पडणें.

RUMPLE* *v.* सुरकुत्या पाडणें, चुरमुटणें, गुधडणें. —*n.* सुरकुती *f*.

RUN* *v. i.* go with a lighter or more rapid gait than by walking धांवणें, धांवत येणें -जाणें, पळणें; retreat or fly away पळणें, पळून जाणें; steal off पोबारा क. -ह्मणणें, गच्छती क.; contend in a race पैजे करितां धांवणें; pass चालणें, गुजरणें (time); flow गळणें, वाहणें, निझरणें; turn, as a wheel फिरणें; spread पसरणें: the fire *ran* along upon the ground; reach पोंचणें: the memory of which *runneth* not to the contrary; go back and forth from place to place, as a stage coach जाणेंयेणें क., जाऊन येणें, जाता येता असणें, खेप टाकणें -क.; be kept in action चालू असणें, चालणें: an engine *runs* night and day; have a course गति -धांव असणें: a line *runs* east and west; to be in form thus, as a combination of words असा मायना असणें: the king's style *runneth* 'Our Sovereign Lord, the King'; to be popularly known लोकांस माहीत असणें, लोकप्रसिद्ध अ.: men give their own names by which they r. a great while in Rome; have growth

वाढणें, वाढ असणें: boys and girls r. up rapidly; tend वळणें, कलणें: man's nature *runs* to herbs; unite मिळणें, एकहोणें, मिळून जाणें: colors r. in washing; go in company संगतीं -बरोबर जाणें: certain covenants are said to r. with the land; continue without falling due चालू -लागू असणें: a note has thirty days to r.; discharge pus, as an ulcer बरबरणें, वाहणें, लस -पू वाहणें; to let r. जाऊं देणें, सोडणें, ढिला क.; after पाठीस लागणें; मिळविण्याचा यत्न क., शोध क.; at शिंगानें ढुसण्यासाठीं अंगावर धांवणें -घसरणें; away पळून जाणें, पळणें; away with घेऊन पळून जाणें; स्त्रीस घरांतून पळवून नेण्याला सहाय क.; जोरानें ओढीत -पळवीत नेणें, पळणें: the horse *ran* away with the carriage; in or into रुतणें, रुपणें, रोवणें; —in trust उचापत -उधार -काढणें, कर्ज क.; in with मिळणें, मान्य होणें; on चालू असणें; बडबड -वटवट चालणें; क्रम चालू असणें; ठोमणे मारणें; [*Print.* to be continued in the same line, without making a break]; out खपणें, संपणें; पसरणें, फैलावणें; over ओसंडणें, -वर सांडणें, वरून जाणें: a cup *runs* over; वरवर पाहणें; -वरून गाडी -घोडा जाणें: to r. over a child; up फुगणें, पूर येणें; वाढणें, चढणें (account); —off with a paramour married woman हात धरून जाणें; —a man with a woman काढणें, काढून नेणें; —a road, range of a hill, &c. वाहणें, लागणें, चालणें; —a damp paper, ink, &c. फुटणें, चरणें, पसरणें [from, to].—*t.* धांवविणें, पळविणें, दवडणें; मनांत वागविणें -आणणें: to r. the world back to its first original; भोसकणें, ढुसकणें; खुपसणें; ओढून आणणें (Acts xxvii. 41); fuse वितळणें; shape डौल -घाट देणें: to r. bullets; ओढणें, काढणें (a line); smuggle जकात टाळून -चोरीनें (माल) आणणें; hazard जोखमांत टाकणें; —a seam धांवता दोर घालणें; down थकेपर्यंत पाठीस लागणें, पाठीस लागून थकविणें; down -नांवें बोंब ठोकणें, हाकाटी मारणें; मोडणें, दाबणें; hard खणपटीस -गळचिपीस बसणें; out बाहेर ढकलणें; परिणामास -शेवटास नेणें; उडवणें, उधळणें (an estate); through उधळणें, उडवणें; up वाढणें, चढणें (account).—*n.* धांवणें *n*, धांव *f*, दौड *f*; धारा, क्रम, रीत *f*; prevalence चलती *f*, प्रचार; pressure on a bank for payment of its notes ब्यांकीवर नोटी वटावण्याचा मारा -ची उडी *f*; [the aftermost part of a ship's bottom; the distance sailed by a ship; a voyage] extent of a r. धांव *f*; at a r. एका तडाक्यानें; in the long r. शेवटीं, अखेरीस, परिणामीं. -AGATE, -AWAY पळपट, पळका. -NER धांवणारा, धांवमारणारा; पळणारा, पळका; courier कासीद, जासूद; shooting spring पागोरा. -NING *a.* धांवरा, धांवता; धांवण्याच्या कामाचा (horse); successive लागोपाठचा पाठोपाठचा: to sow land two years r.; flowing सरळ, सुरळीत (hand); वाहणारा, बरबरीत (a sore); [r. fight, a battle in which one party flees and the other pursues, but the party fleeing keeps up the contest; r. fire, a constant fire of musketry or cannon; r. title, *Print.*, the title of a book that is continued from page to page on the upper margin].

RUNNET* विरजण *n.*

RUPEE (*Skr. rupya*, silver) रुपया.

RUPTURE (*rumpere*, to break) भेद, स्फोट; state of being broken फूट *f*, स्फोट; breach of peace, either between individuals or nations फूट *f*, बिघड, स्नेहभंग; *Med.*, hernia अंतरगळ, अंत्रवृद्धि *f*; *ruptured* gut पोटाळा.—*v.* तोडणें, फोडणें.—*i.* फुटणें.

RURAL *a.* (*ruris*, the country) खेड्यापाड्याचा, बाहेरगांवचा, ग्राम्य; pertaining to farming शेतकीचा, कृषिकर्माचा.

RUSH* लव्हाळा, नागरमोथा; the merest trifle काडी *f*, कसपट *n*.—RUSHY *a*. लव्हाळ्याचा.

RUSH* *v. i.* move or drive forward with vehemence झपाट्यानें -रपाट्यानें चालणें; enter with undue eagerness शिरणें, घुसणें, रिघणें; at, on, upon अंगावर तुटून पडणें, घसरणें; in दपटून शिरणें, घुसणें; forward, headlong, through मुसंडी मारणें.

RUST*, crust which forms on the surface of metals मोरचा, मळ, किट्टा;—of iron जंग, तांब *f*;—of copper कलंक; any foul matter contracted बुरसा, बुरा.—RUSTY *a*. जंगलेला, तांबलेला; impaired by inaction or neglect of use मळीण, मजीत, वापर -राबता नसल्यामुळें बिघडलेला.

RUSTIC *a*. (See RURAL) खेडेगांवचा; rude रानटी, असभ्य, गांवढळ (manners); plain साधा, गांवरानी (dress); simple साधा, भोळा, साबडा.—*n*. खेडेगांवचा राहणारा, शेतखप्या, कुणबी.—RUSTICITY गांवढळपणा, गव्हारपणा.

RUSTLE* *v. i.* सरसरणें, सरसरत जाणें, खडबडणें.—*n*. खडबड *f*, खडखड *f*, खडखडाट.

RUT *F.*—in animals माज, उधान *n*, भर;—of elephants, camels, &c. मस्ती *f*;—of mares, she-asses हारयाण *n*; to be in r. माजास -मस्तीस येणें.

RUT (See ROUTE) चाकारी *f*.

RUTHLESS* *a*. निर्दय, कठोर.

RYE* गव्हा सारखें एक धान्य आहे.

RYOT *Ar.* प्रजा *f*, रयत *f*.

S

SABBATH *Heb.* विश्रामवार, रविवार, शाब्बाथ.

SABLE *a*. *Ger.* सेबल नामक जनावराच्या लवेच्या रंगाचा; काळा.

SABRE *F.* वांकडी तलवार *f*, तेगा.

SACCHARINE *a*. (*Skr. sharkara*) साखरेचा, शर्कराधर्मक.

SACERDOTAL *a*. (*sacerdos*, a priest, from *sacer*, holy) याजकाचा, यज्ञकर्माचा; s. office याजिकी *f*; s. thread यज्ञोपवीत *n*.

SACK* पोतें *n*, थैला, गोणी *f*; double s. कंटाळ *f*, गोणी *f*; saddle s. पडशी *f*; plunder, as of a town गांवलूट *f*.—*v*. पोत्यांत घालणें; लुटणें. -CLOTH तरट *n*, गोणताट *n*. -FUL *a*. गोणीभर.

SACKBUT *F.* अलगुजें *n*.

SACRAMENT (*sacer*, sacred) a solemn religious ordinance संस्कार; the Lord's Supper प्रभुभोजन *n*. -AL *a*. विधीचा, संस्कार संबंधी; विधीनें बांधलेला, संस्कारबद्ध.

SACRED *a*. (do.) set apart to religious use देवास वाहिलेला, पवित्र; religious धर्माचा, धर्मसंबंधी (history); made holy पवित्र केलेला, देवाधर्माचा, पवित्र (place); venerable पूज्य, पूजनीय (name); inviolable अलंघ्य, अलंघनीय (secrets); consecrated संस्कृत, वाहिलेला (temple) [to]. -NESS पवित्रपण, पवित्रता *f*; अनुल्लंघनीयता *f*: the s. of marriage vows.

SACRIFICE *v*. (do.) make an offering of अर्पणें; immolate on the altar of God, either as an atonement for sin, or to procure favor, or to express thankfulness यज्ञ -होम क., बळी देणें; give up for the sake of देणें, -साठीं बदल देणें [to, for].—*n*. अर्पण *n*; यज्ञ, होम, बळी; परित्याग, उत्सर्ग, समर्पण *n*; fire for s. होमाग्नि; pit for s. यज्ञकुंड *n*; place of s. यज्ञशाला *f*; officiating priest at s. याजक; his wife यज्ञपत्नी *f*; s. fire होमाग्नि; god of s. यज्ञेश्वर, यज्ञपुरुष; suitable for s. यज्ञोपकरणी; plot for s. वेदी *f*, स्थंडिल *n*;—of one's self आत्मनिवेदन *n* -समर्पण *n*.—SACRIFICIAL *a*. यज्ञाचा, यज्ञसंबंधी; s. grass कुश *n*, दर्भ.

SACRILEGE (do.) धर्मादायाची चोरी *f*, देवस्वापहार.—SACRILEGIOUS *a.* देवस्वापहाराचा; profane देवनिंदक.

SAD* *a.* dull निस्तेज, काळा (color); serious गंभीर; affected with grief उदास, खिन्न, खेदयुक्त; afflictive दुःखाचा, अनिष्टाचा (accident); downcast तोंड उतरलेला, रडका, रडवा;—of a s. countenance दीनवदन, म्लानमुख. -DEN *v.* उदास -खिन्न क. -LY *ad.* उदासपणानें, दिलगिरीनें; दुःख वाटायाजोगा, भारी. -NESS उदासपणा, दिलगिरी *f*; उदासीनता *f*, औदासीन्य *n*; रडकेपणा, मुखमालिन्य.

SADDLE*, a seat placed on a horse's back जीन, खोगीर;—of a camel जहाज *n*, कजावा; [a piece of meat containing a part of the back of an animal with the ribs on each side; as a s. of mutton]; frame of a s. खोड *n*; foretie of s. गळबंद; sitting cloth over s. गाशा; side of s. छाप *f*.—*v.* खोगीर घालणें -ठेवणें; fix a charge or burden upon ओझें घालणें: to be *saddled* with the expense of bridges. -BACKED *a.* जीनपाठीचा. -BAG पडशी *f*, खोगीर. -BOW खोड *n*. -CLOTH गाशा. -GIRTH तंग. -HORSE स्वारीचा घोडा.—SADDLER जीनगर. -RY जिनाचें सामान *n*; जीनगराचा धंदा, जीनगरी *f*.

SAFE *a.* (*servare*, to save) free from injury निर्भय, बिनधोक; secure from harm सुरक्षित, धड, शाबूत; conferring safety निर्भय, आसऱ्याचा, अभयजनक (harbor) [from].—*n.* निर्भयस्थान *n*; a chest for securing provisions from noxious animals पिंजरा, भाळी *f*; [a fire-proof chest containing money, valuable paper, &c.] [for]. -CONDUCT, convoy वलावा, पावणी *f*; a warrant to pass अभयपत्र *n*. -GUARD protection बचाव, संरक्षण *n*; passport अभयपत्र *n*, कौल; a guard to protect a traveller ताकीददार, वलावा; [an outer petticoat to save a woman's clothes on horseback]. -LY *ad.* निर्भय, खुशाल, सुखरूप; सलामत, धक्का लागल्या वांचून, अचानक; in close custody बंदोबस्तानें, न जाईसा: to keep a prisoner s. -NESS, -TY निर्भयता *f*, निरुपद्रवता *f*; सुरक्षितपणा, शाबूतपणा *n*; आश्रय; place of s. निर्भयस्थान *n*. -LAMP अभयदीपिका *f*.

SAFFLOWER (*saffron & flower*)—the plant करडई *f*, कुसुंब;—the seed करडई *f*; oil expressed from the seed of s. करडेल *n*.

SAFFRON *Ar.* केशर, कुंकुम *n*.—*a.* केशरी, केशरी रंगाचा.

SAG* *v. i.* झुकणें, कलणें, खचणें.—*t.* झुकवणें.

SAGE (*salvia*) Salvia Bengalensis कापूरकचरा -री *f*.

SAGE *a.* (*sapere*, to be wise) शहाणा, चतुर, प्राज्ञ; proceeding from wisdom शहाणपणाचा.—*n.* ज्ञानी, सिद्ध पुरुष, पूर्णबोध; holy s. मुनि, ऋषि. -LY *ad.* शहाणपणानें, चातुर्यानें.—SAGACIOUS *a.* चतुर, शहाणा, तीक्ष्णबुद्धि. -LY *ad.* शहाणपणानें. -NESS शहाणपण *n*, चातुर्य *n*.—SAGACITY चातुर्य *n*, हुशारी *f*, दीर्घदृष्टि *f*, शहाणपण *n*.

SAGITTAL *a.* (*sagitta*, arrow) तिरा सारखा, बाणा सारखा.—SAGITARIUS (*L.*) धनु *n*, धनुरास *f*, धन *f*.

SAGO *Malay.* सागू, सागूचे तांदूळ *m pl*; grain s. सागू, सागूदाणा.

SAIL*, the sheet by which the wind impels a ship शीड *n*, अवजार *n*; a ship गलबत *n*, जहाज *n*; a journey upon the water पाण्यावरून जाणें *n*, जलपर्यटन *n*, सफर *f*; to set s. शीड हकारणें; to strike s. शीड उतरणें; sheet of a s. दमाण *n*; lower end of a s. yard घोंस; s. furled on its yard वात *f*.—*v.* शिडानें -जलमार्गानें जाणें; set sail शीड उभारणें; move smoothly through the air हवेंतून सरपटत जाणें

—*i.* गलबत हकारून जाणें; उडणें; गलबत हकारणें -चालवणें. -CLOTH चिवटा, पडम *n.* -ING समुद्रगमन *n.* -OR खलाशी, दर्यावर्दी. -YARD शीडकाठी *f,* परभाण *n.*

SAINT (*sanctus,* sacred) a holy person पवित्र पुरुष, साधु, संत, भक्त. -ESS संतीण *f.* -LINESS साधुत्व *n,* संतपणा; to assume s. कानांत तुळसी घालणें.

SAKE* कारण *n,* हेतु; for the s. of साठीं, करितां.

SAL (*L.*) क्षार; s. ammoniac नवसागर.—SALINE *a.* खारट, खारा, लवणगुणक, मिठाचा.

SALARY (*salarium,* salt-money, the money given to Roman soldiers for salt, which was a part of their pay, from *sal,* salt) पगार, वेतन *n*; annual pay वर्षाचा पगार, साल *n.*

SALE* विक्री *f,* विकरा, खप; ready-money s. नगद विक्री *f*; for s. विकाऊ, विकायाचा; to set to s. विकायास मांडणें; deed of s. फरोक्त खत *n.* the first s. बोहणी *f.* -ABLE *a.* विकायाजोगा, क्रेय.—SALESMAN दलाल.

SALEP *Ar.* सालंमिश्री *f.*

SALIENT *a.* (*salire,* to leap) उडणारा, उडी मारीत चालणारा; projecting बाहेर आलेला; prominent ठळक, मुख्य (traits).

SALIVA (*L.*) थुंकी *f,* लाळ *f,* मुखरस.—SALIVAL *a.* थुंक्याचा.—SALIVATE *v. Med.* तोंड आणणें-देणें.—SALIVOUS *a.* थुंक्याचा, लाळेचा.

SALLOW* *a.* पिकुट, पिकुटलेला, निस्तेज; to get s. पिकुटणें; s. hue of the countenance काळवंडी *f,* पिकटी *f.* -NESS पिंवळी छाया *f,* पिकुटपणा, पांडुवर्ण.

SALLY (See SALIENT) उडी *f,* उड्डाण *n*; —of anger or ardor उसळी *f,* वेग, आवेश, झटका;—of humor, wit, &c. लहर *f,* स्फुरण *n*; act of levity विलास, चापल्य *n*: the excursion was esteemed but a s. of youth;—*v. i.* छापा घालण्यासाठीं बाहेर पडणें [forth, out, from]. -PORT खिडकी *f,* चोरखिडकी *f.*

SALMON (*salmo*) एक जातीचा मासा आहे.

SALOON *F.* रंगमहाल, सदर *f.*

SALT* मीठ *n,* लवण *n,* क्षार; flavor चव *f,* स्वाद; piquancy चणचणीतपणा, मीठमिरची *f*; a dish for salt at table निमकदाणी *f*; a sailor खलाशी; *Chem.* क्षार; *pl.* marshes flooded by the tide खाजण *n* खार *f*; black s. काळें मीठ *n,* पादेलोण *n*; mineral s. रस, उपरस; water in which s. has been dissolved मिठवणी *f*; rock-s. सेंदेलोण *n,* सैंधव *n*; sochal s. संचळ *n,* संचळखार; to become impregnated with s. खारावणें; caste whose occupation is to prepare s. मिठागरी.—*a.* खारा, खारट (water); खारींतला, खारा (fish).—*v.* मीठ घालणें, खारा -खारट क. -CELLAR निमकदाणी *f.* -ED मीठ घातलेला, खारावलेला. -LESS *a.* अळणी. -MARSH खाजण *n.* -MINE मिठाची खाण *f.* -PAN, -PIT मिठागर *n.* -NESS खारटपणा; मिठाची रुचि *f.* -PETRE सोरा, सोराखार, सोरमीठ *n*; purified s. कलमी सोरा. -WORK मिठागर *n.*—SALTY *a.* खारट तुरट.

SALUBRIOUS *a.* (*salvus,* safe) शरिरास चांगला, आरोग्यजनक, निरोगी, पथ्यकर. -NESS, SALUBRITY शरिरास हितकारकपणा, आरोग्यजनकता *f.*—SALUTARY *a.* पथ्यकर; promotive of public safety लोकरक्षणाचा; contributing to some beneficial purpose परोपकाराचा, हितकारक (design) [for].

SALUTE *v.* (*salus,* health) address with expression of kind wishes कुशल प्रश्न क., क्षेम कुशल पुसणें; greet सलाम -नमस्कार -रामराम क., अभिवंदन क.; greet with a kiss चुंबन घेऊन सलाम क.; greet with a wave of the hand हात उचलून सलाम क. [with].—*n.* सलाम, नमस्कार, रामराम;

चुंबन *n*; *Mil.*, a discharge of cannon or small arms in honor of some distinguished personage, or on the anniversary of some festival;—sometimes also performed by lowering the colors or beating the drums सलामीची तोफ *f* -सरबत्ती *f* -चा तबूर -डंका इ०. -ATION सलाम, नमस्कार, कुरनिशात *f*; s. by, and to, Musalmans, &c. सलाम; s. by, and to, Gujaratis जयगोपाळ; s. by, and to, Byragis जयसीताराम.

SALVATION (*salvare*, to save) तारणें *n*, त्राण *n*, रक्षण *n*; *Theol.* redemption of man from the bondage of sin and liability to eternal death, and the conferring on him everlasting happiness तारण *n*, उद्धार, उद्धरगति *f*; deliverance from enemies सोडवणूक *f*, सुटका *f*; means of s. तारणोपाय; way of s. through devotion भक्तिमार्ग;—through works कर्ममार्ग;—through knowledge ज्ञानमार्ग;—through meditation योगमार्ग.

SALVE* मलम, लेप.

SALVO (*L.*) पकड *f*, सोडवण *f*, खिडकी *f*; to make a s. खिसा -फट राखणें, सवड ठेवणें.

SAME* *a.* not different तोच, हाच (Ps. cii. 27); similar सारखा, सम, समान; just mentioned सदरहू, पूर्वोक्त, मशारनिल्हे; of the s. form समरूप; of the s. kind समजातीय, एकजातीय; of the s. age समवयस्क; the s. time समकाल. -NESS एकपणा, ऐक्य *n*; साम्य *n*, सारखेपणा.

SAMIEL *Ar.* प्राणघेणारी उष्णवाऱ्याची झळई *f*.

SAMPHIRE *F.* हदवेल *f*.

SAMPLE (See EXAMPLE) उदाहरण *n*; मासला, नमुना; a s., as a bundle of grass, a single fruit, a log of wood set aside from the mass in counting or weighing the whole to mark the completion of the total at each pause, and then counted to test the total सळई *f*.—SAMPLER मासला दाखविणारा; मासला, बानगी *f*.

SANCTIFY *v.* (*sanctus*, holy, *facere*, to make) पवित्र क. (Gen. ii. 3); make free from sin निष्पाप क., पवित्र क. (John xvii. 17); make efficient as the means of holiness पवित्रता उत्पन्न होण्यास साधन -कारणीभूत क., पवित्रतेचें साधन क.; give sanction to मंजूर -कायम क. [with, by].—SANCTIFICATION पवित्रीकरण *n*; पापनाशन *n*, पवित्रता *f*, अंतःशुद्धि *f* (2 Thess. ii. 13); consecration वाहणें *n*, अर्पण *n*, निवेदन *n*.—SANCTIMONY भक्तीचें ढोंग *n*, बकध्यान *n*, दांभिकपणा.—SANCTIMONIOUS *a.* दांभिक, बकध्यानी.—SANCTION, approbation and acceptance मान्यता *f*, ग्रहण *n*; support आश्रय, आधार, प्रमाण *n*; anything done or said to enforce the will, law, or authority of another मंजुरी *f*, 'सांक्शन' *n*.—*v.* पसंत -कबूल क., मानणें; confirm मंजूर -बहाल -कायम क.; आश्रय -आधार देणें. —SANCTITY पवित्रता *f*, अंतःशुद्धि *f*; inviolability अनुल्लंघ्यता *f*: the s. of an oath. —SANCTUARY, inner part of a temple गाभारा; sacred place पवित्रस्थळ *n*; a church भजनालय, देवालय *n*; a sacred and inviolable asylum अलंघनीय पवित्र आश्रयस्थान, निर्भयस्थान *n*, शरण *n*; [the most retired part of the temple at Jerusalem, called the *Holy of Holies*, in which was kept the ark of the covenant, and in which no person was permitted to enter except the high priest, and that only once a year, to intercede for the people; also, the most sacred part of the tabernacle; also, the temple at Jerusalem].

SAND* वाळू *f*, रेती *f*; वाळूचें मैदान *n*; a moment पळ *n*, क्षण. -BAG रेतीचा थैला.—

[BLIND *a.* having a defect of sight causing the appearance of small particles flying before the eyes]. -FLY केंवरें *n*, घुंगरटें *n*, केमूर *n*. -GLASS वाळूचें यंत्र *n* -घड्याळ *n*, वालुकायंत्र *n*.—SANDY *a.* रेतीचा, वाळूचा; वाळवंट, रेवसळ; वाळूच्या रंगाचा.

SANDAL (*Gr. sanidos*, a board) वहाण *f*, चपल *f*.

SANDALWOOD *Ar.* (*Skr. tshandana*) चंदन; red s. रक्तचंदन.

SANE *a.* (*sanus*, safe) healthy निरोगी, धडधाकट; not disordered in intellect सावध, हुशार, शुद्धीवर असलेला.—SANITY शुद्धि *f*. सावधपणा.

SANGUINARY *a.* (*sanguis*, blood) बहुरक्तपाताचा, रक्ताच्या पुराचा (battle); bloodthirsty खुनी, हिंसक, रक्तप्रिय.—SANGUINE *a.* रक्तवर्ण (flower); plethoric रक्तातिशयाचा (bodily temperament); ardent आस्थेवाईक, हौसदार (temper); confident उमेदवार, मोठ्या उमेदीचा: s. of success.—SANIES (*L.*) रगतपू, लस *f*.—SANIOUS *a.* रगतपुवाचा, लसीचा (matter); excreting serous matter लसीचा, पूयरक्तस्रावी (ulcer).

SANITARY *a.* (*sanus*, healthy) आरोग्य रक्षणाचा (regulation).

SAP* रस, चीक, द्रव. -LESS *a.* निरस, विरस, असार. -LING रोपा, माडा. -PINESS ओलेपणा, रसाळपणा. -PY *a.* रसभरित, रसरसीत; कोवळा, कच्चा; weak in intellect कोवळ्या बुद्धीचा.

SAP* *v. F.* पाया खणून -ढासळून पाडणें; *Mil.* सुरंग पाडणें.—*n.* सुरुंग. -PER सुरंग्या, 'स्यापर.'

SAPID *a.* (*sapere*, to taste) चवदार, स्वादिष्ट. -ITY चव *f*, रुचि *f*.—SAPIENCE शहाणपण *n*, चतुराई *f*.—SAPIENT *a.* चतुर, शहाणा; would be wise दीडशहाणा.

SAPOTA *Sp.* common s. कंवठ *n*.

SAPANWOOD *Sp.* पतंग, पतंगाचें लांकूड *n*.

SAPPHIRE *Ar.* इंद्रनीलमणि.—*a.* नीलाचा, नीलमय.

SARCASM (*Gr. sarkos*, flesh) a keen, reproachful expression ठोमणा, टोला, छद्म *n*, छद्मी भाषण *n*.—SARCASTIC *a.* छद्मी, वर्मी, ठोमण्याचा, व्यंगोक्तीचा. -ALLY *ad.* टोला -ठोमणा मारून -देऊन, उपरोधानें, व्यंगोक्तीनें.

SARCOMA (*Gr. sarkos*, flesh) *Med.* अवाळूं *n*, वाळूक *n*, गळूं *n*.

SARCOPHAGAN (*Gr.-phagein*, to eat) मांसभक्षक, मांसभोजी.

SARDINE, SARDIUS *F.*, a precious stone आरक्तक.

SARDONYX *L.* a gem गोमेद.

SARSAPARILLA, the Indian s. अनंतमूळ *n*.

SASH *F.* खिडकीच्या कांचेची चौकट *f*.

SASH (?) कमरबंद, कांच्या.

SATAN *Heb.* the devil, or prince of darkness सैतान. -IC, -AL *a.* सैतानाचा, सैतानी.

SATCHEL *F.* थैली *f*, पिसवी *f*.

SATELLITE (*satelles*) a secondary planet उपग्रह; an obsequious dependent परान्नभोजी, शेपूट *n*.

SATE, SATIATE *v.* (*satis*, enough) तृप्त क.; धण पुरविणें; surfeit अति तृप्त क., ओकारी -वीट आणणें, मिठी बसविणें [with].—*a.* धालेला, परितृप्त.—SATIETY अति तृप्ति, टेर *f*, ओकारी *f*, मिठी *f*.

SATIN (*seta*, thick, stiff hair) अतलस *n*, साटीन *f*.

SATIRE (*sat*, *satis*, enough) a composition generally poetical, holding up vice or folly to reprobation निंदेचा पवाडा, दुराचरणोपहासक कविता *f*; keenness and severity of remark उपरोधिक भाषण *n*, टोला, ठोमणा [on].—SATERIC, -AL *a.* उपहासक, निंदात्मक; निंदा करणारा, निंदक (person).—SATIRIZE *v.* निंदा क.

SATISFY *v.* (*satis,* enough, *facere,* to make) तृप्त क., पुरवणें, समाधान क.; convince खातरजमा क.; pay off फेडणें, देणें, वारणें (debt, claim) [by, with].—SATISFACTION तृप्ति *f,* संतोष; खातरी *f,* निशा *f,* समाधान *n;* compensation नुकसानी *f,* नुकसानी बदल पैसा वगैरे देणें *n,* फेड *f;* that which satisfies पूर्त्ति *f,* क्षमासाधन *n.*—SATISFACTORY *a.* समाधान करणारा, मनाजोगा; खातरीचा; फेड करणारा.—SATISFIED *a.* तुष्ट, संतुष्ट, पर्याप्त; खातरी झालेला, गतसंदेह; to be s. पोट भरणें, धण पुरणें; संतुष्ट होणें; खातरी होणें -असणें.

SATURATE *v.* (*satur,* full of food) पुरा भिजवणें, उमळविणें, कणानकण भिजवणें [with].

SATURDAY* शनवार, शनिवार.

SATURN (*Saturnus*) शनि; मूर्त्तिपूजक लोकांचा एक जुना देव होता. -ALIA (*L.*) होळीसारखा एक रोमन लोकांचा सण होता.

SATYR (*satyrus*) एक कल्पित वनदेवता *f* आहे.

SAUCE (*sal,* salt) तोंडीं लावणें *n,* कालवण *n.* —*v.* make poignant खरमरीत -चणचणीत क.—SAUCER वाटी *f,* रिकाबी *f,* तबकडी *f.*—SAUCY *a.* उद्धट, दांडगा; मगरूर, उद्धटपणाचा, दांडगेपणाचा, मगरुरीचा (looks).—SAUCINESS धिटाई *f,* दांडगेपणा, औद्धत्य *n,* मगरुरी *f.*

SAUNTER *v. i. F.* रमणें, रमत रमत फिरणें, झुलणें.

SAVAGE *a.* (*silva,* wood) रानांतला, जंगली, वन्य, वन, in comp. (beast); untamed अशिक्षित, असभ्य, रानटी; cruel क्रूर, निर्दय. —*n.* रानटी माणूस; क्रूर माणूस, खाटीक, कसाब, राक्षस.

SAVANT *F.* गुणग्राहक, पंडित, विद्वान.

SAVE *v.* (*salvare,* from *salvus,* safe) बचावणें, रक्षण क.: to s. a house from the flames; lay up सांठवणें, संग्रह क., ठेवणें (money); be in time for संभाळणें, टिपण साधणें: just *saving* the time; prevent निवारणें, टाळणें, to s. appearances फड संभाळणें; *Theo.* तारणें, उद्धरणें; hinder from being lost वांचविणें, उरवणें, राखणें [from, by, in].—*i.* शिलकेंत -स पाडणें, खर्च कमी क.—*prep.* शिवाय, खेरीज.—SAVING *a.* काटकसऱ्या, अल्पव्ययी. -*prep.* शिवाय.—*p. a.* नफ्याचा; काटकसरीचा. —*n.* काटकसर करून उरवलेला पैसा वगैरे, शिलक *f,* सांटपा इ०; reservation संकोच, पडदा.—SAVINGS-BANK पैसा शिलकेस टाकण्याची पेढी *f.*—SAVIOR तारणारा; JESUS CHRIST, the Redeemer येशू ख्रीस्त, तारणारा.

SAVOR (*sapor*), taste रुचि *f,* स्वाद, लज्जत *f;* odor वास, गंध.—*i.* वास, गंध -चुणुक मारणें [of].—SAVORY *a.* मजेदार, स्वादिष्ट, खमंग. —SAVORINESS मजेदारी *f,* चव *f,* गोडी *f.*

SAW* करवत *m, f;* double s. आढ्याकरवत.—*i.* करवतणें, अरकसणें, करवतीनें कापणें [off, away, asunder]. -DUST (करवतीनें कापलेल्या लांकूड वगैरेचा) भुसा, भुसकट *n.* -YER करवत्या, अरकशी; *sawyer's* work चिरकाम *n.* -FILE करवत घांसायाची कानस *f.* -FISH पोक मासा. -PIT अरकशी उभा राहण्याची खांच *f.*

SAY* *v.* utter in words बोलणें, ह्मणणें; repeat ह्मणणें, पाठ ह्मणणें (a lesson); be determined in mind as to -विषयीं निश्चय क., सांगणें: it is hard to s. what it is; announce as an opinion मतदेणें; it is said असें ह्मणतात, लोक ह्मणतात; that is to s. ह्मणजे; s. in the imp. मला सांग, बोल [to, for, about]. -ING बोलणें *n,* ह्मणणें *n;* a proverb ह्मण *f,* आहणा.

SCAB* *Med.* incrustation over a sore or wound खपला, पापुद्रा, खपली *f;*—of cattle खवडे *pl.* -BED, -BY *a.* खपल्यांनीं भरलेला, खवड्यांचे रोगाचा.

SCABBARD *O. E.* म्यान *n,* मेण *n.*

SCAFFOLD *F.* माचोळा, माळ, मंचक;—of a building पराची *f*, माळा; a stage for the execution of a criminal अपराध्यास फांसी देण्याचा माळा.—*v.* माळा -पराची बांधणें; sustain पाळणें, आश्रय देणें.

SCALD* दारना. -HEAD खवडे *pl.*

SCALE*, thin lamina खरपुडी *f*, पापुद्रा;—of a fish, &c. खवल *n*, माशाचा खवला; incrustation deposited on the inside of a vessel in which water is heated सांका —*v. i.* पापुद्रा -खवला निघणें.—*t.* खवलें काढणें (a fish); पापुद्रा काढणें; [*Gun.*, clean, as the inside of a cannon, by the explosion of a small quantity of powder.]

SCALE (*scala*) a ladder शिडी *f*; *Math.* श्रेढी *f*; *Mus.* ग्राम; relative dimensions, without difference in proportion of parts प्रमाण *n*, स्केल' *n*: a map on a s. of an inch to a mile; regular gradation चढती -उतरती पायरी *f*, दरजा; on a small s. लहान प्रमाणावर, लहान; on a large s. मोठ्या प्रमाणावर, मोठा; to reduce to a small s. संपुष्टांत आणणें.—*v.* शिडी लावून चढणें; पायरी पायरीनें चढणें.

SCALE*, balance तराजू *f*, तागडी *f*; dish of a balance पारडें *n*; *pl. Astr.*, the sign of the Balance तूळरासीची खूण *f*, तुला *f*.

SCALP (*scalpere*, to cut) माथ्याची कातडी *f*. —*v.* माथ्याची कातडी काढणें.

SCALPEL (do.) शस्त्रवैद्याची सुरी *f*, -चें शस्त्र *n*.

SCAMP *F.* सोदा, लुच्चा, गुलाम.

SCAMPER *v. i.* (do.) run with a speed पळणें, पळकाढणें; hasten to escape निसटणें, सटकणें, झुकणें.

SCAN *v.* (*scandere*, to climb) scrutinize शोध -छडा लावणें -काढणें; go through with, as a verse, marking and distinguishing the feet of which it is composed छंदाच्या मात्रा गणणें -मोजणें.

SCANDAL (*scandalum*) offence caused or experienced लाज *f*, शरम *f*; defamatory speech or report चुगली *f*, चहाडी *f*; reproachful aspersion अपवाद, निंदा *f*; imputed disgrace शरम *f*, डाग, कलंक. -IZE *v.* कलंक -काजळी लावणें, तुफान घेणें; कंटाळा -त्रास देणें -आणणें. -OUS *a.* कंटाळा आणण्याचा, त्रासदायक; लाजीरवाणा, लज्जाकारक; चुगलीचा, चाहडीचा.

SCANT* *v.* limit हद्द -आळा बांधणें; cut short आखूड -लहान क.—SCANTY *a.* थोडा, अपुरता, अल्प.—SCANTILY *ad.* थोडा, चुटपुटा, अपुरता.—SCANTINESS थोडेपणा, उणेपणा, कोताई *f*.

SCAPULA (*L.*) खांदा, स्कंध.

SCAR* डाग, चट्टा, वण, चटका.—*v.* डाग -चट्टा पाडणें [with].

SCARCE *a.* (*excerpere*, to pick out) थोडा, अल्प, स्वल्प, महागाईचा; rare विरळा, दुर्लभ, दुर्मिळ. -LY *ad.* विरळा, क्वचित; कष्टें -श्रमें करून, जुलमानें.—SCARCITY थोडेपणा, कमतीपणा, चणचण *f*; विरळपणा, दुर्लभता *f*.

SCARE *v. Scot.* बुजवणें, डचकवणें, भिववणें [with, by, from]. -CROW बुजणें *n*, तोडगा, भेडसावणें *n*.

SCARF* उपवस्त्र *n*, अंगवस्त्र *n*; girl's s. ओढणी *f*.—*v.* उपवस्त्र घेणें. -SKIN बाहेरली कातडी, बाह्यत्वक् *f*.

SCARIFY *v.* (*Gr. skariphos*, a pointed instrument) फांसण्या टाकणें -मारणें -घालणें; stir the surface soil of पाळ्या घालणें (a field).

SCARLET *F.* orange-red color सिंदुरवर्ण, शेंदऱ्यारंग; cloth of a scarlet color शेंदऱ्या रंगाचें वस्त्र *n*.—*a.* शेंदऱ्या रंगाचा, लाल; s. fever ज्या तापांत आंग लाल होतें तो लोहितांगज्वर.

SCATE, See SKATE.

SCATH* तोटा, नुकसान *n*, चट्टा.—*v.* तोटा -हानि क. -LESS *a.* बेनुकसान, शाबीत, सलामत, अविक्षत.

SCATTER* *v.* strew about विखरणें, पसरणें, पेरणें; disperse फांकवणें, उधळणें, फांकाफांक क.; set thinly पातळ -विरळ घालणें -लावणें; frustrate मोडणें, निष्फळ क., वाताहत क. (hopes, plans) [about, among].—*i.* फांकणें, पांगणें, फांकाफांक होणें. -ED विखरलेला, प्रसृत, प्रकीर्ण; उधळलेला, विक्षिप्त; पातळ लावलेला, विरळ, विसकळीत.

SCAVENGER* झाडू, हलालखोर, रस्ते झाडणारा.

SCENE (*scena*) stage रंगभूमि *f* -शाला *f*; part of a play प्रवेश; curtain of the theatre नाटकगृहांतील पडदा; assemblage of objects presented to the view at once देखावा, दृष्टिपात विषय; place of occurrence, exhibition, or action जागा *f*, भूमि *f*, स्थल *n*. -RY देशाची रचना *f*, -चें स्वरूप *n*, देखावा, जलतृणवृक्षादि संस्था *f*;—of a theatre रंगभूमीची गृहवृक्षादि रचना *f*;—of war रणभूमि *f*, समरंगण *n*

SCENT *v.* (*sentire*) वास लावणें -देणें; वास घेणें. [with].—*n.* वास, गंध; sense of smell घ्राणेंद्रिय *n*; course of pursuit मागमूस; s. of सुवारा.

SCEPTIC, SKEPTIC (*Gr. skeptikos*, thoughtful) one who is yet undecided as to what is true संदिग्धमति, अविश्वासी; *Theol.*, a person who doubts the existence and perfections of God, or the truths of revelation नास्तिक, ईश्वरोक्त शास्त्र न मानणारा, चार्वाक. -AL *a.* अविश्वासी, संदिग्ध मानस.—SCEPTICISM अविश्वास, संशय, संदिग्ध मत *n*; नास्तिक मत *n*; ईश्वरोक्त शास्त्रावर अविश्वास.

SCEPTRE (*Gr. skeptron*, staff) a royal mace राजवेत्र *n*; royal authority राजाधिकार.—SCEPTERED राजदंडधारी.

SCHEDULE (*Gr. schede*, a tablet, a leaf) जाबता, फेरिस्त *n*, याद *f*.

SCHEME (*Gr. schema*, form) plan बेत, नकशा; project उपाय, कल्पना *f*, इलाज; wild s. कचाट *n*, लचांड *n*.—*v.* युक्ति -तजवीज क., उपाय काढणें -क.

SCHISM (*Gr. schisma*) division भेद, तट, फळी *f*; [specifically, permanent division or separation in the Christian Church, occasioned by diversity of opinions or any other reason.] -ATIC *a.* मतभेदक, शाखाभेद संबंधी.—*n.* मतभेदी, शाखाभेदी.

SCHOOL (*Gr. scholé*) place where leisure is enjoyed, leisure time given to literary study, place of instruction शाळा *f*; exercises of instruction पाठशाळा *f*, धडा; seminary for theology during the middle ages अध्ययनशाला *f*; assemblage of scholars पाठशाला *f*, शिष्यसमूह;—system of doctrines शिक्षासंप्रदाय, शालासंप्रदाय; disciples of a teacher शिष्यसमूह, शाला *f*; a sect in philosophy, theology, and science शाखा *f*, शालासंप्रदाय; difference of s. शाखाभेद;—of a good s. शालाशुद्ध; s. of philosophy दर्शन *n*.—*v.* शाळेंत शिकविणें; reprove तोंडची शिक्षा क., वाग्दंड क., धमकावणें. -BOY शाळेंत जाणारा मुलगा, विद्यार्थी. -FELLOW शाळेचा सोबती, गुरुबंधु. -HOUSE शालागृह *n*, शाळा *f*. -ING शिक्षण *n*, अध्ययन *n*; शिक्षावेतन *n*, गुरुदक्षिणा *f*, शाळेची फी *f*, फसकी *f*. -MASTER पंतोजी, 'मास्तर.'—SCHOLAR विद्यार्थी, शिकणारा, शिष्य; one engaged in the pursuits of learning विद्यार्थी, विद्याव्यासंगी, विद्यानुयायी; a savant पंडित, विद्वान. -SHIP विद्वत्ता *f*, पांडित्य *n*; maintenance for a scholar विद्यार्थ्याचा पगार -ची पोटगी *f*, 'स्कालरशिप

f.—SCHOLASTIC *a.* पाठशाळेचा, पाठशाळा संबंधी; पाठशाळेंतला; pedantic विद्येच्या डौलाचा, पांडित्यदर्शक.—SCHOLIAST टीकाकार, ग्रंथावर टिपण लिहिणारा.—SCHOLIUM टीका *f*, भाष्य *n*.

SCHOONER *D.* दुकाठी गलबत *n*.

SCIATIC *a.* (*sciatica*) कमरेचा, कटी संबंधी. —SCIATICA कमरेचें दुःख *n*, कटिशूल.

SCIENCE (*scire*, to know) knowledge ज्ञान *n*, विद्या *f*; a branch of knowledge विद्या *f*, शास्त्र *n*, उपशास्त्र *n*; study of s. विद्याभ्यास; sacred s. श्रुति *f*, ज्ञान *n*; profane s. उपविद्या *f*; s., considered as wealth विद्याधन *n*.—SCIENTIFIC *a.* विद्येच्या -शास्त्राच्या नियमा प्रमाणें, विद्यासूत्रानुसारी.

SCIMITAR *F.* कटार *f*, तेगा.

SCINTILLATE *v. i.* (*scintilla*, a spark) थिणग्या उडवणें; sparkle चकचकणें, लकलकणें [with].

SCIOLIST (*scius*, knowing) पुस्तकावरून ओरखडलेला, खंडपंडित.

SCION *F.*, scion कलम *n*; a descendant अंकुर, कोम, वंशज;—of a plantain tree मोनवा, मोना.

SCIRRHUS (*L.*) मांसग्रंथि *f*; flat s. of the spleen or liver खापरी *f*.—SCIRRHOUS *a.* गांठीचा, गांठाळ.

SCISSION (*scindere*, to cut) कापणें *n*, छेदन *n*, खंडन *n*.—SCISSORS *pl.* कातर *f*.

SCOFF *v. i. D.* उपहास -निंदा -छिथू क. [at]. -ER निंदक, छिथू करणारा.

SCOLD *v. i. Ger.* खरडपट्टी काढणें, खडसून बोलणें [for].—*n.* कैकया *f*, कैदासीण *f*, ताटका *f*. -ING दपटणें *n*, मुंडण *n*, खरडपट्टी *f*, दटावणी *f*.

SCOOP *D.* a large ladle पळा, पळी *f*; a hollow खळी *f*, खळगी *f*; [a surgeon's instrument].—*v.* कोरणें, पोखरणें, उकरणें; पळींनें वाढणें -घालणें -काढणें [out].

SCOPE (*scopos*) aim धोरण *n*, संधान *n*, अभिप्राय; room जागा *f*, अवकाश, मोकळेपणा, अवसर; length लांबी *f*.

SCORCH *v.* (*ex, cortex*, bark) burn superficially भाजणें, होरपळणें; affect painfully with heat तळतळविणें.—*i.* पोळणें, जळणें; तळतळणें.

SCORE*, notch सड, कातरा; bill कर्जाऊ दिलेल्या पैशाची किंवा उचापतीची याद *f*; account देणें घेणें *n*, खातें *n*; number of twenty विसा *f*, खंडी *f*, कोडी *f*; account कारण *n*, हेतु; by the s.—selling कोडीनें -कीडीवर; on the s. of बाबद, सबब; by *scores* खंडीवारी; running up a s. उकडा, रतीब; on that s. त्यापेक्षां -पक्षीं.—*v.* कातरे पाडणें; mark with lines रेखटणें, रेघा ओढणें; set down a debt मांडणें, बोट ओढणें; out खोडणें.

SCORN (*cornu*, horn) extreme and passionate contempt तिरस्कार, तिटकारा; object of extreme disdain तिरस्कारास्पद. —*v.* तिरस्कार क., धिःकारणें [for]. -ER धिक्कार करणारा, निंदक. -FUL *a.* निंदाखोर, तिरस्कारी.

SCORPIO (*L.*) विंचू; *Astron.* वृश्चिकरास *f*.—SCORPION विंचू; [a kind of whip armed with points like a scorpion's tail (Kings xii. 11)]; tail of a s. नांगी *f*, नांगा.

SCOT*, portion of money assessed or paid वर्गणी *f*, पट्टी *f*; fine दंड, द्रव्यदंड. -FREE *a.* दंडविगळा -निराळा; clear मोकळा, मुक्त, सुटा, अजीबात.

SCOT* स्काटलंड देशाचा राहणारा.—SCOTCH *a.* स्काटलंड देशचा; स्काच लोकांचा.

SCOTCH *v. Eng.* खांदा -टेका देणें;—a wheel उटाळें लावणें.

SCOTCH *Gael.* फांसण्या टाकणें -मारणें.—*n.* फांसण्या *f pl.*

SCOUNDREL *Ger.* a man without honor or virtue लुच्चा, हरामी, मात्रागमनी.

SCOUR* *v.* clean by friction घांसणें, चोळणें, उजळा देणें; purge violently धुणें, पोटांतला मळ काढणें (the bowels); pass swiftly over -वरून झपाट्यानें जाणें.

SCOURGE (*-corium,* leather) चाबूक, कोरडा; punishment शिक्षा *f,* दंड.—*v.* फटके मारणें; शिक्षा क. (Heb xii. 6) [for, with.]

SCOUT *F.* हेर, बातमीदार, गुप्त दूत.—*v.* हेरणें, टेहळणें; sneer at हेडसावणें, धुतकारणें, उडवणें [at, from].

SCOWL *v. i. Ger.* wrinkle the brows as in frowning कपाळास आट्या घालणें; look angry डोळे वटारणें [upon].

SCRABBLE *v. i. D.* खरडणें, विरखडणें, खिराबिड्या काढणें -ओढणें.

SCRAGGY *a. Ir.* lean कृश, रोड; rough खरबरीत.

SCRAMBLE *v. i. D.* go on all-fours मेटेखुट्यांनीं -हातपाय टेंकून जाणें -चालणें -चढणें; struggle with others for something thrown on the ground झोंबाझोंबी -झटापटी -घेघेमार क.; to be *scrambled* for -वर मिठ्या -उड्या पडणें [for, with, among].

SCRAPE* *v.* rub the surface with a sharp or rough instrument खरडणें, खरवडणें; remove by rubbing खरडून काढणें; acquire penuriously जथणें, जमवणें, कवडी कवडी जोडणें; grate harshly over खरडणें, तासणें, भादरणें; up, out उकरणें;—upon a grater किसणें.—*i.* घांसणें, चोळवटणें; कर्कश शब्द क., करकरणें.—*n.* घर्षण *n,* घसरा; करकर; *f,* कर्कश शब्द; perplexity लचांड *n,* कुलंगडें *n,* कचाट *n.*—SCRAP तुकडा, कुटका;—of paper चिटोरा, चकती *f.* -BOOK गाबाळग्रंथ. -ER खरडणारा; किसणी *f;*—of fruits खवणी *f;*—for the feet वज्री *f;*—for the tongue जिभी *f;* one who plays awkwardly गवतकाप्या, गवत्या, खरडघाशा; one who saves penuriously कवडीचुंबक.—SCRAPINGS खरवड *f,* कीस;—of a dish of food निपूट *f,* शिपूट *f,* निरपण *n*

SCRATCH *v. Ger.* tear the surface वरखडणें, ओरखडा काढणें; tear by the nails बोचकरणें, बोचकुरा घेणें; dig with the claws नखानें उकरणें, खरडून काढणें; allay an itching खाजवणें.—*n.* बोचकरा, नखोरा; superficial mark चरा, ओरखडा.

SCRAWL *v. i.* (See SCRABBLE) ओरखडणें, गिचमीड लिहिणें, भरडणें; over चितारणें, रेघोट्या काढणें.—*n.* ओरखडा, गिचमीड *f.* -INGLY *ad.* खशाबशा, गिचमीड.

SCREAM* *v. i.* किंकाळी फोडणें, किंकळणें, ओरडणें [out].

SCREEN *F.* पडदा, अंतर्धान *n;* a long, coarse sieve चाळण *f,* [for].—*v.* झांकणें, बचावणें आड येऊन बचावणें; चाळणें, चाळून वेगळें क. [from, by.]

SCREW *F.* a cylinder grooved spirally मळसूत्र *n,* पेंच, 'स्क्रू'; miser कृपण, पिळून काढणारा -घेणारा; worn out horse घोडकें *n,* पंचकल्याण; female s. नवरी *f,* मादी *f;* male s. नर, मादा.—*v.* मळसूत्रानें बसवणें; मळसूत्रानें फिरवणें; to squeeze पिळणें, पिळून काढणें; distort पीळ -पिळे देणें, मुरडणें, वक्र क.

SCRIBE *v.* (*scribere,* to write) लिहिणारा, लेखक; notary चिटणीस, दबीर; *Jewish Sac. Hist.,* a writer and a doctor of the law शास्त्री.—SCRIBBLE *v. i.* बिरखुड्या-रेघोट्या काढणें.—*i.* घाईनें लिहिणें, भरडणें, खरडणें.—*n.* बिरखुड्या *f pl,* रेघोट्या *f pl,* कुत्र्याचे पाय *pl.*—SCRIP, piece of paper containing a writing चिठ्ठी, कागद; certificate of stock भांडवलाचा दाखला.—SCRIPT [*Print.* a kind

of type made in imitation of handwriting: *This line is printed in s.*]

Law, an original document लेख, दस्तऐवज. —SCRIPTURE लेख; the books of the Old and New Testament पवित्र शास्त्र, बैबल *n*; a passage from the Scriptures शास्त्रलेख, शास्त्रांतील स्थळ *n*; the s. of the Hindus are वेद, शास्त्र *n*, and पुराण *n*.—SCRIPTURAL *a*. शास्त्रा प्रमाणें, यथाशास्त्र (doctrine); contained in the Scriptures शास्त्रांतला, शास्त्रीय

SCRIP *Sw*. पिशवी *f*, जुगदान *n*.

SCRIVENER (See SCRIBE) one whose occupation is to draw contracts करारनामे लिहिणारा; one whose business is to place money at interest व्याजबट्टा करणारा, सराफ.

SCROFULA (*scrofa*, a breeding sow) गंडमाला *f pl*.

SCROLL *F*. writing formed into a roll गुंडाळी *f*, वळी *f*, पट.

SCROTUM (*L*.) अंडकोश, वृषण *n*; enlargement of s. अंडवृद्धि *f*, अंतर्गळ.

SCRUB *D*. a mean fellow गांवाची खरवड *f*, पायपोस -खेटरखाऊ; worn out brush खराटा- -BY *a*. भिकार.

SCRUPLE (*scrupulus*, a small, sharp stone, anxiety) [a weight of twenty grains]; a very small quantity गुंज *f*, रती *f*; doubt शंका *f*, दिकत *f*, विकल्प [about].—*v. i*. शंका धरणें, मनांत किंतु आणणें.—*t*. -विषयीं शंका घेणें: to s. the truth of an account [about]. -OUS *a*. संशयी, कांक्षाखोर, सकांक्ष, दिकतखोर; exact सुती, रेखला, तवताक, बारीक पाहणारा. -LY *ad*. संशय आणून; बारीक दृष्टीनें.

SCRUTINIZE *a*. (*scruta*, trash) search closely तपासणें, शोधणें, पारखणें, सुलावणें; examine into critically विवेकानें पाहणें, गुणदोषपरीक्षा क., न्याहळणें [into].—SCRUTINY चौकशी *f*, चिकित्सा *f*, तपास; निरेखणें *n*, निरीक्षा *f*; हेरणी *f*.

SCUFFLE*, struggle with close embrace झोंबाझोंबी *f*, झटापटी *f*, धकाधकी *f*; a fight मारामारी *f*.—*v. i*. झटापटी -झोंबाझोंबी चालणें [about].

SCULK *v. i. D*. लपणें, छपणें;—from duty, &c. काम चुकवणें.

SCULL, See SKULL.

SCULPTOR (*sculpere*) खोद -खोदींव काम करणारा. —SCULPTURE खोदींव काम *n*, खोद -नकस काम *n*, खोदगिरी *f*.—SCULPTURED खोदींव.

SIBILANT *a.* (*sibilare*, to hiss) ज्यांत सकार फार येतो तो, सकारी, ऊष्म (letter).

SICK* *a.* inclined to vomit ओकायाजोगा, ओकायास आलेला: I feel s. माझे पोटांत or मला कळमळतें disgusted कंटाळा -वीट -त्रास

आलेला : s. of flattery; indisposed दुखणाईत, रोगी, आजारी; to be s. of -ची ओकारी -चा कंटाळा येणें. -EN *v.* आजारी क., दुखण्या पडणें; कंटाळा आणणें [of, with, by].—*i.* कंटाळा येणें, मन विटणें; ओकारी -कळमळ येणें; become languish ग्लानि येणें. -LY *a.* दुखणेकरी, आजारी, रोगी; रोगाचा, रोगी (climate); म्लान, ग्लान, कलाहीन: the moon grows s. at the sight of the day. -NESS रोग, दुखणें *n*; आजार; रोगदशा *f*, रोगीपणा, दुखणें *n*; वमनेच्छा *f*, ओकायास येणें *n*, ओकारी *f*.

SICKLE* विळा, कोयती *f*.

SIDE*, margin of a surface बाजू *f*, किनारा, कांठ, कड *f*; any part or position viewed as opposite to or contrasted with another बाजू *f*, अंग *n*, हात: this s.; one-half of the body बाजू *f*, कूस *f*, अर्धांग *n*, अंग *n*; declivity, as of a hill उतरण *f*, डोंगराची कड *f*; party पक्ष, बाजू *f*, तड *f*; favor नजर *f*, मर्जी *f*, कैवार; by the s. of जवळ; a line of descent traced through one parent पक्ष; to choose *sides* पक्ष निवडणें; to take *sides* पक्ष -कैवार घेणें; from all *sides* चहूंकडून; from s. to s. आरपार; fair s. दर्शनी अंग *n*; opposite s. प्रतिपक्ष; one who takes a s. पक्षपाती; one's own s. स्वपक्ष; being on the right s. सुफराटा; —on the wrong s. उफराटा; s. of a roof पाख.—*a.* बाजूचा, कडचा; indirect आडकुसीचा, आडबाजूचा.—*v. i.* पक्ष धरणें, कैवार घेणें. -LING *ad.* बाजूनें, बाजूकडून. -SADDLE बायका बसावयाचा घोड्याचा जीन. -VIEW कटाक्ष, अपांगदृष्टि *f*. -WAYS, -WISE *ad.* बाजूकडे, बाजूनें, एका बाजूनें.

SIDERAL *a.* (*sidus*, a star) तारांचा, नक्षत्रविषयक; measured by the apparent motions of the stars नक्षत्रमानाचा (day).

SIEGE (*sedes*, a seat) फौजेचा गराडा -वेढा; to raise a s. वेढा उठवणें.

SIEVE* चाळण *f*, चाळणी *f*;—for washing vegetables, rice, &c. रोवळा.—SIFT *v.* गाळणें, चाळणें, छानणें; grain, &c., in a fan घोळणें, पाखडणें, वेंचणें; examine चाळणें, कसणें, घोळणें.

SIGH* उसासा, सुसकारा.—*v. i.* उसासा देणें -टाकणें; lament दुःख क.—*t.* -च्या विषयीं दुःख क.; उसासा देऊन (दुःख वगैरे) दर्शविणें.

SIGHT* पाहणें *n*, दर्शन *n*; the power of seeing पाहण्याची शक्ति *f*, दृष्टि *f*; open view दर्शन *n*; examination परीक्षा *f*, निरीक्षा *f*, अवलोकन *n*, चौकसी *f*; to take s. नेमधरणें; after s. सकृद्दर्शनीं; at s. पत्रदर्शनीं; error of s. नजरभूल *f*; in the s. of देखतच्या दिसण्यांत; to be in s. दिसणें, दृष्टीस पडणें; to give a s. of देखावा दाखविणें; s. of a gun माशी *f*.—*v.* पाहणें; निरेखणें. -ED *a.* दृष्टीचा: long s. -LESS *a.* अंधळा, नेत्रहीन. -LY *a.* देखणा, दर्शनी, सुदर्शन.

SIGN* (*signum*) token खूण *f*, लक्षण *n*, चिन्ह *n*; miracle चमत्कार; memorial खूण *f*, यादगारी *f*; signal संकेत, इशारा, खूण *f*; —of the zodiac राशि *f*; s. manual हस्ताक्षर *n*, सही *f*; [*Eng. Law*, the royal signature superscribed at the top of bills of grants and letters-patent].—*v.* सही क. -घालणें; खूण क. [with].—SIGNAL इशारा, इशारत *f*.—*a.* विशेष, नामी, मोठा. -IZE *v.* गाजवणें, मिरवणें; communicate with by means of a signal खुणेनें कळविणें;—one's self कीर्त्ति -नांव मिळवणें -संपादणें.—SIGNATURE सही *f*, स्वदस्तुर. —SIGNET मुद्रा *f*, मुद्रिका *f*.—SIGNIFY *v.* make known by sign खुणेनें कळविणें -सांगणें, खूण क.; indicate सुचवणें, कळविणें; mean अर्थ -आशय दाखविणें [to, by]. भारदस्ती -मुजाखा असणें.—SIGNIFICANCE अर्थ, अभिप्राय; भारदस्ती *f*, मुजाखा.—SIGNIFICANT *a.* अर्थाचा, अर्थयुक्त, अर्थसूचक;

expressive सांकेतिक, दर्शक, सूचक.—SIGNIFICATION अर्थ, अभिप्राय.

SILENT *a.* (*silere,* to be silent) perfectly quiet निःशब्द, निवांत; indisposed to talk मुका, मोना, उगा; calm शांत, स्तब्ध. -LY *ad.* उगा, गुपचूप; सामसूम, स्तब्ध.—SILENCE *v.* तोंड बंद क., उगा क.

SILK* रेशीम *n*; रेशमाचें कापड *n*; raw s. कच्चें रेशीम *n.*—*a.* रेशमाचा, रेशमी. -COTTON-TREE शेंवरीचें झाड *n*, सांवर. -EN *a.* रेशमाचा, रेशमी; soft मऊ, नरम; dressed in silk रेशमाचा पोशाक ल्यालेला. -WEAVER रेशमाचें कापड विणणारा, खत्री. -WORM रेशमाचा किडा, कोळीसरा.—SILKY *a.* रेशमाचा; मऊ, नरम; pliant अस्थिरबुद्धि, नरम, चलमति.

SILL*—of a door or window दरवाजाच्या किंवा खिडकीच्या चौकटीची खालची बाजू *f*, शिला *f*.

SILLY* *a.* मूर्ख, वेडगळ, भोळा; वेडेपणाचा, वेडेचाराचा (action).

SILVER* रुपें *n*; silver money रुप्याचें नाणें *n*, नाणें *n*; German s. खोटें रुपें *n*; native s. खाणींतलें रुपें *n.*—*a.* रुप्याचा, चांदीचा; precious मोलवान, चांदीचा; white रुप्याचा, शुभ्र, रौप्यवर्ण; bright चकचकीत, लकलकीत; sweet गोड (slumber); soft and clear मृदु आणि स्पष्ट, मंजूळ आणि मधुर (voice). —*v.* रुप्यानें मढीवणें, रुप्याचें पाणी देणें, रुपेरी मुलामा चढवणें; रुप्या सारखा चकचक क.; पांढरा -शुभ्र क.: his head was *silvered* over with age. -SMITH रौप्यकार, चांदीचें काम करणारा, सोनार.

SIMILAR *a.* (*similis,* like) सारखा, बराबर, सम [to]. -ITY सारखेपणा, साम्य *n*, सादृश्य *n*. -LY *ad.* त्याप्रमाणें, सारखा, तसाच. —SIMILE दाखला, दृष्टांत, उपमा *f*.—SIMILITUDE सारखेपणा, सादृश्य *n*; likeness आकार, रूप *n*, प्रतिमा *f*; comparison उपमा *f*, तुलना *f*.

SIMIOUS *a.* (*simia,* ape) माकडाचा, माकडा सारखा, मर्कटप्राय.

SIMMER *v. i. Eng.* boil gently, or with a gentle hissing चरचरणें, सणसणणें, चटचटणें.—*t.* मंदागीवर शिजवणें -उकडणें.

SIMONY (from *Simon* Magus, see Acts viii.) the crime of buying or selling ecclesiastical preferment धर्माध्यापकाची वृत्ति विकत घेण्याचा किंवा देण्याचा अपराध.

SIMPER *v. i. Ger.* वेड्या प्रमाणें किंवा दिमाखानें गालीं हसणें.

SIMPLE *a.* (*simplex*) single शुद्ध, निर्भेळ (sound); plain साधा (dress); sincere भावार्थी, निष्कपट, भोळा; clear स्पष्ट, उघड (statement); unaffected साधेपणाचा, साधा, उजू, सुरळीत (manners); foolish भोळा, साबडा, भोळसर; *Chem.,* elementary तत्वाचा, तत्वरूप -मय, एकाकी (substance); *Bot.,* entire अखंड, सबंध (stem); [s. contract; *Law,* any contract, whether verbal or written, which is not of record or under seal].—*n.* शुद्ध -निर्भेळ पदार्थ; a medicinal plant औषधि *f*, औषधि वनस्पति *f*. -MINDED *a.* मनाचा भोळा, भावार्थी. -NESS साधेपणा, शुद्धता *f*, निर्भेळपणा इ०. -TON वेडा, भोळाशंकर -नाथ.—SIMPLICITY शुद्ध -निर्भेळपणा; भावार्थ, खरेपणा; सरळ -बाळबोधपणा.—SIMPLIFY *v.* साधा क.; स्पष्ट क., अर्थ सांगणें, उमजविणें, सोपा करून सांगणें, सोपा क. —SIMPLY *ad.* निखालस, नुस्ता; फक्त, केवळ, शुद्ध.

SIMULTANEOUS *a.* (*simul,* at the same time) एकवेळचा, एककाळचा, एककालिक. -LY *ad.* एकाच वेळीं, एकसमयावच्छेदेंकरून, एकदम.

SIN*, transgression of the law of God पाप *n*, पातक *n*, अन्याय *n*: sin offering पापार्पण *n.*—*v.* depart voluntarily from the path of duty prescribed by God to man

पाप क.; trespass उल्लंघन -अपराध क. [against]. -NEE पापी, दुष्ट. -FUL *a.* पापी, पातकी; पापाचा, दुष्कर्माचा (action). -LESS *a.* निष्पाप, निष्कलंक, निर्दोष.

SINCE* *prep.* & *ap.* from the time of पासून, नंतर; ago मागें, झाला, गेला; *conj.* जेव्हां; ज्या अर्थी.

SINCERE *a.* (*sine*, without, *cera*, wax, as if app. orig. to pure honey) pure शुद्ध, निर्भेळ; real खरा, वास्तविक, निष्कपट. -LY *ad.* मनोभावानें, जिवाभावानें.—SINCERITY खरेपणा, निष्कपटपणा; भावार्थ, शुद्ध भाव.

SINCIPUT (*L.*) टवळी *f*, टाळू *f*.

SINE (*sinus*, a curve) *Geom.* ज्या *f*.

SINECURE *a.* (*sine*, without, *cura*, care) बैठा रोजगार -चाकरी *f*; the stipend of a s. बैठा पगार.

SINEW*, tendon स्नायु; strength बळ *n.*—SINEWY *a.* स्नायूचा, स्नायुमय; बळकट, जोरदार.

SING* *v. i.* utter sounds with musical inflections गाणें, गायन क., चालीवर -स्वरावर म्हणणें; utter sweet sounds, as birds गाणें, मधुर स्वर काढणें; make a small, shrill sound झणझणणें, सणसणणें; celebrate something in poetry गाणें, वाखाणणें, पोवाडा गाणें, कवन करून वर्णणें;—a bee, top, &c. गुंगणें, गोंगावणें;—bad singing गद्धे -कुत्ते मल्हार; to s. badly तारे तोडणें.—*t.* गाणें, गाऊन वाखाणणें. -ER गाणारा, गवई.

SINGE* *v.* burn slightly वरवर भाजणें, होरपळणें, पोळणें.

SINGLE *a.* (*singulus*) one only एक, एकला, एकटा; individual विशेष, भिन्न, निराळा; alone एकला, एक; unmarried अविवाहित, सडा, सडी *f*; not twisted with others एकेरी, एकपदरी (thread); performed by one person एकानें केलेला, एकाचा (combat); pure शुद्ध, निर्भेळ; sincere खरा, भावार्थी, अनन्य (heart).—*v.* निवडणें, निवडून घेणें [out, out from]. -HANDED *a.* एकटा, एकाकी. -HEARTED *a.* एकनिष्ठ, एकचित्त, अनन्यवृत्ति. -NESS एकेरीपणा; एकले -टेपणा.—SINGLY *ad.* एकेरी; एकटा; एकएक.—SINGULAR *a.* एकटा; existing by itself अनुपम, अपूर्व, एक, अद्वितीय; uncommon असाधारण, विशेष; *Gram.*;—a number एकवचन *n*; eminent प्रसिद्ध, प्रख्यात, नामांकित, एक; language (address, or mention) in the s. number एकेरा शब्द; odd तऱ्हेवाईक, विलक्षण (zeal). -ITY एकटेपणा; असाधारणता *f*, अनुपमता *f*, अद्वितीयता *f*; विलक्षणपणा, एकाडपणा, तऱ्हेवाईकपणा.

SINISTER *a.* (*L.*) left डावा; inauspicious अशुभ, अभद्र; dishonest कपटाचा, कुटिल (aims).

SINK* *v. i.* fall gradually उतरणें, गळणें, घसरणें;—in water बुडणें;—into mud, &c. रुतणें, रुपणें; decrease in volume ओसरणें उतरणें (a river); fall in बसणें, खचणें, to be impressed ठसणें, बिंबणें, भरणें;—spirits खचणें, गळणें;—money बुडणें, थकणें, डुलणें.—*t.* नाश क., बुडविणें; make by digging खणणें (a well); conceal लपविणें (money); keep out of sight दृष्टिआड ठेवणें, चोरणें (truth); lower in value उतरणें (price of goods); reduce in amount कमी क., फेडणें, उतरणें (debt). —*n.* नाला, मोरी *f*.

SINUS (*L.*) a bay खाडी *f*; *Surg.* नाडीव्रण; नाडी *f*.

SIP* *v.* drink in small quantities चाखत चाखत पिणें; to s. water religiously आचमन घेणें; extract काढणें, काढून घेणें: a bee *sips* nectar from the flowers; drink out of -आंतून पिणें.—*i.* चाखत पिणें, घोट -भुरका घेणें.—*n.* घोट, भुरका.

SIR *F.* महाराज, साहेब, खुदावंत; [a knight or baronet].—SIRE महाराज; father बाप.

SIREN (*L.*) मोहक स्त्री *f*, मोहिनी *f*.

SIRIUS (*L.*) लुब्धक तारा.

SIRRAH *Ir.* मागताच्या लेका -कांचा, अरे, बेटा.

SIRUP *Ar.* शिरा, पाक.

SISTER* (*Skr. swasri*) बहीण *f*; one of the same kind or of the same condition बहीण *f*, जोडी *f*: s. fruits. -HOOD बहीणपण *n*, भगिनीत्व *n*; community of women or sisters स्त्रीमंडळी *f*, स्त्रीसमाज. -IN-LAW, wife's sister मेहुणी *f*; husband's sister नणंद *f*: brother's wife भावजय *f*. -LY *a.* बहिणीचा -सारखा (kindness).

SIT* *v. i.* (*Skr. sad*) rest upon the hunches बसणें; perch पक्षा प्रमाणें बसणें, बसणें; rest बसणें; lie बसणें: a burden *sits* heavily upon him; fit बसणें, जमणें: a coat *sits* well; incubate बसणें, पाखर घालणें: the partridge *sitteth* on eggs, and hatcheth them not; hold a session बैठक -सभा बसणें -होणें; to s. at meat जेवायास -पानावर -मेजावर बसणें: down बसणें, खालीं बसणें; वेढा घालायास आरंभ क.: the enemy *sit* down before a town; बसणें, थिरावणें: उगा राहणें, तृप्त -संतुष्ट होणें, समाधान पावणें; to s. for a portrait आपली तसवीर काढून घेण्याकरितां चितारयाच्या पुढें बसणें; up उठणें, उठून उभा राहणें (Luke vii. 15); बसणें, बसून राहणें: to s. up late at night [on].—*t.* keep the seat upon बैठक सांभाळणें, चिकाटी देऊन बसणें. -TING *n.* बैठक *f*, बसणें *n*, बसणी *f*; a seat बैठक *f*, बसणी *f*, आसन *n*; a session सभाकाळ, बैठक *f*, इ०

SITE (*sinere*, to lay down) situation जागा *f*, ठिकाण *n*, स्थळ *n*; a place fitted or chosen for any certain permanent use or occupation जागा *f*: a s. for a church. —SITUATED *a.* बसलेला, स्थित, ठेवलेला; अवस्थेचा, अवस्थापन्न; badly s. दुःस्थित [at, on].—SITUATION जागा *f*, स्थळ *n*; स्थिति *f*, अवस्था *f*, दशा *f*; office जागा *f*, असामी *f*: a s. under Government.

SIX* *a.* (*Skr. shash*) साहा.—*n.* साहाचा अंक; aggregate of s. छकडी *f*. -FOLD *a.* साहापट. -TEEN *a.* सोळा. -TEENTH *a.* सोळावा. —SIXTH *a.* साहावा.—SIXTY *a.* साठ.—*n.* साठाची संख्या *f*; साठाचा अंक.—SIXTIETH *a.* साठावा.

SIZE (See ASSIZE) bulk लांबिरुंदी *f*, परिमाण *n*, आकारमान *n*.—*v.* लहान मोठा पाहून रचणें -मांडणें, शेज लावणें.—*n. W.* एक प्रकारची पातळ खळ *f*; *Med.* रक्ताचा तवंग.

SIZE *W.* डकवण *n*, खळ *f*, चिकटवण *n*.—*v.* चिकटवणें, खळणें.

SKEIN *F.* कुकडें *n*.

SKATE *D.* बर्फावरून घसरत -झगट्यानें चालत जाण्याचा जोडा.—*v. i.* बर्फावरून चालत -घसरत जाणें.

SKELETON (*Gr.*) bony structure in its natural relation हाडांचा पिंजरा, अस्थिपंजर, सांपळा; a very thin person सुकडा माणूस, कागदीजान; compages सांगाडा, खटारा, सांपळा.

SKEPTIC, See SCEPTIC.

SKETCH *D.* अंकणें *n*, अंकणी *f*;—of a subject अखाडा, मसुदा.—*v.* अंकणें, बेत -नकाशा काढणें -क. [out, in, off].

SKEWER *D.* सळई *f*, शलाका *f*.

SKIFF *F.* लहान होडी *f*, डिंगी *f*.

SKILL*, knowledge ज्ञान *n*, बुद्धि *f*; familiar knowledge with dexterity युक्ति *f*, हिकमत *f*, कौशल्य *n*, कसब *n* [in]. -FUL, -ED *a.* कुशल, कसबी, चतुर, निपुण, सुगर [at, in].

SKIM *v. Ger.* clear off from the surface छाटणें, छाटून काढणें; take off by skimming मलई -साई काढणें; pass near the surface of सरपटणें, -च्या वरून -सरसून -सरपटत जाणें [over, along].—*i.* सरपटत जाणें.—*n.* साई *f*, मलई *f*. -MER झारा, शिबें *n*. -MILK साई काढलेलें दूध *n*. -MING साई काढणें *n*.—SCUM साय *f*, मलई *f*; refuse खरवड *f*.

SKIN*, the external membraneous envelope of animal bodies चामडें *n*, कातडें *n*, चर्म *n*, कातडी *f*, चामडी *f*; the skin of an animal separated from the body कातडें *n*, चरसा, आधोळ; bark of a plant साल *f*, त्वचा *f*; exterior coat of fruits and plants सालपट *n*, टरफल *n*.—as of certain fruits, a sore, &c. कोशेटा;—of a tiger व्याघ्रांबर *n*.—*v.* कातडें -त्वचा -साल काढणें, सोलणें.—*i.* कातडें येणें: a wound *skins* over; [produce, in recitation or other school exercise, the work of another for one's own]. -DEEP *a.* वरवरचा, वरकर्मी. -FLINT कवडीचुंबक, लोहचुंबक. -NY *a.* कातड्याचा; wanting flesh सडसडीत, पातळ, सुकटा, हडक्या.

SKIP *v. Icel.* सोडणें, वगळणें, गाळणें.—*i.* उडी मारणें, ठिकणें; over वगळणें, गाळणें. [from, off, away, to].—*n.* उडी *f*, कुदी *f*.

SKIRMISH *O. E.* गोळागोळी *f*, चकमक *f*.—*v.* फटकाफटकी -गोळागोळी होणें -चालणें [with].

SKIRT*, the lower and loose part of a garment घेर, घोळ, झोळ; edge of any part of dress पदर, शेव; edge कांठ, किनारा, कड *f*, शेव.—*v.* शींव -शिमा असणें -धरणें.—*i.* शिवेवर असणें.

SKITTISH* *a.* shy बुजरा, frisky नाचऱ्या, कुलुल्या.

SKULK* *v. i.* lurk दडणें, लपणें; absent from duty कामावरून गैरहाजीर राहणें, काम चुकविणें [about, away, off, in, out].

SKULL *D.* कंवटी *f*, कवची *f*, करटी *f*.

SKY *D.* आभाळ *n*, आकाश *n*, अंतराळ *n*: the s. is overcast आभाळ आलें. -COLORED *a.* अस्मानी रंगाचा, अस्मानी, नीलवर्ण. -LARK कुकुडकुंभा, भारद्वाज. -LIGHT झारें *n*, धारें *n*, गवाक्ष *n*. -ROCKET बाण.

SLAB *W.* शिला *f*, शीळ *f*;—of a hand-mill तळी *f*;—for grinding condiments, medicaments, &c. पाटा.

SLABBER *v. i. Ger.* लाळ गाळणें -टाकणें.—*t.* लाळीनें ओला क. -भरीवणें. -ER लाळगाळ्या, लाळ्या.

SLACK* *a.* not tense ढिला, सैल; not holding fast खिळखिळीत, खिळखिळ्या; remiss ढिला, मळमळीत, सुस्त, गैदी: s. in duty; slow मंद, सुस्त, धिमा (pace). -EN *v.* ढिला -सैल -ढील क.; जोर -वेग कमी क.; slake भिजवणें, विरवणें (lime).—*i.* ढिला -सैल होणें; सुटणें, मोकळा होणें, विरणें (lime); languish ग्लानि येणें, लुंबणें. -NESS ढिलेपणा, शैथिल्य *n*; आळस, मंदाई *f*, सुस्ती *f*.

SLAKE *v. Icel.* quench विझविणें;—as thirst भागवणें; slack विरवणें, उमलविणें (lime).—*i.* विझणें.

SLAM *v. Icel.* धडकन -आदळून लावणें -बंद क. (a door).

SLANDER *F.* false tale or report maliciously uttered, and tending to injure the reputation of another चहाडी *f*, चुगली *f*, बालंट *n*, आळ; reproach कलंक, निंदा *f*.—*v.* तोहमत आणणें, आळ घेणें, चुगली -चहाडी क. -ER चुगलीखोर, चहाड, बालंट्या. -OUS *a.* चुगलीचा, कुभांड्या, अपवादक (word); चुगली सांगणारा, चुगलीखोर, तुफानी.

SLANT *a. Sw.* तिर्कस.—*v.i.* तिर्कस जाणें -फिरणें,

उतरता असणें.—*t.* उतरता क., ढाळ देणें.—*n.* ढाळ, उतार.

SLAP *Ger.* चपराक *f*, थापड *f*, चापटी *f* [at, on].—*v.* चपराक देणें -मारणें -भडकावणें.

SLASH *v. Icel.* धसकावणें, चपाचप तोडणें.—*n.* तरवार इ० चा वार -ची चीर -फाळा.

SLATE *F.* a kind of stone which readily splits into plates एक जातीचा मऊ दगड आहे, स्लेटीचा दगड; a thin plate of stone चीप *f*; a tablet for writing upon दगडी पाटी *f*, 'स्लेट' *f*.—SLATY *a.* कप्याचा, चिपाचा.

SLATTERN *Ger.* a woman who is negligent of her dress or house आडव्या सुडक्याची बायको *f*, भोंगळी बायको *f*, जोगम्मा *f*; to dress as a s. उभें नेसणें -लावणें.

SLAUGHTER *Icel.* extensive and unnecessary destruction of human life कत्तल *f*, काटाकाटी *f*, कंदन *n*; act of killing as a matter of business कापणें *n*, मारणें *n*, वध: s. of oxen for market.—*v.* काटणें, कत्तल उडवणें, काटाकाटी क.; कापणें, मारणें, कंदन क. -HOUSE जनावरें कापण्याची जागा *f*.

SLAVE *D.* a person who is held in bondage to another दास, गुलाम, बंदा; one who has lost the power of resistance दास, गुलाम: a s. to passions; one who labors like a slave गुलाम, भाडेकरी, हाडाचे मणी करणारा, खप्या, कबाडकष्ट करणारा; female s. दासी *f*, बटीक *f*, कुणबीण *f*.—*v. i.* कबाडकष्ट -गुलामगिरी क.; deal in slaves गुलामांचा व्यापार क. -RY दास्यत्व *n*, गुलामगिरी *f*.—SLAVISH *a.* गुलामाचा; such as becomes a slave गुलामा सारखा, गुलामास योग्य; servile खुशामतीचा, आर्जवी; laborious कष्टाचा, कबाडकष्टाचा.—SLAVER गुलामाच्या व्यापाराचें जहाज *n*; गुलामाचा व्यापार करणारा.

SLAVER *Ger.* लाळ *f*.—*v. i.* लाळ पडणें -गळणें; लाळीनें भरणें [at].

SLAY* *v.* मारणें, जिवें मारणें, प्राण घेणें. -ER मारणारा, वधकरणारा.

SLEDGE*, the hammer घण; *D.* a carriage drawn without wheels बिन चाकांची गाडी *f*; a vehicle moved on low wheels ठेंगण्या चाकांची गाडी *f*.

SLEEK *a.D.* smooth गुळगुळीत, साफ, सफाईदार.

SLEEP* *v. i.* take rest by a suspension of the voluntary exercise of the powers of the body and mind, and an apathy of the organs of sense निजणें, झोंप घेणें; be careless झोंप घेणें, डोळेझांक क., निष्काळजी -निश्चिंत असणें; to be dead मरणें, महानिद्रा लागणें (1 Thes. iv. 14); be in repose स्वस्थ राहणें, पडणें, झोंप घेणें: a question *sleeps* for the present; to s. composedly सावकाश निजणें.—*n.* निद्रा *f*, नीज *f*, झोंप *f*; s. in which the subject turns round and round चक्रीझोंप *f*. -ER निजणारा; a lazy person आळसी, अजगर; a sound s. कुंभकर्ण [a piece of timber or stone on or near the level of the ground, for the support of some superstructure]. -ING झोंप आलेला, निद्रायमाण, निद्रिस्त; occupied for sleeping निजायाचा, निजण्याचा (a car on a railway); s. partner पोटगडी.—*n.* निद्रावस्था *f*. -INESS झोंपाळूपणा; drowsiness झोंपेची गुंगी *f*, सुस्ती *f*.—SLEEPY *a.* झोंपाळू, निद्रालु; tending to induce sleep निद्राकर, झोंप आणणारा; overcome by sleep झोंपेची तार आलेला, झोंपेनें घेरलेला, निद्राग्रस्त.

SLEET*, fall of hail or snow mingled with rain गारांचा -स्नोचा पाऊस.

SLEEVE* बाही *f*, अस्तनी *f*; to laugh in one's s. पदर लावून गालच्या गालीं हसणें.

SLEIGHT *Icel.* हस्तलाघव, हातचलाखी *f*; s. of hand हातचलाखीचा खेळ.

SLENDER *a. D.* thin पातळ, सडपातळ, बारीक; weak निर्बळ, फुसका, अशक्त (constitu-

tion); slight थोडा. हलका. अल्प (hope); moderate थोडा. सुमारावा (intelligence): inadequate थोडा, अपुरता, कोंडा (pittance); simple साधा (diet).

SLICE *Ger.* thin, broad piece फांक *f*, कापटी *f*, चिरोटी *f*, फोड *f*; piece cut off धपळी *f*. चिवळी *f*.—*v.* फांकी क., कापणें, फोडी पाडणें [off].

SLIDE* *v. i.* slip घसरणें, निसरणें; move over snow with a glib, uninterrupted motion वर्फा वरून घसरत जाणें; fall पडणें; pass inadvertently घसरणें, चुकून जाणें.—*t.* लोटणें, सारणें; चोरून शिरकवणें, खुसणें (a word) [off, from, to, along, over].—*n.* घसरड *f*.

SLIGHT *a. Ger.* small बारीक, पातळ, किरकोळ; slender हलका, लहान, फुसका, अलबेला (structure); inconsiderable हलका, कळे नफळेसा (pain).—*n.* contempt अव्हेर, अनादर; neglect उपेक्षा *f*, कानाडोळा, अवगणना *f*.—*v.* तुच्छ मानणें, अनादर क.

SLIM *a. Ger.* पातळ, किरकोळ, बारीक.

SLIME* गाळ, रेबड *f*.—*v.* गाळानें भरणें, रेबडी लावणें [over].—SLIMY *a.* गाळाचा, रेबडीचा; viscous चिकचिकीत, गळगळीत; रेबडीनें भरलेला.

SLING *Ger.* instrument for throwing stones, consisting of a strap and two strings गोफण *f*; a kind of hanging bandage round the neck, in which a wounded arm is sustained ओळंबें *n*;—as for a vessel शिंकें *n*;—for a weight or load नवचण;—for a basket शिंकरणी *f*.—*v.* गोफणीनें मारणें; शिकाळणें.

SLINK* *v.* steal away चोरून जाणें; miscarry, as a beast गाभटणें [off].

SLIP* *v. i.* slide निसरणें, निसटणें; fall into error चुकणें, घसरणें; sneak चोरून निघून जाणें, सुकाडी देणें [away]; enter by oversight चुकीनें नजरचुकीनें शिरणें; to be lost गमावणें.—*t.* सारणें, सरकवणें; हरवणें, घालवणें; omit गाळणें, सोडणें; cut कापणें, तोडणें, छाटणें (branches); let loose सोडणें, मोकळें क. (a hound); throw off अंगाबाहर टाकणें -काढणें: a horse *slips* his bridle; miscarry गाभटणें; on अंगांत अडकवणें (a coat).—*n.* घसरणें *n*, घसरा, चळ, ढळ; a twig separated from the main stock कलम *n*, फांदी *f*; string by which a dog is held कुत्र्याची दोरी *f*; a long narrow piece पट्टी *f*;—of cloth पट्टा *f*, चिंधोटी *f*;—of bamboo कांब *f*, कांबीट *f*;—of metal कांब *f*;—of land पट्टी *f*, चिरोटी *f*; fault चूक *f*, चळ, ढळ; to give the s. झुकाटी देणें. -KNOT सरक -निसर -शेसगांठ *f*. -PER पायपोस, पैजार, मोचा. -PY *a.* घसरता, निसरडा; बुळबुळीत (substances); not affording firm confidence चंचळ, अस्थिर (promise); liable to slip घसराया-जोगा; a s. place घसरड *f*.—SLOP गरगट *n*, ढपळवणी *f*.

SLIT* चीर *f*, भेग *f*.—*v.* चिरणें, उभा कापणें; make a fissure in चीर -भेग पाडणें [up].

SLOAT *Ger.* a narrow piece of timber which holds together large pieces करळी *f*.

SLOOP *Ger.* एककाठी जहाज *n*.

SLOP *Ir.* puddle डबकें *n*, डबरा; mean liquor गरगट *n*, शंखवणी *f*; *pl.* मळकट पाणी *n*.

SLOPE*, a direction downward उतार, ढाळ; acclivity चढण *f*, चढाव.—*v.* ढाळ देणें, उतार क. [off, down, from].—*i.* उतरता होणें.—SLOPING *a.* उतरता, ढाळता.

SLOTH*, laziness आळस, सुस्ती *f*; an animal एक जनावर आहे, पणमृग. -FUL *a.* सुस्ती, आळशी, मंद.

SLOUCH *v. i. D.* मुंडी -मान खालीं करून चालणें.—*t.* खालीं क., पाडणें, लोंबवणें.

SLOUGH* दलदल *f*, रुतण *f*, कर्दम.—SLOUGHY दलदलीचा.

SLOUGH *Ger.* the cast skin of a serpent मेंग *f*, कांत *f*; *Med.*, the part that separates from a foul sore जळमट *n*, गलित-मांस *n*.—*v.* मेंग टाकणें; जळमटें, खपली वगैरे निघणें [off].—SLOUGHY *a.* जळमटांचा.

SLOVEN *a. Ger.* नेभळ, भेंगळ. -LINESS नेभळेपणा, गेंगिपणा, गबाळीपणा. -LY *a.* भेंगळ, गेंदो, गेंबरा; not neat हडगईचा, भावळा.

SLOW* *a.* not quick in motion धिमा, मंदगति, मंद; late उशिरानें होणारा, दीर्घकालिक; not prompt मंद, जड, मठ: s. of speech; not hasty धिमा, गंभीर विचाराचा (Prov. xiv. 29); behind in time मागवा, विलंबित, हळू चालणारा, मंद (watch); not advancing मंद, हळू वाढणारा (growth); having no wit स्थूलबुद्धि, मंद. -LY *ad.* हळवानें, मंद, हळुहळु. -NESS मंदपणा, मंदाई *f*, मंदगति *f*; जडपणा, सुस्ती *f*, बद्धिमांद्य *n*, मंदबुद्धि *f*; सावकाशी *f*, धिमाई *f*.

SLUBBER *v. D.* do lazily, imperfectly, or coarsely गडबडगुंडा क., ढकलणें, दाटणें; daub चोपडणें, लथडणें, लेपटणें; work *slubbered* over विगार *f*, विगारकाम *n*.

SLUGGARD *a. D.* आळशी, अजगर, आर.—SLUGGISH *a.* सुस्त, मंद, जड.

SLUICE *D.* flood-gate उघडी *f*, सांड *f*, सांडवा.

SLUMBER* *v. i.* sleep lightly हलकी झोंप-डुकली घेणें; sleep निजणें; to be in a state of inactivity निवेष्ट -उणी -स्तब्ध बसणें, झोंप घेणें.—*n.* हलकी झोंप *f*, कुरझोंप *f*; झोंप *f*.

SLUR *v. D.* soil बट्टा -काळें -कलंक लावणें; pass lightly उडत उडत -छपावून सांगणें. —*n.* कलंक, डाग, काळोखी *f*; imposition ठकवणूक *f*, फसवणूक *f*.

SLUT *D.* जोगम्मा *f*, हिडशी बायको *f*.

SLY *a. D.* skilful चतुर, धूर्त; cunning कावेदार, मतलबी, धूर्त.

SMACK* *v. i.* kiss with violence मिटक्या मारून मुका घेणें; have a taste वास -लज्जत मारणें -अमणें;—with the lips मिटकी मारणें.—*t.* मिटकी मारून मुका घेणें; crack कडकवणें, तडतडावणें (a whip) [with].—*n.* वास, लज्जत *f*; मिटक्याचा मुका; फटकारा, कडाखा; slap चपराक *f*, चापटी *f*.

SMALL* *a.* not large लहान; insignificant हलका, क्षुल्लक (subject); little in amount or degree थोडा, अल्प, हलका; weak बारीक, एकेरा (voice).—*n.*—of the back बगड *n*, चौक. -NESS लहानपणा; थोडकेपणा, हलकेपणा; बारीकपणा इ०. -POX देवी *f pl*, फोड्या *f pl*.

SMART *Ger.* local pain स्थानिक दुःख *n*, वेदना *f*; pungent pain of mind चटका, मनस्ताप. —*a.* तीक्ष्ण, तिखट; quick चंचळ, चलाख, चपळ; energetic झटपटयाचा, तडाख्याचा, कडक; witty नोकदार, खुबीचा, मार्मिक (repl.); dashy चमकफ, छानदार, ठाकठीक;—of persons चलाख, जलद, हुशार.—*v. i.* दुखणें, चुरचुरणें, चुणचुणणें; to be punished शिक्षा भोगणें -पावणें, चटका लागणें (Prov. xi. 15); to cause to s. for भोगणें, जाणवणें [with]. -LY *ad.* चलाखीनें, झपटयानें; चकपक, छानमारून, चापून चोपून. -NESS तिखटपणा, तीक्ष्णता *f*; चलाखी *f*, झटपट *f*; सफाई *f*, हुशारी *f*; कडाखा, सपाटा; चापचोपी *f*, छान *f*; नोक *f*, खुबी *f*.

SMASH *v. Ger.* चकणाचूर क. -करून टाकणें —*n.* चकणाचूर, चुराडा.

SMATTER *v. i. Ger.* talk superficially वरवर बोलणें; smack लज्जत -वास मारणें. -ER पुस्तकावरून ओढलेला, तकपिट्या, खंडीखंडी पंडित. -ING ओरखडलेलें ज्ञान *n*, खंडपांडित्य *n*, वरवरची माहितगारी *f*.

SMEAR* *v.* daub लिपणें, माखणें; soil कलंक लावणें [over].

SMELL *v. Ger.* perceive by the nose हुंगणें, वासवेणें; to s. out हुंगणें, वासानें शोधून काढणें; to s. a rat माशी शिंकणें [of, to].—*i.* वास असणें -येणें; have a particular tincture वासमारणें.—*n.* वास, गंध; ill-s. घाण *f*, कुवास; good s. सुगंध, सुवास; the power or sense of s. घ्राणेंद्रिय *n.* -FEAST परान्नरुचि. -ING घ्राणेंद्रिय *n.* -ING-BOTTLE वासाची -वास घेण्याची कुपी *f*.

SMELT *v. D.* रस क., गाळणें. -ER रस करून गाळणारा, धावड.

SMILE *v. i. D.* (*Skr. smi*, to laugh) गालीं हसणें, मंदहास्य क.; be propitious प्रसन्न होणें, फुलणें, खुलणें; sneer हसणें, नाक मुरडणें; look gay and joyous उल्लासी -आनंदी दिसणें: *smiling* spring; *smiling* countenance हास्यवदन *n*, प्रसन्नमुख *n*, मंदस्मित वदन *n* [on, at].

SMITE* *v.* strike मारणें, हाणणें, प्रहार क.; kill जिवें मारणें; put to rout in battle युद्धांत मोड क.; blast करपवणें; affect with passion मोहणें, मोहित क.; afflict दुःख देणें; off छेदणें, कापून टाकणें; out पाडणें, तोडणें (tooth).

SMITH* घड -ठोककाम करणारा; iron s. लोहार; gold s. सोनार; copper s. कांसार.—SMITHY घडकामाचें दुकान *n*, लोहारसाळ *f*, इ०.

SMOKE*, the exhalation, visible vapor, or substance that escapes from a burning body धूर, धूम्र; that which resembles smoke, as vapor or watery exhalations धूर, धुई *f*, धुकें *n*; a volume of s. धुराटी -डी *f*.—*v.i.* धूर निघणें; rage धुमसणें, धुसधुसणें, संतापणें; raise a dust by rapid motion (धांवत -जलद चालतांना) धूळ उडवणें -उधळणें; to s. tobacco तंबाखू पिणें -ओढणें; suffer भोगणें, सोसणें: some of you shall s. for it. —*t.* धुरावणें, धुरी -धूर देणें; तंबाखू ओढणें.—SMOKY *a.* emitting smoke धुराचा, धुरकट (fires); filled with smoke धुरानें भरलेला, धुरकटलेला, धुईचा (atmosphere); tarnished with smoke धूर लागलेला, धुरकट, धुरानें काळा झालेला (rafters).

SMOOTH* *a.* not rough गुळगुळीत, नितळ (glass); glossy गुळगुळीत, तुळतुळीत, मऊ (hair); gently flowing सुरळीत, सरळ, संत -झुळझुळा -सुळसुळा वाहणारा (stream); not harsh मृदु, गोडीगुलाबीचा, गोड; flattering आर्जवाचा, गोड (discourse); even सारखा, सपाट, बराबर; not obstructed निर्विघ्न, सोपा, सरळ.—*v.* गुळगुळीत क.; सारखा -बराबर क.; सोपा -सुरळीत क.; palliate हलका -कमी क. (fault).—*i.* आर्जव क. -LY *a.* सुरळीत, सरळ; गोडीगुलाबीनें, गोडगोड बोलून. -NESS गुळगुळीतपणा, सफाई *f*; सारखेपणा, सपाटी *f*; मऊपणा; लाघव *n*, लाडीगोडी *f*. -TONGUED *a.* गोडबोल्या.

SMOTHER* *v.* destroy the life of by suffocation दम -श्वास कोंडून मारणें; stifle दाबणें, दडपणें (a fire); suppress दाबणें, लपवून -दडपून ठेवणें, गिळणें (displeasure) [up].—*i.* गुदमरणें, धुसमटणें; burn slowly धुमसणें, हळुहळु जळणें.

SMOULDER *v. i. D.* धुमणें, धुमसणें.

SMUGGLE* *v.* import or export secretly and without paying duty जकात चुकवून व चोरून (माल) आणणें किंवा नेणें; convey, or introduce, clandestinely चोरून नेणें -आणणें [away, in, out, through].

SMUT*, dirt of soot, lampblack मस *f*, मशेरी *f*;—of corn अंगारा, काजळी *f*; obscene language विचकट -बीभत्स भाषण *n*. —*v.* मस लावणें, काळा क.; तांबारा पाडणें; tarnish कलंक लावणें [with].—*i.* मस जमणें

-होणें. -TY *a.* मस लागलेला, मसकट; काजळी -अंगारा लागलेला, कोळपलेला; विचकट, बीभत्स.

SNAFFLE *Ger.* सुतळ्या लगाम.

SNAIL*, the animal गोगलगाई *f*, पिकळी *f*; a slow moving person मुंगीच्या पायांनीं चालणारा, मदाड.

SNAKE* साप, सर्प. -STONE सर्प -नागमणी. —SNAKY *a.* सापाचा; cunning धूर्त.

SNAP *v. Ger.* break at once कटकन मोडणें, तटकन तोडणें; strike with a sharp sound पटकन मारणें; bite suddenly एकदम डसणें; break upon suddenly with sharp, angry words तुटून -घसरून आंगावर येणें; crack फटकारा मारणें; off तटकन तोडणें, लचका काढणें;—the fingers चुटकी वाजवणें.—*i.* तटकन मोडणें; तोंड टाकणें, डसायाला धांवणें -क.; खेंकणें, खेंकावणें [off].—*n.* चुटकी *f*, चटकी *f*, फटकारा. -PISH *a.* डसरा, डसका, चावरा; खिसखिशा, चिरडखोर, तिडतिडा.

SNARE *D.* trap सांपळा, फांस: fig. सांपळा, फांस.—*v.* फाशांत धरणें -पाडणें [with, by].

SNARL *v. i. D.* growl गुरगुरणें, गुरकावणें; speak roughly खेंकणें, खेंकावणें [at].

SNATCH *v. D.* seize hastily झोंबाडणें, हिसकून घेणें, झडप मारणें; seize and transport away धरून नेणें, पार क. [at, up, from].—*n.* हिसडा, आंसडा, झोंबाडा.

SNEAK* *v.* steal away privately गुपचुप -चोरून निघून जाणें; crouch जीजी क., थुंकी झेलणें (along, about, off, in, into, out, away). —*n.* थुंकी झेलणारा, आर्जवी. -ING आर्जवी, जीजी करणारा.

SNEER *v. i. Pr. Eng.* show contempt by turning up the nose, or by a particular cast of countenance नाक वर क. -मुरडणें; show contempt by a covert expression झिटकारून -लावून -खोंचून बोलणें, ठोमणा मारणें. —*n.* नाकझाडणी *f*, लावून बोलणें *n*, उपरोध.

SNEEZE* *v. i.* शिंकणें, शिंक येणें.—*n.* a sudden and violent ejection of air, chiefly through the nose, with an audible sound शिंक *f*.

SNIFF *v. i. Ger.* सूं सूं क., नाकानें श्वास घेणें.

SNIP *v. D.* cut off कातरणें, कातरून घेणें; pilfer बुटेचोरी क.

SNIPE *D.* पाणलव्हा -लावा.

SNIVEL* *v. i.* नाक वाहणें, शेंबूड वाहणें -गळणें; cry or whine as children धुसमुसणें, पिरपिर लावणें, रडून शेंबूड गाळणें. -ER शेंबड्या, मुसमुसणारा.

SNOOD *Scot.* अगूळ *n, m, f.*

SNORE* *v. i.* घोरणें.

SNORT* *v. i.* खेसणें, फुरफुरणें.

SNOT* शेंबूड. -TY *a.* शेंबड्या, बरबरीत.

SNOUT *Ger.* long projecting nose of a beast जनावराचें तोंड *n*, मुसकट *n*; nose of a a man नाकाड *n*;—in contempt मुसकड *n*.

SNOW* बर्फ *n*, हीम *n*, 'स्नो.'—SNOWY *a.* बर्फासारखा, पांढराफटफटीत; abounding with snow हिमप्रचुर.

SNUB *v. D.* दटावणें, दबकावणें, धमकावणें. -NOSED *a.* नकटा, फेपट्या नाकाचा.

SNUFF *Ger.* the burnt part of a candlewick गूल *m, f*, काजळी *f*, कोजळी *f*; powdered tobacco तपकीर *f*.—*v. i.* कोजळणें; inhale श्वासा बरोबर घेणें; take offence नाक मुरडणें, रुसणें. -BOX तपकिरीची डबी *f*. -ER हुंगणारा; *pl.* कोजळी झाडण्याची कातर *f*. गुलतराश *f* (*H*).—SNUFFLE *v. i.* नाकांत बोलणें, गुणगुणणें.

SNUG* *v. i.* चिकटून निजणें, कुशींत शिरणें.—*a.* —of places सुटसुटीत, अटपसार, अटपता, सुबक;—of persons चिकटलेला, लगटलेला.

SO* *ad.* in that manner तसें, त्याप्रमाणें; in like manner असा, याप्रमाणें; very फार, इतका; s. forth इत्यादि; s. much as इतका;

s.-and-s. असा तसा, माफक; s. that इतकें कीं; s. then तर मग.—*conj.* असें असतां.

SOAK* *v.* steep भिजवणें, भिजूं घालणें; drench चिंबभिजवणें; draw in by the pores शोषणें, शोषून घेणें [through, in].—*i.* भिजत पडणें; मुरणें, जिरणें, भिनणें.

SOAP* साबू, साबण. -BERRY रिठा.—SOAPY *a.* साबणा सारखा; मऊ, गुळगुळीत; साबण लावलेला.—SUDS *pl.* साबणाचें पाणी *n.*

SOAR *v. i.* (*-aura*, the air) उडणें, उंच-वर जाणें, tower in thought उंच विषय धरणें-घेणें [over, above].—*n.* उड्डाण *n.*

SOB* *v.i.* रडणें, स्फुंदणें.—*n.* हुंदका, स्फुंदन *n*, रुदन *n* [for].

SOBER *a.* (*sobrius*) temperate in the use of spirituous liquors बेताने पिणारा, मितपानी; not drunk सावध, अमल न चढलेला, हुशार: the sot may at times be s.; not mad विचारशील, स्थिर; self-controlled नियतवृत्ति, नियमी; not proceeding from passion विचाराचा; serious गंभीरवृत्ति.—*v.* अंमल कैफ उतरणें, शुद्धीवर आणणें.—*i.* शुद्धीवर येणें, कैफ उतरणें. -LY *ad.* अंमला वाचून, कैफा वांचून; थंडाईनें, विचारपूर्वक. -MINDED *a.* स्थिर, विचारवान. -NESS.—SOBRIETY बेताचें पिणें *n*, मितपाशन *n*; सावधपणा, बिनअमलीपणा; स्थिरबुद्धि *f*, गांभीर्य *n*, विचारशीलता *f*.

SOCIABLE, SOCIAL *a.* (*socius*, a companion) सोबतीचा भुकेला, स्नेहबुद्धि; मंडळीचा, संगतीचा; familiar खेळीमेळीचा, स्नेहाचा. -NESS, -ITY स्नेहबुद्धि *f*, मिलाफीपणा.—SOCIETY सोबत *f*, संगत *f*; community मंडळी *f*, पंगती *f*, पंगत *f*, लौकिक.

SOCK (*soccus*, a light shoe) पायाचा मोजा, पायमोजा.

SOCKET (do.) घर *n*, उथळें *n*, खुरशी *f*;—for a post तोळंबा.

SOD *Ger.* गवताळ -गवती जमीन *f*; a s. गवताच्या मुळासगट माती *f*.

SODA (*salsus*, salt) एक प्रकारचा क्षार आहे; subcarbonate of s. पापडखार; impure carbonate of s. सज्जीखार.

SODOMITE, inhabitant of Sodom सदोम गांवचा राहणारा; one guilty of sodomy गुदमैथुन करणारा, गुदमैथुनाचा दोषी; a male that submits to the crime of s. गंडिया.—SODOMY गुदमैथुन *n.*

SOFA *Ar.* 'कोच' *f*, 'सोफा', मंचक.

SOFT* *a.* not firm in resisting नरम, मऊ; not rough सफाईदार, बारीक (silk); agreeable to perceive or feel मृदु, मंद (air); pleasing to the eye दृष्टिरम्य, सुंदर (hues); mild सौम्य, मृदु, करुणार्द्र (form); not rough in sound मंजुळ, मधुर, हलका; *Gram.* घोषवत, सघोष (a letter); effeminate मनाचा कवळा, नरम, मळमळीत; easy हलका, हलक्या होताचा; not tinged with salts, so as to decompose soap गोडा (water); easily wrought सुबड, नरम (iron); quiet शांत (slumbers).—*ad.* हळू, सावकाश; -EN *v.* मऊ-नरम क.; mollify बताचा-सुमारमाफक क.; make tender पाझरविणें, द्रवविणें [down].—*i.* मऊ-नरम होणें; पाझरणें, नरमावणें: the heart *softens* at the sight of woe. -LY *ad.* हलक्यानें, हळू, हलवा; मंजुळ वाणीनें. -NESS मऊपणा, नरमपणा; फुसफुसीतपणा; मनाची नरमाई *f*; मंदत्व *n*, मार्दव *n*; मंजुळता *f*, मधुरता *f*, माधुर्य *n*; सौम्यपणा.

SOIL* *v.* make dirty on the surface मळवणें; tinge with anything extraneous डागवाडणें; manure खत घालणें [with, by].—*n.* मळ; डाग.

SOIL *v. F.* गुरांस पुष्कळ खायास घालून जुलाब देणें.

SOIL (*solum*, the upper stratum of the earth) माती *f*, काळी *f*, धरत्री *f*, जमीन *f*; country देश; manure खत *n*; inferior s. बरडजमीन *n*; white s. पांढर *f*, पांढरी *f*; red s. तांबड *f*.

SOIL (*sus*, a hog) a marshy or miry place to which a hunted boar resorts for refuge पारधी पाठीस लागलेल्या डुकराची आसऱ्याची जागा *f*; [streams or water sought for by any other game, as deer].

SOIREE *F.* an evening party संध्याकाळची (मिळालेली) मंडळी *f*.

SOJOURN *v. i. F.* कांहीं दिवस राहणें.—*n.* मुकाम; प्रवास, देशांतरवास. -ER कांहीं दिवस राहणारा, प्रवासी, उपरी. -ING प्रवास; मुकाम.

SOLACE *v.* (*solari*, to comfort) अश्वासन -धीर देणें; allay सांत्वन -समाधान -शमन क. [with].—*n.* सुख *n*, चैन *f*, आराम; सांत्वन *n*, समाधान *n*.

SOLANUM (*L.*) s. macrohizon डोरली *f*; s. Jacquini डोरली रिंगणी *f*; s. insanum डोरली वांगी *f*; its fruit डोरलें वांगें *n*.

SOLAR *a.* (*sol*, the sun) सूर्याचा, सूर्य संबंधी, सौर; measured by the progress of the sun सौर, सौरमानाचा (year); produced by means of the sun सूर्याच्या योगानें -उनानें उत्पन्न केलेला, in comp. सूर्य (salt). —*n.* a garret room माळी *f*, माळा.

SOLDER (*solidus*, firm) कस्तूर *n*, *m*. डाक.—*v.* कस्तूर क., डाक लावणें, झाळणें.

SOLDIER (*solidus*, a piece of money, the pay of a soldier) a man engaged in military service शिपाई, सैनिक; a private in military service शिपाई, 'सोजर'; a brave warrior योद्धा, वीर. -LY *a.* शिपाईगिरीचा, शिपाईगिरीस लायक.—SOLDIERY शिपाई लोक *pl*, लष्कर *n*; irregular s. शिवबंदी *f*.

SOLE*, bottom of the foot तळवा, पायाचा तळवा, तळपाय; bottom of a shoe जोड्याचा तळ; bottom of anything तळ, बूड *n*.—*v.* तळ लावणें -घालणें.

SOLE (*solea*) a fish लेफ *n*, *m*.

SOLE *a.* (*solus*) एकटा -ला; *Law*, single एकटा, सडा, अविवाहित. -LY *ad.* एकटा, एकाकी.

SOLECISM (*Gr. soloikos*, speaking incorrectly) अप्रयोग, अशुद्ध प्रयोग.

SOLEMN *a.* (*solemnis*, that which takes place every year) marked with religious rites and pomps धर्मसंस्कार -विधिपूर्वक; serious गंभीर, भरकूम; filled to awaken serious reflections धाक बसायाजोगा, दराऱ्याचा, इभ्रतीचा, गंभीरपणाचा; *Law*, made in form रीती प्रमाणें केलेला, कायदेशीर, यथाविधि, दस्तुरमाफक. -ITY गंभीरपणा, गांभीर्य *n*; धाक, जरब *f*, इभ्रत *f*; धर्म -देवकार्य *n*, उत्साह; कायदेशीरपणा, यथाशास्त्रता *f*. -IZE *v.* समारंभानें -यथाविधि -यथाशास्त्र क.; उत्साह -समारंभ क. (a feast); गंभीर क., गंभीरपणा आणणें (the mind).

SOLICIT *v.* (*sollicitus*, wholly moved) ask with earnestness विनवणें, विनंती क.; seek मागणें, याचना क. (a favor); invite बोलावणें [of, from]. -ATION विनवणी *f*, विनंती *f*; याचना *f*; बोलावणें *n*, आमंत्रण *n*. -OR मागणारा, याचक, विनवणारा; *Law*, वकील. -OUS *a.* चिंतेचा, काळजीचा, चिंताक्रांत -युक्त [about, for]. -UDE चिंता *f*, काळजी *f*, घोर.

SOLID *a.* (*solidus*) hard घट, अप्रवाही; not hollow भरींव; cubic घन; strong बळकट, खंबीर, कठीण (wall); substantial ऐवज-ऐपतदार (man); impenetrable अभेद्य.—*n.* भरींव वस्तु *f*, घन पदार्थ; *Geom.* घन; contents of a s. घनफल *n*. -ITY घट्टपणा, घनता *f*; भरींवपणा; बळकटपणा, बळकटी *f*; जीव, ऐवज: s. of arguments. -IFY *v.* घट्ट क.—*i.* घट्ट होणें.

SOLILOQUY (*solus*, alone, *loqui*, to speak) आपल्याशीं बोलणें *n*, आत्मभाषण *n*.

SOLITARY *a*. (do.) living alone एकला राहणारा ;—reproachfully एकलकोंड्या ;—of places गैर वळणाचा -राबत्याचा ; gloomy भणभणीत, भयाण, उदास ; single एकच, एकटा (instance).—*n*. एकला राहणारा, वनवासी.

SOLITAIRE *F*. एकट्यानें खेळायाचा एक खेळ आहे.—SOLITUDE एकांतवास, भणभणीतपणा, भणभणाट ; आडरान *n*, अरण्य *n*.

SOLO *It*. एका गळ्यानें -एका वाद्यानें गायाचें गाणें *n* -वाजविणें *n*, एकाकी गीत *n* -स्वर.

SOLSTICE (*sol*, the sun, *sistere* to cause to stand) *Astron*. सूर्याची उत्तर किंवा दक्षिण गति *f*, अयन *n* ; summer s. उत्तरायण *n* ; winter s. दक्षिणायन *n*.

SOLVE *v*. (*solvere*) dissipate द्रवविणें, द्रव क., वितळविणें ; explain उलगडा क., फोडणें (a problem).—SOLUBLE *a*. द्रव करायाजोगा, द्राव्य; द्रव होण्याजोगा, विद्राव्य [in].—SOLUBILITY द्राव्यता *f* ; गलनीयता *f*.—SOLUTION द्रव करणें *n*, द्रावण *n* ; द्रव झाल्यामुळें एकरूप होणें *n* ; पाणी *n*, in comp. वणी : मिठवणी *n* ; उलगडा ;—of a doubt संशयनिवृत्ति *f*, शंकासमाधान *n* ;—of a difficult verse श्लोकलापनिका *f*.—SOLVENCY कर्ज फेडण्याची लायकी *f*.—SOLVENT *a*. द्रवकरणारा, द्रावक ; able to pay all just debts कर्ज फेडण्यास लायक, दार ; sufficient to pay all debts कर्ज फेडण्या पुरता : the estate is s.—*n*. द्रावक रस.

SOMBER, -BRE *a*. (*sub umbra*, under shade) dark काळासावळा ; gloomy उदास, भणभणीत.

SOME* *a*. more or less कांहीं, अल्पस्वल्प (water); more or fewer कोणी, कित्येक : s. two or three persons ; small quantity कांहीं, थोडासा : s. miles away ; certain कित्येक, कोणी : s. men believe one thing, and others another ; a part कांहीं, थोडें, थोडा : we consumed s. of our provisions. -BODY कोणी एक, कोणी तरी. -HOW *ad*. जसें तसें करून, जसातसा, जेमतेम. -THING कांहीं : there is s. in the wind ; कांहीं, किंचित : s. yet of doubt remains.—*ad*. कांहींसा. -TIME *ad*. केव्हांतरी, कधींतरी ; s. or other केव्हां नाहीं केव्हांतरी ; formerly पूर्वी.—*a*. पूर्वीचा.—*pl. ad*. केव्हां केव्हां, कधीं कधीं. -WHAT *ad*. कांहींसा, कांहीं, जरा, जरासा.—*n*. कांहीं, किंचित. -WHERE *ad*. कोठें, कोठेंतरी.

SOMERSAULT, -SET (*supra*, above, *saltus*, a leap) कोल्हाटी *f*, गोलांट *n*.

SOMNAMBULIST (*somnus*, sleep, *ambulare*, to walk) झोंपेंत चालणारा, निद्राचारी.—SOMNAMBULISM झोंपेंत फिरणें -चालणें *n*, निद्राभ्रमण *n*, निद्राचार.

SOMNIFEROUS *a*. (*-ferre*, to bring) झोंप आणणारा, निद्राकारी.

SOMNILOQUIST *a*. and *n*. (*-loqui*, to speak) झोंपेंत बोलणारा, निद्रालापी.

SOMNOLENT *a*. (*somnus*, sleep) झोंपाळू, निद्राळू —SOMNOLENCY निद्राळूपणा ; *Med*., a state intermediate between sleeping and waking जागृतनिद्रा *f*.

SON* (*Skr. sûnu*, from *sû*, to beget) a male child पुत्र, लेंक, मुलगा ; a male descendant पुत्रसंतान *n*, पुत्र, नंदन ; a pupil शिष्य, पुत्र ; a native of some specified place देशीय, पुत्र : *sons* of India ; produce of anything उपज : earth's tall *sons*, the cedar, oak, and pine ; [Jesus Christ, the Savior ;—called the S. of God, and the S. of man : the Father sent the *Son* to be the Savior of the world, 1 John iv. 14].—a legitimate s. औरस ; a s. lawfully adopted दत्त ; s. of a pregnant bride सहोड ;—of one's slave girl शिंदापोरगा. -IN-LAW जांवई, जामात. -LESS *a*. निपुत्र, निपुत्रिक. -SHIP पुत्रपणा, पुत्रत्व *n*.

Song*, that which is sung गाणें *n*, गायन *n*; a ballad गीत *n*; poem कविता *f*, कवन *n*; object of derision तिरस्कारपात्र *n*; a mere trifle कवडीमाल. -ster गाणारा, गवयी; a bird that sings गाणारें पांखरूं *n*, गायक पक्षी. -stress गाणारीण *f*.

Sonnet (*sonus*, sound) लघुकविता *f*, ख्याल, धुपद, टप्पा इ०.

Sonorous *a*. (*sonare*, to sound) वाजणारा, नादाचा, सनाद खणखणीत, वाजता, डोर: metals are s. bodies; loud-sounding डोर, आवाजदार, गंभीर ध्वनिकर (voice).

Soon* *ad*. in a short time थोडक्या वेळानें, थोडक्यांत, लवकर, इतक्यांत; early लवकर; readily खुशीनें, संतोषानें: I would as s. go as stay जसा मी जाईन, &c.

Soot* घेरोंसा, मस *f*, धुरकट *n*.—Sooty *a*. घेरोसा बसलेला, काळा, मळकटलेला.

Soothe* *v*. flatter मठारणें, थापटणें; assuage सांतवणें, उपशमन क.; please खुशी क. [by].—Soothing शांतवन *n*, उपशमन *n*; समजी *f*.

Sop*, anything steeped and softened in any liquid भिजवलेला तुकडा (भाकर इ०); anything given to pacify गूळखोबरें *n*.

Sophism, Sophistry (*Gr. sophos*, wise) [the doctrine or avowed mode of reasoning practised by a sophist]; any fallacy designed to deceive सिद्धांताभास, आभास. —Sophist [one of a class of men who taught eloquence, philosophy, and politics in ancient Greece, and who, by their fallacious but plausible reasoning, puzzled inquirers after truth, weakened the faith of the people, and drew upon themselves general hatred and contempt]; a fallacious reasoner सिद्धांताभासवादी, आभासवादी.

Soporific *a*. (*soper*, a heavy sleep, *facere*, to make) झोंप आणणारा, निद्राकारी.

Sorcerer (*sors*, *sortis*, a lot) जादूगीर -वाला, चेटकी. -ess जादुगिरीण *f*.—Sorcery जादू *f*, बीरमंत्र, चेटक *n*.

Sordes (*L*.) मळ, कीट.—Sordid *a*. base नीच, हलका, अधम; covetous कृपण, किरटा; कद्रु.

Sore* *a*. painful दुखापत झालेला, दुखरा; tender, as the mind मनांत दुखवलेला, वरमलेला; severe भारी, कठीण, जालीम.—*n*. an ulcer क्षत *n*, व्रण, खवंद *n*; a place in an animal body where the skin and flesh are ruptured or bruised, so as to be tender or painful दुखापत झालेली जागा *f*, दुःख *n*; grief दुःख *n*. -ly *ad*. फार, अतिशय, भारी. -ness भारीपणा, कठीणपणा, दुखरेपणा.

Sorrel* चुका, चुक्याची भाजी *f*.—*a*. *F*. तेल्याबोरे, कुमाईत (horse).

Sorrow* खेद, दुःख *n*, शोक [for, at]—*v*. *i*. दुःख -खेद क. -वाटणें. -ful *a*. दुःखी, दिलगीर, खेदयुक्त; producing sorrow दुःखाचा, दुःखदायक -प्रद (accident); expressing grief दुःखसूचक -दर्शक.—Sorry *a*. दुःखी, खिन्न, कष्टी, श्रमी; melancholy उदास, भणभणीत; poor किलवाणा, नाकारा (excuse, grain); to be s. दुःख वाटणें; पश्चात्ताप होणें; s. article नासकें केणें *n*, दमडीच्या मोलाचा.

Sort (*sors*, *sortis*, a lot) a kind जात *f*; manner रीत *f*, तऱ्हा *f*; degree of any quality प्रत *f*; pair जोड; *pl*. [*Print*. letters, points, marks, &c., that are either deficient or redundant in quantity].—*v*. प्रत लावणें; निवडणें, वेचणें; conjoin जोडणें, रचणें [out, with].—*i*. जमणें, जुळणें; have success सिद्धीस जाणें, यश येणें.

Sot* दारूबाज, कैफी, अमली, छाकटा.

Soul*, the spiritual, rational, immortal

part in man आत्मा, जीव, प्राण seat of real life or vitality जीव, चैतन्य *n*; energy जीव, तेज *n*, हिय्या, पाणी *n*; the leader पुढारी, प्रमुख; a human being जीव, मनुष्य; a disembodied spirit विदेही आत्मा; knowledge of s. आत्मज्ञान *n*; the whole s. सर्वात्मा, सर्वभाव, जीवभाव.

SOUND* *a.* entire धड, अव्यंग, निकोप, अभंग, साबीत; healthy निरोगी, धडाखडा; firm बळकट, खबरदार, मजबूत; founded in truth बरोबर, समर्पक, सयुक्तिक, न्यायाचा (argument, reasoning); heavy भारी, जबर (strokes, beating); fast गाढ, गरद, भारी (sleep); founded in right and law यथान्याय, रास्त (justice); without blemish निर्दोष, निखोड, बिनचूक (words); orthodox खऱ्या मार्गाचा, सत्पथवर्त्ती, यथाशास्त्र. -LY *ad.* मनापासून; गाढ, गरद; रगडून, कचकावून. -NESS निरोगीपणा; मजबुती *f*, साबुती *f*; सत्पथ; सत्पथानुसरण *n*; जीव, बळकटी *f*, ऐवज; गाढपणा, निबिडपणा, निबिडता *f*; निखोडपणा, निर्दोषत्व *n*.

SOUND*, the air-bladder of a fish भोत *n*.

SOUND*, the cuttle-fish समुद्रफेण.

SOUND* उथळ -अरुंद सामुद्रधुनी *f*.—*v.* तळ -पाणी मोजणें; test मन पाहणें, पुसून -खडा टाकून पाहणें.—*i.* गळानें -गळ टाकून तळ पाहणें.

SOUND (*sonus*, noise) नाद, आवाज, ध्वनि, शब्द; empty noise पोकळ आवाज; deep s. गंभीरनाद; prolonged s. दीर्घनाद; confused s. कलकल *f*, कलकलाट.—*v. i.* आवाज होणें, वाजणें; ध्वनि क.; be conveyed in sound गाजणें, वाजणें (1 Thes. i. 8).—*t.* वाजवणें, आवाज काढणें; utter audibly ऐकूं येईसें बोलणें (a note); order by sound आवाज करून (तुतारी -करणा वगैरे वाजवून) हुकूम देणें (a retreat); celebrate by sounds गाजविणें, डंका वाजविणें (one's name or deeds). -ING *a.* वाजवणारा, सनाद.

BOARD [a board or structure with a flat surface, suspended behind or over a pulpit to give distinctness and effect to a speaker's voice].

SOUP *F.* मास वगैरेचा रसा, 'सूप' *n*, सूप *n* (*Sanskr.*)

SOUR* *a.* acid अंबट; rancid खवट, खवचट peevish दाष्ट, खटयाळ, तुसडा; expressing discontent हिमटा, हिमट.—*v.* अंबट क.; खट्टु क.—*v. i.* अंबट होणें (the teeth or palate); अंबणें, खट्टु होणें.

SOURCE (*surgere*, to spring up) उगम, उद्भव, मूल *n*, झरा, खाण *f*, आगर *f*, घर *n*; a spring झरा.

SOUSE *v. F.* डुबकन डुबविणें [in].—*i.* झडप घालणें.

SOUTH* दक्षिण दिशा *f*, दक्षिण *f*; दक्षिणे कडचा देश, दक्षिण *f*.—*a.* दक्षिण दिशेचा, दक्षिणे कडचा, दक्षिण.—*v. i.* दक्षिणेकडे फिरणें -जाणें; पूर्वेपासून किंवा पश्चिमेपासून दक्षिणेकडे फिरणें, दक्षिणायन होणें; to come to the meridian मध्यान्हीस येणें;—said chiefly of the moon.—*ad.* दक्षिणेकडे, दक्षिणाभिमुख. -EAST आग्नेयी *f*, आग्नेयी दिशा *f*. -EASTERLY, EASTERN *a.* आग्नेयी दिशेचा -कडचा- -ERLINESS दक्षिणाभिमुखता *f*. -ERLY, -ERN *a.* दक्षिणेचा; दक्षिणेकडचा; दक्षिणेकडून येणारा. -ERNLY *ad.* दक्षिणेकडे. -ERNMOST *a.* फार दूर, दक्षिणेकडचा. -ERNWOOD दवणा. -WARD *ad.* दक्षिणेकडे. -WEST नैर्ऋति *f*.—*a.* नैर्ऋतीचा.

SOVEREIGN *a.* (*super*, above) chief मुख्य, प्रधान, सर, श्रेष्ठ; utmost पराकाष्ठेचा, महा, परम (influence).—*n.* प्रभु राजा किंवा राणी *f*; दाहा रुपयांच्या किमतीचें सोन्याचें नाणें आहे. -TY मुख्य सत्ता *f* -अधिकार.

SOW* (*Skr. sukar*) डुकरीण *f*.

SOW* *v.* scatter, as seed, upon the earth पेरणें; spread abroad पेरणें, फैलावणें; besprinkle शिंपडणें. -ER पेरणारा.

SPACE (*spatium*, room) जागा *f*; interval अंतर *n*, अवकाश; quantity of time मुद्दत *f*, कालावधि, कालमर्यादा *f*, अवधि *mf*; distance between lines ओळीच्या मधलें अंतर *n*, 'इस्पेस.'—SPACIOUS *a*. ऐसपैस, अघळपघळ; पसरट, अफाट, लांबरुंद (plain).

SPADE* खोरें *n*, कुदळ *f*.

SPAN*, the space from the end of the thumb to the end of the little finger when extended वीत *f*; brief portion of time अल्पकाल.—*v*. वितीनें मोजणें [round].

SPANCEL *Ger*. a rope to tie a cow's hind legs भाला *f*.

SPANGLE *Ger*. चमकी *f*, टिकली *f*.—*v*. चमक्या -टिकल्या लावणें -जडणें [with].

SPANIEL *F*. शिकारी कुत्रा.

SPANISH *a*. स्पेन देशांतला.—*n*. स्पेन देशांतील लोकांची भाषा *f*.

SPAR *D*. सोट, सोटा; बडगा; वासा इ०.

SPAR*—calcarious सफेद सुरमा; crystalized mineral बिलोर *n*.

SPAR* *v. i*. fight with prelusive strokes हातफळी खेळणें -चालणें; dispute भांडणें, वाद क. [with, at].

SPARE* *v*. use frugally हात राखून -आवरून खर्चणें -खर्च क.; part with reluctantly नाखुशीनें देणें -सोडणें; dispense with देणें; forbear सोडणें, माफ क.; treat tenderly दयेनें वागविणें; save राखणें, रक्षण क. [from].—*a*. scanty थोडा, अपुरा; superfluous फालतु, अत्रब, शिलकीचा; lean रोडका, कृश (men).—SPARING *a*. हात राखून खर्च करणारा, काटकसऱ्या; थोडा, in comp. अल्प, मित (diet); कांहीं, थोडा.

SPARK*, small particle of fire ठिणगी *f*, ठिंगळी *f*; a sparkle चमकी *f*; gay man नट, नटवा, छानछोक; lover सोयरा, यार; a small portion कण, लेश.—SPARKLE *v. i*. ठिणग्या निघणें; झगझगणें, लखलखणें, चमकणें [with].—*n*. चमकी *f*.—SPARKLING *a*. झकझकीत, लखलखीत.

SPARROW* चिमणा, चिमणी *f*.

SPASM (*Gr. spaein*, to draw) पेटका, गोळा, बेडकी *f*, वळ. -ODIC *a*. बेडक्यांचा, गोळ्यांचा.

SPATTER *v*. (See SPIT) sprinkle शिंपडणें; defame कलंक लावणें [about].

SPAVIN *F*. घोड्याच्या पायावरचें वारूळ *n*.

SPAN* मांशाचीं अंडीं *n pl*; अंडीं घालणें -टाकणें *n*.

SPAR *D*. a long beam कडी *f*, खांड *n*, सर; *Naut*. डोलकाठी *f*, वगैरे.

SPEAK* *v. i*. express thoughts by words बोलणें, ह्मणणें, उच्चारणें; express opinions मत दर्शविणें, बोलणें; dispute बोलणें, वाद क., भांडणें; utter thoughts in a public assembly सभेंत बोलणें; make mention सांगणें, उल्लेख काढणें; sound नाद क., वाजवणें: make all your trumpets s.; with बोलणें, संभाषण क.; to s. quickly चुरचुर बोलणें.—*t*. बोलणें, तोंडावाटें काढणें, उच्चारणें; celebrate प्रसिद्ध क., गाजविणें (deeds); converse in बोलणें: to s. Latin; address बोलणें: he will s. thee fair; exhibit दाखविणें: let heavens wide circuit s. the Maker's high magnificence; express silently or by signs खुणांनीं दाखविणें, खुणावणें; communicate देणें, बोलणें: to s. peace to the troubled soul [to, of, about]. -ER बोलणारा; वक्ता; one who is the mouthpiece of others दुसऱ्याच्या वाटचा बोलणारा, मुख *n*. -ING बोलणें *n*.—SPEECH वाणी *f*, वाचा *f*; language भाषा *f*, बोली *f*; harangue अलंकारिक भाषण *n*, सभापांडित्य *n*; cleverness of s. वाग्चातुर्य *n*; elegance of s. शब्दलालित्य *n*; covert s. व्याजोक्ति *f*; bad s. दुरुक्ति *f*, दुर्भाषण *n*;

goddess of s. सरस्वति *f*, वाग्देवी *f*; part of s. *Gram.* शब्द. -LESS *a.* मुका, मोना, वाचाहीन; silent कुंठित, निरुत्तर.

SPEAR*, lance भाला, बरची *f*, शूल; spire सुळक्याचें शिखर *n.*—*v.* भाला मारणें -भोसकणें [with].—*i.* सुळक्या प्रमाणें वर येणें. कोंब फुटणें. -HEAD भाल्याची फाळ *f.* -MAN भालेकरी, शूलपाणी. -STAFF भालकाठी *f.*

SPECIAL *a.* (*species*, kind) जातीचा, प्रकारचा; particular विशेष, असाधारण; designed for a particular purpose मुद्दामचा, मुजरतचा, विशेष (an act of Parliament); limited मर्यादित, विशेष कारणाचा -विषयाचा (dictionary); chief in excellence उत्कृष्ट, लोकोत्तर. -LY *ad.* विशेषेंकरून, मुद्दाम, मुजरत. -ITY जातीयता *f*, जातित्व *n*; विशेषता *f*. असाधारणत्व *n*.—SPECIES जात *f*, प्रकार.—SPECIE सोनेंनाणें *n*, नगदी ऐवज.—SPECIFY *v.* तपशीलवार सांगणें -बोलणें -लिहिणें, प्रदर्शित क. —SPECIFIC *a.* विशेष, असाधारण; विशेष जातीचा; *Med.* हुकमी, हटकून -अवश्य गुण करणारा, अचूक; a s. medicine रामबाण; s. gravity विशेष गुरुत्व *n.*—*n.* उत्तम -हटकून गुण आणणारें औषध *n.*—SPECIMEN (*specere*, to look) मासला, नमुना, बानगी *f.*—SPECIOUS *a.* showy देखणाऊ, दर्शनी; plausible देखणाऊ, वरपंकी, वरघडीचा, सत्याभासाचा; s. argument लाघवी भाषण *n.*

SPECK*, spot ठिपका, डाग; very small thing कण;—in the eye फूल *n.*—SPECKLE *v.* ठिपका -डाग पडणें [with]. -LED *a.* ठिपकेदार, चित्रविचित्र.

SPECTACLE (*specere*, to behold) show तमाशा, खेळ, चमत्कार; *pl.* glasses to assist the sight उपनेत्र *n*, चश्मा; a sight पाहण्याचा पदार्थ, दृष्टिविषय.—SPECTATOR मौज पाहणारा, तमासगीर; beholder पाहणारा, द्रष्टा. —SPECTRE भूत *n*, प्रेत *n*, छाया *f*.—SPECTRUM *L.* दृश्यवस्तु *f*; [*Opt.*, the several colored and other rays of which light is composed, separated by the refraction of a prism or other means, and exhibited either as spread out on a screen or by direct vision].

STUB* खुंट *n*, खोड *n*. -BY *a.* आडव्या आगाचा, गिड्डा, चेंडू; टिल्लू.

STUBBLE *D.* गहूं वगैरे धान्याचा सड.

STUBBORN* *a.* refractory अडेल, हट्टी, दुराग्रही; stiff ताठ; persevering धिराचा, निश्चयाचा. -NESS हट्ट, दुराग्रह.

STUCCO *It.* चुन्याचा गिलावा, संदला.

STUD*, ornamental nail चमकी *f*, गुलमेख *f*; ornamental knob गुलमेख *f*.—*v.* चमक्या -गुलमेखा जडणें, जडित क.

STUD* घोड्यांची पागा *f*.

STUDY (*studere*) application of mind to books and learning विद्याभ्यास, व्यासंग,

अभ्यास; meditation मनन *n*, विचार, चिंतन *n*; contrivance युक्ति *f*, तजवीज *f*, उपाय; any particular branch of learning that is studied शिकण्याचा -अभ्यासाचा -अध्ययन विषय; apartment devoted to study शिकण्याची खोली *f*; [*Fine Arts*, a work undertaken for improvement in the art, and often left incomplete].—*v. i.* शिकणें, अभ्यास क.; विचार -मनन क.; be zealous झटणें, तिडकेनें क.—*t.* शिकणें, अध्ययन क.; विचार क.; arrange by previous thought पूर्वी विचार -तजवीज करून ठेवणें; commit to memory पाठ क.—STUDENT शिकणारा, विद्यार्थी.—STUDIED *a.* शिक्षित, अभ्यासित; पढीक, विद्वान; पूर्वयोजित -रचित. —STUDIOUS *a.* अभ्यासी, व्यासंगी, उद्योगी; विद्याभ्यासी, विद्याव्यसनी. -NESS विद्याव्यासंग; उद्योग, व्यासंग, व्यवसाय.

STUFF *Ger.* cloth कापड *n*; material वस्तु *f*, द्रव्य *n*; essence तत्व *n*; nonsense भलतेंच, बडबड *f*; worthless matter ऐलपैल *n*, इळाखिळा; medicine औषध *n*.—*v.* crowd दाटी क., कोंदणें; fill full ठासून भरणें; obstruct कोंदणें, बंद क., बुजवणें; fill the skin of, for the purpose of preserving as a specimen गवत -मसाला वगैरे भरून ठेवणें.—*i.* कचकावून -रगडून -दपटून जेवणें. -ING पुरण *n*, भरण *n*; seasoning for meat पुरण *n*, मसाला.

STUMBLE *v. i. Ger.* trip in walking अडखळणें, ठेंचळणें; err चुकणें, घसरणें; light on by chance अवचित सांपडणें -मिळणें -भेटणें [about, down].—*t.* अडखळवणें, ठोकर खायास लावणें; confound गोंधळविणें, घोटाळ्यांत पाडणें.—*n.* ठेंच *f*, ठोकर *f*.—STUMBLING-BLOCK, -STONE अटकाव, अडखळण *n*.

STUMP *D.* stub खुंट *n*, खोड *n*;—of a limb थोट *n*, बोटूक *n*.—*v.* lop तोडणें, छाटणें.—*i.* दणदण चालणें.—STUMPY *a.* गिड्डा, ठेंगू; थोंटा, लांडा.

STUN* *v.* make senseless by a blow ठोक्यानें मूर्च्छित -बेसावध क.; overpower the sense of hearing -च्या कानठळ्या बसविणें; surprise completely चकित -दंग क. [with, by, at].

STUNT* *v.* वाढ खुंटवणें, खुरट क. [in].—*n.* खुरट -खुजेपणा; खुरट जनावर *n*, खुजा.

STUPID *a.* (*stupidus*) very dull जड, मंद, मूर्ख; heavy गुंग, सुस्त, धुंद; formed without skill ढोबळा, ठोंसर (things). -ITY जडपणा, मंदबुद्धि *f*, बेकुबी *f*; गुंगी *f*, धुंदी *f*, सुस्ती *f*;—STUPEFY *v.* जड -मंद -गुंग क.; गुंगी आणणें [by, with].—STUPEFACTION धुंदी *f*, गुंगी *f*, भूल *f*.— STUPEFACIENT *a.* गुंगी आणणारा.—*n. Med.* गुंगी आणणारें औषध *n*.—STUPENDOUS *a.* चकभूल करणारा, आश्चर्यकारक; of astonishing magnitude मोठा, महान्, अचाट, अवाढव्य.—STUPOR (*L.*) गुंगी *f*, धुंदी *f*; जडबुद्धि *f*, जाड्य *n*, बेकुबी *f*.

STURDY *a. F.* obstinate हट्टी, दुराग्रही, हेकड; violent जोराचा, बळकट (stroke); strong घटमूट, धटिंगण, दांडगा (lout); stout बळकट, दांडगा (tree).

STUTTER *v. i. Ger.* तोत्रें बोलणें [in].

STY* डुकरखाना -वाडा -वाडी *f*.—*v.* डुकरखान्यांत कोंडणें.

STY* रांजणवाडी *f*, आंजुरली *f*.

STYLE (*stylus*) mode of expressing thought in language, whether oral or written वाणी *f*, धाटी *f*, धरती *f*, लबक *f*, ढब *f*; fashion रीत *f*, चाल *f*, मोळा; title किताब, प्रतिष्ठा *f*, नांव *n*; mode of presentation, esp. in music or any of the fine arts कवितेची -गाण्याची सरणी *f* -थाकी *f*; —of a dial शंकु;—of a flower बोंड *n*, पोगी *f*;—for writing लेखणी *f*; pointed iron

सळई *f*, शलाका *f*.—*v*. ह्मणणें, नांव -किताब देणें.—STYLISH *a*. छानदार, विराजित.

STYPTIC *a*. (*stypticus*) रक्त बंद करणारा, रक्तावरोधी.—*n*. *Med*. रक्त बंद करणारें औषध *n*.

STYRAX (*L*.)—liquid शिलारस.

SUAVITY (*suavis*, sweet; *Skr*. *svâdu*) गोडी *f*, गुलाबी *f*, मधुरता *f*, माधुर्य *n*.

SUBACID *a*. (*sub* & *acid*) अंबटगोड, मधुराम्ल.—*n*. मधुराम्ल पदार्थ.

SUBALTERN (*sub*, under, *alternus*, one after another) हाताखालचा मनुष्य किंवा कामदार.

SUBAQUEOUS *a*. (*-aqua*, water) पाण्याखालचा; *Geol*., formed under water पाण्याखालीं झालेला -जमलेला (deposits).

SUBDIVIDE *v*. पोटभाग क., लहान लहान भाग क. [into].—SUBDIVISION वांटणीची वांटणी *f*, पोट वांटणी *f*, अंशांश.

SUBDUE *v*. (*ducere*, to lead) bring under जिंकणें, ताब्यांत आणणें, वश क., हस्तगत क. (enemies); overcome जिंकणें, मोडणें (opposition); tame वळवणें, वठणीस आणणें; soften हलका -नरम क. (ferocity); break, as land लागवडीस आणणें, बेनणें [by].

SUBJACENT *a*. (*-jacere*, to lie) खालचा, अधोवर्त्ती; being in a lower situation, though not directly beneath खालचा.

SUBJECT *a*. (do.) placed under खालचा; placed under the rule of हुकमी, खालचा, अधीन; liable जोगा, अधीन, वश: a country s. to extreme heat; to be s. unto -च्या आज्ञेंत -हुकमांत -स्वाधीन असणें.—*n*. one who lives under the dominion of another प्रजा *f*, रयत *f*, दुसऱ्याच्या अधिकारांतला -राज्यांतला मनुष्य -ताबेदार; that on which any operation is performed पात्र *n*, अधिष्ठान *n*; *Gram*.—of a verb कर्त्ता;—of a proposition साध्य *n*;—of a predicate अनुवाद्य *n*; topic विषय, प्रकरण *n*, अर्थ; the mind मन *n*: thinking s.; [dead body for the purposes of dissection].—*v*. खालीं -अमलांत आणणें; जिंकणें, वश क.; स्वाधीन -पात्र -योग्य क.; make subservient कामास -उपयोगास लावणें; cause to undergo भोगायास -सोसायास लावणें [to]. -ION ताबेदारी *f*, पारतंत्र्य *n*, अधीनता *f*; योग्यता *f*, वशता *f*. -IVE *a*. विषयसंबंधी; मनासंबंधी, मनाचा; अधिकरणसंबंधी. -MATTER विषय, प्रस्ताव.

SUBJOIN *v*. खालीं जोडणें, दुमाल्यास लावणें.—SUBJUNCTIVE *a*. खालीं जोडलेला -लिहिलेला; *Gram*. संशयार्थ (mood).

SUBJUGATE *v*. (*-jugum*, a yoke) जिंकणें, वश क.

SUBLET *v*. पोट भाड्यानें देणें [to].

SUBLIMATE (*sublimis*, high)—white रसकापूर.—SUBLIMATION फूल काढणें *n*.

SUBLIME *a*. (do.) उंच; grand उंच, प्रौढ, उमदा, नामी; elate अत्यानंदित, आल्हादित.—SUBLIMITY उंची *f*, थोरवी *f*, थोरी *f*;—of place उंची *f*;—of nature प्रौढी *f*, पोक्तपणा, भरकुमी *f*, उमदेपणा;—of language भाषणाची प्रौढी *f*;—of feeling consisting of a union of astonishment and awe at the contemplation of great scenes and objects वचक *f*, दरारा, भय *n*, इबरत *f*.

SUBLUNAR, -RY *a*. चंद्राखालचा; pertaining to this world इहलोकचा, ऐहिक, प्रापंचिक.

SUBMARINE *a*. समुद्रांतला.

SUBMAXILLARY *a*. (*-maxilla*, jaw-bone) glands लालोत्पादक पिंड *pl*.

SUBMERGE *v*. (*mergere*, to plunge) बुडवणें, मज्जन क.—*i*. बुडणें.—SUBMERSION बुडवणें *n*, मज्जन *n*.

SUBMIT *v*. (*mittere*, to send) yield वश असणें, आज्ञेंत राहणें -वागणें, मान्य होणें; refer दुसऱ्यावर सोपणें -घालणें -ठेवणें: to s. a question to the court.—*i*. दबणें, वश होणें, हार

येणें; आज्ञेंत -हुकमांत राहणें [to].—SUBMISSION वश होणें *n*, शरण जाणें *n*; ताबेदारी *f*, अधीनता *f*, आज्ञांकितपणा; confession of error अपराध कबूल क. -चदरी घेणें.—SUBMISSIVE *a*. हुकूमबंदा, हुकमी, आज्ञांकित, विनयी.

SUBORDINATE *a*. (*ordinare*, to arrange) खालचे प.यरीचा, खालचा; गौण, अप्रधान.—SUBORDINATION खालची पायरी *f*; गौणता *f*, अप्रधानता *f*.

SUBORN (*-ornare*, to furnish) cause to take a false oath खोटी शपथ घ्यायास लावणें, पैसा देऊन बघवणें; procure by indirect means वांकड्या मार्गानें मिळवणें.

SUBPŒNA (*-pœna*, punishment) *Law* कोर्ताचें साक्षीसमन *n*.

SUBSCRIBE *v*. (*-scribere*, to write) write underneath खालीं लिहिणें; sign with one's own hand स्वहस्तूची सही क., सही क. -घालणें; attest by writing one's name beneath सही घालणें: clerks s. copies of records; promise to give, by writing one's name सही घालून देणें -कबूल क., वर्गणीदार होणें;—a sum of money पट्टीवर लिहिणें, वर्गणी घालणें [for, to].—*i*. कबूल -मान्य होणें; पुस्तक, वर्तमानपत्र इ० चा -ला वर्गणीदार होणें.—SUBSCRIBER सही करणारा; पट्टीवर लिहिणारा, वर्गणीदार.—SUBSCRIPTION सही करणें *n*; सही *f*, हस्ताक्षर *n*, स्वहस्तूर; वर्गणी *f*, पट्टी *f*, टीप *f*.

SUBSEQUENT *a*. (*-sequi*, to follow) मागून झालेला, मागचा, नंतरचा; मागून होणारा [to].—SUBSEQUENCE अनुगमन *n*, मागून येणें *n*.

SUBSERVE *v*. उपयोगास -कामास पडणें.—SUBSERVIENT *a*. उपयोगी, उपयुक्त [to].

SUBSIDE *v*. (*-sidere*, to settle) बसणें, खालीं जाणें, थिरावणें; become tranquil शांत होणें, उतार होणें;—as a swelling ओसरणें, उतरणें, जिरणें [to, into].—SUBSIDENCY बसणें, *n*, थिरावणें *n*, उतार, उपशमन *n*; ओसरी उतरणें *n*.—SUBSIDIARY *a*. कुमकेचा, सहकारी [to].—SUBSIDY कुमक *f*, पुरावा; aid in money पैक्याची कुमक *f*.

SUBSIST *v*. *i*. (*sistere*, to stand) असणें; continue राहणें, चालणें; be maintained with food and clothing निर्वाह गुजारा चालणें; वाचणें, जगणें [on, upon].—*t*. सामग्री पुरवणें; अन्नाचा पुरावा क., खायास घालणें. -ENCE अस्तित्व *n*, असणें *n*; उपजीविका *f*, निर्वाह, गुजारा.

SUBSTANCE (do.) real or existing essence पदार्थ, वस्तु *f*, द्रव्य *n*; essential import तत्त्व *n*, तत्त्वार्थ; matter वस्तु *f*, द्रव्य *n*, मूर्त्ति *f*; estate ऐवज, ऐपत *f*, संपत्ति *f*; *Theol.*, the divine essence ईश्वरी तत्त्व *n*.—SUBSTANTIAL *a*. वास्तविक, खरा (good); ऐपतदार, गबरू, खंबीर (free-holder); stout ऐवजदार, घसमर, दलदपट, घट्ट, ठोंसर (cloth); मूर्त्तिमंत, मूर्त (agent). -LY *ad*. तत्त्वतः, वस्तुतः, खरोखर.—SUBSTANTIATE *v*. प्रतिपादणें, पुरावून -खरा करून देणें [by].—SUBSTANTIVE *a*. विशेष द्रव्यवाचक (verb).—*n*. नाम *n*, नांव *n*, विशेष्य *n*.

SUBSTITUTE *v*. (*-statuere*, to put) बदली देणें, -ठेवणें.—*n*. बदल्या, वांटचा, बदली [for].—SUBSTITUTION बदल -मोबदला देणें *n*; बदली *f*; [*Theol.*, the doctrine that Christ suffered vicariously, being substituted, as it were, for the sinner, and that his sufferings were expiatory]. -AL, -ARY *a*. बदलीचा.

SUBSTRATUM (*-sternere*, to strew) खालचा -तळचा थर; *Agric.*, the subsoil खालची माती *f*.—*Metaph.*, basis अधिकरण *n*, आधार.

SUBTERFUGE (*-fugere*, to flee) सोडवण *n*, फट *f*, खिडकी *f*.

SUBTERRANEAN, -EOUS *a.* (*-terra,* earth) जमिनींतला, भुईतला; s. passage तळवाट *f,* सुरुंग; a s. cavity भुंयार *n.*

SUBTILE *a.* (*-tela,* a web) thin बारीक, सूक्ष्म (air); delicate नाजूक, बारीक, तलम (line); acute तीक्ष्ण, तीव्र (pain); discerning सूक्ष्म -कुशाग्रबुद्धि; cunning धूर्त्त, चतुर, कावेबाज.—SUBTILITY बारीकपणा, बारकाई *f,* सूक्ष्मता *f*; कुशाग्रबुद्धि *f*; नाजकाई *f,* बारकाई *f*; धूर्त्तता *f,* कावेबाजी *f.*—SUBTLE *a.* शहाणा, चतुर, कुशळ; कावेबाज, धूर्त्त.

SUBTRACT *v.* (*-trahere,* to draw) काढणें, घेणें; deduct बाद -वजा क. [from]. -ION काढून घेणें *n*; *Math.* वजाबाकी *f.*

SUBURB (*-urbs,* a city) शहरा बाहेरची वाडी *f,* शिवार *n,* शहरपन्हा, वाडी *f,* उपनगर *n* [of, to].

SUBVERT *v.* (*-vertere,* to turn) पाडणें, मोडणें, लयास नेणें; corrupt बिघडणें, भ्रष्ट क. [by]. —SUBVERSION नाश, मोड, विध्वंस, लय. —SUBVERSIVE *a.* नाश -ध्वंसकारक.

SUCCEED *v.* (*-cedere,* to go) take the place of जागीं-स्थानीं-ठिकाणीं येणें, जागा घेणें; follow in order मागें -क्रमानें येणें; come after नंतर-पुढें येणें [in, at].—*i.* जागीं-ठिकाणीं येणें; ascend the throne after the removal or death of the occupant -च्या मागून गादीवर बसणें; obtain the object desired यश -जय मिळविणें, साधणें, फलप्राप्ति होणें, लाभणें, मनोरथ सिद्धीस जाणें; be acceptable मान्य -पसंत होणें.—SUCCEDANEUM (*L.*) बदली, वांटचा, बदल्या, अनुकल्प.—SUCCESS सिद्धि *f,* यश *n,* बरकत *f*; जय, फते *f,* सिद्धि *f.* -FUL *a.* शेवटास गेलेला, सफळ (affairs); विजयी, यशस्वी, कृतार्थ (person). -ION अनुक्रम, परंपरा *f,* क्रम; series हार *f,* माळका *f,* परंपरा *f*: s. of kings, events; lineage वंशावळी *f*; power or right to enter upon the office, rank, position, &c., held by another उत्तराधिकार, दायाधिकार. -AL *a.* पारंपरिक. -IVE *a.* लागोपाठचा, पाठोपाठचा. -IVELY *ad.* एकामागें एक, अनुक्रमानें. -OR स्थानीं -जागीं झालेला -आलेला; उत्तराधिकारी.

SUCCINT *a.* (*-cingere,* to gird) संक्षिप्त, थोडक्यांत आणलेला. -LY *a.* थोडक्यांत, संक्षेपानें.

SUCCOR *v.* (*-currere,* to run) मदतीस धांवण, मदत क., हात देणें.—*n.* मदत *f,* सहाय *n.*

SUCCULENT *a.* (*sugere,* to suck) रसरसीत, रसभरित, कसदार.—SUCCULENCE रसाळपणा.

SUCCUMB *v. i.* (*-cubare,* to lie down) दबणें, वांकणें [to].

SUCH* *a.* of that kind तसा, तसला; of this kind असा, असला; certain अमका, फलाणा.

SUCK* *v.* draw in with the mouth चोखणें; draw milk from, with the mouth स्तनपान क., लुंचणें, दूध पिणें; swallow up गिळणें, गरक क.; in शोषणें, शोषण क.; out चोखून रिकामा क.; up शोषणें.—*i.* स्तनपान क.; शोषणें इ०.—*n.* चोखणें *n,* चोषण *n*; थानचें दूध *n.* —SUCKLE *v.* दूध -थान पाजणें.—SUCKLING तान्हा, थानचा, अर्भक *n, m.*—SUCTION चोखणें *n,* चोषण *n.*

SUDDEN* *a.* happening without previous notice एकाएकींचा, आकस्मिक; hastily prepared घाईनें तयार केलेला, घाईचा; quick जलद, त्वरित.—*n.* अकस्मात झालेली गोष्ट *f*; on s. एकाएकीं, अकस्मात. -LY *ad.* एकाएकीं, अकस्मात.

SUDORIFIC (*-sudare,* to sweat) घाम आणण्याचें औषध *n.*—*a.* स्वेदोत्पादक, घाम आणणारा.

SUDS* *pl.* साबणाचें पाणी *n.*

SUE* *v. i.* entreat विनंती क.; prosecute फिर्याद क. [to, for, at].—SUIT, endeavor यत्न, प्रयत्न; courtship लग्नार्थ स्त्रीची आराधना *f,* -चे आर्जव *pl*; process at law खटला, मुकदमा, वाद; company of attendants परि-

वार, इतमाम, जिलीब *f*; set जोड, रंग, 'सूट' *n*;—of cloth जोड;—of cards बाजू *f*, रंग; to bring s. फिर्याद क., खटला चालविणें; original s. असल मुकदमा [to, for]. —*v.* fit साजणें, मिळणें, जमणें, बसणें; please मर्जीस उतरणें, उतरणें, पटणें, पसंत असणें; become शोभणें, साजणें.—*i.* जम -जवा बसणें, जुगणें, मिळणें. -ABLE *a.* लायक, योग्य [for, to]. -NESS योग्यता *f*, लायकी *f*; जम, जुवा. -OR विनंती करणारा; अर्जदार, फिर्यादी; लमासाठीं मागणी घालणारा -मागणारा.—SUITE स्वारी *f*, जिलीब *f*; series हार *f*, कतार *f*, माळका *f*: s. of rooms.

SUET (*sebum*) गुर्दावरची चरबी *f*.—SUETY *a.* चरबीचा; चरबी सारखा.

SUFFER *v.* (*-ferrere*, to bear) feel or endure with pain, annoyance, and the like दुःख -त्रास सोसणें -भोगणें; sustain सोसणें, टिकणें, निभावणें; be affected by सोसणें, खाणें, बसणें (damages); permit परवानगी देणें, जाऊं -होऊं देणें (Lev. xix. 17) [for, by, from, in].—*i.* दुःख -त्रास -क्लेश भोगणें; undergo punishment शिक्षा भोगणें; नुकसान -तोटा होणें;—a limb or member दुखवणें. -ABLE *a.* सोसायाजोगा, सहनीय. -ANCE सोसणें *n*, कंठणें *n*, भोग; patience सहनता *f*, सोसणूक *f*, क्षमा *f*; परवानगी *f*, अप्रतिबंध, कानाडोळा; misery दुःख *n*, कष्ट; bearing of pain दुःख भोगणें *n* -कंठणें *n*, भोग. -ER दुःख भोगणारा, दुःखी, कष्टी, श्रमी; सोसणारा, भोगणारा; होऊं देणारा, सहन करणारा इ०. -ING दुःख *n*, क्लेश, व्यथा *f*; दुःखानुभव, दुःखभोग.—*a.* दुःखी, दुःख भोगणारा.

SUFFICE *v. i.* (*-facere*, to make) पुरणें, पुरे होणें.—*t.* पुरे -तृप्त क. [for].—SUFFICIENCY पुरेपणा, पर्याप्ति *f*, पुरवठा; ability शक्ति *f*, योग्यता *f*, लायकी *f*; competence निर्वाहा पुरतें -त्यागभोगा पुरतें धन *n*; ample stock सामग्री *f*, बेगमी *f*; conceit अहंता *f*, मीपणा. —SUFFICIENT *a.* पुरा, पुरेसा, पर्याप्त; योग्य, लायक; amply s. पुष्कळ, विपुल [for]. -LY *ad.* पुरे, बस, पुरा.

SUFFOCATE *v.* (*faux, faucis*, the throat) श्वास -दम कोंडणें किंवा कोंडून मारणें; extinguish विझवणें (fire) [by, with].—SUFFOCATION दम कोंडणें *n*; कोंडमारा, श्वासावरोध.

SUFFRAGE (*suffragium*, vote) सम्मति *f*, अनुमति *f*.—SUFFRAGAN *a.* सहायकारी: a s. bishop.—*n.* सहायकारी बिशप.

SUFFUSE *v.* (*-fundere*, to pour) व्यापणें, भरणें. —SUFFUSION व्याप्ति *f*, व्यापणें *n*.

SUGAR *O. E.* (*Skr. sarkara*) साखर *f*; that which resembles sugar in taste साखरे सारखा गोड पदार्थ, साखर *f*; flattery गोडगोड गोष्टी *f pl*, साखर *f*, आर्जव, गुळखोबरें *n*.—*v.* साखर घालणें -पसरणें, साखरेंत घालणें, इ०; गोडगोड गोष्टी क., साखर पसरणें, वरपंगी बोलणें [with]: -CANDY खडीसाखर *f*. -CANE ऊंस. -MILL गुऱ्हाळ *n*, चरक. —SUGARY *a.* साखरेचा, गोड, मिष्ट; साखरेच्या सारखा; fond of sugar साखरेचा आवडता, गोडखाऊ; in comp. साखर.

SUGGEST *v.* (*-gerere*, to carry) introduce indirectly to the thoughts सुचवणें; insinuate व्यंगोक्तीनें सुचवणें, दर्शविणें [to]. -ION सूचना *f*; that which is suggested सुचविलेली गोष्टी *f*, सूचना *f*; *Law*, information without oath बिनशपथेची जबानी. *f*. -IVE *a.* सूचनेचा, सूचनात्मक.

SUICIDE (*sui*, of one's self, *cædere*, to kill) the act of designedly destroying one's life, committed by a person of years of discretion and of sound mind आत्महत्या *f*; one guilty of self-murder आत्महत्या करणारा, आत्महत्यारा, आत्मघातकी.—SUICIDAL *a.* आत्मघाताचा, आत्मघातक.

SUIT, See under SUE.

SULKY* *a.* दुर्मुखलेला.—SULKS *pl.* खळ *f*, फुरगुट *n, m*; to take the s. हट्टास पेटणें, खळ घेणें.

SULLEN *a. O. E.* dismal काळोखीचा, अंधारीचा; malignant दुष्ट; cross दुर्मुखलेला; obstinate कुचर, घुम्या.

SULLY *v.* (See SOIL) मळवणें, मळीत क.; tarnish कलंक -डाग लावणें.

SULPHER (*L.*) गंधक; roll s. नळ्यागंधक. -OUS *a.* गंधकाचा; गंधकाच्या गुणाचा; गंधकयुक्त.—SULPHATE—of copper मोरचूत.

SULTRY* *a.* उकाड्याचा, गदमदण्याचा; उष्ण, गरम; to be s. गदमदणें, उकडणें.

SUM (*summa*) aggregate जमा *f*, बेरीज *f*; amount रकम *f*; substance सारांश, अर्थ, एकंदरी *f*; *Arith.* उदाहरण *n*, हिशोब.—*v.* एकंदर -गोळाबेरीज क.; up उपसंहार क. -MARY संक्षेप, सारांश, उपसंहार.—*a.* संक्षेपाचा, संक्षिप्त; अटपसार, अटपता (proceedings). -MARILY *ad.* संक्षेपानें; थोडक्या काळांत, लागलाच, ताबडतोब.

SUMMER* उन्हाळा, ग्रीष्मकाल;—s. friend सुखाचा -शाळु सोबती. -HOUSE बंगला, बारादारी *f*.

SUMMER *F.* दारकस *f*, दारपटी *f*.

SUMMIT (*summus*, highest) कळस, शिखर *n*; highest degree पराकाष्ठा *f*, सीमा *f*, हद्द *f*, कळस, शिखर *n*: the s. of fame.

SUMMON *v.* (*summonere*, to give a hint) call बोलावणें; cite by authority सत्तेनें बोलावणें; up उत्तेजित क.; call upon to surrender स्वाधीन होण्यास -शरण येण्यास सांगणें [to, for, up] *n.*—*pl.* सरकारी बोलावणें *n*, तलबनामा, 'समन्स' *n*, 'समान' *n*.

SUMPTUOUS *a.* (*sumptus*, cost) खर्चाचा; बहु भोलाचा; magnificent भडक, भळभळीत; s. dinner चमचमीत -चंगीळ जेवण *n*.

SUN* (*Skr. súrya*, fr. *svar*, heaven) सूर्य; whatever resembles the sun in splendor and importance सूर्य, तेजोराशि; sunshine ऊन *n*; under the s. पृथ्वीवर, इहलोकीं.—*v.* उनांत ठेवणें -टाकणें -घालणें, सूर्यपुट देणें; orbit of the s. सूर्यमंडल *n*; the region of the s. सूर्यलोक; ray of the s. सूर्यकिरण *n*; worshipper of the s. सूर्योपासक, सौर. -BEAM सूर्यकिरण *n*. -BLINK तिरीप *f*. -BURNT *a.* उनानें काळवटलेला. -DAY आदितवार, रविवार; the Christian Sabbath ख्रिस्ती लोकांचा शाब्बाथ.—*a.* शाब्बाथ वाराचा. -DIAL छायायंत्र *n*, इंकुयंत्र *n*. -FLOWER सूर्यफूल *n*. -NY *a.* उनानें केलेला; उनानें रंगवलेला; सूर्यतप्त. -RISE सूर्योदय; the east उगवत *f*, पूर्व *f*. -SET सूर्यास्त; evening संध्याकाळ *f*; the west पश्चिम *f*, मावळत *f*. -SHINE ऊन *n*, निवर *n*; illumination प्रकाश, उजेड, रोशनाई *f*.—*a.* प्रकाशाचा, उनाचा; सूर्य सारखा, तेजःपुंज. -STONE अग्निगर्भ, सूर्यकांत. -STROKE उनाचा चटका, झळ *f*; उनाच्या चटक्यानें होणारा रोग.

SUNDER* *v.* तोडणें, वेगळा क. [in, from].—SUNDRY *a.* अनेक प्रकारचे, नाना प्रकारचे.—SUNDRIES *pl.* परचुरण *n*, किरकोळ.

SUP* *v.* घोट घेणें [up].—*i.* रात्रीचें जेवण क. [on, off]. -PER रात्रीचें जेवण *n*; Lord's s., the memorial sacrament of the communion प्रभुभोजन *n*.

SUPERABOUND *v.* (*super & abound*) बहुत -पुष्कळ असणें [in, with].—SUPERABUNDANT *a.* अतिशय, अधिक.—SUPERABUNDANCE विपुलता *f*, पुष्कळपणा; ऊरपूर *f*, महापूर *f*.

SUPERANNUATED *a.* म्हातारपणानें थकलेला, थकलेला, वयातीत: to be s. साठळणें.—SUPERANNUATION अति वयस्कता *f*, वार्धक्य *n*, साठी *f*.

SUPERB *a.* grand (*superbus*) मोठा, नामी, भव्य; elegant छानदार, भडक, झळक; showy देखाऊ, छानदार.

SUPERCARGO कबाडी गलबताची देखरेख करणारा.

SUPERCILIOUS *a.* (*-cilium*, eyelid) haughty दिमाखदार, तोरेदार; दिमाखावा, माजुरी. -NESS दिमाख, तोरा, बदमस्ती *f*, पीळ.

SUPEREMINENT *a.* सर्वश्रेष्ठ, अतिश्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट.

SUPEREROGATORY *a.* (*-erogare*, pay out money from the public treasury after asking the consent of the people) अत्याचाराचा, कर्त्तव्यातिरिक्त, पाहिजे त्यापेक्षा अधिक केलेला.

SUPERFICIAL *a.* (*-facies*, make) lying on the surface वरचा, वरल्या आंगाचा; बाहेरील; shallow उपरटपी (scholar).—SUPERFICIES वरलें -बाहेरचें आंग *n*; *Civil Law*, everything on the surface of a piece of ground or of a building, so closely connected by art or nature as to constitute a part of it जमीन व तिजवरचीं झाडें वगैरे, घर व त्यावरची माडी वगैरे.

SUPERFINE *a.* फार बारीक, तलम (cloth).—SUPERFLUOUS *a.* (*-fluere*, to flow) अधिक, जास्त, फाजील, उपराळ.—SUPERFLUITY अधिकाई *f*, आधिक्य *n*; something that is beyond what is wanted गरजे बाहेरची वस्तु *f* -गोष्ट *f*, जिची गरज नाहीं ती वस्तु *f*, फालतु जिन्नस *f*, *m*.

SUPERHUMAN *a.* मनुष्यकृतीच्या पलीकडचा, अमानुष, अतिमानुष्य; s. power विभूति *f*, अमानुषशक्ति *f*.

SUPERINCUMBENT *a.* वर पडलेला, उपरिस्थ.

SUPERINDUCE *v.* ओढून वर आणणें -मिळवणें: long custom of sinning *superinduces* upon the soul new and absurd desires.

SUPERINTEND *v.* पाहणें, चौकशी क. ठेवणें. -ENCE देखरेख *f*, चौकशी, पाहाणी *f*. -ENT देखरेख करणारा, पाहणीदार, चौकसनीस, 'सुपिंटेंडेंट.'

SUPERIOR *a.* (*super*, above) वरचे, वरला; higher in rank or office वरचे पदवीचा -पायरीचा, वरिष्ठ, श्रेष्ठ; higher in excellence सरस, अधिक, श्रेष्ठ, उंच; beyond the power or influence of अनधीन, अस्वाधीन, -च्या वर, पलीकडे, अवश; s. planets, planets more distant from the sun than the earth बहिर्वर्त्ती.—*n.* वडील, श्रेष्ठ जन, ज्येष्ठ; —of a convent महंत, आश्रमगुरु. -ITY वरचा अधिकार, वरची पदवी *f*; वर्चस्व *n*, सरदी *f*, प्राधान्य *n*, श्रेष्ठत्व *n*; प्राबल्य *n*, चढ.

SUPERLATIVE *a.* (*-ferrelatum*, to carry) परमावधीचा, सर्वोत्कृष्ट, पराकाष्ठेचा; *Gram.* परमावधिवाचक; s. degree पराकाष्ठा कोटी *f*. [to].

SUPERNATURAL *a.* वरचा (regions); celestial आकाशीय, अलौकिक, अद्भुत, अमानुष.

SUPERNUMERARY *a.* (*numerus*, a number) नेमणुकी बाहेरचा, जास्ती, फालतु, जास्त; s. expense उपराळ -फाजील खर्च.

SUPERPOSE* *v.* (*-ponere*, to place) -वर ठेवणें.

SUPERSCRIBE *v.* (*-scribere*, to write) -वर लिहिणें; -वर पत्ता लिहिणें: to s. a letter. —SUPERSCRIPTION -वरचा लेख -पत्ता.

SUPERSEDE *v.* (*sedere*, to sit) replace -च्या जागीं दुसरा ठेवणें; make void मोडी -रद्द क.; suspend कामावरून अमानत क., दुसरा पाठवून कामावरून काढणें [in, by].

SUPERSTITION (*superstitio*, a standing still over or by a thing; hence wonder, dread, esp. of the divine or supernatural) ignorant and irrational worship of the Supreme Deity अज्ञानभक्ति *f*, अन्यथा भक्ति *f*; excessive exactness in religious practice अति भक्ति *f*, कुभक्ति *f*, अत्याचार, भक्तिवेड *n*; worship of false gods खोटे देवांची भक्ति *f*;

false religion खोटा धर्म, अन्यथा -मिथ्या धर्म; belief in omens and prognostics शकुनभोळेपणा, शकुनादिकावर विश्वास.—SUPERSTITIOUS *a.* अत्याचारी, भक्तीचा वेडा; अतिश्रद्धामूलक; शकुनभोळा.

SUPERSTRUCTURE पायावरची इमारत *f*, जमिनीच्या वरचा इमला; वरचा थर.

SUPERVENE *v. i.* (*-venire*, to come) अणखी येणें, नवा येणें; happen घडणें, होणें.—SUPERVENIENT *a.* नवा आलेला.

SUPERVISE *v.* (*-videre*, to see) पाहणें, देखरेख -चौकसी क.—SUPERVISOR पाहणारा, देखरेख करणारा, चौकसनीस.

SUPINE *a.* (*super*, above) उताणा, उलथा; indolent सुस्त, निरुद्योगी.—*n. Gram.* कारक *n.* क्रियावाचक नाम *n.*

SUPPLANT *v.* (*-planta*, sole of the foot) remove by stratagem युक्तीनें -डोईवर पाय देऊन पाडणें; overthrow मोडणें, पाडणें, खालीं पाडणें, मोड क. [in].

SUPPLE *a.* (*-plicare*, to fold) pliant लवचीक, लवका, नरम; flattering आर्जवी, तोंडदेखला; compliant नरम.—*v.* लवचीक क.; नरम क.

SUPPLEMENT (See SUPPLY) पुरवणी *f*, पुरवणीबंद; that which completes पुरवठा *f*, भर *f*, भरती *f*. -ARY *a.* पुरवणीचा, भरतीचा.

SUPPLIANT *a.* (*supplex*, kneeling down) प्रार्थना -विनंती करणारा; expressive of humble supplication दैन्यवाणा, दीन प्रार्थनेचा, विनंतीचा; s. for protection शरणार्थ.—SUPPLICATE *v.* प्रार्थणें, विनवणें, पाय धरणें; entreat for -साठीं प्रार्थना क., मागणें; s. abjectly पदर पसरणें, मिन्नतवारीनें मागणें [for].—SUPPLICATION प्रार्थना *f*, विनंती *f*; मिन्नतवारी *f*, विनवणी *f*.

SUPPLY *v.* (*plere*, to fill) पुरवणें, पुरवठा क.; take the place of -चीं जागा घेणें, -वाटचें काम क. [with, to].—*n.* पुरवणी *f*, पुरावा; matter supplied भर *f*, भरती *f*, पुरवठा, बेगमी *f*, साहित्य *n*, भरणा; [*pl.* amount of money provided, as by Parliament or Congress, to meet the annual national expenditures: to vote s.]

SUPPORT *v.* (*-portare*, to carry) bear by being under वाहणें, धरणें, नपडूं देणें, आधार हात -आश्रा देणें; sustain सोसणें, साहणें; assist मदत क., संभाळ क., पाठबळ देणें; maintain पोसणें, पाळणें (a family); carry on चालवणें, चालता ठेवणें (war, government); verify खरा करून देणें, पुरावा करून देणें; uphold by aid मदत क., पुस्ती देणें; अनकूल असणें, अनुमोदन देणें; attend, as an honorary assistant: a chairman *supported* by a vice-chairman;—spirit, courage, &c. दम -धैर्य -अवसान देणें [in, by.]—*n.* धरणें *n*, संभाळणें *n*; आधार, सांभाळ; सहाणें *n*, सोसणूक *f*; निर्वाह; पालन *n*, पोषण *n*; आधार, पाठबळ *n*, आश्वासन *n*; उपजीविका *f*, जिनगी *f* [for]. -ABLE *a.* धारण करायाजोगा; सोसण्याजोगा. -ER आधार देणारा, चालवणारा; पालक, पोषक, पालनवाला; पाठ देणारा, पाठिंबा, सारथी; स्थापना -पुष्टी करणारा. -LESS *a.* निराधार, निराश्रित.

SUPPOSE *v.* (*-pausare*, to pause) lay down without proof अटकळ क., मानणें; imagine कल्पिणें, मनांत आणणें; require to exist or be true आहेसा दाखवणें, गर्भित असणें, दर्शवणें: the existence of things *supposes* the existence of a cause of things.—SUPPOSITION कल्पना *f*, अटकळ *f*, भावना *f*, कल्पित गोष्ट *f*; doubt संशय.

SUPPRESS *v.* (*-premere*, to press) मोडणें, नाहींसा क.; conceal दडपणें, दाबणें, छपविणें; stop बंद क.;—an emotion गिळणें, पिणें. -ION मोडणें *n*, ध्वंस; छपावणी *n*, दाबादाबी *f*; as of urine मूत्रस्तंभन *n*, मूत्रावरोध.

SUPPURATE *v. i.* (*-pus*, matter) पिकणें, पुलणास

येणें.—SUPPURATION पुवळणी *f*, पुवाळणी *f*. —SUPPURATIVE *a*. पिकवणारा.

SUPREME *a*. (*supremus*) highest in authority मुख्य, श्रेष्ठ, वरिष्ठ; most excellent सर्वोत्कृष्ट; utmost पराकाष्ठेचा, बेहद्द (folly). —SUPREMACY मुख्य अधिकार, प्राधान्य *n*, वरिष्ठता *f*.

SURD (*surdus*) *Alg*. करणी *f*.

SURE *a*. *F*. confident beyond doubt निभ्रांत, निःसंशय; certain खचीत, निश्चयाचा; of certain actions अचूक; to be s. खचीत, निःसंशय; तर बरोक, बरें. -LY *ad*. खचीत निखालस. -TY खचित -निश्चितपणा; security जामीन, जिम्मेदार; monied s. मालजामीन; s. for a s. आडजामीन;—for good and peaceable conduct फिलजामीन;—for the personal appearance of any one when required to attend हाजीर जामीन, दर्शनप्रतिभू; a s. for confidence, one who engages for the general honesty and responsibility of another प्रत्ययप्रतिभू; a s. for the repayment of a loan or fulfilment of an engagement दानप्रतिभू; a s. who engages to give up property belonging to the debtor if he fails to pay the debt द्रव्यार्पणप्रतिभू. -SHIP जामीनकी *f*.

SURF *F*. कांठावर फुटणारी लाट *f*.

SURFACE (*F*. *sur*, *L*. *super*, & *face*) वरचा -बाहेरला भाग, पृष्ठभाग; outward appearance रूप *n*, बाहेरील देखावा, बाह्यरूप *n*; s. of the earth भूतल *n* -पृष्ठ *n*; on the s. वर.

SURFEIT *v*. *F*. ओकारी येईतों खावविणें -जेवायास -खायास घालणें; ओकारी येई तोंपर्यंत खाणें [with].—*n*. टेर *f*, चेल *f*, उपट *f*.

SURGE (*surgere*, to rise) मोठी लाट *f*.

SURGEON *O*.*E*. शस्त्रवैद्य; veterinary s. अश्ववैद्य.—SURGERY शस्त्रवैद्यकी *f*.—SURGICAL *a*. शस्त्रवैद्याचा -वैद्यकीचा.

SURLY *a*. *Ger*. sour दाष्ट, खाष्ट, खट्याळ.

SURMISE *v*. (*mettre*, to put) संशय -वहीम आणणें.—*n*. अंदेशा, वहीम.

SURMOUNT *v*. *F*. overcome पार पडणें, निभावणें; excel मागें टाकणें, चढ -तोड क.

SURNAME (*sur* & *name*) आडनांव *n*, उपनांव *n*, कूळ *n*; [*surnames* originally designated occupation, estate, place of residence, or some particular thing or event that related to the person: Robert *Smith*, William *Turner*]. [in, at, by] नांव *n*.—*v*. आडनांव देणें -ठेवणें.

SURPASS *v*. मागें टाकणें, चढ -तोड क.

SURPLICE (*-pellicum*, a robe) उपाध्याचा झगा.

SURPLUS (*-plus*, more) ऊर *f*, शिलक *f*, उपराळा.—*a*. फाजील, वर राहिलेला.

SURPRISE *v*. (*-prendere*, to take) take unawares एकाएकीं गांठणें, अकस्मात घेरणें; strike with wonder चकवणें, दंग क.; confuse घोटाळ्यांत पाडणें [by, with, in, at].—*n*. विस्मय *n*, आश्चर्य *n*; एकाएकीं गाठणें *n*. —SURPRISING *a*. चमत्कारिक, विस्मय -आश्चर्य उत्पन्न करणारा (patience). -LY *a*. आश्चर्य वाटण्याजोगा.

SURRENDER *v*. (*-rendre*, to render) yield to the power of another स्वाधीन -हवालीक., सोडणें; yield to any influence वश -स्वाधीन होणें.—*i*. स्वाधीन -हवालीं होणें [to, up]. —*n*. त्याग, परित्याग, अधीनता *f*; शरण येणें *n*.

SURREPTITIOUS *a*. (*-rapere*, to snatch away) खोटा, कपटाचा, कृत्रिम.

SURROUND *v*. (*sur* & *round*) वेढा -वेरा घालणें, वेष्टणें [by, with]. -ING *a*. वेढणारा, वेष्टक; चहूंकडला, आसपासचा, भोंवतालचा,

SURTOUT *F*. वरून घालायाचा अंगरखा.

SURVEILLANCE (*-vigilare*, to watch) पाहरा, चौकी *f*, नजरबंदी *f*, नजरकैद *f*, दृष्टीची कैद *f*.

SURVEY *v*. (*-videre*, to see) पाहणें, निरखणें; examine with reference to condition,

value, &c. पाहणें, तपासणें; measure land, &c. पैमाशी क., जमीन मोजणें.—*n.* पाहणें *n*, टेहळणी *f*, अवलोकन *n*; पाहणी *f*, तपासणी *f*; पैमाशी *f*, जमीनमोजणी *f*. -ING जमीन मोजण्याची विद्या *f*. -OR पाहणारा, चौकशनीस; जमीन मोजणारा, 'सर्वेयर.'

SURVIVE *v.* (*vivere*, to live) मागें -पाठीमागें जगणें -वांचणें.—*i.* जगणें, वांचणें, टिकणें. —SURVIVAL मागें वांचणें *n*.—SURVIVOR मागें वांचणारा; *Law* उत्तराधिकारी.

SUSCEPTIBLE *a.* (*-capere*, to take) ग्राहक, ग्रहणसमर्थ; tender कोमळ, कोंवळा;—as of disease or injury गोडा, दुखरा, कोंवळा [of, to].—SUSCEPTIBILITY ग्राहकत्व *n*, ग्रहणशक्ति *f*.

SUSPECT *v.* (*-specere*, to look) imagine to exist कल्पना क.; imagine to be guilty upon slight evidence or without proof वहीम -अंदेशा येणें; doubt संशय -भ्रांति असणें [of, for].—SUSPICION वहीम, वहमा; संशय, भ्रांति *f*.—SUSPICIOUS *a.* संशयखोर, संशयी; indicating suspicion संशय आणणारा, वहिमाचा, संदेहजनक; doubtful शंकित, साशंक; liable to suspicion संशय येण्याजोगा, संदेहशील.

SUSPEND *v.* (*-pendere*, to hang) टांगणें, लोंबत ठेवणें; make to depend ठेवणें, गुंतवणें, अडकवणें: God hath *suspended* the promise of eternal life on the condition of faith and obedience; cease for a time तहकूब -महकूब क., थांबविणें; hold in a state undetermined तरंगत -मोहगम ठेवणें; debar from any privilege, from the execution from an office, or from the enjoyment of income तूर्त कामावरून -अधिकारावरून दूर क., अमानत ठेवणें, 'सस्पेंड' क.; to s. respiration दम कोंडणें -छाटणें [from, for].—SUSPENSE दुग्धा *f*, अनिश्चय; तहकुबी *f*, महकुबी *f*.—SUSPENSION टांगणें *n*, लोंबत ठेवणें *n*; तहकूब क., ठेवणें *n*, तहकुबी *f*; अमानत क. *n*, अमानती *f*.

SUSTAIN *v.* (*-tenere*, to hold) धरणें, संभाळणें; support पोसणें, पाळणें; suffer सोसणें, भोगणें; sanction मंजूर -कबूल क.: the court *sustains* the action; prove खरा -स्थापित क. [by, in].—SUSTENANCE उपजीविका *f*, अन्न *n*, पोटगी *f*, भक्ष.—SUSTENTATION संभाळ; आश्रय; अन्नसामग्री *f*.

SUTLER *D.* फौजेबराबर चालणारा वाणी, लष्करी बनिया, *Hind.*

SUTURE (*suere, sutum*, to sew) शिवणें *n*; seam शिवण *f*, संधि, चाळा;—of the cranium कपालसंधि, चाल *f*.

SWAB *D.* बोळा *f*.—*v.* बोळवानें झाडणें -साफ क. -पुसणें [up].

SWADDLE* *v.* गुंडाळणें, लपेटणें [up].—SWADDLING-CLOTH बाळंतें *n*.

SWAGGER* *v. i.* मोठाल्या गोष्टी सांगणें, तोरा मिरवणें, ताल तोडणें [about, in, off].

SWALLOW* पाकोळी *f*? निळवी?

SWALLOW* *v.* take into the stomach गिळणें, ग्रासणें; absorb खाणें, गडप क., जिरवणें; up, receive implicitly अविचारानें -डोळे झांकून खरा मानणें -घेणें; गिळणें, उतरणें; appropriate खाणें, गिळंकृत क., डल्ला मारणें; occupy आटोपणें, व्यापणें (time); consume, खर्चणें; engage completely ग्रासणें, वेढणें, गडप क.; —words, letters, &c., in speaking खाणें [up].—*n.* throat अन्नमार्ग, गळा; voracity खादाडपणा; as much as is or can be swallowed at once घोट, बकाणा. -WORT मांदारवृक्ष, अर्क; gigantic s. रुई *f*.

SWAMP* दलदल *f*, पाणथळ *f*, रुतण *f*.

SWAN* राजहंस.

SWARD* गवती जमीन *f*.

SWARM* (*Skr. swar*, to sound) large number of small animals or insects घुंगट *n*, पेंव *n*, लोळ, थवा; any great number झुंड *f*, समुदाय, टोळी *f*, [with].—*v. i.* घोंघों क.;—bees, flies घूंघूं क., गोंगावणें; throng and move busily बुचबुचणें, लसलसणें, सुळसुळाट क. (maggots, fleas, &c.); be thronged गजबजणें, गजगजीत असणें, पेंव फुटणें.

SWARTHY* *a.* काळसर, काळवट.

SWATH*, line of grass or grain cut by the scythe in mowing पात *f*.

SWATHE* *v.* गुंडाळणें, लपेटणें, वेष्टणें [with, in]. —*n.* वेष्टण *n*, लपेटणें *n*.

SWAY *v. D.* wield with the hand पेलणें, तोलणें, वहिवाटणें, चालवणें; govern अमल -अधिकार क.; cause to incline झोंक देणें, कल देणें, मन वळवणें [with, over, by].—*i.* have weight कल -तोल -भार असणें -पडणें; lean कलणें, झुकणें.—*n.* वजन *n*, भारदस्ती *f*; अमल, अधिकार; कल, झोंक.

SWEAR* *v. i.* utter an oath शपथ वाहणें -घेणें; *Law*, give evidence on oath शपथेवर साक्षी देणें; use the name of God profanely देवाचे नांवानें व्यर्थ शपथ वाहणें, देवाचें नांव व्यर्थ घेणें.—*t.* शपथ घालणें -घेणें; शपथ घेऊन साक्षी ठेवणें [into, to, at].

SWEAT* (*Skr. svedas*) moisture excreted from the skin घाम, घर्म; moisture issuing from any substance पाझर, निचरा, तेल *n*; toil कष्ट, मेहनत *f*, घाम.—*v. i.* घाम येणें -सुटणें;—copiously डगडगणें, दरारणें; निचरणें, पाझरणें, रेळणें; काबाडकष्ट -घाम येईतों काम क., हाडांचे मणी-रक्ताचें पाणी क.—*t.* घाम आणणें, स्वेदन क.; पाझरविणें; [to s. coin, remove a portion of a piece of coin, as by shaking it in a bag, so that the friction wears off some of the metal, and so that the diminution of the value is not readily perceived].

SWEEP* *v.* clean by brushing झाडणें, केर काढणें; carry along or off by a long brushing stroke or force वाहवणें, लोटून नेणें: a flood *sweeps* away a bridge; carry off many at a stroke सप्पा उडवणें, धौशा पाडणें, झाडून नेणें; observe rapidly, as parts of a surface वरवर पाहणें, नजर चालवणें [out, from, up, with].—*i.* सपाट्यानें चालणें -जाणें; pass with pomp डौलानें मिरवणें, मिरवत जाणें.—*n.* झपाटा, झटकारा; compass of a stroke अटोका, पोंहोंच *f*: a long s.; sweeper झाडू, झाडूवाला; large oar पतिंगा. -ER झाडणारा; झाडू, भंगी, हलालखोर. -INGS *pl.* गदळ, गाळ.

SWEET* *a.* saccharine साखरेचा, गोड, मिष्ट; fragrant सुवासिक, मधुर (odor); melodious सुस्वर, गोड, मधुर (voice); beautiful सुंदर, प्रसन्न (face); not salt गोड, गोडा, मिठा (water); not stale ताजा (butter); soft मऊ; obliging बोलून चालून गोड, उपकारी (manners).—*n.* गोड पदार्थ; *pl.* मिठाई *f*; सुख *n*, गोडी *f*: the *sweets* of domestic life; a darling जीवप्राण, प्राणसखा. -EN *v.* गोड क. [with].—*i.* गोड होणें. -FLAG वेखंड *n*. -GUM TREE, the balsam शिलारस. -HEART प्रिय, प्यार. -ISH *a.* गोडसर. -MEAT मिठाई *f*, खाऊ. -NESS गोडी *f*, मिष्टपणा, माधुर्य *n*; गोडीगुलाबी *f*, सौजन्य *n*. -POTATO,—the plant रताळी *f*; —the root रताळूं *n*. -ROOT जेष्ठीमद *f*. -SCENTED *a.* सुवासाचा, सुवासिक. -SOP शिताफळा सारखें एक फळ आहे.

SWELL* *v. i.* grow larger सुजणें, फुगणें, वाढणें;—as a river फुगणें, तुंबणें, फुगा येणें; —with anger फुगणें;—with pride फुगणें, चढणें, ताठणें;—with grief उमासा येणें; heave खळबळणें, उसळणें (billows); be enlarged वाढणें, जमणें, चढणें (debt); be turgid फुगणें, ताठणें, तमतमणें (words)

—*t.* सुजवणें, फुगारा आणणें; फुगवणें, तुंबवणें; चढवणें, माजवणें; फुगवणें, वाढवणें [up, with].—*n.* सूज *f*, फुगारा; हुंडका, उमाळा; नदी वगैरेचा फुगा; खळबळाट. -ING सूज *f*; हुंडका, उसासा, उमाळा; फुगारा, फुगवणी *f*.

SWELTER* *v. i.* उबणें, डगडगणें.

SWERVE *v. i. D.* चळणें, भकणें [from, to].

SWIFT* *a.* rapid चपळ, जलद; ready तयार, सिद्ध; speedy जलदीचा. -FOOT *a.* जलद चालणारा, पायसूट. -LY *ad.* जलदी, जलदीनें, लवकर, त्वरेनें. -NESS जलदी *f*, चलाखी *f*, त्वरा *f*.

SWIM* *v. i.* float तरणें, तरंगणें; move progressively in water by means of the hands and feet, or of fins पोहणें, पोहून जाणें; be dizzy भोवणें, फिरणें, तिरमिरणें: the head *swims;* be overflowed जलमय होणें, पाण्यानें भरणें, पोहणें: the earth *swims* in rain; abound रेळचेळ असणें, न्हाणें, पोहणें: they now s. in joy.—*t.* पोहणें, पोहून जाणें; immerse in water that the lighter parts may swim बुडविणें: to s. wheat for seed; cause or compel to swim पोहून नेणें, पोहायास घालणें: to s. a horse across a river. -MER तरंगणारा, पोहणारा. -MING तरंगणें *n*; पोहणें *n*; घेरी *f*, तिरमिरी *f*. -LY *ad.* तडाख्यानें, धडकून.

SWINDLE *v. D.* उपटणें, मुंडवणें, धुतारणें [out, of].—SWINDLER धुतारा, उपटया, उचल्या.

SWINE* डुकर *n*.

SWING* *v.* vibrate झोका घेणें -खाणें; practice swinging झोपा घेणें -खेळणें.—*t.* झोपा काढणें, झोके देणें; फिरवणें, खेळवणें, हालवणें: he *swings* his tail.—*n.* झोका, झेंप *f*, आंदोलन *n*;—as of a whip झपाटा, फटकारा, झटका; swinging line, seat, bed, &c. झोंपाळा, चौफाळा;—as erected at fairs रहाटपाळणा;—to swing devotees बगाड *n*; bent वेग, ओघ, भर; free अस्खलित गति *f*.

SWISS *F.* स्विट्झरलंड देशचा राहणारा; स्विस्-भाषा *f*.—*a.* स्विट्झरलंड देशचा; स्विस् लोकांचा.

SWITCH* डाहळी *f*, छडी *f*, शिपटी *f*.—*v.* छडीनें मारणें.

SWIVEL*, a ring which turns upon a pin फिरकी *f*; a small cannon which turns in a socket फिरकीची तोफ *f*, जेजाल *f*.

SWOON* मूर्च्छा *f*, कलम *f*.—*v. i.* मूर्च्छा येणें [away].

SWOOP (See SWEEP) झेंप *f*, झडप *f*.—*v.* झडप घालणें; catch up झेलणें; take with a sweep झेंप घालून घेणें [away, up].

SWORD* तलवार *f*, खड्ग *n*; belt of a s. पडदळें *n*; hilt of a s. परज *n*. -BLADE तलवारीचें पान *n*. -FISH एक जातीचा मत्स्य आहे. -LAW तलवारीचा अंमल; जबरीचा अंमल, जुलूम. -PLAYER पट्टा खेळणारा. -SMAN तलवार बाळगणारा; तलवारबहादूर.

SYCAMORE *Heb.* अंजिराच्या जातीचा एक मोठा वृक्ष आहे.

SYCOPHANT (*Gr. sukon,* a fig, *phainein,* to show) आर्जवी, खुशामती.—SYCOPHANCY आर्जव, खुशामत *f*.

SYLLABLE (*syllaba*) अक्षर *n*.—SYLLABIC *a.* अक्षरसंबंधी, अक्षराचा.—SYLLABUS सारांश, गोश्वारा, सार *n*.

SYLLOGISM (*syllogismus*) *Logic* अवयवघटित वाक्य *n*.—SYLLOGISTIC *a.* अवयवघटित वाक्याचा -संबंधी.

SYLVAN *a.* (*silvea, sylva,* a wood) रानटी, जंगली, वन्य; woody अरण्यमय, वृक्षमय, —*n.* वनदेवता *f*.

SYMBOL (*symbolus*) sign चिन्ह *n*, निशाणी *f*, खूण *f*; a letter which is significant अर्थसूचक अक्षर *n*; summary of the articles of religion धर्मसिद्धांतसार *n*. -IC, -AL *a.* खुणेचा, लाक्षणिक, सांकेतिक, प्रदर्शक, रूपक.

SYMMETRY (*Gr. sun,* with, *metron,* measure).

आकारशुद्धि *f*, अंगसंयोग, वळणशुद्धपणा.—SYMMETRICAL *a.* आकार -वळणशुद्ध, साखसुरत, सुभट.

SYMPATHY (*Gr. -pathos*, suffering) conformity of temperament प्रकृतीचा सारखेपणा, प्रकृतिसाम्य *n*, साधर्म्य *n*; commiseration दुसऱ्याचें दुःख -दरद जाणणें *n*, कळवळा. [with].—SYMPATHETIC, -AL *a.* समदुःखी.—SYMPATHIZE *v. i.* दुसऱ्याचें दुःख जाणणें, कळवळा येणें; समगुण -साधर्म्य असणें [with].

SYMPTOM (*Gr. ptoma*, a fall) खूण *f*, लक्षण *n*, चिन्ह *n*; *Med.* लक्षण *n*.

SYNAGOGUE (*Gr. sun*, with, *agein*, to lead) a congregation of Jews met for the purpose of worship यहुदी लोकांची भजनसभा *f*; a place where the Jews meet for worship यहुदी लोकांची मशीद *f*, -चें भजनालय *n*, -सभास्थान *n*.

SYNCOPE (*L.*) *Gram.* मधल्या अक्षराचा लोप; *Med.*, a fainting fit मूर्च्छा *f*, मूर्च्छना *f*, कलम *f*.

SYNECDOCHE (*L.*) *Rhet.*, a figure or trope by which the whole of a thing is put for a part, or a part for the whole, the genus for the species or the species for the genus लक्षणा *f*.

SYNOD (*Gr. -hodos*, a way) सभा *f*, मजलस *f*; धर्मप्रकरणी सभा *f*, धर्मव्यवस्थापक सभा *f*.

SYNONYME (*Gr. onoma*, name) पर्याय शब्द, उपशब्द.—SYNONYMOUS *a.* एकार्थक.

SYNOPSIS (*Gr. -opsis*, a sight) गोश्वारा, सारांश; तक्ता, पत्रक *n*.

SYNTAX (*Gr. -tassein*, to put in order) *Gram.* वाक्यरचना *f*, पदयोजना *f*.

SYNTHESIS (*Gr. -thesis*, a placing) the putting of two or more things together, as in compound medicines संयोजन *n*, मीलन *n*, एकीकरण *n*; *Chem.*, the uniting of elements to form a compound तत्वांचें एकीकरण *n*, तत्वमीलन *n*; [*Logic*, the combination of separate elements of thought into a whole, as of simple into complex conceptions, species into genera, individual propositions into systems]; [*Surg.*, the operation by which divided parts are united].

SYRINGE (*Gr. surinx*, pipe) पिचकारी *f*, चिपनळी *f*.—*v.* पिचकारी मारणें; wash and cleanse by injection from a syringe पिचकारीनें धुणें -साफ क.

SYRUP, See SIRUP.

SYSTEM (*Gr. sun*, with, *histemi*, to place) scheme बेत, व्यवस्था *f*; method क्रम, पद्धत *f*, परिपाठ; totality of parts in the body, performing the same or an analogous or a connected function देहप्रकृति *f*, प्रकृति *f*, भाव, शरीर *n*. -ATIC, -AL *a.* बेताचा, व्यवस्थित; सृष्टिक्रमाचा. -ATIZE *v.* क्रम बांधणें -लावणें, व्यवस्था क. -ATIST व्यवस्था करणारा -लावणारा.

SYSTOLE (*Gr. -stellein*, to set) contraction of the heart and arteries for expelling the blood and carrying on the circulation हृत्पिंडसंकोच; *Gram.* दीर्घ अक्षर ह्रस्व करणें *n*.

T

TABASHEER *Per.* तबकीर *n*.

TABBY *a. Per.* बांडा, कसरा.—*v.* बांडा रंगवणें.

TABERNACLE (*taberna*, a shed, or hut) a slightly built or temporary habitation छप्पर *n*, खोपी *f*, मांडव इ०; a tent तंबू, राहुटी *f*; *Jewish antiq.*, a portable structure of wooden framework covered with curtains, which was carried through the wilderness in the Israelitish exodus as a place of sacrifice and worship मंडप; a place of worship भजनालय *n*.—*v.* राहणें, वस्ती क.: Christ *tabernacled* in the flesh.

TABLE (*tabula*, a board) पाटी *f*;—of metal

पत्रा; inscription कोरींव लेख, ताम्रपट, शिलालेख इ०; synopsis तक्ता, पत्रक *n*; *Math.* कोष्टक *n*; an article of furniture चवरंग, मेज *n*, 'टेबल' *n*; entertainment भोजन *n*, जेवण *n*, मेजवानी *f*; company assembled round a table पंगत *f*, भोजनमंडळी *f*; the board on which draughts is played पट; the game itself सारीपाट;—of a hill पठार *f*, तबकडी *f*; *Astron.* कुंडली *f*, the Lord's t. प्रभुभोजन *n*; to serve *tables* गरिबांस अन्न देणें -वांटणें; to turn the *tables* कालचक्र फिरवणें; t. expenses भोजनखर्च.—*v.* पत्रक -तक्ता क. -CLOTH मेजावरची चादर *f*, 'टेबल क्लाथ' *n*. -LAND डोंगरसपाटी *f*, माची *f*, पठार *n*, संथळ *n*. -SPOON मेजावरचा चमचा -ची पळी *f*.—TABLET, a small table लहान मेज *n*, बाजवट *n*; a flat surface for writing, engraving on पाटी *f*, पत्र *n*; *pl.* a kind of pocket memorandum book खिशांत ठेवायाची स्मरणवही *f*; a medicine in square form औषधाची वडी *f*.—TABULAR *a.* पत्रकाच्या -तक्त्याच्या तऱ्हेचा, तक्त्याच्या आकाराचा; तक्त्यांत मांडलेला.

TABOR *Ar.* मृदंग, पखवाज, तबला.—*v. i.* मृदंग वाजविणें. -INE खंजिरी *f*.

TACHYDROMUS ASIATICUS (*Gr. tachus*, fast, *dromos*, a running) a bird पोरचाळवणी *f*.

TACIT *a.* (*tacere*, to be silent) अर्थसिद्ध, ध्वनित, फलित. -LY *ad.* अर्थांत, उगाच राहण्यानें. -URN *a.* अबोल्या, मौना, अल्पभाषी; t. person मुकाम्हसोबा, मुकी मण्यार *f*. -ITY अबोलेपणा, मौन्य *n*.

TACK *D.* a small, short, sharp-pointed nail चूक *f*, गुलमेख *f*.—*v.* टांचे -टांके मारणें; fasten जोडणें, जडणें; change the course of, as a ship हेरे घेणें, वाली येणें [to, up, on, together] -LING, cordage दोरखंडें *n pl*, दोर; harness सामान *n*, सरंजाम.

TACT (*tangere*, to touch) युक्ति *f*, कसब *n*, छाप *f*, शिताबी *f*. -IC,-AL *a.* कवाईतीचा.—*n. pl.* कवाईत *f*, सैन्यरचनेची विद्या *f*. -ILE *a.* स्पर्श करायाजोगा, स्पर्शनीय, स्पर्श्य.

TADPOLE (*pullus*, a young animal) बेडकीचें पोर *n*, बेडकुली *f*, बेंडकुळी *f*.

TAFFETA *Per.* तापता.

TAIL*, the part of an animal which terminates the body behind शेंपूट *n*, पुच्छ *n*; the back, lower, or inferior part of anything शेवट, शेव; anything hanging long शेंपूट *n*, शेंडी *f*; a train of attendants जिलीब *f*, लवाजिमा, शेंपूट *n*; a downy appendage to certain seeds तुरा; the t. of a comet धूमकेतूचें पुच्छ *n*; -ची शेंडी *f*; to turn t. मुठींत नाक धरणें, शेंपूट खालीं घालणें; to bristle up the t. शेंपूट फिंदारणें; to hang at the t. कासेस लागणें, दुमची पुरवणें.

TAILOR *F.* शिंपी, दरजी. -BIRD a species of—सुगरण *f*.

TAINT *v.* (*tingere*) stain कलंक लावणें, दूषित क.; corrupt बिघडणें, खराब क.; infect रोग लावणें; imbue, as with some extraneous matter which alters the sensible qualities of the substance विजातीय पदार्थ घालून गुण बदलणें [with].—*i.* दूषित होणें बिघडणें; लागणें, नासणें (meat).—*n.* दोष, विटाळ, बाध; कलंक, काळें *n*, काळवटी *f*. -ED दूषित; रोगन दिलेला -लावलेला;—as meat लागरा, लागट, लागलेला; कलंक लावलेला, सकलंक.

TAKE* *v.* lay hold of धरणें, पकडणें; obtain possession of by force घेणें, सई क., जिंकणें (a city); charm मोहणें, मोहित क. (Prov. vi. 25); elect निवडणें, निवडून घेणें: the sparrow *takes* a bush; require लावणें, लागणें, खाणें, घेणें: it *takes* so much cloth to make a coat; this man always *takes* time before he passes his judgmen

picture तसबीर काढणें -उतरणें; assume आपणावर घेणें: *I take* the liberty to say; accept घेणें, स्वीकारणें, ग्रहण क.; partake of घेणें, खाणें, पिणें, सेवन क. (food, a glass of wine); leap उडी मारून जाणें, उडणें (a fence); submit to ग्रहण क., मान्य होणें, वश होणें; endure सोसणें (a joke); allow कबूल क., मानणें: to t. a thing for granted; this I t. to be the man's motive; to t. men for spies; receive घेणें, खाणें, मारणें; to t. well गोड करून घेणें;—as breath, leave, revenge, &c. घेणें; to t. advantage of एकाएकीं गांठणें; सवड साधणें; to t. aim नेम धरणें; to t. air फुटणें, बाहेर पडणें, पट्कणीं होणें; along नेणें;—arms हत्यारें घेऊन उठणें, लढाईस उठणें; away नेणें, घेऊन जाणें, हिरावणें, हरवणें;—breath थांबणें, दम -विसांवा घेणें;—care संभाळणें, जपणें;—care of पाहणें, देखरेख क., दिमतींत असणें;—down कमी क.; उतरणें, काढणें (pride); गिळणें, घेणें, पिणें (a potion); लिहून -टिपून -टांचून ठेवणें, मांडणें (a man's words); हल्ला क., -चढून जाणें;—effect लागू होणें, -गुण क.;—fire पेटणें, आग लागणें; from -पासून हरण क.; -चें घेणें; बाद -वजा क.; कमी -उणा क.; [-ground to the right or left, *Mil.*, to extend the line to the right or left];—heart मन मिळवणें; धीर धरणें, धीर -दिलासा मिळणें;—heed संभाळणें, जपणें, सावध असणें;—heed to संभाळणें;—hold of धरणें, पकडणें;—horse स्वार होणें, घोड्यावर बसणें; in कोंडणें, कुडणें; फसवणें; घोटाळ्यांत पाडणें; उमजणें, समजणें; गुंडाळून बांधणें, वळकटी -सुरळी क. (a sail); घेणें, आंत घेणें: a leaky vessel will t. in water; घेणें, वेळच्या वेळेस घेणें -पावणें (a newspaper);—in hand हातीं घेणें -धरणें;—in vain व्यर्थ बोलणें -घेणें (Ex. xx. 7.);—leave निरोप -आज्ञा घेणें;—notice पाहणें, लक्ष देणें; चर्चा क., बोलणें;—oath शपथ घेणें; off काढणें, उतरणें (a load); काढणें (one's hat); कापणें, कापून काढणें (a limb); नाश क., प्राण घेणें (life); व्यर्थ -रद्द क., खोडणें (the force of an argument); परत घेणें -बोलावणें; अंग काढणें; पिणें, घेणें (a glass of wine); विकत घेणें, खरेदी क.; नकल -ठाकी उतरणें (models); नकल क., सोंग आणणें, बतावणी क.; on अंगावर घेणें, -वर घेणें (responsibility); सोंग घेणें;—one's own course आपल्या इच्छेप्रमाणें चालणें -क.; out बाहेर काढणें, काढणें; वेगळा क.; वजा क.; काढणें, सांफ क. (a stain from cloth);—a paper, &c. वर्गणीदार होऊन घेणें, घेणें;—part वांटून घेणें, विभागून घेणें; part with -शीं मिळणें;—place घडणें, घडून येणें, होणें; लागू होणें;—root रुजणें, मूळ धरणें; मुळावणें, स्थापित होणें;—sides पक्ष -बाजू धरणें;—the air वाऱ्यावर फिरणें, हवा खायास जाणें;—the field लढाईस जाणें, लढाई चालू क.;—to heart मनास लागणें, मनावर घेणें; up उचलणें; विकत घेणें; उसनें घेणें; उधार घेणें (goods); चालू क.; *Surg.* पट्टीनें बांधणें, पट्टी बांधणें; घेणें, खाणें, गुंतवणें (time); धरणें, पकडणें (a thief); कबूल क., विश्वासणें; निषेध क., कान उघडणें; झेलणें, धरणें; व्यापणें, वेढणें, अटपणें, घेणें, गुंतवणें (room); उचलणें, पत्करणें, हातीं धरणें आदरणें, पत्करणें (practice, opinion); लागणें, घेणें: this dictionary has *taken* up six years; पक्ष -कैवार घेणें, कर बसविणें; देणेंघेणें क., व्यवहार क.: to t. up a note at the bank; up arms लढाई चालू क., लढूं लागणें;—upon one's self आपणावर घेणें, पत्करणें; आपल्या कामीं लावणें; आपणास लावून घेणें, आपल्यावर घेणें (punishment).—*i.* fix or be fixed जडणें, लागणें, लागू होणें: the infection did not t.; gain reception चालणें, पटणें, मान्य

होणें: if the thing should t.; go जाणें, घेणें: the fox *took* to the hedge; after मागून जाणें, अनुसरणें, वळण घेणें; सारखा असणें, वळणावर -मोडणीवर जाणें; in with आश्रय धरणें; on सोंग घेणें; to सोकणें, सोकावणें; up वाटणें.—*n.* the quantity of fish captured at one catch एका खेपेस धरलेले मासे *pl*; [*Print.*, the quantity of copy taken in hand by a compositor at one time].—TAKING घेणें *n*, स्वीकार, ग्रहण *n*; धरणें *n*, अपहार; agitation तळमळ *f*, त्रेधा *f*, गडबड *f*.

TALC *Ar.* अभ्रक; calx of t. अभ्रक भस्म *n*; yellow t. पिंवळा अभ्रक.

TALE*, story गोष्ट *f*, कथा *f*, कहाणी *f*; reckoning गणती *f*, माप *n*, हिशेब; to be as a t. that is told नकल होणें; with full t. फडाचे मापानें, भरमापानें. -BEARER चुगल्या, चुगलीखोर, चहाड.

TALENT (*Gr. talanton*, a balance, *Skr. tul*, to bear, weigh) साडेसव्वीस शेरांचें एक वजन आहे; २४३७॥ रु० च्या किमतीचा तोडा -नाणें *n*; intellectual ability गुण; *pl* बुद्धि *f*, अक्कल *f*, प्राज्ञा *f*. -ED गुणी, बुद्धिमान.

TALISMAN *Ar.* ताईत, कवच *n*, पत्र *n*.

TALK *v. Sw.* speak freely बोलणें: to t. French; speak बोलणें, भाषण क.: to t. nonsense; consume in talking बोलण्यांत खर्चणें -गमावणें -दवडणें: to t. away an evening; over -विषयीं बोलणें (a matter).—*i.* बोलणें, गोष्ट क.: I will not t. with you; confer बोलणें, मसलत क.; prate वटवट -बडबड क., बकणें; of सांगणें, कथन क.; to बुद्धिवाद सांगणें, कान झाडणें, चार गोष्टी सांगणें -बोलणें: I will t. to my son respecting his conduct [about, of, with, to].—*n.* गोष्टी *f*, बाता *f*, संभाषण *n*; rumour गप *f*, बोलवा *f*; subject of discourse गोष्ट *f*, चर्चा *f*: this achievement is the t. of the whole town. -ATIVE *a.* बोलका, बहुभाष, वाचाळ, चावट. -ER बोलणारा, संभाषणकर्त्ता; वक्ता; वटवट करणारा, बडबड्या; mere t. तोंडचा शिपाई.

TALL *a. W.* उंच, उंच काठीचा -बांध्याचा.

TALLOW* चरबी *f*. -CANDLE चरबीची मेणबत्ती *f*. -CHANDLER चरबीच्या मेणबत्त्या विकणारा.

TALLY *F.* a stick with notches to mark numbers हिशेब ठेवण्या करितां खांडे पाडलेलें लांकूड *n*, सळई *f*; a match जोड, जवा.—*v. i.* जमणें, उतरणें, जुवा बसणें -मिळणें.—*t.* जमविणें, बसविणें [with].

TALON *F.* पंजा, नख *n*.

TAMARIND *Ar.* the tree and fruit चिंच *f*.

TAMBOURINE *F.* डफ *n*, टमकी *f*, तंबुरी *f*.

TAME* *a.* domesticated माणसाळलेला, पाळलेला, पाळीव, ग्राम्य; subdued जिंकलेला; spiritless लेचापेचा, मेंगा, नामर्द; flat पचपचीत, पळपळीत (poem)—*v.* माणसाळणें, सवयीचा क.; वश क., वठणीस आणणें. -LY *ad.* नामर्दपणानें, मेंगेपणानें: to submit t. to oppression.—TAMABLE *a.* माणसाळावयाजोगा, वश करायाजोगा, वश्य.

TAMPER* *v. i.* meddle लुडबुडणें, बुचा-लांडाकारभार क.; practice secretly वळवण्या करितां -फितवण्या करितां संधान -उद्योग चालवणें [with].

TAN *v. F.* impregnate with bark कमावणें, रांपवणें, तयार क. (leather); make brown काळा क.—*i.* काळसरणें, काळवटणें (the skin). -NER कातडें कमाविणारा, ढोर, चाम्हार. -PIT रावणी *f*, चांभाराची कुंडी *f*.

TANGENT (*tangere*, to touch) *Geom.* स्पर्शरेषा *f*; to fly off at a t. ओझरता जाणें.—TANGIBLE *a.* स्पर्श करायाजोगा, स्पर्शायाजोगा, स्पर्शनीय; capable of being realized मिळवायाजोगा, उत्पन्न करायाजोगा; readily apprehensible by the mind सहज समजा-

याजोगा, बुद्धिगम्य, सुगम.—TANGIBILITY स्पर्शाची योग्यता *f*, स्पर्शनीयता *f*.

TANGLE, See ENTANGLE—*n*. गुतागूत *f*, गुरफाटा, गळफाटा.

TANK (*stagnum*) तळें *n*.

TANTALIZE *v. F.* torment or tease by presenting pleasures which cannot be reached छळवणें, चालवणें, झुलवणें, आशेस लावणें [with, by].—TANTALIZATION चाळवणी *f*, झुलवणी *f*.

TANTAMOUNT *a.* (*tantus*, so much, and *amount*) बरोबर, समतोल -भाव [to].

TAP *v. F.* थापटणें, थोपटणें, थाप मारणें [with, at].—*n*. थाप *f*, थापटी *f*;—of the hand, upon a tabor छाप *f*, हात, थाप *f*.

TAP* *v.* पाणी दारू वगैरे पातळ पदार्थ काढण्या करितां (पिप, झाड, फोड इ० ला) भोंक -तोंड पाडणें.—*n*. भोंक *n*, तोंड *n*; पिपांतून दारू काढण्याची नळी *f*; a plug दट्टा, दट्ट्या; liquor which is measured out, as through a tap पिप वगैरेच्या तोंडांतून मोजून काढलेली दारू *f*. -ROOT मुळवा.

TAPE* फीत *f*, नवार *f*; लांब जंत, नाडीतंतु.

TAPER* बारीक मेणबत्ती *f*; a tapering form निमूळता आकार, गोपुच्छाकार.—*a*. निमूळता, चिंचोळा, शुंडाकृति.—*v. i.* बारकावणें, चिंचोळा असणें [off].

TAPESTRY (*tapete*) बुट्टीदार कापड *n*.

TAR* डांबर; a sailor खलाशी.—*v.* डांबर लावणें.

TARDY *a.* (*tardus*, slow) धिमा, सुस्त, मदाड, मंद; late मागस, मागून आलेला.—TARDINESS धिमेपणा, मंदाई *f*.

TARE *O. E.* निदण *n*.

TARE *F.* आभंड *n*, बारदान *n*.

TARGET*, a small shield ढाल *f*; a mark for marksmen to fire at in their practice निशाण *n*; t. practice चांदमारी *f*.

TARIFF *Ar.* जकातीचा निरखनामा.

TARNISH *v. F.* sully विटवणें, मळवणें, मजीत क.; destroy the purity of कलंक -बट्टा -डाग लावणें.—*i.* विटणें, मळणें, मजीत होणें.

TARRY *v. i. W.* stay behind मागें राहणें, राहणें; delay खोळंबणें, खोटी होणें, खोळंबून राहणें; abode राहणें, वस्ती क. [for, at, in].—*t.* खोळंबवणें, थांबवणें.—TARRIER थांबणारा, खोळंबा करणारा.

TARSAL *a. F.* घोटयाचा, गुडघ्याचा.

TARSUS (*L.*) घोटा.

TART* *a.* sour अंबट; sharp खरमरीत, चरमरीत (reply).

TART *a. F.* एक प्रकारचें पक्वान्न आहे.

TARTARUS (*Gr.*) *Gr. Myth.* यमलोक, नरक.

TASK (*taxare*, to rate) business imposed by another सोंपलेलें -मार्थी मारलेलें काम *n*, तोडून -वांटून दिलेलें काम *n*; business काम *n*; burdensome employment जड-अवघड-भारी काम *n*, जिकीर काम *n*; a lesson धडा; to take to t. धमकावणें, निषेध क., शब्दमार देणें.—*v.* काम नेमून देणें; oppress with severe burden पाठीवर धोंड देणें, काचणें. -MASTER काम नेमून देणारा, धडा घालून देणारा; overseer पाहणी करणारा, मुकदम.

TASSEL (*taxillus*, a little die) गोंडा, झुबका.

TASTE *v. F.* try by the touch of the tongue चाखणें, रुचि पाहणें, चव घेणें, स्वाद घेणें, जाणणें; try by eating a little मासल्या करितां खाणें-चाखणें, थोडेसें खाऊन पाहणें; essay अजमासणें, अनुभव घेणें, चाखणें, स्वाद जाणणें; partake of सेवन क., चव घेणें.—*i.* [of] चव घेणें; have a smack स्वाद असणें, वास -गंध -छटा येणें -मारणें.—*n*. स्वाद, रुचि *f*, चव *f*, चट *f*, गोडी *f*; intellectual relish अभिरुचि *f*, गोडी *f*; nice perception रसज्ञान *n*, रस, रसिकता *f*; small portion given as a specimen वानगी *f*, मासला; style शैली *f*, रीत *f*,

धाटणी *f*: the music composed in good t. [for]. -FUL *a.* रुचिकर, मजेदार, चवदार; exhibiting good taste मौजेचा, खुबीदार, छानदार, मजेदार. -LESS *a.* बेचव, निरस, फिका.

TATTLE *v. i. D.* prate बाता -गप्पा छाटणें, बकणें; tell tales चहाडी सांगणें, मुखरस पाघळणें [of, about].—TATTLER बाता छाटणारा, बडबड्या; चहाडखोर, चोंबडा.

TATTOO *v.* (?) गोंदणें.—*n.* गोंदलें *n.*

TAUNT *v. F.* लावून -खोचून बोलणें, ठोंमणा मारणें [with]. -ER लावून -टोचून बोलणारा. -ING ठोमणा, बोंचणी *f.* -LY *ad.* घालून पाडून, खोचून, उपरोधानें.

TAURUS (*L.*) वृषभरास *f.*

TAUTOLOGY (*Gr. tauto,* the same, *logos,* speech) पुनरुक्ति *f,* चर्वित चर्वण *n.*

TAVERN (*tabula,* a board) an inn पोचखाना, खाणावळीचें घर *n*; liquor-shop कलालाचें दुकान *n,* पिठें *n.*

TAW*, a marble to play with बट.

TAWDRY *a.* (from *St. Audrey*) दिखाऊ, पोशाकी, अहेरी.

TAWNY *a. F.* पिंगट, कपिल.

TAX (*taxare,* to value) a levy of any kind made upon property for the support of a government सरकारदेणें *n,* कर, दस्त, पट्टी *f*; a disagreeable duty खटखट *f,* पीडा *f,* लचांड *n*; charge दोष, बोल; t. on boats नजर गलबत *n*; house t. घरपट्टी *f,* उंबर, सारा; land t. सारा; *taxes* in money, not in kind नक्तीबाब *f*; t. on exports and imports जकात *f*; t. on shop-keepers and artificers of a village मोहतरफा.—*v.* कर -दस्त -पट्टी बसवणें; बोल लावणें, दोष ठेवणें: to t. a man with pride; [fix, or determine judicially, as the amount of cost on actions in court] [at, for, with]. -ABLE *a.* साऱ्याचा, कर बसविण्या -घेण्याजोगा (estate). -ATION कर -पट्टी बसवणें *n,* जमाबंदी *f.* -ER कर बसविणारा. -FREE *a.* गैर दस्त, दस्तीबाद.

TEA *Chin.* the leaves of a shrub चहा; decoction of the dried leaves of tea in boiling water चहा, चहापाणी *n*; the evening meal, at which tea is usually served संध्याकाळचें भोजन *n,* चहा. -CUP चहाचा प्याला. -POT चहादाणी *f.* -PLANT चहाचें झाड *n,* -चा रोप. -POY अडणी *f,* तिवयी *f.*

TEACH* *v.* impart the knowledge of शिकविणें, पढवणें;—in an ill-sense शिकविणें, कान फुंकणें, बीर भरणें; conduct through a course of studies शिकवणें, चालवणें (a school); accustom सवयी लावणें (Jer. ix. 5).—*i.* शिकवणें, शिक्षकाचें काम क., पंतोजीपणा क. -ER शिक्षक, शिकविणारा, पंतोजी, 'टीचर'; spiritual t. गुरु, आचार्य; t. of any of the arts वस्ताद. -ING शिकविणें *n*; उपदेश, शिक्षा *f.*—TEACHABLE *a.* शिकवायाजोगा -सारखा, शिक्षणीय; docile सुशिक्ष्य; सालस, गरीब.

TEAK (*Malbar, theka*) सागवान, साय, सायाचा वृक्ष.

TEAL *D.* पाणकोंबडा; cotton t. गिरजा *f.*

TEAM* जोत *n,* सांगड *f.*

TEAR* आसूं *n,* अश्रु *m, n,* नेत्रोदक *n*; flood of *tears* अश्रुधारा *f*; *tears* of affection प्रेमाश्रु *pl*;—of joy हर्षाश्रु *pl.* -DROP अश्रुबिंदु, टीप *n.*

TEAR* *v.* rend फाडणें, चिरणें, विदारणें; lacerate ओरखडणें, बोचकरणें; shatter तुकडे तुकडे -चुराडा -चकणाचूर क.: a state *torn* by factions; pull with violence तोडणें, ओढाताण क., ओढणें (the hair); up, off, away उपटणें, उचकटणें, उखळणें (a floor) [down, up, out, away, off, from].—*i.* rush with

violence धडकाऊन जाणें -चालणें; rage तडफडणें, धडफडणें.—*n.* चीर *f*, फाळा, भेग *f*.

TEASE* *v.* comb, as wool, or flax पिंजणें; scratch, as cloth in dressing for the purpose of raising a nap कापडावर फूल उठवण्या करितां खरवडणें; vex गांजणें, छळणें, जाचणें [by, with].

TEASEL* बिलोरी धोत्रा.

TEAT* आंचूळ *n*, आसड *n*; blind t. खुंट.

TECHNICAL *a.* (*Gr. techne*, an art) पारिभाषिक, लाक्षणिक, विशेष विद्येसंबंधी (phrases). -ITY पारिभाषिकत्व *n*, लाक्षणिकत्व *n*.

TEDIOUS *a.* (*tœdet*, it disgusts) wearisome कंटाळा -त्रास येण्याजोगा; slow चेंगट, दीर्घसूत्री. -NESS चेंगटाई *f*, चेंगट -चावटपणा, दीर्घसूत्र *n*.

TEEM* *v. i.* bear प्रसविणें, विणें;—as a plant फळ देणें; conceive गर्भ धरणें; be full प्रचुरमय असणें, भरणें, ऊत येणें: his mind *teeming* with schemes [with].—*t.* प्रसविणें, विणें.

TEENS *pl.* (from *teen*, ten) [the years of one's age having the termination *teen*, beginning with thirteen, and ending with nineteen]: the young lady is in her *teens* ती तरुण बाई विशीच्या आंत आहे.

TEETH (*pl.* of *tooth*) दांत *pl.*—*v. i.* दांत फुटणें -येणें. -ING दांत येणें *n*, दंतस्फोट.

TEGUMENT (*tegere*, to cover) आवरण *n*, वेष्टन *n*. कातडी *f*, कोश, टरफल *n*, इ०.

TELEGRAPH (*Gr. téle*, far, far off, *graphein*, to write) विद्युत् -तारायंत्र *n*, टेलिग्राफ.—*v.* तारायंत्रांतून बातमी पाठविणें [to].—TELEGRAM तारायंत्रांतून पाठविलेली -आलेली बातमी *f*, तार *f*.

TELESCOPE (*Gr. -skopein*, to view) दुर्बीन *f*.

TELESCOPIC, -AL *a.* दुर्बिनीचा; दुर्बिनींतून दिसणारा (stars); दूरचा -दूर पाहणारा, दूरदृष्टि (eye).

TELL* *v.* count मोजणें, गणणें; utter बोलणें, सांगणें, उच्चारणें; publish कळवणें, सांगणें, बाहेर काढणें (Gen. xii. 18); teach शिकवणें; inform खबर देणें, सांगणें: promised to t. me of; discover सांगणें, शोधून काढणें, उमगणें: the colors are so blended that I cannot t. where one ends and the other begins; to t. off मोजणें.—*i.* सांगणें, हिशेब देणें; take effect गुण येणें, कळून येणें; to t. heavily in the end अवघड -कठीण जाणें; to t. off चुगली क. -सांगणें. -TALE चुगलीखोर.

TEMERITY (*temere*, by chance) उतावळी *f*, घाई *f*, अविचार.

TEMPER *v.* (*tempus*, time) qualify, as by an ingredient मिसळून नेमस्त -बेताचा क., माफक क.; mollify नरमगरम क.; adjust बराबर -दुरुस्त -नीट क.; bring to a proper degree of hardness कठीण क. (iron); to t. hot water by pouring in cold विसळणें, विसळ घालणें [with, by].—*n.* मिसळीचा, नेमस्तपणा, मिसळ *f*; temperament प्रकृति *f*, देहस्वभाव; disposition प्रकृति *f*, मर्जी *f*, कदर *f*; moderation शांति *f*, संयम *n*; irritation चिडवणी *f*, खंवडाळणी *f*;—of metal पाणी *n*. -AMENT प्रकृति *f*, स्वभाव, तब्यत *f*; bilious t. पित्तप्रकृति *f*;—of equable t. समधात. -ANCE, habitual moderation in regard to the indulgence of the natural appetites and passions नेमस्तपणा, नियमितपणा, संयम *n*, नियंतृत्व *n*;—in eating नेमाचें -मोतादीचें खाणें *n*, मिताहार, अल्पाहार;—in drinking नेमाचें पिणें *n*, मितपान *n*. -ATE *a.* नेमस्त, नियमित, नियतवृत्ति; मितभोजी, मिताहारी; मितपानी, नेमानें पिणारा; not excessive परिमित, सौम्य (climate, heat); not violent शांत, थंड, सौम्य थंडाईचा (speech, language). -ATURE, degree of heat or cold उष्णशीतमान *n*, ऊनथंडीचें

प्रमाण *n*: the t. of the air; constitution तब्यत *f*, प्रकृति *f*.

TEMPEST (*tempestas*) वादळ *n*, तुफान *n*. -OUS *a*. वादळाचा, तुफानाचा, तुफानी.

TEMPLE (*templum*, a space marked out, a temple) देऊळ *n*, देवालय *n*.

TEMPLE (See TEMPER) कानपट्टी *f*, आंख.—TEMPORAL *a*. आंखाचा, कानपट्टीचा.

TEMPORAL *a*. (do.) काळाचा, काळसंबंधी; pertaining to the present world ऐहिक, प्रापंचिक; civil or political राज्यसंबंधी, मुलकी (power).—TEMPORARY *a*. दोन दिवसांचा, चालता, हंगामी, क्षणिक, क्षणभंगुर.—TEMPORIZE *v. i.* काळ -रंग -समय वागणें, समय पाहून वागणें, समयानुसरण क. [with].

TEMPT *v.* (*tentare*, to stretch) try यत्न क., झटणें; instigate चेतवणें, उठावणी क.; put to trial पारखणें, परीक्षा क.; entice to evil मोह घालणें, भुलवणें [with, by, to]. -ATION मोहणें *n*, मोह *n*, पापमोह; परीक्षा *f*, पारख *f*; state of being tempted परीक्षेची अवस्था *f*. -ER मोह घालणारा, मोहक; परीक्षक, पारखणारा, पारखी. -ING *a*. आकर्षक, मोहक. (pleasures).

TEN* *a*. दाहा.—*n*. दहांचा आंकडा, दहांची संख्या *f*, दहं *n*. -FOLD *a*. दहापट, दसपट.—TENTH दहावा. -LY *ad*. दहाव्यानें.

TENABLE *a*. (*tenere*, to hold) राखायाजोगा, धरून ठेवण्याजोगा, रक्षणार्ह; maintainable स्थापायाजोगा, चालायाजोगा, प्रतिपाद्य [by].—TENACIOUS *a*. holding fast चिकट, चिकटून -लगटून राहणारा; adhesive चिकट; holding stoutly to one's opinion or purpose चिकट, चिवट, आग्रही, दृढसंकल्प; t. of memory धारणाशक्तिविशिष्ट; of t. memory आठवणीचा बळकट; t. of life दुर्मर, जिवट. -NESS चिकटपणा, चिकटाई *f*.—TENACITY चिकटपणा, चिकटाई *f*; धारणा *f*, धारणाशक्ति *f*; आग्रहीपणा, निग्रह, चिकटपणा.—TENANT, *Law*, one who holds property of another आसामी *f*, कूळ *n*, सारेकरी, रयत *f*; a t. having no right of occupancy उपरी;—of a building भाडेकरी; occupant राहणारा; t. at will मनकुरी रयत *f*.—*v.* भाड्यानें राखणें घेणें. -RY रयत *f*, रयतावा.—TENANCY, भोगवटा, अधिकार, भोग; भाड्याचें घर *n*.

TEND *v.* (See ATTEND) राखणें, पाहणें, समाचार -घेणें; be attentive लक्ष देणें.—cattle or sheep राखणें, वळणें, चारणें.—*v. i.* move in a certain direction झुकणें, कल असणें, वळणें; aim रोख -धोरण -लक्ष असणें; contribute सहाय देणें -असणें -होणें [to, towards]. -ENCY कल, झोंक, ओढा, तोल, प्रवृत्ति *f*. -ER *v.* द्यावयास काढणें, पुढें ठेवणें; offer in words देऊं ह्मणणें, तोंडानें देऊं ह्मणणें.—*n.* ह्मटलेलें मोल proposal for performing a service advertised for कामकरण्याची अर्जी *f*, 'टेंडर' *n*; [a small vessel employed to attend a large one, for supplying her with provisions, &c.; a car attached to locomotives, to supply them with fuel and water].

TENDER *a*. (*tener*) delicate कोमळ, कोंवळा (plants); easily pained दुखरा, कोमळ, नरम (body); delicate सकुमार, नाजूक, कोमल (a woman); weak and feeble अशक्त, दुर्बळ; youthful तरुण, कोमल, कोंवळा: children are t.; compassionate दयाळू, दयार्द्र; dear आवडता, प्रिय; careful to save inviolate, or not to injure जपणारा, सावध, आस्थेवाईक: the civil authority should be t. of the honor of God and religion; gentle कोमलांतःकरण, कोमलचित्त; apt to give pain दुःखप्रद (subject); pathetic रसिक, मनोवेधक, द्रव आणणारा (expression). -HEARTED *a*. मनाचा कोंवळा, कोमलहृदय. -NESS कोमळपणा, नाजुकाई *f*, मृदुता *f*; हळवटपणा, नरमपणा; चित्ताची कोमलता *f*, कृपा *f*, करुणा *f*.—See the adj.

TENDON (*tendere*, to stretch) शीर *f*, स्नायूच्या शेंड्याकडचा रज्वाकार दृढकार, संधिबंधन *n*.

TENDRIL *F*. पागोरा, ताणा, तंतु.

TENEMENT (See TENABLE) house घर *n*, मकान *n*; *Law*, वतन *n*, मिरास *f*.

TENESMUS (*L*.) हगवणीची मुळमुळ *f*.

TENET (*tenere*, to hold) मत *n*, सूत्र *n*: religious *tenets*.

TENON (do.) कुसूं *n*, कूस *f*.

TENOR (do.) general course of thought विचाराचा रोख -चें धोरण *n*; purport अर्थ, आशय; *Mus*. मध्यसवन *n*; [a person who sings the tenor]; character गुण, लक्षण *n*; *Law*, exact copy of a writing, set forth in the words and figures of it यथामूलमत *f*, असल बरहुकूम नकल *f*, उतारा.

TENSE (*tempus*, time) *Gram*. काळ.

TENSE *a*. (*tendere*, to stretch) ताणलेला, ताठ. —TENSION ताठलेपणा, ताठा, ताण.

TENT (do.) तंबू, डेरा; *Surg*.—for a wound बत्ती *f*; rope of a t. ओढण *f*, तणावा; wall of a t. कनात *f*; porch of a t. तयारी *f*. -ER, -HOOK ताणण्याची अंकडी *f*; to be on the *tenters* जीव ओळकुंब्यांत असणें, चिमटयांत सांपडणें, दुग्धा असणें.

TENUITY (*tenuis*, thin) पातळपणा, बारीकपणा, सूक्ष्मता *f*; rareness कमीपणा, कमताई *f*, दुर्मिलता *f*: t. of blood.—TENUOUS *a*. पातळ, बारीक, सूक्ष्म.

TENURE (*tenere*, to hold) right of holding, as property सत्ता *f*, स्वत्व *n*; manner of holding lands, tenements, &c. स्वत्वप्रकार. सत्ताप्रकार, कबज *n*; deed of t. पट्टा, सनद *f*.

TEPID *a*. (*tepere*, to be warm) कोमट, सोमट, मंदोष्ण, सोमाळा. -ITY कोमटपणा, कोमटाई *f*.

TERM (*termen*) limit मर्यादा *f*, सीमा *f*; limited time मुदत *f*, वायदा; a word शब्द, वाक्य *n*, संज्ञा *f*, नाम *n*; *pl*. conditions संकेत, प्रतिज्ञा *f*, अड *f*, अट *f*, शर्यत *f*; session न्यायाधिशांची बैठक *f*, न्यायसभेचा काल; *Logic*—of a syllogism अवयव;—of an arithmetical series पद *n*; first s. आदिपद *n*; last t. अंत्यपद *n*; to bring to *terms* कबूल करविणें; वाटेवर आणणें; to make *terms* करार -कबुलात क.; stated t. बंदी मुदत *f*; *pl*. बोलण्या चालण्याचा भाव; good t. with रहस्य *n*, बनाव; मैत्री *f*, सौमनस्य *n*, सूत *n*; ill t. वांकडें *n*, वैमनस्य *n*, वितुष्ट *n*; person on ill t. with वांकडा; lowest t. निदान *n*. —*v*. बोलणें, -ला नांव देणें -चें नांव ठेवणें.

TERMAGANT *F*. केकसामावसी *f*, कैदासीण *f*, कैकया *f*.

TERMES *pl*. (*L*.) वाळवी *f*, उदई *f*.

TERMINATE *v*. (See TERM) limit हद्द -सीमा घालणें -बांधणें; end संपवणें, शेवट क. [by, with, at, in].—*i*. संपणें, समाप्त होणें, उरकणें.—*n*. हद्द *f*, सीमा *f*, खूण *f*.—TERMINATION अंत, शेवट, अवधि; *Gram*. अंत्य वर्ण. —TERMINUS (*L*.) मर्यादा *f*; extreme point at either end of a piece of railway आगगाडीच्या रस्त्याची थोप *f*.

TERRACE (*terra*, the earth) a raised bank of earth ओटा; the flat roof of a house माळवद *n*, धाबें *n*.

TERRESTRIAL *a*. (do.) पृथ्वीचा, पृथ्वीवरचा; t. animals भूचर, स्थलचर; consisting of the earth मातीचा, पार्थिव, मृन्मय (globe); sublunary भूलोकचा, इहलोकचा; belonging to land जमिनीचा, खुश्कीचा: the t. parts of the earth.—TERRITORY अमलांतला देश, मुलूख.—TERRITORIAL *a*. अमलांतल्या देशाविषयींचा, मुलकी.

TERROR (*terrere*, to frighten) धास्ती *f*, भय *n*, दरारा; cause of fear भयाचें कारण *n*, भय *n*, भयहेतु.—TERRIBLE *a*. भयंकर, भयानक;

excessive भारी, जोराचा, जबरदस्त: t. coldness of the weather [to].—TERRIFY *v.* भेडावणें, भिवविणें, भय घालणें [by, with].—TERRIFIC *a.* भयंकर, भयानक.

TERSE *a.* (*tergere,* to rub off) elegantly concise नीट, नेटका, संस्कृत (language).

TERTIAN *a.* (*tertianus*) तिजांतरा, त्र्याहिक. —*n.* तिजांतरा ताप, त्र्याहिकज्वर.

TEST (*testa,* earthen vessel) a vessel in which refiners try metals मूस *f*; trial परीक्षा *f,* कसोटी *f*; means of trial कसोटी *f,* परीक्षासाधन *n*; touchstone कसोटी *f,* वरकल *m f n*; ground of admission or exclusion परीक्षा *f,* कसोटी *f*; distinction विचार, भेद; *Chem.,* a substance employed to detect any unknown constitute of a compound, by causing it to exhibit some characteristic property कसोटी *f,* परीक्षासाधन *n.*—*v.* परीक्षा क., पारखणें, कसोटीस लावणें : to t. gold सुलावणें.

TESTACEOUS *a.* (*testa,* a shell) शिंपल्याचा, शंखविशिष्ट ; t. animal शंखवासी जीव ; t. powders, *Med.* शंखभस्म *n.*

TESTAMENT (*testis,* a witness) a will मृत्युपत्र *n*; [one of the two general divisions of the canonical books of Sacred Scriptures]; Old T. जुना करार; New T. नवा करार. -ARY *a.* मृत्युपत्र संबंधी ; bequeathed by will मृतलेखदत्त.—TESTATE *a.* मृत्युपत्र केलेला ; a person is said to die t. मृत्युपत्र करून मरणें.—TESTATOR मृत्युलेख करणारा.

TESTER (*testa,* the skull) पलंगाचें छप्पर *n*;—over a pulpit, tomb, &c. छत्री *f.*

TESTICLE (*testis*) अंड, आंड ; enlargement of the *testicles* कोश -अंडवृद्धि *f,* अंतर्गळ ; having testicles अंडील.

TESTIFY *v. i.* (*testis,* a witness, *facere,* to make) साक्ष -शाहिदी देणें (John ii. 25); *Law,* make a solemn declaration under oath प्रतिज्ञेवर लिहून देणें -सांगणें इ० (Num. xxxv. 30) ; declare a charge दोष लावणें (Ps. i. 7.)—*t.* साक्ष भरणें -देणें; प्रतिज्ञा क., प्रतिज्ञेवर सांगणें [to].—TESTIMONY, a solemn declaration or affirmation made for the purpose of establishing or providing some facts साक्ष *f,* प्रतिज्ञापूर्वक साक्ष *f*; affirmation साक्ष *f,* पुरावा; profession कबुलात *f*; witness साक्षी ; the whole divine revelation ईश्वरी शास्त्र *n* (Ps. xix. 7).—TESTIMONIAL खातरीचा कागद -लेख -पत्र *n,* आब्रूपत्र *n,* 'सर्टिफिकिट' *n.*

TESTY *a. F.* खिसखिशा, तुसडा, खडतर, दाष्ट.

TETE-A-TETE *F.* भाषण *n,* संभाषण *n,* तोंडास तोंड *n*; [a form of sofa for two persons, so curved that they are brought face to face while sitting on different sides of the sofa].

TETHER *W.* चारणीची दोरी -सडक *f,* काहाडणी *f.* —*v.* चरायासाठीं दोरी लावून बांधणें.

TETRARCH (*Gr. tetra,* four, *archos*) लहानसा -चौथाईदार राजा.

TETTER*, a vesicular disease of the skin दाद *f.*

TEXT (*textus,* texture) a discourse or composition on which a note or commentary is written मूळग्रंथ, मूळ *n*; a verse or passage of Scripture as the subject of discourse, or in proof of a doctrine प्रतीक *n,* विधि, वचन *n,* शास्त्रवाक्य *n.* -UAL *a.* वचनांतील, वाचनिक. -URE, act of weaving विणणें *n*; that which is woven विणलेलें कापड *n,* विणपें *n*; connection of threads विणकर *f,* वीण *f,* सूतपोत *n*; disposition of parts रचना *f,* जुळणी *f*; of strong t. धनवट ; of fine t. तलम, तलमसुती ; of coarse t. जाडसुती, भरडसुती.

THAN* *conj.* पेक्षां, हून.

THANK* उपकार स्वीकार, कृतज्ञतादर्शन *n*; *pl* उपकारस्तुति *f.*—*v.* express gratitude to for a favor उपकार मानणें -दाखविणें, आभार

मानणें [for]. -FUL *a.* उपकारी, आभारी, कृतज्ञ. -FULLY *ad.* कृतज्ञतापूर्वक, उपकार मानून. -FULNESS उपकारीपणा, कृतज्ञता *f.* -LESS *a.* अनुपकाराचा, कृतघ्न. -WORTHY *a.* उपकार मानण्यास योग्य; meritorious लायक, योग्य.

THAT* *pron.* तो, ती *f,* तें *n*; which जो, जी *f,* जें *n.*—*conj.* जें, कीं.

THATCH* छप्पर, शाकारणी *f.*—*v.* शाकारणी -छप्परबंदी क., छप्पर घालणें. -ER छप्परबंद.

THAW* *v. i.* melt वितुळणें, पाझरणें (ice); become so warm as to melt ice and snow बर्फ वितळे इतकी उष्णता होणें (weather).—*n.* बर्फाच्या -गोठलेल्या पाण्याचा पाझर.

THE* *art.* तो, ती *f,* तें *n,* हा.

THEATRE (*Gr. theatron*) playhouse नाटकगृह *n*; a place of action or exhibition भूमि *f,* आखाडा, फड, रंगभूमि *f.*—THEATRICAL *a.* नाटकाचा, नाटक संबंधी.

THEE* *pron.* तुला; of t. तुझा.

THEFT* चोरी *f,* चौर्य *n*; a petty t. भुट्टेचोरी *f.*

THEIR* *pron.* त्यांचा; ह्यांचा.

THEISM (*Gr. theos,* God) belief or acknowledgment of the existence of a God, as opposed to *atheism* आस्तिक्य *n,* ईश्वर -आस्तिकवाद.—THEISTIC, -AL *a.* आस्तिक्य संबंधी, ईश्वरवादाचा.

THEIST आस्तिक, ईश्वरवादी.

THEME (*Gr. thema*) subject विषय, प्रकरण *n*; a short dissertation composed by a student निबंध, अल्पप्रबंध.

THEN* *ad.* at that time तेव्हां, त्या वेळीं -समयीं; afterward मग, नंतर (Matt. v. 24); therefore यास्तव; at another time दुसऱ्या वेळीं: now and t. कधीं कधीं; till t. तोंपर्यंत. —*conj.* तर, तरी, ह्मणजे, तसें झालें असतां, तर: if all this be so, t. man has a natural freedom.

THENCE* *ad.* from that place तेथून, तेथपासून, तिकडून; from that time तेव्हां पासून त्या वेळेपासून; for that reason तसें झालें असतां, ह्मणून, तशांत. -FORTH *ad.* तेव्हांपासून. -FORWARD *ad.* त्यापासून पुढें.

THEOCRACY (*Gr. theos,* God, *kratein,* to rule) government of a state by the immediate direction or administration of God ईश्वरकर्तृक राज्य *n.*—[THEOCRASY (*Gr. -crasis,* a mixing) a mixture of the worship of different gods, as of Jehovah and idols].—THEOGONY (*Gr. -genos,* birth) देवोत्पत्ति *f,* देवसर्ग.

THEOLOGY (*Gr. -legein,* to speak) the science of God and his relation to his creatures ईश्वरविद्या *f,* अध्यात्मविद्या *f*; *Hind.* t. ब्रह्मविद्या *f* -ज्ञान *n,* वेदांत.—THEOLOGIAN परमार्थज्ञानी, ईश्वरविद्यावेत्ता; ब्रह्मज्ञानी.—THEOLOGICAL *a.* परमार्थविद्या -ईश्वरविद्या विषयक, ईश्वरविद्येचा; वेदांताचा

THEORY (*Gr. theorein,* to look at) speculation कल्पना *f,* अनुमान *n,* तर्क; exposition of the general principles of any science उपपत्ति *f,* शास्त्रार्थ, बीजनिर्देश; science distinguished from the art विद्या *f,* शास्त्र *n.*—THEORETICAL *a.* काल्पनिक, मनोमय, मानसिक.—THEORIST कल्पना काढणारा, उपपत्ति लावणारा.—THEORIZE *v. i.* कल्पना -तर्क काढणें -बसवणें -बांधणें -रचणें.

THERAPEUTICS *sing. & pl.* (*Gr. therapeuein,* to heal) *Med.* औषधाची योजना *f,* योजना *f.*

THERE* *ad.* तेथें, तिकडे; here and t. इकडे तिकडे, जागोजाग. -ABOUT, -ABOUTS *ad.* near that place आसपास, आगेमागें, आरतापरता; nearly सुमारें, त्या सुमारास: ten men or t. -AFTER *ad.* त्यानंतर, नंतर, तदनंतर; according to त्याप्रमाणें. -AT *ad.* त्या ठिकाणीं; on that account त्यामुळें. -BY *ad.* त्यावरून, त्यामुळें. -FORE *ad.* ह्मणून, मुळें, स्तव, सबब, करितां. -FROM *ad.* त्यापासून. -IN *ad.* त्यांत (त्याजागीं -वेळीं -गोष्टींत -बाबतींत). -INTO *ad.* त्या जागीं

-स्थळीं, त्यांत. -OF *ad.* तेथचा, तेथील (Gen. ii. 17). -ON *ad.* त्यावर, ह्यावर. -OUT *ad.* त्यावरून, त्यांतून. -TO *ad.* त्याला; ह्याला. UPON *ad.* त्यावर, त्यावरून; at once लागलाच. -WITH *ad.* त्यासुद्धां -सहित (Phil. iv. 11).

THERMOMETER (*Gr. thermé,* heat, *metron,* measure) शीतोष्णमापक यंत्र *n.*

THESIS (*L.*) a position or proposition which a person advances and offers to maintain, or which is actually maintained by argument पक्ष, प्रतिज्ञा *f,* सिद्धांत; theme विषय; [an essay presented by a candidate for a diploma].

THEY* *pron.* ते;—used indefinitely माणसें *pl,* लोक *pl*; t. say लोक ह्मणतात.

THICK* *a.* dense दाट (vapors); turbid गढूळ, गदळ (water); close दाट, गच्च (people); following in quick succession एका मागून -एकावर एक येणारा, दाट: favors came t. upon him; *Geom.* घन; having more depth or extent from one surface to its opposite than usual दाट, जाड (paper, cloth, plank);—voice दाटलेला, घोगरा; dull मंद, बहिरट: t. of hearing; intimate सलगीचा, खेळीमेळीचा; closely set दाट, घन, गच्च.—*n.* भर, ऐन *f,* जोर, in comp. भर: भर लढाई the t. of the fight. -LY *ad.* दाट, गच्च, जवळ जवळ; in quick succession पाठोपाठ, लागोपाठ. -EN *v.* जाड -घट्ट क., अटवणें, थिजवणें.—*i.* अटणें, आळणें, जमणें; दाटी होणें, दाटणें; become quick and animated तडखा -कडाखा होऊं लागणें, बितणें, जमणें. -ING मिळण *n,* मिळवण *n.* -ET झाडी *f,* जाळी *f,* झुडूप *n.* -NESS जाडपणा, जाडी *f*; स्थूलता *f*; दाटी *f,* दाटपणा; गाढपणा, निबिडपणा: the t. of trees; जाडी *f,* घनत्व *n*: t. of a board; मंदपणा, मांद्य *n,* जडपणा, जाड्य *n.* -SET *a.* अटस, घट्ट.

THIEF* चोर; a petty t. भुट्टेचोर.—THIEVISH *a.* चोरटा, चोरीच्या स्वभावाचा; चोरा सारखा; चोरीचा; चोर: t. practices चोरचाळे *pl.* —THIEVE *v. i.* चोरी -चोरचाळे क. [from].

THIGH* मांडी *f,* जांघ *f.*

THILL* गाडीची दांडी *f,* शेलें *n.* -HORSE धुरेचा घोडा, धुरकरी.

THIMBLE* अंगुस्तान *n.*

THIN* *a.* not thick पातळ, बारीक (paper); rare पातळ (milk); not close पातळ, तुरळ, क.: the grass is t.; not full बारीक, रोड, शुष्क, कृश, क्षीण (ears of corn); lean बारीक, कृशांग, पातळ आंगी, किडकिडीत: some animals are naturally t.; fine बारीक, सूक्ष्म (sound); flimsy विरविरीत, झिरझिरीत.—*v.* बारीक -पातळ क.; पातळ -विरळ क. -LY *ad.* पातळ, बारीक; विरळ, तुरळक, विसकळ. -NESS पातळपणा, बारकाई *f*; सूक्ष्मता *f,* इ०.—See the adj.

THINE* *pron.* तुझा.

THING* inanimate object वस्तु *f,* पदार्थ; a separate being, whether animate or inanimate व्यक्ति *f,* वस्तु *f*; event गोष्ट *f*; something कांहीं एक, कांहीं अंश; affair गोष्ट *f,* विषय, पदार्थ; *pl* चीज *f,* वस्त *f,* सामान *n,* वस्त्रपात्र *n.*

THINK* *v. i.* exercise the mind मनोव्यापार क., चिंतणें; remember आठवण क.: I would have sent the books, but I did not t. of it; reflect चिंतणें, विचार -ध्यान क. (Mark xiv. 72); form an opinion वाटणें, समजणें, भासणें: I t. it will rain to-morrow; intend मनांत येणें -असणें: I *thought* to promote thee to great honor; presume अभिमान बाळगणें, समजणें (Matt. iii. 9);—much of माननें, लेखणें [of].—*t.* कल्पणें, मनांत आणणें, कल्पना क.; माननें, लेखणें, मोजणें; design योजणें, बेत क. -ING विचारवंत, बुद्धिविशिष्ट. —*n.* विचार, कल्पना *f*; चिंतन *n,* चिंतना *f.*

THINK* *v. i.* दिसणें, भासणें, वाटणें: *methinks.*

THIRD* *a.* ordinal of three तिसरा; तिसऱ्या भागाचा.—*n.* तृतीयांश, तिसरा वांटा -भाग; [the sixtieth part of a second of time; *Law*, the third part of the estate of deceased husband which, by some local laws, the widow is entitled to enjoy during her life]. -LY *ad.* तिसऱ्यानें.

THIRST*, vehement desire for drink तहान *f*, तृषा *f*; eager desire सोस *f*, हव्यास, तृषा *f*; drought अवर्षण *n*, कोरड *n*, शोष. —*i.* for तहान लागणें; सोस -हव्यास लागणें: my soul *thirsteth* for the living God [for, after].—THIRSTY *a.* तहानेला, तहान लागलेला, तृषाक्रांत; parched भुकिस्त, निर्जल (Ps. lxiii.); हव्यासी, सोसी.

THIRTEEN* *a.* तेरा.—*n.* तेराचा आंकडा.—THIRTEENTH *a.* तेरावा; तेराव्या भागाचा. t. lunar day त्रयोदशी *f*.—*n.* तेरावा भाग.

THIRTY* *a.* तीस.—*n.* तिसांची संख्या *f*.—THIRTIETH *a.* तिसावा.—*n*, तिसावा भाग.

THIS* *pron.* हा, ही *f*, हें *n*.

THISTLE* उंटकटारा, काटे धोत्रा इ० प्रकारचें कांटेझाड *n*, कांटाळी *f*?

THITHER* *ad.* तिकडे; hither and t. इकडे तिकडे.

THONG* वादी *f*, कातड्याची पट्टी *f* -चा पट्टा.

THORAX (*L.*) ऊर, छाती *f*, वक्षस्थल *n*.—THORACIC *a.* छातीचा, उराचा (arteries).

THORN*, a sharp process from the woody part of a plant कांटा, कंटक; a tree armed with thorns कांटेंझाड *n*, कंटकवृक्ष; trouble कांटा, सल *n*. -APPLE धोत्रा.—THORNY *a.* कांट्याचा, कांटेरा; जाचाचा, त्रासाचा, जिकिरीचा.

THOROUGH* *a.* passing through आरपार जाणारा -गेलेला, सावंत; complete पुरा, पूर्ण, पक्का (poet). -FARE हमरस्ता, रहदारीचा रस्ता; frequented street आल्या गेल्याचा -वहाता रस्ता. -LY *ad.* पुरतेपणीं, पक्केपणीं. -PACED *a.* पक्का, पुरा.

THOU* *pron.* (*Skr. tvam*) तूं.—*v.* अरेतुरे -हुमरी-तुमरी क.—*i.* अरेतुरे ह्मणणें.

THOUGH* *ad.* and *conj.* जरीं; as th. जसें कांहीं, जणूं कांहीं.

THOUGHT*, act of thinking मनन *n*, चिंतन *n*. विचार; serious consideration ध्यान *n*, मनन *n*, विचार; idea कल्पना *f*, तर्क, भास; intention मनांतील गोष्ट *f*, मनोदय, मनोगत *n*, कल्पना *f*. (Ps. lvi.5); concern काळजी *f*, चिंता *f*; evil t. कुकल्पना *f*; speed of t. मनोवेग; beyond t. अचिंत्य. -FUL *a.* विचारवान -शीलवत; ध्यानस्थ, मननशील, चिंतायुक्त, सचिंत. -FULNESS विचारीपणा, विचारशीलता *f*; ध्यानशीलता *f*, ध्याननिष्ठा *f*. -LESS *a.* अविचारी, निश्चिंत, निष्काळजी; stupid मूर्ख, विवेकहीन, अविचारी.

THOUSAND* *a.* हजार, सहस्र; consisting of a great number लाख, लक्ष, सहस्र; one of a t. लाखाचा मनुष्य, हजारांत एक.—*n.* सहस्र; by thousands हजारों, सहस्रशः.

THOWL*, a rowlock खुंट.

THRALDOM* गुलामगिरी *f*, दासत्व *n*.

THRASH* *v.* beat out grain from झोडणें, मळणी क., मळणें; beat soundly with a stick or whip झोडणें, चोपणें [out].—*i.* मळणी क.; drudge काबाड काम -कष्ट क., दगडफोड क. -ING-FLOOR खळें *n*.

THREAD*, a small twist of cotton drawn out to considerable length दोरा, धागा, सूत *n*; filament,—as of a flower तंतु, तार *f*; a line of gold or silver तंतु, तार *f*; something continued in a course सूत *n*, संविधान *n*, अनुसंधान *n*; spiral part of a screw वेढा; sacred t. of the Hindu जानवें *n*, यज्ञोपवीत *n*; t. investiture मुंज *f*, मुंजीबंधन *n*.—*v.* ओवणें, गोवणें; pass through, as a narrow way अरुंद वाटेनें पार जाणें.

THREAT* भेडावणें *n*, भेडसावणें *n*, धमकी *f*. -EN *v*. भय -धाक घालणें -दाखवणें, भेडसावणें, भेडावणें; exhibit the appearance of something evil or unpleasant as approaching to or towards रंग -राग -डौल दाखवणें: the clouds t. us with rain [with]. -ING भयप्रदर्शक -सूचक.

THREE* *a*. (*Skr. tri*) तीन.—*n*. तिनाचा आंकडा, तिनांची संख्या *f*. -FOLD *a*. तिप्पट, तिहेरी, त्रिगुण. -SIDED तिबाजू.

THRENODY (*Gr. threnos, odé*, song) a song of lamentation मरशा.

THRESH, See THRASH [out].

THRESHHOLD*, ground under a door दारवठा, उंबरा; outset आरंभ, उपक्रम.

THRICE* *ad*. तिनदां, त्रिवार, तीन वेळां; repeatedly वारंवार.

THRIFT* *a*.—See under THRIVE.

THRILL* *v*. pierce टोंचणें, वेधणें.—*i*. झणझणणें, घणघणणें, सणसणणें, भिरभिरणें: a sharp sound *thrills* in the ear;—as in the body शिसारी -शिरशिरी येणें [with, through]. —*n*. शिसारी *f*, शिरशिरी *f*, स्फुरण *n*.

THRIVE* *v. i*. prosper भरभराट असणें, जमणें, रंगास चढणें; grow पोसणें, जीवधरणें, वाढणें [upon, with].

THROAT*, fore part of the neck गळा, घसा, कंठ; pharynx घसा; up to the t. आकंठमर्याद.

THROB *v. i*. (*Gr. thorobein*, to make a noise) उडणें, ठणकणें; palpitate ऊर उडणें, धडकी बसणें [with].—*n*. ठणका, स्फुरण *n*.

THROE*, extreme pain अतिवेदना *f*; anguish of travail in childbirth वेण *f*, प्रसूतिवेदना *f*.—*v. i*. वेदना देणें, तिडका येणें.

THRONE (*thronus*) royal seat गादी *f*, सिंहासन *n*, राजासन *n*, तक्त *n*; sovereign power राज्याधिकार, गादी *f*; an exalted personage आर्य, महाराज.—*v*. गादीवर बसवणें; मोठ्या पदावर बसवणें, पदारूढ क.

THRONG* जमाव, दाटी *f*.—*i*. दाटी -भीड होणें; जमून येणें [in, together].—*t*. दाटी क.; दाटी करून -खेटून त्रास देणें.

THROUGH* *prep*. from end to end पार, आरपार; within आंत; by means of करून, करवी, मारफत; over the whole surface of भर, आंतून: to ride t. the country; in the way of passage मधून, वाटेंतून: to run t. a thicket, as a deer; from beginning to end पहिल्या पासून शेवट पर्यंत, साद्यंत, भर: t. the year.—*ad*. आरपार, पार; पहिल्या पासून शेवट पर्यंत, साद्यंत: to read a letter t.; to the end शेवटास, कडेस: to carry a project t.; to drop t. तुकडे तुकडे होऊन पडणें; नाश पावणें; to fall t. सुटणें, पडणें. -OUT—of time शेवट पर्यंत, भर, पर्यंत;—of space एथून तेथून, साद्यंत, भर.

THROW* *v*. hurl झोंकणें, झुगारणें, फेंकणें; overturn in wrestling चीत -जमीनदोस्त क.; venture at dice फांसा टाकून पाहणें, फांसा टाकणें; cast टाकणें, गाळणें; drive by violence आपटणें, आदळणें: a vessel *thrown* upon a rock; away घालवणें, दवडणें, उधळणें (time, money); वर्ज्य क., टाकणें; back उलट जाब देणें; वर्जणें, नाकारणें; by एकीकडे -सांदीकोंदीस टाकणें (a garment); down पाडणें, पाडून टाकणें (a wall); मान हलका क.; in आंत सोडणें, घालणें; दुसऱ्यापासीं ठेवणें; अजमासानें घालणें; सोडणें, टाकणें; off काढणें, उतरणें; दूर क., टाकणें, सोडणें: to t. all sense of shame; on लादणें;—one's self down अंग टाकणें, निजणें, लवंडणें;—one's self on ओठंगणें, टेंकणें; out सुचवणें, दर्शवणें (an observation); बाहेर टाकणें, फेंकणें; up सोडणें, टाकणें; ओकणें, उलटी क. [at, against, from, through].—*n*. टाकणें *n*, प्रक्षेप;—of dice डाव; distance which a missile is or may be thrown ठप्पा, पल्ला.

THRUM *Icel.* वस्त्राच्या दशा *f pl.*—*v.* तारा तोडणें, अनाडीपणानें वाजवणें [on, upon].

THRUSH*—the bird मदनसारिका *f*; *Med.*, minute ulcers covered with a curd-like exudation, found in the mouth मुखमौक्तिक *n*.

THRUST* *v.* push ढकलणें, रेटणें; drive in खुपसणें, खोचणें; away ढकलणें, ढकलून देणें; in खोचून देणें; on पुढें चालवणें, रेटणें; one's self घुसणें, शिरणें; through भोसकणें, ढुसकणें; together दडपणें, चेपणें [with].—*i.* ढुसकी मारणें; आंत शिरणें, पुढें ढकलणें.—*n.* धक्का, धडकी *f*; खुपसणी *f*; ढुसणी *f*.

THUMB* हाताचा अंगठा; one under the t. of छापा खालचा गृहस्थ.—*v.* soil with the thumb or the fingers अंगठ्याचा डाग पाडणें; handle awkwardly अडाणी रीतीनें हातांत धरणें, हातळणें; play with the fingers बोटें चाळविणें: to t. over a tune.

THUMP *Ger.* धपका, धपाटा.—*v.* धपकन मारणें, अपटणें; बुकलणें, कुमलणें [with].—*i.* धप्पा देणें, थडकणें; धपकन पडणें -अदळणें -अपटणें [on].

THUNDER*, sound which follows the flash of lightning गडगडाट, मेघगर्जना *f*, मेघनाद; loud noise गर्जना *f*, गडगडाट.—*v. i.* गर्जणें, गर्जना क.; गडगडणें, गडबड क.—*t.* धडकावून -खणकावून बोलणें [at]. -BOLT वीज *f*, वज्र *n*. -STORM विजेचा पाऊस. -STRUCK दंग, थक्कीत, चकित.

THURSDAY* बृहस्पति-त वार, गुरुवार.

THUS* *ad.* in this manner असा, याप्रमाणें; to this degree इतका.

THWART* *ad.* आडवा.—*v.* मोडा घालणें, अडथळा क., आडवा येणें [in, by].—*i.* move across आडवा जाणें -फिरणें.

THY *pron. O. E.* तुझा. -SELF तूंच, आपण.

TIARA (*L.*) मुगूट, किरीट.

TIBIA (*L.*) नडगी *f*, नळी *f*.

TICK *F.* गोचीड; (prob. from *ticket*) उचापत *f*, उधार *n*.—*v. i.* उचापत देणें, उधार देणें. *D.* टिकटिक वाजणें -शब्द क.—*n.* टिकटिक शब्द.

TICKET *F.* written token चिट्ठी *f*, दाखला; lable चिट्ठी *f*, चकती *f*; as appended to show number and price अंकपट्टी *f*, बीज *n*; as in a lottery टीप *f*, 'टिकीट' *n*, *f*; a certificate or token of right of admission to a place of assembly, or to enter and be carried in a public conveyance दाखलेचिट्ठी *f*, 'टिकीट' *f*, *n*: a railroad t.; a theatre t.—*v.* चिट्ठ्या मारणें -लावणें; टिकिटीवरून ओळखणें; टिकीट देणें [with].

TICKLE* *v.* touch lightly and cause to laugh गुदगुली क.; please by slight gratification थोडक्यांत खुश क. [by, with].—*i.* गुदगुली होणें; गुदगुली क.—TICKLISH *a.* ज्यास गुदगुल्या लवकर होतात तो; unfixed डळमळीत, लटपटीत; difficult कठीण (times).

TIDE*, flux and reflux of the sea भरती *f*, ओहटी *f*; current ओघ, प्रवाह: t. of blood; tendency कल, झोक: time's t. कालदशा *f*; high t. समा; spring t. उधाण *n*; neap t. भांग.—TIDY *a.* चकपक, साखसुरत, ठाकठीक.—TIDINESS चापचोपी *f*, चकपक *f*.—TIDINGS खबर *f*, बातमी *f*, वार्ता *f*.

TIE* *v.* bind बांधणें, बांधून टाकणें, तांगडणें; knit गोवणें, ओवणें; fold गुंडाळणें, बांधणें, लपेटणें; restrain आवरणें, बांधणें, गोवणें; down बांधून ठेवणें, तांगडणें; up जखडणें, तांगडणें;—with a knot गांठ देणें -मारणें [with, to].—*n.* बंद, बंधन *n*, पाश; obligation moral or legal गांठ *f*, नातें *n*, धागादोरा;—as of husband and wife of the soul and body रेशमाची गांठ *f*; knot of hair बुचडा;—as of a necklace गळसरीचा दोरा.—TIED बद्ध, बांधलेला.

TIFFIN *P. E.* फराळ, उपहार, 'टिफिन' *f.*

TIGER (*tigris*) वाघ, व्याघ्र; tiger's skin व्याघ्रचर्म *n.*—TIGRESS वाघीण *f.*

TIGHT *a.* not loose ताठ, तंग; close घट्ट, गच्च, दाट;—as a garment तंग, अटस, अवळ; compact सुटसुटीत, अटोपसार, घट्ट; neat नीट, नीटनेटका. -EN *v.* अवळून बांधणें, अवळणें, ताणणें. -NESS ताठा, ताठपणा, ताण; तंग -अवळ -घट्टपणा; parsimoniousness कृपणपणा, चिकूपणा; stringency तंगचाई *f*: t. of the money market.

TILE* कऊल *n*, कौल *n.*—*v.* कौलें लावणें, शेकारणें [in].—TILING कौलार *n*, खपरेल *n*; tiles कवलें *n pl.*

TILL* *v.* नांगरणें. -AGE नांगरणी *f*, शेती *f*, लागवड *f*. -ER नांगरणारा, शेतकरी.

TILL* *prep.* पर्यंत, पावेतों; t. now आजपर्यंत.

TILT*, covering over the head भुरका, भुरकी *f*; covering for a cart, boat, &c. भुरका, पाल *n*, चांदवा, छत *n*, इ०; the military exercise भालेकरोली *f*; thrust ढुसणी *f*, खुपसणी *f.*—*v.* कलंडणें, कलंडून ओतणें; ढुसणें, खुपसणें; घणानें ठोकणें, घण मारणें [up, over].

TIMBER* इमारती -सुतारकामी लांकूड *n*;—of a house लांकडीकाम *n*, लांकूड *n*.

TIMBREL *Sp.* डफ *n*, खंजिरी *f*.

TIME*, portion of duration काळ, वेळ *m, f*; a proper time प्रसंग, वेळ *f*: there is a t. for every purpose; unmeasured duration काळ: space and t.; duration of one's life आयुष्य *n*: your t. is not your own; it belongs to God, to religion, to mankind; age काळ, युग *n*: ancient t.; allotted period वेळ, समय, मुदत *f*, अवधि *f*: the t. of life is short; delivery प्रसूतकाळ, वेळ *f*, दिवस *pl*: she was within one month of her t.; repetition वेळ, वेळा *f*, वार (दोनवेळां, त्रिवार); state of things at a particular period काल, दिवस *pl*: good *times*, hard *times*; at a certain t. एकदां, कोण्याएका काळीं; present life इहलोक -जन्म t. or eternity; tune ताल, गत *f*; *Gram.* काल; in the course of t. कालेंकरून, कालगतीनें; lapse of t. कालगति *f*, कालचक्र *n*; spirit of the t. कालमाहात्म्य *n*, युगधर्म; to kill t. काल लोटणें -ढकलणें; to spend t. rightly सत्कालक्षेप क.; for a long t. वाढवेळ; given t. नियमित काल; of t. immemorial कै काळचा, काळोकाळचा; the three *times* (past, present, and future) कालत्रय, कालत्रयीं; in the three *times* त्रिकाल; *times* are changed कालचक्र फिरलें, दिवस मागें पाहतात; up to that t. तावत्काल; to take one's t. सावकाशीवर घेणें; in good t. सुवेळीं, वेळेवारीं; unseasonable t. अवकाळ, गैरहंगाम; to consider t. and season वेळ अवेळ पाहणें; according to the t. समयानुसार; at some t. or other कधीं तरी; at *times* कधीं कधीं, कधींमधीं; hard *times* कठीण दिवस *pl*, कडू काळ; from t. to t. वारंवार, वेळोवेळां; to have t. पावणें; in t. and tune तालसुरीं; mean or common t. मध्य *n*, घन *n*; beat t. with a song तालधरणें: *Mus.*, quick द्रुत *n*, ओघ; slow t. ठाय *f*; with reference to repetition पट, गुण: five *times* पांचपट.—*v.* वेळ अवेळ पाहणें, वेळेवार क.; regulate as to time वेळ सांगणें -नेमणें -बांधणें; ascertain the t. of -ची वेळ मोजणें; measure, as in music ताल धरणें [to]. -HONORED *a.* फार दिवसांचा ह्मणून प्रतिष्ठित मानलेला. -KEEPER घड्याळ *n*, कालयंत्र *n*; a person who keeps, marks, or regulates the time, as of the departure of conveyances घड्याळजी ? 'टैम कीपर';—in musical performances ताल धरणारा, तालLY *a.* करी. -वेळेवरचा, वक्तशीर.—*ad.* वेळे-

वारीं, समयास, वेळेस. -SERVER काळ -रंग पाहून चालणारा, समयानुसारी, कालानुरोधी. -SERVING *a.* समयानुसरण *n.* -TABLE वेळापत्रक. *n,* 'टैम टेबल' *n.*

TIMID *a.* (*timere,* to fear) भित्रा, बुजरा, भ्याड. -ITY भित्रेपणा.—TIMOROUS *a.* भित्रा, भ्याड. भयशील; भयाचा.

TIN*, the metal कथील *n*; thin plates of iron covered with tin कल्हईचे लोखंडी पत्रे *pl,* टीन *n*; money पैका, पैसा.—*v.* कल्हई क. -लावणें.

TINCAL *Hind.* टांकणखार.

TINCTURE (*tingere,* to tinge) a shade of color छटा, वास, लकेर *f*; *Med.* अर्क.—*v.* छटा -चुणूक -लकेर आणणें -देणें; imbue the mind of मनांत भरणें [with].—TINGE *v.* छटा -लकेरी आणणें -देणें, -युक्त क. [with].—*n.* छटा, लकेरी *f,* धुनक *f*; color छाया *f,* रंग.

TINDER* पेटवणें *n,* चेतवणें *n,* गूल *m, f.*

TINGLE *v. i. W.* feel a kind of thrilling sensation भणभणणें, झणझणणें, सणसणणें; feel a short thrilling pain चुरचुरणें, सळकणें, चुणचुणणें; have a slight pricking sensation मुंग्या येणें, खरख-हुळहूळ सुटणें, खाज सुटणें [with].—TINKLE *v. i.* किणकिणणें, छणछण वाजणें.—TINKER जुनीं भांडीं विकणारा.

TINSEL *F.* shining material made for ornamental purposes खोटा कलाबतू, तोई *f*; बेगड इ०; something having a false lustre बेगडी डागिणा.

TINT (*tingere,* to dye) *v.* रंग -छटा देणें [with].—*n.* रंग, छटा, लकेरी *f,* धमक *f.*

TINY *a. W.* चिंगुला, चिमकुला, चिमणा.

TIP *D.* अणी *f,* अणकुची *f,* बोंडी *f,* अग्र *n.* —*v.* अणीवर लावणें -चढवणें; टोपण -शेंबी बसविणें: to t. anything with gold [with]. —*Ger.* टिचणें, टिपणें. -CAT इटीदांडू.

TIPPLE *v. Ger.* दारू पिणें, निशाबाजी क.—TIPPLER दारूबाज, छाकटा.—TIPPLING-HOUSE कलालाचें दुकान *n.*—TIPSY *a.* झिंगलेला, मस्त; झिंगल्या सारखा झालेला, झांकेखाणारा.

TIRE*, head-dress मुगूट; attire पोशाक, आभरण *n*; iron band of a wheel धांव *f.*

TIRE* *v.* दमवणें, श्रमवणें [with].—*i.* दमणें, थकणें, श्रमणें.—TIRED श्रमलेला, भागलेला, श्रांत. -SOME *a.* श्रमाचा, कष्टाचा; tedious कंटाळा आणायाजोगा, त्रासदायक, जिकिरीचा, किचर.

TISSUE *F.* cloth interwoven with gold or silver जरीकापड *n*; connected series जाळें *n,* सुताडें *n,* रचना *f,* ग्रंथ: a t. of lies; *Anat.* शरीररचना *f.*—*v.* रचणें, विणणें.

TIT *Icel.* small horse तट्टू *n*; in contempt, a woman बायरूं *n*; a small bird लहान पक्षी, पांखरूं *n*; -t.-for-tat टीपास टीप, यमकाला यमक.

TITHE* दहावा हिस्सा, दशमांश.—*v. i.* दहावा हिस्सा देणें.—*t.* दहावा हिस्याचा कर बसविणें -घेणें (Luke xi. 42).

TITILLATE *v. i.* (*titillare*) गुदगुल्या होणें.

TITLE (*titulus*) name नांव *n*;—of a book ग्रंथनाम *n*; appellation of dignity किताब *n,* प्रतिष्ठानांव *n,* नांव *n*; claim दावा, हक्क, सत्ता *f*; t.-deeds कबाला, सनदा, खतें वगैरे कागदपत्र *n pl.*—*v.* नांव ठेवणें -देणें. -PAGE ग्रंथाच्या नांवाचें पत्र *n,* मलपृष्ठ *n,* 'टैटल पेज' *n,* मुखपत्र *n.*

TITTLE-TATTLE *Ic.* बकबक *f,* वटवट *f.*

TITULAR *a.* (See TITLE) नांवाचा, नामधारी (a king).

To* *prep.* noting access स, ला, पासीं, जवळ, कडे;—nearness to कडे, जवळ, पासीं, प्रत: he is rising *to* wealth;—extent पावेतों, तों, पर्यंत, तोंवर: to beat one *to* death; they met us *to* the number of one hundred;

—comparison हून, पेक्षां ताडून -लावून पाहिलें असतां: all that they did was piety *to* this;—addition अणखी, शिवाय, खेरीज: wisdom he has, and *to* his wisdom courage; accord प्रमाणें, सारखा: she has a husband *to* her mind;—apposition -शीं, वर: they engaged hand *to* hand; accompaniment वर: she sang *to* his guitar; *to*-day आज; *to* and fro इकडे तिकडे; मागें पुढें; *to* the face तोंडावर, समक्ष, रुबरू; *to* wit ह्मणजे; समजणें; as *to* विषयीं, संबंधीं;—as a sign of a verb स, ला, साठीं.

Toad* मोठा बेडूक, चामडेडेरक. -stool कुत्र्याचें मूत *n*, अळंबें *n*.

Toast *v.* (*torrere*, to parch) भाजणें, भाजन क.; warm thoroughly गरम क., शेक देणें: to t. the feet; drink to the health, or in honor of -चें कुशल चिंतून किंवा -च्या सन्मानार्थ दारू पिणें.—*n.* विस्तवावर भाजलेली रोटि *f*, 'तोस्त'; [the name of any person, esp. a person of distinction, in honor of whom health is drunk; anything considered worthy to be commemorated in a similar way].

Tobacco (*Sp. tabaco*, from the Indian *tabaco*, the tube or pipe in which the Indians smoked the plant, transferred by the Spaniards to the herb itself) तंबाखु *f*.

To-day* *ad.* आज, आजच्या दिवसास -सीं.—*n.* आजचा दिवस.

Toddy *Hind.* ताडी *f*.

Toe* पायाचें बोट *n*; great t. पायाचा अंगठा; little t. पायाची करंगळी *f*; space between *toes* बेचक *n*; t. ornament जोडवें *n*.

Together* *ad.* in the same place एकत्र, एका ठिकाणीं; in the same time एकेवेळेस, बराबर; in or into union संगें, संगतीं, बराबर, सुद्धां; in concert एकमतानें, मिळून; t. with संगें, संगतीं, सहवर्त्तमान [with].

Toggle *Ger.* सुरसा.

Toil* *v. i.* कष्ट -मेहनत क., खपणें [for, at].—*t.* कष्टविणें, श्रमविणें.—*n.* कष्ट, श्रम, मेहनत *f*. -some *a.* कष्टाचा, श्रमाचा, मेहनतीचा.

Token*, sign खूण *f*, लक्षण *n*, चिन्ह *n*; memorial of friendship स्नेहाची ओळख *f*, यादगिरी *f*, आठवणूक *f*; [*Print.*, ten quires of paper].

Tolerate *v.* (*tollere*, to lift up) suffer to be or to be done without prohibition परवानगी -मोकळीक देणें, मनाई न क., सहन क., नको न ह्मणणें (opinions, practices).—Toleration, Tolerance परवानगी *f*, अप्रतिबंध, मोकळीक *f*.—Tolerable *a.* supportable सोसायाजोगा, सहनीय, सह्य; moderately good चालायाजोगा, कामचलाऊ, माफक (translation).—Tolerably *ad.* बरा, बराच.—Tolerant *a.* परवानगी देणारा, अडथळा न करणारा, सहिष्णु.

Toll* जकात *f*, दस्तुरी *f*; t.-gatherer नोकदार, जकातदार; t. paid by ships on clearing out of a port पाग. -booth जकातीचा नाका, जकातकट्टा, दस्तुरी *f*.

Toll *v. W.* राहून राहून घांट वाजविणें: to t. the funeral bell.—*i.* राहून राहून (घांट) वाजणें.—*n.* राहून राहून होणारा नाद, सावकाशीचा नाद.

Tomb *F.* grave प्रेताची खांच *f*, प्रेताचा खाडा, शवगर्ता *f*; monument erected to the memory of the dead थडगें *n*, कबर *f*, समाध *f*. -stone कबर *f*.

To-morrow (*to* & *morrow*) उद्यां, उदईक *f*.—*n.* उद्यांचा दिवस.

Tom-tit (*Tom* & *tit*) एक लहान पक्षी आहे.

Tom-tom, *Hind.* टिमकी *f*.

Tone (*tonus*, sound) नाद, स्वर, आवाज; accent स्वर; *Mus.* मूर्च्छना *f*; *Med.* सुभावना *f*, सद्भावना *f*, प्रकृतीचा ताळ; temper तब्यत

f, प्रकृति *f*; tenor बोलण्याचा रोख -चें धोरण *n*, शैली *f*; general style धाटणी *f*, धाटी *f*: a low t. of morals; prevailing color of a picture चित्राचा मुख्य रंग; to recover one's healthy t. from sickness, anger, hatred, &c. प्रकृति ताळ्यावर येणें.—TONIC *a.* स्वराचा; increasing strength शक्तिवर्द्धक; *Med.* रोचक, अग्निवर्द्धक.—*n. Med.* दीपन *n*, पाचक औषध *n*; *Mus.*, the key-tone or first tone of the scale अंशस्वर; quarter t. श्रुति *f*; half t. स्वरांश.

TONGS *pl.* सांडस, चिमटा, गावी *f*.

TONGUE*, the member जीभ *f*, जिव्हा *f*, रसना *f*; speech बोलणें *n*, भाषण *n*: much t. and much judgment seldom go together; power of articulate utterance वाचा *f*, वाचाशक्ति *f*, वाणी *f*; language बोली *f*, भाषा *f*; mother t. जन्मभाषा *f*; words शब्द *pl.*, बोलणें *n*, तोंड *n* (1 John iii. 18); a nation, as distinguished by language देश, लोक;—of flame or fire आगीचा लोळ, आगीवळा, झोत;—of a bell लोळा, लोळी *f*;—of a balance कांटा; to hold the t. तोंडास खीळ घालणें; to bridle the t. तोंड आटोपणें; tip of the t. जिव्हाग्र *n*; root of the t. जिव्हेचा कांदा; projection on the side of a board which fits into a groove कुसूं *n*; narrow strip of land, projecting from the main into a sea or a lake भूशलाका *f*; taper part of anything चिंचोळा भाग, गोपुच्छ *n*.—*v. i.* बोलणें; वटवट -बडबड क. -TIED *a.* बांधलेल्या जिभेचा, बद्धजिव्ह.

TONSIL (*tonsillæ*) अमृतकळा *f pl.*

TONSURE (*tonsura*) डोई क. *n*, केंस काढणें *n*; t. of the head of a child to form the shendi चौल *n*;—the ceremony जावळ *n*, जायवळ *n*.

TOO* *ad.* over फार, फारच, अति; also ही, पण, देखील.

TOOL*, instrument of manual operation हत्यार *n*, आऊत *n*, शस्त्र *n*; any instrument of use साधन *n*, उपकरण *n*, हत्यार *n*: person used as an instrument by another person,—a word of reproach हातगुंडा, ससाणा, कुत्रा.

TOOTH* दांत, दंत;—of a comb, wheel, &c. दांत, दांता; a prong कांटा; taste रुचि *f*, चव *f*: these are not dishes for thy dainty *tooth*; to show the *teeth* धमकावणें, धमकी दाखवणें; to cast in the *teeth* तोंडावर अपमान क.; to do in the *teeth* of नाकावर पाय देणें; to the teeth of तोंडावर. -ACHE दंतशूळ, दांतदुखी *f*. -BRUSH दांत घांसायाची कुंची *f*, दांतवण *n*, इ०. -PICK दांतकोरणें *n*. -POWDER दारशिणा, दांतवण *n*.

TOP*, highest part शेंडा, माथा, शिखर *n*, अग्र *n*; utmost degree कळस, सीमा *f*; highest rank वरची पायरी *f*, पदवी *f*, मुख्य -अग्रस्थान *n*: at the t. of one's class; chief person प्रमुख, शिरोमणि, अग्रगण्य: the t. of zealots; crown of the head टक्कल *n*, माथा; upper part of the plant शेंडा, माथा; t. of a mountain शिखर *n*.—*Ger.* भोंवरा; humming t. जंगीभोंवरा; a dint struck on a t. घुंमा; the swift spinning of a t. upon one spot निधा.—*v.* वर उचलणें; rise to the top of माथ्यावर चढणें; surpass वर चढ होणें, मागें टाकणें; crop बोखा -डिचक्या तोडणें (trees); off पुरा क., कळस क.—*i.* उंच असणें; वर्चस्व असणें [by]. -KNOT बुचडा. -MOST *a.* अगदी वरचा, अग्रतम. -SY-TURVY *ad.* उलथा पालथा, उलटा सुलटा, खालवर.

TOPAZ (*topazon, Skr. tapus,* fire) a mineral पुष्पराग.

TOPIC (*topica*) विषय, प्रकरण *n*. -AL *a.* विषयाचा, प्रकरणाचा; local एकेदशी, विशेष स्थानाचा.

TOPOGRAPHY* (*Gr. topas,* place, *graphein,* to describe) स्थानवर्णन *n*, विशेष स्थलवर्णन *n*.

TORCH *F.* मशाल *f*, दिवटी *f*, टेंभा. -BEARER मशालजी.

TORMENT *F.* अति पीडा *f*, यातना *f*, तीव्र वेदना *f*.—*v.* यातना देणें, पीडा क.; tease छळणें, गांजणें [with, by, for].

TORNADO *Sp.* तुफान *n*, प्रभंजन.

TORPID *a.* (*torpere*, to be stiff) numb बहिरा, सुना, निचेत; dull मंद, सुस्त.—TORPOR सुनेपणा, बधिरपणा; मंदपणा, सुस्ती *f*.

TORRENT (*torrens*, boiling) a violent or rapid stream मुसंडा, झोत, लोंढा; rapid flow ओघ, धार *f*, धारा *f*: t. of vices and follies.

TORRID *a.* (*torrere*, to parch) उनानें वाळलेला -करपलेला, रुक्ष (plain); dried with heat उनानें वाळलेला -करपलेला (plain); t. zone उष्ण कटिबंध.

TORT (*tortus*, twisted) *Law*, a wrongful act for which an action will lie अपकृत्य *n*.

TORTOISE (*tortus*, crooked) कांसव *n*, कूर्म *n*. -SHELL कचकडा, कांसवाची पाठ *f* -पाठीचें हाड *n*.

TORTURE (*torquere*, to twist) extreme pain अति दुःख *n*, वेदना *f*, व्यथा *f*, यातना *f*, हाल *pl*; severe pain inflicted judicially कठीण शिक्षा *f*, राखेचा तोबरा, मिरच्यांची धुरी *f* इ०.—*v.* शरिरास फार दुःख -यातना देणें, हाल क.; अति क्रूर -भारी शिक्षा क., उरावर धोंड देणें, टिपऱ्या लावणें, चरकांत घालणें इ० [by, with].

TOSS *v. W.* throw with the hand टाकणें, उडवणें, फेंकणें;—the head कोलणें, वर क.; cause to rise and fall खालींवर क.: to be *tossed* on the waves; agitate खवळणें; harrass त्रास देणें, छळणें, कष्टी क., भागवणें; keep in play खेळवणें, चाळवणें.—*i.* तळमळणें, तडफडणें;—in passion धडफडणें, तडफडणें; to t. up, to throw a coin into the air and wager on what side it will fall छापतराजू खेळणें.—*n.* कोलणें *n*, फेंकणें *n*; उडवाउडव *f*, उलथापालथ *f*. -ING तळमळ *f*, तडफड *f*; t. and stamping wildly आदळआपट *f*, अदळाअदळ *f*.

TOTAL *a.* (*totus*, all) सर्व, सगळा; entire पूर्ण, पुरा, अखंड.—*n.* बेरीज *f*, जुमला, एकंदर आकार; grand t. of an account मखलाशी *f*. -ITY एकंदर जमा *f*, आकार; समग्रता *f*, परिपूर्णता *f*. -LY *ad.* अगदी, बिलकुल, तमाम.

TOTTER* *v. i.* vacillate डकडकणें, डळमळणें, लटपटणें; झोकत -झोके खात चालणें; shake कांपणें, लटलटणें [about].

TOUCH *v.* (*tangere*) come in contact with स्पर्श क., हात लावणें, शिवणें; perceive by the sense of feeling स्पर्शणें, स्पर्शज्ञान होणें: nothing but body can be *touched*; reach पावणें, पोंचणें: to t. the shores; concern संबंध असणें, लागणें: the quarrel *toucheth* none but thee alone; handle slightly हात -बोट लावणें, स्पर्श क.; meddle with हात घालणें: I have not *touched* the books; melt वेधणें, द्रवणें, कळवळा आणणें: the father was *touched* with what he said; make an impression on ठसा उठवणें, छाप मारणें: it is so hard that the file will not t. it; play on छडणें, वाजविणें: they *touched* their harps; perform, as a tune राग गाणें; afflict दुःख देणें, छडणें: we have not *touched* thee; up ओजवणें, सुधारणें [with].—*i.* लागणें, शिवणें, भिडणें: two spheres t. only at points; treat anything slightly in discourse गोष्ट -उहू काढणें [on, up]; at ओरवा -बंदर क.—*n.* contact स्पर्श; the sense of feeling स्पर्शेंद्रिय *n*, स्पर्श; power of exciting the affections चित्तवेधक -वेधण्याची शक्ति *f*, रस, भाव; emotion रस, भाव; stroke चटका, तडाखा; censure बोल, शब्द; single stroke on a drawing हात; feature स्वरूप *n*; act of the hand on a musical instrument वाद्यावर बोटांचा

-हाताचा चाळा; musical notes स्वर *pl*, मातृका *f pl*; a little धुनुक *f*, छाया: I have a *t.* of your conscience; hint सूचना *f*; taste पारख *f*, परीक्षा *f*, कस. -HOLE—of a fire-arm काना, कान, कोरप *n*. -STONE कसोटी *f*; —for gold वरकल *f*. -WOOD चेतवण *n*, पूड *f*. —TOUCHY *a*. चिरडखोर, शीघ्रकोपी; to be t. फुटाण्या सारखा उडणें.

TOUGH* *a*. not brittle वातड, चिवट; as wood, grass, &c. चिकण, निबर, टणक; tenacious चिवट, लोंचट; strong कणखर, टणक.

TOUR (*tornus*, turner's wheel) going round प्रदक्षिणा *f*; journey in a circuit परिभ्रमण *n*, फेरा, पर्यटन *n*. -IST पर्यटन करणारा, परिभ्रमणकारी.

TOURNAMENT *F*. mock fight भालेकरोली *f*.

TOW* तागाचें बुरकुल *n*.—*v*. दोरी लावून ओढणें. [along]. -AGE दोरी लावून ओढणें *n*.

TOWARD *prep*. (*to & ward*) कडे; with respect to विषयीं, वर, कडे.

TOWEL *F*. हातपुसणें *n*, रुमाल, फडकें *n*.

